<poem> श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीपादश्रीवल्लभाय नमः । श्रीनृसिंहसरस्वत्यै नमः ।
ॐ नमोजी विघ्नहरा । गजानना गिरिजाकुमरा । जय जय लंबोदरा । एकदंता शूर्पकर्णा ॥१॥
हालविशी कर्णयुगुले । तेथूनि जो का वारा उसळे । त्याचेनि वाते विघ्न पळे । विघ्नांतक म्हणती तुज ॥२॥
तुझे शोभे आनन । जैसे तप्त कांचन । किंवा उदित प्रभारमण । तैसे तेज फाकतसे ॥३॥
विघ्नकाननच्छेदनासी । हाती फरश धरिलासी । नागबंद कटीसी । उरग यज्ञोपवीत ॥४॥
चतुर्भुज दिससी निका । विशालाक्षा विनायका । प्रतिपाळिसी विश्वलोका । निर्विघ्ने करूनिया ॥५॥
तुझे चिंतन जे करिती । तया विघ्ने न बाधती । सकळाभीष्टे साधती । अविलंबेसी ॥६॥
सकळ मंगल कार्यासी । प्रथम वंदिजे तुम्हासी । चतुर्दश विद्यांसी । स्वामी तूचि लंबोदरा ॥७॥
वेद शास्त्रे पुराणे । तुझेचि असेल बोलणे । ब्रह्मादिकि या कारणे । स्तविला असे सुरवरी ॥८॥
त्रिपुर साधन करावयासी । ईश्वरे अर्चिले तुम्हासी । संहारावया दैत्यांसी । पहिले तुम्हांसी स्तविले ॥९॥
हरिहर ब्रह्मादिक गणपती । कार्यारंभी तुज वंदिती । सकळाभीष्टे साधती । तुझेनि प्रसादे ॥१०॥
कृपानिधी गणनाथा । सुरवरादिका विघ्नहर्ता । विनायका अभयदाता । मतिप्रकाश करी मज ॥११॥
समस्त गणांचा नायक । तूचि विघ्नांचा अंतक । तूते वंदिती जे लोक । कार्य साधे तयांचे ॥१२॥
सकळ कार्या आधारू । तूचि कृपेचा सागरू । करुणानिधि गौरीकुमरू । मतिप्रकाश करी मज ॥१३॥
माझे मनींची वासना । तुवा पुरवावी गजानना । साष्टांग करितो नमना । विद्या देई मज आता ॥१४॥
नेणता होतो मतिहीन । म्हणोनि धरिले तुझे चरण । चौदा विद्यांचे निधान । शरणागतवरप्रदा ॥१५॥
माझिया अंतःकरणीचे व्हावे । गुरुचरित्र कथन करावे । पूर्णदृष्टीने पहावे । ग्रंथसिद्धि पाववी दातारा ॥१६॥
आता वंदू ब्रह्मकुमारी । जिचे नाम वागीश्वरी । पुस्तक वीना जिचे करी । हंसवाहिनी असे देखा ॥१७॥
म्हणोनि नमतो तुझे चरणी । प्रसन्न व्हावे मज स्वामिणी । राहोनिया माझिये वाणी । ग्रंथी रिघू करी आता ॥१८॥
विद्या वेद शास्त्रांसी । अधिकार जाणा शारदेशी । तिये वंदिता विश्वासी । ज्ञान होय अवधारा ॥१९॥
ऐक माझी विनंती । द्यावी आता अवलीला मती । विस्तार करावया गुरुचरित्री । मतिप्रकाश करी मज ॥२०॥
जय जय जगन्माते । तूचि विश्वी वाग्देवते । वेदशास्त्रे तुझी लिखिते । नांदविशी येणेपरी ॥२१॥
माते तुझिया वाग्बाणी । उत्पत्ति वेदशास्त्रपुराणी । वदता साही दर्शनी । त्यांते अशक्य परियेसा ॥२२॥
गुरूचे नामी तुझी स्थित । म्हणती नृसिंहसरस्वती । याकारणे मजवरी प्रीति । नाम आपुले म्हणूनी ॥२३॥
खांबसूत्रींची बाहुली जैसी । खेळती तया सूत्रासरसी । स्वतंत्रबुधि नाही त्यांसी । वर्तती आणिकाचेनि मते ॥२४॥
तैसे तुझेनि अनुमते । माझे जिव्हे प्रेरीमाते । कृपानिधि वाग्देवते । म्हणोनि विनवी तुझा बाळ ॥२५॥
म्हणोनि नमिले तुझे चरण । व्हावे स्वामिणी प्रसन्न । द्यावे माते वरदान । ग्रंथी रिघू करवी आता ॥२६॥
आता वंदू त्रिमूर्तीसी । ब्रह्माविष्णुशिवांसी । विद्या मागे मी तयासी । अनुक्रमे करोनी ॥२७॥
चतुर्मुखे असती ज्यासी । कर्ता जो का सृष्टीसी । वेद झाले बोलते ज्यासी । त्याचे चरणी नमन माझे ॥२८॥
आता वंदू हृषीकेशी । जो नायक त्या विश्वासी । लक्ष्मीसहित अहर्निशी । क्षीरसागरी असे जाणा ॥२९॥
चतुर्बाहु नरहरी । शंख चक्र गदा करी । पद्महस्त मुरारी । पद्मनाभ परियेसा ॥३०॥
पीतांबर असे कसियेला । वैजयंती माळा गळा । शरणागता अभीष्ट सकळा । देता होय कृपाळू ॥३१॥
आता नमू शिवासी । धरिली गंगा मस्तकेसी । पंचवक्त्र दहा भुजेसी । अर्धांगी असे जगन्माता ॥३२॥
पंचवदने असती ज्यासी । संहारी जो या सृष्टीसी । म्हणोनि बोलती स्मशानवासी । त्याचे चरणी नमन माझे ॥३३॥
व्याघ्रांबर पांघरून । सर्वांगी असे सर्पवेष्टण । ऐसा शंभु उमारमण । त्याचे चरणी नमन माझे ॥३४॥
नमन समस्त सुरवरा । सिद्धसाध्यां अवधारा । गंधर्वयक्षकिन्नरा । ऋषीश्वरा नमन माझे ॥३५॥
वंदू आता कविकुळासी । पराशरादि व्यासांसी । वाल्मीकादि सकळिकांसी । नमन माझे परियेसा ॥३६॥
नेणे कवित्व असे कैसे । म्हणोनि तुम्हा विनवितसे । ज्ञान द्यावे जी भरवसे । आपुला दास म्हणोनि ॥३७॥
न कळे ग्रंथप्रकार । नेणे शास्त्रांचा विचार । भाषा नये महाराष्ट्र । म्हणोनि विनवी तुम्हासी ॥३८॥
समस्त तुम्ही कृपा करणे । माझिया वचना साह्य होणे । शब्दब्युत्पत्तीही नेणे । कविकुळ तुम्ही प्रतिपाळा ॥३९॥
ऐसे सकळिकां विनवोनि । मग ध्याइले पूर्वज मनी । उभयपक्ष जनकजननी । माहात्म्य पुण्यपुरुषांचे ॥४०॥
आपस्तंबशाखेसी । गोत्र कौंडिण्य महाऋषि । साखरे नाम ख्यातिशी । सायंदेवापासाव ॥४१॥
त्यापासूनि नागनाथ । देवराव तयाचा सुत । सदा श्रीसद्गुरुचरण ध्यात ॥ गंगाधर जनक माझा ॥४२॥
नमन करिता जनकचरणी । मातापूर्वज ध्यातो मनी । जो का पूर्वज नामधारणी । आश्वलायन शाखेचा ॥४३॥
काश्यपाचे गोत्री । चौंडेश्वरी नामधारी । वागे जैसा जन्हु अवधारी । अथवा जनक गंगेचा ॥४४॥
त्याची कन्या माझी जननी । निश्चये जैशी भवानी । चंपा नामे पुण्यखाणी । स्वामिणी माझी परियेसा ॥४५॥
नमिता जनकजननीसी । नंतर नमू श्रीगुरुसी । घाली मति प्रकाशी । गुरुचरण स्मरावया ॥४६॥
गंगाधराचे कुशी । जन्म झाला परियेसी । सदा ध्याय श्रीगुरुसी । एका भावे निरंतर ॥४७॥
म्हणोनि सरस्वतीगंगाधर । करी संतांसी नमस्कार । श्रोतया विनवी वारंवार । क्षमा करणे बाळकासी ॥४८॥
वेदाभ्यासी संन्यासी । यती योगेश्वर तापसी । सदा ध्याती श्रीगुरुसी । तयांसी माझा नमस्कार ॥४९॥
विनवितसे समस्तांसी । अल्पमती आपणासी । माझे बोबडे बोलांसी । सकळ तुम्ही अंगिकारा ॥५०॥
तावन्मात्र माझी मति । नेणे काव्यव्युत्पत्ति । जैसे श्रीगुरु निरोपिती । तेणे परी सांगत ॥५१॥
पूर्वापार आमुचे वंशी । गुरु प्रसन्न अहर्निशी । निरोप देती माते परियेसी । चरित्र आपुले विस्तारावया ॥५२॥
म्हणे ग्रंथ कथन करी । अमृतघट स्वीकारी । तुझे वंशी परंपरी । लाधती चारी पुरुषार्थ ॥५३॥
गुरुवाक्य मज कामधेनु । मनी नाही अनुमानु । सिद्धि पावविणार आपणु । श्रीनृसिंहसरस्वती ॥५४॥
त्रैमूर्तीचा अवतार । झाला नृसिंहसरस्वती नर । कवण जाणे याचा पार । चरित्र कवणा न वर्णवे ॥५५॥
चरित्र ऐसे श्रीगुरुचे । वर्णू न शके मी वाचे । आज्ञापन असे श्रीगुरुचे । म्हणोनि वाचे बोलतसे ॥५६॥
ज्यास पुत्रपौत्री असे चाड । त्यासी कथा हे असे गोड । लक्ष्मी वसे अखंड । तया भुवनी परियेसा ॥५७॥
ऐशी कथा जयाचे घरी । वाचिती नित्य प्रेमभरी । श्रियायुक्त निरंतरी । नांदती पुत्रकलत्रयुक्त ॥५८॥
रोग नाही तया भुवनी । सदा संतुष्ट गुरुकृपेकरोनि । निःसंदेह साता दिनी । ऐकता बंधन तुटे जाणा ॥५९॥
ऐसी पुण्यपावन कथा । सांगेन ऐक विस्तारता । सायासाविण होय साध्यता । सद्यःफल प्राप्त होय ॥६०॥
निधान लाधे अप्रयासी । तरी कष्ट का सायासी । विश्वास माझिया बोलासी । ऐका श्रोते एकचित्ते ॥६१॥
आम्हा साक्षी ऐसे घडले । म्हणोनि विनवितसे बळे । श्रीगुरुस्मरण असे भले । अनुभवा हो सकळिक ॥६२॥
तृप्ति झालियावरी ढेकर । देती जैसे जेवणार । गुरुमहिमेचा उद्गार । बोलतसे अनुभवोनि ॥६३॥
मी सामान्य म्हणोनि । उदास व्हाल माझे वचनी । मक्षिकेच्या मुखांतुनी । मधु केवी ग्राह्य होय ॥६४॥
जैसे शिंपल्यांत मुक्ताफळ । अथवा कर्पूर कर्दळ । विचारी पा अश्वत्थमूळ । कवणापासावउत्पत्ति ॥६५॥
ग्रंथ कराल उदास । वाकुड कृष्ण दिसे ऊस । अमृतवत निघे त्याचा रस । दृष्टि द्यावी तयावरी ॥६६॥
तैसे माझे बोलणे । ज्याची चाड गुरुस्मरणे । अंगिकार करणार शहाणे । अनुभविती एकचित्ते ॥६७॥
ब्रह्मरसाची गोडी । अनुभवितां फळें रोकडी । या बोलाची आवडी । ज्यासी संभवे अनुभव ॥६८॥
गुरुचरित्र कामधेनु । ऐकता होय महाज्ञानु । श्रोती करोनिया सावध मनु । एकचिते परियेसा ॥६९॥

तयां ग्रामी वसती गुरु । म्हणोनि महिमा असे थोरु । जाणती लोक चहू राष्ट्र । समस्त जाती यात्रेसी ॥७१॥
तेथे राहोनि आराधिती । त्वरित होय फलप्राप्ति । पुत्र दारा धन संपत्ति । जै जे इच्छिले होय जना ॥७२॥
लाधोनिया संताने । नामे ठेविती नामकरणे । संतोषरूपे येऊन । पावती चारी पुरुषार्थ ॥७३॥
ऐसे असता वर्तमानी । भक्त एक 'नामकरणी' । कष्टतसे अति गहनी । सदा ध्याय श्रीगुरुसी ॥७४॥
ऐसा मनी व्याकुळित । चिंतेने वेष्टिला बहुत । गुरुदर्शना जाऊ म्हणत । निर्वाणमानसे निघाला ॥७५॥
अति निर्वाण अंतःकरणी । लय होवोनि गुरुचरणी । जातो शिष्यशिरोमणी । विसरोनिया क्षुधातृषा ॥७६॥
निर्धार करोनि मानसी । म्हणे पाहीन श्रीगुरुसी । अथवा सांडीन देहासी । जडस्वरूपे काय काज ॥७७॥
ज्याचे नामस्मरण करिता । दैन्यहानि होय त्वरिता । आपण तैसा नामांकिता । किंकर म्हणतसे ॥७८॥
दैव असे आपुले उणे । तरी का भजावे श्रीगुरुचरण । परिस लावता लोहा जाण । सुवर्ण केवी होतसे ॥७९॥
तैसे तुझे नाम परिसे । माझे हृदयी सदा वसे । माते कष्टी सायासे । ठेविता लाज कवणासी ॥८०॥
या बोलाचिया हेवा । मनी धरोनि पहावा । गुरुमूर्ती सदाशिवा । कृपाळू बा सर्वभूती ॥८१॥
अतिव्याकुळ अंतःकरणी । निंदास्तुति आपुली वाणी । कष्टला भक्त नामकरणी । करिता होय परियेसा ॥८२॥
राग स्वेच्छा ओवीबद्ध म्हणावे । आजि पाहुणे पंढरीचे रावे । वंदू विघ्नहरा भावे । नमू ते सुंदरा शारदेसी ॥८३॥
गुरूची त्रैमूर्ति । म्हणती वेदश्रुति । सांगती दृष्टान्ती । कलियुगात ॥८४॥
कलियुगात ख्याति । श्रीनृसिंहसरस्वती । भक्तांसी सारथी । कृपासिंधू ॥८५॥
कृपासिंधु भक्ता । वेद वाखाणिता । त्रयमूर्ति गुरुनाथा । म्हणोनिया ॥८६॥
त्रयमूर्तीचे गुण । तू एक निधान । भक्तांसी रक्षण । दयानिधि ॥८७॥
दयानिधि यती । विनवितो मी श्रीपती । नेणे भावभक्ति । अंतःकरणी ॥८८॥
अंतःकरणी स्थिरु । नव्हे बा श्रीगुरु । तू कृपासागरु । पाव वेगी ॥८९॥
पाव वेगी आता । नरहरी अनंता । बाळालागी माता । केवी टाकी ॥९०॥
तू माता तू पिता । तूचि सखा भ्राता । तूचि कुळदेवता । परंपरी ॥९१॥
वंशपरंपरी । धरूनि निर्धारी । भजतो मी नरहरी । सरस्वतीसी ॥९२॥
सरस्वती नरहरी । दैन्य माझे हरी । म्हणूनि मी निरंतरी । सदा कष्टे व९३॥
सदा कष्ट चित्ता । का हो देशी आता । कृपासिंधु भक्ता । केवी होसी ॥९४॥
कृपासिंधु भक्ता । कृपाळू अनंता । त्रयमूर्ति जगन्नाथा । दयानिधी ॥९५॥
त्रयमूर्ति तू होसी । पाळिसी विश्वासी । समस्त देवांसी । तूचि दाता ॥९६॥
समस्ता देवांसी । तूचि दाता होसी । मागो मी कवणासी । तुजवांचोनी ॥९७॥
तुजवाचोनी आता । असे कवण दाता । विश्वासी पोषिता । सर्वज्ञ तू ॥९८॥
सर्वज्ञाची खूण । असे हे लक्षण । समस्तांचे जाणे । कवण ऐसा ॥९९॥
सर्वज्ञ म्हणोनि । वानिती पुराणी । माझे अंतःकरणी । न ये साक्षी ॥१००॥
कवण कैशापरी । असती भूमीवरी । जाणिजेचि तरी । सर्वज्ञ तो ॥१॥
बाळक तान्हये । नेणे बापमाये । कृपा केवी होय । मातापित्या ॥२॥
दिलियावांचोनि । न देववे म्हणोनि । असेल तुझे मनी । सांग मज ॥३॥
समस्त महीतळी । तुम्हा दिल्हे बळी । त्याते हो पाताळी । बैसविले ॥४॥
सुवर्णाची लंका । तुवा दिल्ही एका । तेणे पूर्वी लंका । कवणा दिल्ही ॥५॥
अढळ ध्रुवासी । दिल्हे हृषीकेशी । त्याने हो तुम्हासी । काय दिल्हे ॥६॥
निःक्षत्र करूनी । विप्राते मेदिनी । देता तुम्हा कोणी । काय दिल्हे ॥७॥
सृष्टीचा पोषक । तूचि देव एक । तूते मी मशक । काय देऊ ॥८॥
नाही तुम्हा जरी । श्रीमंत नरहरी । लक्ष्मी तुझे घरी । नांदतसे ॥९॥
याहोनी आम्हासी । तू काय मागसी । सांग हृषीकेशी । काय देऊ ॥११०॥
मातेचे वोसंगी । बैसोनिया बाळ वेगी । पसरी मुखसुरंगी । स्तनकांक्षेसी ॥११॥
बाळापासी माता । काय मागे ताता । ऐक श्रीगुरुनाथा । काय देऊ ॥१२॥
घेऊनिया देता । नाम नाही दाता । दयानिधि म्हणता । बोल दिसे ॥१३॥
देऊ न शकसी । म्हणे मी मानसी । चौदाही भुवनासी । तूचि दाता ॥१४॥
तुझे मनी पाही । वसे आणिक काही । सेवा केली नाही । म्हणोनिया ॥१५॥
सेवा घेवोनिया । देणे हे सामान्य । नाम नसे जाण । दातृत्वासी ॥१६॥
तळी बावी विहिरी । असती भूमीवरी । मेघ तो अंबरी । वर्षतसे ॥१७॥
मेघाची ही सेवा । न करिता स्वभावा । उदकपूर्ण सर्वा । केवी करी ॥१८॥
सेवा अपेक्षिता । बोल असे दाता । दयानिधि म्हणता । केवी साजे ॥१९॥
नेणे सेवा कैसी । स्थिर होय मानसी । माझे वंशोवंशी । तुझे दास ॥१२०॥
माझे पूर्वजवंशी । सेविले तुम्हांसी । संग्रह बहुवसी । तुझे चरणी ॥२१॥
बापार्चे सेवेसी । पाळिती पुत्रासी । तेवी त्वा आम्हासी । प्रतिपाळावे ॥२२॥
माझे पूर्वधन । तुम्ही द्यावे ऋण । का बा नये करुणा । कृपासिंधु ॥२३॥
आमुर्चे आम्ही घेता । का बा नये चित्ता । मागेन मी सत्ता । घेईन आता ॥२४॥
आता मज जरी । न देसी नरहरी । जिंतोनि वेव्हारी । घेईन जाणा ॥२५॥
दिसतसे आता । कठिणता गुरुनाथा । दास मी अंकिता । सनातन ॥२६॥
आपुले समान । असेल कवण । तयासवे मन । कठिण कीजे ॥२७॥
कठीण कीजे हरी । तुवा दैत्यांवरी । प्रल्हाद कैवारी । सेवकांसी ॥२८॥
सेवका बाळकासी । करू नये ऐसी । कठिणता परियेसी । बरवे न दिसे ॥२९॥
माझिया अपराधी । धरोनिया बुद्धि । अंतःकरण क्रोधी । पहासी जरी ॥१३०॥
बाळक मातेसी । बोले निष्ठुरेसी । अज्ञाने मायेसी । मारी जरी ॥३१॥
माता त्या कुमारासी । कोप न धरी कैशी । आलिंगोनि हर्षी । संबोखी पा ॥३२॥
कवण्या अपराधेसी । न घालिसी आम्हासी । अहो हृषीकेशी । सांगा मज ॥३३॥
माता हो कोपासी । बोले बाळकासी । जावोनि पितयासी । सांगे बाळ ॥३४॥
माता कोपे जरी । एखादे अवसरी । पिता कृपा करी । संबोखूनि ॥३५॥
तू माता तू पिता । कोपसी गुरुनाथा । सांगो कवणा आता । क्षमा करी ॥३६॥
तूचि स्वामी ऐसा । जगी झाला ठसा । दास तुझा भलतैसा । प्रतिपाळावा ॥३७॥
अनाथरक्षक । म्हणती तुज लोक । मी तुझा बाळक । प्रतिपाळावे ॥३८॥
कृपाळु म्हणोनि । वानिती पुराणी । माझे बोल कानी । न घालिसीच ॥३९॥
नायकसी गुरुराणा । माझे करुनावचना । काय दुश्चितपणा । तुझा असे ॥४०॥

करुणा करी ऐसे । वानिती तुज पिसे । अजुनी तरी कैसे । कृपा न ये ॥४२॥
ऐसे नामांकित । विनविता त्वरित । कृपाळु श्रीगुरुनाथ । आले वेगी ॥४३॥
वत्सालागी धेनु । जैशी ये धावोनु । तैसे श्रीगुरु आपणु । आले जवळी ॥४४॥
येतांचि गुरुमुनि । वंदी नामकरणी । मस्तक ठेवोनि । चरणयुग्मी ॥४५॥
केश तो मोकळी । झाडी चरणधुळी । आनंदाश्रुजळी । अंघ्रि क्षाळी ॥४६॥
हृदयमंदिरात । बैसवोनि व्यक्त । पूजा उपचारित । षोडशविधि ॥४७॥
आनंदभरित । झाला नामांकित । हृदयी श्रीगुरुनाथ । स्थिरावला ॥४८॥
भक्तांच्या हृदयांत । राहे श्रीगुरुनाथ । संतोष बहुत । सरस्वतीसी ॥४९॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे मंगलाचरणं नाम प्रथमोऽध्यायः ॥१॥
ओवीसंख्या १४९
॥श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु॥

<poem> श्रीगणेशाय नमः ।
त्रैमूर्तिराजा गुरु तूचि माझा । कृष्णातिरी वास करोनि वोजा । सुभक्त तेथे करिती आनंदा । ते सुर स्वर्गी पहाती विनोदा ॥१॥
ऐसे श्रीगुरुचरण ध्यात । जातां विष्णुनामांकित । अति श्रमला चालत । राहिला एका वृक्षातळी ॥२॥
क्षण एक निद्रिस्त । मनी श्रीगुरु चिंतित । कृपानिधि अनंत । दिसे स्वप्नी परियेसा ॥३॥
रूप दिसे सुषुप्तीत । जटाधारी भस्मांकित । व्याघ्रचर्म परिधानित । पीतांबर कासे देखा ॥४॥
येऊनि योगीश्वर जवळी । भस्म लाविले कपाळी । आश्वासूनि तया वेळी । अभयकर देतसे ॥५॥
इतुके देखोनि सुषुप्तीत । चेतन झाला नामांकित । चारी दिशा अवलोकित । विस्मय करी तया वेळी ॥६॥
मूर्ति देखिली सुषुप्तीत । तेचि ध्यातसे मनात । पुढे निघाला मार्ग क्रमित । प्रत्यक्ष देखे तैसाचि ॥७॥
देखोनिया योगीशाते । करिता झाला दंडवते । कृपा भाकी करुणवक्त्रे । माता पिता तू म्हणतसे ॥८॥
जय जयाजी योगाधीशा । अज्ञानतमविनाशा । तू ज्योतिःप्रकाशा । कृपानिधि सिद्धमुनी ॥९॥
तुझे दर्शने निःशेष । गेले माझे दुरितदोष । तू तारक आम्हास । म्हणोनि आलासि स्वामिया ॥१०॥
कृपेने भक्तालागुनी । येणे झाले कोठोनि । तुमचे नाम कवण मुनि । कवणे स्थानी वास तुम्हा ॥११॥
सिद्ध म्हणे आपण योगी । हिंडो तीर्थ भूमीस्वर्गी । प्रसिद्ध आमुचा गुरु जनी । नृसिंहसरस्वती विख्यात ॥१२॥
त्यांचे स्थान गाणगापूर । अमरजासंगम भीमातीर । त्रयमूर्तीचा अवतार । श्रीनृसिंहसरस्वती ॥१३॥
भक्त तारावयालागी । अवतार त्रयमूर्ति जगी । सदा ध्याती अभ्यासयोगी । भवसागर तरावया ॥१४॥
ऐसा श्रीगुरु कृपासिंधु । भक्तजना सदा वरदु । अखिल सौख्य श्रियानंदु । देता होय शिष्यवर्गा ॥१५॥
त्याचे भक्ता कैंचे दैन्य । अखंड लक्ष्मी परिपूर्ण । धनधान्यादि गोधन । अष्टैश्वर्ये नांदती ॥१६॥
ऐसे म्हणे सिद्ध मुनि । ऐकोनि विनवी नामकरणी । आम्ही असती सदा ध्यानी । तया श्रीगुरुयतीचे ॥१७॥
ऐशी कीर्ति ब्रीद ख्याति । सांगतसे सिद्ध यति । वंशोवंशी करितो भक्ति । कष्ट आम्हा केवी पाहे ॥१८॥
तू तारक आम्हांसी । म्हणोनि माते भेटलासी । संहार करोनि संशयासी । निरोपावे स्वामिया ॥१९॥
सिद्ध म्हणे तये वेळी । ऐक शिष्या स्तोममौळी । गुरुकृपा सूक्ष्मस्थूळी । भक्तवत्सल परियेसा ॥२०॥
गुरुकृपा होय ज्यासी । दैन्य दिसे कैचे त्यासी । समस्त देव त्याचे वशी । कळिकाळासी जिंके नर ॥२१॥
ऐसी वस्तु पूजूनी । दैन्यवृत्ति सांगसी झणी । नसेल तुजे निश्चय मनी । म्हणोनि कष्ट भोगितोसी ॥२२॥
त्रयमूर्ति श्रीगुरु । म्हणोनि जाणिजे निर्धारू । देऊ शकेल अखिल वरू । एका भावे भजावे ॥२३॥
एखादे समयी श्रीहरि । अथवा कोपे त्रिपुरारि । रक्षील श्रीगुरु निर्धारी । आपुले भक्तजनांसी ॥२४॥
आपण कोपे एखाद्यासी । रक्षू न शके व्योमकेशी । अथवा विष्णु परियेसी । रक्षू न शके अवधारी ॥२५॥
ऐसे ऐकोनि नामकरणी । लागे सिद्धाचिया चरणी । विनवीतसे कर जोडुनी । भक्तिभावे करोनिया ॥२६॥
स्वामी ऐसा निरोप देती । संदेह होता माझे चित्ती । गुरु केवी झाले त्रिमूर्ति । ब्रह्मा विष्णु महेश्वर ॥२७॥
आणीक तुम्ही निरोपिलेती । विष्णु रुद्र जरी कोपती । राखो शके गुरु निश्चिती । गुरु कोपलिया न रक्षी कोणी ॥२८॥
हा बोल असे कवणाचा । कवण शास्त्रपुराणींचा । संदेह फेडी गा मनाचा । जेणे मन दृढ होय ॥२९॥
येणेपरी नामकरणी । सिद्धांसी पुसे वंदोनि । कृपानिधि संतोषोनि । सांगतसे परियेसा ॥३०॥
सिद्ध म्हणे शिष्यासी । तुवा पुसिले आम्हांसी वेदवाक्य साक्षीसी । सांगेन ऐका एकचित्ते ॥३१॥
वेद चारी उत्पन्न । झाले ब्रह्मयाचे मुखेकरून । त्यापासाव पुराण । अष्टादश विख्यात ॥३२॥
तया अष्टादशांत । ब्रह्मवाक्य असे ख्यात । पुराण ब्रह्मवैवर्त । प्रख्यात असे त्रिभुवनी ॥३३॥
नारायण विष्णुमूर्ति । व्यास झाला द्वापारांती । प्रकाश केला या क्षिती । ब्रह्मवाक्यविस्तारे ॥३४॥
तया व्यासापासुनी । ऐकिले समस्त ऋषिजनी । तेचि कथा विस्तारोनि । सांगेन ऐका एकचित्ती ॥३५॥
चतुर्मुख ब्रह्मयासी । कलियुग पुसे हर्षी । गुरुमहिमा विनवीतसे करद्वय जोडोनि । भावभक्ति करोनिया ॥३७॥
म्हणे सिद्धा योगीश्वरा । अज्ञानतिमिरभास्करा । तू तारक भवसागरा । भेटलासी कृपासिंधु ॥३८॥
ब्रह्मदेवे कलियुगासी । सांगितले केवी कार्यासी । आद्यंत विस्तारेसी । निरोपिजे स्वामिया ॥३९॥
ऐक शिष्या एकचित्ता । जधी प्रळय झाला होता । आदिमूति निश्चिता । होते वटपत्रशयनी ॥४०॥
अव्यक्तमूर्ति नारायण । होते वटपत्री शयन । बुद्धि संभवे चेतन । आणिक सृष्टि रचावया ॥४१॥
प्रपंच म्हणजे सृष्टिरचना । करणे म्हणोनि आले मना । जागृत होय या कारणा । आदिपुरुष तये वेळी ॥४२॥
जागृत होवोनि नारायण । बुद्धि संभवे चेतन । कमळ उपजवी नाभीहून । त्रैलोक्याचे रचनाघर ॥४३॥
तया कमळामधून । उदय झाला ब्रह्मा आपण । चारी दिशा पाहोन । चतुर्मुख झाला देखा ॥४४॥
म्हणे ब्रह्मा तये वेळी । समस्ताहुनी आपण बळी । मजहून आणिक बळी । कवण नाही म्हणतसे ॥४५॥
हासोनिया नारायणु । बोले वाचे शब्दवचनु । आपण असे महाविष्णु । भजा म्हणे तया वेळी ॥४६॥
देखोनिया श्रीविष्णुसी । नमस्कारी ब्रह्मा हर्षी । स्तुति केली बहुवसी । अनेक काळ परियेसा ॥४७॥
संतोषोनि नारायण । निरोप दिधला अतिगहन । सृष्टि रची गा म्हणून । आज्ञा दिधली तये वेळी ॥४८॥
ब्रह्मा म्हणे विष्णुसी । नेणे सृष्टि रचावयासी । देखिली नाही कैसी । केवी रचू म्हणतसे ॥४९॥
ऐकोनि ब्रह्मयाचे वचन । निरोपि त्यासी महाविष्णु आपण । वेद असती हे घे म्हणोन । देता झाला तये वेळी ॥५०॥
सृष्टि रचावयाचा विचार । असे वेदांत सविस्तार । तेणेचि परी रचुनी स्थिर । प्रकाश करी म्हणितले ॥५१॥
अनादि वेद असती जाण । असे सृष्टीचे लक्षण । जैसा आरसा असे खूण । सृष्टि रचावी तयापरी ॥५२॥
या वेदमार्गे सृष्टीसी । रची गा ब्रह्मया अहर्निशी । म्हणोनि सांगे हृषीकेशी । ब्रह्मा रची सृष्टिते ॥५३॥
सृजी प्रजा अनुक्रमे । विविध स्थावरजंगमे । स्वेदज अंडज नामे । जारज उद्भिजे उपजविले ॥५४॥
श्रीविष्णुचे निरोपाने । त्रिजग रचिले ब्रह्मयाने । ज्यापरी सृष्टिक्रमणे । व्यासे ऐसी कथियेली ॥५५॥
सिद्ध म्हणे शिष्यासी । नारायण वेदव्यास ऋषि । विस्तार केला पुराणांसी । अष्टादश विख्यात ॥५६॥
तया अष्टादशांत । पुराण ब्रह्मवैवर्त । ऋषेश्वरासी सांगे सूत । तेचि परी सांगतसे ॥५७॥
सनकादिकांते उपजवोनि । ब्रह्मनिष्ठ निर्गुणी । मरीचादि ब्रह्म सगुणी । उपजवी ब्रह्मा तये वेळी ॥५८॥
तेथोनि देवदैत्यांसी । उपजवी ब्रह्मा परियेसी । सांगतो कथा विस्तारेसी । ऐक आता शिष्योत्तमा ॥५९॥
कृत त्रेता द्वापार युग । उपजवी मग कलियुग । एकेकाते निरोपी मग । भूमीवरी प्रवर्तावया ॥६०॥
बोलावूनि कृतयुगासी निरोपी ब्रह्मा परियेसी । तुवा जावोनि भूमीसी । प्रकाश करी आपणाते ॥६१॥
ऐकोनि ब्रह्मयाचे वचन । कृतयुग आले संतोषोन । सांगेन त्याचे लक्षण । ऐका श्रोते एकचित्ते ॥६२॥
असत्य नेणे कधी वाचे । वैराग्यपूर्ण ज्ञानी साचे । यज्ञोपवीत आरंभण त्याचे । रुद्राक्षमाळा करी कंकणे ॥६३॥
येणे रूपे युग कृत । ब्रह्मयासी असे विनवित । माते तुम्ही निरोप देत । केवी जाऊ भूमीवरी ॥६४॥
भूमीवरी मनुष्य लोक । असत्य निंदा अपवादक । माते न साहवे ते ऐक । कवणे परी वर्तावे ॥६५॥
ऐकोनि सत्ययुगाचे वचन । निरोपीतो ब्रह्मा आपण । तुवा वर्तावे सत्त्वगुण । क्वचित्काळ येणेपरी ॥६६॥
न करी जड तूते जाण । आणिक युग पाठवीन । तुवा रहावे सावध होऊन । म्हणूनि पाठवी भूमीवरी ॥६७॥
वर्तता येणेपरी ऐका । झाली अवधि सत्याधिका । बोलावूनि त्रेतायुगा देखा । निरोपी ब्रह्मा परियेसा ॥६८॥
त्रेतायुगाचे लक्षण । ऐक शिष्या सांगेन । असे त्याची स्थूल तन । हाती असे यज्ञसामग्री ॥६९॥
त्रेतायुगाचे कारण । यज्ञ करिती सकळ जन । धर्मशास्त्रप्रवर्तन । कर्ममार्ग ब्राह्मणांसी ॥७०॥

बोलावूनि ब्रह्मा हर्षी । निरोप देत द्वापारासी । सांगेन तयाचे रूपासी । ऐका श्रोते एकचित्ते ॥७२॥
खड्गे खट्वांग धरोनि हाती । धनुष्य बाण एके हाती । लक्षण उग्र असे शांति । निष्ठुर दया दोनी असे ॥७३॥
पुण्य पाप समान देखा । स्वरूपे द्वापार असे निका । निरोप घेऊनि कौतुका । आला आपण भूमीवरी ॥७४॥
त्याचे दिवस पुरल्यावरी । कलियुगाते पाचारी । जावे त्वरित भूमीवरी । म्हणोनि सांगे ब्रह्मा देखा ॥७५॥
ऐसे कलियुग देखा । सांगेन लक्षणे ऐका । ब्रह्मयाचे सन्मुखा । केवी गेले परियेसा ॥७६॥
विचारहीन अंतःकरण । पिशाचासारखे वदन । तोंड खालते करुन । ठायी ठायी पडतसे ॥७७॥
वृद्ध आपण विरागहीन । कलह द्वेष संगे घेऊन । वाम हाती धरोनि शिश्न । येत ब्रह्मयासन्मुख ॥७८॥
जिव्हा धरोनि उजवे हाती । नाचे केली अतिप्रीती । दोषोत्तरे करी स्तुति । पुण्यपापसंमिश्र ॥७९॥
हासे रडे वाकुल्या दावी । वाकुडे तोंड मुखी शिवी । ब्रह्मयापुढे उभा राही । काय निरोप म्हणोनिया ॥८०॥
देखोनि तयाचे लक्षण । ब्रह्मा हासे अतिगहन । पुसतसे अतिविनयाने । लिंग जिव्हा का धरिली ॥८१॥
कलियुग म्हणे ब्रह्मयासी । जिंकीन समस्त लोकांसी । लिंग जिव्हा रक्षणारांसी । हारी असे आपणाते ॥८२॥
याकारणे लिंग जिव्हा । धरोनि नाचे ब्रह्मदेवा । जेथे मी जाईन स्वभावा । आपण न भिये कवणाते ॥८३॥
ऐकोनि कलीचे वचन । निरोप देत ब्रह्मा आपण । भूमीवरी जाऊन । प्रकाश करी आपुले गुणे ॥८४॥
कलि म्हणे ब्रह्मयासी । मज पाठविता भूमीसी । आपुले गुण तुम्हांसी । सांगेन ऐका स्वामिया ॥८५॥
उच्छेद करीन धर्मासी । आपण असे निरंकुशी । निरानंद परियेसी । निंदा कलह माझेनी ॥८६॥
परद्रव्यहारक परस्त्रीरत । हे दोघे माझे भ्रात । प्रपंच मत्सर दंभक । प्राणसखे माझे असती ॥८७॥
बकासारिखे संन्यासी । तेचि माझे प्राण परियेसी । छळण करोनि उदरासी । मिळविती पोषणार्थ ॥८८॥
तेचि माझे सखे जाण । आणीक असतील पुण्यजन । तेचि माझे वैरी जाण । म्हणोनि विनवी ब्रह्मयासी ॥८९॥
ब्रह्मा म्हणे कलियुगासी । सांगे तुज उपदेशी । कलियुगी आयुष्य नरासी । स्वल्प असे एक शत ॥९०॥
पूर्व युगांतरी देखा । आयुष्य बहु मनुष्यलोका । तप अनुष्ठान ऐका । करिती अनेक दिवसवरी ॥९१॥
मग होय तयांसी गती । आयुष्य असे अखंडिती । याकारणे क्षिती कष्टती । बहु दिवसपर्यंत ॥९२॥
तैसे नव्हेचि कलियुग जाण । स्वल्प आयुष्य मनुष्यपण । करिती तप अनुष्ठान । शीघ्र पावती परमार्था ॥९३॥
जे जन असती ब्रह्मज्ञानि । पुण्य करितील जाणोनि । त्यास तुवा साह्य होऊनि । वर्तत असे म्हणे ब्रह्मा ॥९४॥
ऐकोनि ब्रह्मयाचे वचन । कली म्हणतसे नमोन । स्वामींनी निरोपिले जे जन । तेचि माझे वैरी असती ॥९५॥
ऐसे वैरी जेथे असती । केवी जाऊ तया क्षिती । ऐकता होय मज भीति । केवी पाहू तयासी ॥९६॥
पंचशत भूमंडळात । भरतखंडी पुण्य बहुत । मज मारितील देखत । कैसा जाऊ म्हणतसे ॥९७॥
ऐकोनि कलीचे वचन । ब्रह्मा निरोपी हासोन । काळात्म्याते मिळोन । तुवा जावे भूमीसी ॥९८॥
काळात्म्याचे ऐसे गुण । धर्मवासना करिल छेदन । पुण्यात्म्याचे अंतःकरण । उपजेल बुद्धि पापाविषयी ॥९९॥
कली म्हणे ब्रह्मयासी । वैरी माझे परियेसी । वसतात भूमंडळासी । सांगेन स्वामी ऐकावे ॥१००॥
उपद्रविती माते बहुत । कृपा न ये मज देखत । जे जन शिवहरी ध्यात । धर्मरत मनुष्य देखा ॥१॥
आणिक असती माझे वैरी । वास करिती गंगातीरी । आणिक वाराणशीपुरी । जाऊनि धर्म करिती देखा ॥२॥
तीर्थे हिंडती जे चरणे । आणिक ऐकती पुराणे । जे जन करिती सदा दाने । तेचि माझे वैरी जाण ॥३॥
ज्यांचे मनी वसे शांति । तेचि माझे वैरी ख्याति । अदांभिकपणे पुण्य करिती । त्यांसी देखता भीतसे ॥४॥
नासाग्री दृष्टि ठेवुनी । जप करिती अनुष्ठानी । त्यासि देखताचि नयनी । प्राण माझा जातसे ॥५॥
स्त्रियांपुत्रांवरी प्रीति । मायबापा अव्हेरिती । त्यावरी माझी बहु प्रीति । परम इष्ट माझे जाणा ॥६॥
वेदशास्त्रांते निंदिती । हरिहरांते भेद पाहती । अथवा शिव विष्णु दूषिती । ते परम आप्त माझे जाणा ॥७॥
जितेंद्रिय जे असती नर । सदा भजती हरिहर । रागद्वेषविवर्जित धीर । देखोनि मज भय ॥८॥
ब्रह्मा म्हणे कलियुगासी । तुझा प्रकाश बहुवसी । तुवा जाताचि भूमीसी । तुझे इच्छे रहाटतील ॥९॥
एखादा विरळागत । होईल नर पुण्यवंत । त्याते तुवा साह्य होत । वर्तावे म्हणे ब्रह्मा ॥११०॥
ऐकोनि ब्रह्मयाचे वचन । कलियुग करीतसे नमन । करसंपुट जोडोन । विनवितसे परियेसा ॥११॥
माझ्या दुष्ट स्वभावासी । केवी साह्य व्हावे धर्मासी । सांगा स्वामी उपायासी । कवणेपरी रहाटावे ॥१२॥
कलीचे वचन ऐकोनि । ब्रह्मा हसे अतिगहनि । सांगतसे विस्तारोनि । उपाय कलीसी रहाटावया ॥१३॥
काळ वेळ असती दोनी । तुज साह्य होउनी । येत असती निर्गुणी । तेचि दाविती तुज मार्ग ॥१४॥
निर्मळ असती जे जन । तेचि तुझे वैरी जाण । मळमूत्रे जयासी वेष्टन । ते तुझे इष्ट परियेसी ॥१५॥
याचि कारणे पापपुण्यासी । विरोध असे परियेसी । जे अधिक पुण्यराशी । तेचि जिंकिती तुज ॥१६॥
या कारणे विरळागत । होतील नर पुण्यवंत । तेचि जिंकिती निश्चित । बहुतेक तुज वश्य होती ॥१७॥
एखादा विवेकी जाण । राहे तुझे उपद्रव साहोन । जे न साहती तुझे दारुण । तेचि होती वश्य तुज ॥१८॥
या कारणे कलियुगाभीतरी । जन्म होतील येणेपरी । जे जन तुझेचि परी । न होय त्या ईश्वरप्राप्ति ॥१९॥
ऐकोनि ब्रह्मदेवाचे वचन । कलियुग करितसे प्रश्न । कैसे साधूचे अंतःकरण । कवण असे निरोपावे ॥१२०॥
ब्रह्मा म्हणे तये वेळी । एकचित्ते ऐक कली । सांगेन ऐका श्रोते सकळी । सिद्ध म्हणे शिष्यासी ॥२१॥
धैर्य धरोनि अंतःकरण । शुद्ध बुद्ध वर्तती जन । दोष न लागती कधी जाण । लोभवर्जित नरांसी ॥२२॥
जे नर भजनी हरिहरांसी । अथवा असती काशीनिवासी । गुरु सेविती निरंतरेसी । त्यासी तुझा न लगे दोष ॥२३॥
मातापिता सेवकासी । अथवा सेवी ब्राह्मणासी । गायत्री कपिला धेनूसी । भजणारांसी न लगे दोष ॥२४॥
वैष्णव अथवा शैवासी । जे सेविती नित्य तुळसीसी । आज्ञा माझी आहे ऐसी । तयासी बाधू नको ॥२५॥
गुरुसेवक असती नर । पुराण श्रवण करणार । सर्वसाधनधर्मपर । त्याते तुवा न बाधावे ॥२६॥
सुकृती शास्त्रपरायणासी । गुरूते सेवित वंशोवंशी । विवेके धर्म करणारासी । त्याते तुवा न बाधावे ॥२७॥
कलि म्हणे ब्रह्मयासी । गुरुमहिमा आहे कैशी । कवण गुरुस्वरूपे कैसी । विस्तारावे मजप्रति ॥२८॥
ऐकोनि कलीचे वचन । ब्रह्मा सांगतसे आपण । गकार म्हणजे सिद्ध जाण । रेफः पापस्य दाहकः ॥२९॥
उकार विष्णुरव्यक्त । त्रितयात्मा श्रीगुरु सत्य । परब्रह्म गुरु निश्चित । म्हणोनि सांगे कलीसी ॥१३०॥
श्लोक ॥ गणेशो वाऽग्निना युक्तो विष्णुना च समन्वितः वर्णद्वयात्मको मंत्रश्चतुर्मुक्तिप्रदायकः ॥३१॥
टीका ॥ गणेशाते म्हणती गुरु । तैसाचि असे वैश्वानरू । ऐसाचि जाण शार्ङ्गधरू । गुरुशब्द वर्ते इतुके ठायी ॥३२॥
श्लोक ॥ गुरुः पिता गुरुर्माता । गुरुरेव परः शिवः । शिवे रुष्टे गुरुस्त्राता गुरौ रुष्टे न कश्चन ॥३३॥
टीका ॥ गुरु आपला मातापिता । गुरु शंकरु निश्चिता । ईश्वरु होय जरि कोपता । गुरु रक्षील परियेसा ॥३३॥
गुरु कोपेल एखाद्यासी । ईश्वर न राखे परियेसी । ईश्वरू कोपेल ज्या नरासी । श्रीगुरु रक्षी निश्चये ॥३५॥
श्लोक ॥ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः । गुरुरेकः परं ब्रह्म तस्मातगुरुमुपाश्रयेत ॥३६॥
टीका ॥ गुरु ब्रह्मा सत्य जाण । तोचि रुद्र नारायण । गुरुचि ब्रह्म कारण । म्हणोनि गुरु आश्रावा ॥३७॥
श्लोक ॥ हरौ प्रसन्नेऽपि च वैष्णवा जनाः संप्रार्थयन्ते गुरुभक्तिमव्ययाम् । गुरौ प्रसन्ने जगदीश्वरः सदा जनार्दनस्तुष्यति सर्वसिद्धिदः ॥३८॥
टीका ॥ ईश्वर जरी प्रसन्न होता । त्यासी गुरु होय ओळखविता । गुरु आपण प्रसन्न होता । ईश्वर होय आधीन आपुल्या ॥३९॥
श्लोक ॥ गुरुः सदा दर्शयिता प्रवृत्ति तीर्थं व्रतं योगतपादिधर्मान् । आचारवर्णादिविवेकयज्ञान् ज्ञानं परं भक्तिविवेकयुक्तम् ॥१४०॥
टीका ॥ गुरु भजे शास्त्रमार्ग वर्तोनि । तीर्थव्रतयोगतपादि मुनी । आचारवर्णादि ज्ञानी । ज्ञान परम भक्तिविवेकयुक्त ॥४१॥

आचारधर्मावर्णाश्रमांसी । विवेकधर्ममार्गासी भक्तिवैराग्ययुक्तांसी । गुरुचि मार्ग दाविणार ॥४३॥
इतुके ऐकोनि कलि आपण । विनवीतसे कर जोडून । गुरु सर्व देवांसमान । केवी झाला सांगा मज ॥४४॥
ब्रह्मा म्हणे कलीसी । सांगेन तुज विस्तारेसी । एकचित्ते परियेसी । गुरुवीण पार नाही ॥४५॥
श्लोक ॥ गुरु विना न श्रवेण भवेत् कस्यापि कस्यचित् । विना कर्णेन शास्त्रस्य श्रवणं तत्कुतो भवेत् ॥४६॥
टीका । गुरुवीण समस्तांसी । श्रवण कैचे परियेसी । श्रवण होता मनुष्यांसी । समस्त शास्त्रे ऐकती ॥
शास्त्र ऐकता परियेसी । तरतील संसारासी । या कारणे गुरुचि प्रकाशी । ज्योत:स्वरूप जाणावा ॥४८॥
गुरु सेविता सर्व सिद्धि । होती परियेसा त्रिशुद्धि । कथा वर्तली अनादि । अपूर्व तुज सांगेन ॥४९॥
पूर्वी गोदावरीचे तीरी । अंगिरस ऋषींचा आश्रम थोरी । वृक्ष असती नानापरी । पुण्यनामे मृग वसती ॥५०॥
ब्रह्मऋषि आदिकरोनि । तप करिती तया स्थानी । तयांत वेदधर्म म्हणोनि । पैलपुत्र होता द्विज ॥५१॥
तया शिष्य बहु असती । वेदशास्त्र अभ्यासिती । त्यात दीपक म्हणोनि ख्याति । शिष्य होता परियेसा ॥५२॥
होता शिष्य गुरुपरायण । केला अभ्यास शास्त्रपुराण । झाला असे अतिनिपुण । सेवा करिता श्रीगुरुची ॥५३॥
वेदधर्म एके दिनी । समस्त शिष्यांसी बोलावूनी । पुसतसे संतोषोनि । ऐका श्रोते एकचित्ते ॥५४॥
बोलावुनि शिष्यांसी । बोले गुरु परियेसी । प्रीति असेल आम्हांसी । तरी माझे वाक्य परियेसा ॥५५॥
शिष्य म्हणती गुरूसी । जे जे स्वामी निरोपिसी । तू तारक आम्हांसी । अंगिकारू हा भरवसा ॥५६॥
गुरूचे वाक्य जो न करी । तोचि पडे रौरव घोरी । अविद्या मायासागरी । बुडोन जाय तो नर ॥५७॥
मग तया कैची गति । नरकी पडे तो सतती । गुरु तारक हे ख्याति । वेदपुराणे बोलती ॥५८॥
ऐकोनि शिष्यांची वाणी । तोषला वेदधर्म मुनी । संदीपकाते बोलावुनी । सांगतसे परियेसा ॥५९॥
ऐका शिष्य सकळीक । आमचे पूर्वार्जित असे एक । जन्मांतरी सहस्त्राधिक । केली होती महापातके ॥१६०॥
आमचे अनुष्ठान करिता । बहुत गेले प्रक्षाळिता । काही शेष असे आता । भोगिल्यावाचून न सुटे जाणा ॥६१॥
तप सामर्थ्ये उपेक्षा करितो । पापमोक्षा आड रिघतो । याचि कारणे निष्कृति करितो । तया पाप घोरासी ॥६२॥
न भोगिता आपुले देही । आपले पापा निष्कृति नाही । हा निश्चय जाणोनि पाही । भोगावे आम्ही परियेसा ॥६३॥
या पापाचे निष्कृतीसी । जावे आम्ही वाराणशीसी । जाईल पाप शीघ्रेसी । प्रख्यात असे अखिल शास्त्री ॥६४॥
या कारणे आम्हांसी । न्यावे पुरी वाराणशीसी । पाप भोगीन स्वदेहासी । माते तुम्ही सांभाळावे ॥६५॥
या समस्त शिष्यांत । कवण असे सामर्थ्यवंत । अंगिकारावे त्वरित । म्हणोनि पुसे शिष्यांसी ॥६६॥
तया शिष्यांमध्ये एक । नाम असे संदीपक । बोलतसे अतिविवेक । तया गुरूप्रति देखा ॥६७॥
दीपक म्हणे गुरुस । पाप करितां देहनाश । न करावा संग्रहो दु:खास । शीघ्र करा प्रतिकारू ॥६८॥
वेदधर्म म्हणे तयासी । दृढ देह असता मनुष्यासी । क्षालन करावे पापासी । पुढती वाढे विषापरी ॥६९॥
अथवा तीर्थे प्रायश्चित्ते । आपुले देही भोगोनि त्वरिते । पापावेगळे न होता निरुते । मुक्ति नव्हे आपणांसी ॥१७०॥
देव अथवा ऋषेश्वरांसी । मनुष्यादि ज्ञानवंतासी । क्षालन न होय पापासी । आपुले आपण न भोगिता ॥७१॥
दीपक म्हणे गुरूसी । स्वामी निरोपावे आपणासी । सेवा करीन स्वशक्तीसी । न करिता अनुमान सांगिजे ॥७२॥
ऐकोनि दीपकाचे वचन । वेदधर्म म्हणे आपण । कुष्ठे होईल अंग हीन । अंधक पांगूळ परियेसा ॥७३॥
संवत्सर एकविशंत । माते सांभाळावे बहुत । जरी असेल दृढ व्रत । अंगिकारावी तुम्ही सेवा ॥७४॥
दीपक म्हणे गुरूसी । कुष्ठी होईन आपण हर्षी । अंध होईन एकवीस वर्षी । पापनिष्कृति करीन ॥७५॥
तुमचे पापाचे निष्कृति । मी करीन निश्चिती । स्वामी निरोपावे त्वरिती । म्हणोनि चरणांसी लागला ॥७६॥
ऐकोनि शिष्याची वाणी । संतोषला वेदधर्म मुनी । सांगतसे विस्तारोनि । तया पाप-लक्षणे ॥७७॥
आपुले पाप आपणासी । ग्राह्यु नव्हे पुत्रशिष्यांसी । न भोगितां स्वदेहासी । न वेचे पाप परियेसा ॥७८॥
याकारणे आपण देखा । भोगीन आपुले पापदु:खा । सांभाळी मज तू संदीपका । एकवीस वर्षेपर्यंत ॥७९॥
जे पीडिति रोगे देखा । प्रतिपाळणारासी कष्ट अधिका । मजहूनि संदीपका । तूते कष्ट अधिक जाण ॥१८०॥
या कारणे आपुले देही । भोगीन पाप निश्चयी । तुवा प्रतिपाळावे पाही । काशीपूरा नेऊनिया ॥८१॥
तया काशीपुरी जाण । पापावेगळा होईन । आपण शाश्वतपद पावेन । तुजकरिता शिष्योत्तमा ॥८२॥
दीपक म्हणे गुरूसी । अवश्य नेईन पुरी काशी । सेवा करीन एकवीस वर्षी । विश्वनाथासम तुमची ॥८३॥
ब्रह्मा म्हणे कलियुगासी । कैसा होता शिष्य त्यासी । कुष्ठ होताची गुरूसी । नेले काशीपुरा ॥८४॥
मणिकर्णिका उत्तरदेशी । कंबळेश्वर सन्निधेसी । राहिले तेथे परियेसी । गुरू शिष्य दोघेजण ॥८५॥
स्नान करूनि मणिकर्णिकेसी । पूजा करिती विश्वनाथासी । प्रारब्धभोग त्या गुरूसी । भोगीत होता तया स्थानी ॥८६॥
कुष्ठरोग झाला बहुत । अक्षहीन अतिदु:खित । संदीपक सेवा करित । अतिभक्ती करूनिया ॥८७॥
व्यापिला देह कुष्ठे बहुत । पू कृमि पडे रक्त । दु:खे व्यापला अत्यंत । अपस्मारी झाला जाण ॥८८॥
भिक्षा मागोनि संदीपक । गुरूसी आणोनि देत नित्यक । करी पूजा भावे एक । विश्वनाथस्वरूप म्हणतसे ॥८९॥
रोगे करूनि पीडितां नरू । साधुजन होती क्रूरू । तोचि देखा द्विजवरू । होय क्रूर एखादे वेळी ॥१९०॥
भिक्षा आणितां एखादे दिवशी । न जेवे श्रीगुरु कोपेसी । स्वल्प आणिले म्हणोनि क्लेशी । सांडोनि देत भूमीवरी ॥९१॥
येरे दिवशि जाऊनि शिष्य । आणि अन्ने बहुवस । मिष्टान्ने न आणी म्हणोनि क्लेश । करिता झाल परियेसा ॥९२॥
परोपरीचे पक्वान्न । का नाणिशी म्हणे जाण । कोपे मारू येत आपण । शाका परोपरी मागतसे ॥९३॥
जितुके आणि मागोनिया । सर्वस्वे करीतसे वाया । कोपे देत शिविया । परोपरी परियेसा ॥९४॥
एखादे समयि शिष्यासी । म्हणे ताता ज्ञानराशी । मजनिमित्त कष्टलासी । शिष्यराया शिखामणी ॥९५॥
सवेचि म्हणत वचने क्रूर । माते गांजिले अपार । तू आमुचे विष्ठामूत्र । क्षणाक्षणा धूत नाही ॥९६॥
खाताती मज मक्षिका । कां न निवारिसी संदीपका । सेवा करिता म्हणे ऐका । भिक्षा नाणिशी म्हणतसे ॥९७॥
या कारणे पापगुण । ऐसेची असती जाण । वोखट वाक्य निर्गुण । पाप म्हणोनि जाणावे ॥९८॥
पाप असे जेथे बहुत । दैन्य मत्सर वसे तेथ । शुभाशुभ नेणे क्वचित । पापरूपे जाणावे ॥९९॥
एखादे दैन्यकासी । दु:खे प्राप्त होती कैसी । अपस्मार होय जयासी । पाअरूप तोचि जाणा ॥२००॥
समस्त रोग असती देखा । कुष्ठ सोळा भाग नव्हे निका । वेदधर्म द्विज ऐका कष्टतसे येणेपरी ॥१॥
ऐसे गुरूचे गुणदोष । मनांत न आणी तोचि शिष्य । सेवा करी एकमानस । तोचि ईश्वर मानोनि ॥२॥
जैसे जैसे मागे अन्न । आणूनि देतसे परिपूर्ण । जैसा विश्वेश्वर नारायण । तैसा गुरु म्हणतसे ॥३॥
काशीक्षेत्र थोर असतां । न करी सदा तीर्थयात्रा । न जाय देवदर्शना सर्वथा । गुरुसेवेवांचूनि ॥॥
श्लोक ॥ न तीर्थयात्रा न च देवयात्रा न देहयात्रा न च गेहयात्रा । अहर्निशं ब्रह्म हरिः सुबुद्धो गुरुः प्रसेव्यो न हि सेव्यमन्यत ॥५॥
टीका ॥ आपुले देहसंरक्षण । कधी न करी शिष्य जाण । लय लावूनि श्रीगुरुचरण । कवणासवे न बोलेची ॥६॥
अहोरात्र येणेपरी । ब्रह्मा शिव म्हणे हरी । गुरुचि होय निर्धारी । म्हणोनि सेवा करीतसे ॥७॥
गुरु बोले निष्ठुरेसी । आपण मनी संतोषी । जे जे त्याचे मानसी । पाहिजे तैसे वर्ततसे ॥८॥
वर्तता येनेपरी देख । प्रसन्न होवोनि पिनाक । उभा येऊनि सन्मुख । वर माग म्हणतसे ॥९॥
अहो गुरुभक्त दीपका । महाज्ञानी कुलदीपका । तुष्टलो तुझे भक्तीसी ऐका । प्रसन्न झालो माग आता ॥२१०॥
दीपक म्हणे ईश्वरासी । हे मृत्युंजय व्योमकेशी । न पुसतां आम्ही गुरुसी । वर न घे सर्वथा ॥११॥
म्हणोनि गेला गुरुपासी । विनवीतसे तयासी । विश्वनाथ आम्हांसी । प्रसन्न होवोनि आलासे ॥१२॥

ऐकोनिया शिष्याचे वचन । बोले गुरु कोपायमान । माझे व्याधिनिमित्त जाण । नको प्रार्थू ईश्वरासी ॥१४॥
भोगिल्यावाचोनि पातकासी । निवृत्ति नव्हे गा परियेसी । जन्मांतरी बाधिती निश्चयेसी । धर्मशास्त्री असे जाण ॥१५॥
मुक्ति अपेक्षा ज्याचे मनी । तेणे करावी पापधुणी । शेष राहतां निर्गुणी । विघ्न करितील मोक्षासी ॥१६॥
ऐशियापरी शिष्यासी । गुरु सांगे परियेसी । निरोप मागोनि श्रीगुरुसी । गेला ईश्वरासन्मुख ॥१७॥
जाऊनि सांगे ईश्वरासी । नलगे वर आपणासी । नये गुरुचे मानसी । केवी घेऊ म्हणतसे ॥१८॥
विस्मय करोनि व्योमकेशी । गेला निर्वाणमंडपासी । बोलावून समस्त देवांसी । सांगे वृत्तान्त विष्णूपुढे ॥१९॥
श्रीविष्णु म्हणे शंकरास । कैसा गुरु कैसा शिष्य । कोठे त्यांचा रहिवास । सांगावे मज निर्धारे ॥२२०॥
सांगे ईश्वर विष्णुसी । आश्चर्य देखिले परियेसी । दीपक शिष्य निश्चयेसी । गुरुभक्त असे जाणा ॥२१॥
गोदावरीतीरवासी । वेदधर्म म्हणिजे तापसी । त्याची सेवा अहर्निशी । करितो भावे एकचित्ते ॥२२॥
नाही त्रिलोकी देखिला कोणी । गुरुभक्ति करणार निर्गुणी । त्याते देखोनि माझे मनी । अतिप्रीति वर्ततसे ॥२३॥
वर देईन म्हणोनि आपण । गेलो होतो तयाजवळी जाण । गुरूचा निरोप नाही म्हणोन । न घे वर परियेसा ॥२४॥
अनेक दिव्यसहस्त्रवर्षी । तप करिती महाऋषि । वर मागती अहर्निशी । नाना कष्ट करोनिया ॥२५॥
तैसा तापसी योगी यांसी । नव्हे मज वर द्यावयासी । बलात्कारे देता तयासी । वर न घे तो दीपक ॥२६॥
तनमन अर्पूनि श्रीगुरूसी । सेवा करितो संतोषी । त्रयमूर्ति म्हणोनि गुरूसी । निश्चये भजतसे ॥२७॥
समस्त देव मातापिता । गुरुचि असे तत्त्वतां । निश्चय केला असे चित्ता । गुरु परमात्मा म्हणोनि ॥२८॥
किती म्हणोनि वर्णू त्यासी । अविद्या-अंधकारासी । छेदिता दीपक परियेसी । कुलदीपक नाम सत्य ॥२९॥
धर्म ज्ञान सर्व एक । गुरुचि म्हणे कुलदीपक । चरणसेवा मनःपूर्वक । करितो गुरूची भक्तीने ॥२३०॥
इतुके ऐकोनि शार्ङ्गधरू । पहावया गेला शिष्यगुरु । त्यांचा भक्तिप्रकारू । पाहे तये वेळी ॥३१॥
सांगितले विश्वनाथे । त्याहून दिसे आणिक तेथे । संतोषोनि दीपकाते । म्हणे विष्णु परियेसा ॥३२॥
दीपक म्हणे विष्णूसी । काय भक्ति देखोनि आम्हांसी । वर देतोसी परियेसी । कवण कार्या सांग मज ॥३४॥
लक्ष कोटी सहस्त्र वरुषी । तप करिती अरण्यावासी । त्यांसी करितोसी उदासी । वर न देसी नारायण ॥३५॥
मी तरी तुज भजत नाही । तुझे नाम स्मरत नाही । बलात्कारे येवोनि पाही । केवी देशी वर मज ॥३६॥
ऐकोनि दीपकाचे वचन । संतोषला नारायण । सांगतसे विस्तारोन । तया दीपकाप्रती देखा ॥३७॥
गुरुभक्ति करिसी निर्वाणेसी । म्हणोनि आम्ही जाहलो संतोषी । जे भक्ति केली त्वां गुरूसी । तेचि आम्हांसी पावली ॥३८॥
जो नर असेल गुरुभक्त जाण । तोचि माझा जीवप्राण । त्यासी वश्य झालो आपण । जे मागेल ते देतो तया ॥३९॥
सेवा करी माता पिता । ती पावे मज तत्त्वतां । पतिसेवा स्त्रिया करिता । तेही मज पावतसे ॥२४०॥
एखाद्या भल्या ब्राह्मणासी । यती योगेश्वर तापसी । करिती नमन भक्तीसी । तेचि मज पावे जाणा ॥४१॥
ऐसे ऐकोनि दीपक । नमिता झाला आणिक । विनवीतसे देख । म्हणे सिद्ध नामधारका ॥४२॥
ऐक विष्णु हृषीकेशी । निश्चय असो माझे मानसी । वेदशास्त्र मीमांसादिकांसी । गुरु आम्हांसी देणार ॥४३॥
गुरूपासोनि सर्व ज्ञान । त्रयमूर्ति होती आम्हां आधीन । आमुचा गुरुचि देव जाण । अन्यथा नाही जाण पा ॥४४॥
सर्व देव सर्व तीर्थ । गुरूचि आम्हा असे सत्य । गुरूवांचूनि आम्हा परमार्थ । काय दूर असे सांगा ॥४५॥
समस्त योगी सिद्धजन । गुरूवांचूनि न होती सज्ञान । ज्ञान होता ईश्वर आपण । केवी दूर असे सांगा ॥४६॥
जो वर द्याल तुम्ही मज । श्रीगुरु देतो काय चोज । याकारणे श्रीगुरुराज । भजतसे परियेसा ॥४७॥
संतोषोनि नारायण । म्हणे धन्य धन्य माझा प्राण । तू शिष्य-शिरोरत्न । बाळक तूचि आमुचा ॥४८॥
काही तरी माग आता । वर देईन तत्त्वतां । विश्वनाथ आला होता । दुसरेन वर द्यावयासी मी आलो ॥४९॥
आमचेनि मन संतोषी । वर माग जो तुझे मानसी । तुज वश्य झालो निर्धारेसी । जे पाहिजे ते देईन आता ॥२५०॥
दीपक म्हणे विष्णुसी । जरी वर आम्हां देसी । गुरुभक्ति होय अधिक मानसी । ऐसे मज ज्ञान द्यावे ॥५१॥
गुरूचे रूप आपण ओळखे । ऐसे ज्ञान देई सुखे । यापरते न मागे निके । म्हणोनि चरणी लागला ॥५२॥
दिधला वर शार्ङ्गपाणी । संतोषोनि बोले वाणी । अरे दीपका शिरोमणी । तू माझा प्राणसखा होशी ॥५३॥
तुवा ओळखिले गुरूसी । देखिले दृष्टी परब्रह्मासी । आणीक जरी आम्हां पुससी । सांगेन एक एकचित्ते ॥५४॥
लौकिक सुबुद्धि होय जैशी । धर्माधर्मसूमने तैशी । उत्कृष्टाहूनि उत्कृष्टेसी । स्तुति करि गा अहर्निशी ॥५५॥
जे जे समयी श्रीगुरूसी । तू भक्तीने स्तुति करिसी । तेणे । होऊ आम्ही संतोषी । तेचि आमुची स्तुति जाण ॥५६॥
वेद वाचिती सांगेसी । वेदान्त भाष्य अहर्निषी । वाचिती जन उत्कृष्टेसी । आम्हा पावे निर्धारी ॥५७॥
बोलती वेद सिद्धान्त । गुरुचि ब्रह्म असे म्हणत । याचि कारणे गुरु भजता सत्य । सर्व देवता तुज वश्य ॥५८॥
गुरु म्हणजे अक्षर दोन । अमृताचा समुद्र जाण । तयामध्ये बुडता क्षण । केवी होय परियेसा ॥५९॥
जयाचे हृदयी गुरुस्मरण । तोचि त्रिलोकी पूज्य जाण । अमृतपान सदा सगुण । तोचि शिष्य अमर होय ॥२६०॥
श्लोक ॥ यदा मम शिवस्यापि ब्रह्मणो ब्राह्मणस्य हि । अनुग्रहो भवेन्नृणां सेव्यते सद्गुरुस्तदा ॥६१॥
टीका ॥ आपण अथवा ईश्वरु । ब्रह्मा जरी देता वरु । तद्वत फलदाता गुरु । गुरु त्रैमूर्ति याचि कारणे ॥६२॥
ऐसा वर दीपकासी । दिधला विष्णूने परियेसी । ब्रह्मा सांगे कलीसी । एकचित्ते परियेसा ॥६३॥
वर लाधोनि दीपक । गेला गुरूचे सन्मुख । पुसतसे गुरु ऐक । तया शिष्या दीपकासी ॥६४॥
ऐक शिष्या कुळदीपका । काय दिधले वैकुंठनायका । विस्तारोनि सांगे निका । माझे मन स्थिर होय ॥६५॥
दीपक म्हणे गुरुसी । वर दिधला हृषीकेशी । म्या मागितले तयासी । गुरुभक्ति व्हावी म्हणोनिया ॥६६॥
गुरुची सेवा तत्परेसी । अंतःकरण दृढेसी । वर दिधला संतोषी । दृढभक्ति माझी तुमचे चरणी ॥६७॥
संतोषोनि श्रीगुरु । प्रसन्न झाला साक्षात्कारू । जीवित्वे होय तू स्थिरू । काशीपुरी वास करी ॥६८॥
तुझे वाक्य सर्वसिद्धि । तुझे घरी नवनिधि । विश्वनाथ तुझे स्वाधी । म्हणे गुरु संतोषोनि ॥६९॥
तुझे स्मरण जे करिती । त्यांचे कष्ट निवारण होती । श्रियायुक्त नांदती । तुझे स्मरणमात्रेसी ॥२७०॥
येणेपरी शिष्यासी । प्रसन्न झाला परियेसी । दिव्यदेह झाला तत्क्षणेसी । झाला गुरु वेदधर्म ॥७१॥
शिष्याचा भाव पहावयास । कुष्ठी झाला महाक्लेश । तो तापसी अतिविशेष । त्यासी कैचे पाप राहे ॥७२॥
लोकानुग्रह करावयासी । गेला होता पुरी काशी । काशीक्षेत्रमहिमा ऐसी । पाप जाय सहस्त्र जन्मीचे ॥७३॥
तया काशीनगरात । धर्म अथवा अधर्म-रत । वास करिती क्वचित । त्यांसि पुनर्जन्म नाही जाणा ॥७४॥
सूत म्हणे ऋषीश्वरासी । येणे प्रकारे कलीसी । सांगे ब्रह्मा परियेसी । शिष्यदीपक आख्यान ॥७५॥
सिद्ध म्हणे नामकरणी । दृढ मन असावे याचि गुणी । तरीच तरेल भवार्णी । गुरुभक्ति असे येणेविधी ॥७६॥
श्लोक ॥ यत्र यत्र दृढा भक्तिर्यदा कस्य महात्मनः । तत्र तत्र महादेवः प्रकाशमुपगच्छति ॥७७॥
टीका । जरी भक्ति असे दृढेसी । त्रिकरणसह मानसी । तोचि लाधे ईश्वरासी । ईश्वर होय तया वश्य ॥७८॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे शिष्यदीपकाख्यानं नाम द्वितीयोऽध्यायः ॥२॥
श्रीदत्तात्रेयार्पितमस्तु ।
ओवीसंख्या ॥२७९॥
॥श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु॥

<poem> श्रीगणेशाय नमः ।
येणेपरी सिद्ध मुनि । सांगता झाला विस्तारोनि । संतोषोनि नामकरणी । विनवितसे मागुती ॥१॥
जय जयाजी सिद्ध मुनी । तारक तू आम्हालागुनी । संदेह होता माझे मनी । आजि तुवा फेडिला ॥२॥
तुझेनि सर्वस्व लाधलो । आनंदजळी बुडालो । परम तत्त्व जोडलो । आजिचेनि दातारा ॥३॥
ऐसे श्रीगुरुमहिमान । मज निरोपिले त्वां ज्ञान । आनंदमय माझे मन । तुझेनि धर्मे स्वामिया ॥४॥
कवणे ठायी तुमचा वास । नित्य तुम्हा कोठे ग्रास । होईन तुझा आतां दास । म्हणोनि चरणी लागला ॥५॥
कृपानिधी सिद्ध मुनी । तया शिष्या आलिंगोनि । आशीर्वचन देऊनि । सांगे आपुला वृत्तान्त ॥६॥
जे जे स्थानी होते गुरु । तेथे असतो चमत्कारू । पुससी जरी आम्हां आहारू । गुरुस्मरणी नित्य जाणा ॥७॥
श्रीगुरुचरित्र महिमान । तेचि आम्हा अमृतपान । सदा सेवितो याचे गुण । म्हणोनि पुस्तक दाविले ॥८॥
भुक्ति मुक्ति परमार्थ । जे जे वांछिजे मनांत । ते ते साध्य होय त्वरित । गुरुचरित्र ऐकता ॥९॥
धनार्थी यासी अक्षय धन । पुत्रपौत्रादि गोधन । कथा ऐकता होय जाण । ज्ञानसिद्धी तात्काळ ॥१०॥
जे भक्तीने सप्तक एक । पढती ऐकती भक्तलोक । काम्य होय तात्कालिक । निपुत्रिका पुत्र होती ॥११॥
ग्रहरोगादिपीडन । न होती व्याधि कधी जाण । जरी मनुष्यास असेल बंधन । त्वरित सुटे ऐकता ॥१२॥
ज्ञातवंत शतायुषी । ऐकता होय भरवसी । ब्रह्महत्यापापे नाशी । एकचित्ते ऐकता ॥१३॥
इतुके ऐकोनि त्या अवसरी । नामधारक नमस्कारी । स्वामी माते तारी तारी । कृपानिधि सिद्ध मुनी ॥१४॥
साक्षात्कारे गुरुमूर्ति । भेटलासी तू जगज्ज्योती । होती वासना माझे चित्ती । गुरुचरित्र ऐकावे ॥१५॥
एखादा तृषेने पीडित । जात असता मार्गस्थ । त्या आणूनि देती अमृत । तयापरी तू मज भेटलासी ॥१६॥
गुरूचा महिमा ऐको कानी । सांगिजे स्वामी विस्तारोनि । अंधकार असतां रजनी । सूर्योदयापरी करी ॥१७॥
इतुकिया अवसरी । सिद्ध योगी अभय करी । धरोनिया सव्य करी । घेवोनि गेला स्वस्थाना ॥१८॥
असे ठाव ज्ञानपंथी । कल्पवृक्ष अश्वत्थी । बैसोनि सांगे ज्ञानज्योती । ऐक शिष्या नामधारका ॥१९॥
नेणती सोय गुरुदास्यका । याचि कारणे उपबाधका । होती तुज अनेका । चिंता क्लेश घडती तुज ॥२०॥
ओळखावया गुरुमूर्तीसी । आपुला आचार परियेसी । दृढ भक्ति धरोनि मानसी । ओळखिजे मग श्रीगुरु ॥२१॥
ऐकोनि सिद्धांचे वचन । संतोषे नामधारक सगुण । क्षणक्षणा करी नमन । करुणावचने करोनिया ॥२२॥
तापत्रयाग्नीत पोळलो । मी संसारसागरी बुडालो । क्रोधादि जलचरी वेष्टिलो । अज्ञानजाळे वेष्टूनिया ॥२३॥
ज्ञाननौकी बसवूनि । कृपेचा वायू पालाणुनि । देहा तारक करूनि । तारावे माते स्वामिया ॥२४॥
ऐशिया करुणावचनी । विनवितसे नामकरणी । मस्तक सिद्धाचिया चरणी । ठेविता झाला पुनः पुनः ॥२५॥
तव बोलिला सिद्ध मुनि । न धरी चिंता अंतःकरणी । उठवीतसे आश्वासोनि । सांकडे फेडीन तुझे आता ॥२६॥
ज्यांसी नाही दृढ भक्ति । सदा दैन्ये कष्टती । श्रीगुरूवरी बोल ठेविती । अविद्यामाया वेष्टूनि ॥२७॥
संशय धरोनि मानसी । श्रीगुरु काय देईल म्हणसी । तेणे गुणे हा भोग भोगिसी । नाना कष्टे व्याकुळित ॥२८॥
सांडोनि संशय निर्धार । गुरुमूर्ति देईल अपार । ऐसा देव कृपासागर । तुज नुपेक्षी सर्वथा ॥२९॥
गुरुमूर्ति कृपासिंधु । प्रख्यात असे वेदा बोधु । तुझे अंतःकरणी वेधु । असे तया चरणांवरी ॥३०॥
तो दातार अखिल मही । जैसा मेघाचा गुण पाही । पर्जन्य पडतो सर्वां ठायी । कृपासिंधु ऐसा असे ॥३१॥
त्यांतचि पात्रानुसार । सांगेन साक्षी एक थोर । सखोल भूमि उदक स्थिर । उन्नती उदक नाही जाण ॥३२॥
दृढ भक्ति जाणा सखोल भूमि । दांभिक ओळखा उन्नत तुम्ही । याचिया कारणे मनोकर्मी । निश्चयावे श्रीगुरूसी ॥३३॥
म्हणोनि श्रीगुरुउपमा । ऐसा कणव असे महिमा । प्रपंच होय परब्रह्मा । हस्त मस्तकी ठेवोनिया ॥३४॥
कल्पतरूची द्यावी उपमा । कल्पिले लाभे त्याचा महिमा । न कल्पितां पुरवी कामा । कामधेनु श्रीगुरु ॥३५॥
ऐसा श्रीगुरु ब्रह्ममूर्ति । ख्याति असे श्रुतिस्मृती । संदेह सांडूनि एकचित्ती । ध्याय पदांबुज श्रीगुरूचे ॥३६॥
इतके परिसोनि नामधारक । नमन करोनि क्षणैक । करसंपुट जोडोनि ऐक । विनवितसे सिद्धासी ॥३७॥
श्रीगुरू सिद्ध योगेश्वरा । कामधेनु कृपासागरा । विनवितसे अवधारा । सेवक तुमचा स्वामिया ॥३८॥
स्वामींनी निरोपिले सकळ । झाले माझे मन निर्मळ । वेध लागला असे केवळ । चरित्र श्रीगुरूचे ऐकावया ॥३९॥
गुरु त्रयमूर्ति ऐको कानी । का अवतरले मनुष्ययोनी । सर्व सांगावे विस्तारोनि । म्हणोनि चरणी लागला ॥४०॥
मग काय बोले योगींद्र । बा रे शिष्या तू पूर्णचंद्र । माझा बोधसमुद्र । कैसा तुवा उत्साहविला ॥४१॥
तूते महासुख लाधले । गुरुदास्यत्व फळले । परब्रह्म अनुभवले । आजिचेनि तुज आता ॥४२॥
हिंडत आलो सकळ क्षिति । कवणा नव्हे ऐशी मति । गुरुचरित्र न पुसती । तूते देखिले आजि आम्ही ॥४३॥
ज्यासी इहपरत्रींची चाड । त्यासी ही कथा असे गोड । त्रिकरणे करोनिया दृढ । एकचित्ते ऐकिजे ॥४४॥
तू भक्त केवळ श्रीगुरुचा । म्हणोनि भक्ति झाली उंचा । निश्चयो मानी माझिया वाचा । लाधसी चारी पुरुषार्थ ॥४५॥
धनधान्यादि संपत्ति । पुत्रपौत्र श्रुतिस्मृति । इह सौख्य आयुष्यगति । अंती गति असे जाणा ॥४६॥
गुरुचरित्र कामधेनु । वेदशास्त्रसमत जाणु । अवतरला त्रयमूर्ति आपणु । धरोनि नरवेष कलियुगी ॥४७॥
कार्याकारण अवतार । होऊनि येती हरिहर । उतरावया भूमिभार । भक्तजनाते तारावया ॥४८॥
ऐकोनि सिद्धाच वचना । प्रश्न करी शिष्यराणा । त्रयमूर्ति अवतार किंकारणा । देह धरोनि मानुषी ॥४९॥
विस्तारोनि ते आम्हांसी । सांगा स्वामी कृपेसी । म्हणोनि लागला चरणासी । करुणावचने करोनिया ॥५०॥
सिद्ध म्हणे नामधारका । त्रयमूर्ति तीन गुण ऐका । आदिवस्तु आपण एका । प्रपंच वस्तु तीन जाणा ॥५१॥
ब्रह्मयाचा रजोगुण । सत्त्वगुन विष्णु जाण। तमोगुण उमारमण । मूर्ति एकचि अवधारा ॥५२॥
ब्रह्मा सृष्टिरचनेसी । पोषक विष्णु परियेसी । रुद्रमूर्ति प्रळयासी । त्रयमूर्तीचे तीन गुण ॥५३॥
एका वेगळे एक न होती । कार्याकारण अवतार होती । भूमीचा भार फेडिती । प्रख्यात असे पुराणी ॥५४॥
सांगेन साक्ष आता तुज । अंबरीष म्हणिजे द्विज । एकादशीव्रताचिया काज । विष्णूसी अवतार करविले ॥५५॥
अवतार व्हावया कारण । सांगेन तुज विस्तारून । मन करोनि सावधान । एकचित्ते परियेसा ॥५६॥
द्विज करी एकादशीव्रत । पूजा करी अभ्यागत । निश्चयो करी दृढचित्त । हरिचिंतन सर्वकाळ ॥५७॥
असो त्याचिया व्रतासी । भंग करावया आला ऋषि । अतिथि होऊनि हठेसी । पावला मुनि दुर्वास ॥५८॥
ते दिवशी साधनद्वादशी घडी एक । आला अतिथि कारणिक । अंबरीषास पडला धाक । केवी घडे म्हणोनिया ॥५९॥
ऋषि आले देखोनि । अंबरीषाने अभिवंदोनि । अर्घ्य पाद्य देवोनि । पूजा केली उपचारे ॥६०॥
विनवितसे ऋषीश्वरासी । शीघ्र जावे स्नानासी । साधन आहे घटिका द्वादशी । यावे अनुष्ठान सारोनिया ॥१॥
ऋषि जाऊनि जाऊनि नदीसी । अनुष्ठान करती विधींसी । विलंब लागता तयासी । आली साधन घटिका ॥६२॥
व्रत भंग होईल म्हणोनि । पारणे केले तीर्थ घेऊनि । नाना प्रकार पक्वानी । पाक केला ऋषीते ॥६३॥
तव आले दुर्वास देखा । पाहूनि अंबरीषाच्या मुखा । म्हणे भोजन केलेसि का । अतिथीविण दुरात्मया ॥४॥
शाप देता ऋषीश्वर । राजे स्मरला शार्ङ्गधर । करावया भक्ताचा कैवार । टाकून आला वैकुंठा ॥६५॥
भक्तवत्सल नारायण । शरणागताचे रक्षण । बिरूद बोलती पुराणे जाण । धावे धेनु वत्सासि जैसी ॥६६॥
शापिले ऋषीने द्विजासी । जन्मावे गा अखिल योनीसी । तव पावला ह्रषीकेशी । येऊनि जवळी उभा ठेला ॥६७॥
मिथ्या नव्हे ऋषीचे वचन । द्विजे धरिले श्रीविष्णुचे चरण । भक्तवत्सल ब्रीद जाण । तया महाविष्णूचे ॥६८॥
विष्णु म्हणे दुर्वासासी । तुवा शापिले अंबरीषासी । राखीन आपुल्या दासासी । शाप आम्हासी तुम्ही द्यावा ॥६९॥

जाणोनि ज्ञानीशिरोमणी । म्हणे तप करितां युगे क्षोणी । भेटी नव्हे हरिचरणी । भूमीवरी दुर्लभ ॥७१॥
शापसंबंधे अवतरोनि । येईल लक्ष्मी घेऊनि । तारावयालागोनी । भक्तजना समस्ता ॥७२॥
परोपकारसंबंधेसी । शाप द्यावा विष्णुसी । भूमिभार फेडावयासी । कारण असे म्हणोनिया ॥७३॥
ऐसे विचारोनि मानसी । दुर्वास म्हणे विष्णूसी । अवतरोनी भूमीसी । नाना स्थानी जन्मावे ॥७४॥
प्रसिद्ध होसी वेळ दहा । उपर अवतार पूर्ण दहा । सहज तू विश्वात्मा महा । स्थूळसूक्ष्मी वससी तू ॥७५॥
ऐसा कार्यकारण शाप । अंगिकारी जगाचा बाप । दुष्टांवरी असे कोप । सृष्टिप्रतिपाळ करावया ॥७६॥
ऐसे दहा अवतार झाले । असे तुवा कर्णी ऐकिले । महाभागवती विस्तारिले । अनंतरूपी नारायण ॥७७॥
कार्यकारण अवतार होती । क्वचित्प्रकट क्वचित गुप्ती । ते ब्रह्मज्ञानी जाणती । मूढमति काय जाणे ॥७८॥
आणीक सांगेन तुज । विनोद झालासे सहज । अनुसया अत्रिऋषीची भाज । पतिव्रताशिरोमणी ॥७९॥
तिचे गृही जन्म जाहले । त्रयमूर्ति अवतरले । कपटवेष धरोनि आले । पुत्र जाहले तियेचे ॥८०॥
नामधारक पुसे सिद्धासी । विनोदकथा निरोपिलीसी । देव अतिप्रकट वेषी । पुत्र जाहले कवणे परी ॥८१॥
अत्रि ऋषि पूर्वी कवण । कवणापासूनि उत्पन्न । मूळ पुरुष होता कवण । विस्तारोनि मज सांगावे ॥८२॥
म्हणे सरस्वती गंगाधर । पुढील कथेचा विस्तार । ऐकता होय मनोहर । सकलांभीष्टे साधती ॥८३॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरो श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे अंबरीषव्रतनिरूपणं नाम तृतीयोऽध्यायः ॥३॥
ओवीसंख्या ॥८३॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु

<poem> श्रीगणेशाय नमः ।
ऐशी शिष्याची विनंती । ऐकोन सिद्ध काय बोलती । साधु साधु तुझी भक्ति । प्रीति पावो गुरुचरणी ॥१॥
ऐक शिष्यचूडामणी । धन्य धन्य तुझी वाणी । आठवतसे तुझ्या प्रश्नी । आदिमध्यावसानक ॥२॥
प्रश्न केला बरवा निका । सांगेन आतां तुज विवेका । अत्रि ऋषीचा पूर्वका । सृष्टीपासोनि सकळ ॥३॥
पूर्वी सृष्टि नव्हती काही । जलमय होते सर्वही । आपोनारायण म्हणोनि पाही । वेद बोलती याची कारणे ॥४॥
उदक आपोनारायण । सर्वां ठायी वास पूर्ण । बुद्धिसंभवप्रपंचगुण । हिरण्यगर्भ अंड निर्मिले ॥५॥
तेचि ब्रह्मांड नाम जाहले । रजोगुने ब्रह्मासि निर्मिले । हिरण्यगर्भ नाम पावले । देवतावर्ष एक होते ॥६॥
तेचि ब्रह्मांड देखा । फुटोनि शकले झाली ऐका । एक शकल भूमिका । होऊनि ठेली शकले दोनी ॥७॥
ब्रह्मा तेथे उपजोन । रचिले चवदाहि भुवन । दाही दिशा मानसवचन । काळ कामक्रोधादि सकळ ॥८॥
सृष्टि रचावयासी । सप्त पुत्र उपजवी मानसी । नामे सांगेन परियेसी । सात जण ब्रह्मपुत्र ॥९॥
मरीचि अत्रि आंगिरस । पुलस्त्य पुलह क्रतु वसिष्ठ । सप्त पुत्र जाहले श्रेष्ठ । सृष्टिकर्ता ब्रह्मा जाण ॥१०॥
सप्त ब्रह्मपुत्रांमधील अत्रि । तेथूनि पीठ गुरुसंतति । सांगेन ऐका एकचित्ती । सभाग्य नामधारका ॥११॥
ऋषि अत्रीची भार्या । नाम तिचे अनसूया । पतिव्रताशिरोमणिया । जगदंबा तेचि जाण ॥१२॥
तिचे सौंदर्यलक्षण । वर्णू शके ऐसा कोण । जिचा पुत्र चंद्र आपण । तिचे रूप काय सांगो ॥१३॥
पतिसेवा करी बहुत । समस्त सुरवर भयाभीत । स्वर्गैश्वर्य घेईल त्वरित । म्हणोनि चिंतिती मानसी ॥१४॥
इंद्रादि सुरवर मिळुनि । त्रयमूर्तिपासी जाउनी । विनविताती प्रकाशोनी । आचार अत्रि ऋषीचा ॥१५॥
इंद्र म्हणे स्वामिया । पतिव्रता स्त्री अनसूया । आचार तिचा सांगो काया । तुम्हाप्रती विस्तारोनि ॥१६॥
पतिसेवा करी भक्तीसी । मनोवाक्कायमानसी । अतिथिपूजा महाहर्षी । विमुख नव्हे कवणे काळी ॥१७॥
तिचा आचार देखोनि । सूर्य भीतसे गगनी । उष्ण तिजला होईल म्हणोनि । मंद मंद तपतसे ॥१८॥
अग्नि झाला भयाभीत । शीतळ असे वर्तत । वायु झाला भयचकित । मंद मंद वर्ततसे ॥१९॥
भूमि आपण भिऊनि देखा । नम्र जाहली पादुका । शाप देईल म्हणोनि ऐका । समस्त आम्ही भीतसो ॥२०॥
नेणो घेईल कवण स्थान । कोण्या देवाचे हिरोन । एखाद्याते वर देता जाण । तोही आमुते मारू शके ॥२१॥
यासि करावा उपाय । तू जगदात्मा देवराय । जाईल आमुचा स्वर्गठाय । म्हणोनि आलो तुम्हा सांगो ॥२२॥
न कराल जरी उपाय यासी । सेवा करू आम्ही तिसी । तिचे द्वारी अहर्निशी । राहू चित्त धरोनिया ॥२३॥
ऐसे ऐकोनि त्रयमूर्ति । महाक्रोधे कापती । चला जाऊ पाहू कैसी सती । म्हणती आहे पतिव्रता ॥२४॥
व्रतभंग करूनी तिसी । ठेवूनि येऊ भूमीसी । अथवा वैवस्वतालयासी । पाठवू म्हणोनि निघाले ॥२५॥
सत्त्व पहावया सतीचे । त्रयमूर्ती वेष भिक्षुकाचे । आश्रमा आले अत्रीचे । अभ्यागत होऊनिया ॥२६॥
ऋषि करू गेला अनुष्ठान । मागे आले त्रयमूर्ति आपण । अनसूयेसी आश्वासून । अतिथि आपण आलो म्हणती ॥२७॥
क्षुधे बहु पीडोन । आम्ही आलो ब्राह्मण । त्वरित द्यावे सती अन्न । अथवा जाऊ आणिका ठाया ॥२८॥
सदा तुमचे आश्रमांत । संतर्पण अभ्यागत । ऐको आली कीर्ति विख्यात । म्हणोनि आलो अनसूये ॥२९॥
इच्छाभोजनदान तुम्ही । देता म्हणोनि ऐकिले आम्ही । ठाकोनि आलो याचि कामी । इच्छाभोजन मागावाया ॥३०॥
इतुके ऐकोनि अनसूया । नमन केले तत्क्षणिया । बैसकार करूनिया । क्षालन केले चरण त्यांचे ॥३१॥
अर्घ्य पाद्य देऊनि त्यांसी । गंधाक्षतापुष्पेसी सवेच म्हणतसे हर्षी । आरोगण सारिजे ॥३२॥
अतिथी म्हणे तये वेळी । करोनि आलो आंघोळी । ऋषि येती बहुता वेळी । त्वरित आम्हा भोजन द्यावे ॥३३॥
वासना पाहोनि अतिथीते । काय केले पतिव्रते । ठाय घातले त्वरिते । बैसकार केला देखा ॥३४॥
बैसवोनिया पाटावरी । घृतेसी पात्र अभिधारी । घेवोनी आली आपण क्षीरी । शाक पाक तये वेळी ॥३५॥
तिसी म्हणती अहो नारी । आम्ही अतिथी आलो दुरी । देखोनि तुझे स्वरूप सुंदरी । अभीष्ट मानसी आणिक वसे ॥३६॥
नग्न होवोनि आम्हांसी । अन्न वाढावे परियेसी । अथवा काय निरोप देशी । आम्ही जाऊ नाही तरी ॥३७॥
ऐकोनि द्विजांचे वचन । अनसूया करी चिंतन । आले विप्र पहावया मन । कारणिक पुरुष होतील ॥३८॥
पतिव्रता शिरोमणी । विचार करी अंतःकरणी । अतिथी विमुख तरी हानि । निरोप केवी उल्लंघू ॥३९॥
माझे मन असे निर्मळ । काय करील मन्मथ खळ । पतीचे असे तपफळ । तारील मज म्हणतसे ॥४०॥
ऐसे विचारोनि मानसी । तथास्तु म्हणे तयांसी । भोजन करावे स्वस्थ चित्तेसी । नग्न वाढीन म्हणतसे ॥४१॥
पाकस्थाना जाऊनि आपण । चिंतन करी पतीचे चरण । वस्त्र फेडोनि नग्न । म्हणे अतिथी बाळे माझी ॥४२॥
नग्न होवोनी सती देखा । घेऊनि आली अन्नोदका । तव तेचि झाले बाळका । ठायांपुढे लोळती ॥४३॥
बाळे देखोनि अनसूया । भयचकित होवोनिया । पुनरपि वस्त्रे नेसोनिया । आली तया बाळकांजवळी ॥४४॥
रुदन करिती तिन्ही बाळे । अनसूया रहावी वेळोवेळ । क्षुधार्त झाली केवळ । म्हणोनि कडिये घेतसे ॥४५॥
कडिये घेवोनि बाळकांसी । स्तनपान करवी अतिहर्षी । एका सांडोनि एकाशी । क्षुधा निवारण करितसे ॥४६॥
पाहे पा नवल काय घडले । त्रयमूर्तीची झाली बाळे । स्तनपान मात्रे तोषले । तपफळ ऐसे पतिव्रतेचे ॥४७॥
ज्याचे उदरी चौदा भुवन । सप्त समुद्र वडवाग्नि जाण । त्याची क्षुधा निवारण । पतिव्रतास्तनपानी ॥४८॥
चतुर्मुख ब्रह्मयासी । सृष्टि करणे अहर्निशी । त्याची क्षुधा स्तनपानेसी । केवी झाली निवारण ॥४९॥
भाळाक्ष कर्पूर गौर । पंचवक्त्र काळाग्निरुद्र । स्तनपान करवी अनसूया सुंदर । तपस्वी अत्री ऐसा ॥५०॥
अनसूया अत्रिरमणी । नव्हती ऐशी कोणी । त्रयमूर्तीची झाली जननी । ख्याति झाली त्रिभुवनांत ॥५१॥
कडिये घेवोनि बाळकांसी । खेळवीतसे तिघांसी । घालोनिया पाळण्यासी । पर्यंदे गाई तये वेळी ॥५२॥
पर्यंदे गाय नानापरी । उपनिषदार्थ अतिकुसरी । अतिउल्हासे सप्त स्वरी । संबोखितसे त्रिमूर्तीसी ॥५३॥
इतुके होता तये वेळी । माध्यान्हवेळ अतिथिकाळी । अत्रि ऋषि अतिनिर्मळी । आला आपुले आश्रमा ॥५४॥
घरामाजी अवलोकिता । तव देखिली अनसूया गाता । कैची बाळे ऐसे म्हणता । पुसतसे स्त्रियेसी ॥५५॥
तिणे सांगितला वृत्तान्त । ऋषि ज्ञानी असे पाहात । त्रयमूर्ति हेचि म्हणत । नमस्कार करितसे ॥५६॥
नमस्कारिता अत्रि देखा । संतोष विष्णुवृषनायका । आनंद झाला चतुर्मुखा । प्रसन्न झाले तये वेळी ॥५७॥
बाळ राहिले पाळणेसी । निजमूर्ति ठाकले सन्मुखेसी । साधु साधु अत्रि ऋषि । अनसूया सत्य पतिव्रता ॥५८॥
तुष्टलो तुझे भक्तीसी । माग मनी वर इच्छिसी । अत्रि म्हणे सतीसी । जे वांछिसी माग आता ॥५९॥
अनसूया म्हणे ऋषीसी । प्राणेश्वरा तूचि होसी । देव पातले तुमच्या भक्तीसी । पुत्र मागा तुम्ही आता ॥६०॥
तिघे बाळक माझे घरी । रहावे माझी पुत्रापरी । हेचि मागतो निर्धारी । त्रयमूर्ति आपणां एकरूपा ॥६१॥
ऐसे वचन ऐकोनि । वर दिधला मूर्ती तिन्ही । राहती बाळके म्हणोनि । आपण गेले निजालयासी ॥६२॥
त्रिमूर्ति राहिले त्यांचे घरी । अनसूया पोशी बाळकापरी । नामे ठेविली प्रीतिकरी । त्रिवर्गांची परियेसा ॥६३॥
ब्रह्मामूर्ति चंद्र झाला । विष्णुमूर्ति दत्त केवळा । ईश्वर तो दुर्वास नाम पावला । तिघे पुत्र अनसूयेचे ॥६४॥
दुर्वास आणि चंद्र देखा । उभे राहूनि मातेसन्मुखा । निरोप मागती कौतुका । जाऊ तपा निजस्थाना ॥६५॥
दुर्वास म्हणे जननी । आम्ही ऋषि अनुष्ठानी । जाऊ तीर्थे आचरोनि । म्हणोनि निरोप घेतला ॥६६॥
चंद्र म्हणे अहो माते । निरोप द्यावा आम्हा त्वरिते । चंद्रमंडळी वास माते । नित्य दर्शन तुमचे चरणी ॥६७॥
तिसरा दत्त विष्णुमूर्ति । असेल तुमचे धरोनि चित्ती । त्रयमूर्ति तोचि निश्चिती । म्हणोनि सांगती तियेसी ॥६८॥
त्रयमूर्ति जाण तोचि दत्त । सर्व विष्णुमय जगत । राहील तुमचे धरोनि चित्त । विष्णुमूर्ति दत्तात्रेय ॥६९॥

अनसूयेचे घरी देखा । त्रयमूर्ति राहिली मूर्ति एका । नाम दत्तात्रेय एका । मूळपीठ श्रीगुरूचे ॥७१॥
ऐशापरी सिद्ध देखा । कथा सांगे नामधारका । संतोषे प्रश्न करी अनेका । पुसतसे सिद्धासी ॥७२॥
जय सिद्ध योगीश्वरा । भक्तजनमनोहरा । तारक संसारसागरा । ज्ञानमूर्ति कृपासिंधो ॥७३॥
तुझेनि प्रसादे मज । ज्ञान उपजले सहज । तारक आमुचा योगिराज । विनंती माझी परियेसा ॥७४॥
दत्तात्रेयाचा अवतारू । सांगितला पूर्वापारू । पुढे अवतार जाहले गुरु । कवणेपरी निरोपिजे ॥७५॥
म्हणे सरस्वतीगंगाधरू । पुढील कथेचा विस्तारू । ऐकता होय मनोहरू । सकळाभीष्टे साधती ॥७६॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे अनसूयोपाख्यानं नाम चतुर्थोऽध्यायः ॥४॥
श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ ओवीसंख्या ॥७७॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु

<poem> श्रीगणेशाय नमः ।
नामधारक भक्तासी । सांगे सिद्ध विस्तारेसी । अवतार झाला मानुषी । भक्तजन तारावया ॥१॥
ऐक भक्ता नामधारका । अंबरीषाकारणे विष्णु देखा । अंगकारिले अवतार ऐका । मानुषी नाना रूप घेतसे ॥२॥
मत्स्य कूर्म वराह देख । नराचा देह सिंहाचे मुख । वामनरूप झाला भिक्षुक । झाला ब्राह्मण क्षेत्रकर्मी ॥३॥
दशरथाचे कुळी जन्म । प्रख्यात अवतार श्रीराम । राजा होऊनि मागुती जन्म । गौळियाघरी गुरे राखी ॥४॥
वस्त्रे फेडूनि झाला नग्न । बौद्धरूपी झाला आपण । होऊनि कलंकी अवतार जाण । तुरुंगारूढ काय आवडी ॥५॥
नाना प्रकार नाना वेष । अवतार धरी हृषीकेश । तारावया भक्तजनास । दुष्टहनन करावया ॥६॥
द्वापारांती झाला कली । अज्ञान लोक ब्राह्मणकुळी । आचारहीन होऊनि प्रबळी । वर्तती महिमा कलियुगी ॥७॥
भक्तजनतारणार्थ । अवतार धरी श्रीगुरुनाथ । सगराकारणे भगीरथ । आणी गंगा भूमंडळी ॥८॥
तैसे एक विप्रवनिता । आराधी श्रीविष्णु दत्ता । तिचे उदरी अवतार धरिता । आश्चर्य झाले परियेसा ॥९॥
पिठापूर पूर्वदेशी । होता ब्राह्मण उत्तमवंशी । आपस्तंभ शाखेसी । नाम आपळराजा जाण ॥१०॥
तयाची भार्या सुमता । असे आचार पतिव्रता । अतिथि आणि अभ्यागता । पूजा करी भक्तिभावे ॥११॥
ऐसे असतां वर्तमानी । पतिसेवा एकमनी । अतिथिपूजा सगुणी । निरंतर करीतसे ॥१२॥
वर्तता ऐसे एके दिवशी । आला दत्त अतिथिवेषी । श्राद्ध होते अमावस्येसी । विप्राघरी तै देका ॥१३॥
न जेविता ब्राह्मण घरी । दत्ता भिक्षा घाली ते नारी । दत्तात्रेय साक्षात्कारी । प्रसन्न झाला तये वेळी ॥१४॥
त्रैमूर्तीचे रूप घेऊनि । स्वरूप दावियले अतिगहनी । पतिव्रता धावोनि चरणी । नमस्कारी मनोभावे ॥१५॥
दत्तात्रेय म्हणे तियेसी । माग माते इच्छिसी । जे जे वासना तुझे मानसी । पावसी त्वरित म्हणतसे ॥१६॥
ऐकोनि स्वामींचे वचन । विप्रवनिता करी चिंतन । विनवीतसे करद्वय जोडून । नानापरी स्तवोनिया ॥१७॥
म्हणे जय जय जगन्नाथा । तू तारक भवासी तत्त्वता । माझे मनी असे जे आर्ता । पुरवावी ते देवराया ॥१८॥
तू कृपाळु सर्वा भूती । वेदपुराणे वाखाणिती । केवी वर्णावी तुझी कीर्ती । भक्तवत्सला कृपानिधि ॥१९॥
मिथ्या नोहे तुझा बोल । जे का ध्रुवासी दिधले पद अढळ । बिभीषणासी लंकास्थळ । देऊनि राज्य समर्पिले ॥२०॥
भक्तजना तू आधार । तयालागी धरिसी अवतार । ब्रीद असे चराचर । चौदा भुवनामाझारी ॥२१॥
आता माते वर देसी । वासना असे माझे मानसी । न व्हावे अन्यथा बोलासी । कृपानिधि देवराया ॥२२॥
माझे मनीची वासना । पुरवावी जगज्जीवना । अनाथरक्षका नारायणा । म्हणोनि चरणा लागतसे ॥२३॥
ऐकोनि तियेचे करुणावचन । संतोषला त्रयमूर्ति आपण । कर धरिला आश्वासोन । सांग जननी म्हणतसे ॥२४॥
तव बोलिली पतिव्रता । स्वामी जे निरोपिले आता । जननी नाम मज ठेविता । करा निर्धार याच बोला ॥२५॥
मज पुत्र झाले बहुत । नव्हेत स्थिर उपजतमृत । जे वाचले आता असत । अक्षहीन पादहीन ॥२६॥
योग्य झाले नाही कोणी । काय करावे मूर्ख प्राणी । असोनि नसती येणे गुणी । पुत्रावीण काय जन्म ॥२७॥
व्हावा पुत्र मज ऐसा । ज्ञानवंत पुराणपुरुषा । जगद्वंद्य वेदसदृशा । तुम्हासारिका दातारा ॥२८॥
ऐकोनि तियेचे वचन । प्रसन्न झाला दत्त आपण । पुढे असे कार्यकारण । दीक्षार्थ भक्तजनांसी ॥२९॥
तापसी म्हणे तियेसी । पुत्र होईल परियेसी । उद्धरिल तुझे वंशासी । ख्यातिवंत कलियुगी ॥३०॥
असावे तुम्ही त्याचे बोली । येऱ्हवी न राहे तुम्हांजवळी । ज्ञानमार्गी अतुर्बळी । तुमचे दैन्य हरील ॥३१॥
इतुके सांगोनि तापसी । अदृश्य झाला परियेसी । विस्मय करितसे मानसी । विप्रवनिता तयेवेळी ॥३२॥
विस्मय करोनि मनात । पतीसी सांगे वृत्तान्त । दोघे हर्षे निर्भर होत । म्हणती दत्तात्रेय होईल ॥३३॥
माध्यान्हसमयी अतिथिकाळी । दत्त येताती तये वेळी । विमुख न होता तये काळी । भिक्षा मात्र घालिजे ॥३४॥
दत्तात्रेयाचे स्थान । माहूर करवीर क्षेत्र खूण । तयाचा वास सदा जाण । पांचाळेश्वर नगरात ॥३५॥
नाना वेष भिक्षुकरूप । दत्तात्रेय येती साक्षेप । न पुसतां मज निरोप । भिक्षा घाली म्हणतसे ॥३६॥
विप्रस्त्री म्हणे पतीसी । आजि अवज्ञा केली तुम्हांसी । ब्राह्मण न जेवता आपण त्यासी । भिक्षा घातली म्हणतसे ॥३७॥
ऐकोनी सतीच्या बोला । विप्र मनी संतोषला । म्हणे पतिव्रते लाभ झाला । पितर माझे तृप्त झाले ॥३८॥
करावे कर्म पितरांच्या नामी । सर्मपावे विष्णुसी आम्ही । साक्षात्कारे येऊनि स्वामी । भिक्षा केली आम्हा घरी ॥३९॥
कृतार्थ झाले पितृगण समस्त । निधरि झाले स्वर्गस्थ । साक्षात विष्णु भेटले दत्त । त्रैमूर्तिअवतार ॥४०॥
धन्य तुझी मातापिता । जे वर लाधलीस मुख्य आता । पुत्र होईल निभ्रांता । न धरी चिंता मानसी ॥४१॥
हर्षे निर्भर होवोनि । राहिली दोघे निश्चित मनी । होती जाहली गर्भिणी । विप्रस्त्री परियेसा ॥४२॥
ऐसे नव मास क्रमोनि । प्रसूत जाहली शुभदिनी । विप्रे स्नान करूनि । केले जातककर्म तये वेळी ॥४३॥
मिळोनि समस्त विप्रकुळी । जातक वर्तविती तये वेळी । म्हणती तपस्वी होईल बळी । दीक्षाकर्ता जगद्गुरू ॥४४॥
ऐकोनि म्हणती मातापिता । हो कां आमुचा कुळउद्धरिता । आम्हा वर दिधला दत्ता । म्हणोनि ठेविती तया नाव ॥४५॥
श्रीपाद म्हणोनि या कारण । नाम ठेवी तो ब्राह्मण । अवतार केला त्रैमूर्ति आपण । भक्तजन तारावया ॥४६॥
वर्तत असता त्याचे घरी । झाली सात वर्षे पुरी । मौजीबधन ते अवसरी । करिता झाला द्विजोत्तम ॥४७॥
बांधिता मौजी ब्रह्मचारी । म्हणता झाला वेद चारी । मीमांसा तर्क अतिविस्तारी । म्हणो लागला तये वेळी ॥४८॥
ऐकोनि समस्त नगरलोक। विस्मय करिती सकळिक । होईल अवतार कारणिक । म्हणोन बोलती आपणात ॥४९॥
आचार व्यवहार प्रायश्चित्त । समस्तांसी आपण बोलत । वेदान्तभाष्य वेदार्थ । सांगतसे द्विजवरांसी ॥५०॥
वर्तता ऐसे तयासी । झाली वर्षे षोडशी । विवाह करू म्हणती पुत्रासी । मातापिता अवधारा ॥५१॥
विचार करिती पुत्रासवे । बा रे लग्न तुवा करावे । श्रीपाद म्हणे ऐका भावे । माझी वांछा सांगेन ॥५२॥
कराल विवाह माझा तुम्ही । सांगो ऐका विचार आम्ही । वैराग्यस्त्रीसंगे असेन मी । काम्य आमुचे तियेजवळी ॥५३॥
ते स्त्रियेवाचूनि आणीक नारी । समस्त जाणा मातेसरी । जरी आणाल ते सुंदरी । वरीन म्हणे तये वेळी ॥५४॥
आपण तापसी ब्रह्मचारी । योगस्त्रियेवांचोनि नारी । बोल धरा निर्धारी । श्रीवल्लभ नाम माझे ॥५५॥
श्रीपाद श्रीवल्लभ नाम ऐसे । झाले त्रिमूर्ति कैसे । पितयाते म्हणतसे । जाउ उत्तरपंथासी ॥५६॥
ऐकोनि पुत्राचे वचन । आठविले पूर्वसूचन । भिक्षुके सांगितली जे खूण । सत्य झाली म्हणतसे ॥५७॥
आताच या बोलासी । मोडा घालिता परियेसी । विघ्न होईल त्वरितेसी । म्हणोनि विचारिती तये वेळी ॥५८॥
न म्हणावे पुत्र यासी । अवतारपुरुष तापसी । जैसे याचे वसे मानसी । तैसे करावे म्हणती दोघे ॥५९॥
निश्चय करूनि आपुले मनी । पुत्राभिमुख जनकजननी । होती आशा आम्हांलागुनी । प्रतिपाळिसी म्हणोनिया ॥६०॥
ऐशी मनी व्याकुळित । डोळा निघती अश्रुपात । माता पडली मूर्च्छागत । पुत्रस्नेहे करोनिया ॥६१॥
देखोनि मातेचे दुःख । संबोखित परमपुरुष । उठवूनि स्वहस्ते देख । अश्रुपात पुशितसे ॥६२॥
न करी चिंता अहो माते । जे मागसी ते देईन तूते । दृढ करूनि चित्ताते । रहा सुखे म्हणतसे ॥६३॥
बा रे तुजकरिता आपण । दुःख विसरले संपूर्ण । रक्षिसी आम्हा वृद्धांलागून । दैन्यावेगळे करोनि ॥६४॥
पुत्र असती आपणा दोन । पाय पांगुळ अक्षहीन । त्याते पोशील आता कोण । आम्हा कवण रक्षील ॥६५॥
ऐकोनि जननीचे वचन । अवलोकी अमृतदृष्टीकरून । पुत्र दोघेही झाले सगुण । आली दृष्टिचरणादिक ॥६६॥
वेदशास्त्रादि व्याकरण । सर्व म्हणती तत्क्षण । दोघे येऊनि धरिती चरण । कृतार्थ झालो म्हणोनिया ॥६७॥
आश्वासून तया वेळी । दिधला वर तत्काळी । पुत्रपौत्री नांदा प्रबळी । श्रियायुक्त सनातन ॥६९॥
सेवा करा जनकजननी । पावा सुख महाज्ञानी । इह सौख्य पावोनि । व्हाल मुक्त हे निश्चये ॥७०॥

पुत्र दोघे शतायुषी । निश्चय धरी वो मानसी । कन्या पुत्र होतील यांसी । तुम्ही नेत्री देखाल ॥७२॥
अखंड लक्ष्मी यांचे घरी । यांचे वंशपरंपरी । कीर्तिवंत सचराचरी । संपन्न होती वेदशास्त्रे ॥७३॥
आमची अवज्ञा न करिता । निरोप द्यावा आम्हा त्वरिता । जाणे असे उत्तरपंथा । दीक्षा द्यावया साधुजना ॥७४॥
सांगोनि मातापित्यासी । अदृश्य झाला परियेसी । पावला त्वरित पुरी काशी । गुप्तरूपे होता तेथे ॥७५॥
निघाला तेथूनि बदरीविना । भेटी घेऊनि नारायणा । अवतार असे आपणा । कार्याकारण मनुष्यदेही ॥७६॥
दीक्षा करावया भक्तजना । तीर्थे हिंडणे आपणा । मनोवेगे मार्गक्रमणा । आले तीर्थ गोकर्णासी ॥७७॥
ऐकोनि सिद्ध मुनींचे वचन । विनवी नामधारक आपण । ते परिसा श्रोतेजन । म्हणे सरस्वतीगंगाधरू ॥७८॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे दत्तात्रेयावतारकथनं नाम पंचमेऽध्यायः ॥५॥
श्रीपादश्रीवल्लभनृसिंहसरस्वतीदत्तात्रेयार्पणमस्तु ।
ओवीसंख्या ॥७८॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु

<poem> श्रीगणेशाय नमः । नामधारक म्हणे सिद्धासी । स्वामी तू ज्योति अंधकारासी । प्रकाश केला जी आम्हांसी । गुरुपीठ आद्यंत ॥१॥
त्रैमूर्ति होऊनि आपण । तीर्थे करावी किंकारण । विशेष असे काय गोकर्ण । म्हणोनि गेले तया स्थान ॥२॥
तीर्थे असती अपरंपारी । समस्त सांडुनि प्रीति करी । कैसा पावला दत्तात्री । अवतारी श्रीपाद श्रीवल्लभ ॥३॥
ऐक शिष्या शिखामणी । तुवा पुशिले जे का प्रश्नी । संतोष जाला अंतःकरणी । सांगेन चरित्र श्रीगुरूंचे ॥४॥
विस्तारोनि आम्हांसी । सांगा स्वामी कृपेसी । म्हणोनि लागला चरणांसी । नामधारक प्रीतिकारे ॥५॥
ऐकोनि नामधारकाचे वचन । संतोषले सिद्धाचे मन । सांगतसे विस्तारोन । गुरुचरित्र परियेसा ॥६॥
तुजकरिता आम्हासी । लाभ झाला असे मानसी । गुरुचरित्र सांगवयासी । उत्कंठा मानसी होय ते ॥७॥
म्हणे त्रैमूर्ति अवतरोन । तीर्थे हिंडे केवी आपण । विशेष पावला गोकर्ण । म्हणोनि पुससी आम्हाते ॥८॥
दत्तात्रेय आप्ण । तीर्थे हिंडे तयाचे कारण । भक्तजनाहितार्थ दीक्षेस्तव जाण । उपदेश करावया ॥९॥
विशेष तीर्थ आपुले स्थान । गोकर्णी शंकर असे जाण । याच कारणे निर्गुण । त्रैमूर्ति वसती तया ठाया ॥१०॥
गोकर्णीचे माहात्म्य । सांगतसे अनुपम्य । एकचित्त करूनि नेम । ऐक शिष्या नामधारका ॥११॥
त्या तीर्थाचे आदि अंती । सांगेन तुम्हां विस्तृती । जे पूर्वी वर लाधले असती । अपूर्व असे ऐकता ॥१२॥
महाबळेश्वरलिंग देखा । स्वयंभू शिव असे ऐका । आख्यान त्याचे ऐका । लंबोदरे प्रतिष्ठले ते ॥१३॥
शिष्य म्हणे सिद्धासी । तीर्थमहिमा वानिसी । विघ्नेश्वरे प्रतिष्ठिले तयासी । विस्तारोनि सांग मज ॥१४॥
ऐसे शिष्य विनवीत । ऐकोनि बहु संतोषत । निरोपित आद्यंत । महाबळेश्वरचरित्र ॥१५॥
पुलस्त्य ब्राह्मणाची भार्या । नाम तियेचे कैकया । ईश्वरभक्ति अतिप्रिया । शिवपूजा सर्वकाळ ॥१६॥
नित्य करी शिवपूजन । पूजेवीण न घे अन्न । ऐसे करिता एक दिन । न मिळे लिंग पूजेसी ॥१७॥
व्रतभंग होईल म्हणोनि । मृत्तिकालिंग करूनि । पूजी अति संतोषोनि । भक्तिपुर्वक अवधारा ॥१८॥
तिचा पुत्र अतिक्रूर । नाम तया दशशिर । आला तेथे वेगवत्तर । मातृदर्शन करावया ॥१९॥
नमिता झाला मातेसी । पुसे पूजा काय करिसी । माता सांगे विस्तारेसी । लिंग पूजिले मृत्तिकेचे ॥२०॥
रावण म्हणे जननीसी । माझी माता तू म्हणविसी । मृतिकेचे लिंग पूजेसी । अभाग्य आपुले म्हणतसे ॥२१॥
मागुती म्हणे तियेसी । पूजिता फळ काय यासी । कैकया सांगे पुत्रासी । कैलासपद पाविजे ॥२२॥
रावण म्हणे मातेसी । कैलास आणुनी तुजपासी । देईन हे निश्चयेसी । सायास का वो करित्येसी ॥२३॥
ऐसे बोले तो रावण । मातेसवे करी पण । आणीन त्वरित उमारमण । कैलासासहित लंकेसी ॥२४॥
पूजा करी वो स्वस्थ चित्तेसी । मृत्तिकालिंग का करिसी । म्हणोनि निघाला त्वरितेसी । मनोवेगे निशाचर ॥२५॥
पावला त्वरे शिवपुरासी । शुभ्र रम्य पर्वतासी । धरोनि हालवीक्रोधेसी । वीस बाहु भुजाबळे ॥२६॥
आंदोळले कैलासभुवन । उपटीतसे तो रावण । दाही शिरे टेकून । उचलीन म्हणे उल्हासे ॥२७॥
शिर लावून पर्वतासी । कर टेकून मांडीसी । उचलिता झाला प्राणेसी । सप्तपाताळ आंदोळले ॥२८॥
फणा चुकवी शेष आपण । कूर्म भ्याला कांपोन । भयचकित देवगण । अमरपुर कांपतसे ॥२९॥
कंप झाला स्वर्गभुवन । सत्यलोक विष्णुभुवन । येरू पडतसे गडबडोन । म्हणती प्रळय मांडला ॥३०॥
कैलासपुरीचे देवगण । भयाभीत झाले कंपायमान । भयाभीत गिरिजा आप । होऊनि गेली शिवापासी ॥३१॥
पार्वती विनवी शिवासी । काय झाले कैलासासी । आंदोळतसे सभेसी । पडो पहात निधरि ॥३२॥
नगरात झाला आकान्त । बैसलेती तुम्ही स्वस्थ । करा प्रतिकार त्वरित । म्हणोनि चरणां लागली ॥३३॥
ईश्वर म्हणे गिरिजेसी । न करी चिंता मानसी । रावण माझा भक्त परियेसी । खेळतसे भक्तीने ॥३४॥
ऐसे वचन ऐकोनि । विनवी गिरिजा नमोनि । रक्ष रक्ष शूलपाणी । समस्त देवगणाते ॥३५॥
ऐकोनि उमेची विनंती । शंकरे चेपिला वामहस्ती । दाही शिरे भुजांसहिती । दडपलासे गिरीच्या तळी ॥३६॥
चिंता करी मनी बहुत । शिव शिव ऐसे उच्चारित । ध्यातसे स्तोत्र करीत । शरणागता रक्ष म्हणोनि ॥३७॥
त्राहि त्राहि पिनाकपाणी । जगद्रक्षकशिरोमणी । शरण आलो तुझे चरणी । मरण कैचे भक्तासी ॥३८॥
शंकर भोळा चक्रवर्ती । ऐकोनि त्याची विनंती । चेपिले होते वामहस्ती । काढिले त्वरित कृपेने ॥३९॥
सुटला तेथूनि लंकेश्वर । स्तोत्र करीतसे अपार । स्वशिरे छेदोनि परिकरे । तंतु लाविले निज अंत्रे ॥४०॥
वेद सहस्त्र एकवचनी । वर्णक्रमादि विस्तारोनि । सामवेद अतिगायनी । समस्त रागे गातसे ॥४१॥
गण रसस्वरयुक्त । गायन करि लंकानाथ । तयांची नामे विख्यात । सांगेन ऐका एकचित्ते ॥४२॥
आठही गण प्रख्यात । उच्चारीतसे लंकानाथ । मगण ब्राह्मण प्रख्यात । नगण क्षत्री विशेष ॥४३॥
भगण वैश्य ध्यानेसी । तगण शूद्रवर्णेसी । जगण दैत्य परियेसी । रगण प्रत्यक्ष च्यूतगुणे ॥४४॥
सगण तुरंगरूपेसी । यगण शुद्ध परियेसी । विस्तारित गायनेसी । लंकापति रावण ॥४५॥
गायन करीत नवरसेसी । नावे सांगेन परियेसी । शांत भयानक अद्‌भुतेसी । शृंगार हास्य करुणरसे ॥४६॥
रौद्र वीर बीभत्सेसी । गायन करी अति उल्हासी । वेणू वाजवी सप्तस्वरेसी । ध्यानपूर्वक विधीने ॥४७॥
जंबुद्वीप वास ज्यासी । षड्जस्वर नाम परियेसी । कंठीहूनि उपज ज्यासी । मयूरस्वर आलापित ॥४८॥
उत्तमवंशी उपज ज्यासी । गीर्वाणकुळी ब्रह्मवंशी । पद्मपत्र वर्ण परियेसी । वन्हि देवता शृंगार रसे ॥४९॥
द्वितीय स्वर ऋषभासी । जन्म प्लक्ष द्वीपासी । उपज हृदयस्थानेसी । चाषस्वर आलापित ॥५०॥
प्रख्यात जन्म क्षत्रवंशी । विराजवर्ण यमदेवतेसी । क्रीडा अद्‌भुत रस ऐसी । वीणा वाजवी रावण ॥५१॥
तृतीय स्वर गांधारेसी । गायन करी रावण परियेसी । कुशद्वीप वास ज्यासी । नासिकस्थान अवधारा ॥५२॥

अजस्वर आलापत्यासी । गीर्वाण कुल वैश्यवंशी । सुवर्णवर्ण कांतीसी । चंद्रदेवता अद्‌भुत रसे ॥५३॥
मध्यम स्वर चातुर्थक । क्रौचद्वीप वास ऐक । उरस्थान उक्त उच्चारी मुखे । क्रौचस्वरे आलापित ॥५४॥
गीर्वाणकुळ ब्रह्मवंश । कुंदवर्ण रूप सुरस । ध्यान करी लंकाधीश । लक्ष्मी देवता करुणा रस ॥५५॥
शाल्मली द्वीप भूमीसी । जन्म पंचमस्वरासी । कंठी उपजोनि नादासी । कोकिळास्वरे गातसे ॥५६॥
ध्यान करी तया स्वरासी । उपज झाला पितृवंशी । कृष्णवर्ण रूप त्यासी । गणनाथ देव हास्यरसे ॥५७॥
श्वेतद्वीप जन्म ख्यात । स्वर असे नाम धैवत । ललाट स्थान नाद व्यक्त । दर्दुरस्वरे आलापी देखा ॥५८॥
ऐसा धैवत स्वरासी । बीभत्स रस अतिउल्हासी । गाय रावण परियेसी । ईश्वराप्रती भक्तीने ॥५९॥
पुष्कर द्वीप उपजे त्यासी । निषाद स्वर नाम परियेसी । उत्पत्ति तालव्य संधीसी । हस्तिस्वरे गातसे ॥६०॥
असुरवंश वैश्यकुळी । कल्प शुद्ध वर्ण पाटली । तुंबर मुनि देवता जवळी । सूर्य देवता अवधारी ॥६१॥
भयानक रस देखा । चर्चा व्याकुळ असे निका । येणेपरी सप्त स्वरिका । गायन करी लंकानाथ ॥६२॥
रागसहितरागिणीसी । गायन करी सामवेदासी । श्रीरागादि वसंतासी । आलाप करी दशशिर ॥६३॥
भैरवादि पंचमरागी । नटनारायण मेघरागी । गायन करी अभ्यासयोगी । लंकानाथ शिवाप्रति ॥६४॥
गौडी कोल्हाळ आंधळी । द्राविडरागी कौशिकमाळी । देवगांधार आनंदलिळी । गायन करी लंकानाथ ॥६५॥
धनाश्रिया वराडीसी । रामकलि मंजिरेसी । गौडकी दशाक्षी हारिसी । गायन करी लंकेश्वर ॥६६॥
भैरवी गुर्जरीसहित । वेळावली राग ललित । कर्नाटकी हंसयुक्त । गायन करी दशशिर ॥६७॥
त्राटकी मोटकि देखा । टंकाक्षी सुधा नाटका । सैधवा माळाकी ऐका । गायन करी लंकानाथ ॥६८॥
बंगाली राग सोरटीसी । कामबोध मधुमाधवीसी । देवाक्रिया भूपाळीसी । गायन करी दशानन ॥६९॥

शिर कापून आपुले देखा । यंत्र केले करकमळिका । शिरा काढून तंतुका । रावणेश्वर गातसे ॥७१॥
समयासमयी आलापन । करी दशशिर आपण । प्रातःकाळी करी गायन । अष्टराग परियेसा ॥७२॥
मध्यमराग वेळोवेळी । दशांकभैरव करी भूपाळी । मल्हार धनाश्री बंगाली । प्रातःकाळी गातसे ॥७३॥
बराडी ललिता गुर्जरासी । गौडक्री आहिरी कौशिकेसी । माध्याह्नसमयी गायनासी । रावण करी परियेसा ॥७४॥
कुरंजी तोडी मालश्रियेसी । दशांक पंचम परियेसी । अपराह्न वेळ अतिहर्षी । ईश्वराप्रती गातसे ॥७५॥
चारी प्रकार गौडियेसी । रामकली श्रीरागासी । देवकीपट मंजिरेसी । वसंतुरागे ऋतुकाळी ॥७६॥
ऐसे छत्तीस रागेसी । गायन करी सामवेदासी । निर्वाणरूप भक्तीसी । चंद्रमौळी सांबाचिये ॥७७॥
रावणाचे भक्तीसी । प्रसन्न ईश्वर त्वरितेसी । निजरूप अतिहर्षी । उभा राहिला सन्मुख ॥७८॥
पंचवक्त्र त्रिनेत्रेसी । उभा राहोनि संतोषी । काय इच्छा तुझे मानसी । माग वर म्हणतसे ॥७९॥
म्हणे रावण शिवासी । काय मागावे तुजपासी । लक्ष्मी माझे घरची दासी । आठ निधि माझे घरी ॥८०॥
चतुरानन माझा जाशी । तेहेतीस कोटी देव हर्षी । सेवा करिती अहर्निशी । सूर्य चंद्र वरुण वायु ॥८१॥
अग्नि सारिखा सेवा करी । वस्त्रे धूत अतिकुसरी । यम माझा आज्ञाधारी । निरोपावेगळा न मारी कवणा ॥८२॥
इंद्रजितासारिखा पुत्र । कुंभकर्णाऐसा भ्रात्र । स्थान समुद्रामाजी पवित्र । कामधेनु माझे घरी ॥८३॥
सहस्त्र कोटी आयुष्य मज । हे सांगणे नलगे तुज । आलो असे जे काज । कैलास नेईन लंकेसी ॥८४॥
व्रत असे जननीसी । नित्य पुजन तुम्हांसी । मनोरथ पुरवावे भक्तीसी । कृपासिंधु दातारा ॥८५॥
ईश्वर म्हणे रावणासी । जरी चाड असे पूजेसी । काय करिसी कैलासासी । आत्मलिंग तुज देतो आता ॥८६॥
जे जे मनीची वासना । पुरेल त्वरित ऐक जाणा । लिंग असे प्राण आपणा । म्हणोनि दिधले रावणासी ॥८७॥
पूजा करी वेळ तिन्ही । अष्टोत्तर शत जप करोनि । रुद्राभिषेके अभिषेकोनि । पूजा करावी एकचित्ते ॥८८॥
वर्षे तीन जे पूजिती । तेचि माझे स्वरूप ओती । जे जे मनी इच्छिती । ते ते पावती अवधारा ॥८९॥
हे लिंग असे जयापासी । मृत्यु नाही गा परियेसी । दर्शनमात्रे महादोषी । उद्धरतील अवधारा ॥९०॥
ठेवू नको भूमीवरी । जोवरी पावे तुझी नगरी । वर्षे तीन पूजा करी । तूचि ईश्वर होशील ॥९१॥
वर लाधोनि लंकेश्वर । निरोप देत कर्पूरगौर । करूनि साष्टांग नमस्कार । निघाला त्वरित लंकेसी ॥९२॥
इतुका होता अवसर । नारद होता ऋषीश्वर । निघोनि गेला वेगे सत्वर । अमरपुरा इंद्रभुवना ॥९३॥
नारद म्हणे इंद्रासी । काय स्वस्थ चित्ते बैसलासी । अमरत्व दिधले रावणासी । लक्ष्मी गेली आजि तुमची ॥९४॥
चिरायु झाला लंकेश्वर । प्राणलिंग देत कर्पूरगौर । आणिक दिधला असे वर । तूचि ईश्वर होशील ॥९५॥
वर्षे तीन पूजिलियासी । तूचि माझे स्वरूप होसी । तुझे नगर कैलासी । मृत्यु नाही कदा तुज ॥९६॥
ऐसा वर लाधोनि । गेला रावण संतोषोनि । तेहेतीस कोटी देव कोठूनि । सुटती आता तुम्हासी ॥९७॥
जावे त्वरित तुम्ही आता । सेवा करावी लंकानाथ । उर्वशी रंभा मेनका । त्वरिता भेटीस न्याव्या रावणाचे ॥९८॥
ऐसे वचन ऐकोनि । इंद्र भयभीत मनी । नारदा विनवी कर जोडूनि । काय करावे म्हणतसे ॥९९॥
नारद म्हणे इंद्रासी । उपाय काय त्वरितेसी । जावे तुम्ही ब्रह्मयासी । तयासी उपाय करील ॥१००॥
इंद्र नारदासमवेत । गेले ब्रह्मलोका त्वरित । विस्तारोनिया वृत्तान्त । सांगे इंद्र ब्रह्मयासी ॥१०१॥
ब्रह्मा म्हणे इंद्रासी । जावे त्वरित वैकुंठासी । दैत्येवरी हृषीकेशी । उपाय करील निर्धारे ॥२॥
म्हणोनि निघाले तिघेजण । पावले त्वरित वैकुंठभुवन । भेटला तत्काळ नारायण । सांगती वृत्तान्त रावणाचा ॥३॥
विरिंचि म्हणे विष्णूसी । प्रतिकार करावा वेगेसी । कारण असे तुम्हांसी । राम-अवतारी परियेसा ॥४॥
तेहतीस कोटी देवांसी । घातले असे बंदीसी । याचि कारणे तुम्हांसी । करणे असे अवधारा ॥५॥
ईश्वराचे प्राणलिंग । घेऊनि गेला राक्षस चांग । आता रावणा नाही भंग । तोचि होईल ईश्वर ॥६॥
त्वरित उपाय करावा यासी । पुढे जड होईल तुम्हांसी । निर्दाळावया राक्षसांसी । अवतरोनि तुम्हीच यावे ॥७॥
ऐसे विनवी चतुरानन । मग कोपोन नारायण । कार्य नासेल म्हणोन । निघाला झडकर कैलासा ॥८॥
विष्णु आला ईश्वरापाशी । म्हणे शंकरा परियेसी । प्राणलिंग रावणासी । द्यावया कारण तुम्हां काय ॥९॥
रावण क्रूर महादैत्य । सुरवर सकळ त्याचे भृत्य । कारागृही असती समस्त । केवी सुटती सांग आम्हा ॥११०॥
ऐसे दुराचारियासी । वर देता उल्हासी । देवत्व गेले त्याचे घरासी । घेईल स्वर्ग निर्धारे तो ॥११॥
ईश्वर म्हणे विष्णुसी । तुष्टलो तयाचे भक्तीसी । विसर पडला आम्हांसी । संतोषे दिधले प्राणलिंग ॥१२॥
आपले शिर छेदोनि देखा । वीणा केला स्वहस्तका । सप्तस्वर वेदादिका । गायन केले संतोषे ॥१३॥
जरी मागता पार्वतीसी । देतो सत्य परियेसी । भुली पडली भक्तीसी । लिंग नेले प्राण माझा ॥१४॥
विष्णु म्हणे उमाकांता । तुम्ही ऐसा वर देतां । आम्हां सायास होय तत्त्वतां । दैत्य उन्मत्त होताती ॥१५॥
देवद्विज लोकांसी । पीडा करिती बहुवशी । कारणे आम्हांसी । अवतार धरणे घडते देखा ॥१६॥
कधी दिले लिंग त्यासी । नेले असेल लंकेसी । शंकर म्हणे विष्णुसी । पांच घटी झाल्या आता ॥१७॥
ऐकताच शिववचन । उपाय करी नारायण । धाडिले चक्र सुदर्शन । सूर्याआड व्हावया ॥१८॥
बोलावूनि नारदासी । सांगतसे हृषीकेशी । तुम्ही जावे त्वरितेसी । रावण जातो लंकेसी देखा ॥१९॥
मार्गी जाऊनि तयासी । विलंब करावा परियेसी । जाऊ न द्यावे लंकेसी । त्वरित जावे म्हणतसे ॥१२०॥
चक्र झाले सूर्याआड । स्नानसंध्या रावणा चाड । तुम्ही जाऊनिया दृढ । विलंब करावा तयासी ॥२१॥
ऐकोनिया श्रीविष्णूच्या बोला । नारद त्वरित निघोन गेला । मनोवेगे पावला । जेथे होता लंकानाथ ॥२२॥
नारदाते पाठवूनि । विष्णू विचारी आपुल्या मनी । गणेशासी बोलावूनि । पाठवू म्हणे विघ्नासी ॥२३॥
बोलावूनि गणेशासी । सांगे विष्णु परियेसी । कैसा रावण तुजसी । सदा उपेक्षितो ॥२४॥
सकळ देव तुज वंदिती । त्याचे मनोरथ पुरती । तुज जे का उपेक्षिती । विघ्ने बाधती तयांसी ॥२५॥
तुज नेणतां रावण देखा । घेऊनि गेला निधान ऐका । प्राण लिंगा अतिविशेखा । नेले शिवाजवळूनि ॥२६॥
आता त्वा करावे एक । रावणापाशी जाऊनि देख । कपटरुपे कुब्जक । बाळवेष धरोनिया ॥२७॥
वाटेसि होईल अस्तमान । रावण करील संध्यावंदन । नारद गेला याचि कारण । विलंब करावया दैत्यासी ॥२८॥
आज्ञा शिवाची रावणासी । न ठेवी लिंग भूमीसी । शौचाचमनसमयासी । आपणाजवळी न ठेविजे ॥२९॥
बाळवेषे तुवा जावे । शिष्यरूप करुणाभावे । सूक्ष्मरूप दाखवावे । लिंग घ्यावे विश्वासुनी ॥३०॥
संध्यासमयी तुझे हाती । लिंग देईल विश्वासरीती । तुवा ठेवावे तत्काळ क्षिती । लिंग राहील तेथेची ॥३१॥
येणेपरी गणेशासी । शिकवी विष्णु परियेसी । संतोषोनि हर्षी । भातुके मागे तये वेळी ॥३२॥
लाडू तिळव पंचखाद्य । इक्षु खोबरे दालिम आद्य । शर्करा घृत क्षीर सद्य । द्यावे त्वरित आपणासी ॥३३॥
चणे भिजवून आपणासी । तांदूळ लाह्या साखरेसी । त्वरित भक्षण करावयासी । द्यावे स्वामी म्हणतसे ॥३४॥
जे जे मागितले विघ्नेश्वरे । त्वरित दिधले शार्ङ्गधरे । भक्षित निघाला वेगवक्त्रे । ब्रह्मचारीवेष धरूनि ॥३५॥
गेला होता नारद पुढे । ब्रह्मऋषि महात्म्य गाढे । उभा ठाकला रावणापुढे । कवण कोठूनि आलासी ॥३६॥
रावण म्हणे नारदासी गेलो होतो कैलासासी । केले उत्कृष्ट तपासी । तोषविले तया शिवा ॥३७॥
तेणे प्रसन्न होऊनि आम्हांसी । लिंग दिधले परियेसी । आणिक सांगितले संतोषी । लिंग महिमा अपार ॥३८॥
नारद म्हणे लंकानाथा । दैव थोर तुझे आता । लिंग लाधलासी अद्भुता । जाणो आम्ही आद्यंत ॥३९॥
दाखवी लिंग आम्हांसी । खुणे ओळखु परियेसी । लिंगलक्षण विस्तारेसी । सांगु आम्ही तुजलागी ॥१४०॥

नारद म्हणे लंकेशा । लिंग महिमेचा प्रकार ऐसा । सांगेन तुज बहु सुरसा । बैसोनि ऐके स्वस्थ चित्ते ॥४२॥
लिंग उपजले कवणे दिवशी । पूर्वी जाणिले तयासी । एकचित्ते परियेसी । कथा असे अतिपूर्व ॥४३॥
गिळूनि सकळ सौरभासी । मृग एक काळाग्निसमेसी । ब्रह्मांडखंड परियेसी । पडिला होता तो मृग ॥४४॥
ब्रह्माविष्णु महेश्वरांसी । गेले होते पारधियेसी । मृग मारिले परियेसी । भक्षिले मेद तये वेळी ॥४५॥
तयासी होती तीन शृंगे । खाली असती तीन लिंगे । तिघी घेतली तीन भागे । प्राणलिंगे परियेसा ॥४६॥
लिंगमहिमा ऐक कानी । जे पूजिती वर्षे तिनी । तेचि ईश्वर होती निर्गुणी । वेदमूर्ति तेचि होय ॥४७॥
लिंग असे जये स्थानी । तोचि कैलास जाण मनी । महत्त्व असे याच गुणी । ब्रह्माविष्णुमहेश्वरांसी ॥४८॥
असे आणिक एक बरवे । सांगेन ऐक एकभावे । रावण म्हणे आम्हा जाणे । असे त्वरित लंकेसी ॥४९॥
म्हणोनि निघाला महाबळी । नारद म्हणे तये वेळी । सूर्यास्त आहे जवळी । संध्याकाळ ब्राह्मणासी ॥१५०॥
सहस्त्रवेद आचरसी । संध्याकाळी मार्ग क्रमिसी । वार्टेस होईल तुज निशी । संध्यालोप होईल ॥५१॥
आम्ही जाऊ संध्यावंदनासी । म्हणोनि नारद विनयेसी । पुसोनिया रावणासी । गेला नदीतीरा ॥५२॥
इतुकिया अवसरी । पातला गणेश ब्रह्मचारी । रावणापुढे चाचरी । समिधा तोडी कौतुके ॥५३॥
रावण चिंती मानसी । व्रतभंग होईल आपणासी । संध्या करावी त्रिकाळेसी । संदेह घडला म्हणतसे ॥५४॥
ईश्वरे सांगितले आम्हांसी । लिंग न ठेवावे भूमीसी । संध्यासमयो झाली निशी । काय करू म्हणतसे ॥५५॥
तव देखिला ब्रह्मचारी । अति सुंदर बाळकापरी । हिंडतसे नदीतीरी । देखिला रावणे तये वेळी ॥५६॥
मनी विचारी लंकानाथ । ब्रह्मचारी कुमार दिसत । न करी आमुचा विश्वासघात । लिंग देऊ तया हाती ॥५७॥
संध्या करू स्वस्थचित्तेसी । लिंग असेल तयापाशी । बाळक असे हे निश्चयेसी । म्हणोनि गेला तया जवळी ॥५८॥
देखोनिया दशशिर । पळतसे लंबोदर । रावण झाला द्विजवर । अभय देऊनि गेला जवळी ॥५९॥ रावण म्हणे तयासी । तू कवण बा सांग आम्हांसी
। मातापिता कवण तुजसी । कवण कुळी जन्म तुझा ॥१६०॥
ब्रह्मचारी म्हणे रावणा । इतुके पुससी कवण्या कारणा । आमुच्या बापे तुझ्या ऋणा । काय द्यावे सांग मज ॥६१॥
हासोनिया लंकेश्वर । लोभे धरिला त्याचा कर । सांग बाळका कवणाचा कुमर । प्रीतीभावे पुसतो मी ॥६२॥
ब्रह्मचारी म्हणे रावणासी । आमुचा पिता काय पुससी । जटाधारी भस्मांगासी । रुद्राक्ष माळा असती देखा ॥६३॥
शंकर म्हणती तयाशी । भिक्षा मागणे अहर्निशी । वृषारूढ उमा सरसी । जननी ते जगन्माता ॥६४॥
इतुके आम्हांसी पुसतोसी । तुज देखता भय मानसी । बहुत वाटे परियेसी । सोड हात जाऊ दे ॥६५॥
रावण म्हणे ब्रह्मचारी । तव पिता असे दरिद्री । भिक्षा मागे घरोघरी । सौख्य तुज काही नसे ॥६६॥
आमुचे नगर लंकापूर । रत्नखचित असे सुंदर । आम्हांसवे चाल सत्वर । देवपूजा करीत जाई ॥६७॥
जे जे मागसी आम्हांसी । सकळ देईन परियेसी । सुखे रहावे मजपाशी । म्हणे रावण तये वेळी ॥६८॥
ब्रह्मचारी म्हणे त्यासी । लंकेसी बहुत राक्षसी । आम्ही बाळक अरण्यवासी । खातील तेथे जातांची ॥६९॥
न येऊ तुझिया नगरासी । सोड जाऊं दे घरासी । क्षुधे पीडतो बहुवसी । म्हणोनि भक्षितो भातुके ॥१७०॥
इतुके ऐकोनि लंकानाथ । त्या बाळका संबोधित । लिंग धरी ऐसे म्हणत । मी संध्या करीन तोंवरी ॥७१॥
बाळक विनवी तयासी । न धरी लिंग परियेसी । मी ब्रह्मचारी अरण्यवासी । उपद्रवू नको म्हणतसे ॥७२॥
तव लिंग असे जड । मी पण बाळ असे वेड । न घे लिंग जाऊ दे सोड । धर्म घडेल तुजलागी ॥७३॥
नानापरी संबोधित । लिंग देत लंकानाथ । संध्या करावया आपण त्वरित । समुद्रतीरी बैसला ॥७४॥
ब्रह्मचारी तयासी । उभा विनवीतसे रावणासी । जड झालिया आपणासी । ठेवीन त्वरित भूमीवरी ॥७५॥
वेळ तीन परियेसी । बोलवीन तुम्हांसी । वेळ लागलिया परियेसी । आपण ठेवीन भूमीवरी ॥७६॥
ऐसा निर्धार करोनि । उभा गणेश लिंग घेऊनि । समस्त देव विमानी । बैसोनि पाहती कौतुके ॥७७॥
अर्घ्यसमयी रावणासी । बोलवी गणेश परियेसी । जड झाले लिंग आम्हांसी । सत्वर घे गा म्हणतसे ॥७८॥
न्यासपूर्वक अर्घ्य देखा । रावण करी अति विवेका । हाता दाखवी बाळका । येतो राहे म्हणोनि ॥७९॥
आणिक क्षणभर राहोनि । गणेश बोले वेळ दोनी । जड झाले म्हणोनि । शीघ्र यावे म्हणतसे ॥८०॥
न ये रावण ध्यानस्थ । गणेश असे विचारीत । समस्त देवांते साक्षी करीत । लिंग ठेवीत भूमीवरी ॥८१॥
श्रीविष्णूते स्मरोनि । लिंग ठेविले स्थापोनि । संतोष जाहला गगनी । पुष्पे वर्षती सुरवर ॥८२॥
अर्घ्य देवोनी लंकेश्वर । निघोनि आला सत्वर । लिंग देखिले भूमीवर । मनी विकळ जाहला ॥८३॥
आवेशोनि रावण देखा । ठोसे मारी गणनायका । हास्यवदन रडे तो ऐका । भूमीवरी लोळतसे ॥८४॥
म्हणे माझिया पित्यासी । सांगेन आता त्वरितेसी । का मारिले मज बाळकासी । म्हणोनि रडत निघाला देखा ॥८५॥
मग रावण काय करी । लिंग धरोनिया दृढ करी । उचलू गेला नानापरी । भूमीसहित हालतसे ॥८६॥
कापे धरणि तये वेळी । रावण उचली महाबळी । न ये लिंग शिर आफळी । महाबळी राहिला ॥८७॥
नाम पाविला याचि कारणे । महाबळेश्वर लिंग जाणे । मुरडोनि ओढिता रावणे । गोकर्णाकार जाहले ॥८८॥
ऐसे करिता लंकानाथ । मागुती गेला तपार्थ । ख्याती झाली गोकर्णांत । समस्त देव तेथे आले ॥८९॥
आणिक असे अपार महिमा । सांगतसे अनुपमा । स्कंदपुराण वर्णिली सीमा । प्रख्याद असे परियेसा ॥१९०॥?
ऐकोनि सिद्धाचे वचन । नामधारक संतोषोन । पुनरपि चरणा लागे जाण । म्हणे सरस्वती गंगाधरू ॥१९१॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ ।
श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे गोकर्णमहिमा वर्णनं नाम षष्ठोऽध्यायः॥६॥
श्रीदत्तात्रेयार्पितमस्तु ।
ओवीसंख्या ॥१९१॥

%

<poem> श्रीगणेशाय नमः ।
नामधारक म्हणे सिद्धासी । गोकर्णमहिमा आम्हांसी । निरोपिजे स्वामी कृपेसी । पूर्वी कवणा साक्ष झाली ॥१॥
समस्त तीर्थ सांडुनी । श्रीपाद गेले किंकारणी । पूर्वी आधार केला कवणी । पुराण कथा सांगा मज ॥२॥
ज्यावरी असेल गुरूची प्रीति । तीर्थमहिमा ऐकणे चित्ती । वांछा होतसे ज्ञानज्योती । कृपासिंधु गुरुराया ॥३॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । गोकर्णमहिमा मज पुससी । सांगेन तुज विस्तारेसी । एकचित्ते परियेसा ॥४॥
पूर्वयुगी इक्ष्वाकुवंशी । मित्रसह राजा परियेसी । प्रतापवंत क्षत्रियराशी । सर्वधर्मरत देखा ॥५॥
राजा सकळशास्त्रज्ञ । विवेकी असे श्रुतिनिपुण । बलाढ्य शूर महाभीम । विद्योद्योगी दयानिधि ॥६॥
असता राजा एके दिवशी । विनोदे निघाला पारधीसी । प्रवेशला महावनासी । वसती शार्दूल सिंह जेथे ॥७॥
निर्मनुष्य अरण्यात । राजा पारधि खेळत । भेटला तेथे अद्भुत । दैत्य ज्वाळाकार भयानक ॥८॥
राजा देखोनि तयासी । वर्षता शर झाला कोपेसी । मूर्छना येऊनि धरणीसी । पडला दैत्य तया वेळी ॥९॥
होता तयाचा बंधु जवळी । आक्रंदतसे प्रबळी । पाषाण हाणी कपाळी । बंधुशोके करोनिया ॥१०॥
प्राण त्यजिता निशाचर । बंधूसी म्हणतसे येर । जरी तू होसी माझा सहोदर । सूड घेई माझा तू ॥११॥
ऐसे बोलोनि बंधूसी । दैत्य पावला पंचत्वासी । अनेक मायापाशी । नररूप धरिले तया वेळी ॥१२॥
रूप धरोनि मानवाचे । सौम्य वाणी बोले वाचे । सेवकत्व करी राजयाचे । अतिनम्रत्वे बोलोनिया ॥१३॥
सेवा करी नानापरी । सेवकाचे सारखे मन धरी । कितीक दिवसांवरी । वनांतरी राजा होता देखा ॥१४॥
समस्त मृग जिंकूनि । दुष्ट जीवाते वधोनि । राजा आला परतोनि । आपुल्या नगरा परियेसा ॥१५॥
ऐसे असता एके दिवशी । पितृश्राद्ध आले परियेसी । आमंत्रण सांगे ऋषींसी । वसिष्ठादिका परियेसा ॥१६॥
ते दिवशी राजा नेमे स्वयंपाक । करवीतसे सविवेक । कापट्ये होता तो सेवक । तया स्थानी ठेविला ॥१७॥
राजा म्हणे तयासी । पाकस्थानी तू वससी । जे जे मागेल भाणवसी । सर्व आणूनि त्वा द्यावे ॥१८॥
अंगिकारोनि तो सेवक । नरमांस आणोनि देख । कापट्यभावे करवी पाक । केली शाक तया वेळी ॥१९॥
ठाय घालिता ऋषेश्वरांसी । पहिलेच वाढिले नरमांसासी । पाहता कोप आला वसिष्ठासी । दिधला शाप तये वेळी ॥२०॥
वसिष्ठ म्हणे रायासी । नरमांस वाढिले आम्हांसी । त्वरित ब्रह्मराक्षस होसी । म्हणोनि शाप दिधला ॥२१॥
शाप देता तये काळी । राजा कोपला तात्काळी । अपराध नसता प्रबळी । वाया मज का शापिले ॥२२॥
नेणे मांसपाक कोणी केला । माझा निरोप नाही झाला । वृथा आमुते शाप दिधला । आपण शापीन म्हणतसे ॥२३॥
उदक घेऊनि अंजुळी । शापावया सिद्ध झाला तये काळी । तव राजपत्नी येऊनि जवळी । वर्जी आपुले पतीते ॥२४॥
पतीसी म्हणे ते नारी । गुरूसी शापिता दोष भारी । वंदुनी तयाचे चरण धरी । तेणे भवसागर तरशील ॥२५॥
मदयंती सतीचे वचन । मानिता झाला राजा आपण । अंजुळीचे उदक जाण । टाकी आपुले चरणावरी ॥२६॥
शाप देता कल्मषपाणी । पडले राजाचे चरणी । कल्मषपाद नाम म्हणोनि । ब्रह्मराक्षस झाला तो राव ॥२७॥
राजपत्नी येऊनि परियेसी । लागली वसिष्ठचरणांसी । उद्धरी स्वामी बाळकासी । एवढा कोप काय काज ॥२८॥
करुणावचन ऐकोनि । शांत झाला वसिष्ठ मुनि । वर्षे बारा क्रमोनि । पुनरपि राजा होशील ॥२९॥
उःशाप देऊनि वसिष्ठ ऋषि । गेला आपुले स्थानासी । ब्रह्मराक्षस राजा परियेसी । होऊनी गेला वनांतरा ॥३०॥
निर्मनुष्य अरण्यात । राजा राहिला प्रख्यात । भक्षीतसे अनेक जंत । पशुमनुष्य आदिकरूनि ॥३१॥
ऐसे क्रमिता तये वनी । मार्गस्थ दंपत्ये दोनी । ब्राह्मण जाता मार्ग क्रमुनी । देखिला राक्षस भयासुर ॥३२॥
येऊनि धरी ब्राह्मणासी । व्याघ्र जैसा पशूसी । घेऊनि गेला भक्षावयासी । विप्रस्त्री समागमे ॥३३॥
अतिशोक करी ब्राह्मणी । जाऊनि लागे राक्षसचरणी । राखे मजला अहेवपणी । प्राणेश्वराते सोडी पितया ॥३४॥
न भक्षी गा माझा पति ।माझी तयावरी अतिप्रीति । मज भक्षी गा म्हणे सुमति । वल्लभाते सोडोनिया ॥३५॥
पतीविण राहता नारी । जन्म वृथाचि दगडापरी । पहिले माते स्वीकारी । प्राण राखे पतीचे ॥३६॥
पति लावण्य पूर्ववयेसी । वेदशास्त्रपारंगेसी । याचा प्राण जरी तू रक्षिसी । जगी होईल तुज पुण्य ॥३७॥
कृपा करी गा आम्हावरी । होईन तुझी कन्या कुमारी । मज पुत्र होतील जरी । नाम वाढवीन तुझे मी ॥३८॥
ऐसे नानापरी देखा । विप्रस्त्री करी महादुःखा । बोल न मानोनि राक्षसे ऐका । त्या ब्राह्मणाते भक्षिले ॥३९॥
पतीते भक्षिले देखोनि । शाप वदली ते ब्राह्मणी । म्हणे राक्षसा ऐक कानी । शाप माझा निधरि ॥४०॥
तू राजा सूर्यवंशी । शापास्तव राक्षस झालासी । पुढे मागुती राजा होसी द्वादश वर्षे क्रमोनि ॥४१॥
परि रमता स्त्रियेसवे । प्राण जाईल स्वभावे । अनाथा भक्षिले दुष्ट भावे । दुरात्म्या तू राक्षसा ॥४२॥
शाप देऊनि तया वेळी । पतीच्या अस्थि मिलवूनि जवळी । काष्ठे घालोनिया प्रबळी । अग्निप्रवेश केला तिने ॥४३॥
ऐसे असता राव देखा । क्रमी बारा वर्षे निका । पुनरपि राजा होऊन ऐका । आला आपुले नगरासी ॥४४॥
विप्रस्त्रियेचे शापवचन । स्त्रियेसी सांगितली खूण । म्हणे संग करिता तत्क्षण । मृत्यु असे आपणासी ॥४५॥
ऐकोनि पतीचे वचन । मदयंती दुःख करी आपण । मन करूनि निर्वाण । त्यजावया प्राण पहातसे ॥४६॥
मदयंती म्हणे रायासी । संतान नाही तुमचे वंशासी । वनी कष्टला बारा वर्षी । आपुले कर्म न चुकेची ॥४७॥
ऐकोनि सतीचे वचन । शोके दाटला अतिगहन । अश्रु आले नेत्रांतून । काय करू म्हणतसे ॥४८॥
मंत्रीवृद्धपुरोहितांसी । बोलाविले परियेसी । ब्रह्महत्या घडली आम्हांसी । विमोचन होय कवणेपरी ॥४९॥
मंत्रीवृद्धपुरोहित । तयासी म्हणती ऐका मात । तीर्थे आचरावी समस्त । तेणे पुनीत व्हाल तुम्ही ॥५०॥
करोनि ऐसा विचार । राजा निघे तीर्था साचार । सर्व तीर्थपरिकर । विधिपूर्वक करीतसे ॥५१॥
ज्या ज्या तीर्था जाय आपण । अनेक पुण्य करी जाण । यज्ञादिक कर्म अन्नदान । ब्राह्मणादिका देतसे ॥५२॥
ऐसी नाना तीर्थे करीत । परी ब्रह्महत्या सवेचि येत । अघोररूपी असे दिसत । कवणेपरी न जायची ॥५३॥
कष्टोनि राजा बहुतांपरी । निर्वाण होऊनि मनाभीतरी । हिंडत पातला मिथिलापुरी । चिंताग्रस्त होवोनिया ॥५४॥
नगरा-बाह्यप्रदेशी । श्रमोनि राजा परियेसी । चिंता करी मानसी । वृक्षच्छाये बैसलासे ॥५५॥
ऋषेश्वरासमवेत । जैसा रुद्र प्रकाशित । गौतम ऋषि अवचित । तया स्थानासि पातला ॥५६॥
राजा देखोनि गौतमासी । चरणी लोळे संतोषी । नमन करी साष्टांगेसी । भक्तिभावे करोनिया ॥५७॥
आश्वासूनि तये वेळी । गौतम पुसे करुणाबहाळी । क्षेमसमाधान सकळी । पुसता झाला वृत्तान्त ॥५८॥
काय झाले तुझे राज्य । अरण्यवासाचे काय काज । चिंताकुलित मुखांबुज । कवण कार्य घडले असे ॥५९॥
ऐकोनि ऋषींचे वचन । राजा सांगे विस्तारोन । शाप जाहला ब्रह्मवचन । ब्रह्महत्या घडली मज ॥६०॥
प्रायश्चित्ते सकळिक । यज्ञादि कर्मे धर्मादिक । सुक्षेत्रे अपार तीर्थे देख । आपण सकळ आचरली ॥६१॥
शमन न होय महादोष । सवेचि येत अघोर वेष । व्रते आचरलो कोटीश । न जाय दोष सर्वथा ॥६२॥
आजिचेनि माझे सफळ जनन । दर्शन झाले जी तुमचे चरण । होतील माझे कष्ट निवारण । म्हणोनि चरणा लागलो ॥६३॥
ऐकोनि रायाचे वचन । करुणासागर गौतम आपण । म्हणे भय सांडी गा निर्वाण वचन । तारील शंकर मृत्युंजय ॥६४॥
तुझे पापनिवारणासी । सांगेन तीर्थविशेषी । महापातक संहारावयासी । गोकर्ण क्षेत्र असे भले ॥६५॥
स्मरण करितां गोकर्णासी । ब्रह्महत्यादि पाप नाशी । तेथे ईश्वर सदा निवासी । मृत्युंजय सदाशिव ॥६६॥
जैसे कैलासाचे शिखर । अथवा स्वर्धुनीमंदिर । निश्चय वास कर्पूरगौर । गोकर्णक्षेत्री परियेसा ॥६७॥
जैसी अंधकाररजनी । प्रकाशावया जैवी अग्नि । चंद्रोदय जरि होय निर्वाणी । तरी सूर्यप्रकाशावीण गति नव्हे ॥६८॥
तैसे समस्त तीर्थाने । पाप नच जाय याचि कारणे । सूर्योदयी तमहरणे । तैसे गोकर्णदर्शने होय ॥६९॥

रुद्रोपेंद्रविरिंचि देखा । जाऊनि तया स्थानी ऐका । तप केले हो सकळिका । कार्यसिद्धि होय त्यांप्रती ॥७१॥
भक्तिपूर्वक तया स्थानी । जप व्रत करिती जाणोनि । फळ होय त्या लक्षगुणी । असे पुण्यक्षेत्र असे ॥७२॥
जैसे ब्रह्मा विष्णु देखा । इंद्रादि देवा सकळिका । साध्य झाले तप ऐका । यावेगळे काय सांगू ॥७३॥
जाणा तो साक्षात् ईश्वर । गोकर्णक्षेत्र कैलासपुर । प्रतिष्ठा करी विघ्नेश्वर । विष्णुनिरोपे विनयार्थ ॥७४॥
समस्त देव तेथे येती । पुण्यक्षेत्री वास करिती । ब्रह्मा विष्णु इंद्रासहिती । विश्वेदेवे मरुद्गण ॥७५॥
चंद्र सूर्य वस्वादिक । पूर्वद्वारी राहिले ऐक । प्रीति करी भक्तिपूर्वक । बैसले असती तये स्थाना ॥७६॥
अग्नि यम चित्रगुप्त । एकादश रुद्र पितृदैवत । दक्षिणद्वारी वास करीत । संतोषे राहिले असती ॥७७॥
वरुणासहित गंगा सकळी । राहती पश्चिमद्वारस्थळी । प्रीति करी चंद्रमौळी । तया सकळां परियेसा ॥७८॥
कुबेर वायु भद्रकाळी । मातृदेवता चंडी सकळी । उत्तरवास त्रिकाळी । पूजा करिती महाबळेश्वराची ॥७९॥
चित्ररथादि विश्वावसु परियेसी । चित्रसेन गंधर्व सुरसी । पूजा करिती सदाशिवासी । सदा वसोनि तया ठायी ॥८०॥
घृताची रंभा मेनका । तिलोत्तमा उर्वशी ऐका । नित्य नृत्य करिती देखा । महाबळेश्वराचे सन्मुख ॥८१॥
वसिष्ठ कश्यप कण्व ऋषि । विश्वामित्र महातापसी । भरद्वाज जैमिनी जाबाल ऋषि । पूजा करिती सदा तेथे ॥८२॥
कृतयुगी ब्रह्म-ऋषि । आचार करिती महातापसी । महाबळेश्वराचे भक्तीसी । राहिले गोकर्णक्षेत्रांत ॥८३॥
मरीचि नारद अत्रि ऋषि । दक्षादि ब्रह्म-ऋषि परियेसी । सनकादिक महातापसी । उपनिषदार्थ उपासिती ॥८४॥
अनेक सिद्ध साध्य जाण । मुनीश्वर अजिनधारण । दंडधारी संन्यासी निर्गुण । ब्रह्मचारी तेथे वसती ॥८५॥
त्वगस्थिमात्रशरीरेसी । अनुष्ठिती महातापसी । पूजा करिती भक्तीसी । चंद्रमौळीची परियेसा ॥८६॥
गंधर्वादि समस्त देव । पितर सिद्ध अष्टवसव । विद्याधर किंपुरुष सर्व । सेवेसी जाती निरंतर ॥८७॥
गुह्यक किन्नर स्वर्गलोक । शेषादि नाग तक्षक । पिशाच वेताळ सकळिक । जाती पूजेसी तया स्थाना ॥८८॥
नाना श्रृंगार करूनि । अनेक भूषणे विराजमानी । सूर्यशशी विमानी । वहनी येती वळघोनिया ॥८९॥
स्तोत्रे गायन करिती देखा । नमिती नृत्य करिती अनेका । पूजेकारणे येती सकळिका । महाबळेश्वरलिंगासी ॥९०॥
जे जे इच्छिती मनकामना । पावती त्वरित निधरि जाणा । समान नाही क्षेत्र गोकर्ण । या ब्रह्मांडगोलकांत ॥९१॥
अगस्त्यादि सनत्कुमार । प्रियव्रतादि राजकुमार । अग्निदेवदानवादि येर । वर लाधले सर्व तया ठायी ॥९२॥
शिशुमारी भद्रकाळी । पूजा करिती त्रिकाळी । नागाते गरुड न गिळी । महाबळेश्वरदर्शने ॥९३॥
रावणादि राक्षसकुळी । कुंभकर्ण येर सकळी । वर लाधले ये स्थळी । बिभीषण पूजीतसे ॥९४॥
ऐसे समस्त देवकुळ । सिद्धदानवादि सकळ । गोकर्णक्षेत्रा जाऊनि प्रबळ । आराधिती नानापरी ॥९५॥
लिंग स्थापिती आपुले नामी । असे ख्याति तया नामी । वर लाधले अनेक कामी । चतुर्विध पुरुषार्थ ॥९६॥
ब्रह्मा विष्णु आपण देखा । कार्तवीर्य विनायका । आपुले नामी लिंग देखा । प्रतिष्ठा केली तये ठायी ॥९७॥
धर्मक्षेत्रपाळादी । दुर्गादेवीशक्तिवृंदी । लिंग स्थापिले आपुले नामी । ज्या गोकर्णक्षेत्रात ॥९८॥
गोकर्णक्षेत्र असे गहन । लिंग तीर्थे असंख्य जाण । पदोपदी असे निर्गुण । ऐसे क्षेत्र अनुपम असे ॥९९॥
सांगो किती विस्तारोन । असंख्यात तीर्थे जाण । पाषाण समस्त लिंग खूण । समस्त उदके जाणावी तीर्थे ॥१००॥
कृतयुगी महाबलेश्वर श्वेत । त्रेतायुगी लोहित । द्वापारी सुवर्णपित । कलियुगी कृष्णवर्ण जाहला ॥१॥
सप्त पाताळ खोलावोन । उभे असे लिंग आपण । कलियुगी मृदु होऊन । दिसे सूक्ष्ममरूपाने ॥२॥
पश्चिम समुद्रतीरासी । गोकर्णक्षेत्रविशेषी । ब्रह्महत्यादि पातके नाशी । काय आश्चर्य परियेसा ॥३॥
ब्रह्महत्यादि महापापे । परदारादि षट् पापे । दुःशील दुराचारी पापे । जाती गोकर्णदर्शने ॥५॥
दर्शनमात्रे पुनीत होती । समस्त काम्यार्थ साधती । अंती होय तयांसी गति । गोकर्णलिंगदर्शने ॥५॥
तये स्थानी पुण्यदिवशी । जे जे अर्चिती भक्तीसी । तेचि जाणा रुद्रवंशी । रायासी म्हणे गौतम ॥६॥
एखादे समयी गोकर्णासी । जाय भक्तीने मानुषी । पूजा करिता सदाशिवासी । शिवपद निश्चये पावे जाणा ॥७॥
आदित्य सोम बुधवारी । अमावास्यादि पर्वाभितरी । स्नान करूनि समुद्रतीरी । दानधर्म करावा ॥८॥
शिवपूजा व्रत हवन । जप ब्राह्मणसंतर्पण । किंचित करिता अनंत पुण्य । गौतम म्हणे रायासी ॥९॥
व्यतिपातादि पर्वणीसी । सूर्य-संक्रांतीचे दिवशी । महाप्रदोष त्रयोदशी । पूजितां पुण्य अगण्य ॥११०॥
काय सांगो त्याचा महिमा । निवाडा होय अखिल कर्मा । ईश्वर भोळा अनंतमहिमा । पूजनमात्रे तुष्टतसे ॥११॥
असित पक्ष माघमासी । शिवरात्री चतुर्दशीसी । बिल्वपत्र वाहिले यासी । दुर्लभ असे त्रिभुवनांत ॥१२॥
ऐसे अनुपम स्थान असता । न जाती मूर्ख लोक ऐकता । शिवतीर्थ असे दुर्लभता । नेणती मूढ बधिर जाणा ॥१३॥
उपोषणादि जागरण । लिंग सन्निध गोकर्ण । स्वर्गासि जावया सोपान । पद्धति असे परियेसा ॥१४॥
ऐसे या गोकर्णस्थानासी । जे जाती जन यात्रेसी । चतुर्विध पुरुषार्थांसी । लाधती लोक अवधारा ॥१५॥
स्नान करूनि समस्त तीर्थी । महाबळेश्वरलिंगार्थी । पूजा करावी भक्त्यर्थी । पातकाव्यतिरिक्त होय जाणा ॥१६॥
ऐशापरी गोकर्णमहिमा । प्रकाश केला ऋषी गौतमा । राजा ऐकोनि अतिप्रेमा । पुसता झाला ते वेळी ॥१७॥
राजा म्हणे गौतमासी । गोकर्णस्थान निरोपिलेसी । पूर्वी पावला कोण यापासी । साक्ष झाली असेल ॥१८॥
विस्तारोनि ते आम्हांसी । सांगावे स्वामी करुणेसी । म्हणोनि लागला चरणांसी । अतिभक्ति करोनिया ॥१९॥
म्हणे गौतम तये वेळी । गोकर्णक्षेत्र महाबळी । जाणो आम्ही बहुकाळी । अपार साक्षी देखिली असे ॥१२०॥
गेलो होतो आम्ही यात्रे । देखिला दृष्टान्त विचित्र । आले होते तेथे जनमात्र । यात्रारूपे करोनिया ॥२१॥
माध्याह्नकाळी आम्ही तेथे । बैसलो होतो वृक्षच्छायेते । दुरोनि देखिले चांडाळीते । वृद्ध अंध महारोगी ॥२२॥
शुष्कमुखी निराहारी । कुष्ठ सर्वांगशरीरी । कृमि पडले अघोरी । पूय शोणित दुर्गंधी ॥२३॥
कुक्षिरोगी गंडमाळा । कफे दाटला असे गळा । दंतहीन अति विव्हळा । वस्त्र नाही परिधाना ॥२४॥
चंद्रसूर्यकिरण पडता । प्राण जाय कंठगता । शौचव्याधी असे बहुता । सर्वांगशूळ महादुःखी ॥२५॥
विधवा आपण केशवपनी । दिसे जैसी मुखरमणी । क्षणक्षणा पडे धरणी । प्राणत्याग करू पाहे ॥२६॥
ऐशी अवस्था चांडाळीसी । आली वृक्षच्छायेसी । देह टाकिला धरणीसी । त्यजू पाहे प्राण आपुला ॥२७॥
प्राण त्यजिता तये वेळी । विमान उतरे तत्काळी । शिवदूत अतिबळी । त्रिशूळ खट्वांग धरूनिया ॥२८॥
टंकायुधे चंद्र भाळी । दिव्यकांति चंद्रासारखी केवळी । किरीटकुंडले मिरवली । चतुर्वर्ग येणेपरी ॥२९॥
विमानी सूर्यासारिखे तेज । अतिविचित्र दिसे विराज । आले चांडाळियेकाज । अपूर्व वर्तले तये वेळी ॥३०॥
आम्ही पुशिले शिवदूतांसी । आलेति कवण्या कार्यासी । दूत म्हणती आम्हांसी । न्यावया आलो चांडाळिते ॥३१॥
ऐकोनि दूताचे वचन । विस्मित झाले आमुचे मन । पुनरपि केला त्यासी प्रश्न । ऐक राया तू एकचित्ते ॥३२॥
ऐशिया चांडाळी पापिणीसी । कैसी योग्य विमानेसी । नेऊनिया श्वानासी । सिंहासनी कैसे योग्य ॥३३॥
या जन्मादारभ्य इसी । पापे पापसंग्रहासी । ऐशी पापीण दुर्वृत्त इसी । केवी न्याल कैलासा ॥३४॥
नाही इसी शिवज्ञान । न करीच हे तपसाधन । दया सत्य कदा नेणे । इसी कैसे न्याल तुम्ही ॥३५॥
पशुमांस आहार इसी । सदा करी जीवहिंसी । ऐशिया दुष्ट कुष्ठी पापिणीसी । केवी नेता स्वर्गभुवना ॥३६॥
अथवा कधी शिवपूजन । न करी पंचाक्षरीजपन । नाही केले शिवस्मरण । इसी कैसे न्याल तुम्ही ॥३७॥
शिवरात्री उपोषण । नाही केले पुण्यदान । यज्ञयागादि साधन । नाही केले इणे कधी ॥३८॥
न करी स्नान पर्वकाळी । नेणे तीर्थ कवणे वेळी । अथवा व्रतादि सकळी । केले नाही इणे कधी ॥३९॥
या सर्वांगी पूय शोणित । दुर्गंधी असे बहुत । ऐशी चांडाळी दुर्वृत्त । कैसी विमानी बैसवाल ॥१४०॥

ऐशी पापिणी दुराचारी । केवीं नेता कैलासपुरीं । योग्य नव्हे चराचरीं । तुम्ही कैवी न्याल इसी ॥४२॥
गौतम म्हणे रायासी । ऐसे पुशिले दूतांसी । त्यांनी सांगितला आम्हांसी । आद्यंत तये चांडाळीचा ॥४३॥
म्हणे गौतम ऋषेश्वर । चांडाळीचे पूर्वापार । सांगेन तुम्हांस सविस्तर । असे आश्चर्य परियेसा ॥४४॥
पूर्वी इचे जन्मस्थान । ब्राह्मणकन्या असे जाण । सौदामिनी नाम असे पूर्ण । सोमबिंबासारखे मुख ॥४५॥
अतिसुंदर रूप इसी । उपवर जाहली पितृगृहासी । न मिळे वर तियेसी । चिंता करिती मातापिता ॥४६॥
न मिळे वर सुंदर तिसी । उन्मत्त जाहली दहा वरुषी । मिळवूनि एका द्विजासी । गृह्योक्तेंसी लग्न केले ॥४७॥
विवाह झालियावरी । होती तया पतीचे घरी । क्वचित्काळ येणेपरी । होती नारी परियेसा ॥४८॥
वर्तता असे पुढे देख । तिचे पतीस झाले दुःख । पंचत्व पावला तात्काळिक । विधिलेख करूनिया ॥४९॥
ऐकोनि तिचे मातापिता । कन्या आपुले घरा आणिती तत्त्वता । पतीचे दुःखे दुःखिता । खेद करी ते नारी ॥१५०॥
अतिसुंदर पूर्ववयासी । मदे व्याप्त प्रतिदिवसी । चंचळ होय मानसी । परपुरुषाते देखोनिया ॥५१॥
गुप्तरुपे क्वचित्काळी । जारकर्म करी ते बाळी । प्रगट जाहले तत्काळी । गौप्य नोहे पातक ॥५२॥
आपण विधवा असे नारी । पूर्ववयासी अतिसुंदरी । विषयी प्रीति असे भारी । स्थिर नोहे तिचे मन ॥५३॥
ऐसे तिचिया पातकासी । विदित जाहले सर्वांसी । वाळीत केले तियेसी । मातापिताबंधुवर्गी ॥५४॥
शंका होती पहिली तिसी । निःशंक झाली व्यभिचारासी । प्रकटरूप अहर्निशी । रमो लागली नगरांत ॥५६॥
तिये नगरी एक वाणी । रूपे होता अतिलावण्यगुणी । त्यासी तिणे पूर्ववयस देखोनि । झाली त्याची कुलस्त्री ॥५७॥
तया शूद्राचिया घरी । वर्ततसे ते नारी । ऐसी पापिणी दुराचारी । कुळवैरीण बेचाळीस ॥५८॥
श्लोक ॥ स्त्रियः कामेन नश्यन्ति ब्राह्मणो हीनसेवया । राजानो ब्रह्मदंडेन यतयो भोगसंग्रहात ॥५९॥
टीका ॥ स्त्रिया नासती कामवेगे । ब्राह्मण नासती हीनसेवे । राज्य जाय द्विजक्षोभे । यति नासे विषयसेवने ॥१६०॥
शूद्रासवे अहर्निशी । रमत होती अतिहर्षी । पुत्र जाहला तियेसी । शूद्रगृही असता ॥६१॥
नित्य मांस आहार तिसी । मद्यपान उन्मत्तेसी । होऊनि तया शूद्रमहिषी । होती पापिणी दुराचारी ॥६२॥
वर्तता एके दिवसी । उन्मत्त होवोनि परियेसी । छेदिले वासरू आहारासी । मेष म्हणोनि पापिणीने ॥६३॥
छेदोनि वत्स परियेसी । पाक केला विनयेसी । शिर ठेविले शिंकियासी । दुसरे दिवशी भक्षावया ॥६४॥
आपण भ्रमित मद्यपानी । जागृत जाहली अस्तमानी । वासरू पाहे जावोनि । धेनू दोहावयालागी ॥६५॥
वत्सस्थानी असे मेष । भ्रमित जाहली अतिक्लेश । घरी पाहातसे शिरास । स्पष्ट दिसे वासरू ॥६६॥
अनुतप्त होवोनि तये वेळी । शिव शिव म्हणे चंद्रमौळी । अज्ञानाने ऐशी पापे घडली । म्हणोनि चिंती दुरात्मिणी ॥६७॥
तया वत्सशिरासी । निक्षेप केला भूमीसी । पति कोपेल म्हणोनि परियेसी । अस्थिचर्म निक्षेपिले ॥६८॥
जाऊनि सांगे शेजार लोका । व्याघ्रे वत्स नेले ऐका । भक्षिले म्हणोनि रडे देखा । पतीपुढे येणेपरी ॥६९॥
ऐसी कितीक दिवसांवरी । नांदत होती शूद्राघरी । पंचत्व पावली ते नारी । नेली दूती यमपुरा ॥१७०॥
घातली तियेसी नरकात । भोग भोगी अतिदुःखित । पुनरपि जन्मा चांडाळी जात । उपजली नारी परियेसा ॥७१॥
उपजतांचि जाहलि अंधळी । विद्रूपवर्ण जैशी काजळी । माता पिता क्वचित्काळी । प्रतिपाळिती मायामोहे ॥७२॥
उच्छिष्ट अन्न घालिती तोंडा । स्वजन तियेचे अखंडा । बाळपणी तयेसि विघडा । पोसिताती येणेपरी ॥७३॥
ऐसे असता वर्तमानी । सर्वांग झाले कुष्ठवर्णी । पंचत्व पावली पिताजननी । दरिद्री झाली निराश्रय ॥७४॥
सर्वांग कुष्ठवर्णपीडित । त्यजिती तियेसि स्वजन भ्रात । भिक्षा मागोनि उदर भरित । रक्षण करी शरीर आपुले ॥७५॥
येणेपरी चांडाळी । वर्तत असे बहुतकाळी । क्षुधेने पीडित सर्वकाळी । आपण अंध कुष्ठ देही ॥७६॥
न मिळे तिसी वस्त्र अन्न । दुःख करीत अतिगहन ऐसे तिचे पूर्वकर्म । झाली वृद्ध अतिकष्टे ॥७७॥
भिक्षा मागे जनांसी । मार्गी पडोनि अहर्निशी । कधी न भरे उदर तिसी । दुःखे विलापे अपार ॥७८॥
व्याधि असे शरीरासी । शोणित पूय परियेसी । दुर्गंधि येत असे महादोषी । सर्वांग कुष्ठे गळतसे ॥७९॥
ऐसे वर्ततांम माघमासी । लोक निघाले यात्रेसी । महास्थान गोकर्णासी । कलत्रपुत्रसहित देख ॥१८०॥
शिवरात्रीचे यात्रेसी । येती लोक देशोदेशी । चतुर्वर्ण आसपासी । हरुषे येती परियेसा ॥८१॥
देशोदेशीचे राजे देखा । हस्तीरथादिसहित ऐका । येती समस्त भूमांडलिका । महाबळेश्वरदर्शनासी ॥८२॥
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र । येती यात्रेसी विनोद । समारंभ वाद्यनाद । अमित लोक परियेसा व८३॥
किती हासती गायन करिती । धावती नृत्य करीत येती । शिवस्मरणे गर्जना करिती । यात्राप्रसंगी जन देखा ॥८४॥
ऐसी महाजनांसमवेत । चांडाळी गेली तेथे त्वरित । सवे भिक्षुक असती बहुत । तयांसवे जात असे ॥८५॥
येणेपरी गोकर्णासी । चांडाळी पातली सायासी । करावलंबे महाजनांसी । भिक्षा मागे करुणावचने ॥८६॥
लोक जाती मार्गात । शयन करी आक्रंदत । कर वोढूनि मागत । महाजन लोकांसी ॥८७॥
पूर्वीची पापी आपण । पीडत असे याची कारण । भिक्षा घाला क्षुधानिवारण । म्हणोनि मागे सकळिका ॥८८॥
नेणे कधीच वस्त्र प्रावरण । धुळीत लोळे आपण । क्षुधाक्रांत होतसे मरण । धर्म करा सकळांसी म्हणे ॥८९॥
सर्वांगी रोगग्रस्त । वस्त्रावीण बाघे शीत । अक्ष नाही क्षुधाक्रांत । धर्म करा सकळिक हो ॥१९०॥
पूर्वी जन्मशतांतरी । नाही केले पुण्य येरी । याचि कारणे पीडित भारी । धर्म करा सकळिक ॥९१॥
येणेपरी मार्गांत । चांडाळी असे याचित । ते दिवशी असे शिवरात्रीव्रत । कोणी न घाली भिक्षा तिसी ॥९२॥
येरी विव्हळे क्षुधाक्रांत । जठराग्नि प्रदीप्त असे बहुत । धर्म करा ऐसे म्हणत । पडली मार्गात तेधवा ॥९३॥
पूजेसि जाती सकळजन । त्याते मागे आक्रंदोन । एक म्हणती हांसोन । उपवास आजि अन्न कैचे ॥९४॥
हाती होती बिल्वमंजरी । घाली ती तियेच्या करी । आघ्राणोनि पाहे येरी । भक्षणवस्तु नव्हे म्हणे ॥९५॥
कोपोनि टाकी ते अवसरी । जाऊनि पडली लिंगावरी । रात्री असती अंधारी । अलभ्य पूजा घडली देखा ॥९६॥
कोणी न घालिती भिक्षा तिसी । उपास घडला ते दिवशी । पूजा पावली त्या शिवासी । बिल्वमंजरी शिवमस्तकी ॥९७॥
इतुके पुण्य घडले तिसी । प्रयत्न न करिता परियेसी । तुष्टला ईश्वर हर्षी । भवार्णवाकडे केले ॥९८॥
येणेपरी चांडाळीसी । उपवास घडला अनायासी । तेथूनि उठली दुसरे दिवसी । भिक्षा मागावयाकारणे ॥९९॥
पहिलीच कुष्ठरोगी असे । अशक्त झाली उपवासे । चक्षुहीन मार्ग न दिसे । जात असे मंदमंद ॥२००॥
सूर्यरश्मीकरूनि तिसी । दुःख होय असमसहसी । पूर्वार्जित कर्मे ऐसी । म्हणती दूत गौतमाते ॥१॥
ऐसी चांडाळी कष्टत । आली वृक्षच्छायेसमीप । त्यजूं पाहे प्राण त्वरित । म्हणोनिया आलो धावोनि ॥२॥
पुण्य घडले इसी आजी । उपवास शिवतिथीकाजी । बिल्वपत्रे ईश्वर पूजी । घडले रात्री जागरण ॥३॥
तया पुण्येकरूनि इचे । पाप गेले शतजन्मीचे । हे प्रीतिपात्र ईश्वराचे । म्हणोनि पाठविले आम्हांसी ॥४॥
ऐसे म्हणती शिवदूत । तियेवरी शिंपूनिया अमृत । दिव्यदेह पावूनि त्वरित । गेली ऐका शिवलोका ॥५॥
ऐसे गोकर्ण असे स्थान । गौतम सांगे विस्तारोन । रायासि म्हणे तू निघोन । त्वरित जाई गोकर्णासी ॥६॥
जातांचि तुझी पापे जाती । इह सौख्य परत्र उत्तम गति । संशय न धरी गा चित्ती । म्हणोनि निरोपी रायासी ॥७॥
परिसोनि गौतमाचे वचन । राजा मनी दृढ संतोषोन । त्वरित पावला क्षेत्र गोकर्ण । पापावेगळा जाहला तो ॥८॥
ऐसे पुण्यपावन स्थान । म्हणोनि राहिले श्रीपाद आपण । सिद्ध म्हणे ऐक कथन । नामधारका एकचित्ते ॥९॥
म्हणोनि सरस्वतीगंगाधरू । सांगे गुरुचरित्र विस्तारू । श्रोते करूनि निर्धारू । एकचित्ते परियेसा ॥२१०॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ । श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे गोकर्णमहिमावर्णन नाम सप्तमोऽध्यायः ॥७॥
श्रीदत्तात्रेयार्पितमस्तु ॥

<poem> श्रीगणेशायनमः ।
नामधारक म्हणे सिद्धासी । गोकर्णमहिमा निरोपिलासी । श्रीगुरु राहिले किती दिवसी । वर्तले पुढे काय सांग ॥१॥
श्रीगुरुमूर्ति कृपासिंधु । माझे मनी लागला वेधु । चरित्र ऐकतां महानंदु । अतिउल्हास होतसे ॥२॥
परिसोनि शिष्याचे वचन । संतोषे सिद्ध अतिगहन । सांगता झाला विस्तारोन । श्रोते तुम्ही अवधारा ॥३॥
गोकर्णक्षेत्री श्रीपाद यति । राहिले वर्षे तीन गुप्ती । तेथोनि श्रीगिरिपर्वता येती । लोकानुग्रहाकारणे ॥४॥
जयाचे करिता चरणदर्शन । समस्त तीर्थासमान जाण । 'चरणं पवित्रं विततं पुराणं । वेदश्रुति ऐसे बोलतसे ॥५॥
समस्त तीर्थे गुरुचरणी । तो कां हिंडे तीर्थभवनी । लोकानुग्रहालागुनी । जात असे परियेसा ॥६॥
मास चारी क्रमोनि तेथे । आले निवृत्तिसंगमाते । दर्शन देती साधुभक्तांते । पातले तया कुरवपुरा ॥७॥
कुरवपुर महाक्षेत्र । कृष्णा गंगा वाहे नीर । महिमा तेथील सांगता अपार । भूमंडाळात दुर्लभ ॥८॥
तेथील महिमा सांगता । विस्तार होईल बहुत कथा । पुढे असे चरित्र अमृता । सांगेन ऐका एकचित्ते ॥९॥
श्रीपाद राहिले कुरवपुरी । ख्याति राहिली भूमीवरी । प्रगटे महिमा अपरंपारी । सांगतां विस्तार असे देखा ॥१०॥
जे जन भजती भक्तीसी । सौख्य पावती अप्रयासी । कन्या पुत्र लक्ष्मीसी । चिंतिले फळ पावती ॥११॥
समस्त महिमा सांगावयासी । विस्तार होईल बहुवसी । नामधारका स्वस्थ परियेसी । सांगेन किंचित् तुज आतां ॥१२॥
पुढे अवतार व्हावया गति । सांगेन ऐका एकचित्ती । श्रीपाद कुरवपुरा असती । कार्यकारणमनुष्यदेही ॥१३॥
अवतार व्हावयाचे कारण । सांगेन त्याचे पूर्वकथन । वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण । होता तया ग्रामी ॥१४॥
त्याची भार्या होती देखा । नाम तियेचे अंबिका । सुशील आचार पतिसेवका । महापुण्य सती देखा ॥१५॥
तियेसी पुत्र होऊनि मरती । पूर्वकर्मफळ अर्जिती । अनेक तीर्थे आचरती । तिणे केलि परियेसा ॥१६॥
ऐसे असतां जे होणार गति । पुत्र जाहला मंदमति । माता स्नेह करी भक्ती । अपूर्व आपणासी म्हणोनि ॥१७॥
वर्धता मातापित्याघरी । विप्रात्मज वाढला प्रीतिकरी । व्रतबंध करिती कुळाचारी । वेदाभ्यास करावया ॥१८॥
विद्या नये तया कुमरा । मंदमति अज्ञान बहिरा । चिंता वर्ते त्या द्विजवरा । म्हणे पुत्र मंदमति ॥१९॥
अनेक देव आराधोनि । पुत्र लाधलो कष्टोनि । प्राचीन कर्म न सुटे म्हणोनि । चिंता करी अहोरात्र ॥२०॥
अनेक प्रकारे शिकवी त्यासी । ताडन करी बहुवसी । होतसे दुःख जननीसी । वर्जी आपुले पतीते ॥२१॥
पतीसी म्हणे ते नारी । पुत्र नाहीत आम्हा घरी । कष्ट करोनि नानापरी । पोसिले एका बाळकासी ॥२२॥
विद्यान येचि वेद त्यासी । वाया मारून का कष्टसी । प्राचीन कर्म न सुटे त्यासी । की मूढ होऊनि उपजावे ॥२३॥
आतां जरी तुम्ही यासी । ताडन कराल अहर्निशी । प्राण त्यजीन मी भरवसी । म्हणोनि विनवी पतीते ॥२४॥
स्त्रियेचे वचन ऐकोनि । विप्र राहिला निचिंत मनी । ऐसा काही काळ क्रमोनि । होती तया ग्रामांत ॥२५॥
वर्तता ऐसे तया स्थानी । विप्र पडला असमाधानी । दैववशेकरूनि । पंचत्व पावला परियेसा ॥२६॥
मग पुत्रासहित ते नारी । होती तेथे कुरवपुरी । याचूनि आपुले उदर भरी । येणेपरी जीवित्व रक्षी ॥२७॥
विप्रस्त्रियेचा पुत्र देखा । विवाहाहायोग्य झाला निका । निंदा करिती सकळीका । मतिहीन म्हणोनिया ॥२८॥
कन्या न देती तयासी कोणी। म्हणती काष्ठे वाहतो का पाणी । समस्त म्हणती असे दूषणी । उदर भरी येणे विद्ये ॥२९॥
समस्त लोक म्हणती त्यासी । तू दगडापरी व्यर्थ जन्मलासी । लांछन लाविले वंशासी । अरे मूर्खा कुळनाशका ॥३०॥
तुझ्या पितयाचा आचार । ख्याति असे चारी राष्ट्र । जाणे धर्म वेद शास्त्र । त्याचे पोटी अवतरलासी ॥३१॥
बोल आणिलासी तुवा पितरांसी । घातले तया अधोगतीसी । भिक्षा मागोनि उदर भरिसी । लाज कैसी तुज न वाटे ॥३२॥
जन्मोनिया संसारी । काय व्यर्थ पशूचिये परी । अथवा गंगेत प्रवेश करी । काय जन्मोनि सार्थक ॥३३॥
ऐसे ऐकोनि ब्रह्मचारी । दुःख करीत नाना प्रकारी । मातेसि म्हणे ते अवसरी । प्राण त्यागीन मी आता ॥३४॥
निंदा करिती सर्वही मज । असोनि देह कवण काज । पोसू न शके माते तुज । जाईन अरण्यवासासी ॥३५॥
ऐकोनि पुत्राचे वचन । माता करी चिंता गहन । शोकदुःखेकरून । विलाप करी ते नारी ॥३६॥
माता सुत दुःख करीत । गेली गंगाप्रवाहात । तेथे देखिले जगदुद्धरित । श्रीपाद योगी स्नान करिता ॥३७॥
जाऊनि दोघे लागती चरणी । विनविताती कर जोडुनी । वासना असे आमुचे मनी । प्राण त्यजावा गंगेत ॥३८॥
निरोप द्यावा जी आम्हांसी । सद्गति व्हावया कारणासी । आत्महत्या महादोषी । म्हणोनि विनवितो कृपासिंधु ॥३९॥
ऐकोनि विप्रसतीचे वचन । पुसती श्रीपाद कृपायमान । कां संकटी तुमचे मन । त्यजिता प्राण काय निमित्त ॥४०॥
विप्रस्त्री तया वेळा । सांगतसे दुःखा सकळा । म्हणे स्वामी भक्तवत्सला । तारावे आम्हा बाळकाते ॥४१॥
पुत्रावीण कष्ट भारी । अनेक तीर्थे पादचारी । केले व्रत पूजा जरी । सकळ देव आराधिले ॥४२॥
व्रते उपवास सांगू किती । करिते झाले अपरिमिती । झाला पुत्र हा दुर्मति । निंदा करिती सकळ जन ॥४३॥
वेदशास्त्रसंपन्न । पति माझा होता ब्राह्मण । त्याचिये पोटी झाला हीन । मंदमति दुरात्मा हा ॥४४॥
कृपा करी गा श्रीपाद यति । जन्मोजन्मी दैवगति । पुत्र न व्हावा मंदमति । ऐसा प्रकार सांगावा ॥४५॥
कृपासागर दैन्यहरण । म्हणोनि धरिले तुझे चरण । शरणागताचे करावया रक्षण । आलासि आजि कृपासिंधु ॥४६॥
जन्मोनिया संसारी । कष्ट केले नानापरी । न देखेचि सौख्यकुसरी । परी जाहले पुत्र न राहती ॥४७॥
वाचोनिया हा एक सुत । शेळीचे गळा स्तन लोंबत । वृथा जन्मला म्हणत । विनवीतसे श्रीगुरूसी ॥४८॥
देवा आता ऐसे करणे । पुढील जन्मी मनुष्यपणे । पूज्यमान पुत्र पावणे । जैसा पूज्य तू जगत्त्रयासी ॥४९॥
सकळ लोक ज्यासि वंदिती । ऐसा पुत्र व्हावा म्हणे ती । उपाय सांगा श्रीगुरु यती । म्हणोनि चरणां लागली ॥५०॥
त्याचेनि माते उद्धारगति । मागुती न होय पुनरावृत्ति । पितरां सकळा स्वर्गप्राप्ति । लाधे ऐसे निरोपावे ॥५१॥
वासना असे माझे मनी । पुत्र व्हावा ब्रह्मज्ञानी । बाळपणिच पाहो नयनी । पूज्यमान समस्तांसी ॥५२॥
ऐकोनि तियेचे वचन । सांगती कृपा भक्ति पाहोन । करी वो ईश्वरआराधन । पुत्र होईल श्रीहरीऐसा ॥५३॥
गौळियाचे घरी देखा । कृष्ण उपजला कारणिका । व्रत केले गौळी ऐका । ईश्वराची आराधना ॥५४॥
तैसा तू आराधी ईश्वर । पुत्र पावशील हा निर्धार । तुझा मनोरथ साचार । पावेल सिद्धि श्रीपाद म्हणती ॥५५॥
विप्रस्त्री म्हणे ते वेळी । कैसे व्रत आचरले गौळी । कैसा पूजिला चंद्रमौळी । विस्तारावे मजप्रती ॥५६॥
तैसेच व्रत करीन आपण । म्हणोनि धरी सद्गुरुचरण । कृपामूर्ति सद्गुरु जाण । सांगता झाला ते वेळी ॥५७॥
म्हणती श्रीपाद यति तियेसी । ईश्वर पूजी हो प्रदोषी । मंदवारी तू विशेषी । पूजा करी भक्तीने ॥५८॥
पूजा करी जे गौळणी । विस्तार असे स्कंदपुराणी । कथा सांगेन ऐक कानी । म्हणती श्रीगुरु तियेसी ॥५९॥
ऐकोन श्रीगुरूचे वचना । संतोषली विप्रांगना । पुढती घाली लोटांगणा । तया श्रीपाद श्रीगुरूप्रती ॥६०॥
विप्रस्त्री म्हणे स्वामीसी । अभिनव माते निरोपिलेसी । देखता पूजा प्रदोषी । पुत्र झाला कृष्णा ऐस ॥६१॥
आपण केलिया पूजा जरी । फळ पावेन निर्धारी । पुर्वी कवणे परी । विस्तारावे दातारा ॥६२॥
श्रीगुरु सांगती तियेसी । सांगेन ऐक एकचित्तेसी । उज्जनी नाम नगरीसी । जाहले विचित्र परियेसा ॥६३॥
तया नगरी चंद्रसेन । राजा होता धर्मपरायण । त्याचा सखा असे प्राण । मणिभद्र नामे परियेसा ॥६४॥
सदा ईश्वरभक्ति करी । नाना प्रकारे अपरंपारी । भोळा देव प्रसन्न करी दिधला चिंतामणि एक ॥६५॥
कोटिसूर्यांचा प्रकाश । माणिक शोभे महासरस । कंठी घालिता महाहर्ष । तया मणिभद्ररायासी ॥६६॥
तया मण्याचे लक्षण । सुवर्ण होय लोह पाषाण । तेज फाकले ज्यावरी जाण । ते कनक होय परियेसा ॥६७॥
जे जे चिंतीत मानसी । ते ते पावत त्वरितेसी । ऐशी ख्याति माणिकासी । समस्त राजे कांक्षा करिती ॥६८॥
इष्टत्वे मागती किती एक । मागो पाठविती ते माणिक । बलात्कारे इच्छिती एक । राजे वांछिती परियेसा ६९॥

राजे समस्त मिळोनि । पातले नगराते उज्जनी । अपार सैन्य मिळवूनि । वेढिले तया नगरासी ॥७१॥
ते दिवशी शनिवार त्रयोदशी । राजा बैसला पूजनासी । शंका न धरितां मानसी । एकचित्ते पूजीतसे ॥७२॥
महाबळेश्वरलिंगासी । पूजा करी तो राजा हर्षी । गौळियाचा कुमर पहावयासी । आला तया शिवालया ॥७३॥
पूजा पाहोनि शिवाची । मुले म्हणती गौळियांची । खेळू चला आम्ही असेची । लिंग करुनि पुजू आता ॥७४॥
म्हणोनि विनोदेकरूनि । आपुले गृहासन्निधानी । एकवटोनि पाषाणी । कल्पिले तेथे शिवालय ॥७५॥
पाषाणाचे करूनि लिंग । पूजा करीत बाळके चांग । नानापरीची पत्री सांग । कल्पिली तेथे पूजेसी ॥७६॥
षोडशोपचारे पूजा करिती । उदक नैवेद्य समर्पिती । ऐसे कौतुके खेळती । गोपकुमर तये वेळी ॥७७॥
गोपिका स्त्रिया येउनी । पुत्रांते नेती बोलावुनी । भोजनाकारणे म्हणोनि । गेले सकळही बाळक ॥७८॥
त्यातील एक गोपीसुत । लिंगभुवन न सोडित । त्याची माता जवळी येत । मारी आपुले पुत्रासी ॥७९॥
म्हणे कुमारा भोजनासी । चाल गृहासी झाली निशी । काही केल्या न जाय परियेसी । तो गोपकुमारक ॥८०॥
कोपेकरूनि ते गौळिणी । मोडी पूजा खेळ अंगणी । पाषाण दूर टाकुनी । गेली आपुले सदनासी ॥८१॥
पूजा मोडिता तो बाळक । प्रलाप करी अनेक । मूर्च्छा येऊनि क्षणेक । पडिला भूमी अवधार ॥८२॥
लय लावूनी लिंगस्थानी । प्राण त्यजू पाहे निर्वाणी । प्रसन्न झाला शूलपाणी । तया गोपसुताकारणे ॥८३॥
शिवालय रत्नखचित । सूर्यासमान प्रभावंत । लिंग दिसे रत्नखचित । जागृत झाला तो बाळ ॥८४॥
निजरूप धरी गौरीरमण । उठवी बाळ करी धरून । वर माग म्हणे मी झालो प्रसन्न । देईन जे वांछिसी ते ॥८५॥
बाळके नमिले ईश्वरासी । कोप न करावा मातेसी । पूजा बिघडली तव प्रदोषी । क्षमा करणे म्हणतसे ॥८६॥
ईश्वर भोळा चक्रवर्ती । वर दिधला बहुप्रीती । प्रदोषसमयी पूजा देखती । गौळिणी होय देवजननी ॥८७॥
तिचे पोटी होईल सुत । तोचि विष्णु अवतार ख्यात । न करी पूजा पाहिली म्हणत । पोषील आपुले पुत्रासी ॥८८॥
जे जे मानसी तू इच्छिसी । पावेल ते ते धरी मानसी । अखिल सौख्य तुझिया वंशासी । पुत्रपौत्रेसी नांदसील ॥८९॥
प्रसन्न होवोनि गिरिजापती । गेले लिंगालयी गुप्ती । लिंग राहिले रत्नखचिती । गौळियाघरी याचिपरी ॥९०॥
कोटिसूर्यप्रकाश । शिवालय दिसे अति सुरस । लोक म्हणती काय प्रकाश । उदय झाला दिनकरा ॥९१॥
आले होते परराष्ट्रराजे । विस्मय करिती चोजे । सांडूनि द्वेष बोलती सहजे । भेटू म्हणती रायासी ॥९२॥
पाहे या पवित्र नगरांत । सूर्य झाला असे उदित । राजा असे बहु पुण्यवंत । ऐसियासी विरोध न करावा ॥९३॥
म्हणोनि पाठविती सेवकासी । भेटू म्हणती रायासी । राजा बोलवी तयांसी । आपुले गृहासी नगरांत ॥९४॥
इतुके होता ते अवसरी । राजा पुसतसे प्रीतिकरी । रात्री असतां अंधकारी । उदय पावला केवी सूर्य ॥९५॥
राजा चंद्रसेनसहित । पाहावया येती कौतुकार्थ । दिसे विचित्र रत्नखचित । शिवालय अनुपम ॥९६॥
येणेचि परी गौळ्याचे सदन । अतिरम्य विराजमान । पुसता झाला आपण । तया गौळिकुमारकाते ॥९७॥
सांगितला सकळ वृत्तान्त । संतोष करिती राजे समस्त । गौळियांत राजा तू म्हणत । देती नानादेशसंपदा ॥९८॥
निघोनि गेले राजे सकळ । राहिला चंद्रसेन निर्मळ । शनिप्रदोष पूजा सफळ । भय कैचे तया राजा ॥९९॥
गौळीकुमर येऊनि घरा । सांगे माते सविस्तरा । पुढे येईल तुझ्या उदारा । नारायण अवतरोनि ॥१००॥
ऐसा ईश्वरे दिधला वर । संशय न करी तू निर्धार । संतोषला कर्पूरगौर । देखिली पूजा प्रदोषाची ॥१॥
मोडिली पूजा म्हणोनि । म्यां विनविला शूलपाणी । क्षमा करूनि घेतले म्हणोनि । सांगे वृत्तान्त मातेसी ॥२॥
ऐसा ईश्वर प्रसन्न झाला । प्रदोषपूजने तया फळला । श्रीपाद सांगती तया वेळा । विप्रस्त्रियेकारणे ॥३॥
तुझे मनी असेल जरी । होईल पुत्र मजसरी । संशय सांडुनि निर्धारी । शनिप्रदोषी पूजी शंभू ॥४॥
ऐसे म्हणोनि श्रीपाददेव । चक्रवर्ती भोळा शिव । विप्रस्त्रियेचा पाहोनि भाव । प्रसन्न होत तया वेळी ॥५॥
बोलावूनि तिचे कुमारासी । हस्त ठेविती मस्तकेसी । ज्ञान जाहले तत्काळेसी । त्रिवेदी झाला तो ब्राह्मण ॥६॥
वेदशास्त्रादि तर्कभाषा । म्हणता झाला अतिप्रकाशा । विस्मय झाला असे सहसा । विप्र म्हणती आश्चर्य ॥७॥
विस्मय करोनि विप्रवनिता । म्हणे ईश्वर हाचि निश्चिता । कार्याकारणे अवतार होता । आला नरदेह धरोनि ॥८॥
पूर्वजन्मीचे पुण्यार्जित । जोडला आम्हा हा निश्चित । भेटला असे श्रीगुरुनाथ । म्हणोनि नमिती क्षणोक्षणा ॥९॥
म्हणे ईशर तूचि होसी । पूजा करीन तुझी मी प्रदोषी । मिथ्या नोहे तुझे वाक्यासी । पुत्र व्हावा तुज ऐसा ॥११०॥
ऐसा निश्चय करोनि । पूजा करिती नित्य येऊनि । प्रदोषपूजा अति गहनी । करी श्रीपादरायासी ॥११॥
पुत्र तिचा झाला ज्ञानी । वेदशास्त्रार्थसंपन्नी । पूज्या जाहला सर्वांहूनि । ब्रह्मवृंद मानित ॥१२॥
विवाह झाल मग यासी । पुत्रपौत्री नांदे हर्षी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । ऐसे होय अवधारा ॥१३॥
ऐसा श्रीगुरु कृपावंत । भक्तजना असे संरक्षित । ऐक शिष्या एकचित्त । नामधारका श्रीमता ॥१४॥
नामधारक भक्तासी । सांगे सिद्ध विस्तारेसी । परियेसा समस्त अहर्निशी । म्हणे सरस्वतीगंगाधरू ॥११५॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्यानेसिद्धनामधारकसंवादे प्रदोषव्रतमाहात्म्यकथनं नाम अष्टमोऽध्यायः ॥८॥
श्रीदत्तात्रेयार्पितमस्तु ।
ओवीसंख्या ॥११५॥

<poem> श्रीगणेशाय नमः ।
ऐकोनि सिद्धाचे वचन । नामधारक करी नमन । विनवीत कर जोडून । भक्तिभावे करोनिया ॥१॥
श्रीपाद कुरवपुरी असता । पुढे वर्तली कैसी कथा । विस्तारूनि सांग आता । कृपामुर्ति दातारा ॥२॥
सिद्ध म्हणे नामधारका । पुढे कथा अपूर्व देखा । तया ग्रामी रजक एका । सेवक झाला श्रीगुरूचा ॥३॥
भक्तवत्सल श्रीगुरुराव । जाणोनि शिष्यांचा भाव । विस्तार करोनि भक्तिस्तव । निरोपित गुरुचरित्र ॥४॥
नित्य श्रीपाद गंगेसी येती । विधिपूर्वक स्नान करिती । लोकवेव्हार संपादिती । त्रयमूर्ति आपण ॥५॥
ज्याचे दर्शन गंगास्नान । त्यासी कायसे आचरण । लोकानुग्रहाकारण । स्नान करीत परियेसा ॥६॥
वर्तता ऐसे एके दिवशी । श्रीपाद यति येती स्नानासी । गंगा वहात असे दशदिशी । मध्ये असती आपण ॥७॥
तया गंगातटाकांत । रजक असे वस्त्रे धूत । नित्य येऊनि असे नमित । श्रीपादगुरुमूर्तीसी ॥८॥
नित्य त्रिकाळ येवोनिया । दंडप्रमाण करोनिया । नमन करी अतिविनया । मनोवाक्कायकर्मे ॥९॥
वर्तता ऐसे एके दिवशी । आला रजक नमस्कारासी । श्रीपाद म्हणती तयासी । एकचित्ते परियेसा ॥१०॥
श्रीपाद म्हणती रजकासी । का नित्य कष्टतोसी । तुष्टलो मी तुझ्या भक्तीसी । सुखे राज्य करी आता ॥११॥
ऐकता गुरूचे वचन । गाठी बांधी पल्लवी शकुन । विनवीतसे कर जोडून । सत्यसंकल्प गुरुमूर्ति ॥१२॥
रजक सांडी संसारचिंता । सेवक जाहला एकचित्ता । दुरोनि करी दंडवता । मठा गेलिया येणेचि परी ॥१३॥
ऐसे बहुत दिवसांवरी । रजक तो सेवा करी । आंगण झाडी प्रोक्षी वारी । नित्य नेमे येणे विधी ॥१४॥
असता एके दिवशी देखा । वसंतऋतु वैशाखा । क्रीडा करीत नदीतटाका । आला राजा म्लेछ एक ॥१५॥
स्त्रियांसहित राजा आपण । अलंकृत आभरण । क्रीडा करीत स्त्रिया आपण । गंगेमधून येतसे ॥१६॥
सर्व दळ येत दोनी थडी । अमित असती हस्ती घोडी । मिरविताती रत्नकोडी । अलंकृत सेवकजन ॥१७॥
ऐसा गंगेच्या प्रवाहात । राजा आला खेळत । अनेक वाद्यनाद गर्जत । कृष्णावेणि थडियेसी ॥१८॥
रजक होता नमस्कारित । शब्द झाला तो दुश्चित । असे गंगेत अवलोकित । समारंभ राजयाचा ॥१९॥
विस्मय करी बहु मानसी । जन्मोनिया संसारासी । जरी न देखिजे सौख्यासी । पशुसमान देह आपुला ॥२०॥
धन्य राजयाचे जिणे । ऐसे सौख्य भोगणे । स्त्रिया वस्त्रे अनेक भूषणे । कैसा भक्त ईश्वराच ॥२१॥
कैसे याचे आर्जव फळले । कवण्या देवा आराधिले । कैसे श्रीगुरु असती भेटले । मग पावला ऐसी दशा ॥२२॥
ऐसे मनी चिंतित । करीतसे दंडवत । श्रीपादराय कृपावंत । वळखिली वासना तयाची ॥२३॥
भक्तवत्सल श्रीगुरुमूर्ति । जाणोनि अंतरी त्याची स्थिति । बोलावूनिया पुसती । काय चिंतिसी मनांत ॥२४॥
रजक म्हणे स्वामीसी । देखिले दृष्टी रायासी । संतोष झाला मानसी । केवळ दास श्रीगुरूचा ॥२५॥
पूर्वी आराधोनि देवासी । पावला आता या पदासी । म्हणोनि चिंतितो मानसि । कृपासिंधु दातारा ॥२६॥
ऐसे अविद्यासंबंधेसी । नाना वासना इंद्रियांसी । चाड नाही या भोगासी । चरणी तुझे मज सौख्य ॥२७॥
श्रीपाद म्हणती रजकासी । जन्मादारभ्य कष्टलासी । वांछा असे भोगावयासी । राज्यभोग तमोवृत्ति ॥२८॥
निववी इंद्रिये सकळ । नातरी मोक्ष नव्हे निर्मळ । बाधा करिती पुढे केवळ । जन्मांतरी परियेसी ॥२९॥
तुष्टवावया इंद्रियांसी । तुवा जावे म्लेछवंशासी । आवडी जाहली तुझे मानसी । राज्य भोगी जाय त्वरित ॥३०॥
ऐकोनि स्वामीचे वचन । विनवी रजक कर जोडून । कृपासागरू तू गुरुराज पूर्ण । उपेक्षू नको म्हणतसे ॥३१॥
अंतरतील तुझे चरण । द्यावे माते पुनर्दर्शन । तुझा अनुग्रह असे कारण । ज्ञान द्यावे दातारा ॥३२॥
श्रीगुरु म्हणती तयासी । वैदुरानगरी जन्म घेसी । भेटी देऊ अंतकाळासी । कारण असे येणे आम्हा ॥३३॥
भेटी होतांचि आम्हांसी । ज्ञान होल तुझे मानसी । न करी चिंता भरवसी । आम्हा येणे घडेल ॥३४॥
आणिक कार्यकारणासी । अवतार घेऊ परियेसी । वेष धरोनि संन्यासी । नाम नृसिंहसरस्वती ॥३५॥
ऐसे तया संबोधूनि । निरोप देती जाय म्हणोनि । रजक लागला तये चरणी । नमस्कारीत तये वेळी ॥३६॥
देखोनि श्रीगुरु कृपामूर्ति । रजकासी जवळी पाचारिती । इह भोगिसी की पुढती । राज्यभोग सांग मज ॥३७॥
रजक विनवीत श्रीपादासी । झालो आपण वृद्धवयेसी । भोग भोगीन बाळाभ्यासी । यौवनगोड राज्यभोग ॥३८॥
ऐकोनि रजकाचे वचन । निरोप देती श्रीगुरु आपण । त्वरित जाई रे म्हणोन । जन्मांतरी भोगी म्हणती ॥३९॥
निरोप देता तया वेळी । त्यजिला प्राण तत्काळी । जन्माता झाला म्लेछकुळी । वैदुरानगरी विख्यात ॥४०॥
ऐसी रजकाची कथा । पुढे सांगून विस्तारता । सिद्ध म्हणे नामधारका आता । चरित्र पुढती अवधारी ॥४१॥
ऐसे झालीया अवसरी । श्रीपादराय कुरवपुरी । असता महिमा अपरंपारी । प्रख्यात असे परियेसा ॥४२॥
महिमा सकळ सांगता । विस्तार होईल बहु कथा । पुढील अवतार असे ख्याता । सांगेन ऐक नामधारका ॥४३॥
महत्त्व वर्णावया श्रीगुरूचे । शक्ति कैची या वाचे । नवल हे अमृतदृष्टीचे । स्थानमहिमा ऐसा ॥४४॥
श्रीगुरु राहती जे स्थानी । अपार महिमा त्या भुवनी । विचित्र जयाची करणी । दृष्टान्ते तुज सांगेन ॥४५॥
स्थानमहिमाप्रकार । सांगेन ऐक एकाग्र । प्रख्यात असे कुरवपूर । मनकामना पुरती तेथे ॥४६॥
ऐसे कित्येक दिवसांवरी । श्रीपाद होते कुरवपुरी । कारण असे पुढे अवतारी । म्हणोनि अदृश्य होते तेथे ॥४७॥
आश्विन वद्य द्वादशी । नक्षत्र मृगराज परियेसी । श्रीगुरु बैसले निजानंदेसी । अदृश्य झाले गंगेत ॥४८॥
लौकिकी दिसती अदृश्य जाण । कुरवपुरी असती आपण । श्रीपादराव निर्धार जाण । त्रयमूर्तिचा अवतार ॥४९॥
अदृश्य होवोनि तया स्थानी । श्रीपाद राहिले निर्गुणी । दृष्टान्त सांगेन विस्तारोनि । म्हणे सरस्वतीगंगाधरू ॥५०॥
जे जन असती भक्त केवळ । त्यांसी दिसती श्रीगुरु निर्मळ । कुरवपूर क्षेत्र अपूर्व स्थळ । असे प्रख्यात भूमंडळी ॥५१॥
1
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे रजकवरप्रदानं नाम नवमोऽध्यायः ॥९॥
ओवीसंख्या ॥५२॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु

<poem> श्रीगणेशाय नमः ।
ऐकोनि सिद्धाचे वचन । नामधारक विनवी जाण । कुरवपुरीचे महिमान । केवी जाहले परियेसा ॥१॥
म्हणती श्रीपाद नाही गेले । आणि म्हणती अवतार झाले । विस्तार करोनिया सगळे । निरोपावे म्हणतसे ॥२॥
सिद्ध सांगे नामधारकासी । श्रीगुरुमहिमा काय पुससी । अनंतरूपे होती परियेसी । विश्वव्यापक परमात्मा ॥३॥
पुढे कार्यकारणासी । अवतार झाले परियेसी । राहिले आपण गुप्तवेषी । तया कुरवक्षेत्रांत ॥४॥
पाहे पा भार्गवराम देखा । अद्यापवरी भूमिका । अवतार जाहले अनेका । त्याचेच एकी अनेक ॥५॥
सर्वा ठायी वास आपण । मूर्ति एक नारायण । त्रिमूर्तीचे तीन गुण उत्पत्ती स्थिति आणि प्रलय ॥६॥
भक्तजना तारावयासी । अवतरतो हृषीकेशी । शाप देत दुर्वासऋषि । कारण असे तयांचे ॥७॥
त्रयमूर्तीचा अवतार । याचा कवणा न कळे पार । निधान तीर्थ कुरवपूर । वसे तेथे गुरुमूर्ति ॥८॥
जे जे चिंतावे भक्तजने । ते ते पावे गुरुदर्शने । श्रीगुरु वसावयाची स्थाने । कामधेनु असे जाणा ॥९॥
श्रीपादवल्लभस्थानमहिमा । वर्णावया अनुपमा । अपार असे सांगतो तुम्हा । दृष्टान्तेसी अवधारा ॥१०॥
तुज सांगावया कारण । गुरुभक्ति वृथा नव्हे जाण । सर्वथा न करी निर्वाण । पाहे वाट भक्तांची ॥११॥
भक्ति करावी दृढतर । गंभीरपणे असावे धीर । तरीच उतरिजे पैलपार । इहपरत्री सौख्य पावे ॥१२॥
याचि कारणे दृष्टान्ते तुज । सांगेन ऐक वर्तले सहज । काश्यपगोत्री होता द्विज । नाम तया वल्लभेश ॥१३॥
सुशील द्विज आचारवंत । उदीम करूनि उदर भरीत । प्रतिसंवत्सरी यात्रेस येत । तया श्रीपादक्षेत्रासी ॥१४॥
असता पुढे वर्तमानी । उदीमा निघाला तो धनी । नवस केला अतिगहनी । संतर्पावे ब्राह्मणासी ॥१५॥
उदीम आलिया फळासी । यात्रेसी येईन विशेषी । सहस्त्र संख्या ब्राह्मणांसी । इच्छाभोजन देईन म्हणे ॥१६॥
निश्चय करोनि मानसी । निघाला द्विजवर उदीमासी । चरण ध्यातसे मानसी । सदा श्रीपादवल्लभाचे ॥१७॥
जे जे ठायी जाय देखा । अनंत संतोष पावे निका । शतगुणे लाभ झाला ऐका । परमानंदा प्रवर्तला ॥१८॥
लय लावूनि श्रीपादचरणी । यात्रेसि निघाला ते क्षणी । वेचावया ब्राह्मणसंतर्पणी । द्रव्य घेतले समागमे ॥१९॥
द्रव्य घेऊनि द्विजवर । निघता देखती तस्कर । कापट्यवेषे सत्वर । तेही सांगते निघाले ॥२०॥
दोन-तीन दिवसांवरी । तस्कर असती संगिकारी । एके दिवशी मार्गी रात्री । जात असता मार्गस्थ ॥२१॥
तस्कर म्हणती द्विजवरासी । आम्ही जाऊ कुरवपुरासी । श्रीपादवल्लभदर्शनासी । प्रतिवर्षी नेम असे ॥२२॥
ऐसे बोलती मार्गासी । तस्करी मारिले द्विजासी । शिर छेदूनिया परियेसी । द्रव्य घेतले सकळिक ॥२३॥
भक्तजनांचा कैवारी । श्रीपादराव कुरवपुरी । पातला त्वरित वेषधारी । जटामंडित भस्मांकित ॥२४॥
त्रिशूळ खट्वांग घेऊनि हाती । उभा ठेला तस्करांपुढती । वधिता झाला तयांप्रती । त्रिशूळेकरूनि तात्काळ ॥२५॥
समस्त तस्करा मारिता । एक तस्कर येऊनि विनविता । कृपाळुवा जगन्नाथा । निरपराधी आपण असे ॥२६॥
नेणे याते वधितील म्हणोनि । आलो आपण संगी होऊनि । तू सर्वोत्तमा जाणसी मनी । विश्वाची मनवासना ॥२७॥
ऐकोनि तस्कराची विनंती । श्रीपाद त्याते बोलाविती । हाती देऊनिया विभूति । विप्रावरी प्रोक्षी म्हणे ॥२८॥
मन लावूनि तया वेळा । मंत्रोनि लाविती विभूती गळा । सजीव जाहला तात्काळा । ऐक वत्सा ऐकचित्ते ॥२९॥
इतुके वर्तता परियेसी । उदय जाहला दिनकरासी । श्रीपाद जाहले गुप्तेसी । राहिला तस्कर द्विजाजवळी ॥३०॥
विप्र पुसतसे तस्करासी । म्हणे तू माते का धरिलेसी । कवणे वधिले तस्करासी । म्हणोनि पुसे तया वेळी ॥३१॥
तस्कर सांगे द्विजासी । आला होता एक तापसी । जाहले अभिनव परियेसी । वधिले तस्कर त्रिशूळे ॥३२॥
मज रक्षिले तुजनिमित्ते । धरोनि बैसविले स्वहस्ते । विभूति लावूनि मग तूते । सजीव केला तव देह ॥३३॥
उभा होता आता जवळी । अदृश्य जाहला तत्काळी । न कळे कवण मुनि बळी । तुझा प्राण रक्षिला ॥३४॥
होईल ईश्वर त्रिपुरारि । भस्मांगी होय जटाधारी । तुझी भक्ति निर्धारी । म्हणोनि आला ठाकोनिया ॥३५॥
ऐकोनि तस्कराचे वचन । विश्वासला तो ब्राह्मण । तस्कराजवळिल द्रव्य घेऊन । गेला यात्रेसी कुरवपुरा ॥३६॥
नानापरी पूजा करी । ब्राह्मणभोजन सहस्त्र चारी । अनंतभक्ती प्रीतिकरी । पूजा करी श्रीपादुकांची ॥३७॥
ऐसे अनंत भक्तजन । मिळूनि सेविती श्रीपादचरण । कुरवपूर प्रख्यात जाण । अपार महिमा ॥३८॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । संशय न धरी तू मानसी । श्रीपाद आहेती कुरवपुरासी । अदृश्यरूप होऊनिया ॥३९॥
पुढे अवतार असे होणे । गुप्त असती याचि गुणे । म्हणती अनंतरूप नारायण । परिपूर्ण सर्वा ठायी ॥४०॥
ऐसी श्रीपादवल्लभमूर्ति । लौकिकी प्रगटली ख्याति । झाला अवतार पुढती । नृसिंहसरस्वती विख्यात ॥४१॥
म्हणोनि सरस्वतीगंगाधरू । सांगत कथेचा विस्तारू । ऐकता होय मनोहरू । सकळाभीष्टे साधती ॥४२॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे भक्तसंकटहरणं नाम दशमऽध्यायः ॥१०॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ।

ओवीसंख्या ॥४२॥

<poem>
श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
नामधारक म्हणे सिद्धासी । पुढें अवतार जाहले कैसी । विस्तारोनियां आम्हांसी । सांगा स्वामी कृपामूर्ति ॥१॥
सिद्ध म्हणे ऐक वत्सा अवतार झाला श्रीपाद हर्षा । पूर्वी वृत्तांत ऐकिला ऐसा । कथा सांगितली विप्रस्त्रियेची ॥२॥
शनिप्रदोषीं सर्वेश्वरासी । पूजित होती गुरु-उपदेशीं । देहवासना असतां तियेसी । पंचत्व पावली तयेवेळीं ॥३॥
झाला जन्म पुढें तिसी । कारंज-नगर उत्तरदेशीं । वाजसनीय शाखेसी । विप्रकुळीं जन्मली ॥४॥
जातक वर्तले तियेसी । नाम 'अंबा-भवानी' ऐसी । आरोपिलें स्नेहेसीं । मातापितरीं परियेसा ॥५॥
वर्धतां मातापित्यागृहीं । वाढली कन्या अतिस्नेही । विवाह करिती महोत्साहीं । देती विप्रासी तेचि ग्रामीं ॥६॥
शिवव्रती असे तो ब्राह्मण । नाम तया 'माधव' जाण । त्यासी दिधली कन्या दान । अतिप्रीतींकरुनि ॥७॥
तया माधवविप्राघरीं । शुभाचारें होती नारी । वासना तिची पूर्वापरीं । ईश्वरपूजा करीतसे ॥८॥
पूजा करी ईश्वरासी । दंपती उभयवर्ग मनोमानसीं । प्रदोषपूजा अतिहर्षी । करिती भक्तिपुरस्कर ॥९॥
मंदवारीं त्रयोदशीसी । पूजा करिती अतिविशेषीं । तंव वत्सरें झालीं षोडशीं । अंतर्वत्नी झाली ऐका ॥१०॥
मास तृतीय-पंचमेसी । उत्साह करिती अनेक हर्षी । उत्तम डोहाळे होती तियेसी । ब्रह्मज्ञान बोलतसे ॥११॥
करिती उत्साह मास-सातीं । द्विज करी सीमंती । अक्षवाणें वोंवाळिती आरती । सुवासिनी मिळूनियां ॥१२॥
ऐसें क्रमितां नवमासीं । प्रसूत झाली शुभ दिवशीं । पुत्र जाहला म्हणून हर्षी । निर्भर होतीं मातापिता ॥१३॥
जन्म होतांचि तो बाळक । 'ॐ' कार शब्द म्हणतसे अलोलिक ।
पाहूनि झाले तटस्थ लोक । अभिनव म्हणोनि तयेवेळीं ॥१४॥
जातककर्म करी तो ब्राह्मण । विप्रांसी देत दक्षिणा दान । ज्योतिषी सांगती सुलक्षण । लग्न सत्वर पाहोनियां ॥१५॥
सांगती ज्योतिषी त्या द्विजासी । मुहूर्त बरवा असे विशेषीं । कुमर होईल कारणिक पुरुषी । गुरु होईल सकळिकां ॥१६॥
याचा अनुग्रह होईल ज्यासी । तो वंद्य होईल विश्वासी । याचें वाक्य होईल परिस । चिंतामणि याचे चरण ॥१७॥
अष्टही सिद्धि याचे द्वारीं । वोळगत राहतील निरंतरीं । नव निधि याच्या घरीं । राहती ऐक द्विजोत्तमा ॥१८॥
न होती यासी गृहिणी-सुत । पूज्य होईल त्रिभुवनांत । याचे दर्शनमात्रें पतित । पुनीत होतील परियेसीं ॥१९॥
होईल हा अवतार-पुरुषी । आम्हां दिसतसे भरवंसीं । संदेह न धरावा मानसीं । म्हणोनि करिती नमस्कार ॥२०॥
म्हणती समस्त द्विजवर । सांगती जनकासी उत्तर । याचेनि महादैन्य हरे । भेणें नलगे कळिकाळा ॥२१॥
तुमचे मनीं जे जे वासना । सर्व साधेल निर्गुणा । यातें करावें हो जतना । निधान आलें तुमचे घरा ॥२२॥
ऐसें जातक वर्तवोन । सांगता झाला विद्वज्जन । जनक जननी संतोषोन । देती दान वस्त्राभरणें ॥२३॥
सांगोनि गेले ब्राह्मणस्तोम । मातापिता अति प्रेम । दृष्टि लागेल म्हणून विषम । निंबलोण वोंवाळिती ॥२४॥
व्यवस्था फांकली नगरांत । अभिनव आजि देखिलें म्हणत ।
उपजतां बाळ 'ॐ' कार जपत । आश्चर्य म्हणती सकळ जन ॥२५॥
नगलोक इष्ट मित्र । पहावया येती विचित्र । दृष्टि लागेल म्हणोनि मात्र । माता न दाखवी कवणासी ॥२६॥
मायामोहें जनकजननी । बाळासी दृष्टि लागेल म्हणोनि । आंगारा लाविती मंत्रोनि । रक्षा बांधिती कृष्णसुतें ॥२७॥
परमात्मयाचा अवतार । दृष्टि त्यासीं केवीं संचार । लौकिकधर्म ममत्कार । मातापिता संरक्षिती ॥२८॥
वर्ततां बाळ येणेंपरी । दिवस दहा झालियावरी । नामकरण पुरःसरीं । ठेविता झाला जनक द्विजोत्तम ॥२९॥
'शालग्रामदेव' म्हणत । जन्मनाम झालें ख्यात । नाम 'नरहरी' ऐसें म्हणत । उच्चार केला धर्मकर्मे ॥३०॥
ममत्व थोर बाळकावरी । प्रतिपाळ करिती प्रीतिकरीं । माता म्हणतसे येरी । न पुरे क्षीर बाळकासी ॥३१॥
पतीसी म्हणे तये वेळां । स्तनीं दूध थोडें बाळा । एखादी मिळवा कां अबळा । स्तनपान देववूं ॥३२॥
अथवा आणा मेषी एक । आपुलें स्तनें न शमे भूक । ऐकोनि हांसे बाळक । स्पर्श करी स्तनासी सव्यकर ॥३३॥
स्तनीं स्पर्श होतांचि कर । बत्तीस धारा वाहे क्षीर । वस्त्र भिजोनि विचित्र । वाहों लागे भूमीवरी ॥३४॥
विस्मय करिती जनकजननी । प्रगट न करिती गौप्यगुणीं । नमन करिती बाळकाचरणीं । माता होय खेळविती ॥३५॥
पाळण्या घालूनि बाळकासी । पर्यंदें गाय अति हर्षी । न राहे बाळक पाळणेसीं । सदा खेळे महीवरी ॥३६॥
वर्धे बाळ येणेंपरी । मातापिता-ममत्कारीं । वर्धतां झाला संवत्सरीं । न बोले बाळ कवणासवें ॥३७॥
माता बोलवी कुमरासी । बोले शब्द ॐकारेसीं । चिंता करीतसे मानसीं । मुकें होईल म्हणोनि ॥३८॥
पुसती जाण ज्योतिष्यासी । म्हणे बोल नये काय यासी । उपाय असेल यास विशेषी । म्हणोनि पुसे वेळोवेळीं ॥३९॥
सांगती जाण ज्योतिषी । आराधावें कुलदेवतेसी । अर्कवारीं अश्वत्थपर्णेसीं । अन्न घालावें तीनी वेळां ॥४०॥
एक म्हणती होईल मुकें । यासि शिकवावें बरव्या विवेकें । बाळ बोल बोलूं शिके । म्हणोनि सांगती विनोदें ॥४१॥
हांसोनि ॐकार उच्चारी बाळ । आणिक नेणे बोल केवळ । विस्मय करितात लोक सकळ । ॐकार शब्द ऐकोनि ॥४२॥
एक म्हणती नवल झालें । सर्व ज्ञान असे भलें । श्रवणीं ऐकतो बोल सकळ । जाणूनि न बोले कवण्या गुणें ॥४३॥
कांहीं केलिया न बोले सुत । चिंता करिताति मातापिता । पुत्रासी जाहलीं वर्षे सात । मुका झाला दैवयोगें ॥४४॥
सातवें वर्ष कुमरासी । योग्य झाला मुंजीसी । पुसताति समस्त ब्राह्मणांसी । केंवी करावें म्हणोनियां ॥४५॥
विप्र म्हणती तया वेळां । संस्कारावें ब्राह्मणकुळा । उपनयनावें केवळा । अष्ट वरुषें होऊं नये ॥४६॥
मातापिता चिंता करिती । उपदेशावें कवणे रीतीं । मुका असे हा निश्चितीं । कैसें दैव झालें आम्हां ॥४७॥
कैसें दैव जाहलें आपुलें । ईश्वरगौरी आराधिले । त्रयोदशीं शिवासी पूजिलें । वायां झालें म्हणतसे ॥४८॥
ईश्वरें तरी दिधला वरु । सुलक्षण झाला कुमरु । न बोले आतां काय करुं । म्हणोनि चिंता शिवासी ॥४९॥
एकचि बाळ आमुचे कुशीं । आणिक न देखों स्वप्नेसीं । वेष्टिलों होतों आम्ही आशीं । आमुतें रक्षील म्हणोनि ॥५०॥
नव्हेच आमुचे मनींचा वास । पुत्र झाला निर्वाणवेष । काय वर दिधला त्या महेशें । शनिप्रदोषीं पूजितां म्यां ॥५१॥
ऐसें नानापरी देखा । जननी करी महादुःखा । जवळी येवोनि बाळक । संबोखीत मातेसी ॥५२॥
घरांत जाऊनि तये वेळां । घेऊनि आला लोखंड सबळा । हातीं धरितांचि निर्मळा । झालें सुवर्ण बावन्नकशी ॥५३॥
आणोनि देतसे मातेसी । विस्मय करी बहुवसी । बोलावूनियां पतीसी । दाविती झाली तयेवेळीं ॥५४॥
गौप्य करिती तये वेळां । मंदिरांत नेलें तया बाळा । पाहती त्याची बाळलीला । आणिक लोह हातीं देती ॥५५॥
अमृतदृष्टीं पाहतां स्वामी । समृद्धि झाली सर्व हेमीं । विश्वास धरिती मनोधर्मी । होईल पुरुष कारणिक ॥५६॥
मग पुत्रातें आलिंगोनि । विनविताति जनकजननी । तूं तारका शिरोमणि । कारणिक पुरुष कुळदीपका ॥५७॥
तुझेनि सर्वस्व लाधलें । बोलतां आम्हीं नाहीं ऐकिलें । अज्ञान-मायेनें विष्टिलें । मुकें ऐसें म्हणों तुज ॥५८॥
आमुचे मनींची वासना । तुंवा पुरवावी नंदना । तुझे बोबडे बोल आपणा । ऐकवावे पुत्रराया ॥५९॥
हास्यवदन करी बाळ । यज्ञोपवीत दावी गळां । कटीं दावी मौंजीस्थळा । म्हणोनि दाखवी मातेसी ॥६०॥
संज्ञा करोनि मातेसी । दावी बाळक संतोषीं । मुंजी बांधितांचि आपणासी । येईल म्हणे बोल सकळ ॥६१॥
मातापिता संतोषती । विद्वांस ज्योतिषी पाचारिती । व्रतबंधमुहूर्त-लग्न पाहती । सर्व आयती करिते झाले ॥६२॥
केली आयती बहुतांपरी । रत्नखचित अळंकारीं । मायामोहें प्रीतीकरीं । समारंभ करिताति ॥६३॥
चतुर्वेदी ब्राह्मण येती । शाखापरत्वें वेद पढती । इष्ट सोयरे दाईज गोत्री । समस्त आले तया भवना ॥६४॥
नानापरीचे श्रृंगार । उभारिले मंडपाकार । आनंद करीतसे द्विजवर । अपार द्रव्य वेंचीतसे ॥६५॥
नगरलोक विस्मय करिती । मूक पुत्रासी एवढी आयती । द्विजा लागली असे भ्रांति । वृथा करितो द्रव्य आपुलें ॥६६॥

एक म्हणती हो कां भलतें । मिष्टान्न आम्हांसि मिळतें । देकार देतील हिरण्य वस्त्रें । चाड नाहीं त्याचे मंत्रा ॥६८॥
ऐसे नानापरीचे लोक । विचार करिती अनेक । मातापित्या अत्यंत सुख । देवदेवक करिताति ॥६९॥
चौलकर्म येरे दिवसीं । भोजन चौलमणीसी । पुनरभ्यंग करुनि हर्षी । यज्ञोपवीत धारण केलें ॥७०॥
मंत्रपूर्वक यज्ञोपवीत । धारण करविती द्विज समस्त । सहभोजन करावया माता । घेऊनि गेली मंदिरांत ॥७१॥
भोजन करोनि मातेसवें । निरोप घे तो एकोभावें । मुंजीबंधन असे करावें । म्हणोनि आला पित्याजवळी ॥७२॥
गृह्योक्तमार्गे मौंजी देखा । बंधन केलें त्या बाळका । सुमुहूर्त आला तत्काळिका । मंत्रोपदेश करिता झाला ॥७३॥
गायत्रीमंत्र अनुक्रमेसीं । उपदेश देती परियेसीं । बाळ उच्चारी मनोमानसीं । व्यक्त न बोले कवणापुढें ॥७४॥
गायत्रीमंत्र कुमरासी होतां । भिक्षा घेऊन आली माता । वस्त्रभूषणें रत्नखचिता । देती झाली तया वेळीं ॥७५॥
पहिली भिक्षा घेऊनि करीं । आशीर्वचन दे ती नारी । बाळ ऋग्वेद म्हणोन उच्चारी आचारधर्मे वर्ततसे ॥७६॥
पहिली भिक्षा येणेंपरी । देती झाली प्रीतिकरीं । 'अग्निमीळे पुरोहितं' उच्चारी । ब्रह्मचारी तया वेळीं ॥७७॥
दुसरी भिक्षा देतां माता । उच्चार केला यजुर्वेद 'इषेत्वा०। लोक समस्त तटस्था । माथा तुकिती तये वेळीं ॥७८॥
तिसरी भिक्षा देतां माता । म्हणे सामवेद पढे आतां । 'अग्नआयाहि०' गायन करीत । तीन्ही वेद म्हणतसे ॥७९॥
सभा समस्त विस्मय करी । पहाती हर्षनिर्भरीं । मुकें बोले वेद चारी । म्हणती होईल कारणिक ॥८०॥
यातें म्हणों नये नर । होईल देवाचा अवतार । म्हणोनि करिती नमस्कार । जगद्गुरु म्हणोनिया ॥८१॥
इतुक्यावरी तो बाळक । मातेसी म्हणतसे ऐक । तुंवा उपदेश केला एक । भिक्षा माग म्हणोनि ॥८२॥
नव्हती बोल तुझे मिथ्या । निर्धार राहिला माझिया चित्ता । निरोप द्यावा आम्हां त्वरिता । जाऊं तीर्थे आचरावया ॥८३॥
आम्हां आचार ब्रह्मचारी । भिक्षा करावी घरोघरीं । वेदाभ्यास मनोहरी । करणें असे परियेसा ॥८४॥
ऐकोनि पुत्राचें वचन । दुःखें दाटली अतिगहन । बाष्प निघताति लोचनीं । आली मूर्च्छना तये वेळीं ॥८५॥
निर्जीव होऊनि क्षणेक । करिती झाली महाशोक । पुत्र माझा तूं रक्षक । म्हणोनि केली आशा बहु ॥८६॥
आमुतें रक्षिसी म्हणोनि । होती आशा बहु मनीं । न बोलसी आम्हांसवें याचि गुणीं । मुकें म्हणविसी आपणासी ॥८७॥
न ऐकों कधीं तुझे बोल । आतां ऐकतां संतोष होईल । ईश्वरपूजा आलें फळ । म्हणोनि विश्वास केला आम्हीं ॥८८॥
ऐसे नानापरी देखा । पुत्रासि म्हणे ते बाळिका । आलिंगोनि कुमारका । कृपा भाकी तयेवेळीं ॥८९॥
ऐकोनि मातेचें वचन । बाळक सांगे ब्रह्मज्ञान । नको खेदवूं अंतःकरण । आम्हां करणें तेंचि असे ॥९०॥
तुतें आणखी पुत्र चारी । होतील माते निर्धारीं । तुझी सेवा परोपरी । करितील मनोभावेसीं ॥९१॥
तुवां आराधिला शंकर । जन्मांतरीं पूर्वापार । म्हणोनि मस्तकीं ठेविती कर । मग तिसी जहालें जातिस्मरण ॥९२॥
पूर्वजन्मींचा वृत्तांत । स्मरतां जाहली विस्मित । श्रीपादश्रीवल्लभ स्वरुपता । दिसतसे तो बाळक ॥९३॥
देखोनि माता तये वेळां । नमन केलें चरणकमळां । श्रीपाद उठवूनि अवलीळा । सांगती गौप्य अवधारीं ॥९४॥
ऐक माते ज्ञानवंती । हा बोल करीं वो गुप्ती । आम्ही संन्यासी असों यति । अलिप्त असों संसारीं ॥९५॥
याचिकारणें आम्ही आतां । हिंडूं समस्त तीर्थां । कारण असे पुढें बहुता । म्हणोनि निरोप मागती ॥९६॥
येणेंपरी जननियेसी । गुरुमूर्ति सांगे विनयेसीं । पुनरपि विनवी पुत्रासी । ऐका श्रोते एकचित्तें ॥९७॥
पुत्रासी विनवी तये वेळ । मातें सांडूनि तुम्ही जरी जाल । आणिक कधीं न देखों बाळ । केवीं वांचूं पुत्रराया ॥९८॥
धाकुटपणीं तुम्हां तापस- । धर्मी कवण आहे हर्ष । धर्मशास्त्रीं ख्याति सुरस । आश्रम चारी आचरावे ॥९९॥
ब्रह्मचर्य वर्षे बारा । त्यावरी गृहस्थधर्म बरा । मुख्य असे वानप्रस्थ तदनंतरा । घडती पुण्यें अपरांपर ॥१००॥
मुख्य आश्रम असे गृहस्थ । आचरतां होय अतिसमर्थ । मग संन्यास घ्यावा मुख्यार्थ । धर्मशास्त्र येणेंपरी ॥१॥
ब्रह्मचर्यमार्ग ऐका । पठण करावें वेदादिकां । विवाह होतां गृहस्थें निका । पुत्रादिक लाधावे ॥२॥
यज्ञादिक कर्म साधोनियां । तदनंतर संन्यास करणें न्याया । येणेंविधि संन्यास असे मुख्या । अग्राह्य संन्यास बाळपणीं ॥३॥
समस्त इंद्रियें संतुष्टवावीं । मनींची वासना पुरवावी । तदनंतर तपासी जावें । संन्यास घेतां मुख्य असे ॥४॥
ऐकोनि मातेचें वचन । श्रीगुरू सांगती तत्त्वज्ञान । ऐक नामधारका सुमन । म्हणोनि सांगे सिद्धमुनि ॥५॥
गंगाधराचा नंदन । विनवीतसे नमून । तें परिसा श्रोते जन । श्रीगुरुचरित्रविस्तार ॥६॥
पुढें वर्तलें अपूर्व ऐका । सिद्ध सांगे नामधारका । महाराष्ट्रभाषेंकरुनि टीका । सांगतसे सरस्वती-गंगाधर ॥१०७॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे श्रीगुरुनरहरिबाळचरित्रलीलावर्णनं नाम एकादशोऽध्यायः ॥११॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥
श्रीगुरुदेवदत्त ॥
(ओवीसंख्या १०७)

<poem>
श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
नामधारक शिष्यराणा । लागे सिद्धाचिया चरणां । करसंपुट जोडूनि जाणा । विनवीतसे परियेसा ॥१॥
जय जया सिद्ध मुनी । तूं तारक या भवार्णी । सांगितलें ज्ञान प्रकाशोनि । स्थिर जाहलें मन माझें ॥२॥
गुरुचरित्रकथामृत । सेवितां तृष्णा अधिक होत । शमन करणार समर्थ । तूंचि एक कृपानिधि ॥३॥
गुरुचरित्र कामधेनु । सांगितलें तुम्हीं विस्तारोनु । तृप्त नव्हे माझें मनु । आणखी अपेक्षा होतसे ॥४॥
क्षुधेंकरुनि पीडिलें ढोर । जैसें पावे तृणबिढार । त्यातें होय मनोहर । नवचे तेथोनि परतोनि ॥५॥
एखादा न देखे तक्र स्वप्नीं त्यासी मिळे क्षीरबरणी । नोहे मन त्याचे धणी । केवीं सोडी तो ठाव ॥६॥
तैसा आपण स्वल्पज्ञानी नेणत होतों गुरु-निर्वाणी । अविद्यामाया वेष्टोनि । कष्टत होतों स्वामिया ॥७॥
अज्ञानतिमिररजनीसी । ज्योतिस्वरुप तूंचि होसी । प्रकाश केलें गा आम्हांसी । निजस्वरुप श्रीगुरुचें ॥८॥
तुवां केले उपकारासी । उत्तीर्ण काय होऊं सरसी । कल्पवृक्ष दिल्हेयासी । प्रत्युपकार काय द्यावा ॥९॥
एखादा देतां चिंतामणी । त्यासी उपकार काय धरणीं । नाहीं दिधलें न ऐकों कानीं । कृपामूर्ति सिद्धराया ॥१०॥
ऐशा तुझिया उपकारासी । उत्तीर्ण नोहे जन्मोजन्मेसीं । म्हणोनि लागतसे चरणांसी । एकोभावेंकरोनियां ॥११॥
स्वामींनीं निरोपिला धर्म-अर्थ । अधिक झाला मज स्वार्थ । उपजला मनीं परमार्थ । गुरुसी भजावें निरंतर ॥१२॥
प्रयागीं असतां गुरुमूर्ति । माधवसरस्वतीस दीक्षा देती । पुढें काय वर्तली स्थिति । आम्हांप्रती विस्तारावें ॥१३॥
ऐकोनि शिष्याचें वचन । सिद्धमुनि संतोषोन । मस्तकीं हस्त ठेवून । आश्वासिती तया वेळीं ॥१४॥
धन्य धन्य शिष्या सगुण । तुज लाधले श्रीगुरुचरण । संसार तारक भवार्ण । तूंचि एक परियेसा ॥१५॥
तुवां ओळखिली श्रीगुरुची सोय । म्हणोनि पुससी भक्तिभावें । संतोष होतो आनंदमय । तुझ्या प्रश्नेंकरुनियां ॥१६॥
सांगेन ऐक एकचित्तें । चरित्र गुरुचें विख्यातें । उपदेश देऊनि माधवातें । होते क्वचित्काळ तेथेंचि ॥१७॥
असतां तेथें वर्तमानीं । प्रख्यात झाली महिमा सगुणी । शिष्य झाले अपार मुनि । मुख्य माधवसरस्वती ॥१८॥
तया शिष्यांचीं नामें सांगतां । विस्तार होईल बहु कथा । प्रख्यात असती नामें सात । सांगेन ऐक एकचित्तें ॥१९॥
बाळसरस्वती कृष्णसरस्वती । उपेंद्र-माधवसरस्वती । पांचवा असे आणीक यति । सदानंदसरस्वती देखा ॥२०॥
ज्ञानज्योतिसरस्वती एक । सातवा सिद्ध आपण ऐक । अपार होते शिष्य आणिक । एकाहूनि एक श्रेष्ठ पैं ॥२१॥
त्या शिष्यांसमवेत । श्रीगुरु निघाले दक्षिणपंथ । समस्त क्षेत्रें पावन करित । आले पुन्हा कारंजनगरासी ॥२२॥
भेटी झाली जनकजननीं । येवोनि लागताति चरणीं । चतुर्वर्ग भ्राते भगिनी । समस्त भेटती स्वामिया ॥२३॥
देखानियां श्रीगुरुमूर्तीसी नगरलोक अत्यंत हर्षी । आले समस्त भेटीसी । पूजा करिती परोपरी ॥२४॥
घरोघरीं श्रीगुरुसी । पाचारिती भिक्षेसी । जाहले रुपें बहुवसी । घरोघरीं पूजा घेती ॥२५॥
समस्त लोक विस्मय करिती । अवतार हा श्रीविष्णु निश्चितीं । वेषधारी दिसतो यति । परमपुरुष होय जाणा ॥२६॥
यातें नर जे म्हणती । ते नर जाती नरकाप्रती । कार्याकारण अवतार होती । ब्रह्माविष्णुमहेश्वर ॥२७॥
जननीजनक येणें रीतीं । पूजा करिती भावभक्तीं । श्रीगुरू झाले श्रीपादयति । जातिस्मृति जननीसी ॥२८॥
देखोनि जननी तये वेळीं । माथा ठेवी चरणकमळीं । सत्यसंकल्प चंद्रमौळी । प्रदोषपूजा आली फळा ॥२९॥
पतीस सांगे तया वेळीं । पूर्वजन्माचें चरित्र सकळीं । विश्ववंद्य पुत्र प्रबळी । व्हावा म्हणोनि आराधिलें म्यां ॥३०॥
याचि श्रीपाद-ईश्वराचें । पूजन केलें मनोवाचें । प्रसिद्ध झालें जन्म आमुचें । साफल्य केलें परियेसा ॥३१॥
म्हणोनि नमिती दोघेजणीं । विनविताति कर जोडूनि । उद्धरावें या भवार्णी । जगन्नाथा यतिराया ॥३२॥
श्रीगुरू म्हणती तयांसी । एकादे काळीं परियेसीं । पुत्र होय संन्यासी । उद्धरील कुळें बेचाळीस ॥३३॥
त्यासी शाश्वत ब्रह्मलोक । अचळ पद असे देख । त्याचे कुळीं उपजतां आणिक । त्यासीही ब्रह्मपद परियेसा ॥३४॥
यमाचे दुःखें भयाभीत । नोहे त्याचे पितृसंततींत । पूर्वज जरी नरकीं असत । त्यांसी शाश्वत ब्रह्मपद ॥३५॥
याकारणें आम्हीं देखा । घेतला आश्रम विशेखा । तुम्हां नाहीं यमाची शंका । ब्रह्मपद असे सत्य ॥३६॥
ऐसें सांगोनि तयांसी । आश्वासीतसे बहुवसी । तुमचे पुत्र शतायुषी । अष्टैश्वर्ये नांदती ॥३७॥
त्यांचे पुत्रपौत्र तुम्ही । पहाल सुखें तुमचे नयनीं । पावाल क्षेम काशीभुवनीं । अंतकाळीं परियेसा ॥३८॥
मुक्तिस्थान काशीपुर । प्रख्यात असे वेदशास्त्र । न करा मनीं चिंता मात्र । म्हणोनि सांगती तये वेळीं ॥३९॥
त्यांची कन्या असे एक । नाम तिचें 'रत्नाई' विशेष । श्रीगुरुसी नमूनि ऐक । विनवीतसे परियेसा ॥४०॥
विनवीतसे परोपरी । स्वामी मातें तारीं तारीं । बुडोनि जात्यें भवसागरीं । संसारमाया वेष्टोनियां ॥४१॥
संसार-तापत्रयासी । आपण भीतसें परियेसीं । निर्लिप्त करीं गा आम्हांसी । आपण तपासी जाईन ॥४२॥
ऐकोनि तियेचें वचन । श्रीगुरु निरोपिताति आपण । स्त्रियांसी पतिसेवाचरण । तेंचि तप परियेसा ॥४३॥
येणें या भावार्णवासी । कडे पडती परियेसीं । जैसा भाव असे ज्यासी । तैसें होईल परियेसा ॥४४॥
उतरावया पैल पार । स्त्रियांसी असे तो भ्रतार । मनें करोनि निर्धार । भजा पुरुष शिवसमानी ॥४५॥
त्यासी होय उद्धार गति । वेदपुराणें वाखाणिती । अंतःकरणीं न करीं खंती । तूतें गति होईल जाण ॥४६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे कर जोडून । श्रीगुरुमूर्ति ब्रह्मज्ञान । विनवीतसें अवधारीं ॥४७॥
तूं जाणसी भविष्यभूत । कैसें मातें उपदेशीत । माझें प्रालब्ध कवणगत । विस्तारावें मजप्रति ॥४८॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । तुझी वासना असे तपासी । संचित पाप असे तुजसी । भोगणें असे परियेसा ॥४९॥
पूर्वजन्मीं तूं परियेसीं । चरणीं लाथिलें धेनूसी । शेजारी स्त्रीपुरुषांसी । विरोधें लाविला कलह जाणा ॥५०॥
तया दोषास्तव देखा । तूतें बाधा असे अनेका । गायत्रीसी लाथिलें ऐका । तूं सर्वांगीं कुष्ठी होसील ॥५१॥
विरोध केला स्त्रीपुरुषांसीं । तुझा पुरुष होईल तापसी । तुतें त्यजील भरंवसी । अर्जित तुझें ऐसें असे ॥५२॥
ऐकोनि दुःख करी बहुत । श्रीगुरुचरणीं असे लोळत । मज उद्धारावें गुरुनाथा त्वरित । म्हणोनि चरणीं लागली ॥५३॥
श्रीगुरू म्हणती ऐक बाळे । क्वचित्काळ असाल भले । अपरवयसा होतांचि काळें । पति तुझा यति होये ॥५४॥
तदनंतर तुझा देह । कुष्ठी होईल अवेव । भोगूनि स्वदेहीं वय । मग होईल तुज गति ॥५५॥
नासतां तुझा देह जाण । भेटी होईल आमुचे चरण । तुझें पाप होईल दहन । सांगेन क्षेत्र ऐक पां ॥५६॥
भीमातीर दक्षिण देशीं । असे तीर्थ पापविनाशी । तेथें जाय तूं भरंवसीं । अवस्था तुज घडलियावरी ॥५७॥
या भूमंडळीं विख्यात । तीर्थ असे अति समर्थ । गंधर्वपुर असे ख्यात । अमरजासंगम प्रसिद्ध जाण ॥५८॥
ऐसें सांगोनि तियेसी । श्रीगुरू निघाले दक्षिण देशीं । त्र्यंबक-क्षेत्रासी । आले, गौतमी-उद्भव जेथें ॥५९॥
शिष्यांसहित गुरुमूर्ति । आले नाशिकक्षेत्राप्रती । तीर्थमहिमा असे ख्याति । पुराणांतरीं परियेसा ॥६०॥
तीर्थमहिमा सांगतां । विस्तार होईल बहु कथा । संक्षेपमार्गे तुज आतां । सांगतसें परियेसीं ॥६१॥
त्या गौतमीची महिमा । सांगतां अपार असे आम्हां । बहिरार्णव-उदक उगमा । ब्रह्मांडाव्यतिरिक्त ॥६२॥
जटामुकुटीं तीर्थेश्वर । धरिली होती प्रीतिकर । मिळोनि समस्त ऋषीश्वर । उपाय केला परियेसा ॥६३॥
ब्रह्मऋषि गौतम देखा । तपस्वी असे विशेषा । व्रीहि पेरिले वृत्तीं ऐका । अनुष्ठानस्थानाजवळी ॥६४॥
पूर्वी मुनी सकळी । नित्य पेरुनि पिकविती साळी । ऐसे त्यांचे मंत्र बळी । महापुण्यपुरुष असती ॥६५॥
समस्त ऋषि मिळोनि । विचार करिती आपुले मनीं । ऋषिगौतम महामुनी । सर्वेश्वराचा मुख्य दास ॥६६॥
त्यासी घालितां सांकडें । गंगा आणील आपुलें चाडें । समस्तां आम्हां पुण्य घडे । गंगास्नानें भूमंडळीं ॥६७॥
श्लोक ॥ या गतिर्योगयुक्तानां मुनीनामूर्ध्वरेतसाम् । सा गतिः सर्वजंतूनां गौतमीतीरवासिनाम् ॥६८॥

याकारणें गौतमीसी । आणावें यत्नें भूमंडळासी । सांकडें घालितां गौतमासी । आणितां गंगा आम्हां लाभ ॥७०॥
म्हणोनि रचिली माव एक । दुर्वेची गाय सवत्सक । करोनि पाठविली ऐक । गौतमाचे ब्रीहिभक्षणासी ॥७१॥
ऋषि होता अनुष्ठानीं । देखिलें धेनूसी नयनीं । निवारावया तत्क्षणीं । दर्भ पवित्र सोडिलें ॥७२॥
तेचि कुश जाहलें शस्त्र । धेनूसी लागलें जैसें वज्रास्त्र । पंचत्व पावली त्वरित । घडली हत्या गौतमासी ॥७३॥
मिळोनि समस्त ऋषिजन । प्रायश्चित्त देती जाण । गंगा भूमंडळीं आण । याविणें तुम्हां नाहीं शुद्धि ॥७४॥
याकारणें गौतमऋषीं । तप केलें सहस्त्र वर्षी । प्रसन्न झाला व्योमकेशी । वर माग म्हणितलें ॥७५॥
गौतम म्हणे सर्वेश्वरा । तुवां देशील मज वरा । उद्धरावया सचराचरा । द्यावी गंगा भूमंडळासी ॥७६॥
गौतमाचे विनंतीसी । निरोप दिधला गंगेसी । घेवोनि आला भूमंडळासी । पापक्षालनार्थ मनुष्यांचे ॥७७॥
ऐसी गंगाभागीरथी । कवणा वर्णावया सामर्थ्य । याचि कारणें श्रीगुरुनाथ । आले ऐक नामधारका ॥७८॥
ऐशी गौतमीतटाकयात्रा । श्रीगुरू आपण आचरीत । पुढें मागुती लोकानुग्रहार्थ । आपण हिंडे परियेसा ॥७९॥
तटाकयात्रा करितां देख । आले श्रीगुरु मंजरिका । तेथें होता मुनि एक । विख्यात 'माधवारण्य' ॥८०॥
सदा मानसपूजा त्यासी । नरसिंहमूर्ति परियेसीं । देखता झाला श्रीगुरुसी । मानसमूर्ति जैसी देखे ॥८१॥
विस्मित होऊनि मानसीं । नमिता झाला श्रीगुरुमूर्तीसी । स्तोत्र करीं बहुवसी । अतिभक्तीकरुनियां ॥८२॥
श्लोक ॥ यद्दिव्यपादद्वयमेवसाक्षाद् , अधिष्ठित देवनदीसमीपे । य उत्तरे तीरनिवासिरामो, लक्ष्मीपतिस्त्वं निवसन्स नित्यम् ॥८३॥
ओंव्या ॥ येणेंपरी श्रीगुरुसी । विनवी माधवारण्य हर्षी । श्रीगुरू म्हणती संतोषीं । तया माधवारण्यासी ॥८४॥
श्लोक ॥ अत्यंतमार्गस्थितिमार्गरुपं, अत्यंतयोगादधिकारतत्त्वम् । मार्गं च मार्गं च विचिन्वतो मे, मार्गोदयं माधव दर्शये ते ॥८५॥
ओंव्या ॥ ऐसें श्रीगुरू तयासी आश्वासोनि म्हणती हर्षी । निजस्वरुप तयासी । दाविते झाले परियेसा ॥८६॥
श्रीगुरुचें स्वरुप देखोनि । संतोषी झाला तो मुनि । विनवीतसे कर जोडूनि । नानापरी स्तुति करी ॥८७॥
जय जया जगद्गुरू । त्रयमूर्तीचा अवतारू । लोकां दिससी नरु । परमपुरुषा जगज्ज्योति ॥८८॥
तूं तारक विश्वासीं । म्हणोनि भूमीं अवतरलासी । कृतार्थ केलें आम्हांसी । दर्शन दिधलें चरण आपुले ॥८९॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । स्तुति करी तो तापसी । संतोष होऊन अति हर्षी । आश्वासिती तया वेळीं ॥९०॥
म्हणती श्रीगुरू तयासी । सिद्धि झाली तुझ्या मंत्रासी । तुज सद्गति भरंवसीं । ब्रह्मलोक प्राप्त होय ॥९१॥
नित्यपूजा तूं मानसीं । करिसी नृसिंहमूर्तीसी । प्रत्यक्ष होईल परियेसीं । न करीं संशय मनांत ॥९२॥
ऐसें सांगोनि तयासी । श्रीगुरू निघाले परियेसीं । आले वासरब्रह्मेश्वरासी । गंगातीर महाक्षेत्र ॥९३॥
तया गंगातटाकांत । श्रीगुरू समस्त शिष्यांसहित । स्नान करितां गंगेंत । आला तेथें विप्र एक ॥९४॥
कुक्षिव्यथा असे बहुत । तटाकीं असे लोळत । उदरव्यथा अत्यंत । त्यजूं पाहे प्राण देखा ॥९५॥
पोटव्यथा बहु त्यासी । नित्य करी तो उपवासासी । भोजन केलिया दु:ख ऐसी । प्राणांतिक होतसे ॥९६॥
याकारणें द्विजवर । सदा करी फलाहार । अन्नासी त्यासी असे वैर । जेवितां प्राण त्यजूं पाहे ॥९७॥
पक्षमासां भोजन करी । व्यथा उठे त्याचे उदरीं । ऐसा किती दिवसवरी । कष्टत होता तो द्विज ॥९८॥
पूर्व दिवसीं तया ग्रामीं । आला सण महानवमी । जेविला मिष्टान्न मनोधर्मी । मासें एक पारणें केलें ॥९९॥
भोजन केलें अन्न बहुत । त्याणें पोट असे दुखत । गंगातीरीं असे लोळत । प्राण त्वरित त्यजूं पाहे ॥१००॥
दु:ख करी द्विज अपार । म्हणे गंगेंत त्यजीन शरीर । नको आतां संसार । पापरुपें वर्तत ॥१॥
अन्न प्राण अन्न जीवन । कवण असेल अन्नावीण । अन्न वैरी झालें जाण । मरण बरवें आतां मज ॥२॥
मनीं निर्धार करोनि । गंगाप्रवेश करीन म्हणोनि । पोटीं पाषाण बांधोनि । गंगेमध्यें निघाला ॥३॥
मनीं स्मरे कर्पूरगौर । उपजलों आपण भूमिभार । केले नाहीं परोपकार । अन्नदानादिक देखा ॥४॥
न करीं पुण्य इह जन्मांत । जन्मांतरीं पूर्वी शत । पुण्यफळ असे दिसत । मग हे कष्ट भोगीतसें ॥६॥
अपूर्ती पूजा ईश्वराची । केली असेल निंदा गुरुची । अवज्ञा केली मातापितयांची । मग हे कष्ट भोगीतसें ॥७॥
अथवा पूर्वजन्मीं आपण । केलें असेल द्विजधिक्कारण । अतिथि आलिया न घालीं अन्न । वैश्वदेवसमयासी ॥८॥
अथवा मारिलें वोवरांसी । अग्नि घातला रानासी । वेगळें सांडूनि जनकजननींसी । स्त्रियेसहित मी होतों ॥९॥
मातापिता त्यजोनियां । असों सुखें जेवूनियां । पूर्वार्जवापासोनियां । मग हे कष्ट भोगीतसें ॥११०॥
ऐसीं पापें आठवीत । विप्र जातो गंगेंत । तंव देखिलें श्रीगुरुनाथें । म्हणती बोलावा ब्राह्मणासी ॥११॥
आणा आणा त्या ब्राह्मणासी । प्राण त्यजितो कां सुखेसीं । आत्महत्या महादोषी । पुसों कवण कवणाचा ॥१२॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । गेले शिष्य धांवोनि । द्विजवरातें काढोनि । आणिलें श्रीगुरुसन्मुख ॥१३॥
अनाथासी कल्पतरु । दु:खिष्टासी कृपासागरू । पुसतसे श्रीगुरू । तया दु:खिष्ट विप्रासी ॥१४॥
श्रीगुरू म्हणती तयासी । प्राण कां गा त्यजूं पाहसी । आत्महत्या महादोषी । काय वृत्तांत सांग आम्हां ॥१५॥
विप्र म्हणे गा यतिराया । काय कराल पुसोनियां । उपजोनि जन्म वायां । भूमिभार जाहलों असें ॥१६॥
मास-पक्षां भोजन करितों । उदरव्यथेनें कष्टतों । साहूं न शकें प्राण देतों । काय सांगूं स्वामिया ॥१७॥
आपणासी अन्न वैरी असतां । केवीं वांचावें गुरुनाथा । शरीर सर्व अन्नगता । केवीं वांचूं जगद्गुरु ॥१८॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । तुझी व्यथा गेली परियेसीं । औषध असे आम्हांपासीं । क्षण एकें सांगों तुज ॥१९॥
संशय न धरीं आतां मनीं । भिऊं नको अंत:करणीं । व्याधि गेली पळोनि । भोजन करी धणीवरी ॥१२०॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । स्थिर झाला अंत:करणीं । माथा ठेवूनि श्रीगुरुचरणीं । नमन केलें तया वेळीं ॥२१॥
इतुकिया अवसरीं । तया ग्रामीचा अधिकारी । विप्र एक अवधारी । आला गंगास्नानासी ॥२२॥
तंव देखिलें श्रीगुरुसी । येऊनि लागला चरणांसी । नमन केलें भक्तीसीं । मनोवाक्कायकर्मे ॥२३॥
आश्वासोनि तये वेळीं । पुसती श्रीगुरू स्तोममौळी । कवण नाम कवण स्थळीं । वास म्हणती तयासी ॥२४॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । सांगतसे तो ब्राह्मण । गोत्र आपलें कौंडिण्य । आपस्तंब शाखेसीं ॥२५॥
नाम मज 'सायंदेव' असे । वास-स्थळ आपलें 'कडगंची'स । आलों असे उदरपूर्तीस । सेवा करितों यवनाची ॥२६॥
अधिकारपणें या ग्रामीं । वसों संवत्सर ऐका स्वामी । धन्य धन्य झालों आम्ही । तुमचे दर्शनमात्रेसीं ॥२७॥
तूं तारक विश्वासी । दर्शन दिधलें आम्हांसी । कृतार्थ झालों भरंवसीं । जन्मांतरींचे दोष गेले ॥२८॥
तुझा अनुग्रह होय ज्यासी । तरेल या भवार्णवासी । अप्रयत्नें आम्हांसी । दर्शन दिधलें स्वामिया ॥२९॥
श्लोक ॥ गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा । पापं तापं च दैन्यं च हरेच्छ्रीगुरुदर्शनम् ॥१३०॥
टीका ॥ गंगा देखितांचि पापें जाती । चंद्रदर्शनें ताप नासती । कल्पतरुची ऐसी गति । दैन्यवेगळा करी जाण ॥३१॥
तैसे नव्हती तुमचे दर्शनगुण । पाप-ताप दैन्यहरण । देखिले आजि तुमचे चरण । चतुर्वर्गफल पावलों ॥३२॥
ऐशी स्तुति करुनि । पुनरपि लागला श्रीगुरुचरणीं । जगद्गुरु अश्वासोनि । निरोप देती तया वेळीं ॥३३॥
श्रीगुरू म्हणती तयासी । आमुचें वाक्य परियेसीं । जठरव्यथा ब्राह्मणासी । प्राणत्याग करीतसे ॥३४॥
उपशमन याचे व्याधीसी । सांगों औषध तुम्हांसी । नेवोनि आपुले मंदिरासी । भोजन करवीं मिष्टान्न ॥३५॥
अन्न जेवितां याची व्यथा । व्याधि न राहे सर्वथा । घेऊनि जावें आतां त्वरिता । क्षुधाक्रांत विप्र असे ॥३६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे कर जोडून । प्राणत्याग करितां भोजन । या ब्राह्मणासी होतसे ॥३७॥
जेविला काल मासें एका । त्याणें प्राण जातो ऐका । अन्न देतां आम्हांसी देखा । ब्रह्महत्या त्वरित घडेल ॥३८॥
श्रीगुरु म्हणती सायंदेवासी । आम्ही औषधी देतों यासी । अपूपान्न-माषेसीं । क्षीरमिश्रित परमान्न ॥३९॥
अन्न जेवितां त्वरितेसीं । व्याधि जाईल परियेसीं । संशय न धरीं तूं मानसीं । त्वरित न्यावें गृहासी ॥१४०॥

अंगीकारोनि श्रीगुरुनाथ । निरोप देती हो कां त्वरित । सिद्ध म्हणे ऐक मात । नामधारक शिष्योत्तमा ॥४२॥
आम्ही होतों तये वेळीं । समवेत-शिष्य सकळीं । जठरव्यथेचा विप्र जवळी ; । श्रीगुरू गेले भिक्षेसी ॥४३॥
विचित्र झालें त्याचे घरीं । पूजा केली परोपरी । पतिव्रता त्याची नारी । 'जाखाई' म्हणिजे परियेसा ॥४४॥
पूजा करिती श्रीगुरुसी । षोडशोपचारें परियेसीं । तेणेंचि रीतीं आम्हांसी । शिष्यां सकळिकां वंदिलें ॥४५॥
श्रीगुरुपूजा-विधान । विचित्र केलें अतिगहन । मंडळ केलें रक्तवर्ण । एकेकासी पृथक्-पृथक् ॥४६॥
पद्म रचूनि अष्टदळी । नानापरीचे रंगमाळी । पंचवर्ण चित्रमाळी । रचिली तियें परियेसा ॥४७॥
चित्रासन श्रीगुरुसी । तेणेंचिपरी सकळिकांसी । मंडळार्चनविधीसीं । करिती पुष्पगंधाक्षता ॥४८॥
संकल्पोनि विधीसीं । नमन केलें अष्टांगेसीं । माथा ठेवूनि चरणीं, न्यासी । पाद सर्वही अष्टांगीं ॥४९॥
षोडशोपचार विधीसीं । पंचामृतादि परियेसीं । रुद्रसूक्तमंत्रेसीं । चरण स्नापिले तये वेळीं ॥१५०॥
श्रीगुरुचरणीं अतिहर्षी । पूजा करीत षोडशी । तया विप्रा ज्ञान कैसी । चरणतीर्थ धरिता झाला ॥५१॥
तया चरणतीर्थासी । पूजा करीत भक्तीसीं । गीतवाद्यें आनंदेसीं । करी आरति नीरांजन ॥५२॥
अनुक्रमें श्रीगुरुपूजा । करिता झाला विधिवोजा । पुनरपि षोडशोपचारें पूजा । करीतसे भक्तीनें ॥५३॥
अक्षय वाणें आरति । श्रीगुरुसी ओंवाळिती । मंत्रघोष अतिभक्तीं । पुष्पांजळी करिता झाला ॥५४॥
अनेकपरी गायन करी । नमन करी प्रीतिकरीं । पतिव्रता असे नारी । पूजा करिती उभयवर्ग ॥५५॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । पूजा केली परियेसीं । तेणेंचि विधीं शिष्यांसी । आम्हां समस्तांसी वंदिलें ॥५६॥
संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । वर देती अतिप्रीतीं । तुझी संतती होईल ख्याति । गुरुभक्ति वंशोवंशीं ॥५७॥
तूं जाणसी गुरुचा वास । अभिवृद्धि होय वंशोवंश । पुत्रपौत्रीं नांदाल हर्षी । गुरुभक्ति येणेंपरी ॥५८॥
ऐसें बोलोनि द्विजासी । आशीर्वचन देती अतिहर्षी । नमन करुनि श्रीगुरुसी । ठाय घातले तये वेळीं ॥५९॥
नानापरीचें पक्वान्न । अपूपादि माषान्न । अष्टविध परमान्न । शर्करासहित निवेदिलें ॥१६०॥
शाक पाक नानापरी वाढताति सविस्तारीं । भोजन करिती प्रीतिकरीं । श्रीगुरुमूर्ति परियेसा ॥६१॥
जठरव्यथेच्या ब्राह्मणें । भोजन केलें परिपूर्ण । व्याधि गेली तत्क्षण । श्रीगुरूचे कृपादृष्टीनें ॥६२॥
परीस लागतां लोहासी । सुवर्ण होय परियेसीं । दर्शन होतां श्रीगुरुसी । व्याधि कैंची सांग मज ॥६३॥
उदय जाहलिया दिनकरासी । संहार होतो अंधकारासी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । दैन्य कैंचें तया घरीं ॥६४॥
ऐसेपरी श्रीगुरुनाथें । भोजन केलें शिष्यासहित । आनंद झाला तेथें बहुत । विस्मय करिती सकळै जन ॥६५॥
अभिनव करिती सकळ जन । द्विजासी वैरी होतें अन्न । औषध झालें तेंचि अन्न । व्याधि गेली म्हणताति ॥६६॥
सिद्ध म्हणे नामधारकास । श्रीगुरुकृपा होय ज्यास । जन्मांतरींचे जाती दोष । व्याधि कैंची त्याचे देहीं ॥६७॥
गंगाधराचा नंदन । सरस्वती सांगें विस्तारोन । गुरुचरित्र कामधेनु । ऐका श्रोते एकचित्तें ॥६८॥
जे ऐकती भक्तीनें । व्याधि नसती त्यांचे भुवना । अखिल सौख्य पावती जाणा । सत्यं सत्यं पुनः सत्यं ॥६९॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे करंजनगराभिगमनं तथा विप्रोदरव्यथानिरसनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥१३॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओंवीसंख्या १६९) ॥ ॐ ॥

<poem>
श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
नामधारक शिष्यराणा । लागे सिद्धाचिया चरणां । करसंपुट जोडूनि जाणा । विनवीतसे परियेसा ॥१॥
जय जया सिद्ध मुनी । तूं तारक या भवार्णी । सांगितलें ज्ञान प्रकाशोनि । स्थिर जाहलें मन माझें ॥२॥
गुरुचरित्रकथामृत । सेवितां तृष्णा अधिक होत । शमन करणार समर्थ । तूंचि एक कृपानिधि ॥३॥
गुरुचरित्र कामधेनु । सांगितलें तुम्हीं विस्तारोनु । तृप्त नव्हे माझें मनु । आणखी अपेक्षा होतसे ॥४॥
क्षुधेंकरुनि पीडिलें ढोर । जैसें पावे तृणबिढार । त्यातें होय मनोहर । नवचे तेथोनि परतोनि ॥५॥
एखादा न देखे तक्र स्वप्नीं त्यासी मिळे क्षीरबरणी । नोहे मन त्याचे धणी । केवीं सोडी तो ठाव ॥६॥
तैसा आपण स्वल्पज्ञानी नेणत होतों गुरु-निर्वाणी । अविद्यामाया वेष्टोनि । कष्टत होतों स्वामिया ॥७॥
अज्ञानतिमिररजनीसी । ज्योतिस्वरुप तूंचि होसी । प्रकाश केलें गा आम्हांसी । निजस्वरुप श्रीगुरुचें ॥८॥
तुवां केले उपकारासी । उत्तीर्ण काय होऊं सरसी । कल्पवृक्ष दिल्हेयासी । प्रत्युपकार काय द्यावा ॥९॥
एखादा देतां चिंतामणी । त्यासी उपकार काय धरणीं । नाहीं दिधलें न ऐकों कानीं । कृपामूर्ति सिद्धराया ॥१०॥
ऐशा तुझिया उपकारासी । उत्तीर्ण नोहे जन्मोजन्मेसीं । म्हणोनि लागतसे चरणांसी । एकोभावेंकरोनियां ॥११॥
स्वामीनीं निरोपिला धर्म-अर्थ । अधिक झाला मज स्वार्थ । उपजला मनीं परमार्थ । गुरुसी भजावें निरंतर ॥१२॥
प्रयागीं असतां गुरुमूर्ति । माधवसरस्वतीस दीक्षा देती । पुढें काय वर्तली स्थिति । आम्हांप्रती विस्तारावें ॥१३॥
ऐकोनि शिष्याचें वचन । सिद्धमुनि संतोषोन । मस्तकीं हस्त ठेवून । आश्वासिती तया वेळीं ॥१४॥
धन्य धन्य शिष्या सगुण । तुज लाधले श्रीगुरुचरण । संसार तारक भवार्ण । तूंचि एक परियेसा ॥१५॥
तुवां ओळखिली श्रीगुरुची सोय । म्हणोनि पुससी भक्तिभावें । संतोष होतो आनंदमय । तुझ्या प्रश्नेंकरुनियां ॥१६॥
सांगेन ऐक एकचित्तें । चरित्र गुरुचें विख्यातें । उपदेश देऊनि माधवातें । होते क्वचित्काळ तेथेंचि ॥१७॥
असतां तेथें वर्तमानीं । प्रख्यात झाली महिमा सगुणी । शिष्य झाले अपार मुनि । मुख्य माधवसरस्वती ॥१८॥
तया शिष्यांचीं नामें सांगतां । विस्तार होईल बहु कथा । प्रख्यात असती नामें सात । सांगेन ऐक एकचित्तें ॥१९॥
बाळसरस्वती कृष्णसरस्वती । उपेंद्र-माधवसरस्वती । पांचवा असे आणीक यति । सदानंदसरस्वती देखा ॥२०॥
ज्ञानज्योतिसरस्वती एक । सातवा सिद्ध आपण ऐक । अपार होते शिष्य आणिक । एकाहूनि एक श्रेष्ठ पैं ॥२१॥
त्या शिष्यांसमवेत । श्रीगुरु निघाले दक्षिणपंथ । समस्त क्षेत्रें पावन करित । आले पुन्हा कारंजनगरासी ॥२२॥
भेटी झाली जनकजननीं । येवोनि लागताति चरणीं । चतुर्वर्ग भ्राते भगिनी । समस्त भेटती स्वामिया ॥२३॥
देखानियां श्रीगुरुमूर्तीसी नगरलोक अत्यंत हर्षी । आले समस्त भेटीसी । पूजा करिती परोपरी ॥२४॥
घरोघरीं श्रीगुरुसी । पाचारिती भिक्षेसी । जाहले रुपें बहुवसी । घरोघरीं पूजा घेती ॥२५॥
समस्त लोक विस्मय करिती । अवतार हा श्रीविष्णु निश्चितीं । वेषधारी दिसतो यति । परमपुरुष होय जाणा ॥२६॥
यातें नर जे म्हणती । ते नर जाती नरकाप्रती । कार्याकारण अवतार होती । ब्रह्माविष्णुमहेश्वर ॥२७॥
जननीजनक येणें रीतीं । पूजा करिती भावभक्तीं । श्रीगुरू झाले श्रीपादयति । जातिस्मृति जननीसी ॥२८॥
देखोनि जननी तये वेळीं । माथा ठेवी चरणकमळीं । सत्यसंकल्प चंद्रमौळी । प्रदोषपूजा आली फळा ॥२९॥
पतीस सांगे तया वेळीं । पूर्वजन्माचें चरित्र सकळीं । विश्ववंद्य पुत्र प्रबळी । व्हावा म्हणोनि आराधिलें म्यां ॥३०॥
याचि श्रीपाद-ईश्वराचें । पूजन केलें मनोवाचें । प्रसिद्ध झालें जन्म आमुचें । साफल्य केलें परियेसा ॥३१॥
म्हणोनि नमिती दोघेजणीं । विनविताति कर जोडूनि । उद्धरावें या भवार्णी । जगन्नाथा यतिराया ॥३२॥
श्रीगुरू म्हणती तयांसी । एकादे काळीं परियेसीं । पुत्र होय संन्यासी । उद्धरील कुळें बेचाळीस ॥३३॥
त्यासी शाश्वत ब्रह्मलोक । अचळ पद असे देख । त्याचे कुळीं उपजतां आणिक । त्यासीही ब्रह्मपद परियेसा ॥३४॥
यमाचे दुःखें भयाभीत । नोहे त्याचे पितृसंततींत । पूर्वज जरी नरकीं असत । त्यांसी शाश्वत ब्रह्मपद ॥३५॥
याकारणें आम्हीं देखा । घेतला आश्रम विशेखा । तुम्हां नाहीं यमाची शंका । ब्रह्मपद असे सत्य ॥३६॥
ऐसें सांगोनि तयांसी । आश्वासीतसे बहुवसी । तुमचे पुत्र शतायुषी । अष्टैश्वर्ये नांदती ॥३७॥
त्यांचे पुत्रपौत्र तुम्ही । पहाल सुखें तुमचे नयनीं । पावाल क्षेम काशीभुवनीं । अंतकाळीं परियेसा ॥३८॥
मुक्तिस्थान काशीपुर । प्रख्यात असे वेदशास्त्र । न करा मनीं चिंता मात्र । म्हणोनि सांगती तये वेळीं ॥३९॥
त्यांची कन्या असे एक । नाम तिचें 'रत्नाई' विशेष । श्रीगुरुसी नमूनि ऐक । विनवीतसे परियेसा ॥४०॥
विनवीतसे परोपरी । स्वामी मातें तारीं तारीं । बुडोनि जात्यें भवसागरीं । संसारमाया वेष्टोनियां ॥४१॥
संसार-तापत्रयासी । आपण भीतसें परियेसीं । निर्लिप्त करीं गा आम्हांसी । आपण तपासी जाईन ॥४२॥
ऐकोनि तियेचें वचन । श्रीगुरु निरोपिताति आपण । स्त्रियांसी पतिसेवाचरण । तेंचि तप परियेसा ॥४३॥
येणें या भावार्णवासी । कडे पडती परियेसीं । जैसा भाव असे ज्यासी । तैसें होईल परियेसा ॥४४॥
उतरावया पैल पार । स्त्रियांसी असे तो भ्रतार । मनें करोनि निर्धार । भजा पुरुष शिवसमानी ॥४५॥
त्यासी होय उद्धार गति । वेदपुराणें वाखाणिती । अंतःकरणीं न करीं खंती । तूतें गति होईल जाण ॥४६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे कर जोडून । श्रीगुरुमूर्ति ब्रह्मज्ञान । विनवीतसें अवधारीं ॥४७॥
तूं जाणसी भविष्यभूत । कैसें मातें उपदेशीत । माझें प्रालब्ध कवणगत । विस्तारावें मजप्रति ॥४८॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । तुझी वासना असे तपासी । संचित पाप असे तुजसी । भोगणें असे परियेसा ॥४९॥
पूर्वजन्मीं तूं परियेसीं । चरणीं लाथिलें धेनूसी । शेजारी स्त्रीपुरुषांसी । विरोधें लाविला कलह जाणा ॥५०॥
तया दोषास्तव देखा । तूतें बाधा असे अनेका । गायत्रीसी लाथिलें ऐका । तूं सर्वांगीं कुष्ठी होसील ॥५१॥
विरोध केला स्त्रीपुरुषांसीं । तुझा पुरुष होईल तापसी । तुतें त्यजील भरंवसी । अर्जित तुझें ऐसें असे ॥५२॥
ऐकोनि दुःख करी बहुत । श्रीगुरुचरणीं असे लोळत । मज उद्धारावें गुरुनाथा त्वरित । म्हणोनि चरणीं लागली ॥५३॥
श्रीगुरू म्हणती ऐक बाळे । क्वचित्काळ असाल भले । अपरवयसा होतांचि काळें । पति तुझा यति होये ॥५४॥
तदनंतर तुझा देह । कुष्ठी होईल अवेव । भोगूनि स्वदेहीं वय । मग होईल तुज गति ॥५५॥
नासतां तुझा देह जाण । भेटी होईल आमुचे चरण । तुझें पाप होईल दहन । सांगेन क्षेत्र ऐक पां ॥५६॥
भीमातीर दक्षिण देशीं । असे तीर्थ पापविनाशी । तेथें जाय तूं भरंवसीं । अवस्था तुज घडलियावरी ॥५७॥
या भूमंडळीं विख्यात । तीर्थ असे अति समर्थ । गंधर्वपुर असे ख्यात । अमरजासंगम प्रसिद्ध जाण ॥५८॥
ऐसें सांगोनि तियेसी । श्रीगुरू निघाले दक्षिण देशीं । त्र्यंबक-क्षेत्रासी । आले, गौतमी-उद्भव जेथें ॥५९॥
शिष्यांसहित गुरुमूर्ति । आले नाशिकक्षेत्राप्रती । तीर्थमहिमा असे ख्याति । पुराणांतरीं परियेसा ॥६०॥
तीर्थमहिमा सांगतां । विस्तार होईल बहु कथा । संक्षेपमार्गे तुज आतां । सांगतसें परियेसीं ॥६१॥
त्या गौतमीची महिमा । सांगतां अपार असे आम्हां । बहिरार्णव-उदक उगमा । ब्रह्मांडाव्यतिरिक्त ॥६२॥
जटामुकुटीं तीर्थेश्वर । धरिली होती प्रीतिकर । मिळोनि समस्त ऋषीश्वर । उपाय केला परियेसा ॥६३॥
ब्रह्मऋषि गौतम देखा । तपस्वी असे विशेषा । व्रीहि पेरिले वृत्तीं ऐका । अनुष्ठानस्थानाजवळी ॥६४॥
पूर्वी मुनी सकळी । नित्य पेरुनि पिकविती साळी । ऐसे त्यांचे मंत्र बळी । महापुण्यपुरुष असती ॥६५॥
समस्त ऋषि मिळोनि । विचार करिती आपुले मनीं । ऋषिगौतम महामुनी । सर्वेश्वराचा मुख्य दास ॥६६॥
त्यासी घालितां सांकडें । गंगा आणील आपुलें चाडें । समस्तां आम्हां पुण्य घडे । गंगास्नानें भूमंडळीं ॥६७॥
श्लोक ॥ या गतिर्योगयुक्तानां मुनीनामूर्ध्वरेतसाम् । सा गतिः सर्वजंतूनां गौतमीतीरवासिनाम् ॥६८॥

याकारणें गौतमीसीं । आणावें यत्नें भूमंडळासी । सांकडें घालितां गौतमासी । आणितां गंगा आम्हां लाभ ॥७०॥
म्हणोनि रचिली माव एक । दुर्वेची गाय सवत्सक । करोनि पाठविली ऐक । गौतमाचे ब्रीहिभक्षणासी ॥७१॥
ऋषि होता अनुष्ठानीं । देखिलें धेनूसी नयनीं । निवारावया तत्क्षणीं । दर्भ पवित्र सोडिलें ॥७२॥
तेचि कुश जाहलें शस्त्र । धेनूसी लागलें जैसें वज्रास्त्र । पंचत्व पावली त्वरित । घडली हत्या गौतमासी ॥७३॥
मिळोनि समस्त ऋषिजन । प्रायश्चित्त देती जाण । गंगा भूमंडळीं आण । याविणें तुम्हां नाहीं शुद्धि ॥७४॥
याकारणें गौतमऋषीं । तप केलें सहस्त्र वर्षी । प्रसन्न झाला व्योमकेशी । वर माग म्हणितलें ॥७५॥
गौतम म्हणे सर्वेश्वरा । तुवां देशील मज वरा । उद्धरावया सचराचरा । द्यावी गंगा भूमंडळासी ॥७६॥
गौतमाचे विनंतीसी । निरोप दिधला गंगेसी । घेवोनि आला भूमंडळासी । पापक्षालनार्थ मनुष्यांचे ॥७७॥
ऐसी गंगाभागीरथी । कवणा वर्णावया सामर्थ्य । याचि कारणें श्रीगुरुनाथ । आले ऐक नामधारका ॥७८॥
ऐशी गौतमीतटाकयात्रा । श्रीगुरू आपण आचरीत । पुढें मागुती लोकानुग्रहार्थ । आपण हिंडे परियेसा ॥७९॥
तटाकयात्रा करितां देख । आले श्रीगुरु मंजरिका । तेथें होता मुनि एक । विख्यात 'माधवारण्य' ॥८०॥
सदा मानसपूजा त्यासी । नरसिंहमूर्ति परियेसीं । देखता झाला श्रीगुरुसी । मानसमूर्ति जैसी देखे ॥८१॥
विस्मित होऊनि मानसीं । नमिता झाला श्रीगुरुमूर्तीसी । स्तोत्र करीं बहुवसी । अतिभक्तीकरुनियां ॥८२॥
श्लोक ॥ यद्दिव्यपादद्वयमेवसाक्षाद् , अधिष्ठित देवनदीसमीपे । य उत्तरे तीरनिवासिरामो, लक्ष्मीपतिस्त्वं निवसन्स नित्यम् ॥८३॥
ओंव्या ॥ येणेंपरी श्रीगुरुसी । विनवी माधवारण्य हर्षी । श्रीगुरू म्हणती संतोषीं । तया माधवारण्यासी ॥८४॥
श्लोक ॥ अत्यंतमार्गस्थितिमार्गरुपं, अत्यंतयोगादधिकारतत्त्वम् । मार्गं च मार्गं च विचिन्वतो मे, मार्गोदयं माधव दर्शये ते ॥८५॥
ओंव्या ॥ ऐसें श्रीगुरू तयासी आश्वासोनि म्हणती हर्षी । निजस्वरुप तयासी । दाविते झाले परियेसा ॥८६॥
श्रीगुरुचें स्वरुप देखोनि । संतोषी झाला तो मुनि । विनवीतसे कर जोडूनि । नानापरी स्तुति करी ॥८७॥
जय जया जगद्‌गुरू । त्रयमूर्तीचा अवतारू । लोकां दिससी नरु । परमपुरुषा जगज्ज्योति ॥८८॥
तूं तारक विश्वासी । म्हणोनि भूमीं अवतरलासी । कृतार्थ केलें आम्हांसी । दर्शन दिधलें चरण आपुले ॥८९॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । स्तुति करीं तो तापसी । संतोष होऊन अति हर्षी । आश्वासिती तया वेळीं ॥९०॥
म्हणती श्रीगुरू तयासी । सिद्धि झाली तुझ्या मंत्रासी । तुज सद्गति भरंवसीं । ब्रह्मलोक प्राप्त होय ॥९१॥
नित्यपूजा तूं मानसीं । करिसी नृसिंहमूर्तीसी । प्रत्यक्ष होईल परियेसीं । न करीं संशय मनांत ॥९२॥
ऐसें सांगोनि तयासी । श्रीगुरू निघाले परियेसीं । आले वासरब्रह्मेश्वरासी । गंगातीर महाक्षेत्र ॥९३॥
तया गंगातटाकांत । श्रीगुरू समस्त शिष्यांसहित । स्नान करितां गंगेंत । आला तेथें विप्र एक ॥९४॥
कुक्षिव्यथा असे बहुत । तटाकीं असे लोळत । उदरव्यथा अत्यंत । त्यजूं पाहे प्राण देखा ॥९५॥
पोटव्यथा बहु त्यासी । नित्य करी तो उपवासासी । भोजन केलिया दुःख ऐसी । प्राणांतिक होतसे ॥९६॥
याकारणें द्विजवर । सदा करी फलाहार । अन्नासी त्यासी असे वैर । जेवितां प्राण त्यजूं पाहे ॥९७॥
पक्षमासां भोजन करी । व्यथा उठे त्याचे उदरीं । ऐसा किती दिवसवरी । कष्टत होता तो द्विज ॥९८॥
पूर्व दिवसीं तया ग्रामीं । आला सण महानवमी । जेविला मिष्टान्न मनोधर्मी । मासें एक पारणें केलें ॥९९॥
भोजन केलें अन्न बहुत । त्याणें पोट असे दुखत । गंगातीरीं असे लोळत । प्राण त्वरित त्यजूं पाहे ॥१००॥
दुःख करी द्विज अपार । म्हणे गंगेंत त्यजीन शरीर । नको आतां संसार । पापरुपें वर्तत ॥१॥
अन्न प्राण अन्न जीवन । कवण असेल अन्नावीण । अन्न वैरी झालें जाण । मरण बरवें आतां मज ॥२॥
मनीं निर्धार करोनि । गंगाप्रवेश करीन म्हणोनि । पोटीं पाषाण बांधोनि । गंगेमध्यें निघाला ॥३॥
मनीं स्मरे कर्पूरगौर । उपजलों आपण भूमिभार । केले नाहीं परोपकार । अन्नदानादिक देखा ॥४॥
न करीं पुण्य इह जन्मांत । जन्मांतरीं पूर्वी शत । पुण्यफळ असे दिसत । मग हे कष्ट भोगीतसें ॥६॥
अपूर्ती पूजा ईश्वराची । केली असेल निंदा गुरुची । अवज्ञा केली मातापितयांची । मग हे कष्ट भोगीतसें ॥७॥
अथवा पूर्वजन्मीं आपण । केलें असेल द्विजधिक्कारण । अतिथि आलिया न घालीं अन्न । वैश्वदेवसमयासी ॥८॥
अथवा मारिलें वोवरांसी । अग्नि घातला रानासी । वेगळें सांडूनि जनकजननींसी । स्त्रियेसहित मी होतों ॥९॥
मातापिता त्यजोनियां । असों सुखें जेवूनियां । पूर्वार्जवापासोनियां । मग हे कष्ट भोगीतसें ॥११०॥
ऐसीं पापें आठवीत । विप्र जातो गंगेंत । तंव देखिलें श्रीगुरुनाथें । म्हणती बोलावा ब्राह्मणासी ॥११॥
आणा आणा त्या ब्राह्मणासी । प्राण त्यजितो कां सुखेसीं । आत्महत्या महादोषी । पुसों कवण कवणाचा ॥१२॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । गेले शिष्य धांवोनि । द्विजवरातें काढोनि । आणिलें श्रीगुरुसन्मुख ॥१३॥
अनाथासी कल्पतरु । दुःखिष्टासी कृपासागरू । पुसतसे श्रीगुरू । तया दुःखिष्ट विप्रासी ॥१४॥
श्रीगुरू म्हणती तयासी । प्राण कां गा त्यजूं पाहसी । आत्महत्या महादोषी । काय वृत्तांत सांग आम्हां ॥१५॥
विप्र म्हणे गा यतिराया । काय कराल पुसोनियां । उपजोनि जन्म वायां । भूमिभार जाहलों असें ॥१६॥
मास-पक्षां भोजन करितों । उदरव्यथेनें कष्टतों । साहूं न शकें प्राण देतों । काय सांगूं स्वामिया ॥१७॥
आपणासी अन्न वैरी असतां । केवीं वांचावें गुरुनाथा । शरीर सर्व अन्नगता । केवीं वांचूं जगद्‌गुरु ॥१८॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । तुझी व्यथा गेली परियेसीं । औषध असे आम्हांपासीं । क्षण एकें सांगों तुज ॥१९॥
संशय न धरीं आतां मनीं । भिऊं नको अंतःकरणीं । व्याधि गेली पळोनि । भोजन करी धणीवरी ॥१२०॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । स्थिर झाला अंतःकरणीं । माथा ठेवूनि श्रीगुरुचरणीं । नमन केलें तया वेळीं ॥२१॥
इतुकिया अवसरीं । तया ग्रामींचा अधिकारी । विप्र एक अवधारीं । आला गंगास्नानासी ॥२२॥
तंव देखिलें श्रीगुरुसी । येऊनि लागला चरणांसी । नमन केलें भक्तीसीं । मनोवाक्कायकर्मे ॥२३॥
आश्वासोनि तये वेळीं । पुसती श्रीगुरू स्तोममौळी । कवण नाम कवण स्थळीं । वास म्हणती तयासी ॥२४॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । सांगतसे तो ब्राह्मण । गोत्र आपलें कौंडिण्य । आपस्तंब शाखेसीं ॥२५॥
नाम मज 'सायंदेव' असे । वास-स्थळ आपलें 'कडगंची'स । आलों असे उदरपूर्तीस । सेवा करितों यवनाची ॥२६॥
अधिकारपणें या ग्रामीं । वसों संवत्सर ऐका स्वामी । धन्य धन्य झालों आम्ही । तुमचे दर्शनमात्रेसीं ॥२७॥
तूं तारक विश्वासी । दर्शन दिधलें आम्हांसी । कृतार्थ झालों भरंवसीं । जन्मांतरीचे दोष गेले ॥२८॥
तुझा अनुग्रह होय ज्यासी । तरेल या भवार्णवासी । अप्रयत्नें आम्हांसी । दर्शन दिधलें स्वामिया ॥२९॥
श्लोक ॥ गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा । पापं तापं च दैन्यं च हरेच्छ्रीगुरुदर्शनम् ॥१३०॥
टीका ॥ गंगा देखितांचि पापें जाती । चंद्रदर्शनें ताप नासती । कल्पतरुची ऐसी गति । दैन्यवेगळा करी जाण ॥३१॥
तैसे नव्हती तुमचे दर्शनगुण । पाप-ताप दैन्यहरण । देखिले आजि तुमचे चरण । चतुर्वर्गफल पावलों ॥३२॥
ऐशी स्तुति करुनि । पुनरपि लागला श्रीगुरुचरणीं । जगद्‌गुरु अश्वासोनि । निरोप देती तया वेळीं ॥३३॥
श्रीगुरू म्हणती तयासी । आमुचें वाक्य परियेसीं । जठरव्यथा ब्राह्मणासी । प्राणत्याग करीतसे ॥३४॥
उपशमन याचे व्याधीसी । सांगों औषध तुम्हांसी । नेवोनि आपुले मंदिरासी । भोजन करवीं मिष्टान्न ॥३५॥
अन्न जेवितां याची व्यथा । व्याधि न राहे सर्वथा । घेऊनि जावें आतां त्वरिता । क्षुधाक्रांत विप्र असे ॥३६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे कर जोडून । प्राणत्याग करितां भोजन । या ब्राह्मणासी होतसे ॥३७॥
जेविला काल मासें एका । त्याणें प्राण जातो ऐका । अन्न देतां आम्हांसी देखा । ब्रह्महत्या त्वरित घडेल ॥३८॥
श्रीगुरु म्हणती सायंदेवासी । आम्ही औषधी देतों यासी । अपूपान्न-माषेसीं । क्षीरमिश्रित परमान्न ॥३९॥
अन्न जेवितां त्वरितेसीं । व्याधि जाईल परियेसीं । संशय न धरीं तूं मानसीं । त्वरित न्यावें गृहासी ॥१४०॥

अंगीकारोनि श्रीगुरुनाथ । निरोप देती हो कां त्वरित । सिद्ध म्हणे ऐक मात । नामधारक शिष्योत्तमा ॥४२॥
आम्ही होतों तये वेळीं । समवेत-शिष्य सकळीं । जठरव्यथेचा विप्र जवळी ; । श्रीगुरू गेले भिक्षेसी ॥४३॥
विचित्र झालें त्याचे घरीं । पूजा केली परोपरी । पतिव्रता त्याची नारी । 'जाखाई' म्हणिजे परियेसा ॥४४॥
पूजा करिती श्रीगुरुसी । षोडशोपचारें परियेसीं । तेणेंचि रीतीं आम्हांसी । शिष्यां सकळिकां वंदिलें ॥४५॥
श्रीगुरुपूजा-विधान । विचित्र केलें अतिगहन । मंडळ केलें रक्तवर्ण । एकेकासी पृथक्-पृथक् ॥४६॥
पद्म रचूनि अष्टदळी । नानापरीचे रंगमाळी । पंचवर्ण चित्रमाळी । रचिली तियें परियेसा ॥४७॥
चित्रासन श्रीगुरुसी । तेणेंचिपरी सकळिकांसी । मंडळार्चनविधीसीं । करिती पुष्पगंधाक्षता ॥४८॥
संकल्पोनि विधीसीं । नमन केलें अष्टांगेसीं । माथा ठेवूनि चरणीं, न्यासी । पाद सर्वही अष्टांगीं ॥४९॥
षोडशोपचार विधीसीं । पंचामृतादि परियेसीं । रुद्रसूक्तमंत्रेसीं । चरण स्नापिले तये वेळीं ॥१५०॥
श्रीगुरुचरणीं अतिहर्षी । पूजा करीत षोडशी । तया विप्रा ज्ञान कैसी । चरणतीर्थ धरिता झाला ॥५१॥
तया चरणतीर्थासी । पूजा करीत भक्तीसीं । गीतवाद्यें आनंदेसीं । करी आरति नीरांजन ॥५२॥
अनुक्रमें श्रीगुरुपूजा । करिता झाला विधिवोजा । पुनरपि षोडशोपचारें पूजा । करीतसे भक्तीनें ॥५३॥
अक्षय वाणें आरति । श्रीगुरुसी ओंवाळिती । मंत्रघोष अतिभक्तीं । पुष्पांजळी करिता झाला ॥५४॥
अनेकपरी गायन करी । नमन करी प्रीतिकरीं । पतिव्रता असे नारी । पूजा करिती उभयवर्ग ॥५५॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । पूजा केली परियेसीं । तेणेंचि विधीं शिष्यांसी । आम्हां समस्तांसी वंदिलें ॥५६॥
संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । वर देती अतिप्रीतीं । तुझी संतती होईल ख्याति । गुरुभक्ति वंशोवंशीं ॥५७॥
तूं जाणसी गुरुचा वास । अभिवृद्धि होय वंशोवंश । पुत्रपौत्रीं नांदाल हर्षी । गुरुभक्ति येणेंपरी ॥५८॥
ऐसें बोलोनि द्विजासी । आशीर्वचन देती अतिहर्षी । नमन करुनि श्रीगुरुसी । ठाय घातले तये वेळीं ॥५९॥
नानापरीचें पक्कवान्न । अपूपादि माषान्न । अष्टविध परमान्न । शर्करासहित निवेदिलें ॥१६०॥
शाक पाक नानापरी वाढताति सविस्तारीं । भोजन करिती प्रीतिकरीं । श्रीगुरुमूर्ति परियेसा ॥६१॥
जठरव्यथेच्या ब्राह्मणें । भोजन केलें परिपूर्ण । व्याधि गेली तत्क्षण । श्रीगुरूचे कृपादृष्टीनें ॥६२॥
परीस लागतां लोहासी । सुवर्ण होय परियेसीं । दर्शन होतां श्रीगुरुसी । व्याधि कैंची सांग मज ॥६३॥
उदय जाहलिया दिनकरासी । संहार होतो अंधकारासी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । दैन्य कैंचें तया घरीं ॥६४॥
ऐसेपरी श्रीगुरुनाथें । भोजन केलें शिष्यासहित । आनंद झाला तेथें बहुत । विस्मय करिती सकळै जन ॥६५॥
अभिनव करिती सकळ जन । द्विजासी वैरी होतें अन्न । औषध झालें तेंचि अन्न । व्याधि गेली म्हणताति ॥६६॥
सिद्ध म्हणे नामधारकास । श्रीगुरुकृपा होय ज्यास । जन्मांतरींचे जाती दोष । व्याधि कैंची त्याचे देहीं ॥६७॥
गंगाधराचा नंदन । सरस्वती सांगें विस्तारोन । गुरुचरित्र कामधेनु । ऐका श्रोते एकचित्तें ॥६८॥
जे ऐकती भक्तीनें । व्याधि नसती त्यांचे भुवना । अखिल सौख्य पावती जाणा । सत्यं सत्यं पुनः सत्यं ॥६९॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे करंजनगराभिगमनं तथा विप्रोदरव्यथानिरसनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥१३॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओवीसंख्या १६९) ॥ ॐ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥नामधारक शिष्य देखा । विनवी सिद्धासी कवतुका । प्रश्न करी अतिविशेखा । एकचित्तें परियेसा ॥१॥जय जया योगीश्वरा । सिद्धमूर्ति ज्ञानसागरा । पुढील चरित्र विस्तारा । ज्ञान होय आम्हांसी ॥२॥उदरव्यथेच्या ब्राह्मणासी । प्रसन्न जाहले कृपेसीं । पुढें कथा वर्तली कैसी । विस्तारावें आम्हांप्रति ॥३॥ऐकोनि शिष्याचें वचन । संतोष करी सिद्ध आपण । गुरुचरित्र कामधेनु जाण । सांगता जाहला विस्तारें ॥४॥ऐक शिष्या शिखामणि । <poem>

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
नामधारक शिष्यराणा । लागे सिद्धाचिया चरणां । करसंपुट जोडूनि जाणा । विनवीतसे परियेसा ॥१॥
जय जया सिद्ध मुनी । तूं तारक या भवार्णी । सांगितलें ज्ञान प्रकाशोनि । स्थिर जाहलें मन माझें ॥२॥
गुरुचरित्रकथामृत । सेवितां तृष्णा अधिक होत । शमन करणार समर्थ । तूंचि एक कृपानिधि ॥३॥
गुरुचरित्र कामधेनु । सांगितलें तुम्हीं विस्तारोनु । तृप्त नव्हे माझें मनु । आणखी अपेक्षा होतसे ॥४॥
क्षुधेंकरुनि पीडिलें ढोर । जैसें पावे तृणबिढार । त्यातें होय मनोहर । नवचे तेथोनि परतोनि ॥५॥
एखादा न देखे तक्र स्वप्नीं त्यासी मिळे क्षीरबरणी । नोहे मन त्याचे धणी । केवीं सोडी तो ठाव ॥६॥
तैसा आपण स्वल्पज्ञानी नेणत होतों गुरु-निर्वाणी । अविद्यामाया वेष्टोनि । कष्टत होतों स्वामिया ॥७॥
अज्ञानतिमिररजनीसी । ज्योतिस्वरुप तूंचि होसी । प्रकाश केलें गा आम्हांसी । निजस्वरुप श्रीगुरुचें ॥८॥
तुवां केले उपकारासी । उत्तीर्ण काय होऊं सरसी । कल्पवृक्ष दिल्हेयासी । प्रत्युपकार काय द्यावा ॥९॥
एखादा देतां चिंतामणी । त्यासी उपकार काय धरणीं । नाहीं दिधलें न ऐकों कानीं । कृपामूर्ति सिद्धराया ॥१०॥
ऐशा तुझिया उपकारासी । उत्तीर्ण नोहे जन्मोजन्मेसीं । म्हणोनि लागतसें चरणांसी । एकोभावेंकरोनियां ॥११॥
स्वामीनीं निरोपिला धर्म-अर्थ । अधिक झाला मज स्वार्थ । उपजला मनीं परमार्थ । गुरुसी भजावें निरंतर ॥१२॥
प्रयागीं असतां गुरुमूर्ति । माधवसरस्वतीस दीक्षा देती । पुढें काय वर्तली स्थिति । आम्हांप्रती विस्तारावें ॥१३॥
ऐकोनि शिष्याचें वचन । सिद्धमुनि संतोषोन । मस्तकीं हस्त ठेवून । आश्वासिती तया वेळीं ॥१४॥
धन्य धन्य शिष्या सगुण । तुज लाधले श्रीगुरुचरण । संसार तारक भवार्ण । तूंचि एक परियेसा ॥१५॥
तुवां ओळखिली श्रीगुरुची सोय । म्हणोनि पुससी भक्तिभावें । संतोष होतो आनंदमय । तुझ्या प्रश्नेंकरुनियां ॥१६॥
सांगेन ऐक एकचित्तें । चरित्र गुरुचें विख्यातें । उपदेश देऊनि माधवातें । होते क्वचित्काळ तेथेंचि ॥१७॥
असतां तेथें वर्तमानीं । प्रख्यात झाली महिमा सगुणी । शिष्य झाले अपार मुनि । मुख्य माधवसरस्वती ॥१८॥
तया शिष्यांचीं नामें सांगतां । विस्तार होईल बहु कथा । प्रख्यात असती नामें सात । सांगेन ऐक एकचित्तें ॥१९॥
बाळसरस्वती कृष्णसरस्वती । उपेंद्र-माधवसरस्वती । पांचवा असे आणीक यति । सदानंदसरस्वती देखा ॥२०॥
ज्ञानज्योतिसरस्वती एक । सातवा सिद्ध आपण ऐक । अपार होते शिष्य आणिक । एकाहूनि एक श्रेष्ठ पैं ॥२१॥
त्या शिष्यांसमवेत । श्रीगुरु निघाले दक्षिणपंथ । समस्त क्षेत्रें पावन करित । आले पुन्हा कारंजनगरासी ॥२२॥
भेटी झाली जनकजननी । येवोनि लागताति चरणीं । चतुर्वर्ग भ्राते भगिनी । समस्त भेटती स्वामिया ॥२३॥
देखानियां श्रीगुरुमूर्तीसी नगरलोक अत्यंत हर्षी । आले समस्त भेटीसी । पूजा करिती परोपरी ॥२४॥
घरोघरीं श्रीगुरुसी । पाचारिती भिक्षेसी । जाहले रुपें बहुवसी । घरोघरीं पूजा घेती ॥२५॥
समस्त लोक विस्मय करिती । अवतार हा श्रीविष्णु निश्चितीं । वेषधारी दिसतो यति । परमपुरुष होय जाणा ॥२६॥
यातें नर जे म्हणती । ते नर जाती नरकाप्रती । कार्याकारण अवतार होती । ब्रह्माविष्णुमहेश्वर ॥२७॥
जननीजनक येणें रीतीं । पूजा करिती भावभक्तीं । श्रीगुरू झाले श्रीपादयति । जातिस्मृति जननीसी ॥२८॥
देखोनि जननी तये वेळीं । माथा ठेवी चरणकमळीं । सत्यसंकल्प चंद्रमौळी । प्रदोषपूजा आली फळा ॥२९॥
पतीस सांगे तया वेळीं । पूर्वजन्माचें चरित्र सकळीं । विश्ववंद्य पुत्र प्रबळी । व्हावा म्हणोनि आराधिलें म्यां ॥३०॥
याचि श्रीपाद-ईश्वराचें । पूजन केलें मनोवाचें । प्रसिद्ध झालें जन्म आमुचें । साफल्य केलें परियेसा ॥३१॥
म्हणोनि नमिती दोघेजणीं । विनविताति कर जोडूनि । उद्धरावें या भवार्णी । जगन्नाथा यतिराया ॥३२॥
श्रीगुरू म्हणती तयांसी । एकादे काळीं परियेसीं । पुत्र होय संन्यासी । उद्धरील कुळें बेचाळीस ॥३३॥
त्यासी शाश्वत ब्रह्मलोक । अचळ पद असे देख । त्याचे कुळीं उपजतां आणिक । त्यासीही ब्रह्मपद परियेसा ॥३४॥
यमाचे दुःखें भयाभीत । नोहे त्याचे पितृसंततींत । पूर्वज जरी नरकीं असत । त्यांसी शाश्वत ब्रह्मपद ॥३५॥
याकारणें आम्हीं देखा । घेतला आश्रम विशेखा । तुम्हां नाहीं यमाची शंका । ब्रह्मपद असे सत्य ॥३६॥
ऐसें सांगोनि तयांसी । आश्वासीतसे बहुवसी । तुमचे पुत्र शतायुषी । अष्टैश्वर्यें नांदती ॥३७॥
त्यांचे पुत्रपौत्र तुम्ही । पहाल सुखें तुमचे नयनीं । पावाल क्षेम काशीभुवनीं । अंतकाळीं परियेसा ॥३८॥
मुक्तिस्थान काशीपुर । प्रख्यात असे वेदशास्त्र । न करा मनीं चिंता मात्र । म्हणोनि सांगती तये वेळीं ॥३९॥
त्यांची कन्या असे एक । नाम तिचें 'रत्नाई' विशेष । श्रीगुरुसी नमूनि ऐक । विनवीतसे परियेसा ॥४०॥
विनवीतसे परोपरी । स्वामी मातें तारीं तारीं । बुडोनि जात्यें भवसागरीं । संसारमाया वेष्टोनियां ॥४१॥
संसार-तापत्रयासी । आपण भीतसें परियेसीं । निर्लिप्त करीं गा आम्हांसी । आपण तपासी जाईन ॥४२॥
ऐकोनि तियेचें वचन । श्रीगुरु निरोपिताति आपण । स्त्रियांसी पतिसेवाचरण । तेंचि तप परियेसा ॥४३॥
येणें या भावार्णवासी । कडे पडती परियेसीं । जैसा भाव असे ज्यासी । तैसें होईल परियेसा ॥४४॥
उतरावया पैल पार । स्त्रियांसी असे तो भ्रतार । मनें करोनि निर्धार । भजा पुरुष शिवसमानी ॥४५॥
त्यासी होय उद्धार गति । वेदपुराणें वाखाणिती । अंतःकरणीं न करीं खंती । तूतें गति होईल जाण ॥४६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे कर जोडून । श्रीगुरुमूर्ति ब्रह्मज्ञान । विनवीतसें अवधारीं ॥४७॥
तूं जाणसी भविष्यभूत । कैसें मातें उपदेशीत । माझें प्रालब्ध कवणगत । विस्तारावें मजप्रति ॥४८॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । तुझी वासना असे तपासी । संचित पाप असे तुजसी । भोगणें असे परियेसा ॥४९॥
पूर्वजन्मीं तूं परियेसीं । चरणीं लाथिलें धेनूसी । शेजारी स्त्रीपुरुषांसी । विरोधें लाविला कलह जाणा ॥५०॥
तया दोषास्तव देखा । तूतें बाधा असे अनेका । गायत्रीसी लाथिलें ऐका । तूं सर्वांगीं कुष्ठी होसील ॥५१॥
विरोध केला स्त्रीपुरुषांसीं । तुझा पुरुष होईल तापसी । तुतें त्यजील भरंवसी । अर्जित तुझें ऐसें असे ॥५२॥
ऐकोनि दुःख करी बहुत । श्रीगुरुचरणीं असे लोळत । मज उद्धारावें गुरुनाथा त्वरित । म्हणोनि चरणीं लागली ॥५३॥
श्रीगुरू म्हणती ऐक बाळे । क्वचित्काळ असाल भले । अपरवयसा होतांचि काळें । पति तुझा यति होये ॥५४॥
तदनंतर तुझा देह । कुष्ठी होईल अवेव । भोगूनि स्वदेहीं वय । मग होईल तुज गति ॥५५॥
नासतां तुझा देह जाण । भेटी होईल आमुचे चरण । तुझें पाप होईल दहन । सांगेन क्षेत्र ऐक पां ॥५६॥
भीमातीर दक्षिण देशीं । असे तीर्थ पापविनाशी । तेथें जाय तूं भरंवसीं । अवस्था तुज घडलियावरी ॥५७॥
या भूमंडळीं विख्यात । तीर्थ असे अति समर्थ । गंधर्वपुर असे ख्यात । अमरजासंगम प्रसिद्ध जाण ॥५८॥
ऐसें सांगोनि तियेसी । श्रीगुरू निघाले दक्षिण देशीं । त्र्यंबक-क्षेत्रासी । आले, गौतमी-उद्भव जेथें ॥५९॥
शिष्यांसहित गुरुमूर्ति । आले नाशिकक्षेत्राप्रती । तीर्थमहिमा असे ख्याति । पुरणांतरीं परियेसा ॥६०॥
तीर्थमहिमा सांगतां । विस्तार होईल बहु कथा । संक्षेपमार्गे तुज आतां । सांगतसें परियेसीं ॥६१॥
त्या गौतमीची महिमा । सांगतां अपार असे आम्हां । बहिराणव-उदक उगमा । ब्रह्मांडाव्यतिरिक्त ॥६२॥
जटामुकुटीं तीर्थेश्वर । धरिली होती प्रीतिकर । मिळोनि समस्त ऋषीश्वर । उपाय केला परियेसा ॥६३॥
ब्रह्मऋषि गौतम देखा । तपस्वी असे विशेषा । व्रीहि पेरिले वृत्तीं ऐका । अनुष्ठानस्थानाजवळी ॥६४॥

समस्त ऋषि मिळोनि । विचार करिती आपुले मनीं । ऋषिगौतम महामुनी । सर्वेश्वराचा मुख्य दास ॥६६॥
त्यासी घालितां सांकडें । गंगा आणील आपुलें चाडें । समस्तां आम्हां पुण्य घडे । गंगास्नानें भूमंडळीं ॥६७॥
श्लोक ॥ या गतिर्योगयुक्तानां मुनीनामूर्ध्वरेतसाम् । सा गतिः सर्वजंतूनां गौतमीतीरवासिनाम् ॥६८॥
टीका ॥ ऊर्ध्वरेत मुनीश्वरांसी । कोटिवर्षे तपस्वियांसी । जे गति होय परियेसीं । ते स्नानमात्रें गौतमीच्या ॥६९॥
याकारणें गौतमीसी । आणावें यत्नें भूमंडळासी । सांकडें घालितां गौतमासी । आणितां गंगा आम्हां लाभ ॥७०॥
म्हणोनि रचिली माव एक । दुर्वेची गाय सवत्सक । करोनि पाठविली ऐक । गौतमाचे ब्रीहिभक्षणासी ॥७१॥
ऋषि होता अनुष्ठानीं । देखिलें धेनूसी नयनीं । निवारावया तत्क्षणीं । दर्भ पवित्र सोडिलें ॥७२॥
तेचि कुश जाहलें शस्त्र । धेनूसी लागलें जैसें वज्रास्त्र । पंचत्व पावली त्वरित । घडली हत्या गौतमासी ॥७३॥
मिळोनि समस्त ऋषिजन । प्रायश्चित्त देती जाण । गंगा भूमंडळीं आण । याविणें तुम्हां नाहीं शुद्धि ॥७४॥
याकारणें गौतमऋषीं । तप केलें सहस्त्र वर्षी । प्रसन्न झाला व्योमकेशी । वर माग म्हणितलें ॥७५॥
गौतम म्हणे सर्वेश्वरा । तुवां देशील मज वरा । उद्धरावया सचराचरा । द्यावी गंगा भूमंडळासी ॥७६॥
गौतमाचे विनंतीसी । निरोप दिधला गंगेसी । घेवोनि आला भूमंडळासी । पापक्षालनार्थ मनुष्यांचे ॥७७॥
ऐसी गंगाभागीरथी । कवणा वर्णावया सामर्थ्य । याचि कारणें श्रीगुरुनाथ । आले ऐक नामधारका ॥७८॥
ऐशी गौतमीतटाकयात्रा । श्रीगुरू आपण आचरीत । पुढें मागुती लोकानुग्रहार्थ । आपण हिंडे परियेसा ॥७९॥
तटाकयात्रा करितां देख । आले श्रीगुरु मंजरिका । तेथें होता मुनि एक । विख्यात 'माधवारण्य' ॥८०॥
सदा मानसपूजा त्यासी । नरसिंहमूर्ति परियेसीं । देखता झाला श्रीगुरुसी । मानसमूर्ति जैसी देखे ॥८१॥
विस्मित होऊनि मानसीं । नमिता झाला श्रीगुरुमूर्तीसी । स्तोत्र करी बहुवसी । अतिभक्तीकरुनियां ॥८२॥
श्लोक ॥ यद्दिव्यपादद्वयमेवसाक्षाद् , अधिष्ठित देवनदीसमीपे । य उत्तरे तीरनिवासिरामो, लक्ष्मीपतिस्त्वं निवसन्स नित्यम् ॥८३॥
ओंव्या ॥ येणेंपरी श्रीगुरुसी । विनवी माधवारण्य हर्षी । श्रीगुरू म्हणती संतोषीं । तया माधवारण्यासी ॥८४॥
श्लोक ॥ अत्यंतमार्गस्थितिमार्गरुपं, अत्यंतयोगादधिकारतत्त्वम् । मार्गं च मार्गं च विचिन्वतो मे, मार्गोदयं माधव दर्शये ते ॥८५॥
ओंव्या ॥ ऐसें श्रीगुरू तयासी आश्वासोनि म्हणती हर्षी । निजस्वरुप तयासी । दाविते झाले परियेसा ॥८६॥
श्रीगुरुचें स्वरुप देखोनि । संतोषी झाला तो मुनि । विनवीतसे कर जोडूनि । नानापरी स्तुति करी ॥८७॥
जय जया जगद्गुरू । त्रयमूर्तीचा अवतारू । लोकां दिससी नरु । परमपुरुषा जगज्ज्योति ॥८८॥
तूं तारक विश्वासी । म्हणोनि भूमीं अवतरलासी । कृतार्थ केलें आम्हांसी । दर्शन दिधलें चरण आपुले ॥८९॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । स्तुति करीं तो तापसी । संतोष होऊन अति हर्षी । आश्वासिती तया वेळीं ॥९०॥
म्हणती श्रीगुरू तयासी । सिद्धि झाली तुझ्या मंत्रासी । तुज सद्गति भरंवसीं । ब्रह्मलोक प्राप्त होय ॥९१॥
नित्यपूजा तूं मानसीं । करिसी नृसिंहमूर्तीसी । प्रत्यक्ष होईल परियेसीं । न करीं संशय मनांत ॥९२॥
ऐसें सांगोनि तयासी । श्रीगुरू निघाले परियेसीं । आले वासरब्रह्मेश्वरासी । गंगातीर महाक्षेत्र ॥९३॥
तया गंगातटाकांत । श्रीगुरू समस्त शिष्यांसहित । स्नान करितां गंगेंत । आला तेथें विप्र एक ॥९४॥
कुक्षिव्यथा असे बहुत । तटाकीं असे लोळत । उदरव्यथा अत्यंत । त्यजूं पाहे प्राण देखा ॥९५॥
पोटव्यथा बहु त्यासी । नित्य करी तो उपवासासी । भोजन केलिया दुःख ऐसी । प्राणांतिक होतसे ॥९६॥
याकारणें द्विजवर । सदा करी फलाहार । अन्नासी त्यासी असे वैर । जेवितां प्राण त्यजूं पाहे ॥९७॥
पक्षमासां भोजन करी । व्यथा उठे त्याचे उदरीं । ऐसा किती दिवसवरी । कष्टत होता तो द्विज ॥९८॥
पूर्व दिवसीं तया ग्रामीं । आला सण महानवमी । जेविला मिष्टान्न मनोधर्मी । मासें एक पारणें केलें ॥९९॥
भोजन केलें अन्न बहुत । त्याणें पोट असे दुखत । गंगातीरीं असे लोळत । प्राण त्वरित त्यजूं पाहे ॥१००॥
दुःख करी द्विज अपार । म्हणे गंगेंत त्यजीन शरीर । नको आतां संसार । पापरुपें वर्तत ॥१॥
अन्न प्राण अन्न जीवन । कवण असेल अन्नावीण । अन्न वैरी झालें जाण । मरण बरवें आतां मज ॥२॥
मनीं निर्धार करोनि । गंगाप्रवेश करीन म्हणोनि । पोटीं पाषाण बांधोनि । गंगेमध्यें निघाला ॥३॥
मनीं स्मरे कर्पूरगौर । उपजलों आपण भूमिभार । केले नाहीं परोपकार । अन्नदानादिक देखा ॥४॥
न करीं पुण्य इह जन्मांत । जन्मांतरीं पूर्वी शत । पुण्यफळ असे दिसत । मग हे कष्ट भोगीतसें ॥६॥
अपूर्ती पूजा ईश्वराची । केली असेल निंदा गुरुची । अवज्ञा केली मातापितयांची । मग हे कष्ट भोगीतसें ॥७॥
अथवा पूर्वजन्मीं आपण । केलें असेल द्विजधिक्कारण । अतिथि आलिया न घालीं अन्न । वैश्वदेवसमयासी ॥८॥
अथवा मारिलें वोवरांसी । अग्नि घातला रानासी । वेगळें सांडूनि जनकजननींसी । स्त्रियेसहित मी होतों ॥९॥
मातापिता त्यजोनियां । असों सुखें जेवूनियां । पूर्वार्जवापासोनियां । मग हे कष्ट भोगीतसें ॥११०॥
ऐसीं पापें आठवीत । विप्र जातो गंगेंत । तंव देखिलें श्रीगुरुनाथें । म्हणती बोलावा ब्राह्मणासी ॥११॥
आणा आणा त्या ब्राह्मणासी । प्राण त्यजितो कां सुखेसीं । आत्महत्या महादोषी । पुसों कवण कवणाचा ॥१२॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । गेले शिष्य धांवोनि । द्विजवरातें काढोनि । आणिलें श्रीगुरुसन्मुख ॥१३॥
अनाथासी कल्पतरु । दुःखिष्टासी कृपासागरू । पुसतसे श्रीगुरू । तया दुःखिष्ट विप्रासी ॥१४॥
श्रीगुरू म्हणती तयासी । प्राण कां गा त्यजूं पाहसी । आत्महत्या महादोषी । काय वृत्तांत सांग आम्हां ॥१५॥
विप्र म्हणे गा यतिराया । काय कराल पुसोनियां । उपजोनि जन्म वायां । भूमिभार जाहलों असें ॥१६॥
मास-पक्षां भोजन करितों । उदरव्यथेनें कष्टतों । साहूं न शकें प्राण देतों । काय सांगूं स्वामिया ॥१७॥
आपणासी अन्न वैरी असतां । केवीं वांचावें गुरुनाथा । शरीर सर्व अन्नगता । केवीं वांचूं जगद्गुरु ॥१८॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । तुझी व्यथा गेली परियेसीं । औषध असे आम्हांपासीं । क्षण एकें सांगों तुज ॥१९॥
संशय न धरीं आतां मनीं । भिंऊं नको अंतःकरणीं । व्याधि गेली पळोनि । भोजन करी धणीवरी ॥१२०॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । स्थिर झाला अंतःकरणीं । माथा ठेवूनि श्रीगुरुचरणीं । नमन केलें तया वेळीं ॥२१॥
इतुकिया अवसरीं । तया ग्रामींचा अधिकारी । विप्र एक अवधारीं । आला गंगास्नानासी ॥२२॥
तंव देखिलें श्रीगुरुसी । येऊनि लागला चरणांसी । नमन केलें भक्तीसीं । मनोवाक्कायकर्मे ॥२३॥
आश्वासोनि तये वेळीं । पुसती श्रीगुरू स्तोममौळी । कवण नाम कवण स्थळीं । वास म्हणती तयासी ॥२४॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । सांगतसे तो ब्राह्मण । गोत्र आपलें कौंडिण्य । आपस्तंब शाखेसीं ॥२५॥
नाम मज 'सायंदेव' असे । वास-स्थळ आपलें 'कडगंची'स । आलों असे उदरपूर्तीस । सेवा करितों यवनाची ॥२६॥
अधिकारपणें या ग्रामीं । वसों संवत्सर ऐका स्वामी । धन्य धन्य झालों आम्ही । तुमचे दर्शनमात्रेसीं ॥२७॥
तूं तारक विश्वासी । दर्शन दिधलें आम्हांसी । कृतार्थ झालों भरंवसीं । जन्मांतरींचे दोष गेले ॥२८॥
तुझा अनुग्रह होय ज्यासी । तरेल या भवार्णवासी । अप्रयत्नें आम्हांसी । दर्शन दिधलें स्वामिया ॥२९॥
श्लोक ॥ गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा । पापं तापं च दैन्यं च हरेच्छ्रीगुरुदर्शनम् ॥१३०॥
टीका ॥ गंगा देखितांचि पापें जाती । चंद्रदर्शनें ताप नासती । कल्पतरुची ऐसी गति । दैन्यवेगळा करी जाण ॥३१॥
तैसे नव्हती तुमचे दर्शनगुण । पाप-ताप दैन्यहरण । देखिले आजि तुमचे चरण । चतुर्वर्गफल पावलों ॥३२॥
ऐशी स्तुति करुनि । पुनरपि लागला श्रीगुरुचरणीं । जगद्गुरु अश्वासोनि । निरोप देती तया वेळीं ॥३३॥
श्रीगुरू म्हणती तयासी । आमुचें वाक्य परियेसीं । जठरव्यथा ब्राह्मणासी । प्राणत्याग करीतसे ॥३४॥
उपशमन याचे व्याधीसी । सांगों औषध तुम्हांसी । नेवोनि आपुले मंदिरासी । भोजन करवीं मिष्टान्न ॥३५॥
अन्न जेवितां याची व्यथा । व्याधि न राहे सर्वथा । घेऊनि जावें आतां त्वरिता । क्षुधाक्रांत विप्र असे ॥३६॥

जेविला काल मासें एका । त्याणें प्राण जातो ऐका । अन्न देतां आम्हांसी देखा । ब्रह्महत्या त्वरित घडेल ॥३८॥
श्रीगुरु म्हणती सायंदेवासी । आम्ही औषधी देतों यासी । अपूपान्न-माषेसी । क्षीरमिश्रित परमान्न ॥३९॥
अन्न जेवितां त्वरितेसीं । व्याधि जाईल परियेसीं । संशय न धरीं तूं मानसीं । त्वरित न्यावें गृहासी ॥१४०॥
अंगीकारोनि तया वेळीं । माथा ठेवी चरणकमळीं । विनवीतसे करुणाबहाळी । यावें स्वामी भिक्षेसी ॥४१॥
अंगीकारोनि श्रीगुरुनाथ । निरोप देती हो कां त्वरित । सिद्ध म्हणे ऐक मात । नामधारक शिष्योत्तमा ॥४२॥
आम्ही होतों तये वेळीं । समवेत-शिष्य सकळीं । जठरव्यथेचा विप्र जवळी ; । श्रीगुरू गेले भिक्षेसी ॥४३॥
विचित्र झालें त्याचे घरीं । पूजा केली परोपरी । पतिव्रता त्याची नारी । 'जाखाई' म्हणिजे परियेसा ॥४४॥
पूजा करिती श्रीगुरुसी । षोडशोपचारें परियेसीं । तेणेंचि रीतीं आम्हांसी । शिष्यां सकळिकां वंदिलें ॥४५॥
श्रीगुरुपूजा-विधान । विचित्र केलें अतिगहन । मंडळ केलें रक्तवर्ण । एकेकासी पृथक्-पृथक् ॥४६॥
पद्म रचूनि अष्टदळी । नानापरीचे रंगमाळी । पंचवर्ण चित्रमाळी । रचिली तियें परियेसा ॥४७॥
चित्रासन श्रीगुरुसी । तेणेंचिपरी सकळिकांसी । मंडळार्चनविधीसीं । करिती पुष्पगंधाक्षता ॥४८॥
संकल्पोनि विधीसीं । नमन केलें अष्टांगेसीं । माथा ठेवूनि चरणीं, न्यासी । पाद सर्वही अष्टांगीं ॥४९॥
षोडशोपचार विधीसीं । पंचामृतादि परियेसीं । रुद्रसूक्तमंत्रेसीं । चरण स्नापिले तये वेळीं ॥१५०॥
श्रीगुरुचरणीं अतिहर्षी । पूजा करीत षोडशी । तया विप्रा ज्ञान कैसी । चरणतीर्थ धरिता झाला ॥५१॥
तया चरणतीर्थासी । पूजा करीत भक्तीसीं । गीतवाद्यें आनंदेसीं । करी आरति नीरांजन ॥५२॥
अनुक्रमें श्रीगुरुपूजा । करिता झाला विधिवोजा । पुनरपि षोडशोपचारें पूजा । करीतसे भक्तीनें ॥५३॥
अक्षय वाणें आरति । श्रीगुरुसी ओंवाळिती । मंत्रघोष अतिभक्ती । पुष्पांजळी करिता झाला ॥५४॥
अनेकपरी गायन करी । नमन करी प्रीतिकरीं । पतिव्रता असे नारी । पूजा करिती उभयवर्ग ॥५५॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । पूजा केली परियेसीं । तेणेंचि विधीं शिष्यांसी । आम्हां समस्तांसी वंदिलें ॥५६॥
संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । वर देती अतिप्रीतीं । तुझी संतती होईल ख्याति । गुरुभक्ति वंशोवंशीं ॥५७॥
तूं जाणसी गुरुचा वास । अभिवृद्धि होय वंशोवंश । पुत्रपौत्रीं नांदाल हर्षी । गुरुभक्ति येणेंपरी ॥५८॥
ऐसें बोलोनि द्विजासी । आशीर्वचन देती अतिहर्षी । नमन करुनि श्रीगुरुसी । ठाय घातले तये वेळीं ॥५९॥
नानापरीचें पक्क्वान्न । अपूपादि माषान्न । अष्टविध परमान्न । शर्करासहित निवेदिलें ॥१६०॥
शाक पाक नानापरी वाढताति सविस्तारीं । भोजन करिती प्रीतिकरीं । श्रीगुरुमूर्ति परियेसा ॥६१॥
जठरव्यथेच्या ब्राह्मणें । भोजन केलें परिपूर्ण । व्याधि गेली तत्क्षण । श्रीगुरूचे कृपादृष्टीनें ॥६२॥
परीस लागतां लोहासी । सुवर्ण होय परियेसीं । दर्शन होतां श्रीगुरुसी । व्याधि कैंची सांग मज ॥६३॥
उदय जाहलिया दिनकरासी । संहार होतो अंधकारासी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । दैन्य कैंचें तया घरीं ॥६४॥
ऐसेपरी श्रीगुरुनाथें । भोजन केलें शिष्यासहित । आनंद झाला तेथें बहुत । विस्मय करिती सकळै जन ॥६५॥
अभिनव करिती सकळ जन । द्विजासी वैरी होतें अन्न । औषध झालें तेंचि अन्न । व्याधि गेली म्हणताति ॥६६॥
सिद्ध म्हणे नामधारकास । श्रीगुरुकृपा होय ज्यास । जन्मांतरींचे जाती दोष । व्याधि कैंची त्याचे देहीं ॥६७॥
गंगाधराचा नंदन । सरस्वती सांगे विस्तारोन । गुरुचरित्र कामधेनु । ऐका श्रोते एकचित्तें ॥६८॥
जे ऐकती भक्तीनें । व्याधि नसती त्यांचे भुवना । अखिल सौख्य पावती जाणा । सत्यं सत्यं पुनः सत्यं ॥६९॥
इति श्रीगुरुचरित्रामृते पर<poem>
श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
नामधारक शिष्यराणा । लागे सिद्धाचिया चरणां । करसंपुट जोडूनि जाणा । विनवीतसे परियेसा ॥१॥
जय जया सिद्ध मुनी । तूं तारक या भवार्णी । सांगितलें ज्ञान प्रकाशोनि । स्थिर जाहलें मन माझें ॥२॥
गुरुचरित्रकथामृत । सेवितां तृष्णा अधिक होत । शमन करणार समर्थ । तूंचि एक कृपानिधि ॥३॥
गुरुचरित्र कामधेनु । सांगितलें तुम्हीं विस्तारोनु । तृप्त नव्हे माझें मनु । आणखी अपेक्षा होतसे ॥४॥
क्षुधेंकरुनि पीडिलें ढोर । जैसें पावे तृणबिढार । त्यातें होय मनोहर । नवचे तेथोनि परतोनि ॥५॥
एखादा न देखे तक्र स्वप्नीं त्यासी मिळे क्षीरबरणी । नोहे मन त्याचे धणी । केवीं सोडी तो ठाव ॥६॥
तैसा आपण स्वल्पज्ञानी नेणत होतों गुरु-निर्वाणी । अविद्यामाया वेष्टोनि । कष्टत होतों स्वामिया ॥७॥
अज्ञानतिमिररजनीसी । ज्योतिस्वरुप तूंचि होसी । प्रकाश केलें गा आम्हांसी । निजस्वरुप श्रीगुरुचें ॥८॥
तुवां केले उपकारासी । उत्तीर्ण काय होऊं सरसी । कल्पवृक्ष दिल्हेयासी । प्रत्युपकार काय द्यावा ॥९॥
एखादा देतां चिंतामणी । त्यासी उपकार काय धरणीं । नाहीं दिधलें न ऐकों कानीं । कृपामूर्ति सिद्धराया ॥१०॥
ऐशा तुझिया उपकारासी । उत्तीर्ण नोहे जन्मोजन्मेसीं । म्हणोनि लागतसे चरणांसी । एकोभावेंकरोनियां ॥११॥
स्वामींनीं निरोपिला धर्म-अर्थ । अधिक झाला मज स्वार्थ । उपजला मनीं परमार्थ । गुरुसी भजावें निरंतर ॥१२॥
प्रयागीं असतां गुरुमूर्ति । माधवसरस्वतीस दीक्षा देती । पुढें काय वर्तली स्थिति । आम्हांप्रती विस्तारावें ॥१३॥
ऐकोनि शिष्याचें वचन । सिद्धमुनि संतोषोन । मस्तकीं हस्त ठेवून । आश्वासिती तया वेळीं ॥१४॥
धन्य धन्य शिष्या सगुण । तुज लाधले श्रीगुरुचरण । संसार तारक भवार्ण । तूंचि एक परियेसा ॥१५॥
तुवां ओळखिली श्रीगुरुची सोय । म्हणोनि पुससी भक्तिभावें । संतोष होतो आनंदमय । तुझ्या प्रश्नेंकरुनियां ॥१६॥
सांगेन ऐक एकचित्तें । चरित्र गुरुचें विख्यातें । उपदेश देऊनि माधवातें । होते क्वचित्काळ तेथेंचि ॥१७॥
असतां तेथें वर्तमानीं । प्रख्यात झाली महिमा सगुणी । शिष्य झाले अपार मुनि । मुख्य माधवसरस्वती ॥१८॥
तया शिष्यांचीं नामें सांगतां । विस्तार होईल बहु कथा । प्रख्यात असती नामें सात । सांगेन ऐक एकचित्तें ॥१९॥
बाळसरस्वती कृष्णसरस्वती । उपेंद्र-माधवसरस्वती । पांचवा असे आणीक यति । सदानंदसरस्वती देखा ॥२०॥
ज्ञानज्योतिसरस्वती एक । सातवा सिद्ध आपण ऐक । अपार होते शिष्य आणिक । एकाहूनि एक श्रेष्ठ पैं ॥२१॥
त्या शिष्यांसमवेत । श्रीगुरु निघाले दक्षिणपंथ । समस्त क्षेत्रें पावन करित । आले पुन्हा कारंजनगरासी ॥२२॥
भेटी झाली जनकजननी । येवोनि लागताति चरणीं । चतुर्वर्ग भ्राते भगिनी । समस्त भेटती स्वामिया ॥२३॥
देखानियां श्रीगुरुमूर्तीसी नगरलोक अत्यंत हर्षी । आले समस्त भेटीसी । पूजा करिती परोपरी ॥२४॥
घरोघरीं श्रीगुरुसी । पाचारिती भिक्षेसी । जाहले रुपें बहुवसी । घरोघरीं पूजा घेती ॥२५॥
समस्त लोक विस्मय करिती । अवतार हा श्रीविष्णु निश्चितीं । वेषधारी दिसतो यति । परमपुरुष होय जाणा ॥२६॥
यातें नर जे म्हणती । ते नर जाती नरकाप्रती । कार्याकारण अवतार होती । ब्रह्माविष्णुमहेश्वर ॥२७॥
जननीजनक येणें रीतीं । पूजा करिती भावभक्तीं । श्रीगुरू झाले श्रीपादयति । जातिस्मृति जननीसी ॥२८॥
देखोनि जननी तये वेळीं । माथा ठेवी चरणकमळीं । सत्यसंकल्प चंद्रमौळी । प्रदोषपूजा आली फळा ॥२९॥
पतीस सांगे तया वेळीं । पूर्वजन्माचें चरित्र सकळीं । विश्ववंद्य पुत्र प्रबळी । व्हावा म्हणोनि आराधिलें म्यां ॥३०॥
याचि श्रीपाद-ईश्वराचें । पूजन केलें मनोवाचें । प्रसिद्ध झालें जन्म आमुचें । साफल्य केलें परियेसा ॥३१॥
म्हणोनि नमिती दोघेजणीं । विनविताति कर जोडूनि । उद्धरावें या भवार्णी । जगन्नाथा यतिराया ॥३२॥
श्रीगुरू म्हणती तयांसी । एकादे काळीं परियेसीं । पुत्र होय संन्यासी । उद्धरील कुळें बेचाळीस ॥३३॥
त्यासी शाश्वत ब्रह्मलोक । अचळ पद असे देख । त्याचे कुळीं उपजतां आणिक । त्यासीही ब्रह्मपद परियेसा ॥३४॥
यमाचे दुःखें भयाभीत । नोहे त्याचे पितृसंततींत । पूर्वज जरी नरकीं असत । त्यांसी शाश्वत ब्रह्मपद ॥३५॥
याकारणें आम्हीं देखा । घेतला आश्रम विशेखा । तुम्हां नाहीं यमाची शंका । ब्रह्मपद असे सत्य ॥३६॥

त्यांचे पुत्रपौत्र तुम्ही । पहाल सुखें तुमचे नयनीं । पावाल क्षेम काशीभुवनीं । अंतकाळीं परियेसा ॥३८॥
मुक्तिस्थान काशीपुर । प्रख्यात असे वेदशास्त्र । न करा मनीं चिंता मात्र । म्हणोनि सांगती तये वेळीं ॥३९॥
त्यांची कन्या असे एक । नाम तिचें 'रत्नाई' विशेष । श्रीगुरुसी नमूनि ऐक । विनवीतसे परियेसा ॥४०॥
विनवीतसे परोपरी । स्वामी मातें तारीं तारीं । बुडोनि जात्यें भवसागरीं । संसारमाया वेष्टोनियां ॥४१॥
संसार-तापत्रयासी । आपण भीतसें परियेसीं । निर्लिप्त करीं गा आम्हांसी । आपण तपासी जाईन ॥४२॥
ऐकोनि तियेचें वचन । श्रीगुरु निरोपिताति आपण । स्त्रियांसी पतिसेवाचरण । तेंचि तप परियेसा ॥४३॥
येणें या भावार्णवासी । कडे पडती परियेसीं । जैसा भाव असे ज्यासी । तैसें होईल परियेसा ॥४४॥
उतरावया पैल पार । स्त्रियांसी असे तो भ्रतार । मनें करोनि निर्धार । भजा पुरुष शिवसमानी ॥४५॥
त्यासी होय उद्धार गति । वेदपुराणें वाखाणिती । अंतःकरणीं न करीं खंती । तूतें गति होईल जाण ॥४६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे कर जोडून । श्रीगुरुमूर्ति ब्रह्मज्ञान । विनवीतसें अवधारीं ॥४७॥
तूं जाणसी भविष्यभूत । कैसें मातें उपदेशीत । माझें प्रालब्ध कवणगत । विस्तारावें मजप्रति ॥४८॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । तुझी वासना असे तपासी । संचित पाप असे तुजसी । भोगणें असे परियेसा ॥४९॥
पूर्वजन्मीं तूं परियेसीं । चरणीं लाथिलें धेनूसी । शेजारी स्त्रीपुरुषांसी । विरोधें लाविला कलह जाणा ॥५०॥
तया दोषास्तव देखा । तूतें बाधा असे अनेका । गायत्रीसी लाथिलें ऐका । तूं सर्वांगीं कुष्ठी होसील ॥५१॥
विरोध केला स्त्रीपुरुषांसी । तुझा पुरुष होईल तापसी । तुतें त्यजील भरंवसीं । अर्जित तुझें ऐसें असे ॥५२॥
ऐकोनि दुःख करी बहुत । श्रीगुरुचरणीं असे लोळत । मज उद्धारावें गुरुनाथा त्वरित । म्हणोनि चरणीं लागली ॥५३॥
श्रीगुरू म्हणती ऐक बाळे । क्वचित्काळ असाल भले । अपरवयसा होतांचि काळें । पति तुझा यति होये ॥५४॥
तदनंतर तुझा देह । कुष्ठी होईल अवेव । भोगूनि स्वदेहीं वय । मग होईल तुज गति ॥५५॥
नासतां तुझा देह जाण । भेटी होईल आमुचे चरण । तुझें पाप होईल दहन । सांगेन क्षेत्र ऐक पां ॥५६॥
भीमातीरं दक्षिण देशीं । असे तीर्थ पापविनाशी । तेथें जाय तूं भरंवसीं । अवस्था तुज घडलियावरी ॥५७॥
या भूमंडळीं विख्यात । तीर्थ असे अति समर्थ । गंधर्वपुर असे ख्यात । अमरजासंगम प्रसिद्ध जाण ॥५८॥
ऐसें सांगोनि तियेसी । श्रीगुरू निघाले दक्षिण देशीं । त्र्यंबक-क्षेत्रासी । आले, गौतमी-उद्भव जेथें ॥५९॥
शिष्यांसहित गुरुमूर्ति । आले नाशिकक्षेत्राप्रती । तीर्थमहिमा असे ख्याति । पुराणांतरीं परियेसा ॥६०॥
तीर्थमहिमा सांगतां । विस्तार होईल बहु कथा । संक्षेपमार्गे तुज आतां । सांगतसें परियेसीं ॥६१॥
त्या गौतमीची महिमा । सांगतां अपार असे आम्हां । बहिरार्णव-उदक उगमा । ब्रह्मांडाव्यतिरिक्त ॥६२॥
जटामुकुटीं तीर्थेश्वर । धरिली होती प्रीतिकर । मिळोनि समस्त ऋषीश्वर । उपाय केला परियेसा ॥६३॥
ब्रह्मऋषि गौतम देखा । तपस्वी असे विशेषा । व्रीहि पेरिले वृत्तीं ऐका । अनुष्ठानस्थानाजवळी ॥६४॥
पूर्वी मुनी सकळी । नित्य पेरुनि पिकविती साळी । ऐसे त्यांचे मंत्र बळी । महापुण्यपुरुष असती ॥६५॥
समस्त ऋषि मिळोनि । विचार करिती आपुले मनीं । ऋषिगौतम महामुनी । सर्वेश्वराचा मुख्य दास ॥६६॥
त्यासी घालितां सांकडें । गंगा आणील आपुलें चाडें । समस्तां आम्हां पुण्य घडे । गंगास्नानें भूमंडळीं ॥६७॥
श्लोक ॥ या गतिर्योगयुक्तानां मुनीनामूर्ध्वरेतसाम् । सा गतिः सर्वजंतूनां गौतमीतीरवासिनाम् ॥६८॥
टीका ॥ ऊर्ध्वरेत मुनीश्वरांसी । कोटिवर्षे तपस्वियांसी । जे गति होय परियेसीं । ते स्नानमात्रें गौतमीच्या ॥६९॥
याकारणें गौतमीसी । आणावें यत्नें भूमंडळासी । सांकडें घालितां गौतमासी । आणितां गंगा आम्हां लाभ ॥७०॥
म्हणोनि रचिली माव एक । दुर्वेची गाय सवत्सक । करोनि पाठविली ऐक । गौतमाचे ब्रीहिभक्षणासी ॥७१॥
ऋषि होता अनुष्ठानीं । देखिलें धेनूसी नयनीं । निवारावया तत्क्षणीं । दर्भ पवित्र सोडिलें ॥७२॥
तेचि कुश जाहलें शस्त्र । धेनूसी लागलें जैसें वज्रास्त्र । पंचत्व पावली त्वरित । घडली हत्या गौतमासी ॥७३॥
मिळोनि समस्त ऋषिजन । प्रायश्चित्त देती जाण । गंगा भूमंडळीं आण । याविणें तुम्हां नाहीं शुद्धि ॥७४॥
याकारणें गौतमऋषीं । तप केलें सहस्त्र वर्षी । प्रसन्न झाला व्योमकेशी । वर माग म्हणितलें ॥७५॥
गौतम म्हणे सर्वेश्वरा । तुवां देशील मज वरा । उद्धरावया सचराचरा । द्यावी गंगा भूमंडळासी ॥७६॥
गौतमाचे विनंतीसी । निरोप दिधला गंगेसी । घेवोनि आला भूमंडळासी । पापक्षालनार्थ मनुष्यांचे ॥७७॥
ऐसी गंगाभागीरथी । कवणा वर्णावया सामर्थ्य । याचि कारणें श्रीगुरुनाथ । आले ऐक नामधारका ॥७८॥
ऐशी गौतमीतटाकयात्रा । श्रीगुरू आपण आचरीत । पुढें मागुती लोकानुग्रहार्थ । आपण हिंडे परियेसा ॥७९॥
तटाकयात्रा करितां देख । आले श्रीगुरु मंजरिका । तेथें होता मुनि एक । विख्यात 'माधवारण्य' ॥८०॥
सदा मानसपूजा त्यासी । नरसिंहमूर्ति परियेसीं । देखता झाला श्रीगुरुसी । मानसमूर्ति जैसी देखे ॥८१॥
विस्मित होऊनि मानसीं । नमिता झाला श्रीगुरुमूर्तीसी । स्तोत्र करी बहुवसी । अतिभक्तीकरुनियां ॥८२॥
श्लोक ॥ यद्दिव्यपादद्वयमेवसाक्षाद् , अधिष्ठित देवनदीसमीपे । य उत्तरे तीरनिवासिरामो, लक्ष्मीपतिस्त्वं निवसन्स नित्यम् ॥८३॥
ओंव्या ॥ येणेंपरी श्रीगुरुसी । विनवी माधवारण्य हर्षी । श्रीगुरू म्हणती संतोषीं । तया माधवारण्यासी ॥८४॥
श्लोक ॥ अत्यंतमार्गस्थितिमार्गरुपं, अत्यंतयोगादधिकारतत्त्वम् । मार्गं च मार्गं च विचिन्वतो मे, मार्गोदयं माधव दर्शये ते ॥८५॥
ओंव्या ॥ ऐसें श्रीगुरू तयासी आश्वासोनि म्हणती हर्षी । निजस्वरुप तयासी । दाविते झाले परियेसा ॥८६॥
श्रीगुरुचें स्वरुप देखोनि । संतोषी झाला तो मुनि । विनवीतसे कर जोडूनि । नानापरी स्तुति करी ॥८७॥
जय जया जगद्गुरू । त्रयमूर्तीचा अवतारू । लोकां दिससी नरु । परमपुरुषा जगज्ज्योति ॥८८॥
तूं तारक विश्वासी । म्हणोनि भूमीं अवतरलासी । कृतार्थ केलें आम्हांसी । दर्शन दिधलें चरण आपुले ॥८९॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । स्तुति करीं तो तापसी । संतोष होऊन अति हर्षी । आश्वासिती तया वेळीं ॥९०॥
म्हणती श्रीगुरू तयासी । सिद्धि झाली तुझ्या मंत्रासी । तुज सद्गति भरंवसीं । ब्रह्मलोक प्राप्त होय ॥९१॥
नित्यपूजा तूं मानसीं । करिसी नृसिंहमूर्तीसी । प्रत्यक्ष होईल परियेसीं । न करीं संशय मनांत ॥९२॥
ऐसें सांगोनि तयासी । श्रीगुरू निघाले परियेसीं । आले वासरब्रह्मेश्वरासी । गंगातीर महाक्षेत्र ॥९३॥
तया गंगातटाकांत । श्रीगुरू समस्त शिष्यांसहित । स्नान करितां गंगेंत । आला तेथें विप्र एक ॥९४॥
कुक्षिव्यथा असे बहुत । तटाकीं असे लोळत । उदरव्यथा अत्यंत । त्यजूं पाहे प्राण देखा ॥९५॥
पोटव्यथा बहु त्यासी । नित्य करी तो उपवासासी । भोजन केलिया दुःख ऐसी । प्राणांतिक होतसे ॥९६॥
याकारणें द्विजवर । सदा करी फलाहार । अन्नासी त्यासी असे वैर । जेवितां प्राण त्यजूं पाहे ॥९७॥
पक्षमासां भोजन करी । व्यथा उठे त्याचे उदरीं । ऐसा किती दिवसवरी । कष्टत होता तो द्विज ॥९८॥
पूर्व दिवसीं तया ग्रामीं । आला सण महानवमी । जेविला मिष्टान्न मनोधर्मी । मासें एक पारणें केलें ॥९९॥
भोजन केलें अन्न बहुत । त्याणें पोट असे दुखत । गंगातीरीं असे लोळत । प्राण त्वरित त्यजूं पाहे ॥१००॥
दुःख करी द्विज अपार । म्हणे गंगेंत त्यजीन शरीर । नको आतां संसार । पापरुपें वर्तत ॥१॥
अन्न प्राण अन्न जीवन । कवण असेल अन्नावीण । अन्न वैरी झालें जाण । मरण बरवें आतां मज ॥२॥
मनीं निर्धार करोनि । गंगाप्रवेश करीन म्हणोनि । पोटीं पाषाण बांधोनि । गंगेमध्यें निघाला ॥३॥
मनीं स्मरे कर्पूरगौर । उपजलों आपण भूमिभार । केले नाहीं परोपकार । अन्नदानादिक देखा ॥४॥
न करीं पुण्य इह जन्मांत । जन्मांतरीं पूर्वी शत । पुण्यफळ असे दिसत । मग हे कष्ट भोगीतसें ॥६॥
अपूर्ती पूजा ईश्वराची । केली असेल निंदा गुरुची । अवज्ञा केली मातापितयांची । मग हे कष्ट भोगीतसें ॥७॥
अथवा पूर्वजन्मीं आपण । केलें असेल द्विजधिक्कारण । अतिथि आलिया न घालीं अन्न । वैश्वदेवसमयासी ॥८॥

मातापिता त्यजोनियां । असों सुखें जेवूनियां । पूर्वार्जवापासोनियां । मग हे कष्ट भोगीतसें ॥११०॥
ऐसीं पापें आठवीत । विप्र जातो गंगेंत । तंव देखिलें श्रीगुरुनाथें । म्हणती बोलावा ब्राह्मणासी ॥११॥
आणा आणा त्या ब्राह्मणासी । प्राण त्यजितो कां सुखेसीं । आत्महत्या महादोषी । पुसों कवण कवणाचा ॥१२॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । गेले शिष्य धांवोनि । द्विजवरातें काढोनि । आणिलें श्रीगुरुसन्मुख ॥१३॥
अनाथासी कल्पतरु । दु:खिष्टासी कृपासागरू । पुसतसे श्रीगुरू । तया दु:खिष्ट विप्रासी ॥१४॥
श्रीगुरू म्हणती तयासी । प्राण कां गा त्यजूं पाहसी । आत्महत्या महादोषी । काय वृत्तांत सांग आम्हां ॥१५॥
विप्र म्हणे गा यतिराया । काय कराल पुसोनियां । उपजोनि जन्म वायां । भूमिभार जाहलों असें ॥१६॥
मास-पक्षां भोजन करितों । उदरव्यथेनें कष्टतों । साहूं न शकें प्राण देतों । काय सांगूं स्वामिया ॥१७॥
आपणासी अन्न वैरी असतां । केवीं वांचावें गुरुनाथा । शरीर सर्व अन्नगता । केवीं वांचूं जगद्‌गुरु ॥१८॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । तुझी व्यथा गेली परियेसीं । औषध असे आम्हांपासीं । क्षण एकें सांगों तुज ॥१९॥
संशय न धरीं आतां मनीं । भिऊं नको अंत:करणीं । व्याधि गेली पळोनि । भोजन करी धणीवरी ॥१२०॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । स्थिर झाला अंत:करणीं । माथा ठेवूनि श्रीगुरुचरणीं । नमन केलें तया वेळीं ॥२१॥
इतुकिया अवसरीं । तया ग्रामींचा अधिकारी । विप्र एक अवधारीं । आला गंगास्नानासी ॥२२॥
तंव देखिलें श्रीगुरुसी । येऊनि लागला चरणांसी । नमन केलें भक्तीसीं । मनोवाक्कायकर्मे ॥२३॥
आश्वासोनि तये वेळीं । पुसती श्रीगुरू स्तोममौळी । कवण नाम कवण स्थळीं । वास म्हणती तयासी ॥२४॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । सांगतसे तो ब्राह्मण । गोत्र आपलें कौंडिण्य । आपस्तंब शाखेसीं ॥२५॥
नाम मज 'सायंदेव' असे । वास-स्थळ आपलें 'कडगंची'स । आलों असे उदरपूर्तीस । सेवा करितों यवनाची ॥२६॥
अधिकारपणें या ग्रामीं । वसों संवत्सर ऐका स्वामी । धन्य धन्य झालों आम्ही । तुमचे दर्शनमात्रेसीं ॥२७॥
तूं तारक विश्वासी । दर्शन दिधलें आम्हांसी । कृतार्थ झालों भरंवसीं । जन्मांतरींचे दोष गेले ॥२८॥
तुझा अनुग्रह होय ज्यासी । तरेल या भवार्णवासी । अप्रयत्नें आम्हांसी । दर्शन दिधलें स्वामिया ॥२९॥
श्लोक ॥ गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा । पापं तापं च दैन्यं च हरेच्छ्रीगुरुदर्शनम् ॥१३०॥
टीका ॥ गंगा देखितांचि पापें जाती । चंद्रदर्शनें ताप नासती । कल्पतरुची ऐसी गति । दैन्यवेगळा करी जाण ॥३१॥
तैसे नव्हती तुमचे दर्शनगुण । पाप-ताप दैन्यहरण । देखिले आजि तुमचे चरण । चतुर्वर्गफल पावलों ॥३२॥
ऐशी स्तुति करुनि । पुनरपि लागला श्रीगुरुचरणीं । जगद्‌गुरु अश्वासोनि । निरोप देती तया वेळीं ॥३३॥
श्रीगुरू म्हणती तयासी । आमुचें वाक्य परियेसीं । जठरव्यथा ब्राह्मणासी । प्राणत्याग करीतसे ॥३४॥
उपशमन याचे व्याधीसी । सांगों औषध तुम्हांसी । नेवोनि आपुले मंदिरासी । भोजन करवीं मिष्टान्न ॥३५॥
अन्न जेवितां याची व्यथा । व्याधि न राहे सर्वथा । घेऊनि जावें आतां त्वरिता । क्षुधाक्रांत विप्र असे ॥३६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे कर जोडून । प्राणत्याग करितां भोजन । या ब्राह्मणासी होतसे ॥३७॥
जेविला काल मासें एका । त्याणें प्राण जातो ऐका । अन्न देतां आम्हांसी देखा । ब्रह्महत्या त्वरित घडेल ॥३८॥
श्रीगुरु म्हणती सायंदेवासी । आम्ही औषधी देतों यासी । अपूपान्न-माषेसीं । क्षीरमिश्रित परमान्न ॥३९॥
अन्न जेवितां त्वरितेसीं । व्याधि जाईल परियेसीं । संशय न धरीं तूं मानसीं । त्वरित न्यावें गृहासी ॥१४०॥
अंगीकारोनि तया वेळीं । माथा ठेवी चरणकमळीं । विनवीतसे करुणाबहाळी । यावें स्वामी भिक्षेसी ॥४१॥
अंगीकारोनि श्रीगुरुनाथ । निरोप देती हो कां त्वरित । सिद्ध म्हणे ऐक मात । नामधारक शिष्योत्तमा ॥४२॥
आम्ही होतों तये वेळीं । समवेत-शिष्य सकळीं । जठरव्यथेचा विप्र जवळी ; । श्रीगुरू गेले भिक्षेसी ॥४३॥
विचित्र झालें त्याचे घरीं । पूजा केली परोपरी । पतिव्रता त्याची नारी । 'जाखाई' म्हणिजे परियेसा ॥४४॥
पूजा करिती श्रीगुरुसी । षोडशोपचारें परियेसीं । तेणेंचि रीतीं आम्हांसी । शिष्यां सकळिकां वंदिलें ॥४५॥
श्रीगुरुपूजा-विधान । विचित्र केलें अतिगहन । मंडळ केलें रक्तवर्ण । एकेकासी पृथक्-पृथक् ॥४६॥
पद्म रचूनि अष्टदळी । नानापरीचे रंगमाळी । पंचवर्ण चित्रमाळी । रचिली तियें परियेसा ॥४७॥
चित्रासन श्रीगुरुसी । तेणेंचिपरी सकळिकांसी । मंडळार्चनविधीसीं । करिती पुष्पगंधाक्षता ॥४८॥
संकल्पोनि विधीसीं । नमन केलें अष्टांगेसीं । माथा ठेवूनि चरणीं, न्यासी । पाद सर्वही अष्टांगीं ॥४९॥
षोडशोपचार विधीसीं । पंचामृतादि परियेसीं । रुद्रसूक्तमंत्रेसीं । चरण स्नापिले तये वेळीं ॥१५०॥
श्रीगुरुचरणीं अतिहर्षी । पूजा करीत षोडशी । तया विप्रा ज्ञान कैसी । चरणतीर्थ धरिता झाला ॥५१॥
तया चरणतीर्थासी । पूजा करीत भक्तीसीं । गीतवाद्यें आनंदेसीं । करी आरति नीरांजन ॥५२॥
अनुक्रमें श्रीगुरुपूजा । करिता झाला विधिवोजा । पुनरपि षोडशोपचारें पूजा । करीतसे भक्तीनें ॥५३॥
अक्षय वाणें आरति । श्रीगुरुसी ओंवाळिती । मंत्रघोष अतिभक्तीं । पुष्पांजळी करिता झाला ॥५४॥
अनेकपरी गायन करी । नमन करी प्रीतिकरीं । पतिव्रता असे नारी । पूजा करिती उभयवर्ग ॥५५॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । पूजा केली परियेसीं । तेणेंचि विधीं शिष्यांसी । आम्हां समस्तांसी वंदिलें ॥५६॥
संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । वर देती अतिप्रीतीं । तुझी संतती होईल ख्याति । गुरुभक्ति वंशोवंशीं ॥५७॥
तूं जाणसी गुरुचा वास । अभिवृद्धि होय वंशोवंश । पुत्रपौत्रीं नांदाल हर्षी । गुरुभक्ति येणेंपरी ॥५८॥
ऐसें बोलोनि द्विजासी । आशीर्वचन देती अतिहर्षी । नमन करुनि श्रीगुरुसी । ठाय घातले तये वेळीं ॥५९॥
नानापरीचें पक्क्वान्न । अपूपादि माषान्न । अष्टविध परमान्न । शर्करासहित निवेदिलें ॥१६०॥
शाक पाक नानापरी वाढताति सविस्तारीं । भोजन करिती प्रीतिकरीं । श्रीगुरुमूर्ति परियेसा ॥६१॥
जठरव्यथेच्या ब्राह्मणें । भोजन केलें परिपूर्ण । व्याधि गेली तत्क्षण । श्रीगुरूचे कृपादृष्टीनें ॥६२॥
परीस लागतां लोहासी । सुवर्ण होय परियेसीं । दर्शन होतां श्रीगुरुसी । व्याधि कैंची सांग मज ॥६३॥
उदय जाहलिया दिनकरासी । संहार होतो अंधकारासी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । दैन्य कैंचें तया घरीं ॥६४॥
ऐसेपरी श्रीगुरुनाथें । भोजन केलें शिष्यासहित । आनंद झाला तेथें बहुत । विस्मय करिती सकळै जन ॥६५॥
अभिनव करिती सकळ जन । द्विजासी वैरी होतें अन्न । औषध झालें तेंचि अन्न । व्याधि गेली म्हणताति ॥६६॥
सिद्ध म्हणे नामधारकास । श्रीगुरुकृपा होय ज्यास । जन्मांतरींचे जाती दोष । व्याधि कैंची त्याचे देहीं ॥६७॥
गंगाधराचा नंदन । सरस्वती सांगे विस्तारोन । गुरुचरित्र कामधेनु । ऐका श्रोते एकचित्तें ॥६८॥
जे ऐकती भक्तीनें । व्याधि नसती त्यांचे भुवना । अखिल सौख्य पावत<poem>
श्रीगणेशाय नम: ॥ श्रीसरस्वत्यै नम: ॥ श्रीगुरुभ्यो नम: ॥
नामधारक शिष्यराणा । लागे सिद्धाचिया चरणां । करसंपुट जोडूनि जाणा । विनवीतसे परियेसा ॥१॥
जय जया सिद्ध मुनी । तूं तारक या भवार्णी । सांगितलें ज्ञान प्रकाशोनि । स्थिर जाहलें मन माझें ॥२॥
गुरुचरित्रकथामृत । सेवितां तृष्णा अधिक होत । शमन करणार समर्थ । तूंचि एक कृपानिधि ॥३॥
गुरुचरित्र कामधेनु । सांगितलें तुम्हीं विस्तारोनु । तृप्त नव्हे माझें मनु । आणखी अपेक्षा होतसे ॥४॥
क्षुधेंकरुनि पीडिलें ढोर । जैसें पावे तृणबिढार । त्यातें होय मनोहर । नवचे तेथोनि परतोनि ॥५॥
एखादा न देखे तक्र स्वप्नीं त्यासी मिळे क्षीरबरणी । नोहे मन त्याचे धणी । केवीं सोडी तो ठाव ॥६॥
तैसा आपण स्वल्पज्ञानी नेणत होतों गुरु-निर्वाणी । अविद्यामाया वेष्टोनि । कष्टत होतों स्वामिया ॥७॥
अज्ञानतिमिररजनीसी । ज्योतिस्वरुप तूंचि होसी । प्रकाश केलें गा आम्हांसी । निजस्वरुप श्रीगुरुचें ॥८॥
तवां केले उपकारासी । उत्तीर्ण काय होऊं सरसी । कल्पवृक्ष दिल्हेयासी । प्रत्युपकार काय द्यावा ॥९॥

ऐशा तुझिया उपकारासी । उत्तीर्ण नोहे जन्मोजन्मेसीं । म्हणोनि लागतसे चरणांसी । एकोभावेंकरोनियां ॥११॥
स्वामीनीं निरोपिला धर्म-अर्थ । अधिक झाला मज स्वार्थ । उपजला मनीं परमार्थ । गुरुसी भजावें निरंतर ॥१२॥
प्रयागीं असतां गुरुमूर्ति । माधवसरस्वतीस दीक्षा देती । पुढें काय वर्तली स्थिति । आम्हांप्रती विस्तारावें ॥१३॥
ऐकोनि शिष्याचें वचन । सिद्धमुनि संतोषोन । मस्तकीं हस्त ठेवून । आश्वासिती तया वेळीं ॥१४॥
धन्य धन्य शिष्या सगुण । तुज लाधले श्रीगुरुचरण । संसार तारक भवार्ण । तूंचि एक परियेसा ॥१५॥
तुवां ओळखिली श्रीगुरुची सोय । म्हणोनि पुससी भक्तिभावें । संतोष होतो आनंदमय । तुझ्या प्रश्नेंकरुनियां ॥१६॥
सांगेन ऐक एकचित्तें । चरित्र गुरुचें विख्यातें । उपदेश देऊनि माधवातें । होते क्वचित्काळ तेथेंचि ॥१७॥
असतां तेथें वर्तमानीं । प्रख्यात झाली महिमा सगुणी । शिष्य झाले अपार मुनि । मुख्य माधवसरस्वती ॥१८॥
तया शिष्यांचीं नामें सांगतां । विस्तार होईल बहु कथा । प्रख्यात असती नामें सात । सांगेन ऐक एकचित्तें ॥१९॥
बाळसरस्वती कृष्णसरस्वती । उपेंद्र-माधवसरस्वती । पांचवा असे आणीक यति । सदानंदसरस्वती देखा ॥२०॥
ज्ञानज्योतिसरस्वती एक । सातवा सिद्ध आपण ऐक । अपार होते शिष्य आणिक । एकाहूनि एक श्रेष्ठ पैं ॥२१॥
त्या शिष्यांसमवेत । श्रीगुरु निघाले दक्षिणपंथ । समस्त क्षेत्रें पावन करित । आले पुन्हा कारंजनगरासी ॥२२॥
भेटी झाली जनकजननी । येवोनि लागताति चरणीं । चतुर्वर्ग भ्राते भगिनी । समस्त भेटती स्वामिया ॥२३॥
देखानियां श्रीगुरुमूर्तीसी नगरलोक अत्यंत हर्षी । आले समस्त भेटीसी । पूजा करिती परोपरी ॥२४॥
घरोघरीं श्रीगुरुसी । पाचारिती भिक्षेसी । जाहले रुपें बहुवसी । घरोघरीं पूजा घेती ॥२५॥
समस्त लोक विस्मय करिती । अवतार हा श्रीविष्णु निश्चितीं । वेषधारी दिसतो यति । परमपुरुष होय जाणा ॥२६॥
यातें नर जे म्हणती । ते नर जाती नरकाप्रती । कार्याकारण अवतार होती । ब्रह्माविष्णुमहेश्वर ॥२७॥
जननीजनक येणें रीतीं । पूजा करिती भावभक्तीं । श्रीगुरू झाले श्रीपादयति । जातिस्मृति जननीसी ॥२८॥
देखोनि जननी तये वेळीं । माथा ठेवी चरणकमळीं । सत्यसंकल्प चंद्रमौळी । प्रदोषपूजा आली फळा ॥२९॥
पतीस सांगे तया वेळीं । पूर्वजन्माचें चरित्र सकळीं । विश्ववंद्य पुत्र प्रबळी । व्हावा म्हणोनि आराधिलें म्यां ॥३०॥
याचि श्रीपाद-ईश्वराचें । पूजन केलें मनोवाचें । प्रसिद्ध झालें जन्म आमुचें । साफल्य केलें परियेसा ॥३१॥
म्हणोनि नमिती दोघेजणीं । विनविताति कर जोडूनि । उद्धरावें या भवार्णी । जगन्नाथा यतिराया ॥३२॥
श्रीगुरू म्हणती तयांसी । एकादे काळीं परियेसीं । पुत्र होय संन्यासी । उद्धरील कुळें बेचाळीस ॥३३॥
त्यासी शाश्वत ब्रह्मलोक । अचळ पद असे देख । त्याचे कुळीं उपजतां आणिक । त्यासीही ब्रह्मपद परियेसा ॥३४॥
यमाचे दुःखें भयाभीत । नोहे त्याचे पितृसंततींत । पूर्वज जरी नरकीं असत । त्यांसी शाश्वत ब्रह्मपद ॥३५॥
याकारणें आम्हीं देखा । घेतला आश्रम विशेखा । तुम्हां नाहीं यमाची शंका । ब्रह्मपद असे सत्य ॥३६॥
ऐसें सांगोनि तयांसी । आश्वासीतसे बहुवसी । तुमचे पुत्र शतायुषी । अष्टैश्वर्यें नांदती ॥३७॥
त्यांचे पुत्रपौत्र तुम्ही । पहाल सुखें तुमचे नयनी । पावाल क्षेम काशीभुवनीं । अंतकाळीं परियेसा ॥३८॥
मुक्तिस्थान काशीपुर । प्रख्यात असे वेदशास्त्र । न करा मनीं चिंता मात्र । म्हणोनि सांगती तये वेळीं ॥३९॥
त्यांची कन्या असे एक । नाम तिचें 'रत्नाई' विशेष । श्रीगुरुसी नमूनि ऐक । विनवीतसे परियेसा ॥४०॥
विनवीतसे परोपरी । स्वामी मातें तारीं तारीं । बुडोनि जात्यें भवसागरीं । संसारमाया वेष्टोनियां ॥४१॥
संसार-तापत्रयासी । आपण भीतसें परियेसीं । निर्लिप्त करीं गा आम्हांसी । आपण तपासी जाईन ॥४२॥
ऐकोनि तियेचें वचन । श्रीगुरु निरोपिताति आपण । स्त्रियांसी पतिसेवाचरण । तेंचि तप परियेसा ॥४३॥
येणें या भावार्णवासी । कडे पडती परियेसीं । जैसा भाव असे ज्यासी । तैसें होईल परियेसा ॥४४॥
उतरावया पैल पार । स्त्रियांसी असे तो भ्रतार । मनें करोनि निर्धार । भजा पुरुष शिवसमानी ॥४५॥
त्यासी होय उद्धार गति । वेदपुराणें वाखाणिती । अंतःकरणीं न करीं खंती । तूतें गति होईल जाण ॥४६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे कर जोडून । श्रीगुरुमूर्ति ब्रह्मज्ञान । विनवीतसें अवधारीं ॥४७॥
तूं जाणसी भविष्यभुत । कैसें मातें उपदेशीत । माझें प्रालब्ध कवणगत । विस्तारावें मजप्रति ॥४८॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । तुझी वासना असे तपासी । संचित पाप असे तुजसी । भोगणें असे परियेसा ॥४९॥
पूर्वजन्मीं तूं परियेसीं । चरणीं लाथिलें धेनूसी । शेजारी स्त्रीपुरुषांसी । विरोधें लाविला कलह जाणा ॥५०॥
तया दोषास्तव देखा । तूतें बाधा असे अनेका । गायत्रीसी लाथिलें ऐका । तूं सर्वांगीं कुष्ठी होसील ॥५१॥
विरोध केला स्त्रीपुरुषांसीं । तुझा पुरुष होईल तापसी । तुतें त्यजील भरंवसी । अर्जित तुझें ऐसें असे ॥५२॥
ऐकोनि दुःख करी बहुत । श्रीगुरुचरणीं असे लोळत । मज उद्धारावें गुरुनाथा त्वरित । म्हणोनि चरणीं लागली ॥५३॥
श्रीगुरू म्हणती ऐक बाळे । क्वचित्काळ असाल भले । अपरवयसा होतांचि काळें । पति तुझा यति होये ॥५४॥
तदनंतर तुझा देह । कुष्ठी होईल अवेव । भोगूनि स्वदेहीं वय । मग होईल तुज गति ॥५५॥
नासतां तुझा देह जाण । भेटी होईल आमुचे चरण । तुझें पाप होईल दहन । सांगेन क्षेत्र ऐक पां ॥५६॥
भीमातीर दक्षिण देशीं । असे तीर्थ पापविनाशी । तेथें जाय तूं भरंवसीं । अवस्था तुज घडलियावरी ॥५७॥
या भूमंडळीं विख्यात । तीर्थ असे अति समर्थ । गंधर्वपुर असें ख्यात । अमरजासंगम प्रसिद्ध जाण ॥५८॥
ऐसें सांगोनि तियेसी । श्रीगुरू निघाले दक्षिण देशीं । त्र्यंबक-क्षेत्रासी । आले, गौतमी-उद्भव जेथें ॥५९॥
शिष्यांसहित गुरुमूर्ति । आले नाशिकक्षेत्राप्रती । तीर्थमहिमा असे ख्याति । पुराणांतरीं परियेसा ॥६०॥
तीर्थमहिमा सांगतां । विस्तार होईल बहु कथा । संक्षेपमार्गें तुज आतां । सांगतसें परियेसीं ॥६१॥
त्या गौतमीची महिमा । सांगतां अपार असे आम्हां । बहिरार्णव-उदक उगमा । ब्रह्मांडाव्यतिरिक्त ॥६२॥
जटामुकुटीं तीर्थेश्वर । धरिली होती प्रीतिकर । मिळोनि समस्त ऋषीश्वर । उपाय केला परियेसा ॥६३॥
ब्रह्मऋषि गौतम देखा । तपस्वी असे विशेषा । व्रीहि पेरिले वृत्तीं ऐका । अनुष्ठानस्थानाजवळी ॥६४॥
पूर्वी मुनी सकळी । नित्य पेरुनि पिकविती साळी । ऐसे त्यांचे मंत्र बळी । महापुण्यपुरुष असती ॥६५॥
समस्त ऋषि मिळोनि । विचार करिती आपुले मनीं । ऋषिगौतम महामुनी । सर्वेश्वराचा मुख्य दास ॥६६॥
त्यासी घालितां सांकडें । गंगा आणील आपुलें चाडें । समस्तां आम्हां पुण्य घडे । गंगास्नानें भूमंडळीं ॥६७॥
श्लोक ॥ या गतिर्योगयुक्तानां मुनीनामूर्ध्वरेतसाम् । सा गतिः सर्वजंतूनां गौतमीतीरवासिनाम् ॥६८॥
टीका ॥ ऊर्ध्वरेत मुनीश्वरांसी । कोटिवर्षे तपस्वियांसी । जे गति होय परियेसीं । ते स्नानमात्रें गौतमीच्या ॥६९॥
याकारणें गौतमीसी । आणावें यत्नें भूमंडळासी । सांकडें घालितां गौतमासी । आणितां गंगा आम्हां लाभ ॥७०॥
म्हणोनि रचिली माव एक । दुर्वेची गाय सवत्सक । करोनि पाठविली ऐक । गौतमाचे ब्रीहिभक्षणासी ॥७१॥
ऋषि होता अनुष्ठानीं । देखिलें धेनूसी नयनीं । निवारावया तत्क्षणीं । दर्भ पवित्र सोडिलें ॥७२॥
तेचि कुश जाहलें शस्त्र । धेनूसी लागलें जैसें वज्रास्त्र । पंचत्व पावली त्वरित । घडली हत्या गौतमासी ॥७३॥
मिळोनि समस्त ऋषिजन । प्रायश्चित्त देती जाण । गंगा भूमंडळीं आण । याविणें तुम्हां नाहीं शुद्धि ॥७४॥
याकारणें गौतमऋषीं । तप केलें सहस्त्र वर्षी । प्रसन्न झाला व्योमकेशी । वर माग म्हणितलें ॥७५॥
गौतम म्हणे सर्वेश्वरा । तुवां देशील मज वरा । उद्धरावया सचराचरा । द्यावी गंगा भूमंडळासी ॥७६॥
गौतमाचे विनंतीसी । निरोप दिधला गंगेसी । घेवोनि आला भूमंडळासी । पापक्षालनार्थ मनुष्यांचे ॥७७॥
ऐसी गंगाभागीरथी । कवणा वर्णावया सामर्थ्य । याचि कारणें श्रीगुरुनाथ । आले ऐक नामधारका ॥७८॥
ऐशी गौतमीतटाकयात्रा । श्रीगुरू आपण आचरीत । पुढें मागुती लोकानुग्रहार्थ । आपण हिंडे परियेसा ॥७९॥
तटाकयात्रा करितां देख । आले श्रीगुरु मंजरिका । तेथें होता मुनि एक । विख्यात 'माधवारण्य' ॥८०॥

विस्मित होऊनि मानसीं । नमिता झाला श्रीगुरुमूर्तीसी । स्तोत्र करीं बहुवसी । अतिभक्तीकरुनियां ॥८२॥
श्लोक ॥ यद्दिव्यपादद्वयमेवसाक्षाद् , अधिष्ठित देवनदीसमीपे । य उत्तरे तीरनिवासिरामो, लक्ष्मीपतिस्त्वं निवसन्स नित्यम् ॥८३॥
ओंव्या ॥ येणेंपरी श्रीगुरुसी । विनवी माधवारण्य हर्षी । श्रीगुरू म्हणती संतोषीं । तया माधवारण्यासी ॥८४॥
श्लोक ॥ अत्यंतमार्गस्थितिमार्गरुपं, अत्यंतयोगादधिकारतत्त्वम् । मार्गं च मार्गं च विचिन्वतो मे, मार्गोदयं माधव दर्शये ते ॥८५॥
ओंव्या ॥ ऐसें श्रीगुरू तयासी आश्वासोनि म्हणती हर्षी । निजस्वरुप तयासी । दाविते झाले परियेसा ॥८६॥
श्रीगुरुचें स्वरुप देखोनि । संतोषी झाला तो मुनि । विनवीतसे कर जोडूनि । नानापरी स्तुति करी ॥८७॥
जय जया जगद्‌गुरू । त्रयमूर्तीचा अवतारू । लोकां दिससी नरु । परमपुरुषा जगज्ज्योति ॥८८॥
तूं तारक विश्वासीं । म्हणोनि भूमीं अवतरलासी । कृतार्थ केलें आम्हांसी । दर्शन दिधलें चरण आपुले ॥८९॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । स्तुति करीं तो तापसी । संतोष होऊन अति हर्षी । आश्वासिती तया वेळीं ॥९०॥
म्हणती श्रीगुरू तयासी । सिद्धि झाली तुझ्या मंत्रासी । तुज सद्गति भरंवसीं । ब्रह्मलोक प्राप्त होय ॥९१॥
नित्यपूजा तूं मानसीं । करिसी नृसिंहमूर्तीसी । प्रत्यक्ष होईल परियेसीं । न करीं संशय मनांत ॥९२॥
ऐसें सांगोनि तयासी । श्रीगुरू निघाले परियेसीं । आले वासरब्रह्मेश्वरासी । गंगातीर महाक्षेत्र ॥९३॥
तया गंगातटाकांत । श्रीगुरू समस्त शिष्यांसहित । स्नान करितां गंगेंत । आला तेथें विप्र एक ॥९४॥
कुक्षिव्यथा असे बहुत । तटाकीं असे लोळत । उदरव्यथा अत्यंत । त्यजूं पाहे प्राण देखा ॥९५॥
पोटव्यथा बहु त्यासी । नित्य करी तो उपवासासी । भोजन केलिया दुःख ऐसी । प्राणांतिक होतसे ॥९६॥
याकारणें द्विजवर । सदा करी फलाहार । अन्नासी त्यासी असे वैर । जेवितां प्राण त्यजूं पाहे ॥९७॥
पक्षमासां भोजन करी । व्यथा उठे त्याचे उदरीं । ऐसा किती दिवसवरी । कष्टत होता तो द्विज ॥९८॥
पूर्व दिवसीं तया ग्रामीं । आला सण महानवमी । जेविला मिष्टान्न मनोधर्मी । मासें एक पारणें केलें ॥९९॥
भोजन केलें अन्न बहुत । त्याणें पोट असे दुखत । गंगातीरीं असे लोळत । प्राण त्वरित त्यजूं पाहे ॥१००॥
दुःख करी द्विज अपार । म्हणे गंगेंत त्यजीन शरीर । नको आतां संसार । पापरुपें वर्तत ॥१॥
अन्न प्राण अन्न जीवन । कवण असेल अन्नावीण । अन्न वैरी झालें जाण । मरण बरवें आतां मज ॥२॥
मनीं निर्धार करोनि । गंगाप्रवेश करीन म्हणोनि । पोटीं पाषाण बांधोनि । गंगेमध्यें निघाला ॥३॥
मनीं स्मरे कर्पूरगौर । उपजलों आपण भूमिभार । केले नाहीं परोपकार । अन्नदानादिक देखा ॥४॥
न करीं पुण्य इह जन्मांत । जन्मांतरीं पूर्वी शत । पुण्यफळ असे दिसत । मग हे कष्ट भोगीतसें ॥६॥
अपूर्ती पूजा ईश्वराची । केली असेल निंदा गुरुची । अवज्ञा केली मातापितयांची । मग हे कष्ट भोगीतसें ॥७॥
अथवा पूर्वजन्मीं आपण । केलें असेल द्विजधिक्कारण । अतिथि आलिया न घालीं अन्न । वैश्वदेवसमयासी ॥८॥
अथवा मारिलें वोवरांसी । अग्नि घातला रानासी । वेगळें सांडूनि जनकजननींसी । स्त्रियेसहित मी होतों ॥९॥
मातापिता त्यजोनियां । असों सुखें जेवूनियां । पूर्वार्जवापासोनियां । मग हे कष्ट भोगीतसें ॥११०॥
ऐसीं पापें आठवीत । विप्र जातो गंगेंत । तंव देखिलें श्रीगुरुनाथें । म्हणती बोलावा ब्राह्मणासी ॥११॥
आणा आणा त्या ब्राह्मणासी । प्राण त्यजितो कां सुखेसीं । आत्महत्या महादोषी । पुसों कवण कवणाचा ॥१२॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । गेले शिष्य धांवोनि । द्विजवरातें काढोनि । आणिलें श्रीगुरुसन्मुख ॥१३॥
अनाथासी कल्पतरु । दुःखिष्टासी कृपासागरू । पुसतसे श्रीगुरू । तया दुःखिष्ट विप्रासी ॥१४॥
श्रीगुरू म्हणती तयासी । प्राण कां गा त्यजूं पाहसी । आत्महत्या महादोषी । काय वृत्तांत सांग आम्हां ॥१५॥
विप्र म्हणे गा यतिराया । काय कराल पुसोनियां । उपजोनि जन्म वायां । भूमिभार जाहलों असें ॥१६॥
मास-पक्षां भोजन करितों । उदरव्यथेनें कष्टतों । साहूं न शकें प्राण देतों । काय सांगूं स्वामिया ॥१७॥
आपणासी अन्न वैरी असतां । केवीं वांचावें गुरुनाथा । शरीर सर्व अन्नगता । केवीं वांचूं जगद्‌गुरु ॥१८॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । तुझी व्यथा गेली परियेसीं । औषध असे आम्हांपासीं । क्षण एकें सांगों तुज ॥१९॥
संशय न धरीं आतां मनीं । भिऊं नको अंतःकरणीं । व्याधि गेली पळोनि । भोजन करी धणीवरी ॥१२०॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । स्थिर झाला अंतःकरणीं । माथा ठेवूनि श्रीगुरुचरणीं । नमन केलें तया वेळीं ॥२१॥
इतुकिया अवसरीं । तया ग्रामींचा अधिकारी । विप्र एक अवधारीं । आला गंगास्नानासी ॥२२॥
तंव देखिलें श्रीगुरुसी । येऊनि लागला चरणांसी । नमन केलें भक्तीसीं । मनोवाक्कायकर्मे ॥२३॥
आश्वासोनि तये वेळीं । पुसती श्रीगुरू स्तोममौळी । कवण नाम कवण स्थळीं । वास म्हणती तयासी ॥२४॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । सांगतसे तो ब्राह्मण । गोत्र आपलें कौंडिण्य । आपस्तंब शाखेसीं ॥२५॥
नाम मज 'सायंदेव' असे । वास-स्थळ आपलें 'कडगंची'स । आलों असे उदरपूर्तीस । सेवा करितों यवनाची ॥२६॥
अधिकारपणें या ग्रामीं । वसों संवत्सर ऐका स्वामी । धन्य धन्य झालों आम्ही । तुमचे दर्शनमात्रेसीं ॥२७॥
तूं तारक विश्वासी । दर्शन दिधलें आम्हांसी । कृतार्थ झालों भरंवसीं । जन्मांतरींचे दोष गेले ॥२८॥
तुझा अनुग्रह होय ज्यासी । तरेल या भवार्णवासी । अप्रयत्नें आम्हांसी । दर्शन दिधलें स्वामिया ॥२९॥
श्लोक ॥ गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा । पापं तापं च दैन्यं च हरेच्छ्रीगुरुदर्शनम् ॥१३०॥
टीका ॥ गंगा देखितांचि पापें जाती । चंद्रदर्शनें ताप नासती । कल्पतरुची ऐसी गति । दैन्यवेगळा करी जाण ॥३१॥
तैसे नव्हती तुमचे दर्शनगुण । पाप-ताप दैन्यहरण । देखिले आजि तुमचे चरण । चतुर्वर्गफल पावलों ॥३२॥
ऐशी स्तुति करुनि । पुनरपि लागला श्रीगुरुचरणीं । जगद्‌गुरु अश्वासोनि । निरोप देती तया वेळीं ॥३३॥
श्रीगुरू म्हणती तयासी । आमुचें वाक्य परियेसीं । जठरव्यथा ब्राह्मणासी । प्राणत्याग करीतसे ॥३४॥
उपशमन याचे व्याधीसी । सांगों औषध तुम्हांसी । नेवोनि आपुले मंदिरासी । भोजन करवीं मिष्टान्न ॥३५॥
अन्न जेवितां याची व्यथा । व्याधि न राहे सर्वथा । घेऊनि जावें आतां त्वरिता । क्षुधाक्रांत विप्र असे ॥३६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे कर जोडून । प्राणत्याग करितां भोजन । या ब्राह्मणासी होतसे ॥३७॥
जेविला काल मासें एका । त्याणें प्राण जातो ऐका । अन्न देतां आम्हांसी देखा । ब्रह्महत्या त्वरित घडेल ॥३८॥
श्रीगुरु म्हणती सायंदेवासी । आम्ही औषधी देतों यासी । अपूपान्न-माषेसीं । क्षीरमिश्रित परमान्न ॥३९॥
अन्न जेवितां त्वरितेसीं । व्याधि जाईल परियेसीं । संशय न धरीं तूं मानसीं । त्वरित न्यावें गृहासी ॥१४०॥
अंगीकारोनि तया वेळीं । माथा ठेवी चरणकमळीं । विनवीतसे करुणाबहाळी । यावें स्वामी भिक्षेसी ॥४१॥
अंगीकारोनि श्रीगुरुनाथ । निरोप देती हो कां त्वरित । सिद्ध म्हणे ऐक मात । नामधारक शिष्योत्तमा ॥४२॥
आम्ही होतों तये वेळीं । समवेत-शिष्य सकळीं । जठरव्यथेचा विप्र जवळी ; । श्रीगुरू गेले भिक्षेसी ॥४३॥
विचित्र झालें त्याचे घरीं । पूजा केली परोपरी । पतिव्रता त्याची नारी । 'जाखाई' म्हणिजे परियेसा ॥४४॥
पूजा करिती श्रीगुरुसी । षोडशोपचारें परियेसीं । तेणेंचि रीतीं आम्हांसी । शिष्यां सकळिकां वंदिलें ॥४५॥
श्रीगुरुपूजा-विधान । विचित्र केलें अतिगहन । मंडळ केलें रक्तवर्ण । एकेकासी पृथक्-पृथक् ॥४६॥
पद्म रचूनि अष्टदळी । नानापरीचे रंगमाळी । पंचवर्ण चित्रमाळी । रचिली तियें परियेसा ॥४७॥
चित्रासन श्रीगुरुसी । तेणेंचिपरी सकळिकांसी । मंडळार्चनविधीसीं । करिती पुष्पगंधाक्षता ॥४८॥
संकल्पोनि विधीसीं । नमन केलें अष्टांगेसीं । माथा ठेवूनि चरणीं, न्यासी । पाद सर्वही अष्टांगीं ॥४९॥
षोडशोपचार विधीसीं । पंचामृतादि परियेसीं । रुद्रसूक्तमंत्रेसीं । चरण स्नापिले तये वेळीं ॥१५०॥
श्रीगुरुचरणीं अतिहर्षी । पूजा करीत षोडशी । तया विप्रा ज्ञान कैसी । चरणतीर्थ धरिता झाला ॥५१॥
तया चरणतीर्थासी । पूजा करीत भक्तीसीं । गीतवाद्यें आनंदेसीं । करी आरति नीरांजन ॥५२॥

अक्षय वाणें आरति । श्रीगुरुसी ओंवाळिती । मंत्रघोष अतिभक्तीं । पुष्पांजळी करिता झाला ॥५४॥
अनेकपरी गायन करी । नमन करी प्रीतिकरीं । पतिव्रता असे नारी । पूजा करिती उभयवर्ग ॥५५॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । पूजा केली परियेसीं । तेणेंचि विधीं शिष्यांसी । आम्हां समस्तांसी वंदिलें ॥५६॥
संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । वर देती अतिप्रीतीं । तुझी संतती होईल ख्याति । गुरुभक्ति वंशोवंशीं ॥५७॥
तूं जाणसी गुरुचा वास । अभिवृद्धि होय वंशोवंश । पुत्रपौत्रीं नांदाल हर्षी । गुरुभक्ति येणेंपरी ॥५८॥
ऐसें बोलोनि द्विजासी । आशीर्वचन देती अतिहर्षी । नमन करुनि श्रीगुरुसी । ठाय घातले तये वेळीं ॥५९॥
नानापरीचें पक्वान्न । अपूपादि माषान्न । अष्टविध परमान्न । शर्करासहित निवेदिलें ॥१६०॥
शाक पाक नानापरी वाढताति सविस्तारीं । भोजन करिती प्रीतिकरीं । श्रीगुरुमूर्ति परियेसा ॥६१॥
जठरव्यथेच्या ब्राह्मणें । भोजन केलें परिपूर्ण । व्याधि गेली तत्क्षण । श्रीगुरूचे कृपादृष्टीनें ॥६२॥
परीस लागतां लोहासी । सुवर्ण होय परियेसीं । दर्शन होतां श्रीगुरुसी । व्याधि कैंची सांग मज ॥६३॥
उदय जाहलिया दिनकरासी । संहार होतो अंधकारासी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । दैन्य कैंचें तया घरीं ॥६४॥
ऐसेपरी श्रीगुरुनाथें । भोजन केलें शिष्यासहित । आनंद झाला तेथें बहुत । विस्मय करिती सकळै जन ॥६५॥
अभिनव करिती सकळ जन । द्विजासी वैरी होतें अन्न । औषध झालें तेंचि अन्न । व्याधि गेली म्हणताति ॥६६॥
सिद्ध म्हणे नामधारकास । श्रीगुरुकृपा होय ज्यास । जन्मांतरींचे जाती दोष । व्याधि कैंची त्याचे देहीं ॥६७॥
गंगाधराचा नंदन । सरस्वती सांगे विस्तारोन । गुरुचरित्र कामधेनु । ऐका श्रोते एकचित्तें ॥६८॥
जे ऐकती भक्तीनें । व्याधि नसती त्यांचे भुवना । अखिल सौख्य पावती जाणा । सत्यं सत्यं पुनः सत्यं ॥६९॥
इति श्रीगुरुचरित्रामृते प<poem>
श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
नामधारक शिष्यराणा । लागे सिद्धाचिया चरणां । करसंपुट जोडूनि जाणा । विनवीतसे परियेसा ॥१॥
जय जया सिद्ध मुनी । तूं तारक या भवार्णी । सांगितलें ज्ञान प्रकाशोनि । स्थिर जाहलें मन माझें ॥२॥
गुरुचरित्रकथामृत । सेवितां तृष्णा अधिक होत । शमन करणार समर्थ । तूंचि एक कृपानिधि ॥३॥
गुरुचरित्र कामधेनु । सांगितलें तुम्हीं विस्तारोनु । तृप्त नव्हे माझें मनु । आणखी अपेक्षा होतसे ॥४॥
क्षुधेंकरुनि पीडिलें ढोर । जैसें पावे तृणबिढार । त्यातें होय मनोहर । नवचे तेथोनि परतोनि ॥५॥
एखादा न देखे तक्र स्वप्नीं त्यासी मिळे क्षीरबरणी । नोहे मन त्याचे धणी । केवीं सोडी तो ठाव ॥६॥
तैसा आपण स्वल्पज्ञानी नेणत होतों गुरु-निर्वाणी । अविद्यामाया वेष्टोनि । कष्टत होतों स्वामिया ॥७॥
अज्ञानतिमिररजनीसी । ज्योतिस्वरुप तूंचि होसी । प्रकाश केलें गा आम्हांसी । निजस्वरुप श्रीगुरुचें ॥८॥
तुवां केले उपकारासी । उत्तीर्ण काय होऊं सरसी । कल्पवृक्ष दिल्हेयासी । प्रत्युपकार काय द्यावा ॥९॥
एखादा देतां चिंतामणी । त्यासी उपकार काय धरणीं । नाहीं दिधलें न ऐकों कानीं । कृपामूर्ति सिद्धराया ॥१०॥
ऐशा तुझिया उपकारासी । उत्तीर्ण नोहे जन्मोजन्मेसीं । म्हणोनि लागतसे चरणांसी । एकोभावेंकरोनियां ॥११॥
स्वामीनीं निरोपिला धर्म-अर्थ । अधिक झाला मज स्वार्थ । उपजला मनीं परमार्थ । गुरुसी भजावें निरंतर ॥१२॥
प्रयागीं असतां गुरुमूर्ति । माधवसरस्वतीस दीक्षा देती । पुढें काय वर्तली स्थिति । आम्हांप्रती विस्तारावें ॥१३॥
ऐकोनि शिष्याचें वचन । सिद्धमुनि संतोषोन । मस्तकीं हस्त ठेवून । आश्वासिती तया वेळीं ॥१४॥
धन्य धन्य शिष्या सगुण । तुज लाधले श्रीगुरुचरण । संसार तारक भवार्ण । तूंचि एक परियेसा ॥१५॥
तुवां ओळखिली श्रीगुरुची सोय । म्हणोनि पुससी भक्तिभावें । संतोष होतो आनंदमय । तुझ्या प्रश्नेंकरुनियां ॥१६॥
सांगेन ऐक एकचित्तें । चरित्र गुरुचें विख्यातें । उपदेश देऊनि माधवातें । होते क्वचित्काळ तेथेंचि ॥१७॥
असतां तेथें वर्तमानीं । प्रख्यात झाली महिमा सगुणी । शिष्य झाले अपार मुनि । मुख्य माधवसरस्वती ॥१८॥
तया शिष्यांचीं नामें सांगतां । विस्तार होईल बहु कथा । प्रख्यात असती नामें सात । सांगेन ऐक एकचित्तें ॥१९॥
बाळसरस्वती कृष्णसरस्वती । उपेंद्र-माधवसरस्वती । पांचवा असे आणीक यति । सदानंदसरस्वती देखा ॥२०॥
ज्ञानज्योतिसरस्वती एक । सातवा सिद्ध आपण ऐक । अपार होते शिष्य आणिक । एकाहूनि एक श्रेष्ठ पैं ॥२१॥
त्या शिष्यांसमवेत । श्रीगुरु निघाले दक्षिणपंथ । समस्त क्षेत्रें पावन करित । आले पुन्हा कारंजनगरासी ॥२२॥
भेटी झाली जनकजननी । येवोनि लागताति चरणीं । चतुर्वर्ग भ्राते भगिनी । समस्त भेटती स्वामिया ॥२३॥
देखानियां श्रीगुरुमूर्तीसी नगरलोक अत्यंत हर्षी । आले समस्त भेटीसी । पूजा करिती परोपरी ॥२४॥
घरोघरीं श्रीगुरुसी । पाचारिती भिक्षेसी । जाहले रुपें बहुवसी । घरोघरीं पूजा घेती ॥२५॥
समस्त लोक विस्मय करिती । अवतार हा श्रीविष्णु निश्चितीं । वेषधारी दिसतो यति । परमपुरुष होय जाणा ॥२६॥
यातें नर जे म्हणती । ते नर जाती नरकाप्रती । कार्याकारण अवतार होती । ब्रह्माविष्णुमहेश्वर ॥२७॥
जननीजनक येणें रीतीं । पूजा करिती भावभक्तीं । श्रीगुरू झाले श्रीपादयति । जातिस्मृति जननीसी ॥२८॥
देखोनि जननी तये वेळीं । माथा ठेवी चरणकमळीं । सत्यसंकल्प चंद्रमौळी । प्रदोषपूजा आली फळा ॥२९॥
पतीस सांगे तया वेळीं । पूर्वजन्माचें चरित्र सकळीं । विश्ववंद्य पुत्र प्रबळी । व्हावा म्हणोनि आराधिलें म्यां ॥३०॥
याचि श्रीपाद-ईश्वराचें । पूजन केलें मनोवाचें । प्रसिद्ध झालें जन्म आमुचें । साफल्य केलें परियेसा ॥३१॥
म्हणोनि नमिती दोघेजणीं । विनविताति कर जोडूनि । उद्धरावें या भवार्णी । जगन्नाथा यतिराया ॥३२॥
श्रीगुरू म्हणती तयांसी । एकादे काळीं परियेसीं । पुत्र होय संन्यासी । उद्धरील कुळें बेचाळीस ॥३३॥
त्यासी शाश्वत ब्रह्मलोक । अचळ पद असे देख । त्याचे कुळीं उपजतां आणिक । त्यासीही ब्रह्मपद परियेसा ॥३४॥
यमाचे दुःखें भयाभीत । नोहे त्याचे पितृसंततींत । पूर्वज जरी नरकीं असत । त्यांसी शाश्वत ब्रह्मपद ॥३५॥
याकारणें आम्हीं देखा । घेतला आश्रम विशेखा । तुम्हां नाहीं यमाची शंका । ब्रह्मपद असे सत्य ॥३६॥
ऐसें सांगोनि तयांसी । आश्वासीतसे बहुवसी । तुमचे पुत्र शतायुषी । अष्टैश्वर्ये नांदती ॥३७॥
त्यांचे पुत्रपौत्र तुम्ही । पहाल सुखें तुमचे नयनीं । पावाल क्षेम काशीभुवनीं । अंतकाळीं परियेसा ॥३८॥
मुक्तिस्थान काशीपुर । प्रख्यात असे वेदशास्त्र । न करा मनीं चिंता मात्र । म्हणोनि सांगती तये वेळीं ॥३९॥
त्यांची कन्या असे एक । नाम तिचें 'रत्नाई' विशेष । श्रीगुरुसी नमूनि ऐक । विनवीतसे परियेसा ॥४०॥
विनवीतसे परोपरी । स्वामी मातें तारीं तारीं । बुडोनि जात्यें भवसागरीं । संसारमाया वेष्टोनियां ॥४१॥
संसार-तापत्रयासी । आपण भीतसें परियेसीं । निर्लिप्त करीं गा आम्हांसी । आपण तपासी जाईन ॥४२॥
ऐकोनि तियेचें वचन । श्रीगुरु निरोपिताति आपण । स्त्रियांसी पतिसेवाचरण । तेंचि तप परियेसा ॥४३॥
येणें या भावार्णवासी । कडे पडती परियेसीं । जैसा भाव असे ज्यासी । तैसें होईल परियेसा ॥४४॥
उतरावया पैल पार । स्त्रियांसी असे तो भ्रतार । मनें करोनि निर्धार । भजा पुरुष शिवसमानी ॥४५॥
त्यासी होय उद्धार गति । वेदपुराणें वाखाणिती । अंतःकरणीं न करीं खंती । तूतें गति होईल जाण ॥४६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे कर जोडून । श्रीगुरुमूर्ति ब्रह्मज्ञान । विनवीतसें अवधारीं ॥४७॥
तूं जाणसी भविष्यभूत । कैसें मातें उपदेशीत । माझें प्रालब्ध कवणगत । विस्तारावें मजप्रति ॥४८॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । तुझी वासना असे तपासी । संचित पाप असे तुजसी । भोगणें असे परियेसा ॥४९॥
पूर्वजन्मीं तूं परियेसीं । चरणीं लाथिलें धेनूसी । शेजारी स्त्रीपुरुषांसी । विरोधें लाविला कलह जाणा ॥५०॥
तया दोषास्तव देखा । तूतें बाधा असे अनेका । गायत्रीसी लाथिलें ऐका । तूं सर्वांगीं कुष्ठी होसील ॥५१॥
विरोध केला स्त्रीपुरुषांसी । तुझा पुरुष होईल तापसी । तूतें त्यजील भरंवसी । अर्जित तुझें ऐसें असे ॥५२॥

श्रीगुरू म्हणती ऐक बाळे । क्वचित्काळ असाल भले । अपरवयसा हौतांचि काळें । पति तुझा यति होये ॥५४॥
तदनंतर तुझा देह । कुष्ठी होईल अवेव । भोगूनि स्वदेहीं वय । मग होईल तुज गति ॥५५॥
नासतां तुझा देह जाण । भेटी होईल आमुचे चरण । तुझें पाप होईल दहन । सांगेन क्षेत्र ऐक पां ॥५६॥
भीमातीर दक्षिण देशीं । असे तीर्थ पापविनाशी । तेथें जाय तूं भरंवसीं । अवस्था तुज घडलियावरी ॥५७॥
या भूमंडळीं विख्यात । तीर्थ असे अति समर्थ । गंधर्वपुर असे ख्यात । अमरजासंगम प्रसिद्ध जाण ॥५८॥
ऐसें सांगोनि तियेसी । श्रीगुरू निघाले दक्षिण देशीं । त्र्यंबक-क्षेत्रासी । आले, गौतमी-उद्भव जेथें ॥५९॥
शिष्यांसहित गुरुमूर्ति । आले नाशिकक्षेत्राप्रती । तीर्थमहिमा असे ख्याति । पुराणांतरीं परियेसा ॥६०॥
तीर्थमहिमा सांगतां । विस्तार होईल बहु कथा । संक्षेपमार्गे तुज आतां । सांगतसें परियेसीं ॥६१॥
त्या गौतमीची महिमा । सांगतां अपार असे आम्हां । बहिरार्णव-उदक उगमा । ब्रह्मांडाव्यतिरिक्त ॥६२॥
जटामुकुटीं तीर्थेश्वर । धरिली होती प्रीतिकर । मिळोनि समस्त ऋषीश्वर । उपाय केला परियेसा ॥६३॥
ब्रह्मऋषि गौतम देखा । तपस्वी असे विशेषा । व्रीहि पेरिले वृत्तीं ऐका । अनुष्ठानस्थानाजवळी ॥६४॥
पूर्वी मुनी सकळी । नित्य पेरुनि पिकविती साळी । ऐसे त्यांचे मंत्र बळी । महापुण्यपुरुष असती ॥६५॥
समस्त ऋषि मिळोनि । विचार करिती आपुले मनीं । ऋषिगौतम महामुनी । सर्वेश्वराचा मुख्य दास ॥६६॥
त्यासी घालितां सांकडें । गंगा आणील आपुलें चाडें । समस्तां आम्हां पुण्य घडे । गंगास्नानें भूमंडळीं ॥६७॥
श्लोक ॥ या गतिर्योगयुक्तानां मुनीनामूर्ध्वरेतसाम् । सा गतिः सर्वजंतूनां गौतमीतीरवासिनाम् ॥६८॥
टीका ॥ ऊर्ध्वरेत मुनीश्वरांसी । कोटिवर्षे तपस्वियांसी । जे गति होय परियेसीं । ते स्नानमात्रें गौतमीच्या ॥६९॥
याकारणें गौतमीसीं । आणावें यत्नें भूमंडळासी । सांकडें घालितां गौतमासी । आणितां गंगा आम्हां लाभ ॥७०॥
म्हणोनि रचिली माव एक । दुर्वेची गाय सवत्सक । करोनि पाठविली ऐक । गौतमाचे ब्रीहिभक्षणासी ॥७१॥
ऋषि होता अनुष्ठानीं । देखिलें धेनूसी नयनीं । निवारावया तत्क्षणीं । दर्भ पवित्र सोडिले ॥७२॥
तेचि कुश जाहलें शस्त्र । धेनूसी लागलें जैसें वज्रास्त्र । पंचत्व पावली त्वरित । घडली हत्या गौतमासी ॥७३॥
मिळोनि समस्त ऋषिजन । प्रायश्चित्त देती जाण । गंगा भूमंडळीं आण । याविणें तुम्हां नाहीं शुद्धि ॥७४॥
याकारणें गौतमऋषीं । तप केलें सहस्त्र वर्षी । प्रसन्न झाला व्योमकेशी । वर माग म्हणितलें ॥७५॥
गौतम म्हणे सर्वेश्वरा । तुवां देशील मज वरा । उद्धरावया सचराचरा । द्यावी गंगा भूमंडळासी ॥७६॥
गौतमाचे विनंतीसी । निरोप दिधला गंगेसी । घेवोनि आला भूमंडळासी । पापक्षालनार्थ मनुष्यांचे ॥७७॥
ऐसी गंगाभागीरथी । कवणा वर्णावया सामर्थ्य । याचि कारणें श्रीगुरुनाथ । आले ऐक नामधारका ॥७८॥
ऐशी गौतमीतटाकयात्रा । श्रीगुरू आपण आचरीत । पुढें मागुती लोकानुग्रहार्थ । आपण हिंडे परियेसा ॥७९॥
तटाकयात्रा करितां देख । आले श्रीगुरु मंजरिका । तेथें होता मुनि एक । विख्यात 'माधवारण्य' ॥८०॥
सदा मानसपूजा त्यासी । नरसिंहमूर्ति परियेसीं । देखता झाला श्रीगुरुसी । मानसमूर्ति जैसी देखे ॥८१॥
विस्मित होऊनि मानसीं । नमिता झाला श्रीगुरुमूर्तीसी । स्तोत्र करीं बहुवसी । अतिभक्तीकरुनियां ॥८२॥
श्लोक ॥ यद्दिव्यपादद्वयमेवसाक्षाद् , अधिष्ठित देवनदीसमीपे । य उत्तरे तीरनिवासिरामो, लक्ष्मीपतिस्त्वं निवसन्स नित्यम् ॥८३॥
ओंव्या ॥ येणेंपरी श्रीगुरुसी । विनवी माधवारण्य हर्षी । श्रीगुरू म्हणती संतोषीं । तया माधवारण्यासी ॥८४॥
श्लोक ॥ अत्यंतमार्गस्थितिमार्गरुपं, अत्यंतयोगादधिकारतत्त्वम् । मार्गं च मार्गं च विचिन्वतो मे, मार्गोदयं माधव दर्शये ते ॥८५॥
ओंव्या ॥ ऐसें श्रीगुरू तयासी आश्वासोनि म्हणती हर्षी । निजस्वरुप तयासी । दाविते झाले परियेसा ॥८६॥
श्रीगुरुचें स्वरुप देखोनि । संतोषी झाला तो मुनि । विनवीतसे कर जोडूनि । नानापरी स्तुति करी ॥८७॥
जय जया जगद्गुरू । त्रयमूर्तीचा अवतारू । लोकां दिससी नरु । परमपुरुषा जगज्ज्योति ॥८८॥
तूं तारक विश्वासी । म्हणोनि भूमीं अवतरलासी । कृतार्थ केलें आम्हांसी । दर्शन दिधलें चरण आपुले ॥८९॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । स्तुति करीं तो तापसी । संतोष होऊन अति हर्षी । आश्वासिती तया वेळीं ॥९०॥
म्हणती श्रीगुरू तयासी । सिद्धि झाली तुझ्या मंत्रासी । तुज सद्गति भरंवसीं । ब्रह्मलोक प्राप्त होय ॥९१॥
नित्यपूजा तूं मानसीं । करिसी नृसिंहमूर्तीसी । प्रत्यक्ष होईल परियेसीं । न करीं संशय मनांत ॥९२॥
ऐसें सांगोनि तयासी । श्रीगुरू निघाले परियेसीं । आले वासरब्रह्मेश्वरासी । गंगातीर महाक्षेत्र ॥९३॥
तया गंगातटाकांत । श्रीगुरू समस्त शिष्यांसहित । स्नान करितां गंगेंत । आला तेथें विप्र एक ॥९४॥
कुक्षिव्यथा असे बहुत । तटाकीं असे लोळत । उदरव्यथा अत्यंत । त्यजूं पाहे प्राण देखा ॥९५॥
पोटव्यथा बहु त्यासी । नित्य करी तो उपवासासी । भोजन केलिया दुःख ऐसी । प्राणांतिक होतसे ॥९६॥
याकारणें द्विजवर । सदा करी फलाहार । अन्नासी त्यासी असे वैर । जेवितां प्राण त्यजूं पाहे ॥९७॥
पक्षमासां भोजन करी । व्यथा उठे त्याचे उदरीं । ऐसा किती दिवसवरी । कष्टत होता तो द्विज ॥९८॥
पूर्व दिवसीं तया ग्रामीं । आला सण महानवमी । जेविला मिष्टान्न मनोधर्मी । मासें एक पारणें केलें ॥९९॥
भोजन केलें अन्न बहुत । त्याणें पोट असे दुखत । गंगातीरीं असे लोळत । प्राण त्वरित त्यजूं पाहे ॥१००॥
दुःख करी द्विज अपार । म्हणे गंगेंत त्यजीन शरीर । नको आतां संसार । पापरुपें वर्तत ॥१॥
अन्न प्राण अन्न जीवन । कवण असेल अन्नावीण । अन्न वैरी झालें जाण । मरण बरवें आतां मज ॥२॥
मनीं निर्धार करोनि । गंगाप्रवेश करीन म्हणोनि । पोटीं पाषाण बांधोनि । गंगेमध्यें निघाला ॥३॥
मनीं स्मरे कर्पूरगौर । उपजलों आपण भूमिभार । केले नाहीं परोपकार । अन्नदानादिक देखा ॥४॥
न करीं पुण्य इह जन्मांत । जन्मांतरीं पूर्वी शत । पुण्यफळ असे दिसत । मग हे कष्ट भोगीतसें ॥६॥
अपूर्ती पूजा ईश्वराची । केली असेल निंदा गुरुची । अवज्ञा केली मातापितयांची । मग हे कष्ट भोगीतसें ॥७॥
अथवा पूर्वजन्मीं आपण । केलें असेल द्विजधिक्कारण । अतिथि आलिया न घालीं अन्न । वैश्वदेवसमयासी ॥८॥
अथवा मारिलें वोवरांसी । अग्नि घातला रानासी । वेगळें सांडूनि जनकजननींसी । स्त्रियेसहित मी होतों ॥९॥
मातापिता त्यजोनियां । असों सुखें जेवूनियां । पूर्वार्जितपापासोनियां । मग हे कष्ट भोगीतसें ॥११०॥
ऐसीं पापें आठवीत । विप्र जातो गंगेंत । तंव देखिलें श्रीगुरुनाथें । म्हणती बोलावा ब्राह्मणासी ॥११॥
आणा आणा त्या ब्राह्मणासी । प्राण त्यजितो कां सुखेसी । आत्महत्या महादोषी । पुसों कवण कवणाचा ॥१२॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । गेले शिष्य धांवोनि । द्विजवरातें काढोनि । आणिलें श्रीगुरुसन्मुख ॥१३॥
अनाथासी कल्पतरु । दुःखिष्टासी कृपासागरू । पुसतसे श्रीगुरू । तया दुःखिष्ट विप्रासी ॥१४॥
श्रीगुरू म्हणती तयासी । प्राण कां गा त्यजूं पाहसी । आत्महत्या महादोषी । काय वृत्तांत सांग आम्हां ॥१५॥
विप्र म्हणे गा यतिराया । काय कराल पुसोनियां । उपजोनि जन्म वायां । भूमिभार जाहलों असें ॥१६॥
मास-पक्षां भोजन करितों । उदरव्यथेनें कष्टतों । साहूं न शकें प्राण देतों । काय सांगूं स्वामिया ॥१७॥
आपणासी अन्न वैरी असतां । केवीं वांचावें गुरुनाथा । शरीर सर्व अन्नगता । केवीं वांचूं जगद्गुरु ॥१८॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । तुझी व्यथा गेली परियेसीं । औषध असे आम्हांपासीं । क्षण एकें सांगों तुज ॥१९॥
संशय न धरीं आतां मनीं । भिऊं नको अंतःकरणीं । व्याधि गेली पळोनि । भोजन करी धणीवरी ॥१२०॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । स्थिर झाला अंतःकरणीं । माथा ठेवूनि श्रीगुरुचरणीं । नमन केलें तया वेळीं ॥२१॥
इतुकिया अवसरीं । तया ग्रामींचा अधिकारी । विप्र एक अवधारी । आला गंगास्नानासी ॥२२॥
तंव देखिलें श्रीगुरुसी । येऊनि लागला चरणांसी । नमन केलें भक्तीसीं । मनोवाक्कायकर्मे ॥२३॥
आश्वासोनि तये वेळीं । पुसती श्रीगुरू स्तोममौळी । कवण नाम कवण स्थळीं । वास म्हणती तयासी ॥२४॥

नाम मज 'सायंदेव' असे । वास-स्थळ आपलें 'कडगंची'स । आलों असे उदरपूर्तीस । सेवा करितों यवनाची ॥२६॥
अधिकारपणें या ग्रामीं । वसों संवत्सर ऐका स्वामी । धन्य धन्य झालों आम्ही । तुमचे दर्शनमात्रेसीं ॥२७॥
तूं तारक विश्वासी । दर्शन दिधलें आम्हांसी । कृतार्थ झालों भरंवसीं । जन्मांतरींचे दोष गेले ॥२८॥
तुझा अनुग्रह होय ज्यासी । तरेल या भवार्णवासी । अप्रयत्नें आम्हांसी । दर्शन दिधलें स्वामिया ॥२९॥
श्लोक ॥ गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा । पापं तापं च दैन्यं च हरेच्छ्रीगुरुदर्शनम् ॥१३०॥
टीका ॥ गंगा देखितांचि पापें जाती । चंद्रदर्शनें ताप नासती । कल्पतरुची ऐसी गति । दैन्यवेगळा करी जाण ॥३१॥
तैसे नव्हती तुमचे दर्शनगुण । पाप-ताप दैन्यहरण । देखिले आजि तुमचे चरण । चतुर्वर्गफल पावलों ॥३२॥
ऐशी स्तुति करुनि । पुनरपि लागला श्रीगुरुचरणीं । जगद्गुरु अश्वासोनि । निरोप देती तया वेळीं ॥३३॥
श्रीगुरू म्हणती तयासी । आमुचें वाक्य परियेसीं । जठरव्यथा ब्राह्मणासी । प्राणत्याग करीतसे ॥३४॥
उपशमन याचे व्याधीसी । सांगों औषध तुम्हांसी । नेवोनि आपुले मंदिरासी । भोजन करवीं मिष्टान्न ॥३५॥
अन्न जेवितां याची व्यथा । व्याधि न राहे सर्वथा । घेऊनि जावें आतां त्वरिता । क्षुधाक्रांत विप्र असे ॥३६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे कर जोडून । प्राणत्याग करितां भोजन । या ब्राह्मणासी होतसे ॥३७॥
जेविला काल मासें एका । त्याणें प्राण जातो ऐका । अन्न देतां आम्हांसी देखा । ब्रह्महत्या त्वरित घडेल ॥३८॥
श्रीगुरु म्हणती सायंदेवासी । आम्ही औषधी देतों यासी । अपूपान्न-माषेसीं । क्षीरमिश्रित परमान्न ॥३९॥
अन्न जेवितां त्वरितेसीं । व्याधि जाईल परियेसीं । संशय न धरीं तूं मानसीं । त्वरित न्यावें गृहासी ॥१४०॥
अंगीकारोनि तया वेळीं । माथा ठेवी चरणकमळीं । विनवीतसे करुणाबहाळी । यावें स्वामी भिक्षेसी ॥४१॥
अंगीकारोनि श्रीगुरुनाथ । निरोप देती हो कां त्वरित । सिद्ध म्हणे ऐक मात । नामधारक शिष्योत्तमा ॥४२॥
आम्ही होतों तये वेळीं । समवेत-शिष्य सकळीं । जठरव्यथेचा विप्र जवळी ; । श्रीगुरू गेले भिक्षेसी ॥४३॥
विचित्र झालें त्याचे घरीं । पूजा केली परोपरी । पतिव्रता त्याची नारी । 'जाखाई' म्हणिजे परियेसा ॥४४॥
पूजा करिती श्रीगुरुसी । षोडशोपचारें परियेसीं । तेणेंचि रीतीं आम्हांसी । शिष्यां सकळिकां वंदिलें ॥४५॥
श्रीगुरुपूजा-विधान । विचित्र केलें अतिगहन । मंडळ केलें रक्तवर्ण । एकेकासी पृथक्-पृथक् ॥४६॥
पद्म रचूनि अष्टदळी । नानापरीचे रंगमाळी । पंचवर्ण चित्रमाळी । रचिली तियें परियेसा ॥४७॥
चित्रासन श्रीगुरुसी । तेणेंचिपरी सकळिकांसी । मंडळार्चनविधीसीं । करिती पुष्पगंधाक्षता ॥४८॥
संकल्पोनि विधीसीं । नमन केलें अष्टांगेसीं । माथा ठेवूनि चरणीं, न्यासी । पाद सर्वही अष्टांगीं ॥४९॥
षोडशोपचार विधीसीं । पंचामृतादि परियेसीं । रुद्रसूक्तमंत्रेसीं । चरण स्नापिले तये वेळीं ॥१५०॥
श्रीगुरुचरणीं अतिहर्षी । पूजा करीत षोडशी । तया विप्रा ज्ञान कैसी । चरणतीर्थ धरिता झाला ॥५१॥
तया चरणतीर्थासी । पूजा करीत भक्तीसीं । गीतवाद्यें आनंदेसीं । करी आरति नीरांजन ॥५२॥
अनुक्रमें श्रीगुरुपूजा । करिता झाला विधिवोजा । पुनरपि षोडशोपचारें पूजा । करीतसे भक्तीनें ॥५३॥
अक्षय वाणें आरति । श्रीगुरुसी ओंवाळिती । मंत्रघोष अतिभक्तीं । पुष्पांजळी करिता झाला ॥५४॥
अनेकपरी गायन करी । नमन करी प्रीतिकरीं । पतिव्रता असे नारी । पूजा करिती उभयवर्ग ॥५५॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । पूजा केली परियेसीं । तेणेंचि विधीं शिष्यांसी । आम्हां समस्तांसी वंदिलें ॥५६॥
संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । वर देती अतिप्रीतीं । तुझी संतती होईल ख्याति । गुरुभक्ति वंशोवंशीं ॥५७॥
तूं जाणसी गुरुचा वास । अभिवृद्धि होय वंशोवंश । पुत्रपौत्रीं नांदाल हर्षी । गुरुभक्ति येणेंपरी ॥५८॥
ऐसें बोलोनि द्विजासी । आशीर्वचन देती अतिहर्षी । नमन करुनि श्रीगुरुसी । ठाय घातले तये वेळीं ॥५९॥
नानापरीचें पक्वान्न । अपूपादि माषान्न । अष्टविध परमान्न । शर्करासहित निवेदिलें ॥१६०॥
शाक पाक नानापरी वाढताति सविस्तारीं । भोजन करिती प्रीतिकरीं । श्रीगुरुमूर्ति परियेसा ॥६१॥
जठरव्यथेच्या ब्राह्मणें । भोजन केलें परिपूर्ण । व्याधि गेली तत्क्षण । श्रीगुरूचे कृपादृष्टीनें ॥६२॥
परीस लागतां लोहासी । सुवर्ण होय परियेसीं । दर्शन होतां श्रीगुरुसी । व्याधि कैंची सांग मज ॥६३॥
उदय जाहलिया दिनकरासी । संहार होतो अंधकारासी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । दैन्य कैंचें तया घरीं ॥६४॥
ऐसेपरी श्रीगुरुनाथें । भोजन केलें शिष्यासहित । आनंद झाला तेथें बहुत । विस्मय करिती सकळै जन ॥६५॥
अभिनव करिती सकळ जन । द्विजासी वैरी होतें अन्न । औषध झालें तेंचि अन्न । व्याधि गेली म्हणताति ॥६६॥
सिद्ध म्हणे नामधारकास । श्रीगुरुकृपा होय ज्यास । जन्मांतरींचे जाती दोष । व्याधि कैंची त्याचे देहीं ॥६७॥
गंगाधराचा नंदन । सरस्वती सांगे विस्तारोन । गुरुचरित्र कामधेनु । ऐका श्रोते एकचित्तें ॥६८॥
जे ऐकती भक्तीनें । व्याधि नसती त्यांचे भुवना । अखिल सौख्य पावती जाणा । सत्यं सत्यं पुनः सत्यं ॥६९॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे करंजनगराभिगमनं तथा विप्रोदरव्यथानिरसनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥१३॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओवीसंख्या १६९) ॥ ॐ ॥
रमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे करंजनगराभिगमनं तथा विप्रोदरव्यथानिरसनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥१३॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओवीसंख्या १६९) ॥ ॐ ॥
ी जाणा । सत्यं सत्यं पुनः सत्यं ॥६९॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे करंजनगराभिगमनं तथा विप्रोदरव्यथानिरसनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥१३॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओवीसंख्या १६९) ॥ ॐ ॥
मकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे करंजनगराभिगमनं तथा विप्रोदरव्यथानिरसनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥१३॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओवीसंख्या १६९) ॥ ॐ ॥
भिक्षा केली ज्याचे भुवनीं । तयावरी संतोषोनि । प्रसन्न जाहले परियेसा ॥५॥गुरुभक्तीचा प्रकारु । पूर्ण जाणे तो द्विजवरु । पूजा केली विचित्रु । म्हणोनि आनंद परियेसा ॥६॥तया सायंदेव द्विजासी । श्रीगुरु बोलती संतोषीं । भक्त हो रे वंशोवंशीं । माझी प्रीति तुजवरी ॥७॥ऐकोनि श्रीगुरुचें वचन । सायंदेव विप्र करी नमन । माथा ठेवून चरणीं । न्यासिता झाला पुनःपुन्हा ॥८॥जय जया जगद्गुरु । त्रयमूर्तीचा अवतारू । अविद्यामाया दिससी नरु । वेदां अगोचर तुझी महिमा ॥९॥विश्वव्यापक तूंचि होसी । ब्रह्मा-विष्णु-व्योमकेशी । धरिला वेष तूं मानुषी । भक्तजन तारावया ॥१०॥तुझी महिमा वर्णावयासी । शक्ति कैंची आम्हांसी । मागेन एक आतां तुम्हांसी । तें कृपा करणें गुरुमूर्ति ॥११॥माझे वंशपारंपरीं । भक्ति द्यावी निर्धारीं । इह सौख्य पुत्रपौत्रीं । उपरी द्यावी सद्गति ॥१२॥ऐसी विनंति करुनी । पुनरपि विनवी करुणावचनीं । सेवा करितो द्वारयवनीं । महाशूरक्रूर असे ॥१३॥प्रतिसंवत्सरीं ब्राह्मणासी । घात करितो जीवेसीं । याचि कारणें आम्हांसी । बोलावीतसे मज आजि ॥१४॥जातां तया जवळी आपण । निश्चयें घेईल माझा प्राण । भेटी जाहली तुमचे चरण । मरण कैंचें आपणासी ॥१५॥संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । अभयंकर आपुले हातीं । विप्रमस्तकीं ठेविती । चिंता न करीं म्हणोनियां ॥१६॥भय सांडूनि तुवां जावें । क्रूर यवना भेटावें । संतोषोनि प्रियभावें । पुनरपि पाठवील आम्हांपाशीं ॥१७॥जंववरी तूं परतोनि येसी । असों आम्ही भरंवसीं । तुवां आलिया संतोषीं । जाऊं आम्ही येथोनि ॥१८॥निजभक्त आमुचा तूं होसी । पारंपर-वंशोवंशीं । अखिलाभीष्ट तूं पावसी । वाढेल संतति तुझी बहुत ॥१९॥तुझे वंशपारंपरीं । सुखें नांदती पुत्रपौत्रीं । अखंड लक्ष्मी तयां घरीं ।

यवन दुष्ट परियेसा । ब्राह्मणातें पाहतां कैसा । ज्वालारुप होता जाहला ॥२२॥विमुख होऊनि गृहांत । गेला यवन कोपत । विप्र जाहला भयचकित । मनीं श्रीगुरुसी ध्यातसे ॥२३॥।कोप आलिया ओळंबयासी । केवीं स्पर्शे अग्नीसी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । काय करील क्रूर दुष्ट ॥२४॥गरुडाचिया पिलियांसी । सर्प तो कवणेपरी ग्रासी । तैसें तया ब्राह्मणासी । असे कृपा श्रीगुरुची ॥२५॥कां एखादे सिंहासी । ऐरावत केवीं ग्रासी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । कलिकाळाचें भय नाहीं ॥२६॥ज्याचे ह्रुदयीं श्रीगुरुस्मरण । त्यासी कैंचें भय दारुण । काळमृत्यु न बाधे जाण । अपमृत्यु काय करी ॥२७॥ज्यासि नाहीं मृत्यूचें भय । त्यासी यवन असे तो काय । श्रीगुरुकृपा ज्यासी होय । यमाचें मुख्य भय नाहीं ॥२८॥ऐसेपरी तो यवन । अंतःपुरांत जाऊन । सुषुप्ति केली भ्रमित होऊन । शरीरस्मरण त्यासी नाहीं ॥२९॥ह्रुदयज्वाळा होय त्यासी । जागृत होवोनि परियेसीं । प्राणांतक व्यथेसीं । कष्टतसे तये वेळीं ॥३०॥स्मरण असें नसे कांहीं । म्हणे शस्त्रें मारितो घाई । छेदन करितो अवेव पाहीं । विप्र एक आपणासी ॥३१॥स्मरण जाहलें तये वेळीं । धांवत गेला ब्राह्मणाजवळी । लोळतसे चरणकमळीं । म्हणे स्वामी तूंचि माझा ॥३२॥येथें पाचारिलें कवणीं । जावें त्वरित परतोनि । वस्त्रें भूषणें देवोनि । निरोप देतो तये वेळीं ॥३३॥संतोषोनि द्विजवर । आला ग्रामा वेगवक्त्र । गंगातीरीं असे वासर । श्रीगुरुचे चरणदर्शना ॥३४॥देखोनियां श्रीगुरुसी । नमन करी तो भावेसीं । स्तोत्र करी बहुवसीं । सांगे वृत्तांत आद्यंत ॥३५॥संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । तया द्विजा आश्वासिती । दक्षिण देशा जाऊं म्हणती । स्थान-स्थान तीर्थयात्रे ॥३६॥ऐकोनि श्रीगुरूचें वचन । विनवीतसे कर जोडून । न विसंबें आतां तुमचे चरण । आपण येईन समागमें ॥३७॥तुमचे चरणाविणें देखा । राहों न शके क्षण एका । संसारसागरतारका । तूंचि देखा कृपासिंधु ॥३८॥उद्धरावया सगरांसी । गंगा आणिली भूमीसी । तैसें स्वामीं आम्हांसी । दर्शन दिधलें आपुलें ॥३९॥भक्तवत्सल तुझी ख्याति । आम्हां सोडणें काय निति । सवें येऊं निश्चितीं । म्हणोनि चरणीं लागला ॥४०॥येणेंपरी श्रीगुरुसी । विनवी विप्र भावेसीं । संतोषोनि विनयेसीं । श्रीगुरु म्हणती तये वेळीं ॥४१॥कारण असे आम्हां जाणें । तीर्थे असती दक्षिणे । पुनरपि तुम्हां दर्शन देणें । संवत्सरीं पंचदशीं ॥४२॥आम्ही तुमचे गांवासमीपत । वास करुं हें निश्चित । कलत्र पुत्र इष्ट भ्रात । मिळोनि भेटा तुम्ही आम्हां ॥४३॥न करा चिंता असाल सुखें । सकळ अरिष्टें गेलीं दुःखें । म्हणोनि हस्त ठेविती मस्तकें । भाक देती तये वेळीं ॥४४॥ऐसेपरी संतोषोनि । श्रीगुरु निघाले तेथोनि । जेथें असे आरोग्यभवानी । वैजनाथ महाक्षेत्र ॥४५॥समस्त शिष्यांसमवेत । श्रीगुरु आले तीर्थे पहात । प्रख्यात असे वैजनाथ । तेथें राहिले गुप्तरुपें ॥४६॥नामधारक विनवी सिद्धासी । काय कारण गुप्त व्हावयासी । होते शिष्य बहुवसी । त्यांसी कोठें ठेविलें ॥४७॥गंगाधराचा नंदनु । सांगे गुरुचरित्र कामधेनु । सिद्धमुनि विस्तारुन । सांगे नामकरणीस ॥४८॥पुढील कथेचा विस्तारु । सांगतां विचित्र अपारु । मन करुनि एकाग्रु । ऐका श्रोते सकळिक हो ॥४९॥इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे क्रूरयवनशासनं-सायंदेववरप्रदानं नाम चतुर्दशोऽध्यायः ॥१४॥श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥(ओवीसंख्या ४९)

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
ऐक शिष्या नामकरणी । धन्य धन्य तुझी वाणी । तुझी भक्ति गुरुचरणीं । लीन जाहली परियेसा ॥१॥
तूं मातें पुसतोसी । होत मन संतोषी । गौप्य व्हावया कारण कैसी । सांगेन ऐक एकचित्तें ॥२॥
महिमा प्रगट जाहली बहुत । तेणें भजती लोक अमित । काम्यार्थ व्हावे म्हणूनि समस्त । येती श्रीगुरुच्या दर्शना ॥३॥
साधु असाधु धूर्त सकळी । समस्त येती श्रीगुरुजवळी । वर्तमानीं खोटा कळी । सकळही शिष्य होऊं म्हणती ॥४॥
पाहें पां पूर्वी भार्गवराम अवतरोनि । निःक्षत्र केली मेदिनी । राज्य विप्रांसी देउनी । गेला आपण पश्चिमसमुद्रासी ॥५॥
पुनरपि जाती तयापासीं । तोही ठाव मागावयासी । याकारणें विप्रांसी । कांक्षा न सुटे परियेसा ॥६॥
उबगोनि भार्गवराम देखा । गेला सागरा मध्योदका । गौप्यरूपें असे ऐका । आणिक मागतील म्हणोनि ॥७॥
तैसे श्रीगुरुमूर्ति ऐक । राहिले गुप्त कारणिक । वर मागतील सकळिक । नाना याती येवोनियां ॥८॥
विश्वव्यापक जगदीश्वर । तो काय देऊं न शके वर । पाहूनि भक्ति पात्रानुसार । प्रसन्न होय परियेसा ॥९॥
याकारणें तया स्थानीं । श्रीगुरु होते गौप्यगुणीं । शिष्यां सकळांसि बोलावूनी । निरोप देती तीर्थयात्रे ॥१०॥
सकळ शिष्यां बोलावोनि । निरोप देती नृसिंहमुनि । समस्त तीर्थे आचरोनि । यावें भेटी श्रीशैल्या ॥११॥
ऐकोनि श्रीगुरुचे वचना । समस्त शिष्य धरिती चरणा । कृपामूर्ति श्रीगुरुराणा । कां उपेक्षिसी आम्हांसी ॥१२॥
तुमचे दर्शनमात्रेंसी । समस्त तीर्थे आम्हांसी । आम्हीं जावें कवण ठायासी । सोडोनि चरण श्रीगुरुचे ॥१३॥
समस्त तीर्थे श्रीगुरुचरणीं । ऐसें बोलती वेदवाणी । शास्त्रींही तेंचि विवरण । असे स्वामी प्रख्यात ॥१४॥
जवळी असतां निधान । केवीं हिंडावें रानोरान । कल्पवृक्ष सांडून । केवीं जावें देवराया ॥१५॥
श्रीगुरु म्हणती शिष्यांसी । तुम्ही आश्रमी संन्यासी । राहूं नये पांच दिवशीं । एके ठायीं वास करीत ॥१६॥
चतुर्थाश्रम घेऊनि । आचरावीं तीर्थे भुवनीं । तेणें मनीं स्थिर होऊनि । मग रहावें एकस्थानीं ॥१७॥
विशेष वाक्य आमुचें एक । अंगीकारणें धर्म अधिक । तीर्थे हिंडूनि सकळिक । मग यावें आम्हांपाशीं ॥१८॥
'बहुधान्य' नाम संवत्सरासी । येऊं आम्ही श्रीशैल्यासी । तेथें आमुचे भेटीसी । यावें तुम्हीं सकळिक हो ॥१९॥
ऐसेपरी शिष्यांसी । श्रीगुरु सांगती उपदेश । समस्त लागती चरणांस । ऐक शिष्या नामधारका ॥२०॥
शिष्य म्हणती श्रीगुरुस तुमचें वाक्य आम्हां परीस । जाऊं आम्ही भरंवसें । करुं तीर्थे भूमीवरी ॥२१॥
गुरुचें वाक्य जो न करी । तोचि पडे रौरव-घोरीं । त्याचें घर यमपुरी । अखंड नरक भोगी जाणा ॥२२॥
जावें आम्हीं कवण तीर्था । निरोप द्यावा गुरुनाथा । तुझें वाक्य दृढ चित्ता । धरुनि जाऊं स्वामिया ॥२३॥
जे जे स्थानीं निरोप देसी । जाऊं तेथें भरंवसीं । तुझे वाक्येंचि आम्हांसी । सिद्धि होय स्वामिया ॥२४॥
ऐकोनि शिष्यांचें वचन । श्रीगुरुमूर्ति प्रसन्नवदन । निरोप देती साधारण । तीर्थयात्रे शिष्यांसी ॥२५॥
या ब्रह्मांडगोलकांत । तीर्थराज काशी विख्यात । तेथें तुम्हीं जावें त्वरित । सेवा गंगाभागीरथी ॥२६॥
भागीरथीतटाकयात्रा । साठी योजनें पवित्रा । साठी कृच्छ्र-फळ तत्र । प्रयाग गंगाद्वारीं द्विगुण ॥२७॥
यमुनानदीतटाकेसी । यात्रा वीस गांव परियेसीं । कृच्छ्र तितुकेचि जाणा ऐसी । एकोमनें अवधारा ॥२८॥
सरस्वती म्हणजे गंगा । भूमीवरी असे चांगा । चतुर्विंशति गांवें अंगा । स्नान करावें तटाकीं ॥२९॥
तितुकेंचि कृच्छ्रफल त्यासी । यज्ञाचें फल परियेसीं । ब्रह्मलोकीं शाश्वतेसीं । राहे नर पितृसहित ॥३०॥
वरुणानदी कुशावर्ती । शतद्रू विपाशका ख्याती । वितस्ता नदी शरावती । नदी असती मनोहर ॥३१॥
मरुद्वृधा नदी थोर । असिक्नी मधुमती येर । पयस्वी घृतवतीतीर । तटाकयात्रा तुम्ही करा ॥३२॥
देवनदी म्हणिजे एक । असे ख्याति भूमंडळीक । पंधरा गांवें तटाक । यात्रा तुम्हीं करावी ॥३३॥
जितुके गांव तितके कृच्छ्र । स्नानमात्रें पवित्र । ब्रह्महत्यादि पातकें नाश तत्र । मनोभावें आचरावें ॥३४॥
चंद्रभागा रेवतीसी । शरयू नदी गोमतीसी । वेदिका नदी कौशिकेसी । नित्यजला मंदाकिनी ॥३५॥
सहस्त्रवक्त्रा नदी थोर । पूर्णा पुण्यनदी येर । बाहुदा नदी अरुणा थोर । षोडश गांवें तटाकयात्रा ॥३६॥
जेथें नदीसंगम असती । तेथें स्नानपुण्य अमिती । त्रिवेणीस्नानफळें असतीं । नदीचे संगमीं स्नान करा ॥३७॥
पुष्करतीर्थ वैरोचनि । सन्निहिता नदी म्हणूनि । नदीतीर्थ असे सगुणी । गयातीर्थी स्नान करा ॥३८॥
सेतुबंध रामेश्वरीं । श्रीरंग पद्मनाभ-सरीं । पुरुषोत्तम मनोहरी । नैमिषारण्य तीर्थ असे ॥३९॥
बदरीतीर्थ नारायण । नदी असती अति पुण्य । कुरुक्षेत्रीं करा स्नान । अनंत श्रीशैल्ययात्रेसी ॥४०॥
महालयतीर्थ देखा । पितृप्रीति तर्पणें ऐका । द्विचत्वारि कुळें निका । स्वर्गासी जाती भरंवसीं ॥४१॥
केदारतीर्थ पुष्करतीर्थ । कोटिरुद्र नर्मदातीर्थ । मातृकेश्वर कुब्जतीर्थ । कोकामुखी विशेष असे ॥४२॥
प्रसादतीर्थ विजयतीर्थ । पुरी चंद्रनदीतीर्थ । गोकर्ण शंखकर्ण ख्यात । स्नान बरवें मनोहर ॥४३॥
अयोध्या मथुरा कांचीसी । द्वारावती गयेसी । शालग्रामतीर्थासी । शबलग्राम मुक्तिक्षेत्र ॥४४॥
गोदावरीतटाकेसी । योजनें सहा परियेसीं । तेथील महिमा आहे ऐसी । वाजपेय तितुकें पुण्य ॥४५॥
सव्यअपसव्य वेळ तीनी । तटाकयात्रा मनोनेमीं । स्नान करितां होय ज्ञानी । महापातकी शुद्ध होय ॥४६॥
आणिक दोनी तीर्थे असतीं । प्रयागसमान असे ख्याति । भीमेश्वर तीर्थ म्हणती । वंजरासंगम प्रख्यात ॥४७॥
कुशतर्पण तीर्थ बरवें । तटाकयात्रा द्वादश गांवें । गोदावरी-समुद्रसंगमें । षट्‌त्रिंशत कृच्छ्रफळ ॥४८॥
पूर्णा नदीतटाकेंसी । चारी गांवें आचरा हर्षी । कृष्णावेणीतीरासी । पंधरा गांवें तटाकयात्रा ॥४९॥
तुंगभद्रातीर बरवें । तटाकयात्रा वीस गांवें । पंपासरोवर स्वभावें । अनंतमहिमा परियेसा ॥५०॥
हरिहरक्षेत्र असे ख्याति । समस्त दोष परिहरती । तैसीच असे भीमरथी । दहा गांवें तटाकयात्रा ॥५१॥
पांडुरंग मातुलिंग । क्षेत्र बरवें पुरी गाणग । तीर्थे असती तेथें चांग । अष्टतीर्थे मनोहर ॥५२॥
अमरजासंगमांत । कोटि तीर्थे असतीं ख्यात । वृक्ष असे अश्वत्थ । कल्पवृक्ष तोचि जाणा ॥५३॥
तया अश्वत्थसन्मुखेंसी । नृसिंहतीर्थ परियेसीं । तया उत्तरभागेसी । वाराणसी तीर्थ असे ॥५४॥
तया पूर्वभागेसी । तीर्थ पापविनाशी । तदनंतर कोटितीर्थ विशेष । पुढें रुद्रपादतीर्थ असे ॥५५॥
चक्रतीर्थ असे एक । केशव देवनायक । ते प्रत्यक्ष द्वारावती देख । मन्मथतीर्थ पुढें असे ॥५६॥
कल्लेश्वर देवस्थान । असे तेथें गंधर्वभुवन । ठाव असे अनुपम्य । सिद्धभूमि गाणगापूर ॥५७॥
तेथें जे अनुष्ठान करिती । तया इष्टार्थ होय त्वरितीं । कल्पवृक्ष आश्रयती । कान नोहे मनकामना ॥५८॥
काकिणीसंगम बरवा । भीमातीर क्षेत्र नांवा । अनंत पुण्य स्वभावा । प्रयागासमान असे देखा ॥५९॥
तुंगभद्रा वरदा नदी । संगमस्थानीं तपोनिधी । मलापहारीसंगमीं आधीं । पापें जातीं शतजन्मांचीं ॥६०॥
निवृत्तिसंगम असे ख्याति । ब्रह्महत्या नाश होती । जावें तुम्हीं त्वरिती । श्रीगुरु म्हणती शिष्यांसी ॥६१॥
सिंहराशीं बृहस्पति । येतां तीर्थे संतोषती । समस्त तीर्थी भागीरथी । येऊनियां ऐक्य होय ॥६२॥
कन्यागतीं कृष्णेप्रती । त्वरित येते भागीरथी । तुंगभद्रा तुळागती । सुरनदीप्रवेश परियेसा ॥६३॥
कर्काटकासी सूर्य येतां । मलप्रहरा कृष्णासंयुता । सर्व जन स्नान करितां । ब्रह्महत्या पापें जातीं ॥६४॥
भीमाकृष्णासंगमेसीं । स्नान करितां परियेसीं । साठ जन्म विप्रवंशीं । उपजे नर परियेसा ॥६५॥
तुंगभद्रासंगमीं देखा । त्याहूनि त्रिगुण अधिका । निवृत्तिसंगमीं ऐका । चतुर्गुण त्याहूनि ॥६६॥
पाताळगंगेचिये स्नानीं । मल्लिकार्जुनदर्शनीं । षड्‌गुण फल तयाहूनि । पुनरावृत्ति त्यासी नाहीं ॥६७॥
लिंगालयीं पुण्य द्विगुण । समुद्रकृष्णासंगमीं अगण्य । कावेरीसंगमीं पंधरा गुण । स्नान करा मनोभावें ॥६८॥

पयस्विनी नदी आणिक । भवनाशिनी अतिविशेष । सर्व पापें हरती ऐक । समुद्रस्कंधदर्शनें ॥७०॥
शेषाद्रिक्षेत्र श्रीरंगनाथ । पद्मनाभ श्रीमदनंत । पूजा करोनि जावें त्वरित । त्रिनामल्लक्षेत्रासी ॥७१॥
समस्त तीर्थांसमान । असे आणिक कुंभकोण । कन्याकुमारी-दर्शन । मत्स्यतीर्थीं स्नान करा ॥७२॥
पक्षितीर्थ असे बरवें । रामेश्वर धनुष्कोटी नावें । कावेरी तीर्थ बरवें । रंगनाथा संनिध ॥७३॥
पुरुषोत्तम चंद्रकुंडेसीं । महालक्ष्मी कोल्हापुरासी । कोटितीर्थ परियेसीं । दक्षिण काशी करवीरस्थान ॥७४॥
महाबळेश्वर तीर्थ बरवें । कृष्णाउगम तेथें पहावें । जेथें असे नगर 'बहें' । पुण्यक्षेत्र रामेश्वर ॥७५॥
तयासंनिध असे ठाव । कोल्हग्रामीं नृसिंहदेव । परमात्मा सदाशिव । तोचि असे प्रत्यक्ष ॥७६॥
भिल्लवडी कृष्णातीरीं । शक्ति असे भुवनेश्वरी । तेथें तप करिती जरी । तेचि ईश्वरीं ऐक्यता ॥७७॥
वरुणासंगमीं बरवें । तेथें तुम्ही मनोभावें । स्नान करा मार्कंडेय-नांवें । संगमेश्वरू पूजावा ॥७८॥
ऋषींचे आश्रम । कृष्णातीरीं असती उत्तम । स्नान करितां होय ज्ञान । तयासंनिध कृष्णेपुढें ॥७९॥
पुढें कृष्णाप्रवाहांत । अमरापुर असे ख्यात । पंचगंगासंगमांत । प्रयागाहूनि पुण्य अधिक ॥८०॥
अखिल तीर्थे तया स्थानीं । तप करिती सकळ मुनि । सिद्ध होय त्वरित ज्ञानी । अनुपम क्षेत्र परियेसा ॥८१॥
ऐसें प्रख्यात तया स्थानीं । अनुष्ठितां दिवस तीनी । अखिलाभीष्ट पावोनि । पावती त्वरित परमार्थी ॥८२॥
जुगालय तीर्थ बरवें । दृष्टीं पडतां मुक्त व्हावें । शूर्पालय तीर्थ बरवें । असे पुढें परियेसा ॥८३॥
विश्वामित्रऋषि ख्याति । तप 'छाया' भगवती । तेथें समस्त दोष जाती । मलप्रहरासंगमीं ॥८४॥
कपिलऋषि विष्णुमूर्ति । प्रसन्न त्यासि गायत्री । श्वेतशृंगीं प्रख्याति । उत्तरवाहिनी कृष्णा असे ॥८५॥
तया स्थानीं स्नान करितां । काशीहूनि शतगुणिता । एक मंत्र तेथें जपतां । कोटीगुणें फळ असे ॥८६॥
आणिक असे तीर्थ बरवें । केदारेश्वरातें पहावें । पीठापुरीं दत्तात्रेयदेव - । वास असे सनातन ॥८७॥
आणिक असे तीर्थ थोरी । प्रख्यात नामें मणिगिरि । सप्तऋषीं प्रीतिकरीं । तप केलें बहु दिवस ॥८८॥
वृषभाद्रि कल्याण नगरी । तीर्थे असतीं अपरंपारी । नव्हे संसारयेरझारी । तया क्षेत्रा आचरावें ॥८९॥
अहोबळाचें दर्शन । साठी यज्ञ पुण्य जाण । श्रीगिरीचें दर्शन । नव्हे जन्म मागुती ॥९०॥
समस्त तीर्थे भूमीवरी । आचरावीं परिकरी । रजस्वला होतां सरी । स्नान करितां दोष होय ॥९१॥
संक्रांति कर्कटिक धरुनि । त्यजावे तुम्हीं मास दोनी । नदीतीरीं वास करिती कोणी । त्यांसी कांहीं दोष नाहीं ॥९२॥
तयांमध्यें विशेष । त्यजावें तुम्हीं तीन दिवस । रजस्वला नदी सुरस । महानदी येणेंपरी ॥९३॥
भागीरथी गौतमीसी । चंद्रभागा सिंधूनदीसी । नर्मदा शरयू परियेसीं । त्यजावें तुम्हीं दिवस तीनी ॥९४॥
ग्रीष्मकाळीं सर्व नदींस । रजस्वला दहा दिवस । वापी-कूट-तटाकांस । एक रात्र वर्जावें ॥९५॥
नवें उदक जया दिवसीं । येतां ओळखा रजस्वलेसी । स्नान करितां महादोषी । येणेंपरी वर्जावें ॥९६॥
साधारण पक्ष तुम्हांसी । सांगितलीं तीर्थे परियेसीं । जें जें पहाल दृष्टीसीं । विधिपूर्वक आचरावें ॥९७॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । शिष्य सकळ करिती नमन । गुरुनिरोप कारण । म्हणोनि निघती सकळिक ॥९८॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । निरोप घेऊनि श्रीगुरुसी । शिष्य गेले यात्रेसी । राहिले श्रीगुरू गौप्यरुपें ॥९९॥
म्हणे सरस्वतीगंगाधर । पुढील कथेचा विस्तार । ऐकतां होय मनोहर । सकळाभीष्टें साधती ॥१००॥
गुरुचरित्र कामधेनु । श्रोते होवोनि सावधानु । जे ऐकती भक्तजनु । लाधती चारी पुरुषार्थ ॥१॥
ब्रह्मरसाची गोडी । सेवितों आम्हीं घडोघडी । ज्यांसी होय आवडी । साधे त्वरित परमार्थ ॥१०२॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे तीर्थयात्रा निरुपणं नाम पंचदशोऽध्यायः ॥१५॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओवीसंख्या १०२)

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
विनवी शिष्य नामांकित । सिद्धासी असे पुसत । सांगा स्वामी वृत्तांत । गुरुचरित्र विस्तारुनि ॥१॥
शिष्य समस्त गेले यात्रेसी । राहिले कोण गुरुपाशीं । पुढें कथा वर्तली कैसी । विस्तारावें दातारा ॥२॥
ऐकोनि शिष्याची वाणी । संतोषी झाले सिद्ध मुनि । धन्य धन्य शिष्या शिरोमणि । गुरुभक्ता नामधारका ॥३॥
अविद्यामायासुषुप्तींत । निजलें होतें माझें चित्त । तुजकरितां जाहलें चेत । ज्ञानज्योति-उदय मज ॥४॥
तूंचि माझा प्राणसखा । ऐक शिष्या नामधारका । तुजकरितां जोडलों सुखा । गुरुचरित्र आठवलें ॥५॥
अज्ञानतिमिरउष्णांत । पीडोनि आलों कष्टत । सुधामृतसागरांत । तुवां मातें लोटिलें ॥६॥
तुवां केले उपकारासी । संतुष्ट झालों मानसीं । पुत्रपौत्रीं तूं नांदसी । दैन्य नाहीं तुझे घरीं ॥७॥
गुरुकृपेचा तूं बाळक । तुज मानिती सकळ लोक । संदेह न करीं घे भाक । अष्टैश्वर्ये नांदसी ॥८॥
गुरुचरित्रकामधेनु । सांगेन तुज विस्तारुनु । श्रीगुरू राहिले गौप्य होऊन । वैजनाथसंनिधेसीं ॥९॥
समस्त शिष्य तीर्थेसी । स्वामीनिरोपें गेले परियेसीं । होतों आपण गुरुपाशीं । सेवा करीत अनुक्रमें ॥१०॥
संवत्सर एक तया स्थानीं । होते गौप्य श्रीगुरु मुनि । अंबा आरोग्यभवानी । स्नान बरवें मनोहर ॥११॥
असतां तेथें वर्तमानीं । आला ब्राह्मण एक मुनि । श्रीगुरुतें देखोनि । नमन करी भक्तिभावें ॥१२॥
माथा ठेवूनि चरणांवरी । स्तोत्र करी परोपरी । स्वामी मातें तारीं तारीं । अज्ञानसागरीं बुडालों ॥१३॥
तप करतों बहु दिवस । स्थिर नव्हे गा मानस । याचि कारणें ज्ञानास । न दिसे मार्ग आपणातें ॥१४॥
ज्ञानाविणें तापसा । वृथा होती सायास । तुम्हां देखतां मानसा । हर्ष जाहला आजि मज ॥१५॥
गुरुची सेवा बहुत दिवस । केली नाहीं सायासें । याचिकारणें मानस । स्थिर नव्हे स्वामिया ॥१६॥
तूं तारक विश्वासी । जगद्गुरू तूंचि होसी । उपदेश करावा आम्हांसी । ज्ञान होय त्वरितेसीं ॥१७॥
ऐकोनि मुनीचें वचन । श्रीगुरू पुसती हांसोन । जाहलासी तूं केवीं मुनि । गुरुविणें सांग मज ॥१८॥
ऐसें म्हणतां श्रीगुरुमूर्ति । मुनीच्या डोळां अश्रुपाती । दुःख दाटलें अपरमिति । ऐक स्वामी गुरुराया ॥१९॥
गुरु होता आपणासी एक । अतिनिष्ठुर त्याचें वाक्य । मातें गांजिलें अनेक । अकृत्य सेवा सांगे मज ॥२०॥
न सांगे वेदशास्त्र आपण । तर्कभाष्यादि व्याकरण । म्हणे तुझें अंतःकरण । स्थिर नव्हे अद्यापि ॥२१॥
म्हणोनि सांगे आणिक कांहीं । आपुलें मन स्थिर नाहीं । करी त्याचे बोल वायी । आणिक कोप करी मज ॥२२॥
येणेंपरी बहुत दिवशीं । होतों तया गुरुपाशीं । बोले मातें निष्ठुरेसीं । कोपोनि आलों तयावरी ॥२३॥
ऐकोनि तयाचें वचन । श्रीगुरुमूर्ति हास्यवदन । म्हणती ऐकें ब्राह्मणा । आत्मघातकी तूंचि होसी ॥२४॥
एखादा मूर्ख आपुले घरीं । मळ विसर्जी देव्हारीं । आपुलें अदृष्ट ऐसेपरी । म्हणोनि सांगे सकळिकां ॥२५॥
तैसें तुझें अंतःकरण । आपुलें नासिक छेदून । पुढिल्यातें अपशकुन । करुनि रहासी तूंचि एक ॥२६॥
न विचारिसी आपुले गुण । तूतें कैंचें होय ज्ञान । गुरुद्रोही तूंचि जाण । अल्पबुद्धि परियेसा ॥२७॥
आपुले गुरूचे गुणदोष । सदा उच्चार करिसी हर्षे । ज्ञान कैंचें होय मानस । स्थिर होय केवीं आतां ॥२८॥
जवळी असतां निधानु । कां हिंडावें रानोरानु । गुरु असतां कामधेनू । वंचूनि आलासी आम्हांजवळी ॥२९॥
गुरुद्रोही कवण नर । त्यासी नाहीं इह पर । ज्ञान कैंचें होय पुरें । तया दिवांधकासी ॥३०॥
जो जाणे गुरुची सोय । त्यासी सर्व ज्ञान होय । वेदशास्त्र सर्व होये । गुरु संतुष्ट होतांचि ॥३१॥
संतुष्टवितां श्रीगुरुसी । अष्टसिद्धि आपुले वशी । क्षण न लागतां परियेसीं । वेदशास्त्र त्यासी साध्य ॥३२॥
ऐकोनि श्रीगुरूचें वचन । माथा श्रीगुरुचरणीं ठेवून । विनवीतसे कर जोडून । करुणावचनेंकरुनियां ॥३३॥
जय जया जगद्गुरु । निर्गुण तूं निर्विकारु । ज्ञानसागर अपरांपरु । उद्धरावें आपणातें ॥३४॥
अज्ञानमाया वेष्टोन । नेणें गुरु कैसा कवण । सांगा स्वामी प्रकाशोन । ज्ञान होय आपणासी ॥३५॥
कैसा गुरु ओळखावा । कोणेपरी आहे सेवा । प्रकाश करोनि सांगावा । विश्ववंद्य गुरुमूर्ति ॥३६॥
जेणें माझें मन स्थिरु । होऊनि ओळखे सोयगुरु । तैसा करणें उपकारु । म्हणोनि चरणीं लागला ॥३७॥
करुणावचन ऐकोनि । श्रीगुरुनाथ संतोषोनि । सांगताति विस्तारोनि । गुरुसेवाविधान ॥३८॥
श्रीगुरु म्हणती ऐक मुनि । गुरु म्हणजे जनकजननी । उपदेशकर्ता आहे कोणी । तोचि जाण परम गुरु ॥३९॥
गुरु विरिंचि हर जाण । स्वरुप तोचि नारायण । मन करुनि निर्वाण । सेवा करावी भक्तीनें ॥४०॥
यदर्थी कथा एक । सांगों आम्ही तत्पर ऐक । आदिपर्वी असे निक । गुरुसेवा भक्तिभावें ॥४१॥
द्वापारांतीं परियेसीं । विप्र एक धौम्यऋषी । तिघे शिष्य होते त्यासी । वेदाभ्यास करावया ॥४२॥
एक 'आरुणी' पांचाळ । दुसरा 'बैद' केवळ । तिसरा 'उपमन्यु' बाळ । सेवा करिती विद्येलागीं ॥४३॥
पूर्वी गुरुची ऐसी रीति । शिष्याकरवीं सेवा घेती । अंतःकरण त्याचें पहाती । निर्वाणवरी शिष्याचें ॥४४॥
पाहोनियां अंतःकरण । असे भक्ति निर्वाण । कृपा करिती तत्क्षण । मनकामना पुरविती ॥४५॥
ऐसा धौम्यमुनि भला । तया आरूणी-पांचाळा । एके दिवशीं निरोप दिल्हा । ऐक द्विजा एकचित्तें ॥४६॥
शिष्यासी म्हणे धौम्यमुनि । आजि तुवां जावोनि रानीं । वृत्तीसी न्यावें तटाकपाणी । जंववरी होय तृप्त भूमि ॥४७॥
असे वृत्ति तळें खालीं । तेथें पेरिली असे साळी । तेथें नेवोनि उदक घालीं । शीघ्र म्हणे शिष्यासी ॥४८॥
ऐसा गुरुचा निरोप होतां । गेला शिष्य धांवत । तटाक असे पाहतां । कालवा थोर वहातसे ॥४९॥
जेथें उदक असे वहात । अतिदरारा गर्जत । वृत्तिभूमि उन्नत । उदक केवीं चढों पाहे ॥५०॥
म्हणे आतां काय करुं । कोपतील मातें श्रीगुरु । उदक जातसे दरारू । केवीं बांधूं म्हणतसे ॥५१॥
आणूनियां शिळा दगड । बांधिता जाहला उदका आड । पाणी जातसे धडाड । जाती पाषाण वाहोनियां ॥५२॥
प्रयत्न करी नानापरी । कांहीं केलिया न चढे वारी । म्हणे देवा श्रीहरि । काय करुं म्हणतसे ॥५३॥
मग मनीं विचार करी । गुरूचे शेतीं न चढे वारी । प्राण त्यजीन निर्धारीं । गुरुचे वृत्तीनिमित्त ॥५४॥
निश्चय करुनि मानसीं । मनीं ध्याई श्रीगुरुसी । म्हणे आतां उपाय यासी । योजूनि यत्न करावा ॥५५॥
घालितां उदकप्रवाहांत । जाती पाषाण वहात । आपण आड पडों म्हणत । निर्धारिलें तया वेळीं ॥५६॥
दोन्ही हातीं धरीं दरडी । पाय टेकी दुसरेकडी । झाला आपण उदकाआड । मनीं श्रीगुरुसी ध्यातसे ॥५७॥
ऐसा शिष्यशिरोमणि । निर्वाण मन करितांक्षणीं । वृत्तीकडे गेलें पाणी । प्रवाहाचें अर्ध देखा ॥५८॥
अर्ध पाणी जैसें तैसें । वाहतसे नित्यसरिसें । तयामध्यें शिष्य संतोषें । बुडाला असे अवधारा ॥५९॥
ऐसा शिष्य तया स्थानीं । बुडाला असे प्रवाहपाणीं । गुरुची वृत्ति जाहली धणी । उदकपूर्ण परियेसा ॥६०॥
त्याचा गुरु धौम्यमुनि । विचार करी आपुले मनीं । दिवस गेला अस्तमानीं । अद्यापि शिष्य न ये म्हणे ॥६१॥
ऐसें आपण विचारीत । गेला आपुले वृत्तींत । जाहलें असे उदक बहुत । न देखे शिष्य तया स्थानीं ॥६२॥
म्हणे शिष्या काय जाहलें । किंवा भक्षिलें व्याघ्रव्याळें । उदकानिमित्त कष्ट केले । कोठें असे म्हणतसे ॥६३॥
ऐसें मनीं विचारीत । उंच स्वरें पाचारीत । अरे शिष्या सखया म्हणत । प्रेमभावें बोलावी ॥६४॥
येणेंपरी करुणावचनीं । पाचारीतसे धौम्यमुनि । शब्द पडे शिष्यकानीं । तेथूनि मग निघाला ॥६५॥
येवोनियां श्रीगुरुसी । नमन केलें भावेसीं । धौम्यमुनी महाहर्षी । आलिंगोनि आश्वासिलें ॥६६॥
वर दिधला तया वेळीं । ऐक शिष्या स्तोममौळी । तूतें विद्या आली सकळी । वेदशास्त्रादि व्याकरण ॥६७॥
ऐसें म्हणतां तत्क्षणीं । झाला विद्यावंत ज्ञानी । लागतसे गुरुचरणीं । भक्तिभावेंकरुनियां ॥६८॥

निरोप घेऊनि शिष्यराणा । गेला आपुले स्थाना । आणिक दोघे शिष्य जाणा । होते तया गुरुजवळी ॥७०॥
दुसरा शिष्य 'बैद' जाणा । गुरुची करी शुश्रूषणा । त्याचे पहावया अंतःकरणा । धौम्य गुरु म्हणतसे ॥७१॥
धौम्य म्हणे शिष्यासी । सांगेन एक तुजसी । तुवां जाऊनि अहर्निशीं । वृत्ति आमुची रक्षिजे ॥७२॥
रक्षूनियां वृत्तीसी । आणावें धान्य घरासी । ऐसें म्हणतां महाहर्षी । गेला तया वृत्तीकडे ॥७३॥
वृत्ति पिके जंववरी । अहोरात्रीं कष्ट करी । राशी होतां अवसरीं । आला आपुले गुरुपाशीं ॥७४॥
सांगता जाहला श्रीगुरुसी । म्हणे व्रीही भरले राशीं । आतां आणावें घरासी । काय निरोप म्हणतसे ॥७५॥
मग म्हणे धौम्यमुनि । बा रे शिष्या शिरोमणि । कष्ट केले बहुत रानीं । आतां धान्य आणावें ॥७६॥
म्हणोनि देती एक गाडा । तया जुंपोनि एक रेडा । गुरु म्हणे जावें पुढा । शीघ्र यावें म्हणतसे ॥७७॥
एकीकडे जुंपी रेडा । आपण ओढी दुसरीकडा । येणेंपरी घेवोनि गाडा । आला तया वृत्तीजवळी ॥७८॥
दोनी खंडी साळीसी । भरी शिष्य गाडियासी । एकीकडे रेडियासी । जुंपोनि ओढी आपण देखा ॥७९॥
रेडा चाले शीघ्रेंसीं । आपण न ये तयासरसी । मग आपुले कंठासी । बांधिता झाला जूं देखा ॥८०॥
सत्राणें तयासरसी । चालत आला मार्गासी । रुतला रेडा चिखलेंसीं । आपुले गळां ओढीतसे ॥८१॥
चिखलीं रुतला रेडा म्हणोनि । चिंता करी बहु मनीं । आपण ओढी सत्राणीं । गळां फांस पडे जैसा ॥८२॥
सोडूनियां रेडियासी । काढिलें शिष्यें गाडियासी । ओढितां आपुले गळां फांसी । पडूनि प्राण त्यजूं पाहे ॥८३॥
इतुकें होतां निर्वाणीं । सन्मुख पातला धौम्यमुनि । त्या शिष्यातें पाहोनि नयनीं । कृपा अधिक उपजली ॥८४॥
सोडूनियां शिष्यातें । आलिंगोनि करूणाभरितें । वर दिधला अभिमतें । संपन्न होसी वेदशास्त्रीं ॥८५॥
वर देतां तत्क्षणेसीं । सर्व विद्या आली त्यासी । निरोप घेऊनियां घरासी । गेला शिष्य परियेसा ॥८६॥
तिसरा शिष्य उपमन्यु । सेवेविषयीं महानिपुण । गुरुची सेवा-शुश्रूषण । बहु करी परियेसा ॥८७॥
त्यासी व्हावा बहुत आहार । म्हणोनि विद्या नोहे स्थिर । त्यासी विचार करीत तो गुरु । यातें करावा उपाय एक ॥८८॥
त्यासी म्हणे धौम्यमुनि । तुज सांगतों म्हणोनि । नित्य गुरें नेऊनि रानीं । रक्षण करीं तृणचारें ॥८९॥
ऐसें म्हणतां गुरुमुनि । नमन करी त्याचे चरणीं । गुरें नेऊनियां रानीं । चारवीत बहुवस ॥९०॥
क्षुधा लागतां आपणासी । शीघ्र आणिलीं घरासी । कोपें गुरु तयासी । म्हणे शीघ्र येतोसि कां रे ॥९१॥
सूर्य जाय अस्तमानीं । तंववरी राखीं गुरें रानीं । येणेंपरी प्रतिदिनीं । वर्तावें तुवां म्हणतसे ॥९२॥
अंगीकारोनि शिष्यराणा । गुरें घेवोनि गेला राना । क्षुधाक्रांत होऊनि जाणा । चिंतीतसे श्रीगुरुसी ॥९३॥
चरती गुरें नदीतीरीं । आपण तेथें स्नान करी । तयाजवळी घरें चारी । असती विप्रआश्रम तेथें ॥९४॥
जाऊनियां तया स्थाना । भिक्षा मागे परिपूर्ण । भोजन करी सावधान । गोधन रक्षी येणेंपरी ॥९५॥
येणेंपरी प्रतिदिवशीं । रक्षूनि आणी गुरें निशीं । वर्ततां ऐसें येरे दिवशीं । पुसता झाला धौम्यमुनि ॥९६॥
गुरु म्हणे शिष्यासी । तूं नित्य उपवासी । तुझा देह पुष्टीसी । कवणेपरी होतसे ॥९७॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । सांगे शिष्य उपमन्य । भिक्षा करितों प्रतिदिन । विप्रांघरीं तेथें देखा ॥९८॥
भोजन करुनि प्रतिदिवसीं । गुरें घेवोनि येतों निशीं । श्रीगुरु म्हणती तयासी । आम्हां सांडूनि केवीं भुक्ती ॥९९॥
भिक्षा मागोनि घरासी । आणोनि द्यावी प्रतिदिवसीं । मागुती जावें गुरांपाशीं । घेऊन यावें निशिकाळीं ॥१००॥
गुरुनिरोपें येरे दिवशीं । गुरें नेऊनि रानासी । मागे भिक्षा नित्य जैसी । नेऊनि दिधली घरांत ॥१॥
घरीं त्यासी भोजन । कधीं नव्हे परिपूर्ण । पुनरपि जाई तया स्थाना । भिक्षा करुनि जेवीतसे ॥२॥
नित्य भिक्षा वेळां दोनी । पहिली भिक्षा देवोनि सदनीं । दुसरी आपण भक्षूनि । काळ ऐसा कंठीतसे ॥३॥
येणेंपरी किंचित्काळ । वर्ततां जाहला महास्थूळ । एके दिवशीं गुरु कृपाळ । पुसतसे शिष्यातें ॥४॥
शिष्य सांगे वृत्तांत । जेणें आपुली क्षुधा शमत । नित्य भिक्षा मागत । वेळ दोनी म्हणतसे ॥५॥
एक वेळ घरासी । आणोनि देतों प्रतिदिवसीं । भिक्षा दुसरे खेपेसी । करितों भोजन आपण ॥६॥
ऐसें म्हणतां धौम्यमुनि । तया शिष्यावरी कोपोनि । म्हणे भिक्षा वेळ दोनी । आणूनि घरीं देईं पां ॥७॥
गुरुनिरोप जेणेंपरी । दोनी भिक्षा आणूनि घरीं । देता जाहला प्रीतिकरीं । मनीं क्लेश न करीच ॥८॥
गुरेंसहित रानांत । असे शिष्य क्षुधाक्रांत । गोवत्स होतें स्तन पीत । देखता जाहला तयासी ॥९॥
स्तन पीतां वांसुरासी । उच्छिष्ट गळे संधींसी । वायां जातें भूमीसी । म्हणोनि आपण जवळी गेला ॥११०॥
आपण असे क्षुधाक्रांत । म्हणोनि गेला धांवत । पसरुनिया दोनी हात । धरी उच्छिष्ट क्षीर देखा ॥११॥

ऐसें क्षीरपान करीं । घेऊनि आपुलें उदर भरी । दोनी वेळ भिक्षा घरीं । देतसे भावभक्तीनें ॥१२॥
अधिक पुष्ट जाहला त्याणें । म्हणे गुरु अवलोकून । पहा हो याचें शरीरलक्षण । कैसा स्थूळ होतसे ॥१३॥
मागुती पुसे तयासी । कवणेपरी पुष्ट होसी । सांगे आपुले वृत्तांतासी । उच्छिष्ट क्षीर पान करितों ॥१४॥
ऐकोनि म्हणे शिष्यासी । मतिहीन होय उच्छिष्टेंसीं । दोष असे बहुवसी । भक्षूं नको आजिचेनी ॥१५॥
भक्षूं नको म्हणे गुरू । नित्य नाहीं तया आहारु । दुसरे दिवशीं म्हणे येरु । काय करुं म्हणतसे ॥१६॥
येणेंपरी गुरेंसहित । जात होता रानांत । गळत होतें क्षीर बहुत । एका रुईचे झाडासी ॥१७॥
म्हणे बरवें असे क्षीर । उच्छिष्ट नव्हे निर्धार । पान करूं धणीवर । म्हणोनि तेथें बैसला ॥१८॥
पानें तोडूनि कुसरीं । तयामध्यें क्षीर भरी । घेत होता धणीवरी । तंव भरिलें अक्षियांत ॥१९॥
तेणें गेले नेत्र दोनी । हिंडतसे रानोवनीं । गुरें न दिसती नयनीं । म्हणोनि चिंता करीतसे ॥१२०॥
काष्ट नाहीं अक्षिहीन । करीतसे चिंता गोधना । गुरें पाहों जातां राना । पडिला एका आडांत ॥२१॥
पडोनियां आडांत । चिंता करी तो अत्यंत । आतां गुरें गेलीं सत्य । बोल गुरुचा आला मज ॥२२॥
पडिला शिष्य तया स्थानीं । दिवस गेला अस्तमानीं । चिंता करी धौम्यमुनि। अजूनि शिष्य न येचि कां ॥२३॥
म्हणोनि गेला रानासी । देखे तेथें गोधनासी । शिष्य नाहीं म्हणोनि क्लेशीं । दीर्घस्वरें पाचारी ॥२४॥
पाचारितां धौम्यमुनि। ध्वनि पडला शिष्यकानीं । प्रत्योत्तर देतांक्षणीं । जवळी गेला कृपाळु ॥२५॥
ऐकोनियां वृत्तांत । उपजे कृपा अत्यंत । अश्विनी देवा स्तवीं म्हणत । निरोप दिधला तये वेळीं ॥२६॥
निरोप देतां तये क्षणीं । अश्विनी देवता ध्याय मनीं । दृष्टि आली दोनी नयनीं । आला श्रीगुरुसन्मुखेसीं ॥२७॥
येवोनि श्रीगुरुसी । नमन केलें भक्तीसीं । स्तुति केली बहुवसी । शिष्योत्तमें तये वेळीं ॥२८॥
संतोषोनि धौम्यमुनी । तया शिष्या आलिंगोनि । म्हणे शिष्या शिरोमणी । तुष्टलों तुझ्या भक्तीसी ॥२९॥
प्रसन्न होऊनि शिष्यासी । हस्त स्पर्शी मस्तकेसी । वेदशास्त्रादि तत्क्षणेसी । आलीं तया शिष्यातें ॥१३०॥
गुरु म्हणे शिष्यासी । जावें आपुले घरासी । विवाहादि करुनि सुखेसीं । नांदत ऐस म्हणतसे ॥३१॥
होईल तुझी बहु कीर्ति । शिष्य होतील तुज अत्यंती । 'उत्तंक' नाम विख्याति । शिष्य तुझा परियेसीं ॥३२॥
तोचि तुझ्या दक्षिणेसी । आणील कुंडलें परियेसीं । जिंकोनियां शेषासी । कीर्तिवंत होईल ॥३३॥
जन्मेजय रायासी । तोच करील उपदेशी । मारवील समस्त सर्पांसी । याग करुनि परियेसा ॥३४॥
तोचि उत्तंक जाऊन । पुढें केला सर्पयज्ञ । जन्मेजयातें प्रेरुन । समस्त सर्प मारविले ॥३५॥
ख्याति जाहली त्रिभुवनांत । तक्षक आणिला इंद्रासहित । गुरुकृपेचें सामर्थ्य । ऐसें असे परियेसा ॥३६॥
जो नर असेल गुरुदूषक । त्यासी कैंचा परलोक । अंतीं होय कुंभीपाक । गुरुद्रोह-पातक्यासी ॥३७॥
संतुष्ट करितां गुरुसी । काय न साधे तयासी । वेदशास्त्र तयासी । लाधे क्षण न लागतां ॥३८॥

त्याचें मन संतुष्टवितां । तुज मंत्र साध्य तत्त्वता । मन करुनि सुनिश्चिता । त्वरित जाईं म्हणितलें ॥१४०॥
ऐसा श्रीगुरू निरोप देतां । विप्र जाहला अतिज्ञाता । चरणांवरी ठेवूनि माथा । विनवीतसे तया वेळीं ॥४१॥
जय जया गुरुमूर्ति । तूंचि साधन परमार्थी । मातें निरोपिलें प्रीतीं । तत्त्वबोध कृपेनें ॥४२॥
गुरुद्रोही आपण सत्य । अपराध घडले मज बहुत । गुरुचें दुखविलें चित्त । आतां केवीं संतुष्टवावें ॥४३॥
सुवर्णादि लोह सकळ । भिन्न होतां सांधवेल । भिन्न होतां मुक्ताफळ । केवीं पुन्हा ऐक्य होय ॥४४॥
अंतःकरण भिन्न होतां । प्रयास असे ऐक्य करितां । ऐसें माझें मन पतित । काय उपयोग जीवूनि ॥४५॥
ऐसें शरीर माझें द्रोही । काय उपयोग वांचून पाहीं । जीवित्वाची वासना नाहीं । प्राण त्यजीन गुरुप्रति ॥४६॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । विनविती ब्राह्मण हर्षी । नमूनि निघे वैराग्येसीं । निश्चय केला प्राण त्यजूं ॥४७॥
अनुतप्त जाहला तो ब्राह्मण । निर्मळ जाहलें अंतःकरण । अग्नि लागतां जैसें तृण । भस्म होय तत्क्षणीं ॥४८॥
जैसा कापूरराशीसी । वन्हि लागतां परियेसीं । जळोनि जाय त्वरितेसीं । तैसें तयासी जहालें ॥४९॥
याकारणें पापासी । अनुतप्त होतां मानसीं । क्षालण होय त्वरितेसीं । शतजन्मींचें पाप जाय ॥१५०॥
निर्वाणरुपें द्विजवर । निघाला त्यजूं कलेवर । ओळखोनियां जगद्गुरु । पाचारिती तयावेळीं ॥५१॥
बोलावोनि ब्राह्मणासी । निरोप देती कृपेसीं । न करीं चिंता तूं मानसीं । गेले तुझे दुरितदोष ॥५२॥
वैराग्य उपजलें तुझ्या मनीं । दुष्कृतें गेलीं जळोनि । एकचित्त करुनि मनीं । स्मरें आपुले गुरुचरण ॥५३॥
तये वेळीं श्रीगुरुसी । नमन केलें चरणासी । जगद्गुरु तूंचि होसी । त्रिमूर्तीचा अवतार ॥५४॥
तुझी कृपा होय जरी । पापें कैंचीं या शरीरीं । उदय होतां भास्करीं । अंधकार राहे केवीं ॥५५॥
ऐसेपरी श्रीगुरुसी । स्तुति करी तो भक्तीसीं । रोमांचळ उठती हर्षी । सददित कंठा जाहला ॥५६॥
निर्मळ मानसीं तयावेळीं । माथा ठेवी चरणकमळीं । विनवीतसे करुणाबहाळीं । म्हणे तारीं तारीं श्रीगुरुमूर्ति ॥५७॥
निर्वाण देखोनि अंतःकरण । प्रसन्न जाहला श्रीगुरु आपण । मस्तकीं ठेविती कर दक्षिण । तया ब्राह्मणासी परियेसा ॥५८॥
परीस लागतां लोहासी । सुवर्ण होय बावनकसी । तैसें तया द्विजवरासी । ज्ञान जहालें परियेसा ॥५९॥
वेदशास्त्रादि तात्काळी । मंत्रशास्त्रें आलीं सकळीं । प्रसन्न जहाला चंद्रमौळी । काय सांगूं दैव त्या द्विजाचें ॥१६०॥
आनंद जाहला ब्राह्मणासी । श्रीगुरु निरोपिती तयासी । आमुचें वाक्य तूं परियेसीं । जाय त्वरित आपुले गुरुपाशीं ॥६१॥
जावोनियां गुरुपाशीं । नमन करीं भावेसीं । संतोषी होईल भरंवसीं । तोचि आपण सत्य मानीं ॥६२॥
ऐसेपरी श्रीगुरुमूर्ति । तया ब्राह्मणा संभाषिती । निरोप घेऊनियां त्वरिती । गेला आपल्या गुरुपाशीं ॥६३॥
निरोप देऊनि ब्राह्मणासी । श्रीगुरु निघाले परियेसीं । 'भिल्लवडी' ग्रामासी । आले भुवनेश्वरी-संनिध ॥६४॥
कृष्णापश्चिमतटाकेसी । औदुंबर वृक्ष परियेसीं । श्रीगुरु राहिले गुप्तेसीं । एकचित्तें परियेसा ॥६५॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । राहिले श्रीगुरु भिल्लवडीसी । महिमा जाहली बहुवसी । प्रख्यात तुज सांगेन ॥६६॥
म्हणोनि सरस्वतीगंगाधर । सांगे गुरुचरित्रविस्तार । ऐकतां होय मनोहर । सकळाभीष्टें साधती ॥१६७॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णनं नाम षोडशोऽध्यायः ॥१६॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओंवीसंख्या १६७)

; श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
सिद्ध म्हणे नामकरणी । गुरुभक्तशिखामणि । तुझी भक्ति गुरुचरणीं । लीन जाहली निर्धारीं ॥१॥
पर्जन्य येतां पुढारां । जैसा येतो सूचना वारा । तैसें तुझें दैन्य-हरा । ऐकसी गुरुचरित्र कथनभेद ॥२॥
ऐसें चरित्र कामधेनु । सांगेन तुज विस्तारोन । एकचित्त करुनि मन । ऐक शिष्या नामधारका ॥३॥
कृष्णावेणीतटाकेसीं । भुवनेश्वरी-पश्चिमेसीं । औदुंबर वृक्षेसीं । राहिले श्रीगुरु परियेसा ॥४॥
गौप्यरुप असती गुरु । ठाव असे अगोचरु । अनुष्ठान धुरंधरु । चातुर्मास येणेंपरी ॥५॥
सिद्धस्थान असे गहन । भुवनेश्वरीसंनिधान । विशेष श्रीगुरु राहिले म्हणोन । उत्कृष्ट जाहलें महिमान ॥६॥
ऐकोनि सिद्धाचें वचन । नामधारक करी नमन । परमात्मा श्रीगुरुराणा । कां रहावें गौप्यरुपें ॥७॥
त्यासी काय असे तपस । भिक्षा मागणें काय हर्ष । संदेह माझ्या मानसास । निवारावा दातारा ॥८॥
ऐक वत्सा नामधारका । भिक्षा मागतो पिनाका । आणिक सांगेन ऐका । दत्तात्रेय तैसाचि ॥९॥
दत्तात्रेय त्रयमूर्ति । भिक्षुकरुपी असे दिसती । भक्तजनानुग्रहार्थी । तीर्थयात्रे हिंडतसे ॥१०॥
अनुपम तीर्थे भूमीवरी । असती गौप्य अपरांपरीं । श्रीगुरुमूर्ति प्रीतिकरीं । प्रगटले भक्तांलागीं ॥११॥
भक्तजनोपकारार्थ । तीर्थे हिंडे श्रीगुरुनाथ । गौप्य व्हावया कारणार्थ । समस्त येऊनि मागती वर ॥१२॥
लपवितां दिनकरासी । केवीं लपे तेजोराशी । कस्तूरी ठेवितां जतनेसी । वास केवीं गौप्य होय ॥१३॥
आणिक सांगेन तुज साक्षी । गुण कैसा कल्पवृक्षीं । जेथें राहे तया क्षितीकांक्षी । कल्पिलें फळ तेथें होय ॥१४॥
याकारणें तया स्थानीं । प्रगटले गुरुमुनि । सांगेन तुज विस्तारुनि । एकचित्तें परियेसा ॥१५॥
करवीरक्षेत्र नगरांत । ब्राह्मण एक वेदरत । शास्त्रपुराण विख्यात । सांगे सकळ विद्वज्जनां ॥१६॥
अग्रवेदी असे आपण । जाणे तर्क व्याकरण । आन्हिकप्रमाण आचरण । कर्ममार्गी रत होता ॥१७॥
त्यासी जाहला एक सुत । मूर्ख असे उपजत । दैववशें मातापिता मृत । असमाधान होऊनियां ॥१८॥
वर्धतां मातापित्याघरीं बाळ । वर्षे सात जाहलीं केवळ । व्रतबंध करिती निश्चळ । तया द्विजकुमरकासी ॥१९॥
न ये स्नानसंध्या त्यासी । गायत्रीमंत्र परियेसीं । वेद कैंचा मूर्खासी । पशूसमान जहाला असे ॥२०॥
जेथें सांगती अध्ययन । जाऊनि आपण शिकूं म्हणे । तावन्मात्र शिकताचि क्षण । सर्वेचि विस्मृति होय त्यासी ॥२१॥
त्या ग्रामींचे विद्वज्जन । निंदा करिती सकळै जन । विप्रकुळीं जन्मून । ऐसा मूर्ख उपजलासी ॥२२॥
तुझा पिता ज्ञानवंत । वेदशास्त्रादि अभिज्ञात । त्याचे पोटीं कैसा केत । उपजलासी दगडापरी ॥२३॥
जळो जळो तुझें जिणें । पित्याच्या नामा आणिलें उणें । पोटीं बांधूनि पाषाण । तळें विहीरी कां न करिसी ॥२४॥
जन्मोनियां संसारीं । वृथा जाहलासी सूकरापरी । तुज गति यमपुरीं । अनाचारें वर्तसी ॥२५॥
ज्यासी विद्या असे ऐका । तोचि मनुष्यांमध्यें अधिका । जेवीं द्रव्य असे निक्षेपिका । तैसी विद्या परियेसा ॥२६॥
ज्याचे ह्रदयीं असे विद्या । त्यासी अखिल भोग सदा । यशस्वी होय सुखसंपदा । समस्तांमध्यें पूज्य तोचि ॥२७॥
श्रेष्ठ असे वयें थोर । विद्याहीन अपूज्य नर । अश्रेष्ठ असे एखादा नर । विद्या असतां पूज्यमान ॥२८॥
ज्यासी नाहीं सहोदर । त्यासी विद्या बंधु-भ्रातर । सकळिकां वंद्य होय नर । विद्या असे ऐशागुणें ॥२९॥
एखादे समयीं विदेशासी । जाय नर विद्याभ्यासी । समस्त पूजा करिती त्यासी । विदेश होय स्वदेश ॥३०॥
ज्यासी विद्या असे बहुत । तोचि होय ज्ञानवंत । त्याचे देहीं देवत्व । पूजा घेई सकळांपाशीं ॥३१॥
एखाद्या राज्याधिपतीसी । समस्त वंदिती परियेसीं । ऐसा राजा आपण हर्षी । विद्यावंतासी पूजा करी ॥३२॥
ज्याचे पदरीं नाहीं धन । त्याचें विद्याच धन जाण । विद्या शिकावी याचिकारण । नेणता होय पशूसमान ॥३३॥
ऐकोनि ब्राह्मणांचें वचन । ब्रह्मचारी करी नमन । स्वामींनीं निरोपिलें ज्ञान । विद्याभ्यास करावया ॥३४॥
जन्मांतरीं पूर्वी आपण । केलें नाहीं विद्यादान । न ये विद्या याचि कारण । त्यासी काय करणें म्हणतसे ॥३५॥
ऐसा आपण दोषी । उद्धरावें कृपेसीं । जरी असेल उपाय यासी । निरोपावें दातारा ॥३६॥
परिहासकें ते ब्राह्मण । सांगताति हांसोन । होईल पुढें तुज जनन । तधीं येईल तुज विद्या ॥३७॥
तुज कैंचा विद्याभ्यासु । नर नव्हेसि तूं साच पशु । भिक्षा मागूनि उदर पोस । अरे मूर्खा कुळनाशका ॥३८॥
ऐसें नानापरी नीचोत्तरेसीं । बोलती द्विज लोक त्यासी । वैराग्य धरुनि मानसीं । निघाला बाळ अरण्यासी ॥३९॥
मनीं झाला खेदें खिन्न । म्हणे त्यजीन आपुला प्राण । समस्त करिती दूषण । काय उपयोग जीवूनियां ॥४०॥
जळो जळो आपुलें जिणें । पशु झालों विद्याहीन । आतां वांचोनि काय कारण । म्हणोनि निघाला वैराग्यें ॥४१॥
भिल्लवडीग्रामासी । आला ब्रह्मचारी परियेसीं । अन्नोदक नेघे उपवासी । पातला निशीं दैववशें ॥४२॥
जेथें असे जगन्माता । भुवनेश्वरी विख्याता । तेथें पातला त्वरिता । करी दर्शन तये वेळीं ॥४३॥
न करी स्नान संध्या देखा । अपार करीतसे दुःखा । देवद्वारासन्मुखा । धरणें घेतलें तया वेळीं ॥४४॥
येणेंपरी दिवस तीनी । निर्वाण मन करुनि । अन्नोदक त्यजूनि । बैसला तो द्विजकुमर ॥४५॥
नव्हे कांहीं स्वप्न त्यालागोनि । म्हणोनि कोपे बहु मनीं । म्हणे अंबा भवानी । कां उपेक्षिसी आम्हांसी ॥४६॥
आक्रोशोनि तये वेळीं । शस्त्रें घेऊनियां प्रबळी । आपुली जिव्हा तात्काळी । छेदूनि वाहे देवीचरणीं ॥४७॥
जिव्हा वाहोनि अंबेसी । मागुती म्हणे परियेसीं । जरी तूं मज उपेक्षिसी । वाहीन शिर तुझे चरणीं ॥४८॥
ऐसें निर्वाण मानसीं । क्रमिता झाला तो निशी । स्वप्न जाहलें तयासी । ऐका समस्त श्रोते जन ॥४९॥
"ऐक बाळा ब्रह्मचारी । नको आक्रोशं आम्हांवरी । असे कृष्णापश्चिमतीरीं । त्वरित जाय तयाजवळी ॥५०॥
औदुंबरवृक्षातळीं । असे तापसी महाबळी । अवतारपुरुष चंद्रमौळी । तुझी वांछा पुरवील" ॥५१॥
ऐसें स्वप्न तयासी । जाहलें अभिनव परियेसीं । जागृत होतांचि हर्षी । निघाला त्वरित तेथोनि ॥५२॥
निघाला विप्र त्वरित । पोहत गेला प्रवाहांत । पैलतटा जाऊनि त्वरित । देखता जाहला श्रीगुरुसी ॥५३॥
चरणांवरी ठेवूनि माथा । करी स्तोत्र अत्यंता । श्रीगुरुमूर्ति संतोषतां । आश्वासिती तया वेळीं ॥५४॥
संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । माथां हस्त ठेविती । ज्ञान जाहलें त्वरिती । जिव्हा आली तात्काळ ॥५५॥
वेद-शास्त्र-पुराण । तर्क भाषा व्याकरण । समस्त त्याचें अंतःकरण । पूर्ण जाहलें तात्काळीं ॥५६॥
जैसा मानससरोवरास । वायस जातां परियेस । जैसा होय राजहंस । तैसें झालें विप्रकुमरा ॥५७॥
चिंतामणि-संपर्केसीं । सुवर्ण होय लोह कैसी । मृत्तिका पडतां जांबूनदीसी । सुवर्ण होय जेवीं देखा ॥५८॥
तैसें तया ब्राह्मणासी । गुरुचरण होतां स्पर्शी । आली अखिल विद्या त्यासी । वेदशास्त्रादि तर्क भाषा ॥५९॥
सिद्ध म्हणे नामधारका । श्रीगुरुमहिमा ऐसी ऐका । जे जे स्थानीं वास देखा । स्थानमहिमा ऐसी असे ॥६०॥
म्हणोनि सरस्वती-गंगाधर । सांगे श्रीगुरुचरित्रविस्तार । ऐकतां होय मनोहर । सकळाभीष्ट साधती ॥६१॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे भिल्लवडीस्थानमहिमावर्णनं-मंदमतिब्राह्मणवरप्रदानं नाम सप्तदशोऽध्यायः ॥१७॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओवीसंख्या ६१)

श्रीगणेशाय नमः ।
श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः । जय जया सिद्धमुनि । तू तारक भवार्णी । सुधारस आमुचे श्रवणी । पूर्ण केला दातारा ॥१॥
गुरुचरित्र कामधेनु । ऐकता न-धाये माझे मन । कांक्षीत होते अंतःकरण । कथामृत ऐकावया ॥२॥
ध्यान लागले श्रीगुरुचरणी । तृप्ति नव्हे अंतःकरणी । कथामृत संजीवनी । आणिक निरोपावे दातारा ॥३॥
येणेपरी सिद्धासी । विनवी शिष्य भक्तीसी । माथा लावूनि चरणांसी । कृपा भाकी तये वेळी ॥४॥; श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥
श्रीगुरुभ्यो नमः ॥
सिद्ध म्हणे नामकरणी । गुरुभक्तशिखामणि । तुझी भक्ति गुरुचरणीं । लीन जाहली निर्धारीं ॥१॥
पर्जन्य येतां पुढारां । जैसा येतो सूचना वारा । तैसें तुझें दैन्य-हरा । ऐकसी गुरुचरित्र कथनभेद ॥२॥
ऐसें चरित्र कामधेनु । सांगेन तुज विस्तारोन । एकचित्त करुनि मन । ऐक शिष्या नामधारका ॥३॥
कृष्णावेणीतटाकेसी । भुवनेश्वरी-पश्चिमेसीं । औदुंबर वृक्षेसीं । राहिले श्रीगुरु परियेसा ॥४॥
गौप्यरुप असती गुरु । ठाव असे अगोचरु । अनुष्ठान धुरंधरु । चातुर्मास येणेंपरी ॥५॥
सिद्धस्थान असे गहन । भुवनेश्वरीसंनिधान । विशेष श्रीगुरु राहिले म्हणोन । उत्कृष्ट जाहलें महिमान ॥६॥
ऐकोनि सिद्धाचें वचन । नामधारक करी नमन । परमात्मा श्रीगुरुराणा । कां रहावें गौप्यरुपें ॥७॥
त्यासी काय असे तपस । भिक्षा मागणें काय हर्ष । संदेह माझ्या मानसास । निवारावा दातारा ॥८॥
ऐक वत्सा नामधारका । भिक्षा मागतो पिनाका । आणिक सांगेन ऐका । दत्तात्रेय तैसाचि ॥९॥
दत्तात्रेय त्रयमूर्ति । भिक्षुकरुपी असे दिसती । भक्तजनानुग्रहार्थी । तीर्थयात्रे हिंडतसे ॥१०॥
अनुपम तीर्थे भूमीवरी । असती गौप्य अपरांपरीं । श्रीगुरुमूर्ति प्रीतिकरीं । प्रगटले भक्तांलागीं ॥११॥
भक्तजनोपकारार्थ । तीर्थे हिंडे श्रीगुरुनाथ । गौप्य व्हावया कारणार्थ । समस्त येऊनि मागती वर ॥१२॥
लपवितां दिनकरासी । केवीं लपे तेजोराशी । कस्तूरी ठेवितां जतनेसी । वास केवीं गौप्य होय ॥१३॥
आणिक सांगेन तुज साक्षी । गुण कैसा कल्पवृक्षीं । जेथें राहे तया क्षितीकांक्षी । कल्पिलें फळ तेथें होय ॥१४॥
याकारणें तया स्थानीं । प्रगटले गुरुमुनि । सांगेन तुज विस्तारुनि । एकचित्तें परियेसा ॥१५॥
करवीरक्षेत्र नगरांत । ब्राह्मण एक वेदरत । शास्त्रपुराण विख्यात । सांगे सकळ विद्वज्जनां ॥१६॥
अग्रवेदी असे आपण । जाणे तर्क व्याकरण । आन्हिकप्रमाण आचरण । कर्ममार्गी रत होता ॥१७॥
त्यासी जाहला एक सुत । मूर्ख असे उपजत । दैववशें मातापिता मृत । असमाधान होऊनियां ॥१८॥
वर्धतां मातापित्याघरीं बाळ । वर्षे सात जाहलीं केवळ । व्रतबंध करिती निश्चळ । तया द्विजकुमरकासी ॥१९॥
न ये स्नानसंध्या त्यासी । गायत्रीमंत्र परियेसीं । वेद कैंचा मूर्खासी । पशूसमान जहाला असे ॥२०॥
जेथें सांगती अध्ययन । जाऊनि आपण शिकूं म्हणे । तावन्मात्र शिकताचि क्षण । सर्वेचि विस्मृति होय त्यासी ॥२१॥
त्या ग्रामींचे विद्वज्जन । निंदा करिती सकळै जन । विप्रकुळीं जन्मून । ऐसा मूर्ख उपजलासी ॥२२॥
तुझा पिता ज्ञानवंत । वेदशास्त्रादि अभिज्ञात । त्याचे पोटीं कैसा केत । उपजलासी दगडापरी ॥२३॥
जळो जळो तुझें जिणें । पित्याच्या नामा आणिलें उणें । पोटीं बांधूनि पाषाण । तळें विहीरी कां न करिसी ॥२४॥
जन्मोनियां संसारीं । वृथा जाहलासी सूकरापरी । तुज गति यमपुरीं । अनाचारें वर्तसी ॥२५॥
ज्यासी विद्या असे ऐका । तोचि मनुष्यांमध्यें अधिका । जेवीं द्रव्य असे निक्षेपिका । तैसी विद्या परियेसा ॥२६॥
ज्याचे हृदयीं असे विद्या । त्यासी अखिल भोग सदा । यशस्वी होय सुखसंपदा । समस्तांमध्यें पूज्य तोचि ॥२७॥
श्रेष्ठ असे वयें थोर । विद्याहीन अपूज्य नर । अश्रेष्ठ असे एखादा नर । विद्या असतां पूज्यमान ॥२८॥
ज्यासी नाहीं सहोदर । त्यासी विद्या बंधु-भ्रातर । सकळिकां वंद्य होय नर । विद्या असे ऐशागुणें ॥२९॥
एखादे समयीं विदेशासी । जाय नर विद्याभ्यासी । समस्त पूजा करिती त्यासी । विदेश होय स्वदेश ॥३०॥
ज्यासी विद्या असे बहुत । तोचि होय ज्ञानवंत । त्याचे देहीं दैवत्व । पूजा घेई सकळांपाशीं ॥३१॥
एखाद्या राज्याधिपतीसी । समस्त वंदिती परियेसीं । ऐसा राजा आपण हर्षी । विद्यावंतासी पूजा करी ॥३२॥
ज्याचे पदरीं नाहीं धन । त्याचें विद्याच धन जाण । विद्या शिकावी याचिकारण । नेणता होय पशूसमान ॥३३॥
ऐकोनि ब्राह्मणांचें वचन । ब्रह्मचारी करी नमन । स्वामींनीं निरोपिलें ज्ञान । विद्याभ्यास करावया ॥३४॥
जन्मांतरीं पूर्वी आपण । केलें नाहीं विद्यादान । न ये विद्या याचि कारण । त्यासी काय करणें म्हणतसे ॥३५॥
ऐसा आपण दोषी । उद्धरावें कृपेसीं । जरी असेल उपाय यासी । निरोपावें दातारा ॥३६॥
परिहासकें ते ब्राह्मण । सांगताति हांसोन । होईल पुढें तुज जनन । तधीं येईल तुज विद्या ॥३७॥
तुज कैंचा विद्याभ्यासु । नर नव्हेसि तूं साच पशु । भिक्षा मागूनि उदर पोस । अरे मूर्खा कुळनाशका ॥३८॥
ऐसें नानापरी नीचोत्तरेसीं । बोलती द्विज लोक त्यासी । वैराग्य धरुनि मानसीं । निघाला बाळ अरण्यासी ॥३९॥
मनीं झाला खेदें खिन्न । म्हणे त्यजीन आपुला प्राण । समस्त करिती दूषण । काय उपयोग जीवूनियां ॥४०॥
जळो जळो आपुलें जिणें । पशु झालों विद्याहीन । आतां वांचोनि काय कारण । म्हणोनि निघाला वैराग्यें ॥४१॥
भिल्लवडीग्रामासी । आला ब्रह्मचारी परियेसीं । अन्नोदक नेघे उपवासी । पातला निशीं दैववशें ॥४२॥
जेथें असे जगन्माता । भुवनेश्वरी विख्याता । तेथें पातला त्वरिता । करी दर्शन तये वेळीं ॥४३॥
न करी स्नान संध्या देखा । अपार करीतसे दुःखा । देवद्वारासन्मुखा । धरणें घेतलें तया वेळीं ॥४४॥
येणेंपरी दिवस तीनी । निर्वाण मन करुनि । अन्नोदक त्यजूनि । बैसला तो द्विजकुमर ॥४५॥
नव्हे कांहीं स्वप्न त्यालागोनि । म्हणोनि कोपे बहु मनीं । म्हणे अंबा भवानी । कां उपेक्षिसी आम्हांसी ॥४६॥
आक्रोशोनि तये वेळीं । शस्त्रें घेऊनियां प्रबळी । आपुली जिव्हा तात्काळी । छेदूनि वाहे देवीचरणीं ॥४७॥
जिव्हा वाहोनि अंबेसी । मागुती म्हणे परियेसीं । जरी तूं मज उपेक्षिसी । वाहीन शिर तुझे चरणीं ॥४८॥
ऐसें निर्वाण मानसीं । क्रमिता झाला तो निशी । स्वप्न जाहलें तयासी । ऐका समस्त श्रोते जन ॥४९॥
"ऐक बाळा ब्रह्मचारी । नको आक्रोशं आम्हांवरी । असे कृष्णापश्चिमतीरीं । त्वरित जाय तयाजवळी ॥५०॥
औदुंबरवृक्षातळीं । असे तापसी महाबळी । अवतारपुरुष चंद्रमौळी । तुझी वांछा पुरवील" ॥५१॥
ऐसें स्वप्न तयासी । जाहलें अभिनव परियेसीं । जागृत होतांचि हर्षी । निघाला त्वरित तेथोनि ॥५२॥
निघाला विप्र त्वरित । पोहत गेला प्रवाहांत । पैलतटा जाऊनि त्वरित । देखता जाहला श्रीगुरुसी ॥५३॥
चरणांवरी ठेवूनि माथा । करी स्तोत्र अत्यंता । श्रीगुरुमूर्ति संतोषतां । आश्वासिती तया वेळीं ॥५४॥
संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । माथां हस्त ठेविती । ज्ञान जाहलें त्वरिती । जिव्हा आली तात्काळ ॥५५॥
वेद-शास्त्र-पुराण । तर्क भाषा व्याकरण । समस्त त्याचें अंतःकरण । पूर्ण जाहलें तात्काळीं ॥५६॥
जैसा मानससरोवरास । वायस जातां परियेस । जैसा होय राजहंस । तैसें झालें विप्रकुमरा ॥५७॥
चिंतामणि-संपर्केसीं । सुवर्ण होय लोह कैसी । मृत्तिका पडतां जांबूनदीसी । सुवर्ण होय जेवीं देखा ॥५८॥
तैसें तया ब्राह्मणासी । गुरुचरण होतां स्पर्शी । आली अखिल विद्या त्यासी । वेदशास्त्रादि तर्क भाषा ॥५९॥
सिद्ध म्हणे नामधारका । श्रीगुरुमहिमा ऐसी ऐका । जे जे स्थानीं वास देखा । स्थानमहिमा ऐसी असे ॥६०॥
म्हणोनि सरस्वती-गंगाधर । सांगे श्रीगुरुचरित्रविस्तार । ऐकतां होय मनोहर । सकळाभीष्ट साधती ॥६१॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे भिल्लवडीस्थानमहिमावर्णनं-मंदमतिब्राह्मणवरप्रदानं नाम सप्तदशोऽध्यायः ॥१७॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

शिष्यवचन ऐकोनि । संतोषला सिद्धमुनि । सांगतसे विस्तारोनि । ऐका श्रोते एकचित्ते ॥५॥
ऐक शिष्या शिकामणी । धन्य धन्य तुझी वाणी । तुझी भक्ति श्रीगुरुचरणी । तल्लीन झाली परियेसा ॥६॥
तुजकरिता आम्हांसी । चेतन जाहले परियेसीं । गुरुचरित्र आद्यंतेसी । स्मरण जाहले अवधारी ॥७॥
भिल्लवडी स्थानमहिमा । निरोपिला अनुपमा । पुढील चरित्र उत्तमा । सांगेन ऐका एकचित्तें ॥८॥
क्वचित्काळ तये स्थानी । श्रीगुरु होते गौप्येनि । प्रकट जहाले म्हणोनि । पुढे निघाले परियेसा ॥९॥
वरुणासंगम असे ख्यात । दक्षिणवाराणसी म्हणत । श्रीगुरु आले अवलोकित । भक्तानुग्रह करावया ॥१०॥
पुढें कृष्णातटाकांत । श्रीगुरू तीर्थे पावन करीत । पंचगंगासंगम ख्यात । तेथें राहिले द्वादशाब्दे ॥११॥
अनुपम्य तीर्थ मनोहर । जैसें अविमुक्त काशीपुर । प्रयागसमान तीर्थ थोर । म्हणोनि राहिले परियेसा ॥१२॥
कुरवपुर ग्राम गहन । कुरूक्षेत्र तोंचि जाण । पंचगंगासंगम कृष्णा । अत्योत्त्म परियेसा ॥१३॥
कुरुक्षेत्रीं जितके पुण्य । तयाहूनि अधिक असे जाण । तीर्थे अस्ती अगण्य । म्हणोनि राहिले श्रीगुरू ॥१४॥
पंचगंगानदीतीर । प्रख्यात असे पुराणांतर । पांच नामे आहेति थोर । सांगेन ऐका एकचित्तें ॥१५॥
शिवा भद्रा भोगावती । कुंभीनदी सरस्वती । ' पंचगंगा' ऐसी ख्याति । महापातक संहारी ॥१६॥
ऐसी प्रख्यात पंचगंगा । आली कृष्णेचिया संगा । प्रयागाहूनि असे चांगा । संगमस्थान मनोहर ॥१७॥
अमरापुर म्हणिजे ग्राम । स्थान असे अनुपम्य । जैसा प्रयागसंगम । तैसे स्थान मनोहर ॥१८॥
वृक्ष असे औदुंबर । प्रत्यक्ष जाणा कल्पतरु । देव असे अमरेश्वर । तया संगमा षट्कूळी ॥१९॥
जैसी वाराणसी पुरी । गंगाभागीरथी-तीरी । पंचनदींसंगम थोरी । तत्समान परियेसा ॥२०॥
अमरेश्वरसंनिधानी । आहेति चौसष्ट योगिनी । शक्तितीर्थ निर्गुणी । प्रख्यात असे परियेसा ॥२१॥
अमरेश्वरलिंग बरवे । त्यासी वंदुनि स्वभावे । पुजितां नर अमर होय । विश्वनाथ तोचि जाणा ॥२२॥
प्रयागी करितां माघस्नान । जें पुण्य होय साधन । शतगुण होय तयाहून । एक स्नाने परियेसा ॥२३॥
सहज नदीसंगमांत । प्रयागसमान असे ख्यात । अमरेश्वर परब्रह्म वस्तु । तया स्थानी वास असे ॥२४॥
याकारणें तिये स्थानी । कोटितीर्थे असती निर्गुणी । वाहे गंगो दक्षिणी । वेणीसहित निरंतर ॥२५॥
अमित तीर्थे तया स्थानी । सांगता विस्तार पुराणीं । अष्टतीर्थ ख्याति जीण । तया कृष्णातटाकांत ॥२६॥
उत्तर दिशी असे देखा वहे कृष्णा पश्चिममुखा । 'शुक्लतीर्थ' नाम ऐका । ब्रह्महत्यापाप दूर ॥२७॥
औदुंबर सन्मुखेसी । तीनी तीर्थे परियेसी । एकानंतर एक धनुषी । तीर्थे असती मनोहर ॥२८॥
'पापविनाशी' 'काम्यतीर्थ' । तिसरें सिध्द ' वरदतीर्थ । अमरेश्वरसंनिधार्थ । अनुपम्य असे भूमंडळी ॥२९॥
पुढें संगम-षट्कुळांत । प्रयागतीर्थ असे ख्यात । ' शाक्तितीर्थ' अमरतीर्थ' । कोटितीर्थ' परियेसा ॥३०॥
तीर्थे असती अपरांपर । सांगता असे विस्तार । याकारणें श्रीपादगुरु । राहिले तेथें द्वादशाब्दें ॥३१॥
कृष्णा वेणी नदी दोनी । पंचगंगा मिळोनी । सप्तनदीसंगम सगुणी । काय सांगू महिमा त्याची ॥३२॥
ब्रह्महत्यादि महापातकें । जळोनि जातीं स्नानें एकें । ऐसें सिध्द्स्थान निकें । सकळाभीष्ट होय तेथें ॥३३॥
काय सांगूं त्यांची महिमा । आणिक द्यावया नाहीं उपमा । दर्शनमातें होती काम्या । स्नानफळ काय वर्णू ॥३४॥
साक्षात् कल्पतरु । असे वृक्ष औदुबरु । गौप्य होऊन अगोचरु । राहिले श्रीगुरु तया स्थानी ॥३५॥
भक्तजनतारणार्थ । होणार असे ख्यात । राहिले तेथें श्रीगुरुनाथ । म्हणोनि प्रकट जाहले जाणा ॥३६॥
असता पुढें वर्तमानीं । भिक्षा करावया प्रतिदिनीं । अमरापुर ग्रामी । जाती श्रीगुरु परियेसा ॥३७॥
तया ग्रामी द्विज एक । असे वेदभ्यासक । त्याची भार्या पतिसेवक । पतिव्रतशिरोमणी ॥३८॥
सुक्षीण असे तो ब्राह्मण । शुक्लभिक्षा करी आपण । कर्ममार्गी आचरण । असे सात्विक वृत्तीनें ॥३९॥
तया विप्रमंदिरांत । असे वेल उन्नत । शेंगा निघती नित्य बहुत । त्याणे उदरपूर्ति करी ॥४०॥
एखादे दिवशी त्या ब्राह्मणासी । वरो न मिळे परियेसीं । तया शेंगांते रांधोनि हर्षी । दिवस क्रमी येणेंपरी ॥४१॥
ऐसा तो ब्राह्मण दरिद्री । याचकारणें उदर भरी । पंचमहायज्ञ कुसरी । अतिथि पूजी भक्तीनें ॥४२॥
वर्तता श्रीगुरु एके दिवसीं । तया विप्रमंदिरासी । गेले आपण भिक्षेसी । नेलें विप्रें भक्तिनें ॥४३॥
भक्तिपूर्वक श्रीगुरूसी । पूजा करी तो षोडशी । घेवडे-शेंगा बहुवसी । केली होती पत्र-शाका ॥४४॥
भिक्षा करून ब्राह्मणासी । आश्वासिती गुरु संतोषी । गेलें तुझे दरिद्र दोषी । म्हणोनी निघती तये वेळी ॥४५॥
तया विप्राचे गृहांत । जो का होता वेल उन्नत । घेवडा नाम विख्यात । आंगण सर्व वेष्टिलें असे ॥४६॥
तया वेलाचें झाडमूळ श्रीगुरुमूर्ति छेदिती तात्काळ । टाकोनि देती परिबळें । गेले आपण संगमासी ॥४७॥
विप्रवनिता तये वेळी । दु:ख करिती पुत्र सकळी । म्हणती पहा हो दैव बळी । कैसें अदृष्ट आपुलें ॥४८॥
आम्हीं तया यतीश्वरासी । काय उपद्रव केला त्यासी । आमुचा ग्रास छेदुनी कैसी । टाकोनि दिल्हा भूमीवरी ॥४९॥
ऐसेपरी ते नारी । दु:ख करी नानापरी । पुरुष तिचा कोप करी । म्हणे प्रारब्ध प्रमाण ॥५०॥
म्हणे स्त्रियेसी तये वेळी । जें जें होणार जया काळी । निर्माण करी चंद्रमोळी । तया आधीन । विश्व जाण ॥५१॥
विश्वव्यापक नारायण । उत्पत्तिस्थितिलया कारण । पिपीलिकादि स्थूळ-जीवन । समस्तां आहार पुरवीतसे ॥५२॥
'आयुरन्नं प्रयच्छति' । ऐसें बोले वेदश्रुति । पंचानन आहार हस्ती । केवीं करी प्रत्यही ॥५३॥
चौऱ्यायशी लक्ष जीवराशी । स्थूल सूक्ष्म समस्तांसी । निर्माण केलें आहारासी । मग उत्पत्ति तदनंतरें ॥५४॥
रंकरायासी एक दृष्टी । करुनि निक्षेपण । सकृत अथवा दुष्कृत्य जाण । आपुलें आपणचि भोगणें । पुढील्यावरी काय बोल ॥५६॥
आपुलें दैव असतां उणें । पुढिल्या बोलती मूर्खपणे ।जे पेरिलें तोंचि भक्षणें । कवणावरी बोल सांगे ॥५७॥
बोल ठेविसी यतीश्वरासी । आपलें आर्जव न विचारिसी । ग्रास हरितला म्हणसी । अविद्यासागरी बुडोनि ॥५८॥
तो तारक आम्हांसी ।म्हणोनि आला भिक्षेसी । नेलें आमुचे दरिद्रदोषी । तोचि तारील आमुतें ॥५९॥
येणेंपरी स्त्रियेसी । संभाषी विप्र परियेसी । काढोनि वेलशाखेसी । टाकीता झाला गंगेत ॥६०॥
तया वेलाचें मूळ थोरी । जे कां होतें आपुले द्वारी । काढूं म्हणुनि द्विजवरी । खणिता झाला तया वेळीं ॥६१॥
काढितां वेलमूळासी । लाधला कुंभे निधानेसी । आनंद जाहला बहुवसी । घेऊनि गेला घरांत ॥६२॥
म्हणती नवल काय वर्तले । यतीश्वर आम्हां प्रसन्न झाले । म्हणोनि ह्या वेला छेदिलें । निधान लाधलें आम्हांसी ॥६३॥
नर नव्हे तो योगीश्वर होईल ईश्वरीअवतार । आम्हां भेटला दैन्यहर । म्हणती चला दर्शनासी ॥६४॥
जाऊनि संगमा श्रीगुरुसी । पूजा करिती बहुवसी । वृत्तांत सांगती तयासी । तये वेळी परियेसा ॥६५॥
श्रीगुरु म्हणती तयासी । तुम्हीं न सांगणें कवणासी । प्रकट करितां आम्हांसी । नसेल लक्ष्मी तुमचे घरी ॥६६॥
ऐसेपरी तया द्विजासी । सांगे श्रीगुरु परियेसी । अखंड लक्ष्मी तुमचे वंशी । पुत्रपौत्री नांदाल ॥६७॥

ऐसा वर लधोन । गेली वनिता तो ब्राह्मण । श्रीगुरुकृपा ऐसी जाण । दर्शनमात्रे दैन्य हरे ॥६८॥
ज्यासी होय श्रीगुरुकृपा । त्यासी कैचे दैन्य पाप । कल्पवृक्ष-आश्रय करितां बापा । दैन्य कैंचे तया घरी ॥६९॥
दैव उणा असेल जो नरु । त्याणें आश्रयावा श्रीगुरु । तोचि उतरेल पैलपारु । पूज्य होय सकळिकांई ॥७०॥
जो कोण भजेल श्रीगुरु । त्यासी लाधेल इह-परु । अखंड लक्ष्मी त्याचे घरी । अष्टैश्वर्ये नांदती ॥७१॥
सिध्द म्हणे नामधारकासी । श्रीगुरुमहिमा असे ऐसी । भजावे तुम्हीं मनोमानसीं । कामधेनु तुझ्या घरीं ॥७२॥
गंगाधराचा कुमर । सांगे श्रीगुरुचरित्रविस्तार । पुढील कथामृतसार । ऐका श्रोते एकचित्तें ॥७३॥

॥ १८ ॥
श्रीपादश्रीवल्लभ-नृसिंहसरस्वती-दत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥ शुभं भवतु ॥
(ओवी संख्या ७३)

श्रीगणेशाय नम: ॥ श्रीसरस्वत्यै नम: ॥ श्रीगुरुभ्यो नम: ॥
नामधारक शिष्यराणा । लागे सिध्दाचिया चरणां । करसंपुट जोडून । विनवीतसे तया वेळी ॥१॥
जय जया सिध्द योगीश्वरा । तूंचि ज्योति अंधकारा । भक्तजनांच्या मनोहरा । भवसागरतारका ॥२॥
अज्ञानतिमिररजनींत । निजलों होतों मदोन्मत्त । गुरुचरित्र मज अमृत । प्राशन करविलें दातारा ॥३॥
त्याणें झालें मज चेत । ज्ञानसूर्यप्रकाश होत । तुझे कृपेने जागृत । जाहलों स्वामी सिध्दमुनि ॥४॥
पुढील कथाविस्तारा । निरोपावा योगीश्वरा । कृपा करी गा दातारा । म्हणोनि लागला चरणांसी ॥५॥
ऐकोनि शिष्याचें वचन । संतोषला सिध्द आपण । सांगतसे विस्तारुन । श्रीगुरुमहिमा अनुपम्य ॥६॥
शिष्योत्तमा नामंकिता । सांगेन ऐके गुरुची कथा । औदुंबरतळी अतिप्रीता । होते श्रीगुरु परियेसा ॥७॥
ऐकोनी सिध्दाचें वचन । नामधारक करी प्रश्न । अनेक पुण्यवृक्ष त्यजून । काय प्रीति औदुंवरी ॥८॥
अश्वत्थवृक्ष असे थोर । म्हणोनि सांगती वेद शास्त्र । श्रीगुरुप्रीति औदुंबर । कवण कारण निरोपावें ॥९॥
सिध्द म्हणे नामंकिता । सांगेन याचिया वृतांता । जधीं नरसिंह अवतार होता । हिरण्यकश्यप विदारिला ॥१०॥
नखेंकरूनि दैत्यासी । विदारिलें कोपेसीं । आंतडीं काढूनियां हर्षीं । घालती माळ गळां नरहरीनें ॥११॥
त्या दैत्याचे पोटी विष होतें काळकूटी । जैसी वडवाग्नि मोठी तैसें विष परियेसा ॥१२॥
विदारण करितां दैत्यासी । वेधलें विष त्या नखांसी । तापली नखें बहुवसी । ऐक शिष्या एकचित्तें ॥१३॥
तये समयी महालक्ष्मी । घेऊनि आली अतिप्रेमी । औदुंबरफळ नामी । शांतीकारणें नखांसी ॥१४॥
तये वेळी शीतलार्थ । नखें रोविलीं औदुंबरात । विषाग्नि झाला शांत । उग्र नरसिंह शांत झाला ॥१५॥
शांत जाहला नृसिंहदेव । देता झाला लक्ष्मीसि खेंव । संतोषोनि उभय देव । वर देती तये वेळीं ॥१६॥
तया समयिं औदुंबरासी देती वर हृषीकेशी । " सदा फळित तूं होसी । 'कल्पवृक्ष ' तुझे नाम ॥१७॥
जे जन भजती भक्तीसीं । काम्यं होय त्वरितसीं । तुज देखतांचि परियेसीं । उग्र विष शांत होय ॥१८॥
जे सेवितील मनुष्यलोक । अखिलकाम्य पावोनि एक । फळ प्राप्त होय निके । पापावेगळा होय नर ॥१९॥
वांझ नारी सेवा करितां । पुत्र होतील तिसी त्वरिता । जे नर असतील दैन्यपीडिता । सेवितं होतील श्रियायुक्त ॥२०॥
तुझी छायीं बैसोन । जे जन करिती जपानुष्ठान । अनंत फळ होय ज्ञान । कल्पिलें फळ होय त्यांसी ॥२१॥
तुझे छायीं जळांत । स्नान करितां पुण्य बहुत । भागीरथीस्नान करीत । तितुकें पुण्य परियेसा ॥२२॥
तुज सेविती त्या नरासी । व्याधि नव्हती कवणे दिवसीं । ब्रह्महत्यादि महादोषी । परिहार होती परियेसा ॥२३॥
जें जें कल्पूनि मानसी । तुज सेविती भावेसीं । कल्पना पुरती भरंवसी । कलियुगी कल्पवृक्ष तूंचि ॥२४॥
सदा वसों तुजपाशीं । लक्ष्मीसहित शांतीसी " । म्हणोनि वर देती हर्षी । नरसिंहमूर्ति तये वेळी ॥२५॥
ऐसा वृक्ष औदुंबर । कलियुगीं तोचि कल्पतरु । नरसिंहमूर्ति होतां उग्र । शांत झाली तयापाशी ॥२६॥
याकारणे श्रीगुरुमूर्ति नृसिंहमंत्र उपासना करिती । उग्रत्वाची करावया शांति । औदुंबरी वास असे ॥२७॥
अवतार आपण तयाचें स्थान आपुलें असे साचें । शांतवन करावया उग्रत्वाचे । म्हणोनि वास औदुंबरी ॥२८॥
सहज वृक्ष तो औदुंवर । कल्पवृक्षसमान तरु । विशेषें वास केला श्रीगुरु । कल्पिली फळे तेथे होती ॥२९॥
तया कल्पद्रुमातळीं । होते श्रीगुरुस्तोममौळी । ब्रह्मा-विष्णु-नेत्रभाळी । देह मानुषी धरोनियां ॥३०॥
भक्तजनां तारणार्थ । पावन करिती समस्त तीर्थ । अवतार त्रयमूर्ति गुरुनाथ । भूमीवरी वर्तत असे ॥३१॥
वृक्षातळी अहर्निशीं । श्रीगुरु असती गौप्येसी । माध्यान्हकाळसमयासी । समारंभ होय तेथें ॥३२॥
अमरेश्वरसंनिधानीं । वसई चौसष्ट योगिनी । पूजा करावया माध्यान्ही । श्रीगुरुजवळी येती नित्य ॥३३॥
नमन करूनि श्रीगुरूसी । नेती आपुले मंदिरासी । पूजा करिती विधीसीं । गंधपरिमळ-कुसुमें ॥३४॥
आरोगोनि तयां घरीं । पुनरपि येती औदुंबरी । एके समयी द्विजवरी । विस्मय करिती देखोनियां ॥३५॥
म्हणती अभिन याति कैसा । न क्री भिक्षा ग्रामांत ऐसा । असतो सदा अरण्यवासा । कवणेपरी काळ कंठी ॥३६॥
पाहूं याचें वर्तमान । कैसा क्रमितो दिनमान । एखादा नर ठेवून । पाहो अंत यतीश्वराचा ॥३७॥
ऐसें विचारूनि मानसी । गेले संगमस्थानासी । माध्यान्हसमयी तयांसी । भय उअपजलें अंत:करणीं ॥३८॥
पाहूं म्हणती श्रीगुरूचा अंत । तेचि जाती यमपंथ । ऐसे विप्र मदोन्मत्त । अधोगतीचे तेचि इष्ट ॥३९॥
उपजतां भय ब्राह्मणांसी । गेले आपुलें स्थानासी । गंगनुज थडियेसी । होता वृत्ति राखीत ॥४०॥
त्याणें देखिले श्रीगुरुसी । आल्या योगिनी पूजेसी । गंगेमध्ये येतां कैसी । मार्ग जाहला जळांत ॥४१॥
विस्मय करी तो नरु । म्हणे कैसा यतीश्वरु । द्विभाग झाला गंगापूरु । केवी गेले गंगेंत ॥४२॥
श्रीगुरुतें नेऊनि। पूजा केली त्या योगिनी। भिक्षा तेथें करूनि आले मागुती बाहेर ॥४३॥
पहात होता गंगानुज । म्हणे कैसे जाहले चोज । अवतार होईल ईश्वरकाज । म्हणोनि पूजिती देवकन्या ॥॥४४॥
येरे दिवसीं मागुती । हाती घेऊन आरति । देवकन्या ओंवाळिती । श्रीगुरूतें नमूनियां ॥४५॥
पुन्हा गंगाप्रवाहांत । श्रीगुरु निघाले योगिनीसहित । हो कां नर होता पहात । तोही गेला सर्वेचि ॥४६॥
नदीतीरी जातां श्रीगुरु । द्विभार जाहलें गंगेत द्वारु । भीतरी दिसे अनुपम्य पुर । रत्नखचित गोपुरेसीं ॥४७॥
अमरावतीसमान नगर जैसी तेजें दिनकर । श्रीगुरु जातांचि समस्त पुर। घेऊनि आलें आरति ॥४८॥
ओवाळून आरति । नेलें आपुले मंदिराप्रति सिंहासन रत्नखचिती । बैसो घालिती तया समयीं ॥४९॥
पूजा करिती विधीसीं । जे कां उपचार षोडशी । अनेकापरी षड्रसेसीं । आरोगिलें तये वेळीं ॥५०॥
श्रीगुरु दिसती तया स्थानीं । त्रैमूर्ति जैसा शुलपाणि । पूजा घेऊनि तत्क्षणीं । मग परतले तयेवेळी ॥५१॥
देखोनियां तया नरासी । म्हणती तूं कां आलासी । विनवी तो नर स्वमियासी । सहज आलों दर्शनाते ॥५२॥
म्हणोनि लागला गुरुचरणीं । तल्लीन होवोनि अंत:करणीं । म्हणे स्वामी गिरिजारमणा । होसी त्रयमूर्ति तुंचि एक ॥५३॥
न कळे तुझें स्वरूपज्ञान । संसारमाया वेष्टून । तूं तारक या भवाणी । उध्दरावे स्वामिया ॥५४॥
तूं तारक विश्वासी । म्हणोनि भूमी अवतरलासी । अज्ञान म्हणिजे रजनीसी । ज्योति:स्वरूप तूंचि एक ॥५५॥
तुझें दर्शन होय ज्यासी । सर्वाभीष्ट फळ होय त्यासी । इहपर अप्रयासी । जोडे नरा न लागतां क्षण ॥५६॥
ऐशापरी तो देखा । स्तुति करितो नर ऐका । संतोषूनि गुरुनायकें । आश्वासिले तया वेळी ॥५७॥
श्रीगुरु म्हणती तयासी । तुझें दैन्य गेलें परियेसी । जें जें तूं इच्छिसी मानसी । सकळाभीष्ट पावशील ॥५८॥
येथील वर्तमान ऐसी । न सांगावे कवणासी । जया दिवशी प्रगट करिसी । तूतें हानी होईल जाण ॥५९॥
येणेंपरी तयासी । श्रीगुरु सांगती परियेसी ।लाले औदुंबरापाशी । गंगानुज-समागमें ॥६०॥
श्रीगुरूचा निरोप घेऊन । गेला गंगानुज आपण । वृत्तिस्थानीं जातांचि क्षण । निधान त्यासी लाधलें ॥६१॥
ज्ञानवं तो झाला नरु । नित्य सेवा करी तो गुरु । पुत्रपौत्र श्रियाकर । महानंदे वर्ततसे ॥६२॥
भक्तिभावें श्रीगुरुसी । नमन करी प्रतिदिवसीं । सेवा करी कलत्रेंसी । एकोभावेंकरूनियां ॥६३॥
वर्तता ऐसे एके दिवसी । आली पौर्णिमा माघमासीं । नमन करूनि श्रीगुरूसी । विनवीतसे तो भक्त ॥६४॥
म्हणे स्वामी जगद्गुरु । माघस्नानी प्रयाग थोरु । म्हणोनि सांगती द्विजवरु । काशीपूर महाक्षेत्र ॥६५॥
कैसे प्रयाग गयास्थान । कैसें वाराणसी भुवन । नेणों आपण यातिहीन । कृपा करणें स्वामिया ॥६६॥
श्रीगुरु म्हणती तयासी । पंचगंगासंगमेंसी । ' प्रयाग ' जाणावें भरंवसी । ' काशीपुर " तें जुगुळ ॥६७॥
दक्षिण ' गया' कोल्हापुर । त्रिस्थळी ऐसें मनोहर । जरी पहासी प्रत्यक्षाकार । दावीन तुज चाल आतां ॥६८॥
बैसले होते व्याघ्राजिनीं । धरी गा मागे दृढ करूनि । मनोवेगें तत्क्षणी । गेले प्रयागा प्रात:काळी ॥६९॥

ऐसी त्रिस्थळी आचरोनि । आले परतोनि अस्तमानीं । येणेपरीं । तयास्थानीं । देखता झाला तो नर ॥७१॥
विश्वनाटक श्रीगुरुमूर्ति । प्रकट झाली ऐसी किर्ति । श्रीगुरु मनीं विचारिती । आतां येथे गौप्य व्हावे ॥७२॥
ऐसेपरी तयास्थानीं । प्रकट झाले श्रीगुरुमुनि अमरेश्वरातें पुसोनि । निघत झाले तये वेळी ॥७३॥
श्रीगुरु निघतां तेथोनि । आल्या चौसष्ट योगिनी । निनविताति करूणावचनीं । आम्हां सोडूनि केवीं जातां ॥७४॥
नित्य तुमचे दर्शनासी । तापत्रय हरती दोषी । अन्नपूर्णा तुम्हांपाशी । केवी राहुं स्वामिया ॥७५॥
येणेंपरी श्रीगुरुसी । योगिनी विनविती भक्तीसीं । भक्तवत्सलें संतोषीं । दिधला वर वेळीं ॥७६॥
श्रीगुरु म्हणती तयांसी। सदा असों औदुंबरेसी । प्रकटार्थ जाणे पूर्वेसी । स्थान आमुचें येथेचि असे ॥७७॥
तुम्ही रहावें येथें औदुंबरी । कल्पवृक्ष मनोहरी । अन्नपूर्णा प्रीतिकरीं । औदुंबरी ठेवितों ॥७८॥
कल्पवृक्ष औदुंबर । येथे असा तुम्ही स्थिर । अमरापुर पश्चिम तीर । अमर स्थान हेंचि जाणा ॥७९॥
प्रख्यात होईल स्थान बहुत । समस्त नर पूजा करीत । मनकामना होय त्वरित । तुम्हीं त्यांसी साह्य व्हावे ॥८०॥
तुम्हांसहित औदुंबरी । आमुच्या पादुका मनोहरी । पूजा करिती जे तत्परी मनकामना पुरती जाणा ॥८१॥
येथे असे अन्नपूर्णा ।नित्य करिती आराधना । तेणें होय कामना । अतुर्विध पुरुषार्थ ॥८२॥
पापविनाशी काम्यतीर्थ । सिध्द्तीर्था स्नान करीत । सात वेळ स्नपन करीत तुम्हांसहित औदुंबरी ॥८३॥
साठी वर्षे वांझेसी । पुत्र होती शतायुषी । ब्रह्महत्या पाप नाशी । स्नानमात्रे त्या तीर्था ॥८४॥
सोमसूर्यग्रहणेसी । अथवा मास संक्रांतीसी । स्नान करिती फळें कैसी । ऐका श्रोते एकचित्तें ॥८६॥
श्रृंग-खूर-सुवर्णेसी । अलंकृत धेनूसी । सहस्त्र कपिला ब्राह्मणांसी । सुरनदीतीरी ऐका । भोजन दिल्हें फळ असे ॥८८॥
औदुंबरवृक्षातळीं । जप करिती जे मननिर्मळी । कोटिगुणें होती फळें । होम केलिया तैसेंचि ॥८९॥
रुद्र जपोनि एकादशी । पूजा करिती मनोमानसी । अतिरुद्र केले फळसदृशी । एकाचित्तें परियेसा ॥९०॥
मंदगती प्रदक्षिणा । करितां होय अनंत पुण्य । पदोपदीं वाजपेययज्ञ । फळ तेथें परियेसा ॥९१॥
नमन करितां येणेंपरीं। पुण्य असे अपरांपरी । प्रदक्षिणा दोन चारी । करूनी करणें नमस्कार ॥९२॥
कुष्ठ असेल अंगहीन । त्याणें करणें प्रदक्षिणा । लक्ष वेळ करितां जाणा । देवासमान देह होय ॥९३॥
ऐसे स्थान मनोहरु । सहज असे कल्पतरु । म्हणोनि सांगतति गुरु । चौसष्ठ योगिनींसी ॥९४॥
ऐसा निरोप देऊन । श्रीगुरु निघाले तेथून । जेथें होतें गाणगाभुवन । भीमातीरी अनुपम्य ॥९५॥
विश्वरूप जगन्नाथ । अखिल ठायीं असे वसत । औदुंबरी प्रीति बहुत । नित्य तेथें वसतसे ॥९६॥
गौप्य राहोनी औदुंबरी । प्रकटरूपें गाणगापुरी । राहिले गुरु प्रीतिकरीं । प्रख्यात झाले परियेसा ॥९७॥
सिध्द म्हणे नामधारकासी । श्रीगुरुमहिमा आहे ऐसी । प्रकट झाले बहुवसी । गाणगापुरी परियेसा ॥९८॥
म्हणोनि सरस्वतीगंगाधर । सांगे गुरुचरित्रविस्तार । भक्तिपूर्वक ऐकती नर । लाभे चतुर्विध पुरुषार्थ ॥९९॥
गुरुचरित्र कामधेनु । जे ऐकती भक्तजनु । त्यांचे घरी निधानु । सकळाभीष्टें पावती ॥१००॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिध्द-नामधारकसंवादे औदुबरवृक्षमहिमानं - योगिनीप्रतिदिनदर्शनं तथा वरप्रदानं नाम एकोनविंशोऽध्याय: ॥१९॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥ ॐ ॥ ॐ ॥ ॐ ॥
(ओवी संख्या १००)

श्रीगणेशाय नम: ॥ श्रीसरस्वत्यै नम: ॥ श्री गुरुभ्यो नम: ॥
नामधारक शिष्यराणा । लागे सिध्दचिया चरणा । विनवीतसे कर जोडून । भक्तिभावेंकरूनि ॥१॥
पुसतसे तयावेळी । माथा ठेवोनि चरणकमळी । जय जया सिध्द-स्तोममौळी । विनंति एक अवधारा ॥२॥
स्वामी निरोपिलें आम्हांसी । श्रीगुरु आले गाणगापुरासी । गौप्यरूपें अमरापुरासी । औदुंबरी असती म्हणतां ॥३॥
वर देऊनि योगिनींसी । आपण आले प्रकटेसी । पुढे तया स्थानी कैसी । विस्तार झाला तें निरोपावें ॥४॥
वृक्ष सांगसी औदुंबर । निश्चयें म्हणसी कल्पतरु । पुढे कवणा झाला वरु । निरोपावे दातारा॥५॥
शिष्यवचन ऐकोनि । संतोषला सिध्दमुनि । सांगतसे विस्तारुनि । औदुंबरास्थानमहिमा ॥६॥
सिध्द म्हणे ऐक बाळा । किती सांगूं गुरुची लीळा । औदुंबरी सर्वकाळ । वास आपण असे जाणा ॥७॥
जया नाम कल्पतरु । काय पुससी तयाचा वरु । जेथे वास श्रीगुरु॥ कल्पिलें फळ तेथें होय ॥८॥
अमित झाला तेथें महिमा । सांगावया अशक्य आम्हां । एखादा सांगो दृष्टांत तुम्हां । शिष्योत्तमा नामधारक ॥९॥
'शिरोळे' म्हणिजे ग्रामेसी । विप्र एक परियेसीं । 'गंगाधर' नाम ऐसी । वेदरत होता जाणा ॥१०॥
त्याची भार्या पतिव्रता । शांत असे सुशीलता । तिसी पुत्र होती ते सर्वेचि मृत्युता । कष्टतसे येणेंपरी ॥११॥
पांच पुत्र तिसी झाले । सर्वेचि पंचत्व पावले । अनेक देव आराधिले । नव्हे कवणेपरी स्थिर ॥१२॥
दु:ख करी ते नारी । व्रत उपवास अपरांपरी । पूर्वकर्म असे थोरी । स्थिर नोहे पुत्र तिसी ॥१३॥
रहणी कर्मविपाकेसी । विचार करिती तिच्या दोषासी । पुत्रशोक व्हावयासी । सांगती पातकें तये वेळी ॥१४॥
सांगती विप्र विद्वज्जन । पुत्र न वांचती काय कारण । पूर्वजन्म-दोषगुण । विस्तार करिती तियेसी ॥१५॥
गर्भपात स्त्रियांसी । जे जन करिती तामसी । पावती वांझ-जन्मासी । झाले पुत्र मरती जाणे ॥१६॥
अश्ववध गोवध करी । वांझ होय सदा ज्वरी । एकदा परद्रव्य अपहारी । अपुत्री होय तो जाणा ॥१७॥
विप्र म्हणती तियेसी । तुझे पूर्वजन्म-दोषी । दिसतसे आम्हांसी । सांगूं ऐका एकचित्ते ॥१८॥
शोनेकगोत्री द्विजापाशीं । रीण घेतले द्रव्यासी । मागता तुवां न देसी । कष्टला बहुत तो ब्राह्मण ॥१९॥
लोभी होता तो ब्राह्मण । द्रव्यसंबंधे दिधला प्राण । आत्महत्या केलिया गुणें । तो पिशाच झाला असे ॥२०॥
गर्भपात करी तो तुज । जाहल्या मृत्यु करी तो द्विज । तुझें कर्म असे सहज । आपली जोडी भोगावी ॥२१॥
ऐकोनी ब्राह्मणाचे वचन । विप्रवनिता खेदे खिन्न । अनुतप्त होऊनि अंत:करण । द्विजचरणा लागली ॥२२॥
कर जोडोनि तये वेळी । विनवीतसे करुणाबहाळी । माथा ठेवूनि चरणकमळी । पुसतसे तयावेळी ॥२३॥
ऐसी पापिणी दुराचारी । बुडाल्यें पापाचे सागरी । स्वामी मातें तारी तारी । उपाय सांगणे म्हणतसे ॥२४॥
ऐसी पापें हळाहळी । अपत्ये भक्षिली चांडाळी । औषधी सांगा तुम्ही सकळी । म्हणोनी सभेसी विनवीतसे ॥२५॥
विप्र म्हणती तियेसी । तुवां केली ब्रह्महत्या दोषी । अपहारिलें द्रव्यासी । ब्राह्मण पिशाच जाहला असे ॥२६॥
जधी मेला द्विजवर । केली नाहीं क्रियाकर्म-पर । त्याचें द्रव्य तुवां सारें । भोगिलें असे जन्मांतरी ॥२७॥
त्यासी करणें उध्दारगति । सोळावें कर्म करावें रीतीं । द्रव्य द्यावें एकशती । तया गोत्रद्विजासी ॥२८॥
तेणें होय तुज बरवें । एकोभावें आचरावें । कृष्णतीरी वास करावे । एक मास उपवासी ॥२९॥
पंचगंगासंगमेसी । तीर्थे असती बहुवसी । औदुंबरवृक्षासी । आराधावें परियेसा ॥३०॥
पापविनाशी करुनी स्नान । वेळ सात औदुंबरस्नपन । अभिषेकोनि श्रीगुरुचरण । पुन्हा स्नान काम्यतीर्थी ॥३१॥
विधिपूर्वक श्रीगुरुचरणीं । पूजा करावी भावोनी॥ येणेंपरी भक्तीने । मास एक आचरावें ॥३२॥
स्थान असे श्रीगुरुचें । नरसिंहसरस्वतीचें । तुझे दोष जातील साचे । पुत्र होतील शतायुषी ॥३३॥
मास आचरोनी येणेंपरी । मग ब्राह्मणातें पाचारीं । द्रव्य द्यावें शौनकगोत्री । द्वीजवरासी एक शत ॥३४॥
त्याचेनि नामें कर्म सकळ । आचरावें मन निर्मळ । होतील तुझे कष्ट सफळ । श्रीगुरुनाथ तारील ॥३५॥
गुरुस्मरण करूनि मनीं । तूं पूजा करीं वो गुरुचरणीं । तुझें पाप होईल धुणी । ब्राह्मणसमंध परिहरेल ॥३६॥
ऐसें सांगतां द्विजवरीं । ऐकोनि सती चिंता करी । शतद्रव्य आमुच्या घरीं । कधीं न मिळे परियेसा ॥३७॥
कष्ट करीन आपुले देहीं । उपवासादि पूजा पाहीं । मासोपवास एकोभावीं । करीन आपण गुरुसेवा ॥३८॥
येणेंपरी तये नारी । सांगे आपुले निर्धारीं । ऐकोनियां द्विजवरीं । निरोप देती तये वेळी ॥३९॥
विप्र म्हणती ऐक बाळे । तूतें द्रव्य इतुकें न मिळे । सेवा करीं वो मननिर्मळें । श्रीगुरुचरणीं तूं आतां ॥४०॥
निष्कृति तुझिया पापासी ।श्रीगुरु करील परियेसीं। औदुंबरसंनिधेंसी । वास असे निरंतर ॥४१॥
तो कृपाळू भक्तांसी । निवारील ब्रह्महत्यादोषासी । जितुकें येईल तुझ्या शक्तीसी । द्रव्य वेंची गुरुनिरोपें ॥४२॥
परिसोनि द्विजवचन । विप्रवनिता संतोषोन । गेली त्वरित ठाकोन । जेथें स्थान श्रीगुरूचें ॥४३॥
स्नान करूनि संगमासी । पापविनाशीं विधीसीं । सात वेळ स्नपनेसीं । करी औदुंबरी प्रदक्षिणा ॥४४॥
काम्यतीर्थी करूनि स्नान । पूजा करूनि श्रीगुरुचरण । प्रदक्षिणा करूनि नमन । करीतसे उपवास ॥४५॥
येणेंपरी दिवस तीनी । सेवा करितां ते ब्राह्मणी । आला विप्र तिच्या स्वप्नीं । द्रव्य मागे शत एक ॥४६॥
अद्यापि जरी न देसी । घेईन तुझे प्राणासी । पुढें तुझ्या वंशासी । वाढों नेदीं अवधारीं ॥४७॥
वायां करिसी तूं सायासी । पुत्र कैंचे तुझे वंशीं । म्हणोनि कोपें मारावयासी । आला पिशाच स्वप्नांत ॥४८॥
भयचकित ते वनिता । औदुंबराआड रिघतां । तंव देखिलें श्रीगुरुनाथा । तयापाठीं रिघाली ॥४९॥
अभय देवोनि नारीसी । वारिता झाला ब्राह्मणासी । पुसती श्रीगुरु तयासी । कां मारिसी स्त्रियेसी ॥५०॥
विप्र विनवी श्रीगुरूसी । "जन्मांतरी आपणासी । अपहार केला द्रव्यासी । प्राण त्यजिला यास्तव ॥५१॥
स्वामी कृपाळू सर्वांसी । आमुचे शत्रूचा पक्षपात करिसी । तूंही यतीश्वर तापसी । पक्षपात करूं नये " ॥५२॥
ऐकोनि तयाचें वचन । श्रीगुरु म्हणती कोपोन । "उपद्रव देसी भक्तजना । तूंतें शिक्षा करूं जाण ॥५३॥
आम्ही सांगों जेणें रीती । जरी ऐकसी हितार्थी । तुज होईल सद्गति । पिशाचत्व परिहरेल ॥५४॥
जें काय देईल विप्रवनिता । तुवां अंगिकारावें सर्वथा । जरी न ये तुझ्या चित्ता । जाईं आतां येथोन ॥५५॥
राखीव माझिया भक्तांसी । वंशोवंशी अभिवृध्दीसीं ; । पुनरपि जरी पाहूं येसी । शिक्षा करूं " म्हणती गुरु ॥५६॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विप्र-पिशाच करी नमन । " स्वामी तुझे देखिले चरण । उध्दरावें आपणासी ॥५७॥
जेणेंपरी आपणासी । होय गति उध्दरावयासी । निरोप देसी करुणेसीं । अंगिकारूं स्वामिया " ॥५८॥
श्रीगुरु म्हणती तयासी । विप्रवनिता भावेसीं । करील कर्म दहा दिवशी । गति होईल तूतें जाणा ॥५९॥
येणेंपरी तयासी । निरोप देती स्त्रियेसी । जें असेल तुजपाशी । आचरीं कर्म तया नामीं ॥६०॥
अष्टतीर्थी स्नान करी । तया नामें अवधारीं । सात दिवस येणेंपरी । स्नपन करीं औदुंबरा ॥६१॥
ब्रह्महत्या तुझे दोषी । जातील त्वरित भरंवसी । कन्या पुत्र पूर्णायुषी । होतील म्हणती श्रीगुरु ॥६२॥
ऐसें देखोनि जागृतीं । विप्रवनिता भयचकिती । ज्ञाने पाहे श्रीगुरुमूर्ति । न विसंवे मनांत ॥६३॥
श्रीगुरुनिरोपें दहा दिवस । केलें आचरण परियेस । ब्रह्महत्या गेला दोष । गति झाली ब्राह्मणासी ॥६४॥
येरे दिवशी स्वप्नांत । प्रत्यक्ष आले श्रीगुरुनाथ । नारिकेल दोन देत । भरली ओंटी तियेची ॥६५॥
म्हणे पारणें करीं वो तूं आतां । पुत्र होतील वेदरता । वाढे त्यांची संतति बहुता । चिंता न करीं अहो बाळे ॥६६॥
गुरुनिरोपें आराधन । करिती दंपती मन:पूर्ण । प्रकट झाला श्रीगुरुराणा । संपर्क लोह-परिसापरी ॥६७॥
गुरुनिरोपें आराधन । करिती दंपती मन:पूर्ण । प्रकट झाला श्रीगुरुराणा । संपर्क लोह परिसापरी ॥६८॥
पुढें तया नारीसी। पुत्रयुग्म सद्वंशी । झाले श्रीगुरुकृपेसीं । एकचित्तें परियेसा ॥६९॥

समारंभ करी जननी । चौलकर्म करणें मनीं । पुत्रासी जाहलीं वर्षे तीन्ही । अत्योल्हास मानसीं ॥७१॥
समारंभ अतिप्रीतीं । करिती झाली आयती । पूर्व दिवसी मध्यरात्रीं । आली व्याधि कुमरासी ॥७२॥
व्याधि असती अष्टोत्तर । एकाहूनि एक थोर । तयामध्यें जो का तीव्र । धनुर्वात तयासी ॥७३॥
अवयव वांकोनि । दिसे भयानक नयनी । येणेपरी दिवस तीन्ही । कष्टातसे तो बाळ ॥७४॥
तया दिवशीं अस्तमानीं । पंचत्व पावला तत्क्षणी । शोक करिती जनक जननी । ऐका श्रोते एकचित्तें ॥७५॥
आक्रोशोनि भूमीसी । आफळी शिर सत्राणेसीं । पाषाण घेवोनि उरासी । घात करी ते नारी ॥७६॥
देह टाकी धरणीवरी । निर्जीव होवोनि क्षणभरी । आठवी दु:ख अपरांपरी । नयनीं वाहे पूर्ण जळ ॥७७॥
प्रेतपुत्रावरी लोळे । अलिंगोनि परिबळें । विष्टोनियां मायाजाळें । प्रलापीतसे ते नारी ॥७८॥
म्हणे ताता पुत्रराया । प्राणरक्षका माझ्या प्रिया । मातें केवी सोडूनियां । जासी कठोर मन करूनि ॥७९॥
कोठें गेलासी खेळावया । स्तनींचें क्षीर जातसे वायां । शीघ्र येईं गा ठाकोनियां । पुत्रराया परियेसीं ॥८०॥
केवीं विसरूं तुझे गुण । माझा तूंचि निर्धान । तुझे गोजिरें बोलणें । केवीं विसरूं पुत्रराया ॥८१॥
तुझे रूपासारखा सुत । केवी देखों मी निश्चित । निधान देखत्यें स्वप्नांत । तैसें मज चाळिवलें ॥८२॥
पुत्र व्यालें पांच आपण । त्यात तूं एक निधन । जधीं झालें गर्भधारण । तैपासाव संतोष ॥८३॥
डोहळे मज उत्तम होती । कधी नसे मी दुश्चिती । अत्योल्हास नवमासांतीं । पुत्र होईल म्हणोनि ॥८४॥
श्रीगुरूंनी दिधला मातें वर । पुत्र होईल निर्धार । त्याणें मज हर्ष फार । वरद पिंड म्हणोनि॥८५॥
जधीं तुज प्रसूत जाहल्यें । अनंत सौख्य मीं लाधलें । प्राणप्रिया तुज मीं पोसिलें । आमुतें रक्षिसी म्हणोनि ॥८६॥
मज भरंवसा तुझा बहुत । वृध्दाप्याचा पोषक म्हणत । आम्हांसी सांडूनि जातां उचित । धर्म नव्हे पुत्रराया ॥८७॥
दु:ख झालें मज बहुत ।विसरल्यें बाळा तुज देखत । तूं तारक आमुचा सत्य । म्हणोनि विश्वास केला जाण ॥८८॥
ऐसें नानापरी देखा । दु:ख करी ते बाळिका । निवारण करिती सकळ लोक । वाया दु:ख तूं कां करिसी ॥८९॥
देवदानवऋषेश्वरांसी । होणार न चुके परियेसीं । ब्रह्मा लिही ललाटेंसी। तेचि अढळ जाण सत्य ॥९०॥
अवतार होताति हरिहर । तेही न राहती स्थिर । उम्ही तरी मनुष्य नर । काय अढळ तुम्हांसी॥९१॥
येणेंपरी सांगती जन । आणखी दु:ख आठवी मन । म्हणे मातें दिधलीं जाण । स्थिर म्हणोनि दोन्ही फळें ॥९२॥
श्रीगुरु-नरसिंहसरस्वती । भूमंडळीं महाख्याति । औदुंबरी सदा वसती । त्यांणी दिधले मज सुत ॥९३॥
त्याचे बोल केवी मिथ्या । मातें दिधला वर सत्या । त्यासी घडो माझी हत्या। पुत्रासवें देईन प्राण ॥९४॥
म्हणोनि आठवी श्रीगुरूसी । देवा मातें गांजिलेंसी । विश्वास केला मी तुम्हांसी । सत्य वाक्य तुझें म्हणत ॥९५॥
सत्यसंकल्प तूंचि होसी । म्हणोनि होत्यें विश्वासी । घात केला गा आम्हांसी । विश्वासघातकी केवी न म्हणों ॥९६॥
त्रयमूर्तीचा अवतारु । तुंचि नरसिंहसरस्वती गुरू। ध्रुवा विभीषणा दिधला वरु । केवीं सत्य म्हणों आतां ॥९७॥
विश्वास केला तुझे बोलें । आतां मातें उपेक्षिलें । माझ्या मनीं निश्चय केला । प्राण देईन तुम्हांवरी ॥९८॥
लोक येती तुझ्या स्थानीं । सेवा करिती निवसोनि । औदुंबरी प्रदक्षिणा करूनि । पुरश्चरणें करिताति ॥९९॥
आपण केलें पुरश्चरण । फळा आलें मज साधन । आतां तुजवरी देईन प्राण । काय विश्वास तुझ्या स्थानीं ॥१००॥
कीर्ति होईल सृष्टींत । आम्हां केला तुवां घात । पुढें तुज भजती भक्त । काय भरंवसा तयांसी ॥१॥
ब्रह्मस्वदोषें पीडोन । दृढ धरिले तुझे चरण । अंगीकारोनि मध्यें त्यजणें । कवण धर्म घडतसे ॥२॥
व्याघ्रातें धेनु भिऊन । जाय आणिकापाशीं ठासून । तोचि मारी तिचा प्राण । तयापरी झालें आपणासी ॥३॥
कीं एखादा पूजेसी । जाय देउळा संधीसी । तेंचि देऊळ तयासी । मृत्यु जोऊनि वर पडे ॥४॥
तयपरी आपणासी । जाहलें स्वामी परियेसीं । माझ्या प्राणसुतासी । न राखिसी देवराया ॥५॥
येणेंपरी अहोरात्री । दु:ख करीतसे ते नारी । उदय जाहला दिनकरीं । प्रात:काळीं परियेसा ॥६॥
द्विज ज्ञाते मिळोनि सकळी । येती तये स्त्रियेजवळी । वायां दु:ख सर्वकाळी । करिसी मूर्खपणें तूं ॥७॥
जे जे समयीं होणार गति । ब्रह्मादिकां न चुके ख्याति । चला जाऊं गंगेप्रती । प्रेतसंस्कार करूं आतां ॥८॥
ऐसें वचन ऐकोनि । महा आक्रोश करी मनी । आपणासहित घाला वन्ही । अथवा नेदीं प्रेतासी ॥९॥
आपणासहित बाळासी । करा पां अग्निप्रवेशी । येरवी नेदीं प्रेतासी । म्हणोनि उरीं बांधी बाळा ॥११०॥
लोक म्हणती तियेसी । नव्हसी तूं स्त्री, कर्कशी । प्रेतासवें प्राण देसी । कवण धर्म सांग आम्हां ॥११॥
नाहीं देखिलें न ऐकों कानीं । पुत्रासवें देती प्राण कोणी । वायां बोलसी मूर्खपणीं । आत्महत्या महादोष ॥१२॥
नानापरी तियेसी । बोधिती लोक परियेसीं । निश्चय तिनें केला ऐसी । प्राण त्यजीन पुत्रासवें ॥१३॥
दिवस गेला दोन प्रहर । प्रेतासी करूं नेदी संस्कार । अथवा न ये गंगतीरा । ग्रामीं आकांत वर्तला ॥१४॥
इतुकिया अवसरीं । आला एक ब्रह्मचारी । सांगे तिसी सविस्तारीं । आत्मज्ञान तये वेळीं ॥१५॥
सिध्द म्हणे नामधारका । पुढें अपूर्व झालें ऐका । ब्रह्मचारी आला एका । बोधिता झाला ज्ञान तिसी ॥१६॥
बाळ नव्हे तोचि गुरु । आला नरवेषधारु । नरसिंहसरस्वती अवतारु । भक्तवत्सल परियेसा ॥१७॥
म्हणोनि सरस्वतीगंगाधर सांगे गुरुचरित्राविस्तार । ऐकता होय मनोहर । शतायुषी पुरुष होय ॥१८॥
भक्तिपूर्वक ऐकती जरी । व्याधि नव्हती त्यांचे । पूर्णायुषी ते होती अमरी । सत्य माना माझा बोल ॥११९॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिध्द-नामधारकसंवादे ब्रह्मसमंधपरिहार-प्रेतजननीशोकनं नाम विशोऽध्याय:
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओवीसंख्या ११९)

श्रीगणेशाय नमः ।
सिद्ध म्हणे नामधारका । ब्रह्मचारी कारणिका । उपदेशी ज्ञान निका । तये प्रेतजननीसी ॥१॥
ब्रह्मचारी म्हणे नारीसी । मूढपणे दुःख करिसी । कोण वाचला धरणीसी । या संसारी सांग मज ॥२॥
उपजला कोण मेला कोण । उत्पत्ति झाली कोठोन । जळात उपजे जैसा फेण । बुदबुद राहे कोठे स्थिर ॥३॥
जैसा देह पंचभूती । मिळोनि होय आकृति । वेगळी होता पंचभूती । अव्यक्त होय देह जाण ॥४॥
तया पंचभूतांचे गुण । मायापाशी वेष्टोन । भ्रांति लाविली मी देह म्हणोन । पुत्रमित्रकलत्रमिषे ॥५॥
सत्त्व रज तमोगुण । तया भूतांपासोन । वेगळाली केली लक्षण । होती ऐका एकचित्ते ॥६॥
देवत्व होय सत्त्वगुण । रजोगुण मनुष्य जाण । दैत्यांसी तमोगुण । गुणानुसारे कर्मे घडती ॥७॥
जेणे कर्मे आचरती । सुकृत अथवा दुष्कृति । तैशीच होय फळप्राप्ति । आपुले आपण भोगावे ॥८॥
जैसी गुणाची वासना । इंदिये तयाधीन जाणा । मायापाशी वेष्टोनि गहना । सुखदुःखे लिप्त करिती ॥९॥
या संसारवर्तमानी । उपजती जंतु कर्मानुगुणी । आपल्या आर्जवापासोनि । सुखदुःखादि भोगिती ॥१०॥
कल्पकोटी वरुषे ज्यांसी । असती आयुष्ये देवऋषि । न सुटे कर्म तयासी । मनुष्याचा कवण पाड ॥११॥
एखादा नर देहाधीन । काळ करी आपुले गुण । कर्म होय अनेक गुण । देहधारी येणेपरी ॥१२॥
जो असे देहधारी । तयासी विकार नानापरी । स्थिर नव्हे तो निर्धारी । आपुले पाप म्हणावया ॥१३॥
या कारणे ज्ञानवंत । संतोष न करी उपजत । अथवा नरा होय मृत्यु । दुःख आपण करू नये ॥१४॥
जधी गर्भसंभव होता । काय दिसे आकारता । अव्यक्त दिसे व्यक्तता । सवेचि होय अव्यक्त पै ॥१५॥
बुदबुद निघती जैसे जळी । सवेचि नष्ट तात्काळी । तैसा देह सर्वकाळी । स्थिर नव्हे सर्वथा ॥१६॥
जधी गर्भप्रसव झाले । विनाशी म्हणोनि जाणिले । कर्मानुबंधे जैसी फळे । तैसे भोगणे देहासी ॥१७॥
कोणी मरती पूर्ववयेसी । अथवा मरती वृद्धपणेसी । आपुले अर्जिती असती जैशी । तेणेपरी घडे जाण ॥१८॥
मायापाशी वेष्टोनि । म्हणती पिता सुत जननी । कलत्र मित्र तेणे गुणी । आपुले आपुले म्हणती मूढ ॥१९॥
निर्मळ देह म्हणो जरी । उत्पत्ति मांसरुधिरी । मळमूत्रांत अघोरी । उद्‌भव झाला परियेसा ॥२०॥
कर्मानुसार उपजतांची । ललाटी लिहितो विरंची । सुकृत अथवा दुष्कृतेची । भोग भोगणे म्हणोनि ॥२१॥
ऐसे कर्म काळासी । जिंकिले नाही परियेसी । या कारणे देहासी । नित्यत्व नाही परियेसा ॥२२॥
स्वप्नी निधान दिसे जैसे । कोणी धरावे भरवसे । इंद्रजाल गारूड जैसे । स्थिर केवी मानिजे ॥२३॥
तुझे तूचि सांग वहिले । कोटी वेळा जन्म झाले । मनुष्य किंवा पशुत्व लाधले । पक्षी अथवा कृमिरूप ॥२४॥
जरी होतीस मनुष्ययोनी । कोण कोणाची होतीस जननी । कोण कोणाची होतीस गृहिणी । सांग तुझे त्वा निश्चये ॥२५॥
कवण तुझी मातापिता । जन्मांतरींची सांग आता । वाया दुःख करिसी वृथा । पुत्र आपुला म्हणोनि ॥२६॥
पंचभूतात्मक देह । चर्ममांस-अस्थि-मज्जा -समूह । वेष्टोनिया नव देह । मळबद्ध शरीर नावे ॥२७॥
कैचा पुत्र कोठे मृत्यु । वाया भ्रमोनि का रडत । सांडोनि द्यावे कैचे प्रेत । संस्कारिती लौकिकार्थ ॥२८॥
येणेपरी ब्रह्मचारी । सांगे तत्त्व विस्तारी । परिसोनिया विप्रनारी । विनवितसे तयासी ॥२९॥
विप्रवनिता तये वेळी । विनवीतसे करुणा बहाळी । स्वामी निरोपिले धर्म सकळी । परी स्थिर नव्हे अंतःकरण ॥३०॥
प्रारब्ध प्रमाण म्हणो जरी । तरी का भजावा श्रीहरी । परीस संपर्क लोह जरी । सुवर्ण न होय कोण बोले ॥३१॥
आम्ही पहिले दैवहीन । म्हणोनि धरिले श्रीगुरुचरण । अभय दिधले नाही मरण । म्हणोनि विश्वासलो आम्ही ॥३२॥
एखाद्या नरा येता ज्वर । धुंडीत जाय वैद्यघर । औषध घेवोनि प्रतिकार । सवेचि करिती आरोग्यता ॥३३॥
एके समयी मनुष्यासी । आश्रय करिती करुणेसी । साह्य होय भरंवसी । आली आपदा परिहारी ॥३४॥
त्रयमूर्तीचा अवतार । श्रीनृसिंहसरस्वती असे नर । तेणे दिधला असे वर । केवी असत्य होय सांगे ॥३५॥
आराधिले म्या तयासी । वर दिधला गा मजसी । त्याचा भरवसा मानसी । धरोनि होते स्वस्थचित्त ॥३६॥
विश्वासुनी असता आपण । केवी केले निर्माण । कैसे झाले माझे मूर्खपण । म्हणोनि स्वामी निरोपिसी ॥३७॥
याकारणे आपण आता । प्राण त्यजीन तत्त्वता । देह समर्पीन श्रीगुरुनाथा । वाढो कीर्ति तयाची ॥३८॥
ऐकोनि तियेचे वचन । ओळखून भाव मन । सांगे बुद्धि तीस ज्ञान । उपाय यासी करी आता ॥३९॥
विश्वास केला श्रीगुरूसी । पुत्र लाधला पूर्णायुषी । जरी आला मृत्यु त्यासी । घेवोनि जाय गुरुस्थाना ॥४०॥
जेथे लाधला तुज वर । तेथे ठेवी कलेवर । पंचगंगाकृष्णातीर । औदुंबरवृक्षातळी ॥४१॥
ऐसे वचन ऐकोनि । विश्वास झाला तिचे मनी । पाठी शव बांधोनि । घेवोनि गेली औदुंबरा ॥४२॥
जेथे होत्या गुरुपादुका । आफळी शिर ते बालिका । रुधिरे भरल्या त्या पादुका । आक्रोशे रडे ती नारी ॥४३॥
समस्त शोकाहुनी अधिक । साहवेना पुत्रशोक । क्षयरोग तोचि एक । मातापितया मृत्युमूळ ॥४४॥
ऐसे करिता झाली निशी । विप्र मागती प्रेतासी । म्हणती आक्रोश का हो करिसी । संस्कारोनि जाऊ आता ॥४५॥
मनुष्य नाही अरण्यात । केवी राहू जाऊ म्हणत । जळू दे वो आता प्रेत । अहो कर्कशा म्हणे ती ज्ञाती ॥४६॥
काही केलिया नेदी प्रेत । आपणासवे जाळा म्हणत । पोटी बांधोनिया प्रेत । लोळतसे पादुकांवरी ॥४७॥
म्हणती विप्र ज्ञाती लोक । राहो नये रानी ऐक । तस्करबाधा होईल देख । जाऊ आता घरासी ॥४८॥
जाऊ स्नान करूनि । उपवास होय आजच्या दिनी । प्रातःकाळी येवोनि । दहन करू म्हणताती ॥४९॥
आजिचे रात्री प्रेतासी । सुटेल वास दुर्गंधीसी । देईल आपोआप दहनासी । त्रासून जाणा कर्कशा ॥५०॥
म्हणोनि निघती सकळ लोक । राहिले तेथे जननीजनक । प्रेत देखोनि करिती शोक । झाली रात्री परियेसा ॥५१॥
निद्रा नाही दिवस दोन्ही । शोक करिती जनकजननी । तीन याम होता रजनी । झोप आली तियेसी ॥५२॥
देखतसे सुषुप्तीत । जटाधारी भस्मोध्दूलित । व्याघ्रचर्मे परिधानित । रुद्राक्षमाळा सर्वांगी ॥५३॥
योगदंड त्रिशूळ हाती । आले औदुंबराप्रति । का हो शोक करिसी सती । आक्रोशोनि आम्हांवरी ॥५४॥
काय झाले तुझिया कुमारा । करू त्यासी प्रतिकारा । म्हणोनि दे तो अभय करा । भक्तवत्सला श्रीगुरु ॥५५॥
भस्म काढोनि प्रेतासी । लावीतसे सर्वांगासी । मुख पसरी म्हणे तिसी । वायुपूर करू म्हणे ॥५६॥
प्राण म्हणे वायु जाण । बाहेर गेला निघोन । घातला मागुती आणून । पुत्र तुझा जीवंत होय ॥५७॥
इतुके देखोनि भयचकित । झाली नारी जागृत । म्हणे आपणा कैसी भ्रांत । पडिली असे प्रेतावरी ॥५८॥
जे का वसे आपुले मनी । तैसेचि दिसे निद्रास्वप्नी । कैचा देव नृसिंहमुनि । भ्रांति आपणा लागलि असे ॥५९॥
आमुचे प्रारब्ध असे उणे । देवावरी बोल काय ठेवणे । अज्ञान आम्ही मूर्खपणे । श्रीगुरूवरी बोल काय ॥६०॥
येणेपरी चिंता करीत । तव प्रेतासी झाले चेत। सर्वांगही उष्ण होत । सर्वसंधी जीव आला ॥६१॥
म्हणे प्रेता काय झाले । किंवा भूत संचारले । मनी भय उपजले । ठेवी काढोनि दूर परते ॥६२॥
सर्व संधीसी जीव आला । बाळ उठोनि बैसला । म्हणे क्षुधा लागली मला । अन्न दे की म्हणे माते ॥६३॥
रुदन करीतसे तये वेळी । आला कुमार मातेजवळी । स्तन घालिता मुखकमळी । क्षीर निघे बत्तीस धारा ॥६४॥
संतोश भय होऊनि तिसी । संदेह वाटे मानसी । कडे घेऊनि बाळकासी । गेली आपुल्या पतीजवळी ॥६५॥
जागृत करूनि पतीसी । सांगे वृत्तान्त तयासी । पति म्हणे तियेसी । ऐसे चरित्र श्रीगुरूचे ॥६६॥
म्हणोनि दंपत्य दोघे जाणा । करोनि औदुंबरी प्रदक्षिणा । साष्टांग नमुनी चरणा । नानापरी स्तोत्रे करिती ॥६७॥
जय जयाजी वरदमूर्ति । ब्रह्मा विष्णु शिवयती । भक्तवत्सला तुझी ख्याति । वासना पहासी भक्तांची ॥६८॥
तू तारक विश्वासी । म्हणोनि भूमी अवतरलासी । अशक्य तुते वर्णावयासी क्षमा करणे स्वामिया ॥६९॥

सर्वस्वी आम्हा क्षमा करणे । म्हणोनि घालिती लोटांगणे । विनवोनिया करुणावचने । गेली स्नानासी गंगेत ॥७१॥
स्नान करोनि बाळकासहित । धुती झाली पादुकांचे रक्त । औदुंबरा स्नपन करीत । लाविती दीप तये वेळी ॥७२॥
पूजा करिती भक्तीसी । मंत्रपूर्वक विधींसी । शमीपत्र कुसुमेसी । पूजा करिती परियेसा ॥७३॥
नीरांजन तये वेळा । करिती गायन परिबळा । अतिसंतोषी ती अबला । भक्तिभावे स्तुति करीत ॥७४॥
इतुके होय तो गेली निशी । उदय झाला दिनकरासी । संस्कारू म्हणोनि प्रेतासी । आले विप्र ज्ञाती सकळ ॥७५॥
तव देखती कुमारासी । विस्मय झाला सकळिकांसी । समाधान करिती हर्षी । महा आनंद वर्तला ॥७६॥
ऐसा श्रीगुरुस्थानमहिमा । अखिल लोक लाधले कामा । एकेकाची सांगता महिमा । विस्तार होईल बहु कथा ॥७७॥
पुत्रप्राप्ति वांझेसी । श्रीप्राप्ति दारिद्र्यासी । आरोग्य होईल रोगियासी । अपमृत्यु न ये जाणा ॥७८॥
सिद्ध म्हणे नामधारका । स्थानमहिमा ऐशी ऐका । अपार असे सांगता देखा । साधारण निरोपिले ॥७९॥
तया औदुंबरातळी । श्रीगुरु वसे सर्वकाळी । काम्य होत तात्काळी । आराधिता नरहरीसी ॥८०॥
भाव असावा आपुले मनीं । पूजा करावी श्रीगुरुचरणी । जी जी वासना ज्याचे मनी । त्वरित होय परियेसा ॥८१॥
हृदयशूळ गंडमाळ । अपस्मार रोग सकळ । परिहरती तात्काळ । श्रीगुरुपादुका अर्चिता ॥८२॥
जो असेल मंदमति । बधिर मुका चरण नसती । औदुंबरी सेवा करिती । सुदेह होय सत्य माना ॥८३॥
चतुर्विध पुरुषार्थ । तेथे होय निश्चित । प्रत्यक्ष वसे श्रीगुरुनाथ । औदुंबरी सनातन ॥८४॥
तया नाव कल्पतरू । प्रत्यक्ष झाणा औदुंबरू । जे जे मनी इच्छिती नरू । साध्य होय परियेसा ॥८५॥
किती वर्णू तेथील महिमा । सांगता अशक्य असे आम्हा । श्रीगुरुसरस्वती नामा । प्रख्यात असे परियेसा ॥८६॥
गंगाधराचा नंदन । सांगे गुरुचरित्र विस्तारोन । भक्तिपूर्वक ऐकती जे जन । सकलाभीष्टे पावती ॥८७॥
म्हणोनि सरस्वतीगंगाधर । सदा श्रीगुरुचरणी स्थिर । उतरवी पैलपार । इहसौख्य परगति ॥८८॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । गुरुमाहात्म्यपरमामृत । विप्रपुत्रसंजीवनामृत । निरोपिले असे येथे ॥८९॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे बालसंजीवन नाम एकविंशोऽध्यायः ॥२१॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या ८९)

श्रीगणेशाय नमः ।
नामधारक शिष्यराणा । लागे सिद्धाचिया चरणा । कर जोडोनिया जाणा । विनवीतसे परियेसा ॥१॥
जय जयाजी योगीश्वरा । शिष्यजनमनोहरा । तूचि तारक भवसागरा । अज्ञानतिमिराज्योती तू ॥२॥
तुझा चरणसंपर्क होता । झाले ज्ञान मज आता । परमार्थवासना तत्त्वतां । झाली तुझे प्रसादे ॥३॥
दाखविली गुरूची सोय । तेणे सकळ ज्ञान होय । तूचि तारक योगिराय । परमपुरुषा सिद्धमुनी ॥४॥
गुरुचरित्रकामधेनु । सांगितले मज विस्तारोनि । अद्यापि न धाय माझे मनु । आणिक आवडी होतसे ॥५॥
मागे तुम्ही निरोपिले । श्रीगुरु गाणगापुरी आले । पुढे कैसे वर्तले । विस्तारावे दातारा ॥६॥
ऐकोनि शिष्याचे वचन । सांगे सिद्ध संतोषोन । म्हणे शिष्या तू सगुण । गुरुकृपेच बाळक ॥७॥
धन्य धन्य तुझे जीवन । धन्य धन्य तुझे मन । होसी तूचि पूज्यमान । या समस्त लोकांत ॥८॥
तुवा प्रश्न केलासी । संतोष माझ्या मानसी । उल्हास होतो सांगावयासी । गुरुचरित्रकामधेनु ॥९॥
पुढे वाढला अनंत महिमा । सांगतां असे अनुपमा । श्रीगुरु आले गाणगाभुवनी । राहिले संगमी गुप्तरूपे ॥१०॥
भीमा उत्तरवाहिनीसी । अमरजासंगमविशेषी । अश्वत्थ नारायण परियेसी । महावरद स्थान असे ॥११॥
अमरजा नदी थोर । संगम झाला भीमातीर । प्रयागासमान असे क्षेत्र । अष्टतीर्थे असती तेतेह ॥१२॥
तया तीर्थांचे महिमान । अपार असे आख्यान । पुढे तुज विस्तारोन । सांगेन ऐक शिष्योत्तमा ॥१३॥
तया स्थानी श्रीगुरुमूर्ति । होती गौप्य अतिप्रीती । तीर्थमहिमा करणे ख्याति । भक्तजनतारणार्थ ॥१४॥
समस्त तीर्थे श्रीगुरुचरणी । ऐसे बोलती वेदपुराणी । त्यासी कायसे तीर्थ गहनी । प्रकाश करी क्षेत्रांसी ॥१५॥
भक्तजनतारणार्थे । तीर्थे हिंडे श्रीगुरुनाथ । गौप्य होती कलियुगात । प्रकट केली गुरुनाथे ॥१६॥
तेथील महिमा अनुक्रमेसी । सांगो पुढे विस्तारेसी । प्रकट झाले श्रीगुरू कैसी । सांगेन ऐका एकचित्ते ॥१७॥
ऐसा संगम मनोहर । तेथे वसती श्रीगुरुवर । त्रिमूर्तींचा अवतार । गौप्य होय कवणेपरी ॥१८॥
सहस्त्र किरणे सूर्यासी । केवी राहवेल गौप्येसी । आपोआप प्रकाशी । होय सहज गुण तयाचे ॥१९॥
वसती रानी संगमासी । जाती नित्य भिक्षेसी । तया गाणगापुरासी । माध्याह्नकाळी परियेसा ॥२०॥
तया ग्रामी द्विजवर । असती एकशत घर । होते पूर्वी अग्रहार । वेदपाठक ब्राह्मण असती ॥२१॥
तया स्थानी विप्र एक । राहत असे सुक्षीण देख । भार्या त्याची पतिसेवक । पतिव्रताशिरोमणी ॥२२॥
वर्तत असता दरिद्रदोषी । असे एक वांझ महिषी । वेसण घातली तियेसी । दंतहीन अतिवृद्ध ॥२३॥
नदीतीरी मळियासी । क्षारमृत्तिका वहावयासी । नित्य द्रव्य देती त्यासी । मृत्तिका क्षार वहावया ॥२४॥
तेणे द्रव्ये वरो घेती । येणे रीती काळ क्रमिती । श्रीगुरुनाथ अतिप्रीती । येती भिक्षेसी त्याचे घरा ॥२५॥
विप्र लोक निंदा करिती । कैचा आला यति म्हणती । आम्ही ब्राह्मण असो श्रोती । न ये भिक्षा आमुचे घरी ॥२६॥
नित्य आमुचे घरी देखा । विशेष अन्न अनेक शाका । असे त्यजुनी यति ऐका । जातो दरिद्रियाचे घरी ॥२७॥
ऐसे बोलती विप्र समस्त । भक्तवत्सल श्रीगुरुनाथ । प्रपंचरहित परमार्थ । करणे असे आपुल्या मनी ॥२८॥
पाहे पा विदुराच्या घरा । प्रीती कैसी शार्ङ्गधरा । दुर्योधनराजद्वारा । कधी न वचे परियेसा ॥२९॥
सात्त्विकबुद्धी जे वर्तती । श्रीगुरूची त्यांसी अतिप्रीति । इह सौख्य अपरा गति । देतो आपल्या भक्तांसी ॥३०॥
ऐसा कृपाळू परम पुरुष । भक्तावरी प्रेम हर्ष । त्यासी दुर्बळ काय दोष । रंका राज्य देउ शके ॥३१॥
जरी कोपे एखाद्यासी । भस्म करील परियेसी । वर देता दरिद्रियासी । राज्य होय क्षितीचे ॥३२॥
ब्रह्मदेवे आपुल्या करे । लिहिली असती दुष्ट अक्षरे । श्रीगुरुचरणसंपर्के । दुष्टाक्षरे ती शुभ होती ॥३३॥
ऐसे ब्रीद श्रीगुरुचे । वर्णू न शके माझे वाचे । थोर पुण्य त्या ब्राह्मणाचे । श्रीगुरु जाती तया घरा ॥३४॥
वर्तत असता एके दिवसी । न मिळे वरू त्या ब्राह्मणासी । घरी असे वांझ महिषी । नेली नाही मृत्तिकेसी ॥३५॥
तया विप्रमंदिरासी । श्रीगुरु आले भिक्षेसी । महा उष्ण वैशाखमासी । माध्याह्नकाळी परियेसा ॥३६॥
ऐसे श्रीगुरुकृपामूर्ति । गेले द्विजगृहाप्रती । विप्र गेला याचकवृत्ती । वनिता त्याची घरी असे ॥३७॥
भिक्षा म्हणता श्रीगुरुनाथ । पतिव्रता आली धावत । साष्टांगी दंडवत । करिती झाली तये वेळी ॥३८॥
नमन करूनि श्रीगुरूसी । विनवीतसे भक्तीसी । आपला पती याचकवृत्तीसी । गेला असे अवधारा ॥३९॥
उत्कृष्ट धान्य घरी बहुत । घेवोनि येतिल पती त्वरित । तववरी स्वामी बैसा म्हणत । पिढे घातले बैसावया ॥४०॥
श्रीगुरुमूर्ति हास्यवदन । बैसते झाले शुभासन । तिये विप्रस्त्रियेसी वचन । बोलती क्षीर का वो न घालिसी ॥४१॥
तुझे द्वारी असता महिषी । क्षीर काहो न घालिसी भिक्षेसी । आम्हाते तू का चाळविसी । नाही वरू म्हणोनिया ॥४२॥
श्रीगुरुवचन ऐकोन । विप्रवनिता करी नमन । वांझ महिषी दंतहीन । वृद्धत्व झाले तियेसी ॥४३॥
उपजतांची आमुचे घरी । वांझ झाली दगडापरी । गाभा न वाचे कवणेपरी । रेडा म्हणोनि पोशितो ॥४४॥
याचि कारणे तियेसी । वेसण घातली परियेसी । वाहताती मृत्तिकेसी । तेणे आमुचा योगक्षेम ॥४५॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । मिथ्या बोलसी आम्हांसी । त्वरित जावोनिया महिषीसी । दुहूनि आणी क्षीर आम्हा ॥४६॥
ऐसे वचन ऐकोनि । विश्वास झाला तिचे मनी । काष्ठपात्र घेवोनि । गेली ऐका दोहावया ॥४७॥
श्रीगुरुवचन ऐकोन । विप्रवनिता जाता क्षण । दुभली क्षीर संतोषोन । भरणे दोन तये वेळी ॥४८॥
विस्मय करी विप्रवनिता । म्हणे ईश्वर हा तत्त्वता । याचे वाक्य परिसता । काय नवल म्हणतसे ॥४९॥
क्षीर घेवोनि घरात । आली पतिव्रता त्वरित । तापविती झाली अग्नीत । सवेचि विनवी परियेसा ॥५०॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । घाली हो क्षीर भिक्षेसी । जाणे आम्हा स्वस्थानासी । म्हणोनि निरोपिती तये वेळी ॥५१॥
परिसोनि स्वामीचे वचन । घेवोनि आली क्षीरभरण । केले गुरुनाथे प्राशन । अतिसंतोषे करूनिया ॥५२॥
संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । वर देती अतिप्रीती । तुझे घरी अखंडिती । लक्ष्मी राहे निरंतर ॥५३॥
पुत्रपौत्री श्रियायुक्त । तुम्ही नांदाल निश्चित । म्हणोनि निघाले त्वरित । संगमस्थानासी आपुल्या ॥५४॥
श्रीगुरु गेले संगमासी । आला विप्र घरासी । ऐकता झाला विस्तारेसी । महिमा श्रीगुरुमूर्तीचा ॥५५॥
म्हणे अभिनव झाले थोर । होईल ईश्वरी अवतार । आमुच्या दृष्टी दिसे नर । परमपुरुष तोचि सत्य ॥५६॥
विप्र म्हणे स्त्रियेस । आमुचे गेले दरिद्रदोष । भेट जाहली श्रीगुरुविशेष । सकळाभीष्टे साधली ॥५७॥
म्हणोनि मनी निर्धार करिती । भेटी जाऊ कैचा यति । हाती घेवोनि आरती । गेले दंपती संगमासी ॥५८॥
भक्तिपूर्वक श्रीगुरूसी । गंधाक्षताधूपदीपेसी । नैवेद्यतांबूलप्रदक्षिणेसी । पूजा करिती सद्भावे ॥५९॥
येणेपरी द्विजवर । लाधता जाहला जैसा वर । कन्यापुत्र लक्ष्मी स्थिर । पूर्ण आयुष्य झाले जाण ॥६०॥
सिद्ध म्हणे शिष्यासी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । दैन्य कैसे त्या नरासी । अष्टैश्वर्ये भोगीतसे ॥६१॥
म्हणे सरस्वतीगंगाधर । सांगे गुरुचरित्रविस्तार । ऐकता होय मनोहर । दैन्यावेगळा होय त्वरित ॥६२॥
इतिश्रीगुरुचरित्रामृत । वंध्या महिषी दुग्ध देत । निश्चयाचे बळे सत्य । भाग्य आले विप्रासी ॥६३॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे वंध्यामहिषीदोहनं नाम द्वाविंशोऽध्यायः ॥२२॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या ६३)

श्रीगणेशाय नमः ।
विनवी शिष्य नामांकित । सिद्ध योगीयाते पुसत । पुढील कथा विस्तारत । निरोपावी दातारा ॥१॥
सिद्ध म्हणे ऐक बाळा । श्रीगुरूची अगम्य लीला । तोचि विप्रे प्रकट केला । जेणे वांझ महिषी दुभिली ॥२॥
तया ग्रामी येरे दिवसी । क्षारमृत्तिका वहावयासी । मागो आले तया महिषीसी । द्रव्य देऊ म्हणताती ॥३॥
विप्र म्हणे तयासी । नेदू दुभते महिषीसी । दावीतसे सकळिकांसी । क्षीरभरणे दोनी केली ॥४॥
करिती विस्मय सकळ जन । म्हणती वांझ दंतही । काल होती नाकी खूण । वेसणरज्जू अभिनव ॥५॥
नव्हती गर्भिणी वांझ महिषी । वत्स न होता दुभे कैसी । वार्ता फाकली विस्तारेसी । कळली तया ग्रामाधिपतीस ॥६॥
विस्मय करुनी तये वेळी । आला अधिपती तयाजवळी । नमोनिया चरणकमळी । पुसतसे वृत्तान्त ॥७॥
विप्र म्हणे तयासी । असे संगमी संन्यासी । त्याची महिमा आहे ऐसी । होईल ईश्वर अवतार ॥८॥
नित्य आमुच्या मंदिरासी । येती श्रीगुरु भिक्षेसी । वरो नव्हती त्या दिवशी । क्षीर आपणा मागितले ॥९॥
वांझ म्हणता रागावोनि । त्वरे क्षीर दोहा म्हणोनि । वाक्य त्याचे निघता क्षणी । कामधेनूपरी जाहली ॥१०॥
विप्रवचन परिसोनि । गेला राजा धावोनि । नमन केले साष्टांगेसी । एका भावे करोनिया ॥१२॥
जय जयाजी जगद्‌गुरु । त्रयमूर्तीचा अवतारु । तुझा महिमा अपरंपारु । अशक्य आम्हा वर्णिता ॥१३॥
नेणो आम्ही मंदमति । मायामोहअंधवृत्ति । तू तारक जगज्ज्योती । उद्धरावे आम्हांते ॥१४॥
अविद्यामायासागरी । बुडालो असो घोर दरी । विश्वकर्ता तारी तारी । म्हणोनि चरणी लागला ॥१५॥
विश्वकर्ता तूचि होसी । हेळामात्रे सृष्टो रचिसी । आम्हा तु दिसतोसी । मनुष्यरूप धरोनि ॥१६॥
वर्णावया तुझा महिमा । स्तोत्र करिता अशक्य आम्हा । तूचि रक्षिता केशव्योमा । चिन्मयात्मा जगद्‌गुरु ॥१७॥
येणेपरी श्रीगुरूसी । स्तोत्र करी बहुवसी । श्रीगुरुमूर्ति संतोषी । आश्वासिती तये वेळी ॥१८॥
संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । तया रायाते पुसती । आम्ही तापसी असो यति । अरण्यवास करितसो ॥१९॥
या कारणे आम्हापासी । येणे तुम्हा संभ्रमेसी । पुत्रकलत्रसहितेसी । कवण कारण सांग म्हणती ॥२०॥
ऐकोनिया श्रीगुरुचे वचन । राजा विनवी कर जोडून । तू तारक भक्तजन । अरण्यवास कायसा ॥२१॥
उद्धरावया भक्तजना । अवतरलासी नारायणा । वासना जैसी भक्तजना । संतुष्टावे तेणेपरी ॥२२॥
ऐशी तुझी ब्रीदख्याति । वेदपुराणी वाखाणिती । भक्तवत्सला श्रीगुरुमूर्ति । विनंती माझी परिसावी ॥२३॥
गाणगापुर महास्थान । स्वामी करावे पावन । नित्य तेथे अनुष्ठान । वास करणे ग्रामात ॥२४॥
मठ करोनि तये स्थानी । असावे आम्हा उद्धरोनि । म्हणोनि लागे श्रीगुरुचरणी । भक्तिपूर्वक नरेश्वर ॥२५॥
श्रीगुरु मनी विचारिती । प्रगट होणे आली गति । क्वचित्काळ येणे रीती । वसणे घडे त्या स्थानी ॥२६॥
भक्तजनतारणार्थ । अवतार धरिती श्रीगुरुनाथ । राजयाचे मनोरथ । पुरवू म्हणती तये वेळी ॥२७॥
ऐसे विचारोनि मानसी । निरोप देती नराधिपासी । जैसी तुझ्या मानसी । भक्ति असे तैसे करी ॥२८॥
गुरुवचन ऐकोनि । संतोषोनि नृप मुनी । बैसवोनिया सुखासनी । समारंभे निघाला ॥२९॥
नानापरींची वाद्ये यंत्रे । गीतवाद्यमंगळतुरे । मृदंग टाळ निर्भरे । वाजताती मनोहर ॥३०॥
राव निघे छत्रपताकेसी । गजतुरंगश्रृंगारेसी । आपुले पुत्रकलत्रेसी । सवे यतीसी घेवोनि ॥३१॥
वेदघोष द्विजवरी । करिताती नानापरी । वाखाणिती बंदिकारी । ब्रीद तया मूर्तीचे ॥३२॥
येणेपरी ग्रामाप्रती । श्रीगुरु आले अतिप्रीती । अनेकपरी आरती । घेउनी आले नगरलोक ॥३३॥
ऐसा समारंभ थोर । करिता झाला नरेश्वर । संतोषोनि श्रीगुरुवर । प्रवेशले नगरात ॥३४॥
तया ग्रामपश्चिमदेशी । असे अश्वत्थ उन्नतेसी । ओस गृह तयापासी । असे एक भयंकर ॥३५॥
तया वृक्षावरी एक । ब्रह्मराक्षस भयानक । त्याचे भये असे धाक । समस्त प्राण्या भय त्याचे ॥३६॥
ब्रह्मराक्षस महाक्रूर । मनुष्यमात्र करी आहार । त्याचे भय असे थोर । म्हणोनि गृह ओस तेथे ॥३७॥
श्रीगुरुमूर्ति तये वेळी । आले तया वृक्षाजवळी । ब्रह्मराक्षस तात्काळी । येवोनि चरणी लागला ॥३८॥
कर जोडूनि श्रीगुरूसी । विनवीतसे भक्तीसी । स्वामी माते तारियेसी । घोरांदरी बुडालो ॥३९॥
तुझ्या दर्शनमात्रेसी । नासली पापे पूर्वार्जितेसी । तू कृपाळू सर्वांसी । उद्धरावे आपणाते ॥४०॥
कृपाळु ते श्रीगुरु । मस्तकी ठेविती करु । मनुष्यरूपे होवोनि येरु । लोळतसे चरणकमळी ॥४१॥
श्रीगुरु सांगती तयासी । त्वरित जावे संगमासी । स्नान करिता मुक्त होसी । पुनरावृत्ति नाही तुज ॥४२॥
गुरुवचन ऐकोन । राक्षस करी संगमी स्नान । कलेवरा सोडूनि जाण । मुक्त झाला तत्क्षणी ॥४३॥
विस्मय करिति सकळ लोक । म्हणती होईल मूर्ति येक । हरि अज पिनाक । हाचि सत्य मानिजे ॥४४॥
श्रीगुरु राहिले तया स्थानी । मठ केला श्रृंगारोनि । नराधिपशिरोमणी । भक्तिभावे पूजीतसे ॥४५॥
भक्तिभावे नरेश्वर । पूजा अर्पी अपरंपार । परोपरी वाद्यगजर । गीतवाद्येमंत्रेसी ॥४६॥
श्रीगुरु नित्य संगमासी । जाती नित्य अनुष्ठानासी । नराधीश भक्तीसी । सैन्यासहित आपण जाय ॥४७॥
एखाद्या समयी श्रीगुरूसी । बैसविती आपुल्या आंदोलिकेसी । सर्व दळ सैन्येसी । घेवोनि जाय वनांतरा ॥४८॥
माध्याह्नकाळी परियेसी । श्रीगुरु येती मठासी । सैन्यासहित आनंदेसी । नमन करी नराधिप ॥४९॥
भक्तवत्सल श्रीगुरुमूर्ति । भक्ताधीन आपण असती । जैसा संतोष त्याच्या चित्ती । तेणेपरी रहाटती ॥५०॥
समारंभ होय नित्य । ऐकती लोक समस्त । प्रगट झाले लोकांत । ग्रामांतरी सकळजनि ॥५१॥
कुमसी म्हणिजे ग्रामासी । होता एक तापसी । त्रिविक्रम भारती नामेसी । तीन वेद जाणतसे ॥५२॥
मानसपूजा नित्य करी । सदा ध्यायी नरहरी । त्याणे ऐकिले गाणगापुरी । असे नरसिंहसरस्वती ॥५३॥
ऐकता त्याची चरित्रलीला । मनी म्हणे दांभिक कळा । हा काय खेळ चतुर्थाश्रमाला । म्हणोनि निंदा आरंभिली ॥५४॥
ज्ञानमुर्ति श्रीगुरुनाथ । सर्वांच्या मनीचे जाणत । यतीश्वर निंदा आपुली करीत । म्हणोनि ओळखिले मनात ॥५५॥
सिद्ध म्हणे नामांकिता । पुढे अपूर्व असे कथा । मन करोनि निर्मळता । एकचित्ते परिस तु ॥५६॥
म्हणे सरस्वतीगंगाधर । सांगे गुरुचरित्रविस्तार । ऐकता होय मनोहर । सकळाभीष्ट पाविजे ॥५७॥
इति श्रीगुरुचरित्र । गाणगापुरी पवित्र । ब्रह्मराक्षसा परत्र । निजमोक्ष दीधला ॥५८॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे राक्षसमुक्तकरणं नाम त्रयोविंशोऽध्याः ॥२३॥
श्रीगुरूदत्तात्रेयार्पितमस्तु ॥ (ओवीसंख्या ५८)

श्रीगणेशाय नमः ।
सिद्ध म्हणे नामधारका । पुढे अपूर्व वर्तले देखा । विस्तारे कथाकौतुका । निरोपीन तुज आता ॥१॥
नामधारक म्हणे सिद्धासी । पुढे कथा वर्तली कैसी । विस्तारोनि आम्हांसी । निरोपावी दातारा ॥२॥
शिष्यवचन परिसोनि । सांगता झाला सिद्ध मुनि । ऐक तू वत्सा नामकरणी । गुरुचरित्र अभिनव ॥३॥
ऐसा त्रिविक्रम महामुनि । जो का होता कुमसीस्थानी । निंदा करी सर्व जनी । दांभिक संन्यासी म्हणोनि ॥४॥
ज्ञानवंत श्रीगुरुमूर्ति । विश्वाच्या मनीचे ओळखती । नसधिपासी सांगती । निंदा करितो म्हणोनि ॥५॥
श्रीगुरु म्हणती तये वेळी । आजची निघावे तात्काळी । त्रिविक्रमभारतीजवळी । जाणे असे कुमसीस ॥६॥
ऐकोनि राजा संतोषला । नानालंकार करिता जाहला । हत्ती अश्वपायदळा । श्रृंगार केला तये वेळी ॥७॥
समारंभ केला थोरु । आंदोळी बैसले श्रीगुरु । नानापरी वाद्यगजरु । करूनिया निघाले ॥८॥
ऐसेपरी श्रीगुरुमूर्ति । तया कुमसी ग्रामा येती । त्रिविक्रमभारती । करीत होता मानसपूजा ॥९॥
मानसपूजा नरहरीसी । नित्य करी भावेसी । स्थिर न होय तया दिवसी । मानसमूर्ति नरकेसरी ॥१०॥
मनी चिंता करी यति । का पा न ये मूर्ति चित्ती । वृथा झाली तपोवृत्ति । काय कारण म्हणतसे ॥११॥
बहुत काळ आराधिले । का पा नरसिंहे उपेक्षिले । तपफळ वृथा गेले । म्हणोनि चिंता करीतसे ॥१२॥
इतुके होता त्या अवसरी । श्रीगुरुते देखिले दूरी । येत होते नदीतीरी । मानसपूजेच्या मूर्तिरूपे ॥१३॥
सर्व दळ दंडधारी । तयांत एकरूप हरी । भारती देखोनि विस्मय करी । नमन करीत निघाला ॥१४॥
साष्टांग नमन करोनि । जावोनि लागे श्रीगुरुचरणी । सर्वचि रूपे झाला प्राणी । दंडधारी यतिरूप ॥१५॥
समस्तरूप एकसरी । दिसताती दंडधारी । कवण लघु कवण थोरी । न कळे तया त्रिविक्रमा ॥१६॥
भ्रांत झाला तये वेळी । पुनरपि लागे चरण कमळी । ब्रह्मा विष्णु चंद्रमौळी । त्रिमूर्ति तू जगद्गुरु ॥१७॥
तुझे न कळे स्वरूपज्ञान । अविद्यामाया वेष्टोन । निजरूप होऊन । कृपा करणे दातारा ॥१८॥
तुझे स्वरूप अवलोकिता । आम्हा अशक्य गुरुनाथा । चर्मचक्षूकरूनि आता । पाहू न शके म्हणतसे ॥१९॥
तू व्यापक सर्वा भूती । नरसिंहमूर्ति झालासी यति । प्रगट नरसिंहसरस्वती । समस्त दिसती यतिरूप ॥२०॥
नमू आता सांग कवणा । कवणापुढे दाखवू करुणा । त्रिमूर्ति तू ओळखसी खुणा । निजरूपे रहावे स्वामिया ॥२१॥
तप केले बहुत दिवस । पूजा केली तुझी मानस । आजि आलिं गा फळास । मूर्ति साक्षात भेटली ॥२२॥
तू तारक विश्वासी । उद्धराया आम्हांसी । म्हणोनि भूमी अवतरलासी । दावी स्वरूप चिन्मय ॥२३॥
ऐसेपरी श्रीगुरूसी । स्तुति केली भक्तीसी । श्रीगुरुमूर्ति संतोषी । झाली निजमूर्ति एक ॥२४॥
व्यक्त पाहे तये वेळी । दिसो लागले सैन्य सकळी । तयामध्ये चंद्रमौळी । दिसे श्रीगुरु भक्तवरद ॥२५॥
श्रीगुरु म्हणती तयासी । नित्य आमुची निंदा करिसी । दांभिक नावे आमहंसी । पाचारिसी मंदमती ॥२६॥
या कारणे तुजपासी । आलो तुझ्या परीक्षेसी । पूजा करिसी तू मानसी । श्रीनृसिंहमूर्तीची ॥२७॥
दांभिक म्हणजे कवण परी । सांग आता विस्तारी । तुझे मनी वसे हरी । तोचि तुज निरोपी ॥२८॥
ऐकोनि श्रीगुरुचे वचन । यतीश्वर करी नमन । सद्गुरु स्वामी कृपा करून । अविद्यारूप नासावे ॥२९॥
तू तारक विश्वासी । त्रयमूर्ति-अवतार तूचि होसी । मी वेष्टोन । मायापाशी । अज्ञानपणे वर्ततो ॥३०॥
मायामोह-अंधकरी । बुडालो अज्ञानसागरी । न ओळखे परमार्थ विचारी । दिवांध झालो स्वामिया ॥३१॥
ज्योतिःस्वरूप तू प्रकाशी । स्वामी माते भेटलासी । क्षमा करावी बाळकासी । उद्धारावे दातारा ॥३२॥
अविद्यारूप-समुद्रात । होतो आपण वहात । न दिसे पैल अंत । बुडतसो स्वामिया ॥३३॥
ज्ञानतारवी बैसवोनि करुणावायु प्रेरूनि । पैलथडी निजस्थानी । पाववी स्वामी कृपासिंधु ॥३४॥
तुझी कृपा होय ज्यासी । दुःखदैन्ये कैचे त्यासी । तोचि जिंकील कळीकाळासी । परमार्थी ऐक्य होय ॥३५॥
पूर्वी कथा ऐकिली श्रवणी । महाभारत पुराणी । दाविले रूप अर्जुना नयनी । प्रसन्न होवोनि तयासी ॥३६॥
तैसे तुम्ही मजला आज । दाविले स्वरूप निज । अनंत महिमा तुझी चोज । भक्तवत्सला गुरुनाथा ॥३७॥
जय जयाजी जगद्गुरु । तू तारक भवसागरु । त्रयमूर्तीचा अवतारु । नरसिंहसरस्वती ॥३८॥
कृतार्थ झालो जी आपण । देखिले आजि तुमचे चरण । न करिता प्रयत्न । भेटला रत्नचिंतामणी ॥३९॥
जैसी गंगा सगरांवरी । कडे केले भवसागरी । जैसा विष्णु विदुराघरी । आला आपण कृपावंत ॥४०॥
भक्तवत्सला तुझी कीर्ति । आम्हा दाविली प्रचीति । वर्णावया नाही मति । अनंतमहिमा जगद्गुरु ॥४१॥
येणेपरी श्रीगुरूसी । करी स्तोत्र बहुवसी । श्रीगुरुमूर्ती संतोषी । दिधला वर तये वेळी ॥४२॥
वर दे तो त्रिविक्रमासी । तुष्टलो तुझ्या भक्तीसी । सद्गति होय भरवसी । पुनरावृत्ति नाही तुज ॥४३॥
तुज साधला परमार्थ । होईल ईश्वरी ऐक्यार्थ । ऐसे म्हणोनि गुरुनाथ । निघाले आपुल्या निजस्थाना ॥४४॥
वर देवोनि भारतीसी । राहविले तेथे कुमसीसी । क्षण न लागता परियेसी । आले गाणगापुरासी ॥४५॥
सिद्ध म्हणे नामधारका । श्रीगुरुमहिमा ऐसा निका । त्रिमूर्ति तोचि ऐका । नररूपे वर्ततसे ॥४६॥
ऐसा परमपुरुष गुरु । त्याते जे कोणी म्हणती नरु । तेचि पावती यमपुरु । सप्तजन्मपर्यंत ॥४७॥
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु । गुरुचि होय गिरिजारमणु । वेदशास्त्रपुराणू । बोलती हे प्रसिद्ध ॥४८॥
या कारणे श्रीगुरूसी । शरण जावे निश्चयेसी । विश्वासावे माझ्या बोलासी । लीन व्हावे श्रीगुरुचरणी ॥४९॥
अमृताची आरवटी । घातली असे गोमटी । ज्ञानी जन प्राशिती घोटी । गुरुचरित्रकामधेनु ॥५०॥
गंगाधराचा नंदन । सांगे गुरुचरित्र विस्तारोन । भक्तिपूर्वक ऐकती जन । लाधती पुरुषार्थ चतुर्विध ॥५१॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे त्रिविक्रमभारती विश्वरूपदर्शनं नाम चतुर्विंशोऽध्यायः ॥२४॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या ५१)

श्रीगणेशाय नमः ।
जय जयाजी सिद्धमुनी । तूचि गुरुशिरोमणी । साक्षी येतसे अंतःकरणी । बोलिला माते परमार्थ ॥१॥
ऐसा कृपाळु परमेश्वर । आपण झाला अवतार । येरा दिसतसे नर । तेचि अज्ञानी प्रत्यक्ष ॥२॥
तया त्रिविक्रमभारतीसी । दाविले रूप प्रत्यक्षेसी । पुढे कथा वर्तली कैसी । निरोपावी दातारा ॥३॥
सिद्ध म्हणे ऐक बाळा । श्रीगुरूची अगम्य लीला । सांगता न सरे बहु काळा । साधारण मी सांगतसे ॥४॥
समस्त लीला सांगता । विस्तार होईल बहु कथा । या कारणे क्वचिता । निरोपीतसे बाळका ॥५॥
पुढे अपूर्व वर्तले एक । ऐक शिष्या नामधारक । विदुरा नामे नगर एक । होता राजा यवन तेथे ॥६॥
महाक्रूर ब्रह्मद्वेषी । सदा करी जीवहिंसी । चर्चा करवी ब्राह्मणांसी । वेद म्हणवी आपणापुढे ॥७॥
विप्रासी म्हणे यवन । जे का असती विद्वज्जन । आपुल्या सभेत येऊन । वेद सर्व म्हणावे ॥८॥
त्याते द्रव्य देईन बहुत । सर्वामध्ये मान्यवंत । जो का सांगेल वेदार्थ । विशेष त्याची पूजा करू ॥९॥
ऐसे ऐकूनि ज्ञानी जन । नेणो म्हणती वेद आपण । जे का असती मतिहीन । कांक्षा करिती द्रव्याची ॥१०॥
जावोनिया म्लेच्छापुढे । वेदशास्त्र वाचिती गाढे । म्लेच्छ मनी असे कुडे । ऐके अर्थ यज्ञकांडाचा ॥११॥
म्हणे विप्र यज्ञ करिती । पशुहत्या करणे रीती । आम्हा म्लेच्छाते निंदिती । पशु वधिती म्हणोनिया ॥१२॥
येणेपरी ब्राह्मणासी । निंदा करी बहुवसी । योग्यता पाहून द्विजवरांशी । अपार द्रव्य देतसे ॥१३॥
येणेपरी तो यवन । देतो द्रव्य म्हणोन । ऐकते झाले सकळ जन । देशोदेशी विप्रवर्ग ॥१४॥
वेदशास्त्री निपुण । द्रव्यावरी ठेवुनी मन । भेटीसी जाती ब्राह्मण । वेद म्हणती यवनापुढे ॥१५॥
ऐसे मंदमति विप्र । त्यांची जोडी यमपुर । मदोन्मत्त दुराचार । तेच इष्ट कलीचे ॥१६॥
येणेपरी वर्तमानी । वर्तत असता एके दिनी । मंदभाग्य विप्र दोनी । येवोनि भेटले राया ॥१७॥
वेदशास्त्र अभिज्ञाती । तीन वेद जाणो म्हणती । तया यवनापुढे किर्ति । आपली आपण सांगती ॥१८॥
विप्र म्हणती रायासी । कोणी नाही आम्हासरसी । वाद करावया वेदांसी । नसती चारी राष्ट्रांत ॥१९॥
असती जरी तुझ्या नगरी । त्वरित येथे पाचारी । आम्हासवे वेद चारी । चर्चा करावी द्विजांनी ॥२०॥
विप्रवचन ऐकोनि । राजा पडला अभिमानी । आपुल्या नगरचे विप्र आणोनि । समस्ताते पुसे तो ॥२१॥
राजा म्हणे समस्तांसी । चर्चा करावी तुम्ही यांसी । जे जिंकिती तर्कसी । त्यासी अपार द्रव्य देऊ म्हणे ॥२२॥
ऐकोनिया ज्ञानी जन । म्हणती म्लेच्छालागून । आम्हा योग्यता नाही जाण । या ब्राह्मणांते केवी जिंकू ॥२३॥
आम्हामध्ये हेचि श्रेष्ठ । विप्र दोघे महासुभट । याते करोनि प्रगट । मान द्यावा महाराज ॥२४॥
ऐसे म्हणती द्विज समस्त । ऐकोनि राजा मान देत । वस्त्रे भूषणे देई विचित्र । गजावरी आरूढविले ॥२५॥
आरूढवोनि हस्तीवरी । मिरवा म्हणे आपुल्या नगरी । नाहीं विप्र यांचे सरी । हेचि राजे विप्रांचे ॥२६॥
आपण राजा यवनांसी । हे दुजे राजे द्विजांसी । ऐसे भूसुर तामसी । म्लेच्छापुढे वेद म्हणती ॥२७॥
महातामसी ते ब्राह्मण । द्विजांते करूनिया दूषण । राजे म्हणविती आपण । तया यवनराज्यांत ॥२८॥
ऐसे असता वर्तमानी । विप्र मदांधे व्यापूनि । राजापुढे जावोनि । विनविताती परियेसा ॥२९॥
विप्र म्हणती रायासी । आम्हा योग्यता बहुवसी । न मिळे एखादा वादासी । वृथा झाले शिकोनिया ॥३०॥
आमुचे मनी बहु आर्ता । करणे वाद वेदशास्त्री । निरोप देई जाऊ आता । विचारू तुझ्या राष्ट्रात ॥३१॥
जरी मिळेल एखादा नरू । तयासवे चर्चा करू । न मिळे तैसा द्विजवरू । जयपत्र घेऊ ब्राह्मणाचे ॥३२॥
राजा म्हणे तयासी । जावे राष्ट्री त्वरितेसी । पराभवावे ब्राह्मणासी । म्हणोनि निरोप देता झाला ॥३३॥
यवनाचे आज्ञेसी । निघाले द्विजवर तामसी । पर्यटन करिता राज्यासी । गावोगावी विचारिती ॥३४॥
गावोगावी हिंडती । जयपत्रे लिहून घेती । ऐसी कवणा असे शक्ति । तयासन्मुख उभे रहावे ॥३५॥
समस्त नगरे हिंडत । पुढे गेले दक्षिणपंथ । भीमातीरी असे विख्यात । कुमसी ग्राम उत्तम ॥३६॥
तेथे होता महामुनि । त्रिविक्रमभारती म्हणुनी । त्यासी येती वेद तिन्ही । अनेकशास्त्री अभिज्ञ तो ॥३७॥
महामुनि कीर्तिमंत । म्हणोनि सांगती जन समस्त । ऐकती द्विज मदोन्मत्त । गेले तया मुनीपासी ॥३८॥
जावोनि म्हणती तयासी । त्रिवेदी ऐसे म्हणविसी । चर्चा करावी आम्हंसी । अथवा द्यावे हारिपत्र ॥३९॥
विप्रवचन ऐकोनि । म्हणतसे त्रिविक्रममुनि । आम्ही नेणो वेद तिन्ही । अथवा न ये वेद एक ॥४०॥
जरी जाणो वेदशास्त्र । तरी का होतो अरण्यपात्र । वंदन करिते राजे सर्वत्र । तुम्हांसारखे भोग करितो ॥४१॥
नेणो म्हणोनि अरण्यवासी । वेष घेतला मी संन्यासी । आम्ही भिक्षुक तापसी । तुम्हांसमान नव्हे जाणा ॥४२॥
हारी अथवा जिंकून । नाही तयाचा अभिमान । तुम्ही उत्कृष्ट विद्वज्जन । आम्हासवे काय वाद ॥४३॥
ऐकोनि मुनींचे वचन । तवका अले ते ब्राह्मण । आम्हासवे वाद कवण । घाली ऐसा त्रिभुवनी ॥४४॥
हिंडत आलो अवघे राष्ट्र । आम्हासमान नाही नर । म्हणोनि दाखविती जयपत्र । असंख्यात परियेसा ॥४५॥
येणेपरी आपणासी । जयपत्र द्यावे विशेषी । अभिमान असल्या मानसी । करी वाद म्हणताती ॥४६॥
अनेकपरी ब्राह्मणांसी । सांगे मुनि विनयेसी । ऐकती ना द्विज महाद्वेषी । मागती जयपत्र आपुले ॥४७॥
त्रिविक्रम महामुनि । आपुले विचार अंतःकरणी । याते न्यावे गाणगाभुवनी । शिक्षा करणे द्विजाते ॥४८॥
विप्र मदांधे व्यापिले । अनेक ब्राह्मण धिक्कारिले । त्याते करणे उपाय भले । म्हणोनि योजिले मनात ॥४९॥
त्रिविक्रम म्हणे विप्रासी । चला गाणगाभुवनासी तेथे देईन तुम्हांसी । जयपत्र विस्तारे ॥५०॥
तेथे असती आपुले गुरु । तयापुढे पत्र देईन निर्धारू । अथवा तुमच्या मनींचा भारू । शमन करू म्हणे देखा ॥५१॥
ऐशी निगुती करूनि । निघाला त्रिविक्रम महामुनि । सवे येती विप्र दोनी । आंद्लिके बैसोनिया ॥५२॥
मूढ ब्राह्मण अज्ञानी । यतीश्वरा चालवोनि । आपण बैसले सुखासनी । म्हणोनि अल्पायुषी झाले ॥५३॥
पावले तया गाणगापुरा । जे का स्थान गुरुवरा । रम्य स्थान भीमातीरा । वास नरसिंहसरस्वती ॥५४॥
नमन करूनि श्रीगुरूसी । विनवी मुनि भक्तीसी । कृपामूर्ति व्योमकेशी । भक्तवत्सला परमपुरुषा ॥५५॥
जय जयाजी जगद्गुरु । निर्गुण तूचि निर्विकारु । त्रयमूर्तीचा अवतारु । अनाथांचा रक्षक ॥५६॥
दर्शन होता तुझे चरण । उद्धरे संसारा भवार्ण । नेणती मूढ अज्ञानजन । अधोगतीचे ते इष्ट ॥५७॥
सदगदित कंठ झाला । रोमांच अंगी उठला । नेत्री बाष्प आनंद झाला । माथा ठेवी चरणावरी ॥५८॥
नमन करितांचि मनीश्वराते । उठविले श्रीगुरुनाथे । आलिंगोनि करुणावक्त्रे । पुसताती वृत्तान्त ॥५९॥
श्रीगुरु पुसती त्रिविक्रमासी । आलेत कवणे कार्यासी । विस्तारोनि आम्हांसी । निरोपावे मुनिवरा ॥६०॥
श्रीगुरुचे वचन ऐकोनि । सांगतसे त्रिविक्रममुनि । मदोन्मत्त विप्र दोनी । आले असती चर्चेसी ॥६१॥
वेदशास्त्रादि मीमांसे । म्हणती चर्चा करू हर्षे । वेद चारी जिव्हाग्री वसे । म्हणती मूढ विप्र दोनी ॥६२॥
जरी न करा चर्चेसी । पत्र मागती हारीसी । अनेकापरी तयांसी । सांगता न ऐकती उन्मत्त ॥६३॥
म्हणोनि आलो तुम्हांजवळी । तुम्ही श्रीगुरु चंद्रमौळी । तुमचे वाक्य असे बळी । तेणेपरी निरोपावे ॥६४॥
मुनिवचन ऐकोनि । श्रीगुरु म्हणती हास्यवदनी । आले होते विप्र दोनी । त्याते पुसती वृत्तान्त ॥६५॥
श्रीगुरु म्हणती विप्रांसी । कवण आलेती कार्यासी । वाद कायसा आम्हांसी । लाभ काय वादे तुम्हा ॥६६॥
आम्ही तापसी संन्यासी । आम्हा हारी कायसी । काय थोरी तुम्हांसी । जय होता यतीसवे ॥६७॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । बोलताती विप्र दोनी । आलो पृथ्वी हिंडोनि । समस्त विप्र जिंकीत ॥६८॥
नव्हे कोणी सन्मुख । वेदचर्चापराङ्मुख । म्हणोनि पत्रे अनेक । काढोनिया दाखविली ॥६९॥

जरी असाल साभिमान । तुम्हांसहित दोघेजण । वेदशास्त्रादि व्याकरण । चर्चा करूं म्हणती विप्र ॥७१॥
आम्ही जाणो वेद चारी । न होती कोणी आम्हांसरी । तुम्ही दोघे यतीश्वरी । काय जाणाल वेदान्त ॥७२॥
श्रीगुरु म्हणती विप्रांसी । गर्वे नाश समस्तांसी । देवदानवादिकांसी । गर्वे मृत्यु लाधला जाणा ॥७३॥
गर्वे बळीसी काय झाले । बाणासुरासी फळ आले । लंकानाथ कौरव गेले । वैवस्वतक्षेत्रासी ॥७४॥
कवण जाणे वेदान्त । ब्रह्मादिका न कळे अंत । वेद असती अनंत । गर्व वृथा तुम्ही करिता ॥७५॥
विचाराल आपुले हित । तरी सांडा सर्व भ्रांत । काय जाणता वेदान्त । चतुर्वेदी म्हणविता ॥७६॥
श्रीगुरूंचे वचन ऐकोनि । गर्वे दाटले बहु मनी । जाणो आम्ही वेद तीन्ही । सांग संहिता परियेसा ॥७७॥
येणेपरी श्रीगुरूंसी । बोलती ब्राह्मण परियेसी । सिद्ध म्हणे नामधारकासी । अपूर्व पुढे वर्तले ॥७८॥
वेद चारी आदि अंती । श्रीगुरु ब्राह्मणां निरोपिती । सांगेन ऐका एकचित्ती । म्हणे सरस्वतीगंगाधर ॥७९॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । त्रिविक्रममुनि विख्यात । विप्र जयपत्र मागत । ते चरित्र वर्णिले ॥८०॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे द्विजप्रशंसा नाम पंचविशोऽध्यायः ॥२५॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या १८०)

श्रीगणेशाय नमः ।
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणांसी । नका भ्रमू युक्तीसी । वेदान्त न कळे ब्रह्मयासी । अनंत वेद असती ॥१॥
वेदव्यासासारिखे मुनि । नारायण अवतरोनि । वेद व्यक्त करोनि । व्यास नाम पावला ॥२॥
तेणेही नाही पूर्ण केले । साधारण सांगितले । शिष्य होते चौघे भले । प्रख्यात नामे अवधारा ॥३॥
शिष्यांची नामे देखा । सांगेन विस्तारे ऐका । प्रथम पैल दुजा वैशंपायन निका । तिसरा नामे जैमिनी ॥४॥
चौथा सुमंतु शिष्य । करीन म्हणे विद्याभ्यास । त्यांसी म्हणे वेदव्यास । अशक्य तुम्हा शिकता ॥५॥
एक वेद व्यक्त शिकता । पाहिजे दिनकल्पांता । चारी वेद केवी वाचिता । अनंत वेद असे महिमा ॥६॥
ब्रह्मकल्प तिन्ही फिरले । वर्षोवर्षी वाचले । ब्रह्मचर्य आचरले । वेद पूर्ण शिको म्हणोनि ॥७॥
या वेदांचे आद्यंत । सांगेन ऐका एकचित्त । पूर्वी भारद्वाज विख्यात । ऋषि अभ्यास करीत होता ॥८॥
लवलेश आले त्यासी । पुनरपि करी तपासी । ब्रह्मा प्रसन्न झाला परियेसी । काय मागशील म्हणोनि ॥९॥
भारद्वाज म्हणे ब्रह्मयासी । स्वामी मज प्रसन्न होसी । वेद शिकेन आद्यंतेसी । ब्रह्मचर्य आश्रमी ॥१०॥
वेदान्त मज दावावे । सर्व माते शिकवावे । ऐसे वरदान द्यावे । म्हणोनि चरणी लागला ॥११॥
ब्रह्मा म्हणे भारद्वाजासी । मिती नाही वेदांसी । सर्व कैसा शिको म्हणसी । आम्हांसी वेद अगोचर ॥१२॥
तुज दावितो पहा सकळ । करोनि मन निर्मळ । शक्ति झालिया सर्व काळ । अभ्यास करी भारद्वाजा ॥१३॥
ऐसे म्हणोनि ऋषीसी । ब्रह्मा दावी वेदांसी । दिसताती तीन राशी । गिरिरूप होवोनि ॥१४॥
ज्योतिर्मय कोटिसूर्य । पाहता ऋषीस वाटे भय । वेदराशी गिरिमय । केवी शिकू म्हणतसे ॥१५॥
तिन्ही ब्रह्मकल्पांवरी । आचरले आश्रम चारी । वेद शिकले तावन्मात्री । एवढे गिरी केवी शिको ॥१६॥
म्हणोनि भयभीत झाला । ब्रह्मयाचे चरणी लागला । म्हणे स्वामी अशक्य केवळा । क्षमा करणे म्हणतसे ॥१७॥
या वेदाचा आद्यंत । आपण पहावया अशक्त । तूचि जाणसी जगन्नाथ । जे देशी ते घीन ॥१८॥
तू शरणागता आधार । माझे मनी वासना थोर । वेद शिकावे अपार । म्हणोनि आलो तुजपासी ॥१९॥
वेद देखोनि अमित । भय पावले चित्त । जे द्याल उचित । तेचि घेऊ परियेसा ॥२०॥
ऐसे वचन ऐकोन । ब्रह्मदेव संतोषोन । देता झाला मुष्टी तीन । अभ्यासावया ॥२१॥
तीन वेदांचे मंत्रजाळ । वेगळे केले तत्काळ । ऐसे चारी वेद प्रबळ । अभ्यासी भारद्वाजी ॥२२॥
अजून पुरते नाही त्यासी । केवी शिको पाहती वेदासी । सांगा तुम्ही परियेसी । चौघे वाचा चारी वेद ॥२३॥
पूर्ण एक एक वेदासी । शिकता प्रयत्न मोठा त्यासी । सांगेन थोडे तुम्हासी । व्यक्त करावया अभ्यास ॥२४॥
शिष्य म्हणती व्यासासी । एक एक वेद आम्हांसी । विस्तारावे आद्यंतेसी । शक्त्यनुसार अभ्यास करू ॥२५॥
ऐसे विनविती चौघेजण । नमुनी व्यासचरण । कृपा करावी जाण । आम्हांलागी व्यासमुनि ॥२६॥
करुणावचन ऐकोनि । व्यास सांगे संतोषोनि । पैल शिष्य बोलावोनि । ऋग्वेद निरोपित ॥२७॥
ऐक पैल शिष्योत्तमा । सांगेन ऋग्वेदमहिमा । पठण करी गा धर्मकर्मी । ध्यानपूर्वक करोनि ॥२८॥
पैल शिष्य म्हणे व्यासासी । बरवे विस्तारावे आम्हांसी । ध्यानपूर्वक लक्षणेसी । भेदाभेद निरोपावे ॥२९॥
त्यात जे अवश्य आम्हांसी । तेचि शिको भक्तीसी । तू कामधेनु आम्हांसी कृपा करी गा गुरुमूर्ती ॥३०॥
व्यास सांगे पैल शिष्यासी । ऋग्वेदध्यान परियेसी । वर्णरूप व्यक्ति कैसी । भेदाभेद सांगेन ॥३१॥
ऋग्वेदाचा उपवेद । असे प्रख्यात आयुर्वेद । अत्रि गोत्र असे शुद्ध । ब्रह्मा देवता जाणावी ॥३२॥
गायत्री छंदासी । रक्तवर्ण परियेसी । नेत्र पद्मपत्रसदृशी । विस्तीर्ण ग्रीवा कंबुकंठ ॥३३॥
कुंचकेशी श्मश्रु प्रमाण । द्वयरत्नी दीर्घ जाण । ऋग्वेद असे रूपधारण । मूर्ति ध्यावी येणेपरी ॥३४॥
आता भेद सांगेन ऐका । प्रथम चर्चा श्रावका । द्वितीय चर्चा श्रवणिया ऐका । जटा शफट दोनी शाखा ॥३५॥
पाठक्रमशाखा दोनी । सातवा दण्ड म्हणोनि । भेद सप्त निर्गुणी । पाच भेद आणिक असती ॥३६॥
अश्वलायनी शांखायनी । शाकला बाष्कला दोनी । पांचवी माण्डूका म्हणोनि । असे भेद द्वादश ॥३७॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणांसी । व्यासे सांगितले शिष्यासी । ऐशिया ऋग्वेदासी । द्वादश भेद विस्तारे ॥३८॥
या कलियुगाभीतरी । म्हणविसी वेद चारी । कीर्ति मिरवा लोकांतरी । अध्यापक म्हणोनि ॥३९॥
तया द्वादश भेदांत । एक शाखा असे विख्यात । सुलक्षण रूप व्यक्त । कोण जाणे सांग मज ॥४०॥
नारायण व्यासमुनि । शाखा द्वादश विस्तारोनि । सांगितल्या संतोषोनि । पैल शिष्यासी ॥४१॥
ऋग्वेदाचे भेद असे । सांगितले वेदव्यासे । श्रीगुरु म्हणती हर्षे । मदोन्मत्त द्विजांसी ॥४२॥
यजुर्वेदविस्तार । सांगेन ऐका अपार । वैशंपायन शिष्य थोर । अभ्यास करी परियेसा ॥४३॥
व्यास म्हणे शिष्यासी । ऐक एकचित्तेसी । सांगतो यजुर्वेदासी । उपवेद धनुर्वेद ॥४४॥
भारद्वाज गोत्र जाणा । अधिदैवत विष्णु जाणा । त्रिष्टुप् छंदासी तुम्ही म्हणा । आता ध्यान सांगेन ॥४५॥
कृशमध्य निर्धारी । स्थूल ग्रीवा कपाल जरी । कांचनवर्ण मनोहरी । नेत्र असती पिंगट ॥४६॥
शरीर ताम्र आदित्यवर्ण । पाच अरत्नी दीर्घ जाण । यजुर्वेदा ऐसे ध्यान । वैशंपायना निर्धारी ॥४७॥
ऐशिया यजुर्वेदासी । असती भेद शायसी । म्हणे व्यास शिष्यासी । सांगेन एकाचिपरी ॥४८॥
प्रथम चरका आहूरका । तिसरा नामकठा ऐका । प्राच्यकठा चतुर्थिका । कपिलकठा पाचवी पै ॥४९॥
सहावी असे अरायणीया । सातवी खुणी वार्तातवीया । श्वेत म्हणिजे जाण आठवीया । श्वेततर नवमी ॥५०॥
मैत्रायणी असे नाम । शाखा असे हो दशम । तिसी भेद उत्तम । असती सात परियेसा ॥५१॥
मानवा दुंदुभा दोनी । तिसरा ऐकेया म्हणोनि । वाराहा नाम चतुर्थपणी । भेद असे परियेसा ॥५२॥
हरिद्रवेया जाण पाचवा । श्याम म्हणिजे सहावा । सातवा श्यामायणीया जाणावा । दशम शाखा परियेसा ॥५३॥
वाजसनेया शाखेसी । भेद असती अष्टादशी । नामे सांगेन परियेसी । श्रीगुरु म्हणती तयांसी ॥५४॥
वाजसनेया नाम एका । द्वितीया जाबला निका । बहुधेया नामे तृतीयका । चतुर्थ कण्व परियेसा ॥५५॥
माध्यंदिना पाचवेसी । शापिया नाम षष्ठेसी । स्थापायनी सप्तमेसी । कापाला अष्टम विख्यात ॥५६॥
पौड्रवत्सा विख्यात । आवटिका नावे उन्नत । परमावटिका परम ख्यात । एकादश भेद जाणा ॥५७॥
पाराशर्या द्वादशी । वैद्येया नामे त्रयोदशी । चतुर्दश भेद पुससी । वैनेया म्हणती तयाते ॥५८॥
औंधेया नामे विशेषी । जाण शाखा पंचदशी । गालवा म्हणिजे षोडशी । बैजवा नाम सप्तदशी ॥५९॥
कात्यायनी विशेषी । जाण शाखा अष्टादशी । वाजसनीय शाखेसी । भेद असती अष्टादश ॥६०॥
तैत्तिरीय शाखा भेद दोनी । व्यास सांगे विस्तारोनि । औख्या काण्डिकेया म्हणोनि । यासी भेद पाच असती ॥६१॥
आपस्तंबी असे थोर । शाखा असे मनोहर । यज्ञादि कर्मे आचार । विज्ञान असे तयात ॥६२॥
दुसरा जाण बौधायनी । सत्याषाढी अघनाशिनी । हिरण्यकेशी म्हणोनि । चौथा भेद परियेसा ॥६३॥
औंधेयी म्हणोनि नाव । भेद असे पाचवा । अनुक्रमे पढावा । म्हणे व्यास शिष्यासी ॥६४॥
षडंगे असती विशेषे । नामे तयांची सांगेन ऐके । शिक्षा व्याकरण कल्पे । निरुक्त छंद ज्योतिष ॥६५॥
याते उपांगे असती माणिक । आणि त्यांची नामे तू ऐक । प्रतिपद अनुपद देख । छंद तिसरा परियेसा ॥६६॥
भाषाधर्म पंचम । मीमांसा न्याय सप्तम । कर्मसंहिता अष्टम । उपांगे ही जाणावी ॥६७॥
परिशिष्टे अष्टाविंश । असती ऐका विशेष । विस्तार करुनी परियेस । व्यास सांगे शिष्यासी ॥६८॥
पूर्वी होत्या वेदराशी । शिकता अशक्य मानवांसी । म्हणोनि लोकोपकारासी । ऐसा केला विस्तार ॥६९॥

येणेपरी विस्तारी । सांगे व्यास परिकरी । वैशंपायन अवधारी । विनवीतसे त्याजवळी ॥७१॥
यजुर्वेद विस्तारेसी । निरोपिला आम्हांसी । शाखाभेद क्रमेसी । वेगळाले करोनि ॥७२॥
संदेह होतो आम्हासी । मूळ शाखा कोण कैसी । विस्तारोनि प्रीतीसी । निरोपावे स्वामिया ॥७३॥
व्यास म्हणे शिष्यासी । बरवे पुसिले आम्हांसी । या यजुर्वेदासी । मूळ तुम्हां सांगेन ॥७४॥
मंत्र ब्राह्मण संहिता । मिळोनि पढता मिश्रिता । तोचि मूळ प्रख्याता । यजुर्वेद जाणिजे ॥७५॥
आणिक असे एक खूण । संहिता मिळोनि ब्राह्मण । तोचि यजुर्वेद मूळ जाण । वरकड शाखा पल्लव ॥७६॥
यज्ञादि कर्मक्रियेसी । हे मूळ गा परियेसी । अभ्यास करी गा निश्चयेसी । म्हणे व्यास शिष्याते ॥७७॥
ऐकोनिया व्यासवचन । वैशंपायन म्हणे कर जोडून । यजुर्वेदमूळ विस्तारोन । निरोपावे स्वामिया ॥७८॥
व्यास म्हणे शिष्यासी । सांगेन ऐक विस्तारेसी । ग्रंथत्रय असती ज्यासी । अभ्यास करी म्हणतसे ॥७९॥
सप्त अष्टक संहितेसी । एकाएकाचे विस्तारेसी । सांगेन तुज भरवसी । म्हणे व्यास शिष्याते ॥८०॥
प्रथम इषेत्वा प्रश्नासी । अनुवाक असती चतुर्दशी । आठ अधिक विसांसी । पन्नासा असती ॥८१॥
अपऊर्ध्व प्रश्नासी । अनुवाक असती चतुर्दशी । चारी अधिक तिसांसी । प्रन्नासा तुम्ही जाणाव्या ॥८२॥
देवस्यत्वा प्रश्नासी । अनुवाक असती एकादशी । एक अधिक तिसांसी । पन्नासा असती ॥८३॥
आददेनामा प्रश्न चतुर्थ । षट्चत्वारिंशत अनुवाक विख्यात । पन्नासा जाण तयात । वेदाधिक पन्नास ॥८४॥
देवासुर नामक प्रश्नासी । अनुवाक असती एकादशी । असती एकावन्न पन्नासी । पंचम प्रश्नांत अवधारा ॥८५॥
'संत्वासिंचा' इति प्रश्न । द्वादश अनुवाक असती पूर्ण । पन्नासा असती एकावन्न । असती सहावे प्रश्नासी ॥८६॥
पाकयज्ञ नामक प्रश्न । त्रयोदशी अनुवाकी संपन्न । पन्नासा असती एकावन्न । सप्तम प्रश्न विस्तार ॥८७॥
अनुमत्य इति प्रश्नासी । अनुवाक जाणा द्वाविशंती । द्विचत्वारिशत पन्नासा असती । प्रथम अष्टक येणेपरी ॥८८॥
प्रथम अष्टक परियेसी । संख्या सांगेन संहितेसी । अनुवाक असती ख्यातीसी । एकचित्ते परियेसा ॥८९॥
एकशत आणि चत्वारिंशत वरी । अधिक त्यावरी तीन निर्धारी । अनुवाक असती परिकरी । अंतःकरणी धरावे ॥९०॥
पन्नासा असती त्यासी । त्रिशताधिक बेचाळिसी । प्रथम अष्टकी परियेसी । म्हणोनि सांगे व्यासमुनि ॥९१॥
द्वितीय अष्टकाचा विचार । सांगेन तो परिकर । प्रथम प्रश्नाचे नाम थोर । वायव्य असे म्हणावे ॥९२॥
प्रथम प्रश्नांत विशेश । अनुवाक जाण एकादश । पंचषष्टि असती पन्नास । एकचित्ते परियेसा ॥९३॥
पुढे असे द्वितीय प्रश्न । नाम असे प्रजापतिगुहान । द्वादश अनुवाक असती जाण । एकसप्तति पन्नासा ॥९४॥
आदित्य नामक प्रश्नास । अनुवाक जाणा चतुर्दश । षट् अधिक पंचाशत । पन्नासा तुम्ही पढाव्या ॥९५॥
पुढील प्रश्न देवामनुष्या । अनुवाक जाणा चतुर्दशा । अष्ट अधिक चत्वारिंशा । पन्नासा तुवा जाणिजे ॥९६॥
म्हणता जाय महापाप । प्रश्न असे विश्वरूप । द्वादश अनुवाक स्वरूप । चारी अधिक सप्तति पन्नासा ॥९७॥
समिधा नाम प्रश्नास । निरुते अनुवाक द्वादश । सप्तति पन्नासा असती त्यास । एकचित्ते परियेसा ॥९८॥
ऐसे द्वितीय अष्टकासी । षष्ठ प्रश्न परियेसी । पाच अधिक सप्ततीसी । अनुवाक तुम्ही जाणावे ॥९९॥
पन्नासांची गणना । सांगेन तुज विस्तारोन । तीन शतांवरी अशीति जाण । अष्ट अधिक परियेसा ॥१००॥
तिसरा अष्टक सविस्तर । सांगेन तुम्हा परिकर । वैशंपायन शिष्य थोर । गुरुमुखे ऐकतसे ॥१॥
तिसऱ्या अष्टकाचा प्रश्न प्रथम । नाम 'प्रजापतिरकाम' ॥ अनुवाक त्या एकादशोत्तम । द्विचत्वारिंशत पन्नासा त्यासी ॥२॥
द्वितीय प्रश्नास असे जाण । नाम 'यो वै पवमान' । एकादश अनुवाक जाण । षट्चत्वारिंशत पन्नासा त्यासी ॥३॥
तृतीय प्रश्ना बरवीयासी । नाम असे 'अग्ने तेजस्वी' । अनुवाकांची एकाद्शी । षट्चत्वारिंशत पन्नासा त्यासी ॥४॥
चौथा प्रश्न 'विवाएत' । एकादश अनुवाक ख्यात । षट्चत्वारिशत पन्नासा त्यांत । एकचित्ते परियेसा ॥५॥
पुढे असे प्रश्न पंचम । म्हणावे नाम पूर्णा प्रथम । अनुवाक अकरा उत्तम । षड्विंशति पन्नासा त्यासी ॥६॥
ऐसे तृतीयाष्टकासी । अनुवाक पंचपंचाशत त्यासी । द्विशत अधिक सहा त्यासी । पन्नासा असती अवधारा ॥७॥
चौथ्या अष्टकाचा प्रथम प्रश्न । नामे असे युंजान । एकादश अनुवाक खूण । षट्चत्वारिंशत पन्नासा ॥८॥
प्रश्नास संज्ञा विष्णोः क्रम ऐसी । एकादश अनुवाक परियेसी । अष्ट अधिक चत्वारिंशतीसी । पन्नासा त्यात विस्तार ॥९॥
तिसरे प्रश्न उत्तम । जाणा तुम्ही आपांत्वा नाम । त्रयोदश अनुवाक उत्तम । षट्त्रिंशत पन्नासा त्यासी ॥११०॥
चौथा प्रश्न रश्मिरसी । अनुवाक असती द्वादशी । सप्ताधिक त्रिंशत त्यासी । पन्नासा असती तुम्ही जाणा ॥११॥
नमस्ते रुद्र उत्तम । प्रश्न होय जाण पंचम । एकादश अनुवाक जाण । सप्ताधिक वीस पन्नासा ॥१२॥
'अश्मन्नूर्ज' प्रश्नास । नव अनुवाक परियेस । षट्चत्वारिंशत पन्नासा त्यास । एकचित्ते परियेसा ॥१३॥
प्रश्न 'अग्नाविष्णू'सी । अनुवाकांची जाण पंचदशी । एक न्यून चाळिसांसी । पन्नासा त्यासी विस्तारे ॥१४॥
ऐसे चतुर्थ अष्टकासी । सप्त प्रश्न परियेसी । अनुवाक असती ब्यायशी । द्विशतांवर एक उण्या अशीति पन्नासा ॥१५॥
पंचमाष्टका प्रथम प्रश्न । नामे 'सावित्राणि' जाण । पन्नासा षष्टि एका ऊण । एकादश अनुवाक ख्याति ॥१६॥
विष्णुमुखा प्रश्नासी । अनुवाक असती द्वादशी । चतुषष्टि पन्नासा त्यासी । श्रीगुरु म्हणती द्विजाते ॥१७॥
तिसरा प्रश्न उत्सन्नयज्ञ । अनुवाक द्वादश धरा खूण । पन्नासांसी द्वय न्यून । पन्नासा असती परियेसी ॥१८॥
चौथा प्रश्न देवासुरा । अनुवाक असती त्यासी बारा । षष्टीत दोन उण्या करा । पन्नासा असती परियेसा ॥१९॥
यदेके नामे प्रश्न । चतुर्विंशति अनुवाक खूण । दोन अधिक षष्टि जाण । पन्नासा असती परियेसा ॥१२०॥
हिरण्यवर्मा षष्ठ प्रश्न । त्रयोविंशति अनुवाक जाण । षष्टीमध्ये सहा न्यून । पन्नासा असती परियेसा ॥२१॥
यो वा आ यथा नामे प्रश्न । षड्विंशति अनुवाक जाण । षष्टीमध्ये सहा न्यून । पन्नासा असती परियेसा ॥२२॥
पंचमाष्टक संहितेसी । सप्त प्रश्न परियेसी । अनुवाक एकशत त्यासी । वीस अधिक विस्तारे ॥२३॥
त्रीणि अधिक चतुःशत । पन्नासा असती जाणा विख्यात । मन करूनि सावचित्त । ऐका म्हणे तये वेळी ॥२४॥
षष्ठाष्टक संहितेसी । प्रथम प्रश्न परियेसी । प्राचीनवंश नाम त्यासी । एकादश अनुवाक जाणा ॥२५॥
अधिक सहा सप्ततीसी । पन्नासा त्यासी परियेसी । विस्तार करूनि शिष्यासी । सांगतसे व्यासदेव ॥२६॥
'यदुभौ' नाम प्रश्नासी । अनुवाक जाणा एकादशी । एक उणा षष्टीसी । पन्नासा असती परियेसी ॥२७॥
तिसरा प्रश्न चात्वाल । एकादशी अनुवाकी माळ । पन्नासा षष्टीवरी द्वय स्थूळ । तिसरा प्रश्न परियेसी ॥२८॥
चवथा प्रश्न यज्ञेन । एकादश अनुवाक जाण । पन्नासा एक अधिक पंचाशत पूर्ण । एकचित्ते परियेसा ॥२९॥
'इंद्रोवृत्र' नाम प्रश्न । एकादश अनुवाक जाण । द्विचत्वारिंशत पन्नासा खूण । पंचम प्रश्नी परियेसा ॥१३०॥
'सुवर्गाय' नाम प्रश्नासी । अनुवाक असती एकादशी । त्रीणि अधिक चत्वारिंशती । पन्नासा असती परियेसा ॥३१॥
सहावे अष्टकी परिपूर्ण । त्यासी सहा अधिक असती पूर्ण । षष्टि अनुवाक असती जाण । त्रयस्त्रिंशदधिकत्रिशत पन्नासा ॥३२॥
सप्तमाष्टकाचा प्रश्न । नामे असे प्रजनन । अनुवाक वीस असती खूण । द्विपंचाशत पन्नासा त्यास ॥३३॥
साध्या म्हणती जो द्वितीय प्रश्न । विंशती अनुवाक जाण । पन्नास पन्नासा परिपूर्ण । एकचित्ते परियेसा ॥३४॥
'प्रजवं वा' नाम प्रश्नासी । अनुवाक वीस परियेसी । द्विचत्वारिंशत पन्नासा त्यासी । श्रीगुरु म्हणती तयांसी ॥३५॥
'बृहस्पती' नामक प्रश्न । द्वाविंशति अनुवाक जाण । त्रीण्यधिक पन्नासा खूण । पन्नासा असती अवधारा ॥३६॥
प्रश्न असे पाचवा जाण । 'गावो' वा नामे उत्तम । पंचविंशति अनुवाक पूर्ण । चतुःपंचाशत पन्नासा त्यासी ॥३७॥
सप्तमाष्टक संहितेसी । अनुवाक असती परियेसी । एकशत सप्त त्यासी । अनुवाक असती विस्तार ॥३८॥
द्विशतावरी अधिकेसी । एकावन्न असती पन्नासी । सप्तमाष्टक असे सुरसी । एकचित्ते परियेसी ॥३९॥
अष्टमाष्टक संहितेसी । षट् शताधिक अष्टचत्वारिंशतीसी । मुख्य प्रश्न चत्वारिंशत भरवसी । अनुवाक असती विस्तारे ॥१४०॥

तीन अष्टक ब्राह्मणांत । असती जे जाणू विख्यात । सांगेन ऐक एकचित्त । म्हणे व्यास शिष्यासी ॥४२॥
प्रथमाष्टक ब्राह्मणासी । प्रश्न आठ परियेसी । नामे त्याची ऐका ऐशी । एकचित्ते परियेसा ॥४३॥
प्रथम प्रश्न संधत्त । नाम असे विख्यात । अनुवाक दहा विस्तृत । अशीति दशक मनोहर ॥४४॥
उद्धन्य नाम दुसरा प्रश्न । सहा अनुवाक दशक पन्नास जाण । वाजपेय अनुसंधान । देवासुरा प्रश्न तिसरा ॥४५॥
त्यासी दशक अनुवाक जाण । पंच अधिक षष्टि दशक जाण । चौथा उभय नाम प्रश्न । दश अनुवाक मनोहर ॥४६॥
सवत्सरगणित सहा अधिका । त्यासी जाणा तुम्ही दशका । पाचवा नामे अग्नेकृत्तिका । प्रश्न असे अवधारा ॥४७॥
त्यासी अनुवाक द्वादश । सांगेन ऐका दशक । दोन अधिक षष्टि विशेष । एकचित्ते परियेसा ॥४८॥
सहावा प्रश्न अनुमत्य । अनुवाक दहा प्रख्यात । पाच अधिक सप्ततिक । दशक त्यासी अवधारा ॥४९॥
सप्तम प्रश्ना धरी खूण । नाम त्या एकद्वाब्राह्मण । दश अनुवाक आहेत जाण । चतुःषष्टि दशक त्यासी ॥१५०॥
आठवा वरुणस्य नाम प्रश्न । अनुवाक त्यासी दहा जाण । सप्त अधिक तीस खूण । दशक त्यासी मनोहर ॥५१॥
प्रथम अष्टक ब्राह्मणासी । प्रश्न आठ परियेसी । अष्टसंप्तति अनुवाक त्यासी । एकचित्ते परियेसा ॥५२॥
एक उणे पाचशत । दशक आहेत विख्यात । वैशंपायन ऐकत । गुरुमुखेकरोनि ॥५३॥
दुसरा अष्टक ब्राह्मणास । प्रथम प्रश्न आंगिरस । अनुवाक जाणा एकादश । साठी दशक मनोहर ॥५४॥
प्रजापतिरकांड । प्रश्न दुसरा हा गोड । एकादश अनुवाक दृढ । त्रिसप्तति दशक त्यासी ॥५५॥
कांड ब्रह्मवादिन । एकादश अनुवाक जाण । दशक आहे तो पन्नास पूर्ण । एकचित्ते परियेसा ॥५६॥
'जुष्टो' नाम प्रश्न ऐक । त्यासी अनुवाक अष्टादशक । वैशंपायन शिष्यक । गुरुमुखे ऐकतसे ॥५७॥
प्रश्न 'प्राणो रक्षति' । अष्ट अनुवाक त्यासी ख्याति । पंच अधिक चत्वारिंशति । दशक तुम्ही ओळखिजे ॥५८॥
'स्वाद्वीत्वा' नामे षष्ठम । प्रश्न असे उत्तम । अनुवाक असती वीस खूण । षट् अधिक अशीति दशक त्यासी ॥५९॥
सप्तम प्रश्न त्रिवृत्तास । अनुवाक असती अष्टादश । सहा अधिक षष्ठीस । दशक त्यासी मनोहर ॥१६०॥
अष्टम प्रश्न 'पीवोअन्न' । अनुवाक असती नऊ जाणा । अशीतीसि एक उणा । दशक त्यासी मनोहर ॥६१॥
द्वितीय अष्टक ब्राह्मणासी । आठ प्रश्न परियेसी । वेद उणे शतक त्यासी । अनुवाक असती मनोहर ॥६२॥
चार शतां उपरी । तीन उणे सप्तति निर्धारी । दशक आहेती विस्तारी । एकचित्ते परियेसा ॥६३॥
तृतीयाष्टक ब्राह्मणासी । प्रश्न असती द्वादशी । नामे त्यांची परियेसी । एकचित्ते अवधारा ॥६४॥
प्रथम प्रश्न विख्यातु । नाम 'अग्निर्नः पातु' । सहा अनुवाक विख्यातु । एक अधिक षष्टी दशक ॥६५॥
'तृतीयस्य' द्वितीय प्रश्न । अनुवाक असती दहा जाण । पंचाशीतिक दशक खूण । एकचित्ते परियेसा ॥६६॥
तिसरा प्रश्न प्रत्युष्ट । अनुवाक असती एकादश । एका उणे ऐशी दशक । एकचित्ते अवधारा ॥६७॥
चौथा प्रश्न 'ब्राह्मणेसि' । अनुवाक एका परियेसी । एका उणे विसांसी । दशक त्यांसी मनोहर ॥६८॥
पंचम प्रश्न नाम सत्य । चतुर्दश अनुवाक विख्यात । एक उणे तीस दशक । एकचित्ते परियेसा ॥६९॥
सहावा प्रश्न 'अंजंति' । पंचदश अनुवाक ख्याति । सात अधिक त्रिंशती । दशक त्यासी जाणावे ॥१७०॥
अच्छिद्रसर्वान्वा नाम प्रश्न । चतुर्दश अनुवाक जाण । तीस अधिक शत खूण । दशक त्यासी मनोहर ॥७१॥
प्रश्न अश्वमेधासी । सांग्रहण्य ख्यातीसी । अनुवाक असती त्रयोदशी । एक्याण्णव दशक ॥७२॥
प्रजापतिरकाम । अश्वमेध असे उत्तम । त्रयोविंशति अनुवाक नेम । चारी अधिक अशीति दशक त्यासी ॥७३॥
संज्ञान म्हणती काठक । अनुवाक दहांशी एक अधिक । एका उणे पन्नास दशक । एकचित्ते परियेसा ॥७४॥
दुसरा 'लोकोसि' काठक । दश अनुवाक असती ऐक । तयांमध्ये दोनी अधिक षष्टी दशक । व्यास म्हणे शिष्यासी ॥७५॥
द्वादश प्रश्न तुभ्यासी । अनुवाक नव परियेसी । सहा अधिक पन्नासासी । दशक त्यासी मनोहर ॥७६॥
तिसरे अष्टक ब्राह्मणासी । सप्त चत्वारिंशत एक शत अनुवाकासी । सात शत द्व्यशीति दशकासी । विस्तार असे परियेसा ॥७७॥
तिनी अष्टक ब्राह्मणासी । प्रश्न सांगेन परियेसी । अष्ट अधिक विसांसी । एकचित्ते अवधारा ॥७८॥
त्रीणि शत विसांसी । एक अधिक परियेसी । अनुवाक आहेती विस्तारेसी । परत ब्राह्मणासी परियेसा ॥७९॥
दशक संख्या विस्तार । सप्तशत अधिक सहस्त्र । अष्टचत्वारिंशति उत्तर । अधिक असती परियेसा ॥१८०॥
आता सांगेन अरण । त्यासी असती दहा प्रश्न । विस्तारोनिया सांगेन । एकचिते अवधारा ॥८१॥
अरणाचा भद्रनाम प्रथम प्रश्न । द्वात्रिंशत् अनुवाक असे खूण । एक शतक तीस जाण । दशक त्यासी मनोहर ॥८२॥
स्वाधाय ब्राह्मणासी । अनुवाक वीस परियेसी । चतुर्विंशति दशक त्यासी । एकचित्ते परियेसा ॥८३॥
चित्ती म्हणिजे प्रश्नासी । अनुवाक जाण एकविंशतीसी । दोन अधिक पन्नासासी । दशक त्यासी विस्तार ॥८४॥
ऐसा थोर चवथा प्रश्न । नाम तया मंत्रब्राह्मण । द्विचत्वारिम्शत अनुवाक जाण । द्विषष्टी दशक त्यासी ॥८५॥
श्रेष्ठ ब्राह्मण प्रश्नासी । अनुवाक जाण द्वादशी । आठ अधिक शतासी । दशक तुम्ही जाणावे ॥८६॥
पितृभेद असे प्रश्न । द्वादश अनुवाक परिपूर्ण । सप्तविंशती दशक जाण । एकचित्ते परियेसा ॥८७॥
'शिक्षा' नाम प्रश्नासी । अनुवाक असती द्वादशी । तीन अधिक विसांसी । दशक त्यासी मनोहर ॥८८॥
ब्रह्मविदा असे प्रश्न । अनुवाक त्यासी नऊ जाण । दशक चतुर्दश असे खूण । व्यास म्हणे शिष्यांसी ॥८९॥
भुगुर्वै असे प्रश्न । अनुवाक त्यासी दहा जाण । पंचदश दशक जाण । एकचित्ते परियेसा ॥१९०॥
दशम प्रश्न नारायण । अनुवाक तीस असती खूण । एकशत वेद जाण । दशक त्यासी परियेसा ॥९१॥
दहा प्रश्न अरणासी । अनुवाक जाण परियेसी । दोनी पूर्ण द्विशतासी । संख्या असे परियेसा ॥९२॥
पंचशता उपरी । नवपंचाशत विस्तारी । दशक जाणा मनोहरी । म्हणे व्यास शिष्याते ॥९३॥
ऐसे ग्रंथ तयांसी । प्रश्न असती ब्यायशी । नव षष्टी अधिक एकशत सहस्त्रासी । अनुवाक जाण मनोहर ॥९४॥
पन्नासी दशक विस्तार । सांगेन तुम्हा प्रकार । द्व्यशत दोनो सहस्त्र । द्वय उणे पन्नास जाण ॥९५॥
द्वयसहस्त्र त्रय शत । सप्त अधिक उन्नत । दशकी जाण विख्यात । ग्रंथत्रय परिपूर्ण ॥९६॥
ऐशीया यजुर्वेदासी । भेद असती शायशी । त्यात एक भेदासी । एवढा असे विस्तार ॥९७॥
येणेपरी व्यासमुनि । वैशंपायना विस्तारोनि । सांगता झाला म्हणोनि । श्रीगुरु म्हणती द्विजांसी ॥९८॥
तिसरा शिष्य जैमिनी । त्यास सांगे व्यासमुनि । सामवेद विस्तारोनि । निरोपित अवधारा ॥९९॥
उपवेद गांधर्व अत्र । काश्यपाचे असे गोत्र । रुद्र देवता परम पवित्र । जगती छंद म्हणावा ॥२००॥
नित्यस्त्रग्वी असे जाणा । शुचि वस्त्र प्रावरणा । मन शांत इंद्रियदमना । शमीदण्ड धरिला असे ॥१॥
कांचननयन श्वेतवर्ण । सूर्यासारखे किरण । षड्रत्नी दीर्घ जाण । सामवेद रूप असे ॥२॥
याच्या भेदा नाही मिती । अखिल सहस्त्र बोलती । ऐसी कोणा असे शक्ति । सकळासी शिकू म्हणावया ॥३॥
एका नारायणावांचोनि । समस्त भेद नेणे कोणी । ऐक शिष्या जैमिनी । सांगे तुज किंचित ॥४॥
प्रथम आसुरायणीया । दुसरे वासुरायणीया । वातान्तरेया म्हणोनिया । तिसरा भेद परियेसा ॥५॥
प्रांजली असे भेद एक । ऋग्वैनविधा एक । आणि प्राचीन योग्यशाखा । असे सहावा परियेसा ॥६॥
ज्ञानयोग सप्तम । राणायणीया असे ज्या नाम । यासी भेद दश जाण । आहेत ऐका एकचित्ते ॥७॥
राणायणीया सांख्यायनी । तिसरा शाठ्या म्हणोन । मुग्दल नाम जाणोनि । चौथा भेद परियेसा ॥८॥
खल्वला महाखल्वला । सप्तम नामे लाङ्गला । अष्ट भेद कैथुमा । गौतमा म्हणे परियेसा ॥९॥
दशम शाखा जैमिनी । ऐसे भेद विस्तारोनि । सांगितले व्यासमुनी । श्रीगुरु म्हणति द्विजांसी ॥२१०॥
पूर्ण सामवेदासी । कोण जाणे क्षितीसी । तीनवेदी म्हणविसी । मदोन्मत्त होवोनिया ॥११॥

अथर्वण वेदासी । उपवेद असे परियेसी । मंत्रशास्त्र निश्चयेसी । वैतान असे गोत्र ॥१३॥
आधिदैवत इंद त्यासी । अनुष्टुप् छंदेसी । तीक्ष्ण चंड क्रूरेसी । कृष्ण वर्ण असे जाण ॥१४॥
कामरूपी क्षुद्र कर्म । स्वदार असे त्यासी नाम । विश्वसृजक साध्यकर्म । जलमूर्ध्नीगालव ॥१५॥
ऐसे रूप तयासी । भेद नव परियेसी । सुमंतु नाम शिष्यासी । सांगतसे श्रीव्यास ॥१६॥
पैप्पला भेद प्रथम । दुसरा भेद दान्ता नाम । प्रदांत भेद सूक्ष्म । चौथा भेद स्तोता जाण ॥१७॥
औता नाम असे ऐका । ब्रह्मदा यशदा शाखा । सातवा भेद शाखा ऐका । शौनकी म्हणती ॥१८॥
अष्टम वेददर्शा भेदासी । चरणविद्या नवमेसी । पाच कल्प परियेसी । सांगेन ऐका एकचित्ते ॥१९॥
ऐसे चौघा शिष्यास । सांगत असे वेदव्यास । प्रकाश केला क्षितीस । भरतखंडी परियेसा ॥२२०॥
या भरतखंडत । पूर्वी होते पुण्य बहुत । वर्णाश्रमधर्म आचर । होते लोक परियेसा ॥२१॥
या कलियुगाभीतरी । कर्म सांडिले द्विजवरी । लोपले वेद निर्धारी । गुप्त जाहले क्षितीसी ॥२२॥
कर्मभ्रष्ट झाले द्विज । म्लेच्छा सांगती वेदबीज । सत्त्व गेले सहज । मंदमती झाले जाण ॥२३॥
पूर्वी होते महत्त्व । ब्राह्मणासी देवत्व । वेदबळे नित्यत्व । भूसुर म्हणती त्या काजा ॥२४॥
पूर्वी राजे याच कारणी । पूजा करती विप्रचरणी । सर्व देता दक्षिणादानी । ते अंगिकार न करिती ॥२५॥
वेदबळे विप्रांसी । त्रिमूर्ति वश होते त्यांसी । इंद्रादि सुरवरांसी । भय होते विप्रांचे ॥२६॥
कामधेनु कल्पतरू । विप्रवाक्ये होत थोरू । पर्वत करिती तृणाकारू । तृणा पर्वत परत्वे ॥२७॥
विष्णु आपण परियेसी । पूजा करी विप्रांसी । आपुले दैवत म्हणे त्यांसी । वेदसत्त्वे करोनिया ॥२८॥
श्लोक ॥ देवाधीनं जगत्सर्वं मंत्राधीनं च दैवतं । ते मंत्रा ब्राह्मणाधीना ब्राह्मणो मम दैवतम् ॥२९॥
ऐसे महत्त्व द्विजांसी । पूर्वी होते परियेसी । वेदमार्ग त्यजोनि सुरसी । अज्ञानमार्गे रहाटती ॥२३०॥
हीन यातीपुढे ऐका । वेद म्हणती मूर्ख देखा । त्यांच्या पाहू नये मुखा । ब्रह्मराक्षस होताती ॥३१॥
तेणे सत्त्व भंगले । हीन यातीते सेविले । अद्यापि क्रय करिती मोले । वेद भ्रष्ट करिताती ॥३२॥
ऐशा चारी वेदांसी । शाखा असती परियेसी । कोणे जाणावे क्षितीसी । सकळ गौप्य होऊनि गेले ॥३३॥
चतुर्वेदी म्हणविसी । लोकांसवे चर्चा करिसी । काय जाणसी वेदांसी । अखिल भेद आहेत जाण ॥२३४॥
ऐशामध्ये काय लाभ । घेऊ नये द्विजक्षोभ । कोणी केला तूते बोध । जाई म्हणती येथून ॥३५॥
आपुली आपण स्तुति करिसी । जयपत्रे दाखविसी । त्रिविक्रम यतीपासी । पत्र मागसी लिहुनी ॥३६॥
आमुचे बोल ऐकोनि । जावे तुम्ही परतोनि । वाया गर्वे भ्रमोनि । प्राण आपुला देऊ नका ॥३७॥
ऐसे श्रीगुरु विप्रांसी । सांगती बुद्धि हितासी । न ऐकती विप्र तामसी । म्हणती चर्चा करू ॥३८॥
चर्चा जरी न करू येथे । हारी दिसेल आम्हांते । सांगती लोक राजयाते । महत्त्व आमुचे उरे केवी ॥३९॥
सिद्ध म्हणे नामांकिता । ऐसे विप्र मदोमन्ता । नेणती आपुले हिता । त्यासी मृत्यु जवळी आला ॥२४०॥
गंगाधराचा नंदनु । सांगे गुरुचरित्र कामधेनु । वेदविवरण ऐकता साधनु । होय समाधान श्रोते जना ॥४१॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । चारी वेदांचा मथितार्थ । उकलोनि दाविला यथार्थ । म्हणे सरस्वतीगंगाधर ॥२४२॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे वेदविस्तारकथनं नाम षड्विंशोऽध्यायः ॥२६॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥ (ओवीसंख्या २४२)

श्रीगणेशाय नमः । नामधारक शिष्यराणा । लागे सिद्धाचिया चरणा विनवीतसे वचना । ऐका श्रोते एकचित्ते ॥१॥
जयजयाजी सिद्ध योगी । तू तारक आम्हा जगी । ज्ञानप्रकाश करणेलागी । दिले दर्शन चरणांचे ॥२॥
चतुर्वेद विस्तारेसी । श्रीगुरु निरोपिती विप्रांसी । पुढे कथा वर्तली कैसी । विस्तारावी दातारा ॥३॥
शिष्यवचन ऐकोनि । सांगता झाला विस्तारोनि । ऐक शिष्या नामकरणी । अनुपम महिमा श्रीगुरूची ॥४॥
किती प्रकारे विप्रांसी । श्रीगुरु सांगती हितासी । न ऐकती द्विज तामसी । म्हणती वाद का पत्र देणे ॥५॥
ऐसे उत्तर ऐकोनि कानी । कोप करिती श्रीगुरु मनि । जैसे तुमचे अंतःकरणी । तैसे सिद्धी पाववू म्हणती ॥६॥
सर्पाचे पेटारियासी । कोरू जाता मूषक कैसी । जैसा पतंग दीपासी । करी आपुला आत्मघात ॥७॥
तैसे विप्र मदोन्मत्त । श्रीगुरु न ओळखत । बळे आपुले प्राण देत । दिवांधवत द्विज देखा ॥८॥
इतुके वर्तता ते अवसरी । श्रीगुरु देखती नरासी दूरी । शिष्यासी म्हणती पाचारी । कवण जातो मार्गस्थ ॥९॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । गेले सेवक धावोनि । त्या नराते पाचारोनि । आणिला गुरुसन्मुख ॥१०॥
गुरु पुसती त्यासी । जन्म कवण जातीसी । तो वृत्तान्त सांग मजसी । म्हणोनि पुसती तये वेळी ॥११॥
श्रीगुरुवचन ऐकोन । सांगे आपण जातिहीन । मातंग नाम म्हणोन । स्थान आपुले बहिर्ग्रामी ॥१२॥
तू कृपाळू सर्वा भूती । म्हणोनि पाचारिले प्रीती । आपण झालो उद्धारगति । म्हणोनि दंडवत नमन करी ॥१३॥
ऐसे कृपाळू परमपुरुष । दृष्टि केली सुधारस । लोहासी लागता परिस । सुवर्ण होता काय वेळ ॥१४॥
तैसे तया पतितावरी । कृपा केली नरहरी । दंड देवोनि शिष्या करी । रेखा सप्त काढविल्या ॥१५॥
श्रीगुरु म्हणती पतितासी । एक रेखा लंघी रे ऐसी । आला नर वाक्यासरसी । आले ज्ञान आणिक तया ॥१६॥
श्रीगुरु म्हणती तयासी । कवणे कुळी जन्मलासी । पतित म्हणे किरातवंशी । नाम आपुले वनराखा ॥१७॥
दुसरी रेका लंघिता । ज्ञान झाले मागुता । बोलू लागला अनेक वार्ता । विस्मय करिती तये वेळी ॥१८॥
तिसरी रेखा लंघी म्हणती । त्यासी झाली ज्ञातिस्मृति । म्हणे गंगापुत्र निश्चिती । वास तटी गंगेच्या ॥१९॥
लंघिता रेखा चवथी । म्हणे आपण शूद्रजाती । जात होतो आपुले वृत्ती । स्वामी माते पाचारिले ॥२०॥
लंघिता रेखा पांचवेसी । झाले ज्ञान आणिक तयासी । जन्म झाला वैश्यवंशी । नाम आपुले सोमदत्त ॥२१॥
सहावी रेखा लंघितां । म्हणे आपण क्षत्रिय ख्याता । नाम आपुले विख्याता । गोदावरी म्हणोनि ॥२२॥
सातवी रेखा लंघिताक्षण । अग्रजाती विप्र आपण । वेदशास्त्रादि व्याकरण । अध्यापक नाम आपुले ॥२३॥
श्रीगुरु म्हणती तयासी । वेदशास्त्री अभ्यास म्हणसी । आले विप्र चर्चेसी । वाद करी त्यांसवे ॥२४॥
अभिमंत्रोनी विभूति । त्याचे सर्वांगी । प्रोक्षिती । प्रकाशली ज्ञानज्योती । त्या नरा परियेसा ॥२५॥
जैसे मानससरोवरास । वायस जाता होती हंस । तैसा गुरुहस्तस्पर्श । पतित झाला ज्ञानराशी ॥२६॥
नरसिंहसरस्वती जगद्गुरु । त्रयमूर्तींचा अवतारु । अज्ञानी लोक म्हणती नरु । तेचि जाती अधःपाता ॥२७॥
येणेपरी पतितासी । ज्ञान झाले आसमासी । वेदशास्त्र सांगेसी । म्हणो लागला तये वेळी ॥२८॥
जे आले चर्चेस विप्र । भयचकित झाले फार । जिव्हा तुटोनि झाले बधिर । ह्रदयशूळ तात्काळी ॥२९॥
विप्र थरथरा कापती । श्रीगुरुचरणी लोळती । आमुची आता काय गति । जगज्ज्योती स्वामिया ॥३०॥
श्रीगुरुद्रोही झालो जाण । धिक्कारिले ब्राह्मण । तू अवतार गौरीरमण । क्षमा करणे स्वामिया ॥३१॥
वेष्टोनिया मायापाशी । झालो आपण महातामसी । नोळखो तुझ्या स्वरूपासी । क्षमा करणे स्वामिया ॥३२॥
तू कृपाळु सर्वा भूती । आमुचे दोष नाणी चित्ती । आम्हा द्यावी उद्धारगति । म्हणोनि चरणी लागती ॥३३॥
एखादे समयी लीलेसी । पर्वत करसी तृणासरसी । पर्वत पाहसी कोपेसी । भस्म होय निर्धारी ॥३४॥
तूचि सृष्टि स्थापिसी । तूचि सर्वांचे पोषण करिसी । तूचि कर्ता प्रळयासी । त्रिमूर्ति जगद्गुरु ॥३५॥
तुझा महिमा वर्णावयासी । मति नाही आम्हांसी । उद्धरावे दीनासी । शरणागता वरप्रदा ॥३६॥
ऐसे विप्र विनविती । श्रीगुरु त्यासी निरोप देती । तुम्ही क्षोभविला भारती । त्रिविक्रम महामुनि ॥३७॥
आणिक केले बहुत दोषी । निंदिले सर्व विप्रांसी । पावाल जन्म ब्रह्मराक्षसी । आपुली जोडी भोगावी ॥३८॥
आपुले आर्जव आपणापासी । भोगिजे पुण्यपापासी । निष्कृति न होता क्रियमाणासी । गति नाही परियेसा ॥३९॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । लागती विप्र दोघे चरणी । कधी उद्धरो भवार्णवी । म्हणोनिया विनविती ॥४०॥
श्रीगुरुनाथ कृपामूर्ति । त्या विप्रांते निरोप देती । ब्रह्मराक्षस व्हाल प्रख्याति । संवत्सर बारापर्यंत ॥४१॥
अनुतप्त झालिया कारण । शांतिरूप असाल जाण । जो का शुकनारायण । प्रथम वाक्य म्हणतसा ॥४२॥
तुमचे पाप शुद्ध होता । द्विज येईल पर्यटता । पुढील वाक्य तुम्हा सांगता । उद्धारगति होईल ॥४३॥
आता जावे गंगेसी । स्थान बरवे बैसावयासी । म्हणोनि निरोपिती त्यासी । गेले विप्र ते वेळी ॥४४॥
निघता ग्रामाबाहेरी । ह्रदयशूल अपरंपारी । जाता क्षण नदीतीरी । विप्र पंचत्व पावले ॥४५॥
आपण केल्या कर्मासी । प्रयत्न नाही आणिकासी । ऐसे विप्र तामसी । आत्मघातकी तेचि जाणा ॥४६॥
श्रीगुरुवचन येणेपरी । अन्यथा नव्हे निर्धारी । झाले राक्षस द्विजवरी । बारा वर्षी गति पावले ॥४७॥
विप्र पाठविले गंगेसी । मागे कथा वर्तली कैसी । नामधारक शिष्यासी । सिद्ध सांगे अवधारा ॥४८॥
पतित झाला महाज्ञानी । जातिस्मरण सप्तजन्मी । पूर्वापार विप्र म्हणोनि । निर्धार केला मनात ॥४९॥
नमन करूनि श्रीगुरूसी । विनवी पतित भक्तीसी । अज्ञानमाया तिमिरासी । ज्योतिरूप जगद्गुरु ॥५०॥
विप्र होतो पूर्वी आपण । केवी झालो जातिहीन । सांगावे जी विस्तारोन । त्रिकाळज्ञान अंतरसाक्षी ॥५१॥
जन्मांतरी आपण देख । पाप केले महादोष । की विरोधिले विनायक । नृसिंहसरस्वती सांग पा ॥५२॥
ऐसे वचन ऐकोनि । सांगती गुरु प्रकाशूनि । म्हणोनि सांगती सिद्धमुनि । नामधारक शिष्यासी ॥५३॥
म्हणोनि सरस्वतीगंगाधर । सांगे गुरुचरित्रविस्तार । पुढील कथा ऐकता नर । पतित होय ब्रह्मज्ञानी ॥५४॥
ऐसी पुण्यपावन कथा । ऐकता उद्धार अनाथा । पावे चतुर्विध पुरुषार्था । निश्चयेसी जाण पा ॥५५॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे मदोन्मत्तविप्रशापकथनं नाम सप्तविंशोऽध्यायः ॥२७॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या ५५)

श्रीगणेशाय नम: ।
नामधारक म्हणे सिद्धासी । पुढील कथा सांग आम्हांसी । उल्हास माझे मानसी । गुरुचरित्र अतिगोड ॥१॥
सिद्ध म्हणे नामधारका । कथा असे अतिविशेष । ऐकता जाती सर्व दोष । ज्ञानज्योतिप्रकाशे ॥२॥
श्रीगुरु म्हणती पतितासी । आपुले पूर्वजन्म पुससी । सांगेन ऐक परियेसी । चांडालजन्म होणार गति ॥३॥
पुण्यपापांची गति । आपुले आर्जव भोगिती । कर्मविपाकी असे ख्याति । नीचश्रेष्ठकर्मानुसारी ॥४॥
विप्र क्षत्रिय वैश्य शूद्र वर्ण । यांचेपासाव चांडाल वर्ण । उपजला असता ज्ञातिहीन । जातिविभाग कर्मापरी ॥५॥
विप्रस्त्रियेपासी देखा । शूद्र जाय व्यभिचारिका । पिंड उपजे तो चांडालिका । सोळावी जाती चांडाल ॥६॥
हे मूळ उत्पत्तीचे लक्षण । नाना दोषांचे आचरण । तेणे हीन जन्म घेणे । विप्रादि चारी वर्णांसी ॥७॥
या दोषाचा विस्तार । सांगतो की सविस्तर । विप्रे करिता अनाचा । जन्म हीनजाती पावे ॥८॥
गुरु अथवा मातापिता । सांडोनि जाय तत्त्वतां । चांडालजन्म होय निरुता । सोडिता कुलस्त्रियेसी ॥९॥
कुलदेवता सोडोनि एका । पूजा करी आणिका । तो होय चांडाल देखा । सदा अनृत बोले नर ॥१०॥
सदा जीवहिंसा करी । कन्याविक्रय मनोहरी । लटिकेचि आपण प्रमाण करी । तोही जन्मे चांडालयोनी ॥११॥
शूद्रहस्ते करी भोजन । अश्वविक्रय करी ब्राह्मण । तोही चांडाल होय जाण । सदा शूद्रसंपर्के ॥१२॥
शूद्रस्त्रीसी सदा संग । नित्य असे दासीयोग । गृहभांड अतळती त्याग । तेणे देवपितृकर्मे करी ॥१३॥
तोही पावे हीनयोनी । जो का अग्नि-घाली रानी । गायवासरांसी विघडोनि । वेगळी करी तोही । होय चांडाल ॥१४॥
सोडी आपुल्या जननीते । आणि मारी लेकराते । वेगळी करी आपुल्या सत्ते । तोही जन्मे चांडाल ॥१५॥
बैलावरी विप्र बैसे । शूद्रान्न जेवी हर्षे । चांडाल होय भरवसे । ऐसे म्हणती श्रीगुरु ॥१६॥
विप्र तीर्थास जावोन । श्राद्धादि न करी जाण । परान्न प्रतिग्रह घेणे । तो होय चांडाल ॥१७॥
षट्कर्मेरहित विप्र देखा । कपिला गाईचे दुग्ध ऐका । न करिता अभिषेका । क्षीरपान जो करी ॥१८॥
तोही पावे चांडालयोनी । तुळसीपत्रे ओरपोनि । पूजा करी देवांलागोनि । शालिग्राम शूद्रे भजलिया ॥१९॥
न सेवीच मातापिता । त्यजी त्यासी न प्रतिपाळिता । चांडाल होय जन्मता । सप्तजन्मी कृमि होय ॥२०॥
पहिली एक स्त्री असता । दुजी करोनि तिसी त्यजिता । होय जन्म त्यासी पतिता । आणिक सांगेन एक नवल ॥२१॥
श्रमोनि अतिथी आला असता । वेद म्हणवोनि अन्न घालिता । जन्म पावे हा तत्त्वता । चांडालयोनी परियेसा ॥२२॥
योग्य विप्रांते निंदिती । आणिक जाती पूजिती । चांडालयोनी जाती । वृत्तिलोप केलिया ॥२३॥
तळी विहिरी फोडी मोडी । शिवालयी पूजा तोडी । ब्राह्मणांची घरे मोडी । तोही जन्मे पतितकुळी ॥२४॥
स्वामिस्त्रियेसी । शत्रुमित्रविश्वासस्त्रीसी । जो करी व्याभिचारासी । तोही जन्मे पतितागृही ॥२५॥
दोघी स्त्रिया जयासी । त्यात ठेवी प्रपंचेसी । अतिथि आलिया अस्तमानासी । ग्रास न दे तोही पतित होय ॥२६॥
त्रिसंध्यासमयी देखा । जो विप्र जेवी अविवेका । भाक देउनी फिरे निका । तो जन्मे चांडालयोनी ॥२७॥
राजे देती भूमिदान । आपण घेती हिरोन । संध्याकाली करी शयन । तोही होय चांडाल ॥२८॥
वैश्वदेवकालि अतिथीसी । जो करी दुष्टोत्तरेसी । अन्न न देई तयासी । कुक्कुटजन्म होवोनि उपजे ॥२९॥
गंगातीर्थांची निंदा करी । एकादशी भोजन करी । स्वामीस सोडी समरी । चांडालयोनी तया जन्म ॥३०॥
स्त्री संभोगी पर्वणीसी । अथवा हरिहरादिवशी । वेद शिकवी शूद्रासी । चांडालयोनी जन्म पावे ॥३१॥
मृत्युदिवसी न करी श्राद्ध । केले पुण्य सांगे प्रसिद्ध । वाटेकरांसी करी भेद । चांडालयोनी जन्म पावे ॥३२॥
ग्रीष्मकाली अरण्यात । पोई घालिती ज्ञानवंत । तेथे विघ्न जो करी । तोही जन्मे चांडालयोनी ॥३३॥
नाडीभेद न कळता वैद्यकी । जाणोनि औषधे दे आणिकी । तो होय महापातकी । चांडालयोनीत संभवे ॥३४॥
जारण मारण मोहनादि । मंत्र जपती कुबुद्धि । जन्म चांडाल होय त्रिशुद्धी । वेदमार्ग त्यजिता विप्रे ॥३५॥
श्रीगुरुसी नर म्हणे कोण । हरिहराते निंदे जाण । अन्य देवतांचे करी पूजन । तो नर पतित होय ॥३६॥
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र । आपुले कर्म त्यजूनि मंद । आणिक कर्म आचरे सदा । तोही होय चांडाल ॥३७॥
शूद्रापासूनी मंत्र शिके । त्यासी घडती सर्व पातके । गंगोदक क्षीरोदके । श्वानचर्मी घातले परी ॥३८॥
विधवा स्त्रीशी संग करी । शिव्या देऊन अतिथि जेववी घरी । श्राद्धदिनी पिंड न करी । चांडालयोनी तो जन्मे ॥३९॥
माता पिता गुरु द्वेषी । तो जन्मे चांडालयोनीसी । आणिक जन्म पापवंशी । उपजोनि येती परियेसा ॥४०॥
गुरूची निंदा करी हर्षी । सदा असे विप्रद्वेषी । वेदचर्चा करी बहुवशी । तो होय ब्रह्मराक्षस ॥४१॥
भजे आपण एक दैवत । दुजे देव निंदा करीत । तो होय अपस्मारित । दरिद्ररूपे पीडतसे ॥४२॥
माता पिता गुरु वर्जोन । वेगळा होय स्त्री आपण । बेरडाचे पोटी उपजोन । रोगी होऊन राहतसे ॥४३॥
सदा वेद दूषी आपण । अवमानीत ब्राह्मण । कर्मभ्रष्ट होय आपण । मूत्रकृच्छ्ररोगी होय ॥४४॥
लोकांचे वर्मकर्म आपण । सदा करी उच्चारण । हृदयरोगी होय जाण । महाकष्ट भोगीतसे ॥४५॥
गर्भपात करी स्त्रियेसी । वांझ होवोनि उपजे परियेसी । पुत्र झालिया मरती त्वरेसी । गर्भपात करू नये ॥४६॥
धर्मशास्त्रादि पुराण । सांगता नायके जाण । आणिक जेविता दृष्टि आपण । बहिरट होवोनि उपजे ॥४७॥
पतितासवे करी इष्टी । गर्दभजन्म पावती । त्यासी रस औषध घेती । मृगयोनी जन्मे तो ॥४८॥
ब्रह्महत्या केली जरी । क्षयरोगी होय निर्धारी । सुरापानी ओळखा परी । श्यामदंत उपजेल ॥४९॥
अश्ववध गोवध करिता । वांझ ज्वरी होय निश्चिता । सवेचि होय अनुतप्तता । दोष काही नाही त्यासी ॥५०॥
विश्वासघातकी नरासी । जन्म होय ऐसा त्यासी । अन्न जेविता वांति उर्वशी । अन्नवैरी तो होय ॥५१॥
सेवक एकाचा चाळवोन । घेवोनि जाती जे जन । त्यासी होय जाण बंधन । कारागृह भोगीतसे ॥५२॥
सर्पजाती मारी नर । सर्पयोनी पुढे निर्धार । ऐसे दोष अपार । आता तस्कर प्रकरण सांगेन ॥५३॥
स्त्रियांते चोरूनि घेऊनि जाय । मतिहीन जन्म होय । सदा क्लेशी आपण होय । अंती जाय नरकासी ॥५४॥
सुवर्णचोरी करी नर । प्रमेहव्याधि होय निर्धार । पुस्तक चोरिता नर । अंध होउनि उपजे देखा ॥५५॥
वस्त्रचोरी करी जरी । श्वित्री रोगी होय निर्धारी । गणद्रव्यचोरी घरी । ब्रह्मांडपुराणी बोलिले असे ॥५७॥
परद्रव्य-अपहार देखा । परदत्तापहार विशेषा । परद्वेषी नर ऐका । धान्य अपुत्री होउनि उपजे ॥५८॥
अन्नचोरी केलिया देखा । गुल्मव्याधि होय ऐका । धान्य करील तस्करिका । रक्तांग होय दुर्गंध शरीर ॥५९॥
का एखादा तैल चोरी । तोही दुर्गंधी पावे शरीरी । परस्त्रीब्रह्मस्व अपहारी । ब्रह्मराक्षसजन्म पावे ॥६०॥
मोती माणिक रत्ने देखा । चोरी करी नर ऐका । हीनजातीसी जन्म निका । पावे नर अवधारा ॥६१॥
पत्रशाखादि फळे चोरी । खरूजी होय अपरंपारी । रक्तांगी होय निर्धारी । गोचिड होय तो नर ॥६२॥
कांस्य लोह कर्पास लवण । तस्करिता नरा जाण । श्वेतकुष्ठ होय निर्गुण । विचारोनि रहाटावे ॥६३॥
देवद्रव्यापहारी देखा । देवकार्यनाश अपहार देखा । पंडुरोगी तो निका । फळचोरी विद्रूपी ॥६४॥
परनिक्षेपचोरी करी देखा । करिता होय सदा शोका । धनतस्कर उंष्ट्र ऐका । जन्म पावे अवधारा ॥६५॥
फलचोरी होय वनचर । जलचोरही होय कावळा थोर । गृहोपकरणे तस्कर । काकजन्म तो पावे ॥६६॥
मधुतस्कर अवधारी । जन्म पावे होय घारी । गोरस करी चोरी । कुष्ठी होय परियेसा ॥६७॥
श्रीगुरु म्हणती पतितासी । जन्म पावे ऐसिया दोषी । आता सांगेन व्यभिचारप्रकरणेसी । शांतिपर्वी बोलिले असे ॥६८॥
परस्त्री आलिंगिया देखा । शतजन्म श्वान निका । पुढे मागुती सप्तजन्मिका । भोगी दु:खा अवधारा ॥६९॥
परस्त्रीयोनी पाहे दृष्टीने । जन्मे तो अंधत्वपणे । बंधुभार्यासंपर्क करणे । गर्दभजन्म तो पावे ॥७०॥

सखीभार्यासवे ऐका । मातुलस्त्री असे विशेखा । येखादा करी संपर्का । श्वानयोनी जन्म पावे ॥७२॥
परस्त्रियांचे वदन । न करावे कदा अवलोकन । कुबुद्धी करिता निरीक्षण । चक्षुरोगी होऊनि उपजे ॥७३॥
आपण असे शूद्रजाति । विप्रस्त्रीशी करी रति । ती दोघेही कृमि होती । हे निश्चित अवधारा ॥७४॥
सदा शूद्रसंपर्क करी । याची स्त्री व्यभिचारी । जन्म पावे हो कुतरी । महादोष बोलिलासे ॥७५॥
ऐसे तया पतिताप्रती । श्रीगुरु आपण निरोपिती । ऐकत होता त्रिविक्रमभारती । प्रश्न केला श्रीगुरूसी ॥७६॥
स्वामी निरोपिले धर्म सकळ । ऐकता होय मन निर्मळ । जरी घडले एक वेळ । पाप जाय कवणेपरी ॥७७॥
श्रीगुरु म्हणती त्रिविक्रमासी । प्रायश्चित्त असे पापासी । पश्चात्ताप होय ज्यासी । पाप नाही सर्वथा ॥७८॥
पाप असे थोर केले । अंतःकरणी असे खोचले । त्यासी प्रायश्चित्त भले । कर्मविपाकी बोलिले ॥७९॥
प्रायश्चित्तांची विधाने । सांगेन ऐका स्थिर मने । अनेक ऋषींची वचने । ती सांगेन ऐका तुम्ही ॥८०॥
प्रथम व्हावा ब्रह्मदंड । तेणे होय पापखंड । गोदाने सालंकृत अखंड । अशक्त तरी द्रव्य द्यावे ॥८१॥
निष्क अथवा अर्धनिष्क । सूक्ष्म पाप पाव निष्क । स्थूलसूक्ष्म असेल पातक । तेणे विधीं द्रव्य द्यावे ॥८२॥
अज्ञानकृत पापासी । पश्चात्तापे शुद्धि परियेसी । गुरुसेवा तत्परेसी । केलिया गुरु निवारी ॥८३॥
नेणता पाप केलियासी । प्रायश्चित्त असे परियेसी । प्राणायाम द्विशतेसी । पुण्यतीर्थी दहा स्नाने ॥८४॥
तीन गुंजा सुवर्ण द्यावे । नदी आचरावे दोन गावे । सौम्य पातक याचि भावे । जाती पापे परियेसी ॥८५॥
स्त्रीपुरुष दोघांत एक । करिती पुण्यपाप दोष । दोघेही पडती दोषात । दोघे आचरावे प्रायश्चित्त ॥८६॥
आणिक एक असे प्रकार । जेणे पाप होय दूर । गायत्रीजप दहा सहस्त्र । करावा तेणे वेदमंत्र ॥८७॥
याचे नाव गायत्रीकृच्छ । महादोषी करी पवित्र । ऐसे करावे विचित्र । श्रीगुरु सांगती त्रिविक्रमासी ॥८८॥
प्राजापत्यकृच्छ्र देखा । असे विधि अतिविशेषा । भोजन करावे मुक्त एका । अथवा अयाचित भिक्षा ॥८९॥
उपवास करावे तीन दिवस । स्मरावे गुरुचरणास । येणे जाती सौम्य दोष । जे आपणासी सामान्य ॥९०॥
'अतिकच्छ्र' असे एक । एकचित्ते मुनि ऐक । दोष असतील सामान्यक । अज्ञानेचि केलिया ॥९१॥
अन्न घ्यावे सप्तविंशति ग्रास । सकाळी बारा रात्री पंचदश । अथवा दोनी अष्ट ग्रास । अयाचित अन्न द्यावे ॥९२॥
ऐसे सौम्य पातकासी । विधि असती परियेसी । मास एक नेमेसी । अंजुली एक जेवावे ॥९३॥
उपवास तीन करावे देखा । प्रकार सांगेन आणिका । तीन दिन उपोषका । घृतपारणे करावे ॥९४॥
तीन दिवस घृत घेवोनि । क्षीर घ्यावे दिवस तीनी । तीन दिवस वायु भक्षोनि । पुनः क्षीर एक दिवस ॥९५॥
एखादा असेल अशक्त । तयासी असे एक व्रत । तीळ गुळ लाह्या पीठ । उपवास एक करावा ॥९६॥
पूर्णकृच्छ्र करा ऐसी । पर्णोदक घ्यावे प्रतिदिवशी । करावे तितके उपवासी । पश्चात्तापे प्राशन कीजे ॥९७॥
कमल बिल्व अश्वत्थ । कुशोदक बिंदु नित्य । पान करावे सत्य । पर्णकृच्छ्र परियेसा ॥९८॥
आणिक एक प्रकार । करी चांद्रायण-आचार । कुक्कुटांडप्रमाण आहार । ग्रास घ्यावे वर्धमानी ॥९९॥
अमावास्येसी एक ग्रास । पौर्णिमेसी पंचदश । कृष्णपक्षी उतरत । दुसरे मासी हविष्यान्न ॥१००॥
आपले पाप प्रगटूनि । उच्चारावे सभास्थानी । पश्चात्तापे जळूनि । पाप जाय अवधारा ॥१॥
आता सांगेन तीर्थकृच्छ्र । यात्रा करावी पवित्र । वाराणसी श्वेतपर्वत । स्नानमात्रे पापे जाती ॥२॥
वरकड तीर्थी गेलियासी । गायत्रीजप सहस्त्रेसी । पाप जाय त्वरेसी । अगस्तीवचन बोलिले असे ॥३॥
समुद्रसेतुबंधेसी । स्नान केलिया परियेसी । भ्रूणहत्यापाप नाशी । कृतघ्नादि पातके ॥४॥
विधिपूर्वक शुचीसी । जप कोटी गायत्रीसी । ब्रह्महत्यापाप नाशी । ऐके त्रिविक्रम एकचित्ते ॥५॥
लक्ष गायत्री जप केलिया । सुरापानपाप जाय लया । सुवर्णचोरी केलिया । सात लक्ष जपावे ॥६॥
अष्ट लक्ष गुरुतल्पगासी । गायत्री जपता पाप नाशी । आता सांगेन परियेसी । वेदाक्षरे पाप दूर ॥७॥
पवमानसूक्त चत्वारी । पठण करिता ब्रह्महत्या दूरी । इंद्रमित्र अवधारी । एक मास जपावे ॥८॥
सुरापानादि पातके । जातील येणे सूक्तके । शुनःशेपा नाम सूक्ते । सुवर्णहरा पाप जाय ॥९॥
पवमानशन्नसूक्त । पठण करिता हविष्योक्त । मास एक पठत । गुरुतल्पगादिक हरती ॥११०॥
पंच मास सहा मास । मिताहर करुनी पुरुष । पुरुषसूक्ते कर्मनाश । पंचमहापापे नासती ॥११॥
त्रिमधु म्हणेजे मंत्रसूक्त । सुवर्णत्रीनास मंत्र । जपावे नाचिकेत । समस्त पातके प्रायश्चित्त ॥१२॥
नारायणपन्न देखा । जपावे भक्तिपूर्वका । नाशी पंच महापातका । प्रीतिपूर्वक जपावे ॥१३॥
त्रिपदा नाम गायत्रीसी । जपती जे भक्तीसी । अघमर्षण त्रिरावृत्तेसी । सप्त जन्म पाप जाय ॥१४॥
अपांमध्य पन्नासी । तद्विष्णो नाम सूक्तेसी । जपती जे जन भक्तीसी । सप्त जन्म पाप जाय ॥१५॥
आणिक असे विधान देखा । अज्ञानकृत दोषादिका । अनुतप्त होवोनि विशेषा । पंचगव्य प्राशन कीजे ॥१६॥
गोमूत्र गोमय क्षीर । दधि घृत कुशसार । विधिमंत्रे घ्यावे निर्धार । पहिले दिनी उपवास ॥१७॥
नीलवर्ण गोमूत्र । कृष्णगोमय पवित्र । ताम्र गायत्रीचे क्षीर । श्वेतधेनूचे दधि घ्यावे ॥१८॥
कपिला गाईचे तूप बरवे । ऐसे पंचगव्य बरवे घ्यावे । एकेकाचे क्लप्त भावे । सांगेन सर्व अवधारा ॥१९॥
गोमूत्र घ्यावे पावशेर। अंगुष्ठपर्व गोमय पवित्र । क्षीर पावणे दोन शेर । दधि तीन पाव घ्यावे ॥१२०॥
घृत घ्यावे पाव शेर । तितुकेचि मिळवावे कुशनीर । घेता मंत्र उच्चार । विस्तारोनि सांगेन ॥२१॥
कुशांसहित सहा रसे । एकेकासी मंत्र पृथक असे । प्रथम मंत्र इरावती असे । इदं विष्णु दुजा देख ॥२२॥
मानस्तोक मंत्र तिसरा । प्रजापति चतुर्थ अवधारा । पंचम गायत्री उच्चारा । सहावी व्याहृति प्रणवपूर्वका ॥२३॥
ऐसे मंत्रोनि पंचगव्य । प्यावे अनुतप्त एकभाव । अस्थिगत चर्मगत पूर्व । पापे जाती अवधारा ॥२४॥
गाई न मिळता इतुके जिन्नसी । कपिला गाय मुख्य परियेसी । दर्शनमात्रे दोष नाशी । कपिला गाई उत्तम ॥२५॥
पंचमहापातक नावे । ब्रह्महत्या सुरापान जाणावे । स्वर्णस्तेय गुरुतल्पग जाणावे । पाचवा त्यासवे मिळालेला ॥२६॥
चौघे पातकी देखा । पाचवा तया मिळता देखा । त्यासहित पंचमहापातका । आहेती पापे परियेसा ॥२७॥
सुरापानी ब्रह्मघातकी । सुवर्णस्तेय गुरुतल्पकी । पाचवा महाघातकी । जो सानुकूळ मिळे तो ॥२८॥
ऐसे पातक घडे त्यासी । प्रायश्चित्त परियेसी । श्रीगुरुसंतोषी । अनुग्रहे पुनीत ॥२९॥
एखादा मिळेल शास्त्रज्ञ । स्वधर्माचारे अभिज्ञ । त्याच्या अनुग्रहे पापघ्न । पुनीत होय अवधारा ॥१३०॥
ऐसे श्रीगुरु त्रिक्रमासी । प्रायश्चित्त सांगती परियेसी । सकल विप्र संतोषी । ज्ञानप्रकाशे होती ॥३१॥
श्रीगुरु म्हणती पतितासी । पूर्वी तू विप्र होतासी । माता पिता गुरु दूषी । तेणे होय चांडालजन्म ॥३२॥
आता सांगतो ऐक । स्नानसंगमी मास एक । केलिया दोष जाती निःशंक । पुनः विप्रजन्म होसी ॥३३॥
पतित म्हणे स्वामीसी । तव दर्शन जाहले आम्हांसी । कावळा जाता मानसासी । राजहंस तो होतसे ॥३४॥
तैस तव दर्शनमात्रे । पवित्र झाली सकळ गात्रे । तारावे आता त्वा कृपापात्रे । शरणागतासी ॥३५॥
परिस लागता लोखंडासी । सुवर्ण होय तत्क्षणेसी । सुवर्ण मागुती लोहासी । केवी मिळे स्वामिया ॥३६॥
तव दर्शनसुधारसी । आपण झालो ज्ञानराशी । अभिमंत्रोनि आम्हांसी । विप्रांमध्ये मिळवावे ॥३७॥
ऐकोनि तयाचे वचन । गुरु बोलती हासोन । तव देह जातिहीन । विप्र केवी म्हणतील ॥३८॥
पतिताच्या गृहासी । उपजोनि तू वाढलासी । ब्रह्मत्व केवी पावसी । विप्र निंदा करितील ॥३९॥
पूर्वी ऐसा विश्वामित्र । क्षत्रियवंशी गाधिपुत्र । तपोबळे म्हणवी पवित्र । म्हणे तो विप्र आपणा ॥१४०॥
ब्रह्मयाची शत वर्षे । तप केले महाक्लेशे । त्याचे बळे म्हणवीतसे । ब्रह्मऋषी आपणा ॥४१॥

देव म्हणती तयासी । आम्हा गुरु वसिष्ठ ऋषि । जरी तो बोले ब्रह्मऋषि । तरी आम्ही अंगिकारू ॥४३॥
मग त्या वसिष्ठासी । विनवी विश्वामित्र ऋषि । विप्र म्हणा आपणासी । केले तप बहुकाळ ॥४४॥
वसिष्ठ म्हणे विश्वामित्र । क्षत्रिय तपास अपात्र । देह टाकोनि मग पवित्र । विप्रकुळी जन्मावे ॥४५॥
मग तुझा होईल व्रतबंध । होईल गायत्रीप्रबोध । तधी तुवा होसी शुद्ध । ब्रह्मऋषि नाम तुझे ॥४६॥
काही केल्या न म्हणे विप्र । मग कोपला विश्वामित्र । वसिष्ठाचे शत पुत्र । मारिता झाला तये वेळी ॥४७॥
ब्रह्मज्ञानी वसिष्ठ ऋषि । नव्हे कदा तामसी । अथवा न म्हणे ब्रह्मऋषि । तया विश्वामित्रासी ॥४८॥
वर्तता ऐसे एके दिवसी । विश्वामित्र कोपेसी । हाती घेउनी पर्वतासी । घालू आला वसिष्ठावरी ॥४९॥
विचार करीत मागुती मनी । जरी वधीन वसिष्ठमुनि । आपणाते न म्हणे कोणी । ब्रह्मऋषि म्हणोनिया ॥१५०॥
इंद्रादि देव समस्त ऋषि । म्हणती वसिष्ठवाक्यासरसी । आपण म्हणो ब्रह्मऋषि । अन्यथा नाही म्हणोनिया ॥५१॥
ऐशा वसिष्ठमुनीस । मारिता यासी फार दोष । म्हणोनि टाकी गिरिवरास । भूमीवरी परियेसा ॥५२॥
अनुतप्त झाला अंतःकरणी । वसिष्ठे ते ओळखूनि । ब्रह्मऋषि म्हणोनि । पाचारिले तये वेळी ॥५३॥
संतोषोनि विश्वामित्र । म्हणे बोल बोलिला पवित्र । म्हणे घरी अन्नमात्र । तुम्ही घ्यावे स्वामिया ॥५४॥
संतोषोनि वसिष्ठ । तयालागी बोलत । म्हणे शरीर हे निभ्रांत । सूर्यकिरणी पचवावे ॥५५॥
विश्वामित्रे अंगिकारिले । सूर्यकिरणे देहा जाळिले । सहस्त्रकिरणी तापले । देह सर्व भस्म झाला ॥५६॥
विश्वामित्र महामुनि । अतिसामर्थ्य अनुष्ठानी । पहिला देह जाळोनि । नूतन देह धरियेला ॥५७॥
ब्रह्मर्षि तेथोन । विश्वामित्र झाला जाण । सकळांसी मान्य । महाराज ॥५८॥
मग म्हणती सकळ मुनि । विश्वामित्र ब्रह्मज्ञानी । ब्रह्मऋषी म्हणोनि । झाला त्रिभुवनी प्रख्यात ॥५९॥
या कारणे तव देह । विसर्जावा जन्म इह । अनुतप्त तव भाव । ब्रह्मकुल भाविसी ॥१६०॥
ऐसे त्या पतितासी । बोधिता गुरु परियेसी । लाधले सुख त्यासी । त्याच्या मानसी न ये काही ॥६१॥
निधान सापडे दरिद्र्यासी । तो का सांडील संतोषी । अमृत सापडता रोग्यासी । का सांडील जीवित्व ॥६२॥
एखादे ढोर उपवासी । पावे तृणबिढारासी । तेथोनि जावया त्यासी । मन नव्हे सर्वथा ॥६३॥
तैसे त्या पतितासी । लागले ध्यान गुरूसी । न जाय आपुल्या मंदिरासी । विप्र आपणा म्हणतसे ॥६४॥
इतुके होता ते अवसरी । आली त्याची पुत्रनारी । म्हणो लागले अपस्मारी । म्हणोनि आलो धावत ॥६५॥
जवळ येता स्त्रियेसी । स्पर्शो नको म्हणे तिसी । कोपेकरोनि मारावयासी । जात असे तो पतित ॥६६॥
दुःख करी ती भार्या । दुरुनी नमे गुरुपाया । पति माते सोडोनिया । जातो आता काय करू ॥६७॥
कन्या पुत्र मज बहुत । तया कोण पाळित । आम्हा सांडोनि जातो किमर्थ । सांगा तयासी स्वामिया ॥६८॥
जरी न सांगाल स्वामी त्यासी । त्यजीन प्राण पुत्रासरसी । येरवी आपणाते कोण पोषी । अनाथ मी स्वामिया ॥६९॥
ऐकोनि तियेचे वचन । गुरु बोलती हासोन । त्या नराते बोलावून । सांगताती परियेसा ॥१७०॥
गुरु म्हणती पतितासी । जावे आपुल्या घरासी । पुत्रकलश क्षोभता दोषी । तूते केवी गति होय ॥७१॥
या संसारी जन्मोनिया । संतोषवावे इंद्रिया । मग पावे धर्मकाया । तरीच तरे भवार्णव ॥७२॥
या कारणे पूर्वीच जाणा । न करावी आपण अंगना । करोनि तिसी त्यजिता जाणा । महादोष बोलिजे ॥७३॥
सूर्य-भूमी-साक्षीसी । तुवा वरिले स्त्रियेसी । तीस त्यागिता महादोषी । तूते नव्हे गति जाण ॥७४॥
श्रीगुरुवचन ऐकोन । विनवीतसे कर जोडून । केवी होऊ जातिहीन । ज्ञान होवोनि मागुती ॥७५॥
श्रीगुरु मनी विचारिती । याचे अंगी असे विभूति । प्रक्षाळावे लुब्धका-हाती । अज्ञानत्व पावेल ॥७६॥
ऐसे मनी विचारूनि । सांगती शिष्यासी बोलावोनि । एका लुब्धका पाचारोनि । आणा अतित्वरेसी ॥७७॥
तया ग्रामी द्विज एक । करी उदीम वाणिक । तयाते पाचारिती ऐक । तया पतितासन्निध ॥७८॥
श्रीगुरु म्हणती त्यासी । उदक घेवोनि हस्तेसी । स्नपन करी गा पतितासी । होय आसक्त संसारी ॥७९॥
आज्ञा होता ब्राह्मण । आला उदक घेऊन । त्यावरी घालिता तत्क्षण । गेली विभूति धुवोनि ॥८०॥
विभूति धूता पतिताचे । झाले अज्ञान मन त्याचे । मुख पाहता स्त्री-पुत्रांचे । धावत गेला त्याजवळी ॥८१॥
आलिंगोनिया पुत्रासी । भ्रांति म्हणे त्यासी । का आलो या स्थळासी । तुम्ही आला कवण कार्या ॥८२॥
ऐसा मनी विस्मय करीत । निघोनि घरा गेला पतित । सांगितला वृत्तान्त । विस्मय सर्व करिताती ॥८३॥
इतुके झाले कौतुक । पहाती नगरलोक । विस्मय करिती सकळिक । म्हणती अभिनव काय झाले ॥८४॥
त्रिविक्रमभारती मुनि । जो का होता गुरुसन्निधानी । पुसतसे विनवोनि । ऐका श्रोते एकचित्ते ॥८५॥
त्रिविक्रम म्हणे श्रीगुरूसी । होतो संदेह मानसी । निरोप द्यावा कृपेसी । विनंती एक अवधारा ॥८६॥
महापतित जातिहीन जाण । तयाते दिधले दिव्यज्ञान । अंग धुता तत्क्षण । गेले ज्ञान केवी त्याचे ॥८७॥
विस्तारोनि आम्हांसी । निरोपावे कृपेसी । म्हणोनि लागला चरणांसी । भावभक्ति करोनिया ॥८८॥
ऐसे पुत्र त्रिविक्रम यति । श्रीगुरु तया निरोपिती । त्याचे अंगाची विभूति । धुता गेले ज्ञान त्याचे ॥८९॥
ऐसे विभूतीचे महिमान । माहात्म्य असे पावन । सांच होय ब्रह्म पूर्ण । भस्ममहिमा अपार ॥१९०॥
गुरुवचन ऐकोनि । विनवीतसे त्रिविक्रम मुनि । देव गुरुशिरोमणि । भस्ममहिमा निरोपावा ॥९१॥
सिद्ध म्हणे शिष्यासी । भस्ममहिमा परियेसी । गुरु सांगता विस्तारेसी । एकचित्ते अवधारा ॥९२॥
म्हणोनि सरस्वतिगंगाधर । गुरुचरित्रविस्तार । ऐकता होय मनोहर । सकळाभीष्टे साधती ॥९३॥
पुढील कथा पावन । सांगे सिद्ध विस्तारोन । महाराष्ट्रभाषेकरून । सांगे सरस्वती गुरुदास ॥९४॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे कर्मविपाककथनं नाम अष्टाविंशोऽध्यायः ॥२८॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या १९५)

श्रीगणेशाय नम: ।
सिध्द म्हणे नामधारका । पुढें अपूर्व झालें ऐका । योगेश्वर कारणिका । सांगे स्त्रियांचे धर्म सकळ ॥१॥
योगेश्वर म्हणती स्त्रियेसी । आचार स्त्रियांचे पुससी । सांगेन तुज विस्तारेंसी । भवसागर तरावया ॥२॥
पति असतां कवण धर्म । अथवा मेलिया काय कर्म । उभयपक्षी विस्तारोन । सांगेन ऐकचित्ते ॥३॥
कथा स्कंदपुराणांत । काशीखंडीं विस्तृत । स्त्रियांचे धर्म बहुत । एकचित्तें ऐकावे ॥४॥
अगस्ति ऋषि महामुनि । जो का काशीभुवनीं । लोपमुद्रा महाज्ञानी । त्याची भार्या परियेसा ॥५॥
पतिव्रताशिरोमणि। दुजी नव्हती आणिक कोणी । असतां तेथें वर्तमानी । झाले अपूर्व परियेसा ॥६॥
त्या अगस्तिच्या शिष्यांत । विंध्य नामें असे विख्यात । पर्वतरूपें असे वर्तत । होता भूमीवर देखा ॥७॥
विध्याचळ म्हणिजे गिरी । अपूर्व वनें त्यावरी । शोभायमान महाशिखरी । बहु रम्य परियेसा ॥८॥
ब्रह्मर्षि नारदमुनि । हिंडत गेला तये स्थानीं । संतोष पावला पाहोनि । स्तुति केली तये वेळी ॥९॥
नारद म्हणे विंध्यासी । सर्वात श्रेष्ठ तूं होसी । सकळ वृक्ष तुजपासीं । मनोरम्य स्थळ तुझें ॥१०॥
परी एक असे उणें । मेरुसमान नव्हेसी जाणें स्थळ स्वल्प या कारणें । महत्व नाहीं परियेसा ॥११॥
ऐसें म्हणतां नारदमुनि । विंध्याचळ कोपोनि । वाढता झाला ते क्षणी । मेरुपरी होईन म्हणे ॥१२॥
वाढे विंध्याचळ देखा । सूर्यमंडळासंमुखा । क्रमांतरें वाढतां ऐका । गेला स्वर्गभुवनासी ॥१३॥
विंध्याद्रीच्या दक्षिण भागासी । अंधकार अहर्निशीं । सूर्यरश्मी न दिसे कैशीं । यज्ञादि कर्मे राहिलीं ॥१४॥
ऋषि समस्त मिळोनि । विनवूं आले इंद्रभुवनी । विध्याद्रीची करणी । सांगते झाले विस्तारें ॥१५॥
इंद्र कोपे तये वेळी । गेला तया ब्रह्मयाजवळी । सांगितला वृत्तान्त सकळी । तया विंध्य पर्वताचा ॥१६॥
ब्रह्मा म्हणे इंद्रासी । आहे कारण आम्हांसी । अगस्ति असे पुरीं काशी । त्यासी दक्षिण दिशे पाठवावें ॥१७॥
दक्षिण दिशा भुमीसी । अंधार पडिला परियेसी । या कारणें अगस्तीसी । दक्षिण दिशे पाठवावें ॥१८॥
अगस्तीचा शिष्य देखा । विंध्याचल आहे जो कां । गुरु येतां संमुखा । नमितां होई दंडवत ॥१९॥
सांगेल अगस्ति शिष्यासी । वाढों नको म्हणेल त्यासी । गमन करितां शिखरेसी । भूमीसमान करील ॥२०॥
या कारणें तुम्ही आतां । काशीपुरा जावें तत्त्वतां । अगस्तीतें नमतां । दक्षिणेसी पाठवावें ॥२१॥
येणेंपरी इंद्रासी । सांगे ब्रह्मदेव हर्षी । निरोप घेऊन वेगेंसी । निघता झाला अमरनाथ ॥२२॥
देवासहित इंद्र देखा । सवें बृहस्पति ऐका । सकळ ऋषि मिळोनि देखा । आले काशी भुवनासी ॥२३॥
अगस्तीच्या आश्रमासी । पातले समस्त इंद्र ऋषि । देवगुरु महाऋषि । बृहस्पति सवें असे ॥२४॥
देखोनिया अगस्ति मुनि । सकळांतें अभिवंदोनि । अर्ध्यपाद्य देउनी । पूजा केली भक्तीनें ॥२५॥
देव आणि बृहस्पति । अगस्तीची करिती स्तुति । आणिक सवेंचि आणिती । लोपामुद्रा पतिव्रता ॥२६॥
देवगुरु बृहस्पति । सांगे पतिव्रताख्याति । पूर्वी पतिव्रता बहुती । लोपमुद्रासरी नव्हती ॥२७॥
अरुंधती सावित्री सती । अनुसया पतिव्रती । शांडिल्याची पत्नी होती । पतिव्रता विख्यात ॥२८॥
लक्ष्मी आणि पार्वती । शांतरूपा स्वयंभुपत्नी । मेनिका अतिविख्याती । हिमवंताची प्राणेश्वरी ॥२९॥
सुनीती ध्रुवाची माता । संज्ञादेवी सुर्यकांता । स्वाहादेवी विख्याता । यज्ञपुरुषप्राणेश्वरी ॥३०॥
याहूनि आणिक ख्याता । लोपामुद्रा पतिव्रता । ऐका समस्त देवगण म्हणतां । बृहस्पति सांगतसे ॥३१॥
पतिव्रतेचें आचरण । सांगे गुरु विस्तारोन । पुरुष जेवितां प्रसाद जाण । मुख्य भोजन स्त्रियेसी ॥३२॥
आणिक सेवा ऐशी करणें । पुरुष देखोनि उभें राहणें । आज्ञेविण बैसों नेणे । अवज्ञा न करणें पतीची ॥३३॥
दिवस अखंड सेवा करणे अतिथि येतां पूजा करणें । पतिनिरोपावीण न जाणें । दानधर्म न करावा ॥३४॥
पतीची सेवा निरंतरीं । मनीं भाविजे हाचि हरि । शयनकाळी सर्व रात्रीं । सेवा करावी भक्तींसी ॥३५॥
पति निद्रिस्त झाल्यावरी । आपण शयन कीजे नारी । चोळी तानवडे ठेवावीं दुरी । तेणें पुरुषशरीर स्पर्शू नये ॥३६॥
स्पर्शे चोळी पुरुषासी । हानि होत आयुष्यासी । घेऊं नये नांव त्यासी । पति-आयुष्य उणें होय ॥३७॥
जागृत न होतां पति ऐका । पुढें उठीजे सती देखा । करणें सडासंमार्जन निका । करणें निर्मळ मंगलप्रद ॥३८॥
स्नान करूनि त्वरित । पूजूनि घ्यावें पतितीर्थ । चरणी मस्तक ठेवोनि यथार्थ । शिवासमान भावावें ॥३९॥
असतां ग्रामीं गृहीं पुरुष । सर्व शृंगार करणें हर्ष । ग्रामा गेलिया पुरुष । शृंगार आपण करुं नये ॥४०॥
पति निष्ठुर बोले जरी । आपण कोप कदा न करी । क्षमा म्हणोनी चरण धरी । राग न धरी मनांत ॥४१॥
पति येतां बाहेरुनी । सामोरी जाय तेक्षणी । सकळ कामें त्यजूनि । संमुख जाय पतिव्रता ॥४२॥
काय निरोप म्हणोनि । पुसावें ऐसें वंदोनि । जें वसे पतीच्या मनीं । त्याचपरी रहाटे ॥४३॥
पतिव्रतेचें ऐसें लक्षण । सांगेन ऐका देवगण । बहिर्द्वारी जातां जाण । अनेक दोष परियेसा ॥४४॥
बहिर्द्वारीं जाणें जरी । पाहूं नये नरनारीं । सवेंचि परतावें लवकरी । आपुले गुही असावें ॥४५॥
जरी पाहे बहिर्द्वारीं । उलूकयोनी जन्मे नारी । याच प्रकारे निर्धारी । पातिव्रत्य लोपामुद्रेचें ॥४६॥
लोपामुद्रा पतिव्रता । बाहेर न वचे सर्वथा । प्रात:काळ जो का होता । सडासंमार्जन करीतसे ॥४७॥
देवउपकरणी उजळोनि । गंधाक्षतादि करूनि । पुष्पवाती पंचवर्णी । रंगमाळा देवांसी ॥४८॥
अनुष्ठानाहूनि पति येतां । सकळ आयती करी तत्त्वतां । धरोनि पतीच्या चित्ता । पतीसवें रहाटे ती ॥४९॥
पुरुषाचें उच्छिष्ट भोजन । मनोभावें करणें आपण । नसतां पुरुष ग्रामीं जाण । घ्यावा अतिथिधेनुप्रसाद ॥५०॥
अतिथीसी घालावे अन्न । अथवा धेनूतें पूजोन । भोजन करावें सगुण । पतिव्रता परियेसा ॥५१॥
गृह निर्मळ निरंतर करी । निरोपावेगळा धर्म न करी । व्रतोपवास येणेपरी । निरोपावेगळे न करी जाणा ॥५२॥
उत्साह होता नगरात । कधी पाहू न म्हणत । तीर्थयात्राविवाहार्थ । कधीही न वचे परियेसा ॥५३॥
पुरुष संतोषी असता जरी । दुश्चित नसावी त्याची नारी । पुरुष दुश्चित असता जरी । आपण संतोषी असो नये ॥५४॥
रजस्वला झालिया देखा । बोलो नये मौन्य निका । नायकावे वेद ऐका । मुख पुरुषा दाखवू नये ॥५५॥
ऐसे चारी दिवसांवरी । आचरावे तिये नारी । सुस्नात होता ते अवसरी । पुरुषमुख अवलोकिजे ॥५६॥
जरी नसे पुरुष भवनी । त्याचे रूप ध्यावे मनी । सूर्यमंडळ पाहोनि । घरात जावे पतिव्रते ॥५७॥
पुरुषआयुष्यवर्धनार्थ । हळदीकुंकुम लाविजे ख्यात । सेंदूर काजळ कंठसूत्र । फणी माथा असावी ॥५८॥
तांबूल घ्यावे सुवासिनी । असावी तिचे माथा वेणी । करी कंकणे तोडर चरणी । पुरुषासमीप येणेपरी ॥५९॥
न करी इष्टत्व शेजारणीशी । रजकस्त्रीकुंटिणीसी । जैनस्त्रीद्रव्यहीनेसी । इष्टत्व करिता हानि होय ॥६०॥
पुरुषनिंदक स्त्रियेसी । न बोलावे तियेसी । बोलता दोष घडे तिसी । पतिव्रतालक्षण ॥६१॥
सासू श्वशुर नणंद वहिनी । दीरभावाते त्यजुनी । राहता वेगळेपणी । श्वानजन्म पावती ॥६२॥
अंग धुवो नये नग्नपणे । उखळमुसळावरी न बैसणे । पाई विवरल्यावीण जाणे । फिरू नये पतिव्रते ॥६३॥
जाते उंबऱ्यावरी देखा । बैसो नये वडिलांसमुखा । पतिव्रतालक्षण ऐका । येणेपरी असावे ॥६४॥
पतीसवे विवाद । करिता पावे महाखेद । पतिअंत:करणी उद्वेग । आपण कदा करू नये ॥६५॥
जरी असे अभाग्य पुरुष । नपुसक जरी असे देख । असे व्याधिष्ठ अविवेक । तरी देवासमान मानावा ॥६६॥
तैसा पुरुष असेल जरी । तोचि मानावा हरि । त्याचे बोलणे रहाटे तरी । परमेश्वरा प्रिय होय ॥६७॥
पतीचे मनी जी आवडी । तैसीच ल्यावी लेणी लुगडी । पति दुश्चित्त असता घडी । आपण श्रृंगार करू नये ॥६८॥
सोपस्कार पाहिजे जरी । न सांगावे आपण नारी । असता कन्या पुत्र जरी । तयामुखी सांगावे ॥६९॥

जितुके मिळाले पतीसी । संतुष्ट असावे मानसी । समर्थ पाहोनि कांक्षेसी । पतिनिंदा करू नये ॥७१॥
तीर्थयात्रे जाती लोक । म्हणोनि न गावे कौतुक । पुरुषाचे पादोदक । तेचि तीर्थ मानावे ॥७२॥
भागीरथीसमान देख । पतिचरणतीर्थ अधिक । पतिसेवा करणे मुख । त्रयमूर्ति संतुष्टती ॥७३॥
व्रत करणे असेल मनी । ते पुरुषा करावे पुसोनि । आत्मबुद्धी करिता कोणी । पति-आयुष्य उणे होय ॥७४॥
आणिक जाय नरकाप्रती । पति घेवोनि सांगाती । ऐसे बोलती वेदश्रुति । बृहस्पति सांगतसे ॥७५॥
पतीस क्रोधे उत्तर देती । श्वानयोनी जन्म पावती । जंबुक होवोनि भुंकती । ग्रामासन्निध येऊन ॥७६॥
नित्य नेम करणे नारी । पुरुष-उच्छिष्ट भोजन करी । पाद प्रक्षालोनि तीर्थधारी । घेवोनि तीर्थ जेवावे ॥७७॥
पति प्रत्यक्ष शंकर । काम्य होती मनोहर । पावे ती वैकुंठपुर । पतिसहित स्वर्गभुवना ॥७८॥
जावो नये वनभोजनासी । अथवा शेजारीगृहासी । इष्टसोयरे म्हणोनि हर्षी । प्रतिदिनी न जावे ॥७९॥
आपुला पुरुष दुर्बल किती । समर्थाची न करावी स्तुति । पति असता अनाचाररीती । आपण निंदा करू नये ॥८०॥
कैसा तरी आपुला पति । आपण करावी त्याची स्तुति । तोचि म्हणावा लक्ष्मीपति । एकभावे करोनिया ॥८१॥
सासूश्वशुर पुरुषांपुढे । नेटे बोलो नये गाढे । हासो नये त्यांपुढे । पति-आयुष्य उणे होय ॥८२॥
सासूश्वशुर त्यजून आपण । वेगळे असू म्हणे कवण । ऋक्षयोनी जन्मोन । अरण्यात हिंडेल ॥८३॥
पुरुष कोपे मारी जरी । मनी म्हणे हा मरो नारी । जन्म पावेल योनी व्याघ्री । महाघोर अरण्यात ॥८४॥
पर पुरुषाते नयनी पाहे । उपजता वरडोळी होय । पुरुषा वंचूनि विशेष खाय । ग्रामसूकर होय ती ॥८५॥
तोही जन्मी सोडोनि । उपजे वाघुळाचे योनी । आपुली विष्ठा आपण भक्षुनी । वृक्षावरी लोंबतसे ॥८६॥
पतिसंमुख निष्ठुर वचनी । उत्तर देती कोपोनि । उपजे मुकी होऊनि । सप्तजन्म दरिद्री ॥८७॥
पुरुष दुजी पत्नी करी । तिसी आपण वैर धरी । सप्त जन्मांवरी । दुर्भाग्यता होय अवधारा ॥८८॥
पुरुषावरी दुसरिया । दृष्टि ज्या करिती आवडिया । पतिता घरी जन्म पावोनिया । दुःखे सदा दारिद्र्य भोगिती ॥८९॥
पुरुष येता बाहेरुनी । संमुख जावे भामिनी । उदके पाद प्रक्षालुनी । विंझणा वारिजे श्रमहार ॥९०॥
पादसंवाहन भक्तीसी । मृदु वाक्य बोलिजे पतीसी । पुरुष होता संतोषी । त्रिमूर्ति संतोषती ॥९१॥
काय देती माता पिता । नेदी इष्टवर्ग बंधु भ्राता । इहपराची जोडी देता । पुरुष नारीचा देव जाण ॥९२॥
गुरु देव तीर्थे समस्ती । सर्व जाणावा आपुला पति । ऐसा निश्चय ज्यांच्या चित्ती । पतिव्रता त्याचि जाणा ॥९३॥
जीव असता शरीरासी । पवित्र होय समस्तांसी । जीव जाता क्षणे कैसी । कदा प्रेता नातळती ॥९४॥
तैसा पति प्राण आपला । पति नसता अशुचि तिला । या कारणे पतिच सकळा । प्राण आपुला जाणावा ॥९५॥
पति नसता स्त्रियेसी । सर्व अमंगळ परियेसी । विधवा म्हणजे प्रेतासरसी । अपत्य नसता अधिक जाण ॥९६॥
ग्रामास जाता परियेसी । विधवा भेटता संमुखेसी । मरण सांगे सत्य त्यासी । पुत्रासी अशुभ नव्हे जाणा ॥९७॥
माता विधवा असे जरी । पुत्रासी मंगळ शकुन करी । पुत्राविण विधवा नारी । नमन तिसी करू नये ॥९८॥
तिच्या आशीर्वादे आपण । मंगळ न होय सत्य जाण । तिचा हो का शाप मरण । तिसी कोणी बोलू नये ॥९९॥
या कारणे पतिव्रता । बरवे पुरुषासवे जाता । सर्व वैभव देहासहिता । केवी जाई परियेसा ॥१००॥
चंद्रासवे चांदणी जैसी । मेघासवे वीज कैसी । मावळता सवेचि जातसे । पतीसवे तैसे जावे ॥१॥
सहगमन करणे मुख्य जाण । थोर धर्मश्रुतीचे वचन । पूर्वज बेचाळीस उद्धरण । पतिव्रताधर्माने ॥२॥
पुरुष प्रेत झालियावरी । सहगमना जाता ते नारी । एकेक पाउली निर्धारी । अश्वमेघसहस्त्रपुण्य ॥३॥
पापी पुरुष असेल जाण । त्यासी आले जरी मरण । यमदूत नेती बांधून । नरकाप्रती परियेसा ॥४॥
पतिव्रता त्याची नारी । जरी सहगमन करी । जैसी सर्पासी नेती घारी । तैसी पतीते स्वर्गा नेई ॥५॥
सहगमन केलियावरी । पाहूनि यमदूत पळती दूरी । पतीसी सोडोनि सत्वरी । जाती यमदूत आपले पुरासी ॥६॥
पतिव्रताशिरोमणी । बैसविती विमानी । पावविती स्वर्गभुवनी । देवांगना ओवाळिती ॥७॥
यमदूत त्वरे पळती । काळाची न चाले ख्याती । पतिव्रता देखताचि चित्ती । भय वाटे म्हणताती ॥८॥
सूर्य भितो देखून तियेसी । तपतो तेजे मंदेसी । अग्नि भिउनी शांतीसी । उष्ण तिसी होऊ न शके ॥९॥
नक्षत्रे भिती पाहता तियेसी । आपुले स्थान घेईल ऐसी । जाय स्वर्गभुवनासी । पतीसहित परियेसा ॥११०॥
येणेपरी स्वर्गभुवनी । जाय नारी संतोषोनि । आपुले पतीस घेऊनि । राहे स्वर्गी निरंतर ॥११॥
तीन कोटि रोम तिसी । स्वदेह देता अग्नीसी । त्याची फळे असती कैशी । एकचित्ते ऐकावे ॥१२॥
एकेक रोम रोमासी । स्वर्गी राहे शतकोटि वर्षी । पुरुषासवे स्वानंदेसी । पतिव्रता राहे तेथे ॥१३॥
ऐसे पुण्य सहगमनासी । कन्या व्हावी ऐशी वंशी । बेचाळीस कुळे कैसी । घेऊन जाय स्वर्गाते ॥१४॥
धन्य तिची मातापिता । एकवीस कुळे उद्धरिता । धन्य पुरुषवंश ख्याता । बेचाळीस उद्धरिले ॥१५॥
ऐसे पुण्य सहगमनासी । पतिव्रतेच्या संगतीसी । आणिक सांगेन विस्तारेसी । देवगुरु म्हणतसे ॥१६॥
असेल नारी दुराचारी । अथवा व्याभिचारकर्म करी । त्याचे फळ अतिघोरी । एकचित्ते परियेसा ॥१७॥
उभय कुळे बेचाळिस । जरी असतील स्वर्गास । त्यासी घेउनि नरकास । प्रेमे जाय परियेसा ॥१८॥
अंगावरी रोम किती । तितुकी कोटि वर्षे ख्याती । नरकामध्ये पंचे निरुती । तिचे फळ ऐसे असे ॥१९॥
भूमिदेवी ऐसे म्हणे । पतिव्रतेच्या पवित्र चरणे । आपणावरी चालता क्षणे । पुनीत मी म्हणतसे ॥१२०॥
सूर्य चंद्र ऐसे म्हणती । आपली किरणे ज्योती । जरी पतिव्रतेवरी पडती । तरी आपण पावन होऊ ॥२१॥
वायु आणि वरुण । पतिव्रतेचिया स्पर्शाकारणे । पावन होऊ म्हणोन । स्पर्शे पुनीत होती ते ॥२२॥
घरोघरी स्त्रिया असती । काय करावी लावण्यसंपत्ति । जिचेनि वंश उद्धरती । तैसी स्त्री असावी की ॥२३॥
ज्याचे घरी पतिव्रता । दैवे आगळा तो तत्त्वता । करावे सुकृत जन्मशता । तरीच लाभे तैशी सती ॥२४॥
चतुर्विध पुरुषार्थ देखा । स्त्रियेच्या संगती लाघे लोका । पतिव्रता सती अधिका । पुण्यानुसार लाभे जना ॥२५॥
ज्याचे घरी नाही सती । पुण्ये त्यासी काही न घडती । यज्ञादि कर्मे ख्याति । सती असता होती जाण ॥२६॥
सती नसे ज्याचे घरी । त्यासी अरण्य नाही दूरी । वृथा जन्मोनि संसारी । कर्मबाह्य तोचि जाणा ॥२७॥
ऐसी सती मिळे ज्यासी । समस्त पुण्य होय त्यासी । पुत्रसंतान परलोकासी । साधन होय सतीचेनि ॥२८॥
स्त्रियेवीण असेल नर । तयासी न साधे कर्माचार । कर्महीन देव पितर । कर्मार्ह नव्हे कदा ॥२९॥
पुण्य जोडे गंगास्नानी । त्याहूनि पतिव्रतादर्शनी । महापापी होय पावन । सप्त जन्म पुनीत ॥१३०॥
पतिव्रतेचा आचार । सांगे पतिव्रतेसी योगेश्वर । म्हणे सरस्वतीगंगाधर । सांगे बृहस्पति देवगुरु ॥३१॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । गुरुचरित्र पुण्यराशी । ऐकता पावती सद्गतीसी । म्हणे सरस्वतीगंगाधर ॥३२॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । पतिव्रतानिरूपण विख्यात । ऐकता होय पुनीत । जे जे चिंतिले पाविजे ॥३३॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे पतिव्रताख्यानं नाम एकत्रिंशोऽध्यायः ॥३१॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या १३३)

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
नामधारक शिष्यराणा । लागे सिद्धाचिया चरणा । विनवीतसे कर जोडून । भक्तिभावेकरूनिया ॥१॥
जय जया सिद्धमुनि । तूचि तारक भवार्णी । अज्ञानतिमिर नासोनि । ज्योतिःस्वरूप तूचि होसी ॥२॥
अविद्यामायासागरी । बुडालो होतो महापुरी । तुझी कृपा जाहली तरी । तारिले माते स्वामिया ॥३॥
तुवा दाविला निज-पंथ । जेणे जोडे परमार्थ । विश्वपालक गुरुनाथ । तूचि होसी स्वामिया ॥४॥
गुरुचरित्र सुधारस । तुवा पाजिला आम्हांस । तृप्त न होय गा मानस । तृषा आणिक होतसे ॥५॥
तुवा केलिया उपकारासी । उत्तीर्ण नव्हे मी वंशोवंशी । निजस्वरूप आम्हांसी । दाविले तुम्ही सिद्धमुनि ॥६॥
मागे कथा निरोपिलीसी । अभिनव जाहले सृष्टीसी । पतिताकरवी ख्यातीसी । वेद चारी म्हणविले ॥७॥
त्रिविक्रम महामुनेश्वरासी । बोधिले ज्ञान प्रकाशी । पुढे कथा वर्तली कैशी । विस्तारावे दातारा ॥८॥
ऐकोनि शिष्याचे वचन । संतोषला सिद्ध आपण । प्रेमभावे आलिंगोन । आश्वासीतसे तये वेळी ॥९॥
धन्य धन्य शिष्यमौळी । तुज लाधले अभीष्ट सकळी । गुरूची कृपा तात्काळी । जाहली आता परियेसा ॥१०॥
धन्य धन्य तुझी वाणी । वेध लागला श्रीगुरुचरणी । तूचि तरलासी भवार्णी । सकळाभीष्टे साधतील ॥११॥
तुवा पुसिला वृत्तांत । संतोष झाला आजि बहुत । श्रीगुरुमहिमा असे ख्यात । अगम्य असे सांगता ॥१२॥
एकेक महिमा सांगता । विस्तार होईल बहु कथा । संकेतमार्गे तुज आता । निरोपीतसे परियेसी ॥१३॥
पुढे असता वर्तमानी । तया गाणगग्रामभुवनी । महिमा होतसे नित्यनूतनी । प्रख्यातरूप होऊनिया ॥१४॥
त्रयमूर्तीचा अवतार । झाला नृसिंहसरस्वती नर । महिमा त्याची अपरंपारु । सांगता अगम्य परियेसा ॥१५॥
महिमा तया त्रयमूर्तीची । सांगता शक्ति आम्हा कैची काया धरूनि मानवाची । चरित्र केले भूमीवरी ॥१६॥
तया स्थानी असता गुरु । ख्याति झाली अपरांपरु । प्रकाशत्व चारी राष्ट्र । समस्त येती दर्शना ॥१७॥
येती भक्त यात्रेसी । एकोभावे भक्तीसी । श्रीगुरुदर्शनमात्रेसी । सकळाभीष्ट पावती ॥१८॥
दैन्य पुरुष होती श्रियायुक्त । वांझेसी पुत्र होय त्वरित । कुष्ठे असेल जो पीडित । सुवर्ण होय देह त्याचा ॥१९॥
अक्षहीना अक्ष येती । बधिर कर्णी ऐकती । अपस्मारादि रोग जाती । श्रीगुरुचरणदर्शनमात्रे ॥२०॥
परीस लागता लोहासी । सुवर्ण होय नवल कायसी । श्रीगुरुकृपा होय ज्यासी । सकळाभीष्ट पाविजे ॥२१॥
ऐसे असता वर्तमानी । उत्तर दिशे माहुरस्थानी । होता विप्र महाघनी । नाम तया 'गोपीनाथ' ॥२२॥
तया पुत्र होऊनि मरती । करी दुःख अनेक रीती । दत्तात्रेया आराधिती । स्त्रीपुरुष दोघेजण ॥२३॥
पुढे जाहला आणिक सुत । तया नाम ठेविती 'दत्त' । असती आपण धनवंत । अति प्रीती वाढविले ॥२४॥
एकचि पुत्र तया घरी । अति प्रीति तयावरी । झाला पाच संवत्सरी । व्रतबंध केला तयासी ॥२५॥
वर्षे बारा होता तयासी । विवाह करिती प्रीतीसी । अतिसुंदर नोवरीसी । विचारूनि प्रीतिकरे ॥२६॥
मदनाचे रतीसरसी । रूप दिसे नोवरीसी । अति प्रीति सासूश्वशुरासी । महाप्रेमे प्रतिपाळिती ॥२७॥
दंपती एकचि वयेसी । अति प्रिय महा हर्षी । वर्धता झाली षोडशी । वर्षे तया पुत्रासी ॥२८॥
दोघे सुंदर सुलक्षण । एकापरीस एक प्राण । न विसंबिती क्षण क्षण । अतिप्रिय परियेसा ॥२९॥
ऐसी प्रेमे असता देखा । व्याधि आली त्या पुरुषा । अनेक औषधे देता ऐका । आरोग्य नोहे तयासी ॥३०॥
नवचे अन्न तयासी । सदा राहे उपवासी । त्याची भार्या प्रीतीसी । आपण न घे सदा अन्न ॥३१॥
पुरुषावरी आपुला प्राण । करी नित्य उपोषण । पतीस देता औषधे जाण । प्राशन करी परियेसा ॥३२॥
येणेपरी तीन वर्षी । झाली व्याधि-क्षयासी । पतिव्रता स्त्री कैसी । पुरुषासवे कष्टतसे ॥३३॥
पुरुषदेह क्षीण झाला । आपण तयासरसी अबला । तीर्थ घेऊनि चरणकमळा । काळ क्रमी तयाजवळी ॥३४॥
दुर्गंधि झाले देह त्याचे । जवळी न येती वैद्य साचे । पतिव्रता सुमन तिचे । न विसंबेचि क्षणभरी ॥३५॥
जितुके अन्न पतीसी । तितुकेचि ग्रास आपणासी । जैसे औषध देती त्यासी । आपण घेतसे परियेसा ॥३६॥
मातापिता दायाद गोती । समस्त तिसी वारिती । पतिव्रता ज्ञानवंती । न ऐके बोल कवणाचे ॥३७॥
दिव्यवस्त्रादि आभरणे । त्यजिली समस्त भूषणे । पुरुषावरी आपुला प्राण । काय सुख म्हणतसे ॥३८॥
उभयतांची मातापिता । महाधनिक श्रीमंता । पुत्रकन्येसी पाहता । दुःख करिती परियेसा ॥३९॥
अनेक जपानुष्ठान । मंत्रविद्या महाहवन । अपरिमित ब्राह्मणभोजन । करविताति अवधारा ॥४०॥
अनेक परीचे वैद्य येती । दिव्य रस-औषधे देती । शमन नव्हे कवणे रीती । महाव्याधीने व्यापिले ॥४१॥
पुसती जाणत्या ज्योतिष्यासि । पूजा करिती कुळदेवतांसी । काही केलिया पुत्रासी । आरोग्य नोहे सर्वथा ॥४२॥
वैद्य म्हणती तये वेळी । नव्हे बरवे त्यासी अढळी । राखील जरी चंद्रमौळी । मनुष्ययत्न नव्हे आता ॥४३॥
ऐसे ऐकोनि मातापिता । दुःखे दाटली करिती चिंता । जय जया जगन्नाथा । दत्तात्रेया गुरुमूर्ति ॥४४॥
आराधोनिया तुम्हांसी । पुत्र लाधलो संतोषी । पापरूप आपणासी । निधान केवी राहो पाहे ॥४५॥
एकचि पुत्र आमचे वंशी । त्याते जरी न राखिसी । प्राण देऊ तयासरसी । दत्तात्रेया स्वामिया ॥४६॥
ऐसे नानापरी देखा । दुःख करिती जननीजनका । वारीतसे पुत्र ऐका । मातापिता आलिंगोनि ॥४७॥
म्हणे आपुले भोग सरले । जितुके ऋण तुम्हा दिधले । अधिक कैचे घेऊ भले । ऋणानुबंध न चुकेचि ॥४८॥
ऐसे ऐकोनि मातापिता । दोघे जाहली मूर्च्छागता । पुत्रावरी लोळता । महादुःखे दाटोनिया ॥४९॥
म्हणती ताता पुत्रराया । आमुचीआशा झाली वाया । पोषिसी आम्हा म्हणोनिया । निश्चय केला होता आपण ॥५०॥
उबगोनिया आम्हांसी । सोडूनि केवी जाऊ पाहसी । वृद्धाप्यपणी आपणांसी । धर्म घडे केवी तुज ॥५१॥
ऐकोनि मातापितावचन । विनवीतसे आक्रंदोन । करणी ईश्वराधीन । मनुष्ययत्न काय चाले ॥५२॥
मातापित्यांचे ऋण । पुत्रे करावे उत्तीर्ण । तरीच पुत्रत्व पावणे । नाही तरी दगडापरी ॥५३॥
मातेने केले मज पोषण । एके घडीचे स्तनपान । उत्तीर्ण नव्हे भवार्ण । जन्मांतरी येऊनिया ॥५४॥
आपण जन्मलो तुमचे उदरी । कष्ट दाविले अतिभारी । सौख्य न देखा कवणेपरी । ऐसा आपण पापी देखा ॥५५॥
आता तुम्ही दुःख न करणे । परमार्थी दृष्टी देणे । जैसे काही असेल होणे । ब्रह्मादिका न सुटेचि ॥५६॥
येणेपरी जननीजनका । संभाषीतसे पुत्र निका । तेणेपरी स्त्रियेसी देखा । सांगतसे परियेसा ॥५७॥
म्हणे ऐक प्राणेश्वरी । झाले आमुचे दिवस सरी । मजनिमित्ते कष्टलीस भारी । वृथा गेले कष्ट तुझे ॥५८॥
पूर्वजन्मीचे वैरपण । तुजसी होता माझा शीण । म्हणोनि तूते दिधले जाण । जन्मांतरीचे कष्ट देखा ॥५९॥
तू जरी रहासी आमुचे घरी । तुज पोशितील परिकरी । तुज वाटेल कष्ट भारी । जाई आपुले माहेरा ॥६०॥
ऐसे तुझे सुंदरीपण । न लाधे आपण दैवहीन । न राहे तुझे अहेवपण । माझे अंग स्पर्शता ॥६१॥
ऐकोनि पतीचे वचन । मूर्च्छा आली तत्क्षण । माथा लावूनिया चरणा । दुःख करी तये वेळी ॥६२॥
म्हणे स्वामी प्राणेश्वरा । तुम्ही मज न अव्हेरा । तुहांसरी दातारा । आणिक नाही गति आपणा ॥६३॥
जेथे असे तुमचा देह । सवेचि असे आपण पाहे । मनी न करा संदेह । समागमी तुमची आपण ॥६४॥
ऐसे दोघांचिया वचनी । ऐकोनिया जनकजननी । देह टाकोनिया धरणी । दुःख करिती तयेवेळी ॥६५॥
उठवूनिया श्वशुरासी । संबोखीतसे सासूसी । न करा चिंता, हो भरवसी । पति आपुला वाचेल ॥६६॥
विनवीतसे तये वेळी । आम्हा राखेल चंद्रमौळी । पाठवा एखाद्या स्थळी । पति आपुला वाचेल ॥६७॥
सांगती लोक महिमा ख्याति । नरसिंहसरस्वती श्रीगुरुमूर्ति । गाणगापुरी वास करिती । तया स्वामी पहावे ॥६८॥
त्याचे दर्शनमात्रेसी । आरोग्य होईल पतीसी । आम्हा पाठवा त्वरितेसी । म्हणोनि चरणा लागली ॥६९॥

तया रोगिया करोनि डोली । घेवोनि निघाली ते बाळी । विनवीतसे तये वेळी । आपले सासूश्वशुरांसी ॥७१॥
स्थिर करूनि अंतःकरण । सुखे रहावे दोघेजण । पति असे माझा प्राण । राखील माझे कुळदैवत ॥७२॥
म्हणोनि सासूश्वशुरांसी । नमन करी प्रीतीसी । आशीर्वाद देती हर्षी । अहेवपण स्थिर होय ॥७३॥
तुझे दैवे तरी आता । आमुचा पुत्र वाचो वो माता । म्हणोनि निघाले बोळवीत । आशीर्वाद देताति ॥७४॥
येणेपरी पतीसहित । निघती झाली पतिव्रता । क्वचित्काळ मार्ग क्रमिता । आली गाणगापुरासी ॥७५॥
मार्ग क्रमिता रोगियासी । अधिक जाहला त्रिदोषी । उतरता ग्रामप्रदेशी । अतिसंकट जाहले पै ॥७६॥
विचारिता श्रीगुरूसी गेले होते संगमासी । जावे म्हणोनि दर्शनासी । निघती झाली तये वेळी ॥७७॥
पतिव्रता तये वेळ । आली आपुले पतीजवळ । पहाता जाहला अंतकाळ । प्राण गेला तत्क्षणी ॥७८॥
आकांत करी ते नारी । लोळतसे धरणीवरी । भोसकूनि घ्यावया घेता सुरी । वारिती तियेसी ग्राम लोक ॥७९॥
आफळी शिरे भूमीसी । हाणी उरी पाषाणेसी । केश मोकळे आक्रोशी । प्रलापीतसे परियेसा ॥८०॥
हा हा देवा काय केले । का मज गाईसी गांजिले । आशा करूनि आल्ये । राखिसी प्राण म्हणोनि ॥८१॥
पूजेसी जाता देउळात । पडे देऊळ करी घात । ऐसी कानी न ऐको मात । दृष्टांत झाला आपणासी ॥८२॥
उष्णकाळी तापोनि नरु । ठाकोनि जाय एखादा तरु । वृक्षचि पडे आघात थोरु । तयापरी झाले मज ॥८३॥
तृषेकरूनि पीडित । जाय मनुष्य गंगेत । संधी सुसरी करी घात । तयापरी मज झाले ॥८४॥
व्याघ्रभये पळे धेनु । जाय आधार म्हणोनु । तेथेंचि वधिती यवनु । तयापरी झाले मज ॥८५॥
ऐसी पापी दैवहीन । आपुले पतीचा घेतला प्राण । मातापितरांसी त्यजून । घेवोनि आल्ये विदेशी ॥८६॥
येणेपरी दुःख करीत । पाहू आले जन समस्त । संभाषिताति दुःखशमता । अनेकपरीकरूनिया ॥८७॥
वारितातिं नारी सुवासिनी । का वो दुःख करिसी कामिनी । विचार करी अंतःकरणी । होणार न चुके सकळिकांसी ॥८८॥
ऐसे म्हणता नगरनारी । तिसी दुःख झाले भारी । आठवीतसे परोपरी । आपुले जन्मकर्म सकळ ॥८९॥
ऐका तुम्ही मायबहिणी । आता कैची वाचू प्राणी । पतीसी आल्ये घेऊनि । याची आशा करोनिया ॥९०॥
आता कवणा शरण जावे । राखेल कोण मज जीवे । प्राणेश्वरा त्यजूनि जीवे । केवी वाचू म्हणतसे ॥९१॥
बाळपणी गौरीसी । पूजा केली शंकरासी । विवाह होता परियेसी । पूजा केली मंगळागौरी ॥९२॥
अहेवपणाचे आशेनी । पूजा केली म्या भवानी । सांगती माते सुवासिनी । अनेकपरी व्रतादिके ॥९३॥
जे जे सांगती माते व्रत । केली पूजा अखंडित । समस्त जाहले आता व्यर्थ । रुसली गौरी आपणावरी ॥९४॥
आता माझिये हळदीसी । चोर पडले गळेसरीसी । सर्वस्व दिधले वन्हीसी । कंकण-कंचुकी परियेसा ॥९५॥
कोठे गेले माझे पुण्य । वृथा पूजिला गौरीरमण । कैसे केले मज निर्वाण । ऐका मायबहिणी हो ॥९६॥
केवी राहू आता आपण । पति होता माझा प्राण । लोकांसरिसा नोहे जाण । प्राणेश्वर परियेसा ॥९७॥
ऐसे नानापरी देखा । करी पतिव्रता दुःखा । पतीच्या पाहूनिया मुखा । आणिक दुःख अधिक करी ॥९८॥
आलिंगोनि प्रेतासि । रोदन करी बहुवसी । आठवी आपुले पूर्व दिवसी । पूर्वस्नेह तये वेळी ॥९९॥
म्हणे पुरुषा प्राणेश्वरा । कैसे माझे त्यजिले करा । उबग आला तुम्हा थोरा । म्हणोनि माते उपेक्षिले ॥१००॥
कैसी आपण दैवहीन । तटाकी खापर लागता भिन्न । होतासि तू निधान । आयुष्य तुझे उणे जहाले ॥१॥
तुमचे मातापितयांसी । सांडूनि आणिले परदेशी । जेणेपरी श्रावणासी । वधिले राये दशरथे ॥२॥
तैसी तुमची जनकजननी । तुम्हा आणिले त्यजूनि । तुमची वार्ता ऐकोनि । प्राण त्यजितील दोघेजण ॥३॥
तीन हत्या भरवसी । घडल्या मज पापिणीसी । वैरिणी होय मी तुम्हांसी । पतिघातकी आपण सत्य ॥४॥
ऐशी पापिणी चांडाळी । निंदा करिती लोक सकळी । प्राणे घेतला मीचि बळी । प्राणेश्वरा दातारा ॥५॥
स्त्री नव्हे मी तुमची वैरी । जैसी तिखट शस्त्र सुरी । वेधिली तुमचे शरीरी । घेतला प्राण आपणचि ॥६॥
मातापिता बंधु सकळी । जरी असती तुम्हाजवळी । मुख पाहती अंतकाळी । त्यांसि विघ्न आपण केले ॥७॥
माझ्या वृद्ध सासूसासऱ्यात । होती तुमची आस । पुरला नाही त्यांचा सोस । त्याते सांडोनि केवी जाता ॥८॥
एकचि उदरी तुम्ही त्यासी । उबगलेति पोसावयासी । आम्हा कोठे ठेवूनि जासी । प्राणेश्वरा दातारा ॥९॥
आता आपण कोठे जावे । कवण माते पोसील जीवे । न सांगता आम्हांसी बरवे । निघोनि गेलासी प्राणेश्वरा ॥११०॥
तू माझा प्राणेश्वरु । तुझे ममत्व केवी विसरू । लोकासमान नव्हसी नरु । प्रतिपाळिले प्रीतिभावे ॥११॥
कधी नेणे पृथक्शयन । वामहस्त-उसेवीण । फुटतसे अंतःकरण । केवी वाचो प्राणेश्वरा ॥१२॥
किती आठवू तुझे गुण । पति नव्हसी माझा प्राण । सोडोनि जातोसि निर्वाण । कवणेपरी वाचू मी ॥१३॥
आता कवण थाऱ्य जाणे । कवण घेतील मज पोसणे । 'बालविधवा' म्हणोनि जन । निंदापवाद ठेविती ॥१४॥
एकही बुद्धि मज न सांगता । त्यजिला आत्मा प्राणनाथा । कोठे जावे आपण आता । केशवपन करूनि ॥१५॥
तुझे प्रेम होते भरल्ये । मातापितयाते विसरल्ये । त्यांचे घरा नाही गेल्ये । बोलावनी नित्य येती ॥१६॥
केवी जाऊ त्यांच्या घरा । उपेक्षितील प्राणेश्वरा । दैन्यवृत्ती दातारा । चित्तवृत्ति केवी धरू ॥१७॥
जववरी होतासी तू छत्र । सर्वा ठायी मी पवित्र । मानिती सकळ इष्टमित्र । आता निंदा करतील ॥१८॥
सासूश्वशुरापाशी जाणे । मज देखता त्याही मरणे । गृह जहाले अरण्य । तुम्हाविणे प्राणेश्वरा ॥१९॥
घेवोनि आल्ये आरोग्यासी । येथे ठेवूनि तुम्हांसी । केवी जाऊ घरासी । राक्षसी मी पापीण ॥१२०॥
ऐसे नानापरी ते नारी । दुःख करी अपरांपरी । इतुके होता अवसरी । आला तेथे सिद्ध एक ॥२१॥
भस्मांकित जटाधारी । रुद्राक्षमाळाभूषण-अळंकारी । त्रिशूळ धरिला असे करी । येऊनि जवळी उभा ठेला ॥२२॥
संभाषीतसे तया वेळी । का वो प्रलापिसी स्थूळी । जैसे लिहिले कपाळी । तयापरी होतसे ॥२३॥
पूर्वजन्मीचे तपफळ । भोगणे आपण हे अढळ । वाया रडसी निर्फळ । शोक आता करू नको ॥२४॥
दिवस आठ जरी तू रडसी । न ये प्राण प्रेतासी । जैसे लिहिले ललाटेसी । तयापरी घडेल जाण ॥२५॥
मूढपणे दुःख करिसी । समस्ता मरण तू जाणसी । कवण वाचला असे धरित्रीसी । सांग आम्हा म्हणतसे ॥२६॥
आपुला म्हणसी प्राणेश्वरु । कोठे उपजला तो नरु । तुझा जन्म झाला येरु । कवण तुझी मातापिता ॥२७॥
पूर येता गंगेत । नानापरीची काष्ठे वाहत । येऊनि एके ठायी मिळत । फाकती आणिक चहूकडे ॥२८॥
पाहे पा एका वृक्षावरी । येती पक्षी अपरांपरी । क्रमोनि प्रहर चारी । जाती मागुती चहूकडे ॥२९॥
तैसा हा संसार जाण नारी । कवण वाचला असे स्थिरी । मायामोहे कलत्रपुत्री । पति म्हणसी आपुला ॥१३०॥
गंगेमध्ये जैसा फेन । तेणेपरी देह जाण । स्थिर नोहे याचि कारण । शोक वृथा करू नको ॥३१॥
पंचभूतात्मक देह । तत्संबंधी गुण पाहे । आपुले कर्म कैसे आहे । तैसा गुण उद्भवे ॥३२॥
गुणानुबंधे कर्मे घडती । कर्मासारिखी दुःख-प्राप्ति । मायामोहाचिया रीती । मायामयसंबंधे ॥३३॥
मायासंबंधे मायागुण । उपजे सत्त्व-रज-तमोगुण । येणेचि तीन्हि देह जाण । त्रिगुणात्मक देह हा ॥३४॥
हा संसार वर्तमान । समस्त कर्माचे अधीन । सुखदुःख आपुले गुण । भोगिजे आपुले आर्जव ॥३५॥
कल्पकोटी दिवसवरी । देवास आयुष्य आहे जरी । त्यासी काळ न चुके सरी । मनुष्याचा कवण पाड ॥३६॥
काळ समस्तांसी कारण । कर्माधीन देह-गुण । स्थिर कल्पिता साधारण । पंचभूत देहासी ॥३७॥
काळ-कर्म-गुणाधीन । पंचभूतात्मक देह जाण । उपजता संतोष नको मना । मेलिया दुःख न करावे ॥३८॥
जधी गर्भ होता नरु । जाणिजे नश्य म्हणोनि प्रख्यात थोरु । त्याचे जैसे गुणकर्म-विवरु । तैसे मरण जन्म परियेसा ॥३९॥
कोणा मृत्यु पूर्ववयसी । कवणा मृत्यु वृद्धाप्येसी । जैसे आर्जव असे ज्यासी । तयापरी घडे जाणा ॥१४०॥

आयुष्य सुखदुःख जाणा । समस्त पापवश्य-पुण्य । ललाटी लिहिले असे ब्रह्माने । अढळ जाण विद्वज्जना ॥४२॥

एखादे समयी कर्मासी । लंघिजेल पुण्यवशी । देवदानवमनुष्यांसी । काळ न चुके भरवसे ॥४३॥

संसार म्हणजे स्वप्नापरी । इंद्रजाल-गारुडीसरी । मिथ्या जाण तयापरी । दुःख आपण करू नये ॥४४॥

शतसहस्त्रकोटि जन्मी । तू कवणाची कोण होतीस गृहिणी । वाया दुःख करिसी झणी । मूर्खपणेकरूनिया ॥४५॥

पंचभूतात्मक शरीर । त्वचा मांस शिरा रुधिर । मेद मज्जा अस्थि नर । विष्ठा-मूत्र-श्र्लेष्मसंबंधी ॥४६॥

ऐशा शरीरअघोरात । पाहता काय असे स्वार्थ । मल मूत्र भरले रक्त । तयाकारणे शोक का करिसी ॥४७॥

विचार पाहे पुढे आपुला । कोणेपरी मार्ग असे भला । संसारसागर पाहिजे तरला । तैसा मार्ग पाहे बाळे ॥४८॥

येणेपरी तियेसी । बोधिता झाला तापसी । ज्ञान झाले तियेसी । सांडी शोक तयावेळी ॥४९॥

कर जोडोनि तये वेळी । माथा ठेविनि चरणकमळी । विनवीतसे करुनाबहाळी । उद्धरी स्वामी म्हणोनिया ॥१५०॥

कवण मार्ग आपणासी । जैसा स्वामी निरोप देसी । जनक जननी तू आम्हासी । तारी तारी म्हणतसे ॥५१॥

कवणेपरी तरेन आपण । हा संसार भवार्ण । तुझा निरोप करीन । म्हणोनि चरणा लागली ॥५२॥

ऐकोनि तियेचे वचन । सांगे योगी प्रसन्नवदन । बोलतसे विस्तारून । आचरण स्त्रियांचे ॥५३॥

म्हणोनि सरस्वती गंगाधर । सांगे गुरुचरित्रविस्तार । ऐकता समस्त पाप दूर । सकळाभीष्टे साधती ॥१५४॥

इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे प्रेतांगनाशोको नाम त्रिंशत्तमोऽध्यायः ॥३०॥

श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

(ओवीसंख्या १५४)

श्रीगणेशाय नम: ।

सिध्द म्हणे नामधारका । पुढें अपूर्व झालें ऐका । योगेश्वर कारणिका । सांगे स्त्रियांचे धर्म सकळ ॥१॥
योगेश्वर म्हणती स्त्रियेसी । आचार स्त्रियांचे पुससी । सांगेन तुज विस्तारेंसी । भवसागर तरावया ॥२॥
पति असतां कवण धर्म । अथवा मेलिया काय कर्म । उभयपक्षी विस्तारोन । सांगेन ऐकचित्ते ॥३॥
कथा स्कंदपुराणांत । काशीखंडीं विस्तृत । स्त्रियांचे धर्म बहुत । एकचित्तें ऐकावे ॥४॥
अगस्ति ऋषि महामुनि । जो का काशीभुवनीं । लोपमुद्रा महाज्ञानी । त्याची भार्या परियेसा ॥५॥
पतिव्रताशिरोमणि। दुजी नव्हती आणिक कोणी । असतां तेथें वर्तमानी । झाले अपूर्व परियेसा ॥६॥
त्या अगस्तिच्या शिष्यांत । विंध्य नामें असे विख्यात । पर्वतरूपें असे वर्तत । होता भूमीवर देखा ॥७॥
विध्याचळ म्हणिजे गिरी । अपूर्व वनें त्यावरी । शोभायमान महाशिखरी । बहु रम्य परियेसा ॥८॥
ब्रह्मर्षि नारदमुनि । हिंडत गेला तये स्थानीं । संतोष पावला पाहोनि । स्तुति केली तये वेळी ॥९॥
नारद म्हणे विंध्यासी । सर्वात श्रेष्ठ तूं होसी । सकळ वृक्ष तुजपासीं । मनोरम्य स्थळ तुझें ॥१०॥
परी एक असे उणें । मेरुसमान नव्हेसी जाणें स्थळ स्वल्प या कारणें । महत्व नाहीं परियेसा ॥११॥
ऐसें म्हणतां नारदमुनि । विंध्याचळ कोपोनि । वाढता झाला ते क्षणी । मेरुपरी होईन म्हणे ॥१२॥
वाढे विंध्याचळ देखा । सूर्यमंडळासंमुखा । क्रमांतरें वाढतां ऐका । गेला स्वर्गभुवनासी ॥१३॥
विंध्याद्रीच्या दक्षिण भागासी । अंधकार अहर्निशीं । सूर्यरश्मी न दिसे कैशीं । यज्ञादि कर्मे राहिलीं ॥१४॥
ऋषि समस्त मिळोनि । विनवूं आले इंद्रभुवनी । विध्याद्रीची करणी । सांगते झाले विस्तारें ॥१५॥
इंद्र कोपे तये वेळी । गेला तया ब्रह्मयाजवळी । सांगितला वृत्तान्त सकळी । तया विंध्य पर्वताचा ॥१६॥
ब्रह्मा म्हणे इंद्रासी । आहे कारण आम्हांसी । अगस्ति असे पुरीं काशी । त्यासी दक्षिण दिशे पाठवावें ॥१७॥
दक्षिण दिशा भुमीसी । अंधार पडिला परियेसी । या कारणें अगस्तीसी । दक्षिण दिशे पाठवावें ॥१८॥
अगस्तीचा शिष्य देखा । विंध्याचल आहे जो कां । गुरु येतां संमुखा । नमितां होई दंडवत ॥१९॥
सांगेल अगस्ति शिष्यासी । वाढों नको म्हणेल त्यासी । गमन करितां शिखरेसी । भूमीसमान करील ॥२०॥
या कारणें तुम्ही आतां । काशीपुरा जावें तत्त्वतां । अगस्तीतें नमतां । दक्षिणेसी पाठवावें ॥२१॥
येणेंपरी इंद्रासी । सांगे ब्रह्मदेव हर्षी । निरोप घेऊन वेगेंसी । निघता झाला अमरनाथ ॥२२॥
देवासहित इंद्र देखा । सवें बृहस्पति ऐका । सकळ ऋषि मिळोनि देखा । आले काशी भुवनासी ॥२३॥
अगस्तीच्या आश्रमासी । पातले समस्त इंद्र ऋषि । देवगुरु महाऋषि । बृहस्पति सवें असे ॥२४॥
देखोनिया अगस्ति मुनि । सकळांतें अभिवंदोनि । अर्ध्यपाद्य देउनी । पूजा केली भक्तीनें ॥२५॥
देव आणि बृहस्पति । अगस्तीची करिती स्तुति । आणिक सवेंचि आणिती । लोपामुद्रा पतिव्रता ॥२६॥
देवगुरु बृहस्पति । सांगे पतिव्रताख्याति । पूर्वी पतिव्रता बहुती । लोपमुद्रासरी नव्हती ॥२७॥
अरुंधती सावित्री सती । अनुसया पतिव्रती । शांडिल्याची पत्नी होती । पतिव्रता विख्यात ॥२८॥
लक्ष्मी आणि पार्वती । शांतरूपा स्वयंभुपत्नी । मेनिका अतिविख्याती । हिमवंताची प्राणेश्वरी ॥२९॥
सुनीती ध्रुवाची माता । संज्ञादेवी सुर्यकांता । स्वाहादेवी विख्याता । यज्ञपुरुषप्राणेश्वरी ॥३०॥
याहूनि आणिक ख्याता । लोपामुद्रा पतिव्रता । ऐका समस्त देवगण म्हणतां । बृहस्पति सांगतसे ॥३१॥
पतिव्रतेचें आचरण । सांगे गुरु विस्तारोन । पुरुष जेवितां प्रसाद जाण । मुख्य भोजन स्त्रियेसी ॥३२॥
आणिक सेवा ऐशी करणें । पुरुष देखोनि उभें राहणें । आज्ञेविण बैसों नेणे । अवज्ञा न करणें पतीची ॥३३॥
दिवस अखंड सेवा करणे अतिथि येतां पूजा करणें । पतिनिरोपावीण न जाणें । दानधर्म न करावा ॥३४॥
पतीची सेवा निरंतरीं । मनीं भाविजे हाचि हरि । शयनकाळी सर्व रात्रीं । सेवा करावी भक्तींसी ॥३५॥
पति निद्रिस्त झाल्यावरी । आपण शयन कीजे नारी । चोळी तानवडे ठेवावीं दुरी । तेणें पुरुषशरीर स्पर्शू नये ॥३६॥
स्पर्शे चोळी पुरुषासी । हानि होत आयुष्यासी । घेऊं नये नांव त्यासी । पति-आयुष्य उणें होय ॥३७॥
जागृत न होतां पति ऐका । पुढें उठीजे सती देखा । करणें सडासंमार्जन निका । करणें निर्मळ मंगलप्रद ॥३८॥
स्नान करूनि त्वरित । पूजूनि घ्यावें पतितीर्थ । चरणी मस्तक ठेवोनि यथार्थ । शिवासमान भावावें ॥३९॥
असतां ग्रामीं गृहीं पुरुष । सर्व शृंगार करणें हर्ष । ग्रामा गेलिया पुरुष । शृंगार आपण करुं नये ॥४०॥
पति निष्ठुर बोले जरी । आपण कोप कदा न करी । क्षमा म्हणोनी चरण धरी । राग न धरी मनांत ॥४१॥
पति येतां बाहेरुनी । सामोरी जाय तेक्षणी । सकळ कामें त्यजूनि । संमुख जाय पतिव्रता ॥४२॥
काय निरोप म्हणोनि । पुसावें ऐसें वंदोनि । जें वसे पतीच्या मनीं । त्याचपरी रहाटे ॥४३॥
पतिव्रतेचें ऐसें लक्षण । सांगेन ऐका देवगण । बहिर्द्वारी जातां जाण । अनेक दोष परियेसा ॥४४॥
बहिर्द्वारीं जाणें जरी । पाहूं नये नरनारीं । सवेंचि परतावें लवकरी । आपुले गुही असावें ॥४५॥
जरी पाहे बहिर्द्वारीं । उलूकयोनी जन्मे नारी । याच प्रकारे निर्धारी । पातिव्रत्य लोपामुद्रेचें ॥४६॥
लोपामुद्रा पतिव्रता । बाहेर न वचे सर्वथा । प्रात:काळ जो का होता । सडासंमार्जन करीतसे ॥४७॥
देवउपकरणी उजळोनि । गंधाक्षतादि करूनि । पुष्पवाती पंचवर्णी । रंगमाळा देवांसी ॥४८॥
अनुष्ठानाहूनि पति येतां । सकळ आयती करी तत्त्वतां । धरोनि पतीच्या चित्ता । पतीसवें रहाटे ती ॥४९॥
पुरुषाचें उच्छिष्ट भोजन । मनोभावें करणें आपण । नसतां पुरुष ग्रामीं जाण । घ्यावा अतिथिधेनुप्रसाद ॥५०॥
अतिथीसी घालावे अन्न । अथवा धेनूतें पूजोन । भोजन करावें सगुण । पतिव्रता परियेसा ॥५१॥
गृह निर्मळ निरंतर करी । निरोपावेगळा धर्म न करी । व्रतोपवास येणेपरी । निरोपावेगळे न करी जाणा ॥५२॥
उत्साह होता नगरात । कधी पाहू न म्हणत । तीर्थयात्राविवाहार्थ । कधीही न वचे परियेसा ॥५३॥
पुरुष संतोषी असता जरी । दुश्चित नसावी त्याची नारी । पुरुष दुश्चित असता जरी । आपण संतोषी असो नये ॥५४॥
रजस्वला झालिया देखा । बोलो नये मौन्य निका । नायकावे वेद ऐका । मुख पुरुषा दाखवू नये ॥५५॥
ऐसे चारी दिवसांवरी । आचरावे तिये नारी । सुस्नात होता ते अवसरी । पुरुषमुख अवलोकिजे ॥५६॥
जरी नसे पुरुष भवनी । त्याचे रूप ध्यावे मनी । सूर्यमंडळ पाहोनि । घरात जावे पतिव्रते ॥५७॥
पुरुषआयुष्यवर्धनार्थ । हळदीकुंकुम लाविजे ख्यात । सेंदूर काजळ कंठसूत्र । फणी माथा असावी ॥५८॥
तांबूल घ्यावे सुवासिनी । असावी तिचे माथा वेणी । करी कंकणे तोडर चरणी । पुरुषासमीप येणेपरी ॥५९॥
न करी इष्टत्व शेजारणीशी । रजकस्त्रीकुंटिणीसी । जैनस्त्रीद्रव्यहीनेसी । इष्टत्व करिता हानि होय ॥६०॥
पुरुषनिंदक स्त्रियेसी । न बोलावे तियेसी । बोलता दोष घडे तिसी । पतिव्रतालक्षण ॥६१॥
सासू श्वशुर नणंद वहिनी । दीरभावाते त्यजुनी । राहता वेगळेपणी । श्वानजन्म पावती ॥६२॥
अंग धुवो नये नग्नपणे । उखळमुसळावरी न बैसणे । पाई विवरल्यावीण जाणे । फिरू नये पतिव्रते ॥६३॥
जाते उंबऱ्यावरी देखा । बैसो नये वडिलांसमुखा । पतिव्रतालक्षण ऐका । येणेपरी असावे ॥६४॥
पतीसवे विवाद । करिता पावे महाखेद । पतिअंत:करणी उद्वेग । आपण कदा करू नये ॥६५॥
जरी असे अभाग्य पुरुष । नपुसक जरी असे देख । असे व्याधिष्ठ अविवेक । तरी देवासमान मानावा ॥६६॥
तैसा पुरुष असेल जरी । तोचि मानावा हरि । त्याचे बोलणे रहाटे तरी । परमेश्वरा प्रिय होय ॥६७॥
पतीचे मनी जी आवडी । तैसीच ल्यावी लेणी लुगडी । पति दुश्चित्त असता घडी । आपण श्रृंगार करू नये ॥६८॥
सोपस्कार पाहिजे जरी । न सांगावे आपण नारी । असता कन्या पुत्र जरी । तयामुखी सांगावे ॥६९॥

जितुके मिळाले पतीसी । संतुष्ट असावे मानसी । समर्थ पाहोनि कांक्षेसी । पतिनिंदा करू नये ॥७१॥
तीर्थयात्रे जाती लोक । म्हणूनि न गावे कौतुक । पुरुषाचे पादोदक । तेचि तीर्थ मानावे ॥७२॥
भागीरथीसमान देख । पतिचरणतीर्थ अधिक । पतिसेवा करणे मुख । त्रयमूर्ति संतुष्टती ॥७३॥
व्रत करणे असेल मनी । ते पुरुषा करावे पुसोनि । आत्मबुद्धी करिता कोणी । पति-आयुष्य उणे होय ॥७४॥
आणिक जाय नरकाप्रती । पति घेवोनि सांगाती । ऐसे बोलती वेदश्रुति । बृहस्पति सांगतसे ॥७५॥
पतीस क्रोधे उत्तर देती । श्वानयोनी जन्म पावती । जंबुक होवोनि भुंकती । ग्रामासन्निध येऊन ॥७६॥
नित्य नेम करणे नारी । पुरुष-उच्छिष्ट भोजन करी । पाद प्रक्षालोनि तीर्थधारी । घेवोनि तीर्थ जेवावे ॥७७॥
पति प्रत्यक्ष शंकर । काम्य होती मनोहर । पावे ती वैकुंठपुर । पतिसहित स्वर्गभुवना ॥७८॥
जावो नये वनभोजनासी । अथवा शेजारीगृहासी । इष्टसोयरे म्हणोनि हर्षी । प्रतिदिनी न जावे ॥७९॥
आपुला पुरुष दुर्बल किती । समर्थाची न करावी स्तुति । पति असता अनाचाररीती । आपण निंदा करू नये ॥८०॥
कैसा तरी आपुला पति । आपण करावी त्याची स्तुति । तोचि म्हणावा लक्ष्मीपति । एकभावे करोनिया ॥८१॥
सासूश्वशुर पुरुषांपुढे । नेटे बोलो नये गाढे । हासो नये त्यांपुढे । पति-आयुष्य उणे होय ॥८२॥
सासूश्वशुर त्यजून आपण । वेगळे असू म्हणे कवण । ऋक्षयोनी जन्मोन । अरण्यात हिंडेल ॥८३॥
पुरुष कोपे मारी जरी । मनी म्हणे हा मरो नारी । जन्म पावेल योनी व्याघ्री । महाघोर अरण्यात ॥८४॥
पर पुरुषाते नयनी पाहे । उपजता वरडोळी होय । पुरुषा वंचूनि विशेष खाय । ग्रामसूकर होय ती ॥८५॥
तोही जन्मी सोडोनि । उपजे वाघुळाचे योनी । आपुली विष्ठा आपण भक्षुनी । वृक्षावरी लोंबतसे ॥८६॥
पतिसंमुख निष्ठुर वचनी । उत्तर देती कोपोनि । उपजे मुकी होऊनि । सप्तजन्म दरिद्री ॥८७॥
पुरुष दुजी पत्नी करी । तिसी आपण वैर धरी । सप्त जन्मांवरी । दुर्भाग्यता होय अवधारा ॥८८॥
पुरुषावरी दुसरिया । दृष्टि ज्या करिती आवडिया । पतिता घरी जन्म पावोनिया । दुःखे सदा दारिद्र्य भोगिती ॥८९॥
पुरुष येता बाहेरुनी । संमुख जावे भामिनी । उदके पाद प्रक्षालुनी । विंझणा वारिजे श्रमहार ॥९०॥
पादसंवाहन भक्तीसी । मृदु वाक्य बोलिजे पतीसी । पुरुष होता संतोषी । त्रिमूर्ति संतोषती ॥९१॥
काय देती माता पिता । नंदी इष्टवर्ग बंधु भ्राता । इहपराची जोडी देता । पुरुष नारीचा देव जाण ॥९२॥
गुरु देव तीर्थे समस्ती । सर्व जाणावा आपुला पति । ऐसा निश्चय ज्यांच्या चित्ती । पतिव्रता त्याचि जाणा ॥९३॥
जीव असता शरीरासी । पवित्र होय समस्तांसी । जीव जाता क्षणे कैसी । कदा प्रेता नातळती ॥९४॥
तैसा पति प्राण आपला । पति नसता अशुचि तिला । या कारणे पतिच सकळा । प्राण आपुला जाणावा ॥९५॥
पति नसता स्त्रियेसी । सर्व अमंगळ परियेसी । विधवा म्हणजे प्रेतासरसी । अपत्य नसता अधिक जाण ॥९६॥
ग्रामास जाता परियेसी । विधवा भेटता संमुखेसी । मरण सांगे सत्य त्यासी । पुत्रासी अशुभ नव्हे जाणा ॥९७॥
माता विधवा असे जरी । पुत्रासी मंगळ शकुन करी । पुत्राविण विधवा नारी । नमन तिसी करू नये ॥९८॥
तिच्या आशीर्वादे आपण । मंगळ न होय सत्य जाण । तिचा हो का शाप मरण । तिसी कोणी बोलू नये ॥९९॥
या कारणे पतिव्रता । बरवे पुरुषासवे जाता । सर्व वैभव देहासहिता । केवी जाई परियेसा ॥१००॥
चंद्रासवे चांदणी जैसी । मेघासवे वीज कैसी । मावळता सवेचि जातसे । पतीसवे तैसे जावे ॥१॥
सहगमन करणे मुख्य जाण । थोर धर्मश्रुतीचे वचन । पूर्वज बेचाळीस उद्धरण । पतिव्रताधर्माने ॥२॥
पुरुष प्रेत झालियावरी । सहगमना जाता ते नारी । एकेक पाउली निर्धारी । अश्वमेघसहस्त्रपुण्य ॥३॥
पापी पुरुष असेल जाण । त्यासी आले जरी मरण । यमदूत नेती बांधून । नरकाप्रती परियेसा ॥४॥
पतिव्रता त्याची नारी । जरी सहगमन करी । जैसी सर्पासी नेती घारी । तैसी पतीते स्वर्गा नेई ॥५॥
सहगमन केलियावरी । पाहूनि यमदूत पळती दूरी । पतीसी सोडोनि सत्वरी । जाती यमदूत आपले पुरासी ॥६॥
पतिव्रताशिरोमणी । बैसविती विमानी । पावविती स्वर्गभुवनी । देवांगना ओवाळिती ॥७॥
यमदूत त्वरे पळती । काळाची न चाले ख्याती । पतिव्रता देखताचि चित्ती । भय वाटे म्हणताती ॥८॥
सूर्य भितो देखून तियेसी । तपतो तेजे मंदेसी । अग्नि भिउनी शांतीसी । उष्ण तिसी होऊ न शके ॥९॥
नक्षत्रे भिती पाहता तियेसी । आपुले स्थान घेईल ऐसी । जाय स्वर्गभुवनासी । पतीसहित परियेसा ॥११०॥
येणेपरी स्वर्गभुवनी । जाय नारी संतोषोनि । आपुले पतीस घेऊनि । राहे स्वर्गी निरंतर ॥११॥
तीन कोटि रोम तिसी । स्वदेह देता अग्नीसी । त्याची फळे असती कैशी । एकचित्ते ऐकावे ॥१२॥
एकेक रोम रोमासी । स्वर्गी राहे शतकोटि वर्षी । पुरुषासवे स्वानंदेसी । पतिव्रता राहे तेथे ॥१३॥
ऐसे पुण्य सहगमनासी । कन्या व्हावी ऐशी वंशी । बेचाळीस कुळे कैसी । घेऊन जाय स्वर्गाते ॥१४॥
धन्य तिची मातापिता । एकवीस कुळे उद्धरिता । धन्य पुरुषवंश ख्याता । बेचाळीस उद्धरिले ॥१५॥
ऐसे पुण्य सहगमनासी । पतिव्रतेच्या संगतीसी । आणिक सांगेन विस्तारेसी । देवगुरु म्हणतसे ॥१६॥
असेल नारी दुराचारी । अथवा व्याभिचारकर्म करी । त्याचे फळ अतिघोरी । एकचित्ते परियेसा ॥१७॥
उभय कुळे बेचाळिस । जरी असतील स्वर्गास । त्यासी घेउनि नरकास । प्रेमे जाय परियेसा ॥१८॥
अंगावरी रोम किती । तितुकी कोटि वर्षे ख्याती । नरकामध्ये पंचे निरुती । तिचे फळ ऐसे असे ॥१९॥
भूमिदेवी ऐसे म्हणे । पतिव्रतेच्या पवित्र चरणे । आपणावरी चालता क्षणे । पुनीत मी म्हणतसे ॥१२०॥
सूर्य चंद्र ऐसे म्हणती । आपली किरणे ज्योती । जरी पतिव्रतेवरी पडती । तरी आपण पावन होऊ ॥२१॥
वायु आणि वरुण । पतिव्रतेचिया स्पर्शाकारणे । पावन होऊ म्हणोन । स्पर्शे पुनीत होती ते ॥२२॥
घरोघरी स्त्रिया असती । काय करावी लावण्यसंपत्ति । जिचेनि वंश उद्धरती । तैसी स्त्री असावी की ॥२३॥
ज्याचे घरी पतिव्रता । दैवे आगळा तो तत्त्वता । करावे सुकृत जन्मशता । तरीच लाभे तैशी सती ॥२४॥
चतुर्विध पुरुषार्थ देखा । स्त्रियेच्या संगती लाघे लोका । पतिव्रता सती अधिका । पुण्यानुसार लाभे जना ॥२५॥
ज्याचे घरी नाही सती । पुण्ये त्यासी काही न घडती । यज्ञादि कर्मे ख्याति । सती असता होती जाण ॥२६॥
सती नसे ज्याचे घरी । त्यासी अरण्य नाही दूरी । वृथा जन्मोनि संसारी । कर्मबाह्य तोचि जाणा ॥२७॥
ऐसी सती मिळे ज्यासी । समस्त पुण्य होय त्यासी । पुत्रसंतान परलोकासी । साधन होय सतीचेनि ॥२८॥
स्त्रियेवीण असेल नर । तयासी न साधे कर्माचार । कर्महीन देव पितर । कर्मार्ह नव्हे कदा ॥२९॥
पुण्य जोडे गंगास्नानी । त्याहूनि पतिव्रतादर्शनी । महापापी होय पावन । सप्त जन्म पुनीत ॥१३०॥
पतिव्रतेचा आचार । सांगे पतिव्रतेसी योगेश्वर । म्हणे सरस्वतीगंगाधर । सांगे बृहस्पति देवगुरु ॥३१॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । गुरुचरित्र पुण्यराशी । ऐकता पावती सद्गतीसी । म्हणे सरस्वतीगंगाधर ॥३२॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । पतिव्रतानिरूपण विख्यात । ऐकता होय पुनीत । जे जे चिंतिले पाविजे ॥३३॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे पतिव्रताख्यानं नाम एकत्रिंशोऽध्यायः ॥३१॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या १३३)

श्रीगणेशाय नमः ।
पतिव्रतेचिया रिति । सांगे देवा बृहस्पति । सहगमनी फलश्रुति । येणेपरी निरोपिली ॥१॥
विधवापणाचा आचारू । सांगता झाला देववरू । पुसताती ऋषेश्वरू । ऐका श्रोते एकचित्ते ॥२॥
जवळी नसता आपुला पति । त्याते मरण झालिया प्राप्ति । काय करावे त्याचे सती । सहगमन केवी करावे ॥३॥
अथवा असेल गरोदरी । असे तीते कन्याकुमरी । काय करावे तिये नारी । म्हणून विनविती गुरूसी ॥४॥
ऐकोनि देवांचे वचन । सांगता जाला विस्तारोन । एकचित्ते करून । ऐका श्रोते सकळ ॥५॥
पति जवळी असे जरी । सहगमनी जावे तिये नारी । असता आपण गरोदरी । करू नये सहगमन ॥६॥
स्तनपानी असता कुमारू । तिणे करिता पाप थोरू । पुरुष मेला असेल दुरू । सहगमन करू नये ॥७॥
तिणे असावे विधवापणे । विधिपूर्वक आचरणे । सहगमासमाने । असे पुण्य परियेसा ॥८॥
विधवापणाचा आचारू । करिता असे पुण्य थोरू । निवर्तता आपुला भ्रतारू । केशवपन करावे ॥९॥
ज्या का विधवा केश राखिती । त्यांची ऐका फलश्रुति । केश पुरुषासी बाधिती । नरकापरी परियेसा ॥१०॥
यास्तव करणे केशवपण । करावे तिणे नित्य स्नान । एक वेळा भोजन । करावे तिणे परियेसा ॥११॥
एक धान्याचे अन्न । करावे तिणे भोजन । तीन दिवस उपोषण । करावे तिणे भक्तीने ॥१२॥
पाच दिवस पक्षमासास । करावा तिणे उपवास । अथवा चांद्रायणग्रास । भोजन करणे परियेसा ॥१३॥
चंद्रोदय बीजेसी । एक ग्रास तया दिवसी । चढते घ्यावे पंधरा दिवसी । पौर्णिमेसी भोजन ॥१४॥
कृष्णपक्षी येणेपरी । ग्रास घ्यावे उतरत नारी । अमावास्या येता जरी । एक ग्रास जेवावा ॥१५॥
शक्ति नाही जियेसी । एकान्न जेवावे परियेसी । अथवा फल-आहारेसी । अथवा शाका-आहार देखा ॥१६॥
अथवा घ्यावे क्षीर मात्र । कधी न घ्यावे अपवित्र । जेणे राहे प्राण मात्र । श्वासोच्छ्वास चाले ऐसे ॥१७॥
शयन करिता मंचकावरी । पुरुष घाली रौरव घोरी । भोगी नरक निरंतरी । पतीसहित परियेसा ॥१८॥
करू नये मंगलस्नान । अथवा देहमर्दन । गंध परिमल तांबूल जाण । पुष्पादि तिणे वर्जावे ॥१९॥
पुत्रावीण असे नारी । करणे तर्पण पुत्रापरी । तीळ दर्भ कुशधारी । गोत्रनाम उच्चारावे ॥२०॥
विष्णुपूजा करावी नित्य । आपुला पुरुष हा निश्चित । पुरुष आठवोनि चित्त । विष्णुस्थानी मानिजे ॥२१॥
पुरुष असता जेणेपरी । पतिनिरोपे आचार करी । तेणेचि रीती विष्णु अवधारी । त्यांचे निरोपे आचरावे ॥२२॥
तीर्थयात्रा उपासव्रत । विष्णुनिरोपे करावे निश्चित । अथवा गुरु द्विज विख्यात । त्यांचे निरोपे आचरावे ॥२३॥
आपण असता सुवासिनी । ज्या वस्तूची प्रीति अंतःकरणी । तैशी वस्तु द्यावी धणी । विद्वज्जनविप्रांसी ॥२४॥
वैशाख माघ कार्तिकमास । अनेक स्नानी आचारविशेष । माघस्नान तीर्थास । विष्णुस्मरणे करावे ॥२५॥
वैशाखी जळकुंभदान । कार्तिकी दीपआराधन । ब्राह्मणा द्यावे घृतदान । यथाशक्त्या दक्षिणेसी ॥२६॥
माघमासी तिळघृतेसी । द्यावे दान विप्रांसी । अरण्यात वैशाखमासी । पोई घालिजे निर्मळोदके ॥२७॥
शिवालयी ईश्वरावरी । गळती ठेविजे निर्मळ वारी । गंध परिमळ पूजा करी । तेणे पुण्य अगाध ॥२८॥
विप्राचिया घरोघरी । उदक घालिजे शक्त्यानुसारी । अन्न द्यावे निर्धारी । अतिथिकाळी परियेसा ॥२९॥
तीर्थयात्रे जात्या लोका । त्याते द्याव्या छत्रपादुका । येता आपल्या गृहांतिका । पादप्रक्षालन करावे ॥३०॥
वारा घालावा विझणेसी । वस्त्र द्यावे परिधानासी । गंध तांबूल परिमळासी । कर्पूरवेलादि परियेसा ॥३१॥
जलपात्र द्यावे शक्तीसी । गुडपान आम्रपानेसी । द्राक्षे कर्दळीफळेसी । ब्राह्मणा द्यावे मनोहर ॥३२॥
जे जे दान द्यावे द्विजा । पतीच्या नावे अर्पिजे वोजा । संकल्पून पुरुषकाजा । धर्म करणे येणेपरी ॥३३॥
कार्तिकमासी जवान्न । अथवा जेविजे एकान्न । वृताक माष मसूर लवण । तैलादि मधु वर्जावे ॥३४॥
वर्जावे कास्यपात्र । आणिक वर्जावे द्विदलमात्र । मनी असावे पवित्र । एकाग्रेसी परियेसा ॥३५॥
पलाशपात्री भोजन करावे । शुचि उद्यापन करावे । जे जे व्रत धराते । त्याते उजवावे तत्त्वता ॥३६॥
घृतभरित कास्यपात्र । विप्रा द्यावे पवित्र । भूमिशयन केले व्रत । मंचक द्यावा विप्रासी ॥३७॥
जे जे वस्तु त्यजिली आपण । ते ते द्यावी ब्राह्मणालागून । रसद्रव्ये एक मास जाण । त्याग करावी परियेसा ॥३८॥
त्यजूनिया दधि क्षीर । उद्यापन आचार मनोहर । असलिया शक्त्यनुसार । धेनु द्यावी सालंकृत ॥३९॥
विशेषे असे आणिक व्रत । दीपदान असे ख्यात । वर्णिता महिमा अनंत । देवांसी म्हणे बृहस्पति ॥४०॥
दीपदान भाग सोळा । वरकड नसती धर्म सकळा । या कारणे अनंतफळा । दीपदान करावे ॥४१॥
माघस्नान माघमासी । करणे सूर्योदयासी । येणेपरी एक मासी । आचरावे भक्तीने ॥४२॥
लाडू तिळ खर्जुरेसी । करूनि पक्वान्ने ब्राह्मणांसी । द्यावी तिणे भक्तीसी । दक्षिणेसहित जाणा ॥४३॥
शर्करा मिरे एळेसी । तळून अपूप घृतेसी । दान द्यावे यतीसी । भोजन द्यावे अतीता ॥४४॥
हेमंतऋतु होता जाण । व्हावया शीतनिवारण । काष्ठे द्यावी विप्राकारणे । वस्त्रे द्यावी द्विजांसी ॥४५॥
पर्यंक द्यावा सुषुप्तीसी । एखाद्या भल्या ब्राह्मणासी । चित्र रक्त वस्त्रेसी । कंबळ द्यावे विप्रवर्गा ॥४६॥
व्हावया शीतनिवारण । औषध द्यावे उष्ण उष्ण । तांबूलदान परिपूर्ण । द्यावे एळाकर्पूरेसी ॥४७॥
गृहदान द्यावे विप्रासी । सांवत्सरिक ग्रामेसी । जाता तीर्थयात्रेसी । पादरक्षा देईजे ॥४८॥
गंध परिमळ पुष्पेसी । पूजा करावी केशवासी । रुद्राभिषेक विधींसी । अभिषेकावा गौरीहर ॥४९॥
धूप दीप नैवेद्यसी । पूजा करावी षोडशी । प्रीति बहु शंकरासी । दीपमाळा उजळिता ॥५०॥
आणिक सुगंध गंधेसी । तांबूलदान विधींसी । कर्पूरलवंगादि विविधेसी । भक्तिभावे अर्पिजे ॥५१॥
आपला पुरुष ध्यावोनि मनी । नारायण तो म्हणोनि । पूजा करावी एके मनी । भक्तिभावे परियेसा ॥५२॥
नेमे असावे तिये नारी । न बैसावे बैलावरी । लेवू नये चोळी करी । श्वेतवस्त्र नेसावे ॥५३॥
रक्त कृष्ण चित्र वस्त्र । लेता जाण दोष बहुत । आणिक असे व्रत । पुत्राचे बोल वर्तावे ॥५४॥
'आत्मा वै पुत्र नाम' । म्हणून बोलती वेदागम । पतीपासून पुत्रजन्म । पुत्रआज्ञेत असावे ॥५५॥
ऐसा आचार विधवेसी । असे शास्त्रपुराणेसी । जरी आचरती भक्तीसी । सहगमनाचे फळ असे ॥५६॥
पापी जरी पति असला । असेल पूर्वी निवर्तला । नरकामध्ये वास्त केला । पापरूपे भुंजत ॥५७॥
विधवापणे येणेपरी । आचरण करी जे नारी । मरण होता अवसरी । घेवोनि पति स्वर्गी जाय ॥५८॥
जितुक्या परी बृहस्पति । सांगे समस्त देवांप्रती । लोपामुद्रेची केली स्तुति । पतिव्रताशिरोमणि ॥५९॥
जितुक्या पतिव्रता नारी । समस्त भागीरथी सरी । त्यांचे पुरुष शंकरापरी । पूजा करावी दोघांची ॥६०॥
ऐसे बृहस्पतीचे वचन । सांगितले मनी विस्तारोन । ऐक बाळे तव मन । ज्यावरी प्रीति तेचि करी ॥६१॥
दुःख सकळ त्यजोनि । मम बोल ठेवी मनी । सांगितले तुजलागोनि । परलोकसाधन ॥६२॥
धैर्य जरी असेल तुजसी । सहगमन करी पतीसरसी । विधवापणे आचार करिसी । तेही पुण्य तितुकेची ॥६३॥
जे आवड तुझे मनी । सांग माये विस्तारोनि । हस्त मस्तकी ठेवूनि । पुसतसे प्रेमभावे ॥६४॥
ऐकोनि तया अवसरी । केले नमन तिये नारी । विनवीतसे करुणोत्तरी । भक्तिभावे करूनिया ॥६५॥
जय जयाजी योगीश्वरा । तूचि पिता सहोदरा । माझा प्राण मनोहरा । जनक जननी तूचि होसी ॥६६॥
आल्ये आपण परदेशात । जवळी नाही बंधुभ्रात । भेटलेती तुम्ही परमार्थ । अंतकाळी सोयरा ॥६७॥
सांगितले तुम्ही आचार दोनी । कष्ट बहु विधवापणी । अशक्य आम्हा न-टाके स्वामी । असाधारण असे दातारा ॥६८॥
तारुण्यपण मजसी । लावण्य असे देहासी । निंदापवाद शरीरासी । घडेल केवी वर्तमान ॥६९॥

म्हणूनि मागुती नमस्कारी । माथा ठेवी चरणांवरी । स्वामी माते तारी तारी । भवसागरी बुडतसे ॥७१॥
करुणाकृपेचा सागर । उठवीतसे योगेश्वर । देता झाला अभयकर । म्हणे पतीसवे जावे ॥७२॥
तोचि ठाव पुरुषासी । जाय माते सांगतेसी । सांगेन तुज विशेषी । ऐक माते एकचित्ते ॥७३॥
आलात तुम्ही दर्शनी । श्रीगुरुभेटीलागोनि । आरोग्य होईल म्हणोनि । भक्तिभावेकरूनिया ॥७४॥
होणार झाली ब्रह्मकरणी । काळासी जिंकिले नाही कोणी । जैशी ईश्वरनिर्वाणी । तैसेपरी होतसे ॥७५॥
ब्रह्मलिखित न चुके जाण । जे जे भोगणे असेल आपण । घडे तैसे श्रुतिवचन । दुःख कोणी करू नये ॥७६॥
हरिश्चंद्र राजा देख । डोंबाघरी वाहे उदका । बळी अजिंक्य ऐका । तोही गेला पाताळा ॥७७॥
सहस्त्रकोटि वर्षे ज्यासी । आयुष्य असे रावणासी । काळ तयाप्रति ग्रासी । दुर्योदह्ना काय झाले ॥७८॥
भीष्मदेव इच्छारमनी । तेही पडले रणांगणी । परीक्षिती सर्पाभेणी । लपता काय झाले तया ॥७९॥
अनंत अवतार येणेपरी । होऊनि गेले संसारी । देव दानव येणेपरी । सकळ काळाआधीन ॥८०॥
या कारणे काळासी । कोणी जिंकिले नाही क्षितीसी । सकळ देवदानवांसी । काळ जिंकी निधरि ॥८१॥
काळा जिंकिता नाही कोणी । एका श्रीगुरुवाचोनि । भाव असे ज्याचे मनी । त्यासी प्रत्यक्ष असे जाणा ॥८२॥
आता तुम्ही ऐसे करणे । जावे त्वरित सहगमने । अंतकाळ होता क्षणे । श्रीगुरुदर्शना जाय म्हणे ॥८३॥
म्हणोनि भस्म तये वेळी । लाविता झाला कपाळी । रुद्राक्ष चारी तत्काळी । देता जहाला तये वेळी ॥८४॥
योगी बोले तियेसी । रुद्राक्ष बांधी कंठासी । दोनी प्रेतकर्णासी । बांधोनि दहन करावे ॥८५॥
आणिक एक सांगेन तुज । गुरुदर्शना जाई सहज । रुद्रसूक्त म्हणती द्विज । गुरुचरण प्रक्षाळिता ॥८६॥
तेचि तीर्थ घेवोनि । आपुला देह प्रोक्षोनि । प्रेतावरी आणोनि । प्रोक्षण करावे भक्तीने ॥८७॥
मग जावे सहगमनेसी । वाणे द्यावी सुवासिनींसी । अनेक द्रव्ये वेचूनि हर्षी । विप्रा तोषवावे बहुत ॥८८॥
ऐशा परी तियेसी । सांगोनि गेला तापसी । पतिव्रता भावेसी । करी आयती त्या वेळी ॥८९॥
भले ब्राह्मण बोलावूनि । षोडश कर्मे आचरोनि । प्रेतासी प्रायश्चित्त देवोनि । औपासन करविताती ॥९०॥
सुस्नात होवोनि आपण । पीतांबर नेसोन । सर्वाभरणे लेवोन । हळदी कुंकू लावितसे ॥९१॥
औपासन प्रेतासी । करविताती विधींसी । प्रेत बांधोनि काष्ठेसी । घेवोनि गेले गंगेत ॥९२॥
अग्नि घेऊनि तळहातेसी । निघाली पतिव्रता कैसी । आनंद बहु मानसी । प्रेतापुढे जातसे ॥९३॥
सोळा वरुषांचे तारुण्यपण । सुंदर रुप लावण्य । ल्याइलीसे आभरणे । लक्ष्मीसरसी दिसतसे ॥९४॥
मिळोनिया नगरनारी । पाहो आल्या सहस्त्र चारी । माथा तुकविती सकळी । पतिव्रता म्हणोनिया ॥९५॥
एक म्हणती काय नवल । पूर्ववयेसी असे बाळ । काय दैव पूर्वफळ । पतीसवे जातसे ॥९६॥
देखिले नाही पतीचे मुख । नाही जहाले की बाळक । कैसा जीव झाला एक । आनंदरूपे जातसे ॥९७॥
म्हणती शिकवा इसी । वाया का हो जीव देसी । परतूनि जाई माहेरासी । आपुल्या मातापित्याजवळी ॥९८॥
एक म्हणती ज्ञानवंता । सत्य नारी पतिव्रता । बुद्धि दे गा जगन्नाथा । सकळ स्त्रिया ऐसीच ॥९९॥
धन्य इची मातापिता । बेचाळीस उद्धरले आता । प्रेतापुढे चालता । एकैक पाउला अश्वमेधफळ ॥१००॥
येणेपरी नदीतीरासी । गेली नारी पतीसरसी । कुंड केले अग्नीसी । काष्ठे शेणी अपरिमित ॥१॥
अग्निकुंडसन्निधेसी । ठेविले तया प्रेतासी । बोलावोनि सुवासिनींसी । देई झाली वाण देखा ॥२॥
सुपे चोळी कुंकुमेसी । हळदी काजळ परियेसी । तोडर कंठसूत्रेसी । सुवासिनींसी देतसे ॥३॥
गंधपुष्पादि परिमळेसी । पूजा केली सुवासिनींसी । द्रव्य दिधले अपारेसी । समस्त ब्राह्मणा तये वेळी ॥४॥
नमन करोनि समस्तांसी । निरोप मागतसे हर्षी आपण जाते माहेरासी । लोभ असो द्यावा म्हणतसे ॥५॥
माझा पिता शूलपाणी । उमा गौरी अंतःकरणी । आम्हा बोलाविले सगुणी । प्रेमभावे करूनिया ॥६॥
आली श्रावणी दिपवाळी । आम्ही जातो मातेजवळी । पतीसहित मने निर्मळी । जाते लोभ असो द्यावा ॥७॥
समागमे लोक आपुले । होते जे का सवे आले । त्यांसी सांगतसे बाळे । परतोनि जावे ग्रामासी ॥८॥
पुसता श्वशुरमामेसी । त्याते न सांगावे परियेसी । प्राण देतील आम्हांसी । हत्या तुम्हा घडेल ॥९॥
त्यासी तुम्ही सांगावे ऐसे । क्षेम आहे तीर्थवासे । भीमातीरस्थान ऐसे । श्रीगुरूचे सन्निधानी ॥११०॥
आलो श्रीगुरुदर्शनासी । आरोग्य झाले पतीसी । राहिलो आपण संतोषी । म्हणोनि सांगा घरी आमुचे ॥११॥
ऐसे सांगा श्वशुरमामींसी । आमुचे मातापितयादिकांसी । इष्टजन सोयरियांसी । सांगा येणेपरी तुम्ही ॥१२॥
ऐसे वचन ऐकोन । दुःख पावले सकळ जन । आपण असे हास्यवदन । प्रेताजवळी उभी देखा ॥१३॥
अग्निकुंडी तये क्षणी । घालिताती काष्ठ शेणी । तो आठवण झाली झणी । योगेश्वराचा उपदेश ॥१४॥
मग रुद्राक्ष काढोनिया दोनी । बांधिले प्रेताचिया श्रवणी । कंठसूत्री दोन ठेवोनि । पुसतसे ब्राह्मणांसी ॥१५॥
विनवीतसे द्विजांसी । संकल्प केला म्या मानसी । श्रीगुरुमूर्ति आहे कैसी । आपल्या दृष्टी पाहीन ॥१६॥
दृष्टी देखोनिया स्वामीसी । त्वरित येईन अग्निकुंडापासी । आज्ञा झालिया वेगेसी । त्वरित येईन म्हणतसे ॥१७॥
ऐकोनि तियेचे वचन । बोलताती विद्वज्जन । दहन होता अस्तमान । त्वरित जाउनी तुम्ही यावे ॥१८॥
पुसोनिया विप्रांसी । निघाली नारी संगमासी । जेथे होता हृषीकेशी । श्रीनरसिंहसरस्वती ॥१९॥
सर्व येती नरनारी । विप्रमेळा नानापरी । कौतुक पाहती मनोहरी । पतिव्रता स्त्रियेची ॥१२०॥
जाता मार्गी स्तोत्र करी । म्हणे स्वामी नरकेसरी । अभाग्य आपुले पूर्वापरी । म्हणोनि आम्हा अव्हेरिले ॥२१॥
तूचि दाता सर्वेश्वर । शरणागतांचा आधार । ऐसे तुझे ब्रीद थोर । कामी आपण न लाधेची ॥२२॥
हेळामात्रे त्रिभुवनासी । रची स्वामी रजोगुणे सृष्टीसी । सत्त्वगुणे सृष्टीसी । प्रतिपाळिसी तूचि स्वामी ॥२३॥
तमोगुणे निश्चयेसी । प्रलय समस्त जीवांसी । त्रिगुण तूचि होसी । त्रिमूर्ति तूचि देवा ॥२४॥
तुजपाशी सर्व सिद्धि । ओळंघिती तव विधी । देखिली आमुची कुडी बुद्धि । जाणोनि माते अव्हेरिली ॥२५॥
एखादा नर बाधा करी । जाणोनि सांगती राजद्वारी । क्षण न लागता अवसरी । राजा साह्य करी तयांचे ॥२६॥
रोग होता मनुष्यासी । जाऊनिया वैद्यापासी । औषध करी तात्काळेसी । आरोग्य तया होतसे ॥२७॥
तू त्रिमूर्तीचा अवतार । ख्याति झाली अपरंपार । सर्व भक्तजना आधार । म्हणोनि सेविती सकळ जन ॥२८॥
अपराध आपण काय केले । भेटीसी वीस गावे आले । मातापिता विसरले । तुझ्या ध्याने स्वामिया ॥२९॥
होसी तूचि मातापिता । म्हणोनि आल्ये धावता । भेटी होता आरोग्यता । पतीस व्हावी म्हणोनिया ॥१३०॥
आपुले समान असती नारी । त्या नांदता पुत्रपौत्री । आपण झाल्ये दगडापरी । पुत्र नाही आपणासी ॥३१॥
पति आपुला सदा रोगी । कैचा पुत्र आपणालागी । तरी याचि काम्यालागी । निघोनि आल्ये स्वामिया ॥३२॥
आरोग्य होईल पतीसी । पुत्र होतील आपणासी । आशा धरून मानसी । आल्ये स्वामी कृपासिंधु ॥३३॥
पुरले माझे मनोरथ । आरोग्य झाला प्राणनाथ । पुत्र झाले बहुत । नवल झाले स्वामिया ॥३४॥
मनोरथ पावला सिद्धीसी । म्हणोनि आल्ये पुसावयासी । जाते आता परलोकासी । कीर्ति तुझी घेवोनि ॥३५॥
ऐशा परी ध्यान करीत । आली अमरजासंगमी त्वरित । वृक्ष असे अश्वत्थ । देखती झाली स्वामिया ॥३६॥
उभी ठाकोनिया दुरी । तया साष्टांग नमन करी । श्रीगुरु म्हणे त्या अवसरी । सुवासिनी होय ध्रुव ॥३७॥
ऐसे म्हणता मागुती । नमन करी एकभक्ती । पुनरपि स्वामी तेणेच रीती । अष्टपुत्रा होय म्हणतसे ॥३८॥
ऐसे ऐकोनिया वचन । हास्य करिती सकळ जन । सांगताती विस्तारोन । गुरूलागी सत्वर ॥३९॥
विप्र म्हणती स्वामीसी । इचा पति पंचत्वासी । पावला परंधामासी । सुवासिनी केवी होय ॥४०॥

तुमचा निरोप घेवोनि । अग्निकुंडा जावोनि । समागमे पतिशयनी । दहन करणे तियेसी ॥४२॥
ऐकोनि त्याचे वचन । श्रीगुरु म्हणती हासोन । इचे स्थिर अहेवपण । मरण केवी घडे इसी ॥४३॥
गुरु म्हणती जा वेळी । आणा प्रेत आम्हाजवळी । प्राण गेला कवणे वेळी । पाहू म्हणती अवधारा ॥४४॥
श्रीगुरु म्हणती द्विजांसी । आमुचे बोल जहाले इसी । अहेवपण स्थिर इसी । संदेह न धरावा मनात ॥४५॥
या बोलाचा निर्धारू । करील आता कर्पूरगौरू । नका प्रेत संस्कारू । आणा प्रेत आम्हांजवळी ॥४६॥
श्रीगुरूचा निरोप होता । आणो गेले धावत प्रेता । पहाती लोक कौतुका । अभिनव म्हणताती ॥४७॥
इतुके होता ते अवसरी । आले विप्र तेथवरी । पूजा करिती मनोहरी । श्रीगुरुची भक्तीने ॥४८॥
रुद्रसूक्त म्हणोनि । अभिषेक करिती श्रीगुरुचरणी । षोडशोपचारी विस्तारोनि । पूजा करिती भक्तीने ॥४९॥
तीर्थपूजा नानापरी । पूजा करिती उपचारी । इतुकीया अवसरी । घेउनी आले प्रेतासी ॥१५०॥
प्रेत आणोनिया देखा । ठेविले श्रीगुरुसंमुखा । श्रीगुरु म्हणती विप्रलोका । सोडा वस्त्र दोर त्याचे ॥५१॥
चरणतीर्थ त्यावेळी । देती तया विप्रांजवळी । प्रोक्षा म्हणती तात्काळी । प्रेत सर्वांगी स्नपन करा ॥५२॥
श्रीगुरुनिरोपे ब्राह्मण । प्रेतासी करिती तीर्थस्नपन । अमृतदृष्टीसी आपण । पाहती प्रेत अवधारा ॥५३॥
पाहता सुधादृष्टीकरून । प्रेत झाले संजीवन । उठोनि बैसे तत्क्षण । अंग मुरडीत परियेसा ॥५४॥
नग्न म्हणुनी लाजत । प्रेत झाले सावचित्त । नवे वस्त्र नेसत । येवोनि बैसे एकीकडे ॥५५॥
बोलावोनि स्त्रियेसी । पुसतसे विस्तारेसी । कोठे आणिले मजसी । यतीश्वर कोण सांगे ॥५६॥
इतुके लोक असता का । का वो तू न करसी चेता । निद्रा आली मदोन्मत्ता । म्हणोनि सांगे स्त्रियेसी ॥५७॥
ऐकून पतीचे वचन । सांगती झाली विस्तारून । उभी राहून दोघेजण । नमन करिती श्रीगुरूसी ॥५८॥
चरणी माथा ठेवून । स्तोत्र करिती दोघेजण । पहाती लोक सर्व जन । महा आनंद प्रवर्तला ॥५९॥
म्हणती पापरूपी आपण । पाप केले दारुण । पापापासाव अनुसंधान । जन्म जहालो परियेसी ॥१६०॥
दुर्बुद्धीने वर्तलो । पापसागरी बुडालो । तुझे चरण विसरलो । त्रयमूर्ती जगद्गुरु ॥६१॥
सकळ जीवमात्रांसी । रक्षिता शंकर तू होसी । ख्याति तव त्रिभुवनासी । शरणागता रक्षिसी ॥६२॥
त्राहि त्राहि जगद्गुरु । विश्वमूर्ति परात्परु । ब्रह्मा विष्णु शंकरु । सच्चिदानंदस्वरूप तू ॥६३॥
त्राहि त्राहि विश्वकर्ता । त्राहि त्राहि जगद्धर्ता । कृपासागरा जगन्नाथा । भक्तजनविश्रामा ॥६४॥
जय जयाजी गुरुमूर्ति । जटाजूट पशुपति । अवतरलासी तू क्षिती । मनुष्यदेह धरूनिया ॥६५॥
त्राहि त्राहि पिनाकपाणि । त्राहि देवा तू शिरोमणि । भक्तजन पाळोनि । रक्षितोसी निरंतर ॥६६॥
सर्वा भूती तूचि वससी । नमन तुझे चरणांसी । मज ऐसे गमलासी । मातारूप वर्तत तू ॥६७॥
त्रिभुवनी तव करणी । माथा ठेविला तुझे चरणी । निश्चय केला माझे मनी । पुनर्जन्म नव्हे आता ॥६८॥
विश्वकारण करिसी । हेळामात्रे सृष्टि रचिसी । मज ऐसे गमलासी । अज्ञानरूपे वर्तत ॥६९॥
तुझे न ऐके एखादा जरी । कोपसी त्वरित त्यावरी । माझे मनी येणेपरी । निष्कलंक तू दिसतोसी ॥१७०॥
क्रोध नाही तुझे मनी । आनंदमूर्ति तूचि सहस्त्रगुणी । भक्तजना संरक्षणी । कृपासागर स्वामिया ॥७१॥
जीवमात्रा कृपा करिसी । शरणागताते रक्षिसी । इहपर सौख्याते देसी । चतुर्विध पुरुषार्थ ॥७२॥
तूचि करुणेचा सागरू । चिन्मात्रा अगोचरू । श्रीनरसिंहसरस्वती गुरु । क्षमा करणे स्वामिया ॥७३॥
ऐसी नानापरीसी । स्तोत्रे केली श्रीगुरूसी । श्रीगुरुमूर्ति संतोषी । आश्वासिती तये वेळी ॥७४॥
अष्ट पुत्र पूर्णायुषी । होतील सत्य तुजसी । हो का श्रीमंत अतिहर्षी । गेले तुमचे पूर्वदोष ॥७५॥
चतुर्विध पुरुषार्थ । लभ्य झाले तुम्हांसी यथार्थ । सांडोनि संदेह त्वरित । सुखे असा म्हणती गुरु ॥७६॥
इतुके होता ते अवसरी । मिळाल्या होत्या नरनारी । जयजयकार अपरंपारी । प्रवर्तला तये वेळी ॥७७॥
नमन करिती सकळ जन । स्तोत्र करिताती गायन । करिताती नीरांजन । जयजयकार प्रवर्तला ॥७८॥
तयामध्ये विप्र एक । होता धूर्त कुबुद्धिक । आपुले मनी आणोनि तर्क । श्रीगुरूसी पुसतसे ॥७९॥
विप्र म्हणे श्रीगुरूसी । विनंती स्वामी परियेसी । संशय आमुचे मानसी । होत आहे स्वामिया ॥१८०॥
वेदशास्त्रे पुराणे । बोलताती सनातने । ब्रह्मलिखित सत्य जाणे । म्हणोनि वाक्य निर्धारी पा ॥८१॥
घडला नाही अपमृत्यु यासी । दिवामरण परियेसी । आला कैसा जीव यासी । ब्रह्मलिखित सत्य मिथ्या ॥८२॥
न कळे याच्या अभिप्राया । निरोपावे गुरुराया । गुरु म्हणती हासोनिया । तया मूर्ख ब्राह्मणासी ॥८३॥
गुरु म्हणती तयासी । सांगेन तुज विस्तारेसी । पुढील जन्माच्या आयुष्यासी । उसने घेतले परियेसा ॥८४॥
आम्ही तया बह्मदेवासी । मागून घेतले करुणेसी । पुढले जन्मी परियेसी । वर्षे तीस संख्या पै ॥८५॥
भक्तजन रक्षावयासी । मागून घेतले ब्रह्मदेवासी । म्हणून सांगती विस्तारेसी । तया विप्रवर्गाते ॥८६॥
तटस्थ झाले सकळ जन । साष्टांग करिती नमन । गेले आपुलिया भुवना । ख्याति झाली चहू राष्ट्रा ॥८७॥
पतिव्रतेने पतीसहित । स्नान केले संगमात । अंतःकरणी संतोष बहुत । पूजा करिती भक्तीसी ॥८८॥
अपार द्रव्य वेचोनि । विप्र तोषवोनि आराधनी । सूर्य जाता अस्तमानी । येती गुरूच्या मठासी ॥८९॥
स्त्रीपुरुष नमस्कार । करिताती वारंवार । पूजासामग्री उपचार । आरती करिती श्रीगुरूसी ॥१९०॥
सिद्ध म्हणे नामधारका । पुढे अपूर्व वर्तले ते ऐका । कथा असे अपूर्व देखा । सांगेन ऐका एकचित्ते ॥९१॥
म्हणे सरस्वतीगंगाधर । सांगे गुरुचरित्र विस्तार । ऐकता पावन मनोहर । सकळाभीष्टे पावती ॥९२॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । उठविले विप्राचे प्रेत । सौभाग्य देवोनि अद्भुत । परम तयासी तोषविले ॥१९३॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ । श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे प्रेतसंजीवनं नाम द्वात्रिंशोऽध्यायः ॥३२॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओवीसंख्या १९३)

श्रीगणेशाय नमः ।
नामधारक शिष्यराणा । लागे सिद्धाचिया चरणा । विनवीतसे भाकूनि करुणा । भक्तिभावेकरोनि ॥१॥
म्हणे स्वामी सिद्धमुनि । पूर्वकथानुसंधानी । पतीसह सुवासिनी । आली श्रीगुरुसमागमे ॥२॥
श्रीगुरु आले मठासी । पुढे कथा वर्तली कैसी । विस्तारोनि कृपेसी । निरोपावी स्वामिया ॥३॥
सिद्ध म्हणे ऐक बाळा । दुजे दिनी प्रातःकाळी । दंपत्ये दोघे गुरूजवळी । येवोन बैसती वंदोन ॥४॥
विनविताती कर जोडोनि । आम्हा शोक घडल्या दिनी । एके यतीने येवोनि । बुद्धिवाद सांगितला ॥५॥
रुद्राक्ष चारी आम्हासी । देता बोलिला परियेसी । कानी बांधोनि प्रेतासी । दहन करा म्हणितले ॥६॥
आणिक एक बोलिले । रुद्रसूक्त असे भले । अभिषेकिती विप्रकुळे । ते तीर्थ आणावे ॥७॥
आणोनिया प्रेतावरी । प्रोक्षा तुम्ही भावे करी । दर्शना जावे सत्वरी । श्रीनृसिंहसरस्वती स्वामीचे ॥८॥
ऐसे सांगोनि आम्हांसी । आपण गेला परियेसी । रुद्राक्ष राहिले मजपासी । पतिश्रवणी स्वामिया ॥९॥
ऐकोनि तियेचे वचन । श्रीगुरु सांगती हासोन । रुद्राक्ष दिल्हे आम्ही जाण । तव भक्ति देखोनिया ॥१०॥
भक्ति अथवा अभक्तीसी । रुद्राक्ष धारण करणारासी । पापे न लागती परियेसी । उंच अथवा नीचाते ॥११॥
रुद्राक्षांचा महिमा । सांगितला अनुपमा । सांगेन विस्तारून तुम्हा । एकचित्ते परियेसा ॥१२॥
रुद्राक्षधारणे पुण्य । मिति नाही अगण्य । आणिक नाही देवास मान्य । श्रुतिसंमत परियेसा ॥१३॥
सहस्त्रसंख्या जो नर । रुद्राक्षमाळा करी हार । स्वरूपे होय तोचि रुद्र । समस्त देव वंदिती ॥१४॥
सहस्त्र जरी न साधती । दोही बाही षोडशती । शिखेसी एक ख्याति । चतुर्विंशति दोही करी ॥१५॥
कंठी बांधा बत्तीस । मस्तकी बांधा चत्वारिंश । श्रवणद्वयी द्वादश । धारण करावे परियेसा ॥१६॥
कंठी अष्टोत्तरशत एक । माळा करा सुरेख । रुद्रपुत्रसमान ऐक । येणे विधी धारण केलिया ॥१७॥
मोती पोवळी स्फटिकेसी । रौप्य वैडूर्ये सुवर्णेसी । मिळोनि रुद्राक्षमाळेसी । करावे धारण परियेसा ॥१८॥
याचे फळ असे अपार । रुद्राक्षमाला अति थोर । जे मिळती समयानुसार । रुद्राक्ष धारण करावे ॥१९॥
ज्याचे गळा रुद्राक्ष असती । त्यासी पापे नातळती । तया होय सद्गति । रुद्रलोकी अखंडित ॥२०॥
रुद्राक्षमाळा धरोनि । जप करिती अनुष्ठानी । अनंत फळ असे जाणी । एकचित्ते परियेसा ॥२१॥
रुद्राक्षाविणे जो नर । वृथा जन्म जाणा घोर । ज्याचे कपाळी नसे त्रिपुंड्र । जन्म वाया परियेसा ॥२२॥
रुद्राक्ष बांधोनि मस्तकेसी । अथवा दोन्ही श्रवणांसी । स्नान करिता नरासी । गंगास्नानफळ असे ॥२३॥
रुद्राक्ष ठेवोनि पूजेसी । अभिषेक करावा श्रीरुद्रेसी । लिंगपूजा समानेसी । फळ असे निर्धारा ॥२४॥
एकमुख पंचमुख । एकादश असती मुख । चतुर्दशादि कौतुक । मुखे असती परियेसा ॥२५॥
हे उत्तम मिळती जरी । अथवा असती नानापरी । धारण करावे प्रीतिकरी । पावे चतुर्विध पुरुषार्थ ॥२६॥
यांचे पूर्वील आख्यान । विशेष असे अति गहन । ऐकता पापे पळोन । जाती त्वरित परियेसा ॥२७॥
राजा काश्मीरदेशासी । भद्रसेन नामे परियेसी । त्याचा पुत्र सुधर्म नामेसी । प्रख्यात असे अवधारा ॥२८॥
त्या राजाचा मंत्रीसुत । नाम तारक विख्यात । दोघे कुमार ज्ञानवंत । परमसखे असति देखा ॥२९॥
उभयता एके वयासी । एके स्थानी विद्याभ्यासी । क्रीडा विनोद अति प्रीतींसी । वर्तती देखा संतोषे ॥३०॥
क्रीडास्थानी सहभोजनी । असती दोघे संतोषोनि । ऐसे कुमार महाज्ञानी । शिवभजक परियेसा ॥३१॥
सर्वदेहा अलंकार । रुद्राक्षमाळा सुंदर । भस्मधारण त्रिपुंड्र । टिळा असे परियेसा ॥३२॥
रत्नाभरणे सुवर्ण । लेखिती लोहासमान । रुद्रमाळावाचून । न घेती देखा अलंकार ॥३३॥
मातापिता बंधुजन । आणोनि देती रत्नाभरण । टाकोनि देती कोपोन । लोह पाषाण म्हणती त्यांसी ॥३४॥
वर्तता ऐसे एके दिवशी । तया राजमंदिरासी । आला पराशर ऋषि । जो का त्रिकाळज्ञ असे देखा ॥३५॥
ऋषि आला देखोन । राजा संमुख जाऊन । साष्टांगी नमन करून । अभिवंदिला तये वेळी ॥३६॥
बैसवोनि सिंहासनी । अर्घ्य पाद्य देवोनि । पूजा केली विधानी । महानंदे तये वेळी ॥३७॥
कर जोडोनि मुनिवरासी । विनवी राव भक्तीसी । पिसे लागले पुत्रांसी । काय करावे म्हणतसे ॥३८॥
रत्नाभरणे अलंकार । न घेती भुषण परिकर । रुद्राक्षमाळा कंठी हार । सर्वाभरणे तीच करिती ॥३९॥
शिकविल्या नायकती । कैचे यांचे मती । स्वामी त्याते बोधिती । तरीच ऐकती कुमार ॥४०॥
भूतभविष्यावर्तमानी । त्रिकाळज्ञ तुम्ही मुनि । यांचा अभिप्राय विस्तारोनि । निरोपावा दातार ॥४१॥
ऐकोनि रायाचे वचन । पराशरा हर्ष जाण । निरोपितसे हासोन । म्हणे विचित्र असे देखा ॥४२॥
तुझ्या आणि मंत्रिसुताचे । वृत्तान्त असती विस्मयाचे । सांगेन ऐक विचित्र साचे । म्हणोनि निरोपी तया वेळी ॥४३॥
पूर्वी नंदीनाम नगरी । अति लावण्य सुंदरी । होती एक वेश्या नारी । जैसे तेज चंद्रकांति ॥४४॥
जैसा चंद्र पौर्णिमेसी । तैसे छत्र असे तिसी । सुखासन सुवर्णेसी । शोभायमान असे देखा ॥४५॥
हिरण्यमय तिचे भुवन । पादुका सुवर्णाच्या जाण । नानापरी आभरणे । विचित्र असती परियेसा ॥४६॥
पर्यंक रत्नखचित देखा । वस्त्राभरणे अनेका । गोमहिषी दास्यादिका । बहुत असती परियेसा ॥४७॥
सर्वाभरणे तीस असती । जैसी दिसे मन्मथरति । नवयौवना सोमकांति । अतिसुंदर लावण्य ॥४८॥
गंध कुंकुम कस्तुरी । पुष्पे असती नानापरी । अखिल भोग तिच्या घरी । ख्याति असे तया ग्रामी ॥४९॥
धनधान्यादि संपत्ति । कोटिसंख्या नाही मिति । ऐशियापरी नांदती । वारवनिता तये नगरी ॥५०॥
असोनि वारवनिता । म्हणवी आपण पतिव्रता । धर्म करी असंख्याता । अन्नवस्त्रे ब्राह्मणांसी ॥५१॥
नाट्यमंडप तिचे द्वारी । रत्नखचित नानापरी । उभारिला अतिकुसरी । सदा नृत्य करी तेथे ॥५२॥
सखिवर्गासह नित्य । नृय करी मनोरथ । कुक्कुट मर्कट विनोदार्थ । बांधिले असती मंडप्पी ॥५३॥
तया मर्कटकुक्कुटांसी । नृत्य शिकवी विनोदेसी । रुद्राक्षमाळाभूषणेसी । गळा रुद्राक्ष बांधिले ॥५४॥
तया मर्कटकुक्कुटांसी । नामे ठेविली सदाशिव ऐसी । वर्तता एके दिवसी । अभिनव झाले परियेसा ॥५५॥
शिवव्रत म्हणजे एक । वैश्य झाला महाधनिक । रुद्राक्षमाळा-भस्मांकित । प्रवेशला तिचे घरी ॥५६॥
त्याचे सव्य करी देखा । रत्नखचित लिंग निका । तेजे फाके चंद्रार्का । विराजमान दिसतसे ॥५७॥
तया वैश्यासी देखोनि । नेले वेश्ये वंदूनि । नाट्यमंडपी बैसवोनि । उपचार केले नानापरी ॥५८॥
तया वैश्याचे करी । जे का होते लिंग भारी । रत्नखचित सूर्यापरी । दिसतसे तयाचे ॥५९॥
देखोनि लिंग रत्नखचित । वारवनिता विस्मय करीत । आपुल्या सखीस म्हणत । ऐसी वस्तु पाहिजे आम्हा ॥६०॥
पुसावे तया वैश्यासी । जरी देईल मौल्येसी । अथवा देईल रतीसी । होईन कुलस्त्री तीन दिवस ॥६१॥
ऐकोन तियेचे वचन । पुसती वैश्यासी सखी जाण । जरि का द्याल लिंगरत्न । देईल रति दिवस तीनी ॥६२॥
अथवा द्याल मौल्येसी । लक्षसंख्यादि द्रव्यासी । जे का वसे तुमचे मानसी । निरोपावे वेश्येप्रती ॥६३॥
ऐकोनि सखियांचे वचन । म्हणे वैश्य हासोन । देईन लिंग मोहन । रतिकांक्षा करुनी ॥६४॥
तुमची मुख्य वारवनिता । जरी होईल माझी कांता । दिवस तीन पतिव्रता । होवोनि असणे मनोभावे ॥६५॥
म्हणोनिया मुख्य वनितेसी । पुसतसे वैश्य तिसी । व्यभिचारिणी नाम तुजसी । काय सत्य तुझे बोल ॥६६॥
तुम्हा कैचे धर्म कर्म । बहु पुरुषांचा संगम । पतिव्रता कैचे नाम । तुज असे सांग मज ॥६७॥
प्रख्यात तुमचा कुळाचार । सदा करणे व्यभिचार । नव्हे तुमचे मन स्थिर । एका पुरुषासवे नित्य ॥६८॥
ऐकोनि वैश्याचे वचन । वारवनिता बोले आपण । दिनत्रय सत्य जाण । होईन तुमची कुलस्त्री ॥६९॥

वैश्य म्हणे तियेसी । प्रमाण द्यावे आम्हांसी । दिनत्रय दिवानिशी । वागावे पत्नीधर्मकर्मे ॥७१॥
तये वेळी वारवनिता । लिंगावरी ठेवी हाता । चंद्र सूर्य साक्षी करिता । झाली पत्नी तयाची ॥७२॥
इतुकिया अवसरी । लिंग दिले तियेचे करी । संतोष जहाली ती नारी । करी कंकण बांधिले ॥७३॥
लिंग देवोनि वेश्येसी । बोले वैश्य परियेसी । माझ्या प्राणासमानेसी । लिंग असे जाण तुवा ॥७४॥
या कारणे लिंगासी । जतन करणे परियेसी । हानि होता यासी । प्राण आपुला देईन ॥७५॥
ऐसे वैश्याचे वचन ऐकोन । अंगिकारिले आपण । म्हणे लिंग करीन जतन । प्राणापरी परियेसा ॥७६॥
ऐसी दोघे संतोषित । बैसले होते मंडपात । दिवस जाता अस्तंगत । म्हणती जाऊ मंदिरा ॥७७॥
संभोगसमयी लिंगासी । न ठेवावे जवळिकेसी । म्हणे वैश्य तियेसी । तये वेळी परियेसा ॥७८॥
ऐकोनि वैश्याचे वचन । मंडपी ठेविले लिंगरत्न । मध्यस्तंभी बैसवोन । गेली अंतर्गृहात ॥७९॥
क्रीडा करिती दोघेजण । होते ऐका एक क्षण । उठिला अग्नि दारुण । तया नाट्यमंडपी ॥८०॥
अग्नि लागता मंडप । भस्म झाला जैसा धूप । वैश्य करितसे प्रलाप । देखोनि तये वेळी ॥८१॥
म्हणे हा हा काय झाले । माझे प्राणलिंग गेले । विझविताती अतिप्रबळे । नगरलोक मिळोनि ॥८२॥
विझवूनिया पहाती लिंगासी । दग्ध झाले परियेसी । अग्नी कुक्कुटमर्कटांसी । दहन जहाले परियेसा ॥८३॥
वैश्य देखोनि तये वेळी । दुःख करी अतिप्रबळी । प्राणलिंग गेले जळोनि । आता प्राण त्यजीन म्हणे ॥८४॥
म्हणोनिया निघाला बाहेरी । आयती केली ते अवसरी । काष्ठे मिळवोन अपारी । अग्नि केला परियेसा ॥८५॥
लिंग दग्ध झाले म्हणत । अग्निप्रवेश केला त्वरित । नगरलोक विस्मय करीत । वेश्या दुःख करीतसे ॥८६॥
म्हणे हा हा काय झाले । पुरुषहत्यापाप घडले । लिंग मंडपी ठेविले । दग्ध जहाले परियेसा ॥८७॥
वैश्य माझा प्राणेश्वर । तया हानि जहाली निर्धार । पतिव्रताधर्मे सत्वर । प्राण त्यजीन म्हणतसे ॥८८॥
बोलाविले विप्रांसी । संकल्पिले संपदेसी । सहगमन करावयासी । दानधर्म करीतसे ॥८९॥
वस्त्रे भूषणे भांडारा । देती झाली विप्रवरा । चंदनकाष्ठभारा । चेतविले अग्नीसी ॥९०॥
आपुल्या बंधुवर्गासी । नमोनि पुसे तयासी । निरोप द्यावा आपणासी । पतीसवे जातसे ॥९१॥
ऐकोनि तियेचे वचन । दुःख पावले बंधुजन । म्हणती तुझी बुद्धि हीन । काय धर्म करीतसे ॥९२॥
वेश्येच्या मंदिरासी । येती पुरुष रतीसी । मिती नाही तयांसी । केवी जहाला तुझा पुरुष ॥९३॥
कैचा वैश्य कैचे लिंग । वाया जाळिसी आपुले अंग । वारवनिता धर्म चांग । नूतन पुरुष नित्य घ्यावा ॥९४॥
ऐसे वैश्य किती येती । त्यांची कैशी होसी सती । हासती नगरलोक ख्याति । काय तुझी बुद्धि सांगे ॥९५॥
येणेपरी सकळ जन । वारिताती बंधुजन । काय केलिया नायके जाण । कवणाचेही ते काळी ॥९६॥
वेश्या म्हणे तये वेळी । आपुला पति वैश्य अढळी । प्रमाण केले तयाजवळी । चंद्र सूर्य साक्षी असे ॥९७॥
साक्षी केली म्या हो क्षिति । दिवस तीन अहोरात्री । धर्मकर्म त्याची पत्नी । जाहले आपण परियेसा ॥९८॥
माझा पति जाहला मृत । आपण विनवीतसे सत्य । पतिव्रता धर्म ख्यात । वेदशास्त्र परियेसा ॥९९॥
पतीसवे जे नारी । सहगमन हाय प्रीतिकरी । एकेक पाउली भूमीवरी । अश्वमेधफळ असे ॥१००॥
आपुले माता पिता उद्धरती । एकवीस कुळे पवित्र होती । पतीची जाण तेच रीती । एकवीस कुळे परियेसा ॥१॥
इतुके जरी न करिता । पातिव्रत्यपणा वृथा । केवी पाविजे पंथा । स्वर्गाचिया निश्चये ॥२॥
ऐसे पुण्य जोडिती । काय वाचूनि राहणे क्षिती । दुःख संसारसागर ख्याति । मरणे सत्य कधी तरी ॥३॥
म्हणोनि विनवी सकळांसी । निघाली बाहेर संतोषी । आली अग्निकुंडापासी । नमन करी तये वेळी ॥४॥
स्मरोनिया सर्वेश्वर । केला सूर्यासी नमस्कार । प्रदक्षिणे उल्हास थोर । करिती झाली तये वेळी ॥५॥
नमुनी समस्त द्विजांसी । उभी ठेली अग्निकुंडासी । उडी घातली वेगेसी । अभिनव जहाले तये वेळी ॥६॥
सदाशिव पंचवक्त्र । दशभुजा नागसूत्र । हाती आयुधे विचित्र । त्रिशूळ डमरू जाण पा ॥७॥
भस्मांकित जटाधारी । बैसला असे नंदीवरी । धरिता झाला वरचेवरी । वेश्येशी तये वेळी ॥८॥
तया अग्निकुंडात । न दिसे अग्नि असे शांत । भक्तवत्सल जगन्नाथ । प्रसन्न झाला तये वेळी ॥९॥
हाती धरुनी तियेसी । कडे काढी व्योमकेशी । प्रसन्न होउनी परियेसी । वर माग म्हणतसे ॥११०॥
ईश्वर म्हणे तियेसी । आलो तुझे परीक्षेसी । धर्मधैर्य पाहावयासी । येणे घडले परियेसा ॥११॥
झालो वैश्य आपणची । रत्नलिंग स्वयंभूची । मायाअग्नि केला म्यांची । नाट्यमंडप दग्ध केला ॥१२॥
तुझे मन पहावयासी । जहालो अग्निप्रवेशी । तूची पतिव्रता सत्य होशी । सत्य केले व्रत आपुले ॥१३॥
संतोषलो तुझे भक्तीसी । देईन वर जो मागसी । आयुरारोग्यश्रियेसी । जे इच्छिसी ते देईन ॥१४॥
म्हणे वेश्या तये वेळी । नलगे वर चंद्रमौळी । स्वर्ग भूमि पाताळी । न घे भोग ऐश्वर्य ॥१५॥
तुझे चरणकमळी भृंग । होवोनि राहीन महाभाग्य । माझे इष्ट बंधुवर्ग । सकळ तुझे सन्निधेसी ॥१६॥
दासदासी माझे असती । सकळा न्यावे स्वर्गाप्रति । तव सन्निध पशुपति । सर्वदा राहो सर्वेश्वरा ॥१७॥
न व्हावी पुनरावृत्ती । न लागे संसार यातायाती । विमोचावे स्वामी त्वरिती । म्हणोनि चरणी लागली ॥१८॥
ऐकोनि तियेचे वचन । प्रसन्न झाला गौरीरमण । सकळा विमानी बैसवोन । घेऊन गेला स्वर्गाप्रती ॥१९॥
तिचे नाट्यमंडपात । जो का झाला मर्कटघात । कुक्कुटसमवेत । दग्ध जहाले परियेसा ॥१२०॥
म्हणोनि पराशर ऋषि । सांगतसे रायासी । मर्कटजन्म त्यजूनि हर्षी । तुझे उदरी जन्मला ॥२१॥
तुझे मंत्रियाचे कुशी । कुक्कुट जन्मला परियेसी । रुद्राक्षधारणफळे ऐसी । राजकुमार होऊन आले ॥२२॥
पूर्वसंस्काराकरिता । रुद्राक्षधारण केले नित्या । इतके पुण्य घडले म्हणता । जहाले तुझे कुमार हे ॥२४॥
आता तरी ज्ञानवंती । रुद्राक्ष धारण करिताती । त्याच्या पुण्या नाही मिती । म्हणोनि सांगे पराशरऋषि ॥२५॥
श्रीगुरु म्हणती दंपतीसी । येणेपरी रायासी । सांगता झाला महाऋषि । पराशर विस्तारे ॥२६॥
ऐकोनि ऋषीचे वचन । राजा विनवी कर जोडून । प्रश्न केला अतिगहन । सांगेन ऐका एकचित्ते ॥२७॥
म्हणोनि सिद्ध विस्तारेसी । सांगे नामधारकासी । अपूर्व जहाले परियेसी । पुढील कथा असे ऐका ॥२८॥
गंगाधराचा नंदनु । सांगे श्रीगुरुचरित्रकामधेनु । ऐका श्रोते सावधानु । लाधे चारी पुरुषार्थ ॥२९॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । रुद्राक्षमहिमा येथ । सांगितले निभ्रांत । पुण्यात्मक पावन जे ॥१३०॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे रुद्राक्षमाहात्म्य नाम त्रयस्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥३३॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओवीसंख्या १३०)

श्रीगणेशाय नमः ।
श्रीगुरु म्हणती दंपतीसी । ऐसा पराशर ऋषि । तया काश्मीर राजासी । रुद्राक्षमहिमा निरोपी ॥१॥
तया राजकुमाराचे । विस्तारोनि सुधावाचे । सांगितले पूर्वजन्माचे । चरित्र सर्व ॥२॥
संतोषोनि तो राजा । लागला त्याचे पादांबुजा । कर जोडोनिया वोजा । विनवीतसे परियेसा ॥३॥
राजा म्हणे ऋषीश्वरासी । स्वामी निरोपिले आम्हांसी । पुण्य घडले आत्मजासी । रुद्राक्षधारणे करोनिया ॥४॥
पूर्वजन्मी अज्ञानेसी । रुद्राक्ष बांधिले तिणे वेश्यी । त्या पुण्ये दशा ऐशी । प्राप्त झाली स्वामिया ॥५॥
ज्ञानवंत आता जाण । करिती रुद्राक्षधारण । पुढे यांचे लक्षण । कवणेपरी वर्ततील ॥६॥
भूतभविष्य-वर्तमानी । त्रिकाळज्ञ तुम्ही मुनि । सांगा स्वामी विस्तारोनि । माझेनि मंत्रिकुमराचे ॥७॥
ऐकोनि रायाचे वचन । सांगे ऋषि विस्तारोन । दोघा कुमारकांचे लक्षण । अपूर्व असे परियेसा ॥८॥
ऋषि म्हणे रायासी । पुत्रभविष्य पुससी । ऐकोनि दुःख पावसी । कवणेपरी सांगावे ॥९॥
राव विनवी तये वेळी । निरोपावे सकळी । उपाय करिसी तात्काळी । दुःखावेगळा तूचि करिसी ॥१०॥
ऐकोनिया ऋषीश्वर । सांगता झाला विस्तार । ऐक राजा तुझा कुमार । बारा वर्षे आयुष्य असे ॥११॥
तया बारा वर्षात । राहिले असती दिवस सात । आठवे दिवसी येईल मृत्यु । तुझ्या पुत्रासी परियेसा ॥१२॥
ऐकोनि ऋषीचे वचन । राजा मूर्च्छित जाहला तत्क्षण । करिता झाला रुदन । अनेकपरी दुःख करित ॥१३॥
ऐकोनि राजा तये वेळी । लागला ऋषीच्या चरणकमळी । राखे राखे तपोबळी । शरणागत मी तुझा ॥१४॥
नानापरी गहिवरत । मुनिवराचे चरण धरित । विनवीतसे स्त्रियांसहित । काय करावे म्हणोनिया ॥१५॥
दयानिधि ऋषीश्वरु । सांगता झाला विचारु । शरण रिघावे जगद्गुरु । उमाकांत शिवासी ॥१६॥
मनीचे भय त्यजुनी । असावे आता शिवध्यानी । तो राखील शूलपाणी । आराधावे तयाते ॥१७॥
जिंकावया काळासी । उपाय असे परियेसी । सांगेन तुम्हा विस्तारेसी । एकचित्ते अवधारा ॥१८॥
स्वर्ग मृत्य पाताळासी । देव एक व्योमकेशी । निष्कलंक परियेसी । चिदानंदस्वरूप देखा ॥१९॥
ऐसा देव मूर्तिमंत । रजोरूपे ब्रह्मा सृजत । सृष्टि करणार समर्थ । वेद चारी निर्मिले ॥२०॥
तया चतुर्वेदांसी । दिधले तया विरंचीसी । आत्मतत्त्वसंग्रहासी । ठेविली होती उपनिषदे ॥२१॥
भक्तवत्सल सर्वेश्वर । तेणे दिधले वेदसार । रुद्राध्याय सुंदर । दिधला तया विरंचीसी ॥२२॥
रुद्राध्यायाची महिमा । सांगता असे अनुपमा । याते नाश नाही जाणा । अव्यय असे परियेसा ॥२३॥
पंचतत्त्व शिवात्मक । रुद्राध्याय असे विशेष । ब्रह्मयाने चतुर्मुख । विश्व सृजिले वेदमते ॥२४॥
तया चतुर्मुखी देखा । वेद चारी सांगे निका । वदन दक्षिण कर्ण एका । यजुर्वेद निरूपिला ॥२५॥
तया यजुर्वेदांत । उपनिषदसार ख्यात । रुद्राध्याय विस्तारत । सांगे ब्रह्मा मुनिवरांसी ॥२६॥
समस्त देवऋषींसी । मरीचि अत्रि परियेसी । आणिक सकळ देवांसी । सांगे ब्रह्मा तये वेळी ॥२७॥
तेचि ऋषि पुढे देखा । शिकविती आपुले शिष्यादिका । त्यांचे शिष्य पुढे ऐका । आपुल्या शिष्या शिकविले ॥२८॥
पुढे त्यांचे पुत्रपौत्री । विस्तार झाला जगत्री । शिकविले ऐका पवित्री । रुद्राध्याय भूमीवरी ॥२९॥
त्याहूनि नाही आणिक मंत्र । त्वरित तप साध्य होत । चतुर्विध पुरुषार्थ लाधे त्वरित परियेसा ॥३०॥
नानापरीची पातके । केली असती अनेके । रुद्रजाप्ये सम्यके । भस्म होती परियेसा ॥३१॥
आणिक एक नवल केले । ब्रह्मदेव सृष्टि रचिले । वेदतीर्थ असे भले । स्नानपान करावे ॥३२॥
त्याणे कर्मे परिहरती । संसार होय निष्कृति । जे जन श्रीगुरु भजती । ते तरती भवसागर ॥३३॥
सुकृत अथवा दुष्कृत । जे जे कीजे आपुले हीत । जैसे पेरिले असे शेत । तेचि उगवे परियेसा ॥३४॥
सृष्टिधर्मप्रवृत्तीसी । ब्रह्मे रचिले परियेसी । आपुले वक्षपृष्ठेसी । धर्माधर्म उपजवी ॥३५॥
जे जन धर्म करिती । इह पर सौख्य पावती । जे अधर्मे रहाटती । पापरूपी तेचि जाणा ॥३६॥
काम क्रोध लोभ जाण । मत्सर दंभ परिपूर्ण । अधर्माचे सुत जाण । इतुके नरकनायक ॥३७॥
गुरुतल्पगसुरापानी । कामुक जे परिपूर्णी । पुल्कस्वरूप अंतःकरणी । तेचि प्रधान नरकाचे ॥३८॥
क्रोधे पितृवधी देखा । मातृवधी असती जे का । ब्रह्महत्यादि पातका । कन्याविक्रयी जे जन ॥३९॥
इतुके क्रोधापासूनि । उद्भव झाले म्हणोनि । पुत्र जहाले या कारणी । क्रोधसुत तया म्हणती ॥४०॥
देवद्विजस्वहरण देखा । ब्रह्मस्व घेवोनि नेदी जो का । सुवर्णतस्कर ऐका । लोभपुत्र तया नाव ॥४१॥
ऐशा पातकांसी । यमे निरोपिले परियेसी । तुम्ही जावोनि मृत्युलोकासी । रहाटी करणे आपुले गुणे ॥४२॥
तुम्हासवे भृत्य देखा । देईन सर्व उपपातका । सकळ पाठवावे नरका । जे जन असती भूमीवरी ॥४३॥
यमाची आज्ञा घेवोनि । आली पातके मेदिनी । रुद्रजपत्याते देखोनि । पळोनि गेली परियेसा ॥४४॥
जावोनिया यमाप्रती । महापातके विनविती । गेलो होतो आम्ही क्षिती । भयचकित होउनी आलो ॥४५॥
जय जयाजी यमराया । आम्ही पावलो महाभया । किंकर तुमचे म्हणोनिया । प्रख्यात असे त्रिभुवनी ॥४६॥
आम्ही तुमचे आज्ञाधारी । निरोपे गेलो धरित्री । पोळलो होतो वह्निपुरी । रुद्रजप ऐकोनि ॥४७॥
क्षितीवरी रहावयासी । शक्ति नाही आम्हांसी । पाहता रुद्रजपासी । पोळलो आम्ही स्वामिया ॥४८॥
ग्रामी खेटी नदीतीरी । वसती द्विज महानगरी । देवालयी पुण्यक्षेत्री । रुद्रजप करिताती ॥४९॥
कवणेपरी आम्हा गति । जाऊ न शको आम्ही क्षिती । रुद्रजप जन करिताती । तया ग्रामा जाऊ न शको ॥५०॥
आम्ही जातो नरापासी । वर्तवितो पातकासी । होती नर महादोषी । मिति नाही परियेसा ॥५१॥
प्रायश्चित्तसहस्त्रेसी जो का नव्हे पुण्यपुरुषी । तैसा द्विज परियेसी । पुण्यवंत होतसे ॥५२॥
एखादे समयी भक्तीसी । म्हणती रुद्राध्यायासी । तो होतो पुण्यराशि । पाहता त्यासी भय वाटे ॥५३॥
तैसा पापी महाघोर । पुण्यवंत होतो नर । भूमीवरी कैसे आचार । आम्हा कष्ट होतसे ॥५४॥
काळकूट महाविष । रुद्रजाप्य आम्हा दिसे । शक्ति नाही आम्हांसी । भूमीवरी जावया ॥५५॥
रुद्रजाप्यविषासी । शमन करावया शक्त होसी । रक्ष गा रक्ष गा आम्हांसी । विनविताती पातके ॥५६॥
इतुके बोलती पातके । ऐकोनि यममाथा तुके । कोपे निघाला तवके । ब्रह्मलोका तये वेळी ॥५७॥
जाऊनिया ब्रह्मयापासी । विनवी यम तयासी । जय जयाजी कमळवासी । सृष्टिकारी चतुर्मुखा ॥५८॥
आम्ही तुझे शरणागत । तुझे आज्ञे कार्य करित । पापी नराते आणित । नरकालयाकारणे ॥५९॥
महापातकी नरांसी । आणू पाठवितो भृत्यांसी । पातकी होय पुण्यराशि । रुद्रजप करूनिया ॥६०॥
समस्त जाती स्वर्गासी । महापातकी अतिदोषी । नाश केला पातकांसी । शून्य जहाले नरकालय ॥६१॥
नरक शून्य झाले सकळ । माझे राज्य निष्फळ । समस्त जहाले कैवल्य । उत्पत्ति राहिली स्वामिया ॥६२॥
याते उपाय करावयासी । देवा तू समर्थ होसी । राखे राखे आम्हांसी । राज्य गेले स्वामिया ॥६३॥
तुम्ही होउनी मनुष्यासी । स्वामित्व दिधले भरवसी । रुद्राध्यायानिधानेसी । कासया साधन दिधलेत ॥६४॥
याकारणे मनुष्य लोकी । नाही पापलेश । रुद्रजपे विशेष । पातके जळती अनेक ॥६५॥
येणेपरी यम देखा । विनविता झाला चतुर्मुखा । प्रत्युत्तर देतसे ऐका । ब्रह्मदेव यमासी ॥६६॥
अभक्तीने दुर्मदेसी । रुद्रजप करिती यासी । अज्ञानी लोक तामसी । उभ्यानी निजूनी पढती नर ॥६७॥
त्याते अधिक पापे घडती । ते दंडावे तुवा त्वरिती । जे का भावार्थे पढती । ते त्वा सर्वदा वर्जावे ॥६८॥
बाधू नका तुम्ही ऐका । सांगावे ऐसे पातका । रुद्रजपे पुण्य विशेखा । जे जन पढती भक्तीसी ॥६९॥

तैसे अल्पायुषी नरे । रुद्रजप करिता बरे । पापे जाती निधरि । दीर्घायु होय तो देखा ॥७१॥
तेजो वर्चस्‍ बल धृति । आयुरारोग्य ज्ञान संपत्ति । रुद्रजपे वर्धती । ऐके यमा एकचित्ते ॥७२॥
रुद्रजपमंत्रेसी । स्नान करविती ईश्वरासी । तेचि उदक भक्तीसी । जे जन करिती स्नानपान ॥७३॥
त्याते मृत्युभय नाही । आणिक एक नवल पाही । रुद्रजपे पुण्य देही । स्थिर जीव पुण्य असे ॥७४॥
अतिरुद्र जपोनि उदकासी । स्नान केल्या वरांसी । भीतसे मृत्यु त्यासी । तेही तरती भवार्णवी ॥७५॥
शतरुद्र अभिषेकासी । पूजा करिती महेशासी । ते जन होती शतायुषी । पापनिर्मुक्त परियेसा ॥७६॥
ऐसे जाणोनि मानसी । सांगे आपुले दूतासी । रुद्र जपता विप्रांसी । बाधू नको म्हणे ब्रह्मा ॥७७॥
ऐकोनि ब्रह्मयाचे वचना । यम आला आपुले स्थाना । म्हणोनि पराशरे जाणा । निरोपिले रायासी ॥७८॥
आता तुझ्या कुमारासी । उपाय सांगेन परियेसी । दशसहस्त्र रुद्रेसी । स्नपन करी शिवाते ॥७९॥
दहा सहस्त्र वर्षांवरी । तव पुत्र राज्य करी । इंद्रासमान धुरंधरी । कीर्तिवंत अपार ॥८०॥
त्याचे राज्याश्रियेसी । अपाय नसे निश्चयेसी । अकंटक संतोषी । राज्य करी तुझा सुत ॥८१॥
बोलवावे शत विप्रांसी । जे का विद्वज्जन परियेसी । लावावे ज्ञानी अनुष्ठानासी । तात्काळ तुवा रुद्राच्या ॥८२॥
ऐशा विप्राकरवी देखा । शिवासीकरी अभिषेका । आयुष्य वर्धेल कुमारका । सद्यःश्रेय होईल ॥८३॥
येणेपरी रायासी । सांगे पराशर ऋषि । राये महा आनंदेसी । आयुष्य वर्धना आरंभ केला ॥८४॥
ऐसा ऋषि पराशर । उपदेशितांची द्विजवर । बोलावोनिया सर्व संभार । पुरवीतसे ब्राह्मणांसी ॥८५॥
शतसंख्याक कलशांसी । विधिपूर्वक शिवासी । पुण्यवृक्षतळेसी । अभिषेक करवितसे ॥८६॥
त्याचिया जळे पुत्रासी । स्नान करवी प्रतिदिवसी । सप्त दिन येणे विधींसी । आराधिला ईश्वर ॥८७॥
अवधी जहाली दिवस सात । बाळ पडिला निचेष्टित । पराशरे येवोनि त्वरित । उदकेसी सिंचिले ॥८८॥
तये वेळी अवचित । वाक्य जहाले अदृश्यत । सवेचि दिसे अद्‌भुत । दंडहस्त महापुरुष ॥८९॥
महादंष्ट्र भयचकित । आले होते यमदूत । समस्त द्विजवर रुद्र पढत । मंत्राक्षता देताती ॥९०॥
मंत्राक्षता ते अवसरी । घातलिया कुमारावरी । दूत पाहती राहूनि दूरी । जवळ येऊ न शकती ॥९१॥
होते महापाश हाती । कुमारावरी टाकू येती । शिवदूत दंडहस्ती । मारू आले यमदूता ॥९२॥
भये चकित यमदूत । पळोनि गेले धावत । पाठी लागले शिवदूत । वेदपुरुषरूप देखा ॥९३॥
येणेपरी द्विजवर । तेणे रक्षिला राजकुमार । आशीर्वाद देती थोर । वेदश्रुति करूनिया ॥९४॥
इतुकियावरी राजकुमार । सावध झाला मन स्थिर । राजयासी आनंद थोर । समारंभ करीतसे ॥९५॥
पूजा करोनि द्विजांसी । देता झाला भोजनासी । तांबूलादि दक्षिणेसी । संतोषविले द्विजवर ॥९६॥
संतोषोनि महाराजा । सभा रचित महावोजा । बैसवोनि समस्ता द्विजा । महाऋषीते सिंहासनी ॥९७॥
राजा आपुले स्त्रियेसहित । घालिता झाला दंडवत । येवोनिया बैसला सभेत । आनंदित मानसी ॥९८॥
त्या समयीं ब्रह्मसुत । नारद आला अकस्मात । राजा धावोनि चरण धरीत । सिंहासनी बैसवी ॥९९॥
पूजा करोनि उपचारी । राजयाते नमस्कारी । म्हणे स्वामी या अवसरी । कोठोनि येणे झाले पै ॥१००॥
राजा म्हणे देवऋषी । हिंडता तुम्ही त्रिभुवनासी । काय वर्तले विशेषी । आम्हालागी निरोपिजे ॥१॥
नारद म्हणे रायासी । गेलो होतो कैलासासी । येता देखिले मार्गासी । अपूर्व झाले परियेसा ॥२॥
महामृत्यु दूतांसहित । न्यावया आला तुझे सुत । सवेचि येऊनि शिवदूत । तयालागी पराभविले ॥३॥
यमदूत पळोनि जाती । यमापुढे सर्व सांगती । आम्हा मारिले शिवदूती । कैसे करावे क्षितीत ॥४॥
यम कोपोनि निघाला । वीरभद्रापासी गेला । म्हणे दूता का मार दिला । निरपराधे स्वामिया ॥५॥
निजकर्मानुबंधेसी । राजपुत्र गतायुषी । त्याते आणिता दूतांसी । कासया शिवदूती मारिले ॥६॥
वीरभद्र अतिक्रोधी । म्हणे झाला रुद्रविधि । दहा सहस्त्र वर्षे अवधि । आयुष्य असे राजपुत्रा ॥७॥
न विचारिता चित्रगुप्ता । वाया पाठविले दूता । वोखटे केले शिवदूता । जिवे सोडिले म्हणोनि ॥८॥
बोलावोनि चित्रगुप्ता । आयुष्य विचारीन त्वरिता । म्हणोनि पाठवी दूता । चित्रगुप्त पाचारिला ॥९॥
पुसताति चित्रगुप्तासी । काढोनि पाहे पुत्रासी । बारा वर्षे आयुष्य परियेसी । राजकुमारा लिहिले असे ॥११०॥
तेथेचि लिहिले होते आणिक । दशसहस्त्र वर्षे लेख । पाहोनि यम साशंकित । म्हणे अपराध आमुचा ॥११॥
वीरभद्राते वंदून । यमधर्म गेला परतोन । आम्ही आलो तेथोन । म्हणोनि सांगे नारद ॥१२॥
रुद्रजपे पुण्य करिता । आयुष्य वर्धले तुझे सता । मृत्यु जिंकिला तत्त्वता । पराशरगुरुकृपे ॥१३॥
ऐसे नारद सांगोनि । निघोनि गेला तेथोनि । पराशर महामुनि । निरोप घेतला रायाचा ॥१४॥
समस्त गेले द्विजवर । राजा हर्षे निर्भर । राज्य भोगिले धुरंधर । पुत्रपौत्री महीवरी ॥१५॥
ऐसा रुद्राध्यायमहिमा । पूजा करावी गुरुब्रह्मा । भिणे नलगे काळमहिमा । श्रीगुरु म्हणती दंपतीसी ॥१६॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । ऐसी कथा विस्तारेसी । श्रीगुरु सांगे दंपतीसी । प्रेमभावेकरोनिया ॥१७॥
या कारणे श्रीगुरूसी । प्रीति थोर रुद्राध्यायासी । पूजा करावी भक्तीसी । रुद्राध्यायेकरोनिया ॥१८॥
म्हणे सरस्वतीगंगाधर । सांगे गुरुचरित्रविस्तार । ऐकता तरे भवसागर । लाधे चारी पुरुषार्थ ॥१९॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । रुद्राभिषेकमाहात्म्य तेथ । वर्णिले असे अद्‌भुत । म्हणे सरस्वतीगंगाधर ॥१२०॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ । श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे रुद्राध्यायमहिमावर्णनं नाम चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥३४॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या १२०)

श्रीगणेशाय नमः ।
नामधारक सिद्धासी । विनवीतसे परियेसी । रुद्राध्याय विस्तारेसी । दंपतीसी सांगितला ॥१॥
पुढे काय वर्तले । विस्तारोनि सांगा वहिले । मन माझे वेधले । गुरुचरित्र ऐकावया ॥२॥
सिद्ध म्हणे ऐक ताता । अपूर्व असे पुढे कथा । तेचि जाण पतिव्रता । श्रीगुरूते विनवीत ॥३॥
कर जोडोनि गुरूसी । विनवीतसे भक्तीसी । आम्हा गति पुढे कैसी । कवणेपरी असावे ॥४॥
या कारणे आपणासी । एखादा मंत्र उपदेशी । जेणे होय स्थिर जीवासी । चरणस्मरण सनातन ॥५॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । स्त्रियांसी मंत्र उपदेशी । पतिभक्तीविणे त्यांसी । उपदेशासी देऊ नये ॥६॥
देता उपदेश स्त्रियांसी । विघ्न असे मंत्रासी । पूवी शुक्राचार्यासी । झाले असे परियेसा ॥७॥
ऐसे ऐकता गुरुवचन । विनवीतसे कर जोडून । स्त्रिया केवी मंत्रहीन । शुक्राचार्या कैसे झाले ॥८॥
विस्तारोनि आम्हासी । सांगा स्वामी कृपेसी । म्हणोनि लागली चरणासी । करुणावचनेकरोनिया ॥९॥
श्रीगुरु सांगती तियेसी । पूर्वकथा आहे ऐसी । युद्ध देवदैत्यांसी । सदैव होय अवधारा ॥१०॥
दैत्यसैन्य पडे रणी । शुक्र जपे संजीवनी । सकळ सैन्य उठवूनि । पुनरपि युद्धा पाठवीत ॥११॥
इंद्र वज्रे असुर मारी । शुक्र अमृत जप करी । सवेचि येती निशाचरी । देवसैन्य मारावया ॥१२॥
ऐसे होता एके दिवसी । इंद्र गेला कैलासासी । सांगे स्थिति शिवासी । शुक्राचार्याची मंत्रकरणी ॥१३॥
कोपोनिया ईश्वर । नंदीस सांगे उत्तर । तुवा जावोनि वेगवक्त्र । शुक्राचार्या धरोनि आणी ॥१४॥
स्वामीचे वचन ऐकोनि । नंदी गेला ठाकोनि । होता शुक्र तपध्यानी । मुखी धरिला नंदीने ॥१५॥
नंदी नेत शिवापासी । आकांत वर्तला दैत्यांसी । ईश्वरे प्राशिले शुक्रासी । अगस्ती सिंधूचियापरी ॥१६॥
ऐसा कित्येक दिवसांवरी । होता शुक्र शिवाचे उदरी । निघूनि गेला मूत्रद्वारी । विसर पडला शिवासी ॥१७॥
पूर्वी होते शुक्र नाव । ईश्वर-उदरी झाला उद्भव । नाव पावला भार्गव । पुनः संजीवनी जपे तो ॥१८॥
इंद्र मनी विचारी । पुरोहितासी पाचारी । कैसा शुक्र जिवंत करी । पुनः दैत्यजनांसी ॥१९॥
त्यासी विघ्न करावे एक । तू पुरोहित विवेकयुक्त । बुद्धि विचारी अनेक । बृहस्पति गुरुराया ॥२०॥
पाहे पा दैत्यांचे दैव कैसे । शुक्रासारिखा गुरु विशेषे । देतो जीवासी भरवसे । दैत्य येती युद्धासी ॥२१॥
तैसा तू नव्हेस आम्हांसी । आम्हाते का उपेक्षिसी । देवगुरु तू म्हणविसी । बुद्धि करी शीघ्र आता ॥२२॥
तू पूज्य सकळ देवांसी । जरी आम्हा कृपा करिसी । शुक्राचार्य काय विशेषी । तुजसमान नव्हे जाणा ॥२३॥
ऐसे नानापरी देख । इंद्र अमरनायक । पूजा करी उपचारिक । बृहस्पति संतोषला ॥२४॥
गुरु म्हणे इंद्रासी । यासी ऐक तू उपायासी । षट्कर्णी करावे मंत्रासी । सामर्थ्य राहील शुक्राचे ॥२५॥
एखादा पाठवावा शुक्रापासी । विद्यार्थी करून त्वरेसी । मंत्र शिकेल भरवसी । विद्यार्थिरूपेकरूनिया ॥२६॥
आपुला पुत्र कच असे । त्याते पाठवू विद्याभ्यासे । मंत्र शिकेल आहे कैसी । संजीवनी अवधारा ॥२७॥
कचाते आणूनि बुद्धियुक्ति । सांगतसे बृहस्पति । तुवा जावे शुक्राप्रती । विद्यार्थिरूप धरोनि ॥२८॥
आमुची निंदा तेथे करी । मनोभावे सेवा करी । संजीवनी कवणेपरी । मंत्र शिके पुत्रराया ॥२९॥
इंद्रादिक देवतांचा । निरोप घेऊनि पितयाचा । शुक्राप्रति गेला कचा । विद्यार्थिरूप धरोनि ॥३०॥
नमन केले साष्टांगी । उभा राहिला करुणांगी । शुक्र पुसतसे वेगी । कवण कोठूनि आलासी ॥३१॥
बोले आपण द्विजकुमार । तुझी कीर्ति ऐकिली थोर । विद्याभ्यासीन मनोहर । म्हणोन आलो सेवेसी ॥३२॥
सेवक होईन तुमचे चरणी । आलो इच्छेसी धरूनि । तू भक्तवत्सलशिरोमणि । अनाथांचा प्रतिपालक ॥३३॥
बोलोनि ऐसे कचवचन । विनवीतसे कर जोडून । शुक्रकन्या जवळी येऊन । पितयालागी विनवित ॥३४॥
पितयासी म्हणे देवयानी । विप्र भला दिसे नयनी । याते तुम्ही शिष्य करूनि । विद्याभ्यास सांगावा ॥३५॥
कच सुंदर सुलक्षण । जैसा दिसे की मदन । देवयानी करी चिंतन । ऐसा पति व्हावा म्हणे ॥३६॥
ऐसी वासना धरुनी । पितयाते विनवुनी । शिष्य केला कच सगुणी । शुक्राचार्य विद्या सांगे ॥३७॥
ऐसा विद्याभ्यास करीत । दैत्यकुळी म्हणती निश्चित । देवगणी आले सत्य । कपटवेषे करूनि ॥३८॥
शिकूनिया विद्येसी । जाऊनि शिकवील देवांसी । कुडे होईल आम्हांसी । तेणे मनी चिंतावले ॥३९॥
काळ क्रमिता एके दिवसी । कच पाठविला समिधांसी । दैत्य जाती साह्येसी । तया कचाचे अवधारा ॥४०॥
रानी जाउनी समागमेसी । दैत्य मारिले कचासी । समिधा घेवोनि घरासी । दैत्य आपण येते झाले ॥४१॥
शुक्राचार्यांची कन्या । पितयासी परम मान्या । पितयासी विनवी धन्या । कच कैसा नाही आला ॥४२॥
कच आलियावाचूनी । भोजन न करी देवयानी । ऐसे ऐकता निर्वाणी । शुक्राचार्य चिंतावला ॥४३॥
ज्ञानी पाहे मानसी । मृत्यु झाला असे तयासी । मंत्र जपूनि संजीवनीसी । त्वरित घरी आणिला ॥४४॥
आणिक होता बहुत दिवस । दैत्य करिती अतिद्वेष । गेला होता वनवास । पुनरपि तयासी वधियेले ॥४५॥
मागुती वाचेल म्हणोनि । चूर्ण करिती छेदोनि । दाही दिशा टाकुनी । आले घरा पुनरपि ॥४६॥
दिवस गेला अस्तमानी । पुसतसे देवयानी । कच न दिसे म्हणोनि । पितयाते विनवीत ॥४७॥
कच माझा प्राणसखा । ना आणिशी जरी खाईन विखा । दावी मज तयाचे मुखा । म्हणोनि प्रलाप करीतसे ॥४८॥
कन्येवरी ममत्व बहुत । तेणे शुक्र ज्ञाने पहात । छिन्नभिन्न केले म्हणत । मंत्र जपला संजीवनी ॥४९॥
धन्य मंत्राचे सामर्थ्ये । कच आला घरा त्वरित । देवयानी संतोषत । पितयाने आलिंगिली ॥५०॥
दैत्य मनी विचार करिती । काय केल्या न मरे म्हणती । गुरुकन्येसी याची प्रीति । म्हणुनि गुरु वाचवितो ॥५१॥
आता उपाय करू यासी । उदईक येईल एकादशी । मारूनि मिळवू पानेसी । गुरुमुखी पाजावे ॥५२॥
ऐशी निगुती करोनि । आली एकादशी दिनी । कचाते बाहेर नेवोनि । मारते जहाले दैत्य शिष्य ॥५३॥
प्राशन करविती गुरूसी । मिळवूनिया मद्यरसी । स्निग्ध मिळवूनिया बहुवसी । शुक्रगुरूसी देत झाले ॥५४॥
मागुती पुसे देवयानी । पितयाते विनवुनी । कचासी आणी म्हणोनि । रुदन करी आक्रोशे ॥५५॥
शुक्र पहातसे ज्ञानी न दिसे कच त्रिभुवनी । खेद करीतसे मनी । कन्यालोभेकरोनिया ॥५६॥
विचार करिता सर्वा ठायी । दिसू लागला आपुले देही । संदेह पडला शक्रासी पाही । कैसे करावे म्हणोनि ॥५७॥
कन्येसी म्हणे शुक्र देखा । कच न ये आता ऐका । माझे उदरी असे निका । कैसा काढू तयासी ॥५८॥
यासी काढिता आपणासी । मृत्यु होईल परियेसी । काय अभिलाष असे त्यासी । म्हणोनि कन्येसी पुसतसे ॥५९॥
पितया विनवी देवयानी । अभिलाष होता माझे मनी । भार्या त्याची होउनी । दोघे राहू तुजपासी ॥६०॥
हाचि व्हावा माझा पति । ऐसे संकल्पिले चित्ती । न उठे जरी पुढती । तरी प्राण त्यागीन ॥६१॥
संदेह पडला शुक्रासी । बोधिता झाला कन्येसी । त्यास उठविता आपणासी । मृत्यू होईल अवधारी ॥६२॥
कन्या म्हणे पितयासी । सकळा तू वाचविसी । आपुला प्राण जाईल म्हणसी । हे आश्चर्य वाटतसे ॥६३॥
शुक्र म्हणे देवयानी । मंत्र असे संजीवनी । मजवाचोनि नेणे कोणी । माते कोण उठवील ॥६४॥
मंत्र सांगो नये कवणा । षट्कर्णी होता जाईल गुणा । कचाकरिता माझा प्राण । जाईल देखा अवधारी ॥६५॥
न ऐके कन्या देवयानी । पित्याचे चरण धरोनि । विनवीतसे कर जोडोनि । मंत्र आपणाते शिकवावा ॥६६॥
कचासी तू सजीव करी । तुज येईल मृत्यू जरी । मी मंत्र जपोनि निर्धारी । सजीव करीन तुजलागी ॥६७॥
शुक्र म्हणे कन्येसी । मंत्र सांगू नये स्त्रियांसी । दोष असता परियेसी । वेदशास्त्रसंमत असे ॥६८॥
स्त्रियांसी मंत्र पतिभक्ति । जपू नये मंत्रयुक्ति । सांगता दोष आम्हा घडती । मंत्रसामर्थ्य जाईल ॥६९॥

शुक्राची कन्येवरी प्रीति । उठवूनि तिसी आलिंगिती । मंत्र तिसी सांगती । संजिवनी अवधारा ॥७१॥
आपुल्या पोटी कच होता । तोही होय ऐकता । मंत्र जहाला षट्कर्णता । मग जपला कचानिमित्त ॥७२॥
शुक्राचे पोटातुनी । कच निघाला फोडुनी । मंत्र जपे ती देवयानी । पितयाते उठविले ॥७३॥
तीन वेळा मंत्र जपता । कचे पाठ केला तत्त्वता । संतोष करी मनी बहुता । कार्य साधले म्हणोनि ॥७४॥
शुक्राचार्याते नमुनी । कच विनवी कर जोडुनी । माते दैत्य मारिती म्हणोनि । निरोप द्यावा मजलागी ॥७५॥
स्वामीचेनि विद्या शिकलो । तुझे कृपेने पूर्ण जहालो । देवकार्यार्थ संतोषलो । म्हणूनि चरणी लागला ॥७६॥
शुक्राचार्ये हर्षोनि । निरोप दिधला त्यालागोनी । पदर धरी देवयानी । पति व्हावे म्हणोनिया ॥७७॥
तूते मारिले तीन वेळी । मी वाचविले त्या काळी । विद्या शिकलासी पित्याजवळी । अवश्य वरावे मजलागी ॥७८॥
कच म्हणे ऐक बाळे । गुरुकन्या भगिनी बोले । तुवा आमुते वाचविले । माता होसी निर्धारी ॥७९॥
वरिता दोष आपणासी । दूषण ठेवितील सर्व ऋषि । भगिनी तू आमुची होसी । कैसी वरू म्हणे तो ॥८०॥
देवयानी कोपोनि । शाप दिधला ते क्षणी । वृथा विद्या होईल मानी । समस्त विसरे तात्काळी ॥८१॥
माझे अंतःकरणीची आशा । वृथा केली निराशा । विद्या न ये तुज लवलेशा । म्हणूनि शाप दिधला ॥८२॥
कच म्हणे तियेसी । वाया शापिले आम्हांसी । पुरुष वरील तुजसी । ब्रह्मकुळाव्यतिरिक्त ॥८३॥
तुझा पिता ब्रह्मज्ञानी । जाणे अमृतसंजीवनी । तुज शिकविले म्हणोनि । पुढे मंत्र न चाले ॥८४॥
ऐसा शाप देउनी । कच गेला निघुनी । संतोष झाला इंद्रभुवनी । दैत्यजीवन नव्हेची ॥८५॥
शुक्राचा संजीवनी मंत्र । कामा न ये झाला अपात्र । स्त्रियांसी न सांगावा मंत्र । म्हणोनि श्रीगुरु निरूपिती ॥८६॥
स्त्रियांलागी पतिसेवा । याची कारणे मंत्र न द्यावा । व्रतोपवास करावा । गुरु-पुरुष-निरोपाने ॥८७॥
सावित्री विनवी श्रीगुरूसी । व्रत आचरले बहुवसी । तुझे वाक्य आम्हांसी । व्रत एखादे निरोपावे ॥८८॥
तुजवरी माझा विश्वास । तुजवाचोनि नेणू आणिकास । व्रत तूचि आम्हांस । व्रत तुझी चरणसेवा ॥८९॥
भक्ति राहे तुझे चरणी । ऐसा निरोप द्यावा मुनि । म्हणुनी लागली चरणी । कृपा करी म्हणोनिया ॥९०॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । सांगेन तुज व्रत ऐसी । स्थिर होय अहेवपणासी । राज्य पावे तुझा पति ॥९१॥
दंपत्य विनवी श्रीगुरूसी । तुझे वाक्य कारण आम्हासी । जैसा तू निरोप देसी । तेणे रीती रहाटू ॥९२॥
जो गुरुवाक्य न करी । तो पडे रौरवघोरी । तुझे वाक्य आम्हा शिरी । म्हणूनि चरणी लागली ॥९३॥
भक्तवत्सल श्रीगुरुनाथ । सांगता जहाला अतिप्रीत । विस्तारोनि समर्थ । व्रत तिसी सांगतसे ॥९४॥
सिद्ध म्हणे नामधारका । श्रीगुरु म्हणती कौतुका । ऐकताती दंपती निका । अतिप्रीतिकरोनिया ॥९५॥
श्रीगुरु म्हणती तयांसी । सांगेन व्रत इतिहासी । ऋषि पुसती सूतासी । व्रत बरवे निरोपावे ॥९६॥
सूत म्हणे ऋषीश्वरा । व्रत सांगेन मनोहरा । स्त्रिया अथवा पुरुषा बरा । व्रत असे अवधारा ॥९७॥
नित्यानंद असे शांत । निर्विकल्प विख्यात । ऐसा ईश्वर अर्चिता त्वरित । सकळाभीष्टे पाविजे ॥९८॥
संसारसागरात । विषयातुर आचरत । तेही पूजिता पूर्ण भक्त । त्यासी ईश्वर प्रसन्न होय ॥९९॥
विरक्त अथवा संसाररत । विषयातुर आसक्त । जे पूजिती पूर्ण भक्त । त्यासी ईश्वर प्रसन्न होय ॥१००॥
तेणे पाविजे पैलपार । ऐसे बोलती वेदशास्त्र । स्वर्गापवर्गा अधिकार । त्यासी होय परियेसा ॥१॥
विशेष व्रत असे ऐक । सोमवार व्रतनायक । ईश्वरार्चन करा विवेक । सकळाभीष्टे पाविजे ॥२॥
नक्त भोजन उपवासी । जितेंद्रिय करा विशेषी । वैदिक तांत्रिक पूजेसी । विधिपूर्वक सकळिक ॥३॥
गृहस्थ अथवा ब्रह्मचारी । सुवासिनी कन्याकुमारी । भर्तृविण विधवा नारी । व्रत करावे अवधारा ॥४॥
याचे पूर्वील आख्यान । सांगेन ऐका अतिगहन । ऐकता करी पावन । सकळांसही परियेसा ॥५॥
स्कंदपुराणींची कथा । सर्व साद्यंत ऐका । पूर्वयुगी आर्यावर्तका । राजा एक अवधारा ॥६॥
चित्रवर्मा नाम त्यासी । धर्मात्मा राजा परियेसी । धर्ममार्ग आचरे हर्षी । अधर्मति शिक्षा करी ॥७॥
अखिल पुण्ये त्याणे केली । सकल संपत्ति वाढविली । समस्त पृथ्वी जिंकिली । पराक्रमेकरूनिया ॥८॥
सहपत्नी धर्म करिती । पुत्रकाम्ये शिवाप्रती । ऐसा किती काळ क्रमिती । कन्या झाली तयाते ॥९॥
अतिसुंदर सुलक्षण । पार्वतीरूपासमान । तेज फाके सूर्यकिरण । अतिलावण्य न वर्णवे ॥११०॥
वर्तावया जातकासी । बोलाविले ज्योतिषी । द्विज मिळाले अपारेसी । वर्तविती जातक ॥११॥
म्हणती कन्या सुलक्षण । नामे सीमंतिनी जाण । उमेसारखे मांगल्यपण । किंवा दमयंतीस्वरूप होय ॥१२॥
भागीरथीऐसी रूपासी । लक्ष्मीसारिखी गुणराशी । ज्ञाने देवमतासरसी । जानकीसमान पतिव्रता ॥१३॥
सूर्यासारिखी होईल कांति । चंद्रासमान मनशांति । दहा सहस्त्र वरुषे ख्याति । पतीसह राज्य करील ॥१४॥
जातक वर्तवले तिसी । राव पावला अतिहर्षी । अखिल दाने विप्रांसी । देता जाहला अवधारा ॥१५॥
असता राव सभेसी । द्विज एक परियेसी । भय न धरिता वाक्यासी । बोलतसे अवधारा ॥१६॥
ऐक राया माझे वचन । कन्यालक्षण मी सांगेन । चवदावे वर्षी विधवापण । होईल इयेसी जाण पा ॥१७॥
ऐसे वाक्य परिसोनि । राव पडिला मूर्छा येवोनि । चिंता वर्तलि बहु मनी । विप्रवाक्य परिसता ॥१८॥
ऐसे सांगोनि ब्राह्मण । गेला निघोनि तत्क्षण । सर्व दुःखाते पावून । तळमळीत तेधवा ॥१९॥
ऐसे बालपण क्रमिता । सप्त वर्षे जाती तत्त्वता । चिंतीत होती मातापिता । वऱ्हाड केवी करावे ॥१२०॥
चवदावे वर्षी विधवापण । म्हणोनि बोलिला ब्राह्मण । तेणे व्याकुळ अंतःकरण । राजा-राजपत्नीचे ॥२१॥
कन्या खेळे राजांगणी । सवे सखयाते घेवोनि । बोलता ऐकिले विप्रवचनी । चौदावे वर्षी विधवत्व ॥२२॥
ऐसे ऐकोनि वचन । कन्या करीतसे चिंतन । वर्तता आली एक दिन । तया घरी ब्रह्मस्त्री देखा ॥२३॥
याज्ञवल्क्याचिया पत्नी । मैत्रेयी म्हणोनि । घरी आली देखोनि । चरण धरीत तेधवा ॥२४॥
भावे साष्टांग नमूनि । करसंपुट जोडोनि । विनवी करुणावचनी । माते प्रतिपाळी म्हणतसे ॥२५॥
सौभाग्य स्थिर होय जेणे । उपाय सांगे मजकारणे । चंचळ असे अंतःकरणे । म्हणूनि चरणी लागली ॥२६॥
कन्या विनवी तियेसी । ऐसे व्रत सांग आम्हांसी । आम्हा जननी तूचि होसी । व्रत सांग म्हणतसे ॥२७॥
ऐकोनि कन्येच्या वचना । बोले मैत्रेयी जाणा । शरण रिघावे उमारमणा । अहेवपण स्थिर होय ॥२८॥
सोमवार परियेसी । व्रत आचरी नेमेसी । पूजा करावी शिवासी । उपवास करुनी अवधारा ॥२९॥
बरवे सुस्नात होवोनि । पीतांबर नेसोनि । मन स्थिर करोनि । पूजा करावी गौरीहरा ॥१३०॥
अभिषेके पापक्षय । पीठ पूजिता साम्राज्य । गंधाक्षता पुष्पमाल्य । सौभाग्यसौख्य पाविजे ॥३१॥
सौगंध होय धूपाने । कांति पाविजे दीपदाने । भोग नैवेद्यार्पणे । तांबूलदाने लक्ष्मी स्थिर ॥३२॥
चतुर्विध पुरुषार्थ । नमस्कारिता त्वरित । अष्टैश्वर्ये नांदत । ईश्वरजप केलिया ॥३३॥
होमे सर्व कोश पूर्ण । समृद्धि होतसे जाण । करिता ब्राह्मणभोजन । सर्व देवता तृप्त होती ॥३४॥
ऐसे सोमवार व्रत । कन्ये करी वो निश्चित । भव आलिया दुरित । परिहरती महाक्लेश ॥३५॥
गौरीहरपूजा करिता । समस्त दुरिते जाती तत्त्वता । ऐकोनि सीमंतिनी तत्त्वता । अंगिकारिले व्रत देखा ॥३६॥
सोमवारचे व्रत । आचरे सीमंतिनी त्वरित । पिता देखोनि निश्चित । विवाहायोग्य म्हणोनि ॥३७॥
राजा विचारी मानसी । वऱ्हाड करावे कन्येसी । जैसे प्राक्तन असेल तिसी । तैसे घडो म्हणतसे ॥३८॥
विचारोनि मंत्रियांसी । पाठविता झाला राष्ट्रांसी । दमयंतीनळवंशी । इंद्रसेनाचा कुमारक ॥३९॥
चंद्रांगद वर बरवा । जैसा तेज चंद्रप्रभा । बोलाविले विवाहशोभा । कन्या दिधली संतोषे ॥१४०॥

नाना द्रव्यालंकार । वऱ्हाडिका देई नृपवर । अखिल दाने देकार । विप्रालागी देता झाला ॥४२॥
पाठवणी केली सकळिका । जामात ठेविला कौतुका । कन्यास्नेह अनेका । म्हणोनि राहविले राजपुत्रा ॥४३॥
राजपुत्र श्वशुरगृही । स्त्रिया प्रीति अतिस्नेही । काळ क्रमिता एके समयी । जलक्रीडेसी निघाला ॥४४॥
कालिंदी म्हणिजे नदीसी । राजपुत्र परियेसी । सर्व दळ समागमेसी । गेला नदीसी विनोदे ॥४५॥
राजपुत्र निघे नदीत । सवे निघाले लोक बहुत । विनोदे असे पोहत । अतिहर्षे जलक्रीडा ॥४६॥
पोहता राजकुमार देखा । बुडाला मध्ये गंगोदका । आकांत झाला सकळिका । काढा काढा म्हणताती ॥४७॥
सवे सैन्य लोक सकळ । होते नावेकरी प्रबळ । उदकी पाहताती तये वेळ । न दिसे कोठे बुडाला ॥४८॥
उभय तटी सैन्यातून । धावत गेले राजसदना । व्यवस्था सांगती संपूर्ण । जामात तुमचा बुडाला ॥४९॥
कालिंदी नदीच्या डोहात । संगतीने होते पोहत । अदृश्य झाला त्वरित । न दिसे कुमार बुडाला ॥१५०॥
ऐकोनि राजा पडे धरणी । मूर्च्छना येऊनि तत्क्षणी । कन्या ऐकताच श्रवणी । त्यजू पाहे प्राणाते ॥५१॥
राजा कन्येसी संबोखित । आपण गेला धावत । राजस्त्रिया शोक करीत । कन्यादुःखे अतिबहु ॥५२॥
सीमंतिनी करी शोका । म्हणे देवा त्रिपुरांतका । शरण रिघालिया देखा । मरण कैसे न आले मज ॥५३॥
मृत्यु चवदा वर्षी जाण । म्हणोनि धरिले तुमचे चरण । वृथा गेले व्रताचरण । सोमवार शिवाचे ॥५४॥
तव देणे अढळ सकळा । मज उपेक्षिले जाश्वनीळा । अपकीर्ति तुज केवळा । शरणागता रक्षिसी ॥५५॥
स्मरण करी श्रीगुरूसी । याज्ञवल्क्यपत्नीसी । सांगितले व्रत आम्हांसी । सौभाग्य स्थिर म्हणोनिया ॥५६॥
तिचिया वाक्ये करूनि । पूजिली शिवभवानी । वृथा झाली माझे मनी । शीघ्र विनवी शिवासी ॥५७॥
ऐसे दुःखे प्रलापत । सीमंतिनी जाय रडत । गंगाप्रवेश करीन म्हणत । निघाली वेगे गंगेसी ॥५८॥
पिता देखोनि नयनी । धरावया गेला धावोनी । कन्येते आलिंगोनी । दुःख करी अत्यंत ॥५९॥
सकळ मंत्री पुरोहित । सर्व सैन्य दुःख करीत । बोलाविले नावेकरी त्वरित । पहा म्हणती गंगेत ॥१६०॥
गंगा सकळ शोधिती । न दिसे कुमार कवणे गती । शोक करीतसे सीमंती । राजा संबोखी तियेसी ॥६१॥
राजकुमाराचे सेवक । करू लागले बहु दुःख । सांगो गेले पुत्रशोक । इंद्रसेनाकारणे ॥६२॥
ऐकोनिया इंद्रसेन । दुःख करी अतिगहन । भार्येसहित धावून । आला तया मृत्युस्थळा ॥६३॥
दोघे राव मिळोन । शोक करिती दारुण । हा हा कुमारा म्हणोन । ऊर शिर पिटताती ॥६४॥
हा हा पुत्रा ताता म्हणत । राजा गडबडा असे लोळत । मंत्री राजकुळ समस्त । नगरलोक दुःख करिती ॥६५॥
कोठे गेला राजसुत । म्हणोनि सीमंतिनी रडत । खिन्न झाले समस्त । मातापितर श्वशुरादि ॥६६॥
कोणे स्थानी पति गेले । म्हणोनि सीमंतिनी लोळे । ललाट हस्ते पिटिले । पार नाही शोकासी ॥६७॥
सीमंतिनी म्हणे पितयासी । प्राण त्यजीन पतिसरसी । वाचूनिया संसारासी । वैधव्य कोण भोगील ॥६८॥
पुसे सकळ द्विजासी । करावे की सहगमनासि । विप्र सांगती रायासी । प्रेतावेगळे करू नये ॥६९॥
प्रेत शोधावे नदीत । दहन करावे कन्येसहित । न दिसे बुडाला गंगेत । केवी सहगमन होईल ॥१७०॥
आता इसी ऐसे करणे । प्रेत सापडे तववरी राखणे । ऐकोनिया द्विजवचने । राजा कन्ये विनवीतसे ॥७१॥
ऐसे व्याकुळ दुःखे करिती । मंत्री पुरोहित म्हणती । जे असेल होणार गती । ब्रह्मादिका चुकेना ॥७२॥
होणार जहाली देवकरणी । काय कराल दुःख करोनी । ऐसे मंत्री संबोखुनी । रायाते चला म्हणती ॥७३॥
निघाले राजे उभयता । मंदिरा पावले दुःख करिता । इंद्रसेन अति दुःखिता । न विसरे कधी पुत्रशोक ॥७४॥
राज्य-व्यापार सोडूनि । दुःख करी पुत्रचिंतनी । गोत्रजी राज्य हिरूनी । कपटे घेतले तयाचेच ॥७५॥
सहभार्या रायासी । ठेविते झाले कारागृहासी । पुत्रशोके बहु त्यासी । राज्यभोग चाड नाही ॥७६॥
चित्रवर्मा राव देखा । कन्या ठेविली ममत्विका । प्राण त्यजू पाहे निका । लोक निंदितील म्हणोनि ॥७७॥
राव म्हणे कन्येसी । पुत्र नाही आमुचे वंशी । कन्या एक तू आम्हांसी । पुत्रापरी रहाटावे ॥७८॥
लोक निंदितील आम्हांसी । वैधव्य आले परियेसी । वर्ष एक क्रमिलियासी । पुढे आचार करी वो बाळे ॥७९॥
पित्याचे वचन ऐकोनी । करीतसे बहु चिंतनी । म्हणे देवा शूळपाणि । केवी माते गांजिले ॥१८०॥
ऐसे विचारुनी मानसी । व्रत आचरे तत्परेसी । सोमवार उपवासासी । ईश्वरपूजा करीतसे ॥८१॥
इकडे तो राजकुमार । बुडाला होता गंगापूर । गेला जेथे पाताळनगर । वासुकी जेथे राज्य करी ॥८२॥
नागलोकीचिया नारी । आल्या होत्या नदीतीरी । राजकुमार आला पुरी । नदीतटाकी वहातसे ॥८३॥
देखोनिया नागकन्या । काढिती संतोषे करोनिया । अमृता शिंपिती आणुनिया । सावध केला तयाते ॥८४॥
कन्या मिळूनि त्यासी । घेवोनि जाती तक्षकापासी । विचित्र नगर परियेसी । राजपुत्र पहात असे ॥८५॥
पाहे पाताळनगर-रचना । जैसी शोभा इंद्रभुवना । गोपुरे दिसती महारत्ना । विद्युल्लतेपरी ॥८६॥
इंद्रनीळ वैडुर्यैसी । मानिके मुक्ताफळांसी । महारम्य पुरी जैसी । सूर्यकांति मिरवत ॥८७॥
चंद्रकांतिसरसी भूमि । महाद्वारे कपाट हेमी । अनेक रत्ने नाही उपमी । ऐशा मंदिरा प्रवेशला ॥८८॥
पुढे देखिली सभा थोर । समस्त बैसले सर्पाकार । आश्चर्य करी राजकुमार । असंख्य सर्प दिसताती ॥८९॥
सभेमध्ये अतिशोभित । मध्ये बैसला पन्नगनाथ । जैशी सूर्यकांति फाकत । अति उन्नत बैसला ॥१९०॥
अनेक शत फणा दिसती । जैशी वीज लखलखती । पीतांबरे सज्योती । रत्नकुंडलमंडित ॥९१॥
अनेकरत्नखचित देखा । मुकुट मिरवती सहस्त्र एका । सहस्त्रफणी मिरवे तक्षका । ऐसा सभे बैसला असे ॥९२॥
रूपयौवन नागकन्या । नानापरी भरणे लेवोनिया । अनेक सहस्त्र येवोनिया । सेवा करिती तक्षकाची ॥९३॥
ऐशा सभास्थानी देख । राव बैसला तक्षक । देखोनिया राजकुमारक । नमन करी साष्टांगी ॥९४॥
तक्षक पुसे नागकन्यांसी । कैचा कुमार आणिलासी । सुलक्षण दिसतो कैसी । कोठे होता म्हणे तया ॥९५॥
नागकन्या म्हणती त्यासी । नेणो नाम याचे वंशी । वहात आला यमुनेसी । घेऊन आलो तुम्हांजवळी ॥९६॥
तक्षक पुसे राजकुमारासी । नाम कवण कवणे वंशी । काय कारणे आलासी । कवण देशी वास तुझा ॥९७॥
सांगे राजकुमार देख । आम्ही भूमंडळनायका । नैषध राजपति ऐका । नळनामे पुण्यश्लोक ॥९८॥
त्याचा पुत्र इंद्रसेन । जन्म आमुचा त्यापासून । चंद्रांगद नामे आपण । गेलो होतो श्वशुरागृहा ॥९९॥
जलक्रीडा करावयासी । गेलो होतो यमुनेसी । विधिवशे आम्हांसी । बुडालो नदी अवधारा ॥२००॥
वहात आलो नदीत । नागकन्या मज देखत । घेवोनि आल्या तुम्हांप्रत । पूर्वभाग्ये करूनि ॥१॥
पूर्वार्जित पुण्यवंशी । भेटी झाली चरणांसी । धन्य माझे जीवित्वासी । कृतार्थ झालो म्हणतसे ॥२॥
करुणावचन ऐकोनि । तक्षक बोले संतोषोनि । नको भिऊ म्हणोनि । धैर्य तया दिधले ॥३॥
शेष म्हणे रे बाळा । तू आहेसी मन निर्मळा । तुमचे घरी सर्वकाळा । दैवत कोण पूजितसा ॥४॥
ऐसे ऐकोनि राजकुमार । हर्षे जहाला निर्भर । सांगतसे विस्तार । आपुला देव शंकर ॥५॥
सकळ देवांचा देव । नाम ज्याचे सदाशिव । वामांगी उमा अपूर्व । त्यालागी पूजू निरंतर ॥६॥
ज्यापासोनि जनित ब्रह्मा । सृष्टि सृजितो अनुपमा । तो सदाशिव आम्हा । निज दैवत निधरि ॥७॥
तयाच्या सत्त्वगुणेसी । विष्णु उपजला परियेसी । प्रतिपाळक लोकांसी । तो सदाशिव आराधितो ॥८॥
ज्याच्या तामसगुणे जाण । एकादश रुद्रगण । उपजले असती याकारण । प्रलयकर्ता या नाव ॥९॥
धाता विधाता आपण । उत्पत्तिस्थितिलयाकारण । तेजासी तेज असे जाण । तैसा ईश्वर पूजितसो ॥२१०॥
पृथ्वी आप तेजासी । जो पूर्ण वायु आकाशी । तैसा पूजितसो शिवासी । म्हणे राजकुमार देखा ॥११॥

ज्याची कथा वेद जहाले । तक्षक शेष ज्याची कुंडले । त्रिनेत्री असे चंद्र मोळे । तैसा शंकर पूजितसो ॥१३॥
ऐसे ऐकोनि वचन । तक्षक संतोषला अतिगहन । राजकुमारा आलिंगोन । तुष्टलो तुष्टलो म्हणतसे ॥१४॥
तक्षक बोले तये वेळी । तुज देईन राज्य सकळी । तुवा रहावे पाताळी । आनंदे भाग्य भोगीत ॥१५॥
माझ्या लोकी जे जे रत्न । ते ते देईन तुजकारण । पावोनिया समाधान । सुखे येथे रहावे ॥१६॥
पाताळ लोकीची रचना । पहावी तुवा अनुपमा । कल्पवृक्ष मनोरमा । आहेत माझ्या नगरात ॥१७॥
अमृत न देखती स्वप्नी कोणी । ते भरले असे जैसे पाणी । तळी बावी पोखरणी । अमृताच्या माझ्या घरात ॥१८॥
नाही मरण तव येथे । रोगपीडादि समस्ते । नेणती कोणी स्वप्नावस्थे । ऐसे नगर माझे असे ॥१९॥
सुखे रहावे येथे स्वस्थ । तक्षक कुमारक सांगत । राजपुत्र असे विनवीत । करुणावचने ॥२२०॥
राजपुत्र विनवी तक्षकासी । मी एकलाची पितयाचे कुशी । भार्या चतुर्दश वर्षी । शिवपूजनी रत सदा ॥२१॥
नूतन झाले माझे पाणिग्रहण । गुंतले तेथे अंतःकरण । पाहीन मातापिताचरण । तेणे सर्वस्व पावलो ॥२२॥
आपण बुडालो नदीत । पिता माता दुःख करीत । पत्नी जीव त्यागील सत्य । हत्या पडे मस्तकी ॥२३॥
देखिले तव चरण आपण । तेणे झालो धन्य धन्य । रक्षिला आपण माझा प्राण । दर्शन करा मातापिता ॥२४॥
तक्षक झाला संतोषित । नाना रत्ने त्यासी देत । अमृत पाजिले बहुत । आण्क दिधले स्त्रियेसी ॥२५॥
कल्पवृक्षफळे देती । अपूर्व वस्तु आभरणे त्यासी । जे अपूर्व असे क्षिती । अमोल्य वस्तु देता जहाला ॥२६॥
इतुके देवोनि कुमारकासी । तक्षक बोले परियेसी । जे जे काळी आम्हा स्मरसी । तव कार्य सिद्धि पावेल ॥२७॥
आणिक संतोषोनि चित्ती । वस्त्रे वाहने मागुती । तुरंग दिधले मनोगती । सवे दे कुमार आपुला ॥२८॥
चंद्रांगदकुमारासी । इतके दिधले आनंदेसी । निरोप दिधला परियेसी । वाहन तुरंग मनोहर ॥२९॥
तक्षका नमूनि त्वरित । वारूवरी आरूढ राजसुत । मनोवेगे मार्ग क्रमित । नागकुमार सवे जाणा ॥२३०॥
जिये स्थानी बुडाला होता । तेथे पावला क्षण न लागता । निघाला बाहेर वारूसहिता । नदीतटाकी उभा असे ॥३१॥
सोमवार त्या दिवशी । सीमंतिनी आली स्नानासी । सवे होत्या सखी सेवेसी । नदीतीरी उभी असे ॥३२॥
सीमंतिनी म्हणे सखियासी । आश्चर्य वाटे मानसी । उदकातुनी निघाला परियेसी । सवे असे नागपुत्र ॥३३॥
राक्षस होई की वेषधरू । रूप धरिले असे नरू । दिसतसे मनोहरू । तुरंगारूढ जाहला असे ॥३४॥
कैसे पहा हो रूप यासी । जेवी सूर्य प्रकाशी । दिव्यमालांबरे कैसी । सुगंध असे परिमळा ॥३५॥
दश योजनेपर्यंत । सुवास येतसे अमित । पूर्वी देखिला असे रूपवंत । भासे त्यासी पाहिला ॥३६॥
स्थिर स्थिर भयभीता । त्याचिया पहाती स्वरूपता । आपुला पतीसादृश्य म्हणता । रूप आठवी तये वेळी ॥३७॥
राजपुत्र पाहे तियेसी । म्हणे स्वरूपे माझी स्त्री ऐसी । गळसरी न दिसे कंठासी । हार नसे मुक्ताफळ ॥३८॥
अवलोकितसे अंगखूण । न दिसे हळदी करी कंकण । चित्ती व्याकुळ रूपहीन । सदृश दिसे प्राणेश्वरी ॥३९॥
मनी विचरी मागुता । रूप तिचे आठविता । तुरंगावरूनि उतरता । नदीतीरी बैसला असे ॥२४०॥
बोलावोनि तियेसी । पुसतसे अति प्रेमेसी । तुझा जन्म कवणे वंशी । पुरुष तुझा कोण सांगे ॥४१॥
का कोमाइलीस बाळपणी । दिससी शोके म्लान लक्षणी । सांगावे मज विस्तारोनि । अति स्नेहे पुसतसे ॥४२॥
ऐकोनि सीमंतिनी देखा । आपण न बोले लज्जे ऐका । सखियांसी म्हणे बालिका । वृत्तान्त सांगा समस्त ॥४३॥
सखिया सांगती तयासी । हे सीमंतिनी नाम परियेसी । चंद्रांगदाची महिषी । चित्रवर्म्याची हे कन्या ॥४४॥
इचा पति अतिसुंदर । चंद्रांगद नामे थोर । जळक्रीडा करिता फार । येथे बुडाला नदीत ॥४५॥
तेणे शोक करिता इसी । वैधव्य आले परियेसी । दुःख करीत तीन वर्षी । लावण्य इचे हरपले ॥४६॥
सोमवारव्रत करीत । उपवास पूजादि आचरत । आज स्नानानिमित्त । आली असे नदीसी ॥४७॥
इच्या श्वशुराची स्थिति देखा । पुत्रशोके विकळ ऐका । राज्य घेतले दायादिका । कारागृही घातले ॥४८॥
या कारणे सीमंतिनी । नित्य पूजी शूलपाणि । सोमवार उपोषणी । म्हणोनि करिती परियेसा ॥४९॥
इतके सख्या सांगती । मग बोले आपण सीमंती । किमर्थ पुसता आम्हांप्रती । आपण कोण कंदर्परूपी ॥२५०॥
गंधर्व किंवा तुम्ही देव । किन्नर अथवा सिद्ध गंधर्व । नररूप दिसता मानव । आमुते पुसता कवण कार्या ॥५१॥
स्नेहभावे करोनी । पुसता तुम्ही अति गहनी । पूर्वी देखिले होते नयनी । न कळे खूण म्हणतसे ॥५२॥
आप्तभाव माझ्या मनी । स्वजन तसे दिसता नयनी । नाम सांगा म्हणोनि । आठवी रूप पतीचे ॥५३॥
आठवोनि पतीचे रूप । करू लागली अति प्रलाप । धरणी पडली रुदितबाष्प । महादुःख करीतसे ॥५४॥
तियेचे दुःख देखोनि नयनी । कुमार विलोकी तटस्थपणी । मुहूर्त एक सावरोनि । आपण दुःख करीतसे ॥५५॥
दुःख करोनिया देखा । प्रक्षाळिले आपुल्या मुखा । उगी राहे म्हणे ऐका । आमुचे नाम सिद्ध म्हणे ॥५६॥
सीमंतिनी करिता शोक अपार । जवळी आला राजकुमार । हाती धरली सत्वर । संबोखीतसे प्रेमभावे ॥५७॥
एकांती सांगे तियेसी । म्हणे तुझ्या भ्रतारासी । देखिले आम्ही दृष्टीसी । सुखी आता असावे ॥५८॥
तव व्रतपुण्ये करोनी । पति शीघ्र पहासी नयनी । चिंता करून नको म्हणोनी । तृतीय दिनी भेटेल ॥५९॥
तव पति माझा सखा । प्राण तोचि ऐका । संदेह न करी वो बालिका । आण शिवचरणाची ॥२६०॥
ऐसे एकांती सांगून । प्रगट न करी म्हणून । दुःख आठवले ऐकून । सीमंतिनी बाळिकेसी ॥६१॥
सुटल्या धारा लोचनी । प्रेमे रडे स्फुंदोनी । विचार करी सीमंतिनी । हाचि होय मम पति ॥६२॥
पतीसारिखे मुखकमळ । नयन सुंदर अति कोमळ । ध्वनि बोलता ज्याची मंजुळ । अति गंभीर बोलतसे ॥६३॥
मृदु वाणी पतीसरसी । तैसाची बोले तो हर्षी । धरिता माझिया करासी । अति मृदु लागले ॥६४॥
माझे पतीचे लक्षण । मी जाणे सर्व खूण । हाचि होय माझा प्राण । समस्त चिन्हे असती ॥६५॥
यास देखोनि नयनी । धारा सुटल्या प्रेमे जीवनी । नवलपरी विचारूनी । मागुती अनुमान करीत ॥६६॥
दैवहीन असे आपण । कैसा पति येईल म्हणोन । बुडाला नदीत जाऊन । मागुती कैसी भ्रांति म्हणे ॥६७॥
मेला पति मागुती येता । ऐशी न ऐकिली कानी कथा । स्वप्न देखिले की भ्रांता । काय कळते माझे मना ॥६८॥
धूर्त होय की वेषधारा । राक्षस यक्ष किंवा किन्नरी । कपटे प्रगटला नदीतीरी । म्हणोनि कल्पना करीतसे ॥६९॥
किंवा पावला शिवव्रते । की धाडिला गिरिजानाथे । संकट जाणोनि आमुच्या येथे । मैत्रेयीकारणे धाडिला ॥२७०॥
ज्यास प्रसन्न शंकर । त्यास कैचा दुःखविकार । चिंतिले पाहिजे निर्धारे । ऐसे चिंती सीमंतिनी ॥७१॥
ऐसे होता राजकुमार । आरूढला वारूवर । निरोप मागे प्रीतिकर । सीमंतिनी नारीसी ॥७२॥
निघाला अश्व मनोवेगे । पातला नगरा अतिशीघ्रे । वासुकीपुत्र होता संगे । तया पाठवी नगरांत ॥७३॥
त्वा जावोनि वैरियांसी । इष्टती सांगा वादीयासी । न ऐकता तव बोलासी । संहारीन बोलावे ॥७४॥
ऐसे वचन ऐकोनि । त्वरित पावला राजभुवनी । उभा राहोनि कठोर वचनी । बोलतसे नगराधिपतीसी ॥७५॥
चला शीघ्र कुटुंबेसी । चंद्रांगदाचे भेटीसी । तक्षकाचे दर्शनासी । गेला होता पाताळी ॥७६॥
कालिंदीये नदीत । बुडाला हे ऐकोनिया मात । तुम्ही केला स्वामीघात । राज्य घेतले इंद्रसेनाचे ॥७७॥
आता सांगेन तुम्हांसी । चाड असे जरी प्राणासी । शरण जावे तयासी । इंद्रसेना स्थापोनी ॥७८॥
तक्षकासारखा मैत्र जोडला । दिधले नवनागसहस्त्रबळा । शीघ्र लागा चरणकमळा । चंद्रांगदाचे जाऊनी ॥७९॥
न ऐकाल माझ्या वचना । तरी आताचि घेतो प्राणा । तक्षके पाठविले आपणा । पारिपत्याकारणे हो ॥२८०॥
ऐसे वचन ऐकोनी । शत्रु भयाभीत मनी । हीन बुद्धि केली जाणोनी । आता शरण रिघावे ॥८१॥
जरी करू बलात्कार । तक्षक करील संहार । लोकात होई निंदा फार । प्राण जाईल आपुला ॥८२॥

सकळ विनविती त्यासी । अपराध घडला आम्हांसी । प्राण राखा वेगेसी । म्हणोनि चरणी लागले ॥८४॥
राया इंद्रसेनासी । तक्षकपुत्र सांगे त्यासी । तुमचा पुत्र आला परियेसी । वासुकी भेटी गेला होता ॥८५॥
ऐकोनि राव संतोषी त्यासी । आठवोनि अधिक दुःखासी । मूर्छा येवोनि धरणीसी । पत्नीसहित पडियेला ॥८५॥
नागकुमरे उठविले त्यासी । दुःख कासया करावे हर्षी । येईल पुत्र भेटीसी । त्वरे करोनि आतांची ॥८६॥
मग राव अतिहर्षी । बोलावित मंत्रियांसी । नगर श्रृंगारावयासी । निरोप दिधला तये वेळी ॥८७॥
ऐसा निरोप देऊन । भेटी निघाला आपण । सकळ दायाद स्वजन । राणीवसा आदिकरूनि ॥८९॥
मंत्रीपुरोहितासहित । निघाले लोक समस्त । कौतुक पाहो म्हणत । मेला पुत्र कैसा आला ॥२९०॥
आनंद झाला सकळिका । राव मानि महाहरिखा । पाहीन म्हणे पुत्रमुखा । अति आवडीने अवधारा ॥९१॥
सवे वाजंत्र्यांचे गजर । नगरलोका संतोष थोर । करिताती जयजयकार अति उल्हास करिताती ॥९२॥
ऐसे जाऊनि पुत्रासी । भेटी झाली रायासी । चंद्रांगद पितयासी । नमस्कारी साष्टांगे ॥९३॥
अति प्रेमे पुत्रासी । आलिंगी राव त्वरेसी । सद्गदित कंठेसी । नेत्री सुटल्या अश्रुधारा ॥९४॥
पुत्रासी म्हणे इंद्रसेन । आलासी बाळा माझा प्राण । श्रमलो होतो तुजविण । म्हणोनि सांगे दुःख आपुले ॥९५॥
मातेते आलिंगोन । दुःख करी ती अतिगहन । विनवीत तिये संबोखोन । मजनिमित्त कष्टलिसी ॥९६॥
पुत्र नव्हे मी तुमचा शत्रू । जाऊनि आपुले सुखार्थु । तुम्हा दुखविले की बहुतु । नेदीच सुख तुम्हाते ॥९७॥
आपण जावोनि पाताळी । राहिलो सुखे शेषाजवळी । तुम्ही कष्टलीत बहुतकाळी । मजनिमित्त अहोरात्र ॥९८॥
काष्ठासरी अंतःकरण । माझे असे की सत्य जाण । माताजीव जैसे मेण । पुत्रानिमित्त कष्ट बहुत ॥९९॥
मातापितयांचे दुःख । जो नेणे तोचि शतमूर्ख । उत्तीर्ण व्हावया अशक्य । स्तनपान एक घडीचे ॥३००॥
मातेवीण देव देखा । पुत्रासि नाही विशेखा । कवण उत्तीर्ण नव्हे ऐका । माता केवळ मृडानी ॥१॥
दुःख देत जननीसी । तो जाय यमपुरासी । पुत्र नव्हे त्याचे वंशी । सप्तजन्मी दरिद्री ॥२॥
ऐसे मातेसि विनवूनी । भेटतसे तो भाऊबहिणी । इष्ट सोयरे अखिल जनी । प्रधानासमवेत नागरिका ॥३॥
इतुकिया अवसरी । प्रवेश केला नगराभीतरी । समारंभ केला अति थोरी । पावले निजमंदिरा ॥४॥
तक्षकाचे पुत्रासी । गौरविले सन्मानेसी । वस्त्रे भूषणे रत्नेसी । इंद्रसेने अतिप्रीती ॥५॥
चंद्रांगद सांगे पितयासी । तक्षक उपकार विस्तारेसी । प्राण वाचविला आम्हासी । द्रव्य दिधले अपार ॥६॥
सुंदर वस्त्रे आभरणे । दिधली होती तक्षकाने । पिता देखोनि संतोषाने । म्हणे धन्य तक्षक ॥७॥
निरोप दिधला नागपुत्रासी । बोळविले तयासी । भृत्य पाठविले वेगेसी । चित्रवर्म्याचे नगरात ॥८॥
राव म्हणे तये वेळी । सून माझी दैवे आगळी । तिचे धर्मे वाचला बळी । पुत्र माझा अवधारा ॥९॥
तिणे आराधिला शंकर । तेणे कंकण चुडे स्थिर । तेणे वाचला माझा कुमर । सौभाग्यवती सून माझी ॥३१०॥
म्हणोनि पाठविले वेगेसी । लिहोनिया वर्तमानासी । चित्रवर्मरायासी । इंद्रसेन रायाने ॥११॥
हेर निघाले सत्वरी । चित्रवर्म्याचिये नगरी । व्यवस्था सांगितली कुसरी । चंद्रांगदशुभवार्ता ॥१२॥
संतोषे राजा ऐकोनि देखा । करिता झाला महासुखा । दाने दिधली अपार ऐका । रत्ने भूषणे हेरांसी ॥१३॥
इंद्रसेन राजा सत्वर । पुनरपि करावया वऱ्हाड थोर । चंद्रांगद बडिवार । सेना घेवूनि निघाला ॥१४॥
महोत्साह झाला थोर । वऱ्हाड केले धुरंधर । चंद्रांगद प्रीतिकर । सीमंतिनीसी भेटला ॥१५॥
पाताळींची अमोल्य वस्तु । प्राणेश्वरीसी अर्पित । पाजिता झाला अमृत । महानंद प्रवर्तला ॥१६॥
कल्पवृक्षफळ देखा । देवोनि तोषविला नायका । अमोल्य वस्त्राभरणी देखा । दश योजने तेज फाके ॥१७॥
ऐसा उत्साह विवाह केला । आपुले पुरीसी निघाला । सीमंतिनीचे वैभवाला । जोडा नसे त्रिभुवनी ॥१८॥
मग जावोनि नगरासी । राज्यी स्थापिला पुत्रासी । दहा सहस्त्र पूर्ण वर्षी । राज्य केले चद्रांगदे ॥१९॥
सीमंतिनी करी व्रतासी । उपवास सोमवारासी । पूजिले गौरीहरासी । म्हणोनि पावली इष्टार्थ ॥३२०॥
ऐसे विचित्र असे व्रत । म्हणोनि सांगे श्रीगुरुनाथ । ऐक सुवासिनी म्हणत । अति प्रीती निरूपिले ॥२१॥
ऐसे करी वो आता व्रत । चुडे कंकणे अखंडित । कन्या पुत्र होती बहुत । आमुचे वाक्य अवधारी ॥२२॥
दंपत्य विनवी श्रीगुरूसी । तुमची चरणसेवा आम्हांसी । पुरविती मनोरथासी । आम्हा व्रत कायसे ॥२३॥
आमचा तू प्राणनायक । तुजवाचोनि नेणो आणिक । तव स्मरणमात्रे असे निक । म्हणोनि चरणी लागली ॥२४॥
श्रीगुरु म्हणती तयासी । आमुचे निरोपे करा ऐसी । व्रत आचरा सोमवारासी । तेचि सेवा आम्हा पावे ॥२५॥
निरोप घेऊनि श्रीगुरूचा । नेम धरिला सोमवाराचा । भेटीलागी तयाच्या । मातापिता पावली ॥२६॥
ऐकोनिया कन्यापुत्रवार्ता । संतोषली त्याची माता । द्रव्य वेचिले अपरिमिता । समाराधना ब्राह्मणांसी ॥२७॥
पूजा करिती श्रीगुरूसी । आनंद अति मानसी । समारंभ दिवानिशी । बहुत करिती भक्तीने ॥२८॥
ऐशापरी वंदोनी । श्रीगुरूचा निरोप घेउनी । गेली ग्रामा परतोनी । ख्याती झाली चहू राष्ट्री ॥२९॥
पुढे त्या दंपतीसी । पाच पुत्र शतायुषी । झाले आशीर्वादेसी । श्रीगुरूरायाच्या ॥३३०॥
प्रतिवर्षी दर्शनासी । दंपती येती भक्तीसी । ऐसे शिष्य परियेसी । श्रीगुरूचे माहात्म्य ॥३१॥
ऐसे श्रीगुरुचरित्र । सिद्ध सांगे पवित्र । नामधारक अतिप्रीती । ऐकतसे अवधारा ॥३२॥
गंगाधराचा कुमर । सरस्वती विनवी गुरुकिंकर । स्वामी माझा पारंपार । श्रीनृसिंहसरस्वती ॥३३॥
ऐसा वरदमूर्ति देखा । सकळ जन तुम्ही ऐका । प्रसन्न होईल तात्काळिका । न धरावा संदेह मानसी ॥३४॥
साखर स्वादु म्हणावयासी । उपमा द्यावी कायसी । मनगटीचे कंकणासी । आरसा कासया पाहिजे ॥३५॥
प्रत्यक्ष पाहता दृष्टान्तेसी । प्रमाण कासया परियेसी ।ख्याती असे भूमंडळासी । कीर्ति श्रीगुरुयतीची ॥३६॥
ऐका हो जन समस्त । सांगतो मी उत्तम होत । सेवा करिता श्रीगुरुनाथ । त्वरित होय मनकामना ॥३७॥
अमृताची आरवटी । घातली असे गोमटी । पान करा हो तुम्ही घोटी । धणीवरी सकळिक ॥३८॥
श्रीगुरुचरित्र कामधेनु । ऐकता होय पतित पावनु । नाम ज्याचे कामधेनु । तो चिंतिले पुरवित ॥३९॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । सीमंतिनी आख्यान विख्यात । पंचत्रिंशत अध्यायात । कथासार सांगितली ॥३४०॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे सीमंतिन्याख्यानं नाम पंचत्रिंशोऽध्यायः ।
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥३५॥ श्रीगुरुदेव दत्त ॥
(ओवीसंख्या ३४०)

f श्रीगणेशाय नमः । शिष्योत्तम नामकरणी । लागे सिद्धाचे चरणी । विनवीतसे कर जोडोनि । भक्तिभावे करूनिया ॥१॥
जय जयाजी सिद्ध मुनि । तूचि तारक भवार्णी । तूचि होसी ब्रह्मज्ञानी । अविद्यातिमिरभास्कर ॥२॥
मायामोहरजनीत । होतो आपण निद्रिस्त । कृपासागर श्रीगुरुनाथ । जागृत केले आम्हांसी ॥३॥
तिमिरहरण भास्करु । मज भेटलासी गुरु । कडे केले भवसागरु । चिन्मयात्मा सिद्ध मुनि ॥४॥
ऐसे म्हणोनि सिद्धासी । विनवी भावभक्तीसी । गुरुमूर्ति संतोषी । अभयकर देतसे ॥५॥
पुढे चरित्र केवी झाले । विस्तारावे स्वामी वहिले । आमुते स्वामी कृतार्थ केले । ज्ञानामृत प्राशवून ॥६॥
कथामृत ऐकता श्रवणी । तृप्ति न होय अंतःकरणी । निरोपावे विस्तारोनि म्हणोनि चरणी लागला ॥७॥
सिद्ध म्हणे नामधारका । पुढील कथा झाली निका । एकचित्ते तुम्ही ऐका । ज्ञान होय समस्तांसी ॥८॥
गाणगापुरी असता श्रीगुरु । महिमा वाढली अपरंपारु । बोलता असे विस्तारु । तावन्मात्र सांगतसो ॥९॥
महिमा एकेक सांगता । विस्तार होईल बहु कथा । अवतार श्रीहरी साक्षाता । कवण शके वर्णावया ॥१०॥
तया गाणगापुरात । होता विप्र वेदरत । विरक्त असे बहुश्रुत । कर्ममार्गे वर्ततसे ॥११॥
न घेतला प्रतिग्रह त्याणे । परान्नासी न वचे नेणे । मिथ्या वाचे नेणे । अनुवाद आपण न करीच ॥१२॥
नित्य शुष्क भिक्षा करी । तेणे आपुले उदर भरी । तयाची नारी असे घरी । क्रोधवंत परियेसा ॥१३॥
याचकवृत्ति तो ब्राह्मण । कंठी संसार सामान्यपणे । अतीत- अभ्यागताविणे । न घेई अन्न प्रत्यही ॥१४॥
तया ग्रामी प्रतिदिवसी । विप्र येती समाराधनेसी । सहस्त्र संख्या ब्राह्मणांसी । मिष्टान्न घालिती परियेसा ॥१५॥
समस्त जावोनि भोजन करिती । तया विप्रवनितेप्रती । येऊनि गृही स्तुति करिती । अनेक परीची पक्वान्ने ॥१६॥
ऐकोनि तया विप्रनारी । नानापरी दुःख करी । परमेश्वरा श्रीहरी । म्हणोनि चिंती मनात ॥१७॥
कैसे दैव आपुले हीन । नेणे स्वप्नी ऐसे अन्न । दरिद्री पतीसी वरून । सदा कष्ट भोगितसे ॥१८॥
पूर्वजन्मीचे आराधन । तैसा आपणासी पति हीन । सदा पाहे दरिद्रपण । वर्ततसो देवराया ॥१९॥
समस्त विप्र स्त्रियांसहित । नित्य परान्नभोजन करीत । पूर्वजन्मीचे सुकृत । केले होते समस्ती ॥२०॥
आपुला पति दैवहीन । कदा नेणे परान्नभोजन । काय करावे नारायण । म्हणोनि चिंती मनात ॥२१॥
वर्तता ऐसे तया स्थानी । आला विप्र महाधनी । अपरपक्ष करणे मनी । म्हणोनि आला परियेसी ॥२२॥
तया स्थानी विप्रासी । क्षण दिले परियेसी । सवे त्यांच्या स्त्रियांसी । आवंतिले तिही परियेसा ॥२३॥
देखोनि ते विप्रवनिता । पतीजवळी आली त्वरिता । सांगती झाली विस्तारता । आमंत्रण ब्राह्मणाचे ॥२४॥
अनेक परीची पक्वान्ने । देताती वस्त्रे परिधाने । अपार दक्षिणाद्रव्यदाने । देताती ऐके प्राणेश्वरा ॥२५॥
याते स्वामी अंगीकारणे । अथवा आपण निरोप देणे । कांक्षा करिते माझे मन । अपूर्व अन्न जेवावे ॥२६॥
ऐकोनि तियेचे वचन । निरोप देत ब्राह्मण । सुखे जावे करी भोजन । आपणा न घडे म्हणतसे ॥२७॥
निरोप घेउनी तये वेळी । गेली तया गृहस्थाजवळी । आपण येऊ भोजनकाळी । म्हणोनि पुसे तयासी ॥२८॥
विप्र म्हणे तियेसी । आम्ही सांगू दंपतीसी । बोलावी आपुल्या पतीसी । तरीच आमुच्या गृहा यावे ॥२९॥
ऐकोनि तयाचे वचन । झाली नारी खेदे खिन्न । विचार करी आपुले मन । काय करावे म्हणोनिया ॥३०॥
म्हणे आता काय करणे । कैसे दैव आपुले उणे । बरवे अन्न स्वप्नी नेणे । पतीकरिता आपणासी ॥३१॥
विचारोनि मानसी । आली नृसिंहगुरूपासी । नमन करी साष्टांगेसी । अनेकापरी विनवीतसे ॥३२॥
म्हणे स्वामी काय करणे । बरवे अन्न कधी नेणे । आपुले पतीसी सांगणे । आवंतणे बरवे येतसे ॥३३॥
सांगू म्हणती दंपतीसी । माझा पति नायके वचनासी । न वचे कधी परान्नासी । काय करू म्हणतसे ॥३४॥
स्वामी आता कृपा करणे । माझ्या पतीते सांगणे । बरवी येताती आमंत्रणे । अन्नवस्त्र देताती ॥३५॥
ऐकोनि तियेचे वचन । श्रीगुरुमूर्ति हास्यवदन । बोलावूनिया तत्क्षण । सांगती तया द्विजासी ॥३६॥
श्रीगुरु म्हणती तयासी । जावे तुम्ही आवंतणेसी । तुझे स्त्रियेचे मानसी । असे मिष्टान्न जेवावे ॥३७॥
तिचे मनींची वासना जाण । तुवा पुरवावी कारण । सदा दुश्चित अंतःकरण । कुलस्त्रियेचे असो नये ॥३८॥
ऐकोनि श्रीगुरूचे वचन । नमन करी तो ब्राह्मण । विनवीतसे कर जोडून । परान्न आपणा नेम असे ॥३९॥
गुरुवचन जो न करी । तोचि पडे रौरवघोरी । निरोप तुमचा माझ्या शिरी । जाईन त्वरित म्हणतसे ॥४०॥
पुसोनिया श्रीगुरूसी । आले दंपत्य आवंतणेसी । आनंद झाला बहुवसी । तया विप्रस्त्रियेते ॥४१॥
पितृनाम उच्चारोन । संकल्प करी तो ब्राह्मण । अनेक परीचे मिष्टान्न । वाढिती तया दंपतीसी ॥४२॥
भोजन करिता समयासी । दिसे विपरीत तियेसी । श्वान सूकर येउनी हर्षी । समागमे जेविताती ॥४३॥
कंटाळले तिचे मन । उठली आपण त्यजुनी अन्न । जे जेवीत होते ब्राह्मण । तया समस्तांसी सांगतसे ॥४४॥
ऐसेपरी पतीसहित । आली नारी चिंताक्रांत । पतीस सांगे वृत्तान्त । श्वानउच्छिष्ट जेविलेती ॥४५॥
स्त्रियेसी म्हणे तो ब्राह्मण । तुझे नि आपुले दैव हीन । घडले आपणासी परान्न । उच्छिष्ट श्वानसूकरांचे ॥४६॥
ऐसे म्हणोनि स्त्रियेसी । आली दोघे श्रीगुरुपासी । नमन केले परियेसी । ऐका श्रोते एकचित्ते ॥४७॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । कैसे सुख परान्नासी । सदा दुखविसी पतीसी । पुरले तुझे मनोरथ ॥४८॥
ऐसे वचन ऐकोनि । लागे नारी श्रीगुरुचरणी । विनवीतसे कर जोडूनि । क्षमा करणे स्वामिया ॥४९॥
मंदमति आपणासी । दोष घडविले पतीसी । नेले आपण परान्नासी । क्षमा करणे स्वामिया ॥५०॥
चिंता करी द्विजवरू । म्हणे स्वामी काय करू । दोष घडला अपारू । व्रतभंग झाला म्हणोनि ॥५१॥
परान्न न घ्यावे म्हणोनि । संकल्प होता माझे मनी । मिळाली सती वैरिणी । दोष आपणा घडविला ॥५२॥
ऐकोनि तयाचे वचन । श्रीगुरु म्हणती हासोन । पुरविली स्त्रियेची वासना । आता तिचे मन धाले ॥५३॥
कधी न वचे परान्नासी । वर्तेल तुझ्या वाक्यासरसी । न करी चिंता मानसी । दोष तुज नाही जाण ॥५४॥
आणिक एक सांगे तुज । जेणे धर्म घडती सहज । अडला असेल एखादा द्विज । देवपितृकर्माविणे ॥५५॥
कोणी न मिळती विप्र त्यासी । जावे तेथे भोजनासी । जरी तेथे तू न जासी । अनंत दोष असे जाण ॥५६॥
श्रीगुरूचे वचन ऐकोन । साष्टांगी करी नमन । विनवीतसे कर जोडून । विनंति माझी परियेसा ॥५७॥
अन्न घ्यावे कवणा घरी । घडतील दोष कवणेपरी । जाऊ नये कवणा घरी । निरोपावे स्वामिया ॥५८॥
विप्रवचन ऐकोन । श्रीगुरु सांगती विस्तारोन । सावधान करून मन । ऐका श्रोते सकळिक ॥५९॥
श्रीगुरु म्हणती विप्रासी । अन्न घ्यावया घरे पुससी । गुरुभुवनादिकी हर्षी । जेवावे शिष्यवर्गा घरी ॥६०॥
वैदिकादि विद्वज्जन । मातुळ आपुला श्वशुर जाण । सहोदरादि साधुजन । तया घरि जेवावे ॥६१॥
अडला विप्र ब्राह्मणाविण । त्याचे घरी घ्यावे अन्न । करावे गायत्रीजपन । दोष जाती अवधारा ॥६२॥
विप्र म्हणे श्रीगुरूसी । विनंत माझी परियेसी । निषिद्ध अन्न आम्हासी । कवण्या घरी जेवू नये ॥६३॥
श्रीगुरु सांगती ब्राह्मणासी । अन्नवर्जित घरे ऐसी । अपार असे स्मृति चंद्रिकेसी । ऋषिसंमते सांगेन ॥६४॥
नित्य मातापितयांसी । सेवा घेती अतिदोषी । जाऊ नये तया घरासी । धनलोभिष्ठ द्विजांघरी ॥६५॥
कलत्र पुत्र कष्टवोनि । धर्म करी विप्रालागोनि । अन्ननिषेध तया भुवनी । दोष घडती जेविल्या ॥६६॥
गर्विष्ठ चित्रक शस्त्रधारी । विप्र जाण मल्लयुद्ध करी । वीणा वाद्य ज्याचे घरी । न घ्यावे अन्न ब्राह्मणाने ॥६७॥
बहिष्कारी विप्राघरी । याचकवृत्तीने उदर भरी । अन्न वर्जावे तया घरी । आत्मस्तुति परनिंदक ॥६८॥
बहुजन एक अन्न करिती । पृथक् वैश्वदेव न करिती । वर्जावी अन्ने विप्रजाती । महादोष बोलिजे ॥६९॥
गुरु म्हणोनि समस्तांसी । आपण मंत्र उपदेशी । शिष्य रहाटे दुर्वृत्तीसी । त्या गुरुघरी जेवू नये ॥७०॥

धनगर्वी तामसाघरी । कृपण निर्द्रव्य व्यभिचारी । दांभिक दुराचारी विप्राघरी । अन्न तुम्ही वर्जावे ॥७२॥
पुत्रा पतीते सोडोनि । वेगळी असे जे ब्राह्मणी । वर्जावे अन्न साधुजनी । महादोष बोलिजे ॥७३॥
स्त्रीजित असे एखादा जरी । विप्र सुवर्णाकार करी । सदा बहु याचक जरी । तया घरी न जेवावे ॥७४॥
खळ राजसेवकाघरी । लोह काष्ठ छेदन करी । वस्त्रधुत्या रजकाघरी । दान विप्रे घेऊ नये ॥७५॥
मद्यपान नराघरी । याचने उदरपूर्ति करी । वेश्मी सहजार असे नारी । दान विप्रे न घ्यावे ॥७६॥
तस्करविद्या असे ज्यासी । द्वारपाळकाघरी परियेसी । न घ्यावे अन्न कुटिलासी । महादोष बोलिजे ॥७७॥
द्रव्य घेउनी शूद्राकरी । अध्ययन सांगे द्विजवरी । अन्न वर्जावे तया घरी । घोडी विकी जो ब्राह्मण ॥७८॥
भागवतकीर्तन नाही घरी । द्यूतकर्मी अतिनिष्ठुरी । स्नानावीण भोजन करी । तया घरी जेवू नये ॥७९॥
न करी संध्या सायंकाळी । दान न करी कदा काळी । पितृकर्म वर्जिता कुळी । तया घरी न जेवावे ॥८०॥
दंभार्थाने जो जप करी । अथवा कापट्यरूपे जरी । द्रव्य घेवोनि जप करी । तया घरी जेवू नये ॥८१॥
ऋण देऊन एखाद्यासी । उपकार दावी परियेसी । द्रव्य सांची कलत्रेसी । तया घरी जेवू नये ॥८२॥
विश्वासघातकी नराघरी । अनीति पक्षपात करी । स्वधर्म सांडी दुराचारी । पूर्वजमार्ग सोडिल्या घरी ॥८३॥
विद्वज्जन ब्राह्मण साधूसी । एखादा करी अति द्वेषी । अन्न वर्जावे तुम्ही हर्षी । तया घरी जेवू नये ॥८४॥
कुळदैवत माता पिता । सोडोनि जाय जो परता । आपुलाले गुरूसी निंदिता । जेवू नये तया घरी ॥८५॥
गोब्राह्मणवध करी । स्त्रीवधु नर असे जरी । अन्न घेता दोष भारी । श्रीगुरु म्हणती विप्रासी ॥८६॥
आशाबद्ध सदा नरु । धरूनि राहे एका द्वारु । दान देता वर्जी जरु । जेवू नये तया घरी ॥८७॥
समस्त जातीस करी शरण । तोचि चांडाळ होय जाण । घेऊ नये त्याचे अन्न । नमन न करी विप्रासी ॥८८॥
आपुल्या कन्याजामातेसी । क्रोधे करून सदा दूषी । न घ्यावे अन्न त्या घरासी । निपुत्राचे घरी देखा ॥८९॥
पंचमहायज्ञ करी आपण । जेवी आणिकाचे घरी अन्न । परपाक करी तया नाम जाण । तया घरी जेवू नये ॥९०॥
विवाह झाला असता आपण । पंचमहायज्ञ न करी ब्राह्मण । स्थालीपाकनिवृत्ति नव जाणे । न जेवावे तया घरी ॥९१॥
घरचे अन्न दूषण करी । परान्नाची स्तुति करी । अन्न वर्जावे तया घरी । श्वपच नाम तयाचे ॥९२॥
भाणसपणे उदर भरी । अन्न घेता तया घरी । डोळे जाती अवधारी । आंधळा होय अल्पायुषी ॥९३॥
बधिर होय शरीरहीन । स्मृतिमेघा जाय जाण । धृतिशक्ति जाय जाण । माणसाचे घरी जेवू नये ॥९४॥
गृहस्थधर्मे असे आपण । दानधर्म न करी जाण । अद्वैतशास्त्र बोलू जाणे । तया घरी जेवू नये ॥९५॥
परगृही वास आपण । परान्न जेवी जो ब्राह्मण । त्याचे जितुके असे पुण्य । यजमानासी जाय देखा ॥९६॥
तया यजमानाचे दोष । लागती त्वरित भोजनस्पर्श । त्याचिकारणे निषिद्ध असे । परान्न तुम्ही वर्जावे ॥९७॥
भूदान गोदान सुवर्णदान । गजवाजीरत्नदान । घेता नाही महादूषण । अन्नदाना अतिदोष असे ॥९८॥
समस्त दुष्कृत परान्नासी । घडती देखा ब्राह्मणासी । तैसेचि जाणा परस्त्रियेसी । संग केलिया नरक होय ॥९९॥
परगृही वास करिता । जाय आपुली लक्ष्मी त्वरिता । अमावास्येसी परान्न जेविता । मासपुण्य जाय देखा ॥१००॥
अगत्य जाणे परान्नासी । न बोलाविता जाय संतोषी । जाता होती महादोषी । शूद्रे बोलाविता जाऊ नये ॥१॥
आपुल्या कन्येच्या घरासी । जाऊ नये भोजनासी । पुत्र झालिया कन्येसी । सुखे जावे अवधारा ॥२॥
सूर्यचंद्रग्रहणेसी । दान घेऊ नये परियेसी । जात अथवा मृतसूतकेसी । जाऊ नये परियेसा ॥३॥
ब्राह्मणपणाचा आचार । कवण रहाटे द्विजवर । तैसे जरी करिती नर । त्यासी कैचे दैन्य असे ॥४॥
समस्त देव त्याचे होती । अष्ट महासिद्धि साधती । ब्राह्मणकर्मे आचरती । कामधेनु तया घरी ॥५॥
विप्र मदांधे व्यापिले । आचारकर्म सांडिले । याचिकारणे दरिद्री झाले । स्वधर्म नष्ट होऊनिया ॥६॥
विप्र विनवी स्वामीसी । आमुची विनंति परियेसी । सकळ आचारधर्मासी । निरोपावे दातारा ॥७॥
श्रीगुरुमूर्ति कृपासागरु । त्रिमूर्तीच्या अवतारु । भक्तजनांच्या आधारु । निरोपावे आचार ब्राह्मणाचे ॥८॥
श्रीगुरु म्हणती तयासी । ब्राह्मणाचा आचार पुससी । सांगेन ऐक विस्तारेसी । पूर्वी ऋषि आचरले जे ॥९॥
नैमिषारण्यी समस्त ऋषि । तप करिती बहु दिवसी । आला पराशर ऋषि । म्हणोनि समस्त वंदिती ॥११०॥
समस्त ऋषि मिळोन । विनविताती कर जोडून । ब्राह्मणाचे आचरण । केवी करावे म्हणती ते ॥११॥
आता आम्ही आचार करितो । तेणे संशय मनी येतो । ब्रह्मऋषि तुम्ही म्हणूनि पुसतो । तुमचा उपदेश आम्हा व्हावा ॥१२॥
गुरुमुखेवीण मंत्र । ग्राह्य नव्हे हो पवित्र । तैसा श्रीगुरु तू सत्पात्र । आचार आम्हा सांगावे ॥१३॥
पराशर म्हणे ऋषींसी । सांगेन आचार तुम्हासी । जेणे होय अप्रयासी । सर्व सिद्धि पावती ॥१४॥
ब्राह्ममुहूर्ती उठोनि । श्रीगुरुस्मरण करोनि । मग ध्याव्या मूर्ति तिन्ही । ब्रह्माविष्णुमहेश्वर ॥१५॥
मग स्मरावे नवग्रह । सूर्यादि केतूसह । सनत्कुमार-सनक-सनंदन-सह । स्मरावे तये वेळी ॥१६॥
सह-नारद तुंबरु देखा । स्मरावे सिद्ध योगी देखा । सप्त समुद्र असती जे का । स्मरावे सप्त पितृदेवता ॥१७॥
सप्त ऋषीते स्मरोनि । सप्त द्वीपे सप्त भुवनी । समस्त नामे घेऊनि । ऐसे म्हणावे प्रातःस्मरण ॥१८॥
मग उठावे शयनस्थानी । आचमन करोनि दोनी । लघुशंकेसी जाऊनि । शौचाचमन करावे ॥१९॥
पराशर म्हणे ऋषींसी । ऐका आचमनविधीसी । सांगतसे विस्तारेसी । जे जे समयी करणे ऐका ॥१२०॥
स्नानापूर्वी अपर दोनी । उदक प्राशिता येणेचि गुणी । निजता उठता समयी दोनी । आचमने करावी ॥२१॥
अधोवायुशब्द झालिया । वोखटे दृष्टी देखिलिया । दोन्ही वेळा आचमूनिया । शुचि व्हावे परियेसा ॥२२॥
भोजनापूर्वी अपर दोनी । जांभई आलिया शिंकलिया दोनी । लघुशंकाशौची दोनी । आचमन करावे ॥२३॥
जवळी उदक नसेल जरी । श्रोत्राचमन करा निर्धारी । स्पर्श करावा अक्ष श्रोत्री । येणे पवित्र परियेसा ॥२४॥
ब्राह्मणाचे उजवे कानी । सप्त देवता असती निर्गुणी । त्यासी स्पर्शिता तत्क्षणी । आचमनफळ असे देखा ॥२५॥
श्लोक । अग्निरापश्च चंद्रश्च वरुणार्केद्रवायवः । विप्रस्य दक्षिणे कर्णे नित्यं तिष्ठन्ति देवताः ॥२६॥
टीका । त्या देवतांची नावे ऐका । सांगेन ऋषि सकळिका । अग्नि आप वरुणार्का । वायु इंद्र चंद्र असती ॥२७॥
लघुशंकाचमन करोनि । तूष्णीम स्नान करा सुमनी । बैसावे शुचि आसनी । अरुणोदय होय तव ॥२८॥
गायत्रीमंत्रजपाव्यतिरिक्त । वरकड जपावे पवित्र । प्रगट होता अरुणोदित । बहिर्भूमीसी जाईजे ॥२९॥
यज्ञोपवीत कानी ठेवोनि । डोईल पालव घालूनि । नैऋत्य दिशे जाऊनि । अधोमुखी बैसावे ॥१३०॥
दिवसा बसावे उत्तरमुखी । रात्री बैसावे दक्षिणमुखी । मौन असावे विवेकी । चहूकडे पाहू नये ॥३१॥
सूर्यचंद्रनक्षत्रांसी । पाहू नये नदी-आकाशी । स्त्रीजन लोक परियेसी । पाहू नये कवणाते ॥३२॥
शौचाविणे कांस घाली । कांस न काढी लघुशंकाकाळी । त्यासी होय यमपुरी अढळी । नरक भोगी अवधारा ॥३३॥
अगत्य घडे उदकावीण । करूनिया गंगास्मरण । मृत्तिकेने शौच करणे । भक्षणादि वर्जावे ॥३४॥
बर्हिर्भूमि जावयासी । ठाऊ कैसा परियेसी । ऐका समस्त तत्परेसी । म्हणे पराशर सर्वांते ॥३५॥
न बैसावे भूमीवरी । बैसिजे पानगवतावरी । हिरवी पर्णे करावी दुरी । वाळल्या पानी बैसावे ॥३६॥
जे ब्राह्मण उभ्या मुतती । त्यांसी ऐका कवण गति । त्यांचे रोमे अंगी किती । तावत्काळ वर्षे नरकी पडती ॥३७॥
मळविसर्जन करूनि । उठावे हाती शिश्न धरूनि । जळपात्रापासी जाऊनि । शौच करावे परियेसा ॥३८॥
मृत्तिकाशौच करावयासी । मृत्तिका आणावी तुम्ही ऐसी । वारुळ मूषकगृह परियेसी । नदीमधील आणु नये ॥३९॥
ज्या मार्गी लोक चालती । अथवा वृक्षाखालील माती । देवालय क्षेत्रतीर्थी । मृत्तिका आपण वर्जावी ॥१४०॥
वापी कूप तडागात । मृत्तिका आणिता पुण्य बहुत । उदक करी घेऊनि प्रोक्षित । मृत्तिका घ्यावी शौचासी ॥४१॥

एकैक पायासी सात वेळ । मृत्तिका लावावी सकळ । आणिक सांगेन समय केवळ । ऋषि समस्त परियेसा ॥४३॥
या मृत्तिका शौचविधान । मूत्रशंकेसी एक गुण । बहुर्भूमीसी द्विगुण । मैथुनाअंती त्रिगुण देखा ॥४४॥
आणिक प्रकार असे देखा । करावे येणेप्रमाणे ऐका । जितुके करणे गृहस्थ लोका । द्विगुण करावे ब्रह्मचारी ॥४५॥
त्रिगुण करावे वानप्रस्थे । चतुर्गुण करावे यती समस्ते । न्यून पूर्ण करावे यापरते । धर्मसिद्धि होय देखा ॥४६॥
येणे प्रकारे करा दिवसी । रात्री याच्या अर्धेसी । संकटसमयी या अर्धेसी । मार्गस्थे अर्ध त्याहुनी ॥४७॥
व्रतबंध झालिया ब्राह्मणासी । हाच आचार परियेसी । हाचि उपदेश चहू वर्णासी । शौचविधि बोलिला ॥४८॥
शौच केलियानंतरी । चूळ भरावे परिकरी । ब्राह्मणे आठ भरी । क्षत्रिये सहा परियेसा ॥४९॥
वैश्ये चार शूद्रे दोनी वेळे । येणे विधि भरा चूळ । अधिक न करावे केवळ । म्हणे पराशर ऋषि ॥१५०॥
चूळ भरावे आठ वेळा । आचमावे तीन वेळा । शुचिस्थानी बैसून निर्मळा । कुळदेवता स्मरावी ॥५१॥
तूष्णीम् आचमन करावे । नाम घेता चोवीस ठावे । आतळावे पुनः आचमावे । त्याचा विधी सांगेन ॥५२॥
विप्रदक्षिणतळहाती । पाच तीर्थे विख्यात असती । जे बोलिले असे श्रुती । सांगेन तीर्थ अवधारा ॥५३॥
अंगुष्ठमूळ तळहातेसी । अग्निब्रह्मतीर्थ परियेसी । तर्जनी अंगुष्ठ मध्यदेशी । पितृतीर्थ असे जाण ॥५४॥
चतुर्थ अंगुलीचे वरी । देवतीर्थ अवधारी । कनिष्ठिका भागोत्तरी । ऋषितीर्थ परियेसा ॥५५॥
तर्पण देवापितृऋषि । जे स्थानी तीर्थे करावी हर्षी । आचमन ब्रह्मतीर्थेसी । करा ब्राह्मण विद्वज्जन ॥५६॥
ब्रह्मतीर्थे आचमने तिन्ही । केशव नारायण माधव म्हणोनि । देवतीर्थ उदक सांडोनि । गोविंद नाम उच्चारावे ॥५७॥
विष्णु मधुसूदन हस्त धुवोनि दोन्ही । त्रिविक्रम वामन गाला स्पर्शोनि । बिंबोष्ठ तळहस्ते स्पर्शोनि । श्रीधर नाम उच्चारावे ॥५८॥
पुनरपि हस्त हृषीकेशी । पद्मनाभ पादद्वय स्पर्शी । सव्य हस्त पंचांगुलीसी । दामोदर शिखास्थानी ॥५९॥
चतुरंगुलि पृष्ठदेशी । संकर्षण घ्राणेसी । तर्जनी आणि अंगुष्ठेसी । म्हणावा वासुदेव प्रद्युम्न ॥१६०॥
अंगुष्ठ अनामिकेसी । नेत्रस्पर्श श्रोत्रेसी । कनिष्ठिका अंगुष्ठेसी । अच्युत नाभी म्हणावे ॥६१॥
पंचांगुली उपेंद्र देखा । हरी श्रीकृष्ण भुजा एका । पाच अंगुली विधिपूर्वका । येणे विधी स्पर्शावे ॥६२॥
विधी संध्याकाळी । आणिक करावे वेळोवेळी । अशौच अथवा संकटकाळी । असती विधाने ती ऐका ॥६३॥
देवतीर्थे तिन्ही घ्यावे । हस्त प्रक्षाळा गोविंद नावे । मुख प्रक्षाळोनि मंत्र म्हणावे । संध्याव्यतिरिक्त येणेपरी ॥६४॥
विधान आणिक सांगेन । देवतीर्थे तिनी घेऊन । गोविंदनामे हस्त धुवून । चक्षु श्रोत्र स्पर्शावे ॥६५॥
शूद्रादि ओवाळियासी । स्पर्श होता परियेसी । आचमनविधि ऐसी । गुरु म्हणती ब्राह्मणाते ॥६६॥
भिजोनि आलिया पाउसात । द्विराचमने होय पुनीत । स्नान भोजनी निश्चित । द्विराचमन करावे ॥६७॥
फलाहार भक्षण करिता । अथवा आपण उदक घेता । आला असेल स्मशानी हिंडता द्विराचमने शुद्ध होय ॥६८॥
उदक नसे जवळी जरी । श्रोत्राचमन करा निर्धारी । आणिक असे एक परी । तूष्णीम आचमन करावे ॥६९॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । आचमनविधि आहे ऐसी । जे करिती भक्तीसी । दैन्य कैचे तया घरी ॥१७०॥
आता सांगेन विधान । करावया दंतधावन । समस्त पर्वणी त्यजून । प्रतिपदा षष्ठी वर्जावी ॥७१॥
न करावे नवमीद्वादशीसी । शनयर्कमंगळवारेसी । श्राद्धकाळी विवाहदिवसी । करू नये दंतधावन ॥७२॥
कंटकवृक्षशाखेसी । ताडमाडकेतकीसी । खर्जूरनारिकेलशाखेसी । केलिया जन्म चांडाळयोनी ॥७३॥
खदिरकरंजाआघाडेसी । औदुंबरार्कवटशाखेसी । अथवा वृक्ष करवंदेसी । पुण्य वृक्ष ऐका तुम्ही ॥७४॥
विप्रे द्वादशांगुलेसी । नवांगुले क्षत्रियासी । षडांगुले वैश्यशूद्रासी । दंतधावन काष्ठ आणावे ॥७५॥
दंतधावन काष्ठेसी । तोडिता म्हणावे मंत्रासी । आयु: प्रज्ञा नाम परियेसी । म्हणोनि काष्ठ तोडावे ॥७६॥
दंतधावन करोनि ऐसे । काष्ठ टाकावे नैऋत्य दिशे । चूळ भरोनि द्वादश । द्विराचमन करावे ॥७७॥
मग करावे प्रातःस्नान । तेणे होय सर्व साधन । तेजोबलाआयुष्यवर्धन । प्रातःस्नान केलिया ॥७८॥
प्रज्ञा वाढे दु:स्वप्ननाश । सकळ दैवते होती वश । सौभाग्य सुख होती हर्ष । प्रातःस्नान केलिया ॥७९॥
यती तापसी संन्यासी । त्रिकाळ करावे स्नानासी । ब्रह्मचारी विधींसी । एक वेळ करावे ॥१८०॥
नित्य केलिया पापनाश असे । करावे याचि कारणे हर्षे । गृहस्थे वानप्रस्थे विशेषे । प्रातर्मध्याह्नी करावे ॥८१॥
अशक्य संकट आले जरी । अथवा न मिळे निर्मल वारि । स्नान करावयाचि परी । सांगेन ऐका ब्राह्मणहो ॥८२॥
अग्निस्नान भस्मस्नान । अथवा करावे वायुस्नान । करा विधीने मंत्रस्नान । आपोहिष्ठा मंत्राने ॥८३॥
आणिक स्नानफळे असती । ज्यास असेल भावभक्ति । गुरुदेवता दर्शनमात्री । तीर्थस्नानफळ असे ॥८४॥
अथवा दर्शन मातापिता । चरणतीर्थ भक्तीने घेता । अंगावरी प्रोक्षिता । तीर्थस्नानफळ असे ॥८५॥
अथवा भिजेल पर्जन्यांत । उभा राहोनि वारा घेत । किंवा बैसावे गोधुळीत । स्नानफळ असे देखा ॥८६॥
स्पर्श चांडाळा होता । जलस्नाने होय शुचिता । शूद्राचा स्पर्श होता । उपस्नान करावे ॥८७॥
दृढ असे तनु आपुले । स्नान मुख्य करावे जले । संधि-विग्रह-साकडे पडले । उषःस्नान करावे ॥८८॥
प्रातःस्नान करावयासी । शीतोदक उत्तम परियेसी । अशक्तता असेल देहासी । उष्णोदके करावे ॥८९॥
स्वभावे पवित्र असे उदक । वरी झालिया अग्निसंपर्क । पवित्र झाले उदक अधिक । गृहस्थासी मुख्य असे ॥१९०॥
उष्णोदके स्नान करिता । शीतोदक करा मिश्रित । मध्ये करावे आचमन तत्त्वता । संकल्प तेथे म्हणावा ॥९१॥
घरी स्नान करिता देखा । अघमर्षण तर्पण नव्हे निका । वस्त्रे पिळू नये ऐका । आपुले हस्ते करूनिया ॥९२॥
पुत्रोत्साह संक्रांतीसी । श्राद्धकाळ मृतदिवसी । न करावे स्नान उष्णोदकेसी । अमावास्या पौर्णिमा ॥९३॥
स्नान करिता बांधा शिखा । दर्भहस्ती सूर्याभिमुखा । मौन असावे विवेका । कवणासवे न बोलावे ॥९४॥
आपोहिष्ठा मंत्रेसी । गायत्री तीन म्हणा सुरसी । येणेपरी स्नानोदकासी । अभिमंत्रावे ब्राह्मणे ॥९५॥
प्रथम शीतोदक घेऊनि । पश्चात उष्णोदक मिळवोनि । स्नान करावे प्रतिदिनी । गृहस्थांनी घरी देखा ॥९६॥
अवधूत मंत्र म्हणत । वस्त्र उकलावे त्वरित । उद्यंत मंत्र जपत । वस्त्र सूर्यासी दाखवावे ॥९७॥
आचमन करूनि आपण देवस्यत्व मंत्र जपोन । धूत वस्त्र नेसून । आणिक मंत्र जपावे ॥९८॥
आवहंती वितन्वती मंत्रे । वस्त्रे नेसावी पवित्र । द्विराचमन करावे तंत्रे । वस्त्र पिळोनि आचमन कीजे ॥९९॥
आता मंत्रस्नान करणे । सांगेन त्याची विधाने । आपोहिष्ठादि मंत्राने । प्रोक्षावे शरीरावरी ॥२००॥
पाद मुर्ध्नी हृदयस्थानी । मूर्ध्नी हृदय पाद प्रोक्षोनि । करावे तुम्ही मार्जनी । आपोहिष्ठा मंत्रेसी ॥१॥
ऐसे स्नान करोनि । पुनः आचमन करोनि । मानसस्नान विधींनी । करावे ऐका भक्तीने ॥२॥
नारायण विष्णूमूर्तीसी । स्नान करावे भक्तीसी । चतुर्भुज अलंकारेसी । ध्यान केलिया मानसन्मान ॥३॥
अपवित्र: पवित्रो वा । येणे मंत्रे हरि ध्यावा । उदके देहे प्रोक्षावा । स्नानफळ अवधारा ॥४॥
मंगलस्नानविधा । सांगेन ऐका ब्राह्मण । रविवारी निषेध जाण । ज्वर होय अंगासी ॥५॥
नदीतीरी असे नरु । अशक्त असे शरीरु । गंगास्मरणे निर्धारु । आर्द्रवस्त्रे अंग पुसावे ॥६॥
कांतिहानि सोमवारासी । मंगळवारी मृत्यु परियेसी । लक्ष्मी पावे बुधवारेसी । धनहानि गुरुवारी ॥७॥
शुक्रवारी पुत्रघात । शनिवारी अखिल संपत । जाणा ऐसे निश्चित । मंगलस्नान करावे ॥८॥
नदीस्नान प्रवाहमुखी । घरी प्रातःसूर्याभिमुखी । संध्याकाळी पश्चिममुखी । स्नान करावे अवधारा ॥९॥
स्नान करिता नदीसी । अघमर्षण करावे परियेसी । नमोऽग्नयेऽप्सुमते मंत्रेसी । नदीस्नान करावे ॥२१०॥
यदपांक्रूर मत्रेंसी । उदक लोटावे द्विहस्तेसी । तीन वेळा लोटोनि हर्षी । इमं मे गंगे जपावे ॥११॥
ऋतं च सत्यं च मंत्र जपत । स्नान करावे गंगेत । नदीस्नानविधि ख्यात । करा तुम्ही विप्रवर्ग ॥१२॥

आता वस्त्रावे विधान । सांगैन ऐका ऋषिजन । ओले वस्त्रे कासेवीण । नेसू नये गृहस्थाने ॥१४॥
रक्तादि वस्त्र जीर्ण धोत्र । नेसूनि जे जन जप करीत । ते पुण्य जाय राक्षसांप्रत । एक धोत्र असलिया ॥१५॥
श्वेतवस्त्र ब्राह्मणासी । मुख्य असे परियेसी । उपवस्त्र वहिर्वासी । उत्तरवस्त्र म्हणिजे तया ॥१६॥
धोत्र नेसलिया नंतरी । विभूति लावावी परिकरी । मंत्रविधान-पुरःसरी । भस्म धारण करावे ॥१७॥
भस्म शुद्ध न मिळे जरी । गोपीचंदन लावावे परी । द्वारावती मुख्य धरी । वरकड मृत्तिका अग्राह्य ॥१८॥
न मिळे द्वारावती देखा । करा धारण गंगामृत्तिका । ऊर्ध्वपुंड्र असे निका । विष्णुसायुज्य होय तया ॥१९॥
पुष्टिकाम असे ज्यासी । लावावे तेणे अंगुष्ठेसी । ज्यासी काम असे आयुधी । मध्यांगुली लावावे ॥२२०॥
अन्नकाम अनामिएसी । तर्जनी काम्य मुक्तीसी । जे लाविती नखेसी । महापातक घडे तया ॥२१॥
उत्तम रुंदी दशांगुली । मध्यम नव आष्ट अंगुली । सप्त सहा पंचागुली । शूर्पाकार लावावे ॥२२॥
चतुर्थ त्रीणि द्वयांगुली । अधम पक्ष असे बोली । द्वादश नामे करा भली । विष्णुनाम उच्चारित ॥२३॥
केशव म्हणावे ललाटस्थानी । नाभी नारायण म्हणोनि । माधवनामे हृदयस्थानी । कमळपुष्पाकार देखा ॥२४॥
गोविंदनामे कंठेसी । विष्णुनामे कटिप्रदेशी । दक्षिणभुजा मधुसूदनेसी । नाभी उत्तर त्रिविक्रम ॥२५॥
वामन नामे बाहु देखा । श्रीधर दक्षिणकर्णिका । हृषीकेश वामकर्णिका । पद्मनाभ दक्षिणकटी ॥२६॥
दामोदर शिरस्थान । ऐका ऊर्ध्वपुंड्रविधान । पापे जाती जळोन । गोपीचंदन लाविता ॥२७॥
द्वारावती लावोनि । लावा भस्म त्रिपुंड्रांनी । हरिहर संतोषोनि । साधे भुक्ति मुक्ति देखा ॥२८॥
विवाहादि शोभन दिवसी । देवताकृत्य श्राद्धदिवसी । अभ्यंगानंतर सूतकेसी । गोपीचंदन वर्जावे ॥२९॥
ब्रह्मयज्ञतर्पणासी । कुश सांगेन विस्तारेसी । आहेत दश प्रकारेसी । नामे सांगेन विख्यात ॥२३०॥
दूर्वा उशीर कुश काश । सकुद गोधूम व्रीहि मौजीष । नागरमोथा दर्भ परियेसा । दश दर्भ मुख्य असती ॥३१॥
नित्य आणावे दूर्वैसी । जरी न साधे आपणासी । श्रावण भाद्रपदमासी । संग्रह संवत्सरी करावा ॥३२॥
चारी दूर्वा विप्रासी । त्रीणि क्षत्रिय-वैश्यासी । एक नेमिली शूद्रासी । चतुर्वर्णी धरावे ॥३३॥
या दूर्वेची महिमा । सांगता असे अनुपमा । अग्रस्थानी असे ब्रह्मा । मूळी रुद्र मध्ये हरि ॥३४॥
अग्रभागी चतुरंगुल । ग्रंथी मूळी द्वयांगुल । धारण करावे ब्रह्मकुळे । याची महिमा थोर असे ॥३५॥
चक्र धरोनि विष्णु देखा । दैत्य पराभवी ऐका । ईश्वर त्रिशूल धरिता देखा । राक्षसांतक केवी होय ॥३६॥
इंद्र वज्रायुध धरिता । दैत्यगिरी विभांडी तत्त्वता । तैसे ब्राह्मण दूर्वा धरिता । पापदुरिते पराभवती ॥३७॥
जैसे तृणाचे बणवीसी । अग्निस्पर्श होता नाशी । तेवी आलिया पापराशि । दर्भस्पर्शे जळती देखा ॥३८॥
ब्रह्मयज्ञ जपसमयी । ग्रंथि बांधावी कुशाग्री । वर्तुळाकार भोजनसमयी । धरावी ब्राह्मणे भक्तीने ॥३९॥
कर्म आचरता दूर्वैसी । ग्रंथि बांधावी परियेसी । अग्निस्पर्श कर्पूराशी । पाप नाशी येणेपरी ॥२४०॥
एकादशांगुल प्रादेशमात्र । द्विदल असावे पवित्र । नित्य-कर्मासी हेच पवित्र । द्विदल जाणा मुख्य असे ॥४१॥
जपहोमादि दानासी । स्वाध्याय पितृकर्मासी । सुवर्णरजतमुद्रिकेसी । कुशावेगळे न करावे ॥४२॥
देवपितृकर्मासी देख । रजत करावे सुवर्णयुक्त । तर्जनीस्थानी रौप्यमुद्रिका । सुवर्ण धरावे अनामिकेसी ॥४३॥
मुद्रिका असावी खड्गपात्री । कनिष्ठिकांगुली पवित्री । ग्राह्य नव्हे जीवंतपित्री । तर्जनांगुली मुद्रिका ॥४४॥
योगपट उत्तरी देखा । तर्जनीस्थानी रौप्यमुद्रिका । पायी न घालाव्या पादुका । गयाश्राद्ध न करावे ॥४५॥
नवरत्न मुद्रिका ज्याचे हाती । पापे त्यासी न लागती । एखादे रत्न असता हाती । मुद्रिका पवित्र ब्राह्मणासी ॥४६॥
प्रातःसंध्येच विधान । सांगेन ऐका ऋषिजन । नक्षत्र असतांचि प्रारंभून । अर्घ्य सूर्योदयी द्यावे ॥४७॥
सूर्योदय होय तव । जप करीत उभे असावे । उदयसमयी अर्घ्य द्यावे । तत्पूर्वी देणे सर्व व्यर्थ ॥४८॥
ऋषि पुसती पराशरासी । संध्या करावया विधि कैसी । विस्तारोनि आम्हांसी । सांगावे जी स्वामिया ॥४९॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । सांगेन संध्याविधिसी । ऐका तुम्ही तत्परेसी । पराशरस्मृतीसी असे ॥२५०॥
गायत्रीमंत्र जप करिता । शिखा बांधावी तत्त्वता । आसन घालावे निरुता । दर्भपाणि होउनी ॥५१॥
देवतीर्थे द्विराचमन । विष्णुनाम स्मरोन । प्राणायाम विस्तारोन । न्यासपूर्वक करावे ॥५२॥
प्रणवाचा परब्रह्म ऋषि । गायत्री नाम छंदासी । परमात्मा देवता परियेसी । म्हणा प्राणायामे विनियोगः ॥५३॥
ॐ व्याहृति सत्यज्ञानिया । नाभि हृदय मूर्ध्नी स्पर्शावया । व्याहृति सप्त अतिशया । प्रत्येक देवता ऋषि सांगेन ॥५४॥
व्याहृति सप्तस्थानासी । ऐका असे प्रजापति ऋषि । प्रत्येक देवता परियेसी । सप्त नामे देवांची ॥५५॥
अग्निर्वायु गुरुः सूर्य । वरुणेंद्र विश्वदेव । सप्त व्याहृति सप्त देव । छंद सप्त सांगेन ॥५६॥
गायत्री आणि उष्णिका । अनुष्टुप् बृहती पंक्ति पंचम ऐका । त्रिष्टुप् जगती छंद विशेखा । प्राणायामे विनियोगः ॥५७॥
ॐ भूः पादन्यास । ॐ भुवः जानु स्वः गुह्य । ॐ महः नाभि स्थान स्पर्शा । जनो हृदय तपो कंठ ॥॥५८॥॥
ॐ भूः हृदयाय नम इति । ॐ भुवः शिरसे स्वाहेति । ॐ स्वः शिखायै वषडिति । ॐ तत्सवितुर्वरेण्यं कवचाय हुं ॥२६०॥
ॐ भर्गोदेवस्य धीमहि नेत्रत्रयाय वोषट् । धियोयोनः प्रचोदयात अस्त्राय फट् । ॐ भूर्भु०इति दिग्बंधः । ऐसे षडंग करावे ॥६१॥
प्राणायामे विनियोगः म्हणुनि । आपोस्तन स्पर्शोनि । ज्योतिर्नेत्रस्पर्शस्थानी । रसो जिव्हामृतललाटे ॥६२॥
प्राणायाम करावयासी । प्रजापति म्हणती ऋषि । देवतानामे परियेसी । ब्रह्माग्निवायु सूर्य असे ॥६३॥
ब्रह्मभूर्भुवःस्वः म्हणुनि । प्राणायाम करा तिन्ही । त्रिपदा गायत्री जप कोणी । जपणारासी सर्व सिद्धि ॥६४॥
गायत्रीची अधिदेवता । ब्रह्माग्निवायु सविता । ऋषि ब्रह्मा असे ख्याता । सप्त लोकन्यास सांगेन ॥६५॥
पादन्यास भुर्लोक । भुवः जानु अतिविशेख । स्वः गुह्य असे लोक । नाभिन्यास महर्लोक ॥६६॥
जनो हृदय तपो ग्रीवे । भ्रुवोर्ललाटे सत्यलोक म्हणावे । ऐसे शिरस्थान बरवे । सत्यलोक म्हणती तयासी ॥६७॥
गायत्रीची प्रार्थना करूनि । प्राणायाम करा विधींनी । ब्रह्मचारी गृहस्थानी । पंचांगुली धरा परमेष्ठी ॥६८॥
वानप्रस्थ संन्यासी यती । अनामिकाकनिष्ठिकांगुष्ठेसी । ओंकारादि वायुपूरकेसी । दक्षिणनासापुटे चढवावे ॥६९॥
वामनासापुटी विसर्जोनि । करा प्राणायाम तिन्ही । येणेचि विधी करा मुनि । त्रिकालसंध्या कर्मे ॥२७०॥
आता करावे मार्जनेसी । सांगेन ऐका समस्त ऋषि । जैसे अति स्मृतिचंद्रिकेसी । तेणे विधी सांगतो ॥७१॥
आपोहिष्ठेति सूक्तेसी । सिंधुद्वीप ऋषि गायत्री छंदेसी । आपोदेवता मार्जनासी । हा म्हणावा विनियोग ॥७२॥
येणे मंत्रे म्हणोन । कुशपवित्रे करा मार्जन । यस्य क्षयाय मंत्रे जाण । आपुले पाद प्रोक्षावे ॥७३॥
आपोजनयथा मंत्रेसी । प्रोक्षावे आपुल्या शिरसी । सूर्यश्चेति मंत्रेसी । उदक प्राशन करावे ॥७४॥
हिरण्यवर्णसूक्तेसी । मार्जन करावे परियेसी । द्रुपदादिवेति मंत्रेसी । घ्राणोनि उदक सोडावे ॥७५॥
आचमने करोनि दोन । मार्जनविधान सांगेन । वामहस्ती पात्र धरून । मार्जन करा विशेषी ॥७६॥
औदुंबर सुवर्ण रजत । काष्ठाचेही असे पवित्र । ऐसे असे निर्मळ पात्र । वामहस्ती उदक बरवे ॥७७॥
मृण्मय अथवा द्विमुख पात्र । भिन्न पात्र ते जाण अपवित्र । ते अग्राह्य देवपितरा । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥७८॥
मार्जनसंख्या सांगेन ऐका । शिरसी अष्ट पादे नवका । यस्य क्षयाय स्नान भुमिका । येणेपरी मार्जन ॥७९॥
आपः पुनन्तु मंत्रेसी । प्राशनोदक माध्याह्नेसी । अग्निश्चेति मंत्रेसी । सायंसंध्या करावी ॥२८०॥
प्राशनांती तुम्ही ऐका । द्विराचमन करा निका । आघ्राण करुनी सांडिजे ऐका । एक आचमन करावे ॥८१॥
अर्घ्य द्यावयाचे विधान । सांगेन ऐका ऋषिजन । गोश्रृंगाइतुके आकारोन । अर्घ्य द्यावे मनोभावे ॥८२॥
गायत्रीमंत्र जपोनि । सायंप्रातर्द्यावी तिन्ही । हंसःशुचिषेति माध्याह्नी । अर्घ्य द्यावे अवधारा ॥८३॥
प्रातर्माध्याह्नी उभे बरवे । सायं अर्घ्य बैसोनि द्यावे । आचमन त्रिवारी करावे । करी प्रदक्षिणा असावादित्य ॥८४॥

सूर्यासवे युद्धासी। नित्य येतीपरियेसी । संदेह पडे देवांसी । सूर्या होईल अपजय ॥८६॥
अपजय येता सूर्यासी । उदयास्तमान न होय परियेसी । कर्मे न चालती ब्राह्मणांसी । स्वाहास्वधाकार न चाले ॥८७॥
स्वाहास्वधाकार रहाती । समस्त देवांस उपवास होती । सृष्टि राहिली न होय उत्पत्ति । म्हणोनि उपाय रचियेला ॥८८॥
याचि कारणे अर्घ्य देती । तीचि वज्रायुधे होती । जावोनि दैत्यांसी लागती । पराभविती प्रतिदिवसी ॥८९॥
दैत्य असती ब्रह्मवंश । त्यांसी वधिलिया घडती दोष । प्रदक्षिणा करिता होय नाश । असावादित्य म्हणोनिया ॥२९०॥
ब्रह्महत्येचिया पातकासी । भूमिप्रदक्षिणा दोष नाशी । चार पावले फिरता कैसी । भूमिप्रदक्षिणा पुण्य असे ॥९१॥
संध्या करावयाचे स्थान । सांगेन ऐका फलविधान । घरी करिता प्रतिदिन । एकचि फळ अवधारा ॥९२॥
दश फळ ग्रामाबाहेर देखा । नदीस केलिया शताधिका । पुष्करतीरी सहस्त्र ऐका । गंगासुरनदी कोटिफल ॥९३॥
सुरापान दिवा मैथुन । अनृतादि वाक्ये पापे जाण । संध्या बाहेर करिता क्षण । जळती दोष तात्काळी ॥९४॥
स्थाने असती जप करावयासी । विस्तारे सांगेन तुम्हासी । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । एकचित्ते परियेसा ॥९५॥
जप केलिया घरी ऐका । एकचि फल असे देखा । बाहेर द्विगुणी फल अधिका । नदीतीरी त्रिगुण फल ॥९६॥
गोस्थळ वृंदावन देखा । दशगुण फल अधिका । अग्निहोत्रस्थानी निका । शतगुणफल अधिक असे ॥९७॥
तीर्थदेवता सन्निधानी । सहस्त्रफल असे निर्गुणी । शतकोटि फल हरिसन्निधानी । ईश्वरसंनिधानी अनंत फल ॥९८॥
जप करिता आसनासी । विधिनिषेध आहे परियेसी । सांगेन ऐका तत्परेसी । पुण्य पाप बोलिले असे ॥९९॥
काष्ठासनी बैसोनि जरी । जप करिता मनोहरी । दुःख भोगी निरंतरी । अभागी पुरुष तो होय ॥३००॥
पल्लवशाखांसी बसता । सदा होय दुश्चिता । वस्त्रासनी दरिद्रता । पाषाणासनी व्याधि होय ॥१॥
भस्मासनी व्याधिनाश । कंबलासनी सुखसंतोष । कृष्णाजिनी ज्ञानप्रकाश । व्याघ्रचर्मी मोक्षश्री ॥२॥
कुशासनी वशीकरण । सर्व रोगांचे उपहरण । पापे जाती पळोन । आयुःप्रज्ञा अधिक होय ॥३॥
ओ इत्येक्षारकमंत्री । जपावा तुम्ही पवित्री । ध्यान करावे गायत्री । समस्त पापे हरती देखा ॥४॥
गायत्रीचे स्वरूप आता । अभिवन असे वर्णिता । रक्तांगी वास रक्ता । हंस वाहन असे देखा ॥५॥
अकार ब्रह्मा अधिदेवता । चतुर्भुजा चतुर्वक्त्रा । कमंडलु अक्षसूत्रा । चाटु धरिला असे करी ॥६॥
ऋग्वेद असे समागमी । अग्निहोत्रफल आवाहयामि । मग आयातु वरदा देवी । म्हणावे ऐका ब्राह्मणाने ॥७॥
त्या मंत्रासी ऋषि देवता । गायत्रीसदृश असे ख्याता । प्रातःसंध्या तुम्ही करिता । विधि तुम्हा सांगेन ॥८॥
गायत्री देवता गायत्री अनुष्टुप छंदः । ॐ आदित्य देवता देवा । हे प्रातःसंध्या म्हणता भेद । गायत्री देवता गायत्री छंदः ॥९॥
गायत्री आवाहने विनियोगः । ही माध्याह्नसंध्या म्हणावी । सविता देवता गायत्री छंदः । सरस्वती आवाहने विनियोगः ॥३१०॥
प्रातःसंध्येचे ध्यान । सांगेन ऐका तुम्ही गहन । रक्तांगी रक्तवसन । हंसासनी आरूढ असे ॥११॥
चतुर्बाहु चतुर्मुखी । कमंडलु धरिला विशेखी । अक्षसूत्र चाटु हस्तकी । ऋग्वेदसहित अग्निहोत्र ॥१२॥
ऐसे ध्यान करोनि । मग म्हणावे अक्षरज्ञानी । एकचित्ते असा ध्यानी । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥१३॥
ओंकार शिखामावाहयामि । छंदऋषीनावाहयामी । श्रियमावाहयामि । बलमावाहयामि ॥१४॥
ऐसे म्हणोनि प्रातःकाळी । संध्या करावी सुवेळी । आता सांगेन माध्याह्नकाळी । ध्यान आवाहनपूर्वक ॥१५॥
अभिभुरो सावित्रीध्यान । यौवनस्था माध्याह्न । सांगेन ऐका ऋषिजन । एकचित्ते परियेसा ॥१६॥
श्वेतांगी श्वेतवस्त्र । वाहन असे वृषभ पवित्र । उकार रुद्रगण दैवत । पंचमुखा असे देखा ॥१७॥
वरद अभयहस्त देखा । रुद्राक्षमाळा त्रिशूलधारका । यजुर्वेद असे देखा । अग्निष्टोम फल जाणा ॥१८॥
ओंकारशिखामावाहयामि । छंदऋषीनावाहयामि । श्रियमावाहयामि । ह्रियमावाहयामि ॥१९॥
आता सायंसंध्या ध्यान । सांगेन ऐका विधान । एकचित्ते ऐका वचन । ध्यानपूर्वक सांगेन ॥३२०॥
अभिभूरो सरस्वती वृद्धा । जाणावी तुम्ही सायंसंध्या । कृष्णांगी कृष्णवस्त्रपरिधाना । गरुडवाहन असे देखा ॥२१॥
मकार विष्णुदेवता । चतुर्भुज शंखचक्रधृता । गदापद्मधारणहस्ता । सामवेदसहित जाणा ॥२२॥
वाजपेयफल जाण । सायंसंध्या असे ध्यान । करावे ऐका तुम्ही ब्राह्मण । म्हणोनि सांगती श्रीगुरु ॥२३॥
ओंकारशिखामावाहयामि । छंदऋषीनावाहयामि । श्रियमावाहयामि । बलमावाहयामि ॥२४॥
पंचशीर्षोपनयने विनियोगः । प्रणवस्य परब्रह्म ऋषिः । परमात्मा देवता । गायत्री छंदः ॥२५॥
उदात्तस्वरित स्वरः अग्निर्वायुः सूर्यदेवता । गायत्री त्रिष्टुप् जगती छंदः । ब्रह्माविष्णुमहेश्वरादेवताः । ऋग्यजुःसामानि स्वरूपाणि ॥२६॥
आहवनीयाग्निगार्हपत्य । दक्षिणाग्निउपस्थानानि । पृथिव्यंतरिक्षं द्यौस्तत्त्वानि । उदात्तानुदात्तस्वरितस्वराः ॥२७॥
पीतविद्युतश्वेतवर्णी । प्रातर्मध्याह्नतृतीयसवनानि । विश्वतजसप्राज्ञस्वरूपिणी । जागृतीस्वपन्सुषुप्त्यवस्था ॥२८॥
ऐसे त्रिपदा गायत्रीसी । सांगितले त्रिविध ध्यानासी । आता विधान जपासी । सांगेन ऐका एकचित्ते ॥२९॥
ममोपात्तदुरितक्षयद्वारा । श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं जपे विनियोगः । ॐ अं नाभौ । वं हृदये मं कंठे ॥३३०॥
भूः अक्षरमंत्रासी । गायत्री असे छंदेसी । अग्निर्देवता परिएय्सी । विश्वामित्र ऋषि देखा ॥३१॥
षड्ज स्वर श्वेत वर्ण । पादस्पर्श उच्चारोन । प्राणायामे विनियोगून । दुसरी व्याहृति म्हणावी ॥३२॥
भुवः अक्षरमंत्रासी । उष्णिक नाम छंदासी । वायुर्देवता परियेसी । भृगु ऋषि असे जाण ॥३३॥
असे रूप श्यामवर्ण । पादस्पर्श रूप उच्चारोन । करा तुम्ही ऐसे ध्यान । जानूमध्ये न्यासावे ॥३४॥
प्राणायाम विनियोग म्हणोनि । न्यास करावे भक्तिभावनी । स्वः व्याहृति म्हणोनि । ध्यान करा भक्तीने ॥३५॥
स्वः व्याहृतिमंत्रासी । म्हणा अनुष्टुप् छंदासी । सविता देवता परियेसी । भारद्वाज ऋषि जाण ॥३६॥
स्वर गांधार पीतवर्णा । कंठी स्पर्शोन मंत्र म्हणा । प्राणायामे विनियोग जाणा । तृतीय व्याहृतिमंत्रासी ॥३७॥
ॐ महः मंत्रासी । बृहती छंदासी । बृहस्पति देवता परियेसी । वसिष्ठ ऋषि निर्धारे ॥३८॥
मध्यम स्वर पिशंग वर्ण । ऐसे करा तुम्ही ध्यान । वेगे म्हणा नाभी स्पर्शोन । प्राणायामे विनियोगः ॥३९॥
जन मंत्र उच्चारासी । म्हणा पंक्ति छंदासी । वरुण देवता गौतम ऋषि । पंचम स्वर असे जाण ॥३४०॥
रूप असे नीलवर्ण । करा न्यास हृदयस्थान । प्राणायामे विनियोगून । जनः पंच न्यास ऐसे ॥४१॥
तपः मंत्र न्यासासी । त्रिष्टुप् छंद परियेसी । ईश्वर देवता कश्यप ऋषि । धैवत स्वर परियेसा ॥४२॥
असे आपण लोहवर्ण । स्पर्श करावे कंठस्थान । प्राणायामे विनियोगून । न्यास करावा ब्राह्मणहो ॥४३॥
सत्यं म्हणतसे मंत्रासी । करावे जगती छंदासी । विश्वेदेव अंगिरस ऋषि । निषाद स्वर जाणावा ॥४४॥
रूप असे कनकवर्ण । भ्रुवोर्ललाटा स्पर्शून । प्राणायामे विनियोगून । न्यास करावा भक्तीने ॥४५॥
इतुके न्यास करोनि । हस्त ठेवा शिरस्थानी । ध्यान करा विधानी । सांगेन ऐका ब्राह्मणहो ॥४६॥
शिरस्थान स्पर्शासी । म्हणा अनुष्टुप् छंदासी । उच्चार प्रजापति ऋषि । परमात्मा देवता जाण ॥४७॥
प्राणायामे विनियोगून । मग करावे गायत्रीध्यान । ॐ आपोज्योति म्हणोन । मंत्र म्हणा भक्तीने ॥४८॥
ॐ आपोज्योतिरसोमृतं । ब्रह्मभूर्भुवःस्वरो । शिरसी येणे विधी । अंगन्यास करावे ॥४९॥
चोवीस अक्षरे मंत्रासी । न्यास सांगेन एकाएकासी । एकचित्ते परियेसी । म्हणे पराशर ऋषि तो ॥३५०॥
या त्रिपदा गायत्रीसी । असे विश्वामित्र ऋषि । देवी गायत्री छंदेसी । वर्ण देवता सांगेन ॥५१॥
ऐसे त्रिपदा गायत्रीमंत्रासी । चोवीस अक्षरे परियेसी । पृथक न्यास परियेसी । सांगेन ऐक द्विजोत्तमा ॥५२॥
तवर्णाक्षर मंत्रासी । जाणा विश्वामित्र ऋषि । अग्नि देवता परियेसी गायत्री छंद म्हणावा ॥५३॥
अतसीपुष्पे वर्णे जैसी । तद्रूप वर्ण असे परियेसी । वायव्य कोण स्थान त्यासी । गुल्फन्यास करावा ॥५४॥
त्सवर्णाक्षर मंत्रासी । असे विश्वामित्र ऋषि । वायुदेवता परियेसी । देवी गायत्री छंद देखा ॥५५॥

विवर्णनाम अक्षरासी । जाणा विश्वामित्र ऋषि । सोमदेवता परियेसी । देवी गायत्री छंद देखा ॥५७॥
न्यास करावया जानुस्थान । इंद्रनील विद्युद्वर्ण । ऐसे अक्षरविधान । महारोग हरती देखा ॥५८॥
तुवर्ण नाम अक्षरासी । असे विश्वामित्र ऋषि । विद्युद्देवता परियेसी । देवी गायत्री छंद देखा ॥५९॥
न्यास करा जानुस्थानी । दीप्ति असे जैसा वह्नि । रूप असे सौम्यपणी । भ्रूणहत्यापाप नाशी ॥३६०॥
र्वर्ण अक्षरासी । असे विश्वामित्र ऋषि । सोम देवता परियेसी । देवी गायत्री छंद देखा ॥६१॥
सुवर्णस्फटिककांति । गुह्यस्थानी न्यास बोलती । समस्त अघौघ नाशती । रूपार्ववर्णस्थाना उत्तम ॥६२॥
रेवर्ण नाम अक्षरमंत्रासी । असे विश्वामित्र ऋषि । वरुण देवता परियेसी । देवी गायत्री छंद देखा ॥६३॥
णिकार वृषणस्थान जाणा । विद्युत्प्रकाशरूपधारणा । बार्हस्पत्यनाम खुणा । अभक्ष्यपापक्षालन ॥६४॥
णिवर्णाक्षर मंत्रासी । जाणा विश्वामित्र ऋषि । बृहस्पति देवता परियेसी । देवी गायत्री छंद देखा ॥६५॥
यं कटिस्थान शांताकारवर्ण । देहहत्यापापज्वलन । न्यास करावे सगुण । विद्वज्जन ब्राह्मणा ॥६६॥
यं अक्षर म्हणावयासी । असे विश्वामित्र ऋषि । तारका दैवत परियेसी । देवी गायत्री छंद असे ॥६७॥
भकारा नाभी करा न्यास । कृष्णमेघवर्ण सुरस । पर्जन्य देवता संकाश । गुरुहत्यापाप नाशी ॥६८॥
भवर्ण नाम अक्षरासी । असे विश्वामित्र ऋषि । पर्जन्य देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥६९॥
र्गो अक्षरा उदर न्यास । ध्यान रक्तवर्ण सुरस । इंद्र देवता परियेस । गोहत्येचे पाप जाय ॥३७०॥
गोवर्ण नाम अक्षरासी । जाणावा विश्वामित्र ऋषि । इंद्र देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥७१॥
देकारन्यास स्तनासी । गंधर्व नाम देव परियेसी । स्त्रीहत्यापाप नाशी । एकचित्ते परियेसा ॥७२॥
देवर्ण नाम अक्षरासी । जाणा विश्वामित्र ऋषि । गंधर्व देवता परियेसी । देवी गायत्री छंद देखा ॥७३॥
वकार हृदयस्थानन्यास । शुक्ल रूप वर्ण परियेस । पूषा देवता असे त्यास । वाणीजातपाप नाशी ॥७४॥
ववर्णाक्षर मंत्रासी । जाणावा विश्वामित्र ऋषि । रुद्र देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥७५॥
स्य अक्षरा कंठन्यास । कांचनवर्ण रूप सुरस । मित्र देवता परियेस । मार्जारकुक्कुटपाप जाय ॥७६॥
स्यवर्ण अक्षर मंत्रासी । असे विश्वामित्र ऋषि । मित्र देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥७७॥
धीकाराक्षरमंत्र दंती न्यास । शुक्लकुमुदसंकाश । त्वष्टा देवता परियेस । पितृहत्यापाप जाय ॥७८॥
धीवर्ण नाम अक्षरासी । जाणा विश्वामित्र ऋषि । विष्णु देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाण ॥७९॥
मकारन्यास तालुस्थान । पद्म तेजोमय जाण । वासुदेव असे खूण । सर्वजन्मपाप जाय ॥३८०॥
मकार वर्णाक्षरमंत्रासी । असे विश्वामित्र ऋषि । वासुदेव देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥८१॥
हिकार नासिकी करा न्यास । शंखवर्ण असे त्यास । वासुदेव देवता परियेस । सर्व पाप हरण होय ॥८२॥
हिवर्ण नाम मंत्रासी । जाणा विश्वामित्र ऋषि । मेरु देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥८३॥
धिकारा नेत्रस्थानी न्यास । पांडुरभास संकाश । सोम देवता परियेस । पाणिग्रहणपाप नाशी ॥८४॥
धिवर्ण नाम मंत्रासी । तोचि विश्वामित्र ऋषि । सोमदेवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥८५॥
योकाराक्षर मंत्रासी । भुवोर्मध्ये न्यासिजे त्यासी । रक्तगौरवर्ण रूपेसी । प्राणिवधपाप जाय ॥८६॥
योकाराक्षर नामाक्षरासी । जाणा विश्वामित्र ऋषि । यमदेवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥८७॥
योकार ललाटस्थानी न्यास । रूप रुक्मांभसंकाश । सर्व पाप होय नाश । भक्तिपूर्वक न्यासावे ॥८८॥
योवर्णाक्षर मंत्रासी । तोचि विश्वामित्र ऋषि । विश्वे देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥८९॥
नकारा उदित प्राङ्मुखा । सूर्यासमान तेज देखा । आश्विनौ देवता असे निका । विराजमान परियेसा ॥३९०॥
नकाराक्षर वर्णासी । जाणा विश्वामित्र ऋषि । अश्विनौ देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥९१॥
प्रकाराक्षरन्यास करोनि दक्षिणे । रूप असे नीलवर्ण । प्रजापति देवता जाण । विष्णुसायुज्य पाविजे ॥९२॥
प्रवर्णाक्षर मंत्रासी । असे विश्वामित्र ऋषि । प्रजापति देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥९३॥
चोकार वर्ण मंत्रासी । न्यासिजे तया पश्चिम भागासी । कुंकुमरूपवर्ण त्यासी । सर्वदेवपदवी पाविजे ॥९४॥
चोकार वर्ण मंत्राक्षरासी । जाणावा विश्वामित्र ऋषि । सर्व देवता परियेसी । गायत्री देवी छंद जाणा ॥९५॥
दकाराक्षराचा उत्तरे न्यास । शुक्लवर्ण रूप सुरस । करावे तुम्ही ऐसे न्यास । कैलासपद पाविजे ॥९६॥
दकाराक्षर मंत्रासी । जाणा विश्वामित्र ऋषि । रुद्र देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥९७॥
याकार मूर्धास्थानी न्यास । सुवर्णरूप सुरस । ब्रह्मस्थाना होय वास । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥९८॥
यावर्णाक्षर मंत्रासी । असे विश्वामित्र ऋषि । ब्रह्म देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥९९॥
तकार न्यास शिखास्थानी । निरुपम वैष्णवभुवनी । विष्णुरूप धरोनि । वैकुंठवास होय जाणा ॥४००॥
तकार वर्णाक्षरमंत्रासी । जाणा विश्वामित्र ऋषि । विष्णु देवता परियेसी । देवी गायत्री छंद जाणा ॥१॥
ऐसे चोवीस अक्षरमंत्रासी । न्यास करावे विधींसी । हस्त ठेवोनिया शिरासी । आणिक न्यास करावे ॥२॥
शिरस्थानी न्यासासी । म्हणावे अनुष्टुप् छंदासी । ख्याति प्रजापति ऋषि । परमात्मा देवता जाणा ॥३॥
प्राणायामे विनियोग म्हणोनि । ओं आपोस्तन स्पर्शोनि । ज्योतिर्नेत्र स्पर्शोनि । रसोजिह्वा न्यासावे ॥४॥
अमृतेति ललाटेसी । मूर्ध्नि स्पर्शोनि ऐसी । ब्रह्मभूर्भुवःस्वरोमासी । न्यास करा येणे विधी ॥५॥
इतुके न्यास करोनि । गायत्री त्रिवार म्हणोनि । व्यापक न्यास करोनि । करशुद्धि करा तीन वेळा ॥६॥
भुः० स्वः० विन्यसोनि । गायत्रीच्या दश पदांनी । दशांगुली न्यासोनि । पादप्रमाण करावे ॥७॥
अंगुष्ठमूल धरोनि । कनिष्ठिका स्पर्शोनि । उभय हस्त न्यासोनि । दशपादांगुली न्यासावे ॥८॥
चोवीस अक्षरमंत्रासी । अंगुलिन्यास करा हर्षी । तर्जनीमूलादारभ्येसी । कनिष्ठिकापर्यंत ॥९॥
द्वादशाक्षरी अकैक हस्त । करावे न्यास सुनिश्चित । षडंगन्यास समस्त । प्रणवासहित करावे ॥४१०॥
ॐ भूः हिरण्यात्मने । अंगुष्ठाभ्यां नमः । ॐ भुवः प्रजापत्यात्मने । तर्जनीभ्यां नमः ॥११॥
ॐ स्वः सूर्यात्मने मध्यमाभ्यां नमः । ॐ महः ब्रह्मात्मने अनामिकाभ्यां नमः ।
ॐ जनः, ॐ तपः ॐ सत्यं, कनिष्ठिकाभ्यां नमः । प्रचोदयात करतलकरपृष्ठाभ्यां नमः ॥१२॥
ॐ तत्सवितुः अंगुष्ठाभ्यां हृदयाय नमः । वरेण्यं तर्जनीभ्यां शिरसे स्वाहा ।
भर्गोदेवस्य मध्यमाभ्यां शिखायै वषट् । धीमहि अनामिकाभ्यां कवचाय हुं ॥१३॥
धियोयोनः कनिष्ठिकाभ्यां नेत्रत्रयाय वौषट् । प्रचोदयात करतलकरपृष्ठाभ्यां अस्त्राय फट् । उभयहस्तांगुलिन्यासं कुर्यात । अथ षडंगन्यासः ॥१४॥
ॐ भूः हिरण्यात्मने हृदयाय नमः । ॐ भुवः प्रजापत्यात्मने शिरसे स्वाहा । ॐ स्वः सूर्यात्मने शिखायै वौषट् । ॐ महः ब्रह्मात्मने कवचाय हुं ॥१५॥
ॐ जनः, ॐ तपः, ॐ सत्यं, सोमात्मने । नेत्रत्रयाय वौषट् । प्रचोदयात सर्वात्मने अस्त्राय फट् । ॐ तत्स० हृदयाय नमः ॥१६॥
ॐ वरेण्यं शिरसे स्वाहा ।भर्गोदेवस्य शिखायै वौषट् । धीमहि कवचाय हुं । धियोयोनः नेत्रत्रयाय वौषट् । प्रचोदयात अस्त्राय फट् ॥१७॥
षडंगन्यास करोनि । अंगन्यास दशस्थानी । त्यांची नावे सांगेन कानी । एकचित्ते अवधारा ॥१८॥
पादजानुकटिस्थानी । नाभिहृदयकंठभुवनी । तालुनेत्र स्पर्शोनि । ललाटशिरी दशस्थान ॥१९॥
गायत्रीमंत्राच्या दहा पदांसी । दशस्थान अंगन्यासासी । तत्सवितुर्वरेण्येसी । भर्गोदेवस्य पंचम स्थान ॥४२०॥
धीमहि म्हणजे षष्ठ स्थान । धियो सप्तम स्थान जाण । योकारो अष्टम अंगन्यास पूर्ण । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥२१॥
नकार नवम मंत्रस्थान । प्रचोदयात दहावे जाण । अंगन्यास येणे गुण । करा तुम्ही द्विजोत्तमा ॥२२॥
चतुर्विंशति अक्षरांसी । करावे अंगन्यासासी । पादांगुष्ठस्पर्श हर्षी । शिखादारभ्य न्यासावे ॥२३॥
अंगुष्ठाभ्यां नमः । त्सं गुल्फयोर्नमः । विं जंघयोर्नमः । तुं जानुभ्यां नमः ॥२४॥

भं नाभ्यै नमः । गौं उदराय नमः । दें स्तनाभ्यां नमः । वं हृदयाय नमः ॥२६॥
स्यं कंठाय नमः । धीं दंतेभ्यो नमः । मं तालवे नमः । हिं नासिकायै नमः ॥२७॥
धिं नेत्राभ्यां नमः । यों भ्रुवोर्मध्याय नमः । यों ललाटाय नमः । नः प्राङ्मुखाय नमः ॥२८॥
प्रं दक्षिणमुखाय नमः । चों पश्चिममुखाय नमः । दं उत्तरमुखाय नमः । यां मूर्ध्ने नमः । तं शिखायै वषट् ॥२९॥
ऐसे न्यास करोनि । पुनः पादांगुष्ठ धरोनि । कटिपर्यंत न्यासोनि । ऊर्ध्वन्यास करावे ॥४३०॥
तकारा अंगुष्ठस्थान । त्सकार गुल्फ असे स्थान । विकार जंघास्थान । ऐका ब्राह्मणा म्हणती गुरु ॥३१॥
तुकार जानूर्वकार ऊरवे । वकार गुह्यपूर्वक स्पर्श । णिकारा वृषणस्थान बरवे । तुकार कटिस्थान न्यास ॥३२॥
शिखा धरोनि पादपर्यंत । करावे न्यास उतरत । त्याते सांगेन आदिअंत । एकचित्ते परियेसा ॥३३॥
तं नमः शिकायै विन्यस्य । यां नमः मुर्ध्नि विन्यस्य । दं नमः उत्तरशिखायां न्यस्य । चो नमः पश्चिमशिखायां ॥३४॥
प्रं नमः दक्षिणशिखायां । नं नमः प्राङ्मुखे । यो नमः ललाटे । यो नमः भ्रुवोर्मध्यी ॥३५॥
धिं नमः नेत्रत्रये । हिं नमः नासिकयोः । मं नमः तालौ । धी नमः दंतेषु ॥३६॥
स्यं नमः कंठे । वं नमः हृदये । दें नमः स्तनयोः । गौं नमः उदरे । भं नमः नाभौ ॥३७॥
प्रणवादि नमोत न्यास करावे । आकार नाभी उकार हृदये । मकार मुखे नकार ललाटे । मकर शिरसि हस्तेन नमस्कृत्वा ॥३८॥
अथ मुद्रासंपुटप्रकारी । चतुर्विंशति अवधारी । सांगेन त्यांचा विस्तार परी । ऐका ब्राह्मण एकचित्ते ॥३९॥
श्लोक । सुमुखं संपुटं चैव विततं विस्तृतं तथा । द्विमुखं त्रिमुखं चैव चतुःपंचमुखं तथा ॥४४०॥
षण्मुखाधोमुखं चैव व्यापकांजलिकं तथा । शकटं यमपाशं च ग्रंथितं चोल्मुकोल्मुकम ॥४१॥
प्रलंबं मुष्टिकं चैव मत्स्यकूर्मो वराहकम् । सिंहाक्रांतं महाक्रांतं मुद्गरं पल्लवं तथा ॥४२॥
एता मुद्रा न जानाति गायत्री निष्फला भवेत । एता मुद्रास्तु कर्तव्या गायत्री सुप्रतिष्ठिता ॥४३॥
अस्यार्थः । सुमुखं ॥१॥ संपुटं ॥२॥ विततं ॥३॥ विस्तृतं ॥४॥ द्विमुखं ॥५॥ त्रिमुखं ॥६॥
चतुर्मुखं ॥७॥ पंचमुखं ॥८॥ षण्मुखं ॥९॥ अधोमुखं ॥१०॥ व्यापकांजलिकं ॥११॥
शकटं ॥१२॥ यमपाशं च ॥१३॥ ग्रंथितं ॥१४॥ चोल्मुकोल्मुकं ॥१५॥ प्रलंबं ॥१६॥
मुष्टिकं ॥१७॥ मत्स्यः ॥१८॥ कूर्मः ॥१९॥ वराहः ॥२०॥
सिंहाक्रांतं ॥२१॥ महाक्रांतं ॥२२॥ मुद्गरं ॥२३॥ पल्लवं ॥२४॥
मुद्राविण गायत्रीमंत्र । जप करितां सर्व व्यर्थ । या कारणे करावे पात्र । मुद्रापूर्वक जप करावा ॥४४॥
गौप्य करावा मुद्रायुक्त । प्राणायाम करा निश्चित । समस्त पापक्षयार्थ । म्हणोनि अष्टोत्तरीय संकल्पावे ॥४५॥
या गायत्रीप्रथमपादासी । म्हणा ऋग्वेद असे ऋषि । भूमितत्त्व परियेसी । ब्रह्मा देवता त्रिष्टुप् छंद ॥४६॥
द्वितीयपाद गायत्रीसी । यजुर्वेद असे ऋषि । रुद्रदेवता प्राणापानव्यालतत्त्वेसी । जगती म्हणा अहर्निशी ॥४७॥
गायत्री तृतीयपादासी । ऋग्यजुः सामतत्त्व परियेसी । विष्णु देवता त्रिष्टुप छंदेसी । समस्तपापक्षयार्थ विनियोग ॥४८॥
भूमिस्तंभ परियेसी । गायत्री छंदासी । म्हणावे ब्रह्मपदासी । ब्रह्मा दैवत जाणावे ॥४९॥
गायत्रीचे ध्यान । सांगेन तुम्हा विधान । एकचित्ते करा पठण । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥४५०॥
श्लोक । मुक्ताविदुमहेमनीलधवलच्छायैर्मुखैस्त्रीक्षणैर्युक्तामिंदुकलानिबद्धमुकुटां तत्त्वार्थवर्णात्मिकाम् ।
गायत्री वरदाभयांकुशकशां शुभ्रं कपालं गदां शंखं चक्रमथारविंदयुगलं हस्तैर्वहन्ती भजे ॥५१॥
ऐसे ध्यान करोनि । जप करावा नासिकाग्रनयनी । अंती षडंग न्यासोनि । जप करा येणेपरी ॥५२॥
गायत्रीमंत्राची प्रशंसा । एकचित्ते परियेसा । मंत्रनाम असे विशेषा । अक्षरे दोनी पाप हरे ॥५३॥
मकार म्हणजे आपुले मन । त्रकार नाम आपुला प्राण । मन प्राण एकवटोन । जप करावा एकचित्ते ॥५४॥
जप म्हणजे अक्षरे दोनी । प्रख्यात असती त्रिभुवनी । जकार जन्म विच्छेदोनि । पकारे जन्मपाप दुरी ॥५५॥
चारी वेदांस मूळ एका । गायत्रीनाम नाशी पातका । याचि कारणे करावा निका । वेदपठणफळ असे ॥५६॥
ऐसा मंत्र न जरी जपे नर । वृथा जन्म जैसा सूकर । जप करा हो निर्धार । चिंतिले फल पाविजे ॥५७॥
न करावा उदकी बैसोन । त्वरित होय प्रज्ञाहीन । याचि कारणे सांगेन विस्तारोन । अग्नि तीनि विप्रमुखी ॥५८॥
आहवनीय गार्हपत्य । दक्षिणाग्नि तिसरा विख्यात । अग्निउदकसंपर्के त्वरित । तेजत्व जाय अग्नीचे ॥५९॥
या कारणे उदक वर्जोनि । बैसिजे उत्तम आसनी । हस्तस्पर्शी नाभिस्थानी । जपावा माळ धरोनिया ॥४६०॥
उभेनी जपावा प्रातःकाळी । बैसोनि कीजे माध्याह्नकाळी । अथवा उभा ठाकोनि । उभय पक्षी करावा ॥६१॥
माध्याह्नी हृदयस्थानी । जपावा माळ धरोनि । हस्त मुखे स्पर्शोनि । सायंकाळी जपावा ॥६२॥
बैसोनि जपावा सायंकाळी । पहावा वृक्ष निर्मळी । जरी वृक्ष नसे जवळी । नासाग्रानयनी जपावा ॥६३॥
ब्रह्मचारी गृहस्थासी । जप नेमिला अष्टोत्तरेसी । वानप्रस्थ संन्यासी यासी । सहस्त्र मुख्य करावा ॥६४॥
संधिविग्रह होय जरी । अष्टाविंशति तरी करी । अशक्ति होय जरी । दहा वेळ जपावा ॥६५॥
उत्तम पक्ष मानसी । मध्यम गौप्य सुमुखेसी । अक्षरे प्रगट वाक्येसी । कनिष्ठ पुकार परियेसा ॥६६॥
त्रिपाद असती गायत्रीसी । मिळोनि न म्हणावी परियेसी । म्हणता होय महादोषी । महानरक अवधारा ॥६७॥
पृथक करोनि त्रिपदासी । जपा मंत्र अतिहर्षी । ब्रह्महत्यादि पापे नाशी । अनंत पुण्य लाधिजे ॥६८॥
अंगुष्ठजपे एक पुण्य । पर्वांगुलीने दशगुण । शंखमणीने होय शतगुण । प्रवालमाला सहस्त्रफळ ॥६९॥
स्फटिकमणि दहासहस्त्र । मौक्तिके पुण्य लक्षाधिक । पद्माक्षी निर्गुण जप । दशलक्ष पुण्य असे ॥४७०॥
कोटुगुणे सुवर्णमाला । कुश रुद्राक्ष अनंतफला । जप करा नित्य काळा । गौप्यमाला धरोनिया ॥७१॥
गौप्यमाला करकमळी । जप करा निश्चली । सौख्य पावे अनंत फळी । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणाते ॥७२॥
जप करिता नुल्लंघिजे मेरु । उल्लंघिता पाप बोलिले अपारु । प्राणायाम केलिया त्रिवारु । मेरुलंघनपाप जाय ॥७३॥
गायत्रीजप तीन दिवस । प्रत्यही करावा एकादश । सर्व पातके होती नाश । त्रिरात्रीचे पाप जाय ॥७४॥
अष्टोत्तरशत जप करिता । अघोर पातक जाय त्वरिता । करोनि सहस्त्र जप एकाग्रता । उपपातके नासती ॥७५॥
महापातकादि दोषासी । कोटि जप करावा परियेसी । जे जे कर्म इच्छिसी । त्वरित होय अवधारा ॥७६॥
जप करावा मन दृढे । न पहावे मागे पुढे । शूद्रादिक यातीकडे । संभाषण न करावे ॥७७॥
द्रव्य घेवोनि एखाद्यासी । जपता होय अनंतदोषी । चांडाळयोनीत भरवसी । जन्म पावे परियेसा ॥७८॥
कंडू नये शरीर आपुले । नेणता जरी इतुके घडले । श्रोत्राचमन करा वहिले । दोष नाही अवधारा ॥७९॥
ब्राह्मणाचे दक्षिणकर्णी । सप्त देवता ऐका निर्गुणी । स्पर्श करिता तत्क्षणी । पापे जाती परियेसा ॥४८०॥
दृष्टी पडता चांडाळासी । द्विराचमने शुद्ध होसी । संभाषण झालिया पतितासी । आचमनस्नान करावे ॥८१॥
जपता निद्रा येई जरी । अधोवायु जांभई आलियावरी । क्रोधरूपे जपता जरी । पापरूपे अवधारा ॥८२॥
मौन्य करावे हे उत्तमी । अगत्ये बोलिजे संधिविषयी । तद्विष्णो मंत्र जपता कर्मी । पापे जाती सकळिक ॥८३॥
नेणता घडे इतुके जरी । आचमन करावे श्रोत्री । अग्नि सूर्यधेनुदर्शन करी । विष्णुमंत्र जपावा ॥८४॥
ऐसा जप करावा विधीने । मनकामना होय पूर्ण । ऐकती समस्त ऋषिजन । म्हणोनि सांगे पराशर ॥८५॥
गायत्री जपावी ऐशी । प्रातःकाळी म्हणा मित्रस्य ऋषि । उदुत्यं मंत्र माध्याह्नेसी । इमं मे वरुण सायंकाळी ॥८६॥
शाखापरत्वे मंत्र असती । म्हणावे विधि जैसे असती । गोत्र प्रवर म्हणा भक्ती । वृद्धाचाराप्रमाणे ॥८७॥
चारी दिशा नमोनि । प्रदक्षिणा करावी सगुणी । गोत्र प्रवर उच्चारोनि । नमस्कार करा परियेसा ॥८८॥
ऐसी संध्या करून । मग करावे औपासन । सांगेन त्याचे विधान । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥८९॥

न करावे वेळणी आळंद्यात । भूमीवरी न करा नित्य । स्थंडिली करावे विहित । अथवा उदके सारवावे ॥९१॥
कुंडी स्थापोनि अग्नीसी । करावे नित्य उपासनेसी । वारा घालो नये त्यासी । हाते पर्णी आणि सुपे ॥९२॥
व्याधिष्ठ पर्णवाते होय । सुपे दरित्र धनक्षय । मुखे फुंकिलिया आयुष्य जाय । हस्तमुली होय मृत्यु ॥९३॥
फुंकणी अथवा विझण्यासी । वायु घालावा अग्नीसी । काष्ठे समृद्धि परियेसी । ज्वलित असावा अग्नि देखा ॥९४॥
ज्वाला निघती जये स्थानी । आहुति घालावी तया वदनी । समिधा आणाव्या ब्राह्मणी । शूद्रहस्ते घेऊ नये ॥९५॥
समिधा पुष्पे दूर्वा देखा । आणो नये शूद्रे ऐका । होमद्रव्ये होती विशेखा । सांगेन नावे परियेसा ॥९६॥
साळी सावे नीवार । तंदुल असती मनोहर । गोधूम जव निर्धार । यावनाळ मुख्य असे ॥९७॥
साठी दाणे मिति प्रमाण । आहुति मुख्य कारण । अधिक न कीजे अथवा न्यून । घृतसंपर्क करावे ॥९८॥
घृत नसेल समयासी । तिल पवित्र होमासी । तिळांचे तैल परियेसी । तेही पवित्र असे देखा ॥९९॥
औपासन केलियावरी । ब्रह्मयज्ञ तर्पण करी । सांगेन विधि अवधारी । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥५००॥
मुख्य सकळ प्रातःकर्म सारोनि । ब्रह्मयज्ञ करावा माध्याह्नी । उपासनादि कर्मे करोनि । मग करावा ब्रह्मयज्ञ ॥१॥
उदकसन्निध मुख्य स्थानी । करावे तर्पण ब्राह्मणी । प्राणायाम तीन करोनि । विद्युदसि मंत्र जपावा ॥२॥
दूर्वा घेऊनि दक्षिण करी । पूर्वमुख अथवा उत्तरी । बसावे वाम पादावरी । दक्षिण पाद ठेवोनि ॥३॥
उभयहास्तसंपुटेसी । ठेवावे दक्षिण जानुवासी । म्हणावे तीन प्रणवांसी । मग म्हणावे ऋचाक्षर ॥४॥
ॐ भू० ऐसे म्हणोनि । त्रिपदा गायत्री उच्चारोनि । तत्स० म्हणोनि । मग जपावी दश वेळा ॥५॥
स्वाध्याय दिवसासी । म्हणा वेद शक्तीसी । अनध्याय होय तया दिवसी । एक ऋचा म्हणा पन्नासा ॥६॥
तोही नये एखाद्यासी । मंत्र म्हणावा विशेषी । नमो ब्रह्मणे मंत्रासी । तीन वेळा जपावा ॥७॥
वृष्टिरासि मंत्रासी । जपोनि स्पर्शावे उदकासी । तर्पण करावे परियेसी । ऐक ब्राह्मणा एकचित्ते ॥८॥
ब्रह्मयज्ञ करावयासी । द्रव्य दर्भ परियेसी । वसुरुद्रआदित्यांसी । तृप्त समस्त देव पितर ॥९॥
एखादे दिवसी न घडे जरी । अथवा होय समय रात्री । जप करावा गायत्री । वेदपठण फल असे ॥५१०॥
देवतर्पण कुशाग्रेसी । मध्यस्थाने तृप्त ऋषि । मुळे पितृवर्गासी । तर्पण करावे परियेसा ॥११॥
न करावे तर्पण पात्रात । करावे आपण उदकात । भूमीवरी घरी नित्य । निषिद्ध असे करू नये ॥१२॥
दर्भ ठेवोनि भूमीवरी । तर्पण करावे अवधारी । विधियुक्त भक्तिपुरःसरी । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥१३॥
तीळ धरोनि आपुल्या करी । तर्पण करावे अवधारी । ठेवो नये शिळेवरी । भूमी काष्ठपात्री देखा ॥१४॥
रोमकूपादि स्थानी देखा । तीळ ठेविता पावती दुःखा । तीळ होती कृमि ऐका । निषिद्ध बोलली स्थाने पाच ॥१५॥
घरी तर्पण करावयासी । तीळ अग्राह्य परियेसी । करावे आपण उदकासी । ऐका समस्त ऋषिजन ॥१६॥
श्वेत तीळ देवांसी । धूम्रवर्ण ऋषिजनांसी । कृष्णवर्ण पितरांसी । तीळतर्पण करावे ॥१७॥
यज्ञोपवीती सव्ये देवांसी । निवीती करावी ऋषींसी । अपसव्य पितरांसी । तर्पण करावे येणे रीती ॥१८॥
देवासी अंजुलि एक । ऋषींसी अंजुलिद्वय सम्यक । पितरांसी अंजुलि त्रिक । तर्पण ऐसे करावे ॥१९॥
स्त्रियांसी अंजुलि एक देखा । व्यतिरिक्त बंधूसी एक । सपत्नी आचार्य नामिका । द्वयांजुलि करावे ॥५२०॥
देवब्रह्मऋषीश्वरांसी । अक्षता मुख्य तर्पणासी । कृष्णतिलतर्पण पितरांसी । अनंत पुण्ये परियेसा ॥२१॥
आदित्य शुक्रवारेसी । प्रतिपदा मघा नक्षत्रासी । षष्ठी नवमी एकादशीसी । तिलतर्पण करू नये ॥२२॥
अथवा विवाह उपनयनासी । जन्मनक्षत्र जन्मदिवसी । आपुल्या घरी शुभदिवसी । तिलतर्पण करू नये ॥२३॥
जधी न करी तिलतर्पण । उदके मुख्य करा जाण । मुद्रिका हस्ती सुवर्ण । दर्भपवित्रे करावे ॥२४॥
पाय न धुता मंगलस्नान । तिलावीण करिता तर्पण । श्राद्ध करी दक्षिणेविण । निष्फल असे अवधारी ॥२५॥
निषिद्ध बोलिले ज्या दिवसी । तर्पण करावे उदकेसी । दिपवाळी चतुर्दशीसी । करावे तर्पण परियेसा ॥२६॥
अंगारक कृष्ण चतुर्दशीसी । करावे तर्पण परियेसी । यमाचे नावे विधीसी । यज्ञोपवीत सव्याने ॥२७॥
एकेक तीळ घेऊनि । त्रिवार अंजुलि देऊनि । यमाचे नाव उच्चारोनि । तर्पण करावे भक्तीने ॥२८॥
यमाची नावे त्रयोदशी । सांगेन ऐका विस्तारेसी । यम धर्मराजा परियेसी । मृत्यु अंतक चौथा जाणा ॥२९॥
वैवस्वत काल देखा । सर्वभूतक्षय ऐका । आठवा औदुंबरनामिका । नीलाय परमेष्ठी दहा जाणा ॥५३०॥
वृकोदर चित्ररेखा । चित्रगुप्त त्रयोदशिका । प्रत्येक नामे म्हणोनि एकेका । नदीत द्यावे परियेसा ॥३१॥
समस्त पातके नासती । रोगराई न पीडिती । अपमृत्यु कधी न येती । ग्रहपीडा न बाधे ॥३२॥
शुक्लपक्षी माघमासी । तर्पण करावे अष्टमीसी । भीष्मनामे परियेसी । वर्षपातके परिहरती ॥३३॥
ऐसे तर्पण करोनि । सूर्यनामे अर्घ्ये तिन्ही । द्यावी समस्त द्विजजनी । म्हणे नृसिंहसरस्वती ॥३४॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । कृपामूर्ति स्वामी कर्मविधिसी । सांगता झाला ब्राह्मणासी । येणेपरी विहिताचार ॥३५॥
म्हणे सरस्वतीगंगाधर । ऐसा ब्राह्मणांचा आचार । वर्तता होय मनोहर । सर्वाभीष्टे साधतील ॥३६॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । नामधारक शिष्य संवादत । वेदोपनिषदमतितार्थ । आचारनिरूपणाध्याय हा ॥५३७॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे आह्निकनिरूपणं नाम षट्त्रिंशोऽध्यायः ॥३६॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ।
(ओवीसंख्या ५३७)

श्रीगणेशाय नमः ।
नामधारक विनवी सिद्धासी । पुढे कथा वर्तली कैसी । श्रीगुरु सांगती विस्तारेसी । काय निरूपिले यानंतर ॥१॥
ऐक नामधारका सगुणा । श्रीगुरु अवतार नारायणा । जाणे सर्व आचारखुणा । सांगतसे कृपेसी ॥२॥
त्रैमूर्तीच्या अवतारास । आचार सांगता काय प्रयास । ज्ञान देउनी पतितास । वेद म्हणविले कवणेपरी ॥३॥
ऐसे गुरुमूर्ति दातारु । भक्तजनकल्पतरु । सांगते झाले आचारु । कृपा करोनि विप्रासी ॥४॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । गृहरक्षणार्थ कारणासी अग्निमंथनकाष्ठासी । संपादावे कृष्णामार्जार ॥५॥
श्रीखंडादि मणिघृते । तिळ कृष्णाजिन छागवस्त्रे । इतुकी असावी पवित्रे । दुरिते बाधा करू न शकती ॥६॥
शुक्लपक्ष सारसासी । पोसावे घरी परियेसी । समस्तपापविनाशी । धेनु असावी आपुले घरी ॥७॥
देवपूजेचे विधान । सांगेन ऐका एक मन । गृह बरवे संमार्जन । देवगृह असावे ॥८॥
हिरण्य रौप्य ताम्रेसी । अथवा मृत्तिका पात्रेसी । संमार्जन करावे विधीसी । निषिद्ध पात्रे सांगेन ॥९॥
कास्यपात्री कन्याहस्ती । नोवरी अथवा शूद्र जाती । न करावे वस्त्र धरोनि वामहस्ती । दक्षिण हस्ती सारवावे ॥१०॥
प्रारंभ करावा नैऋत्यकोनी । रात्री न करावे उदक घेउनी । अगत्य करणे घडे मनी । भस्मे करोनि सारवावे ॥११॥
रंगमाळिका घालोनि निर्मळ । असावे देवताभुवनी । मग बैसोनि शुभासनी । देवपूजा करावी ॥१२॥
जैसी संध्या ब्राह्मणासी । देवपूजा करावी तैसी । त्रिकाल करावे अर्चनासी । एकचित्ते मनोभावे ॥१३॥
त्रिकाळी न घडे ज्यासी । प्रातःकाळी करावी हर्षी । तेही न साधे परियेसी । माध्याह्नकाळी करावे ॥१४॥
सायंकाळी मंत्रेसी । पुष्पे वाहोनि भक्तीसी । ऐसे न साधे जयासी । भोजनकाळी करावे ॥१५॥
देवपूजा न करी नर । पावे त्वरित यमपुर । नरक भोगी निरंतर । ऐक ब्राह्मणा एकचित्ते ॥१६॥
विप्रकुळी जन्म जयासी । पूजा न करिता जेवी हर्षी । तोचि होय यमग्रासी । वैश्वदेव न करी नर ॥१७॥
देवपूजा करावयासी । सहा प्रकार परियेसी । उदकनारायण विशेषी । पूजिता तृप्ति जगन्नाथा ॥१८॥
दुसरा प्रकार सांगेन ऐका । अग्निदेवपूजा अधिका । मानसपूजा अतिविशेखा । एकचित्ते परियेसा ॥१९॥
सूर्यपूजा करिता जाण । संतुष्ट होय नारायण । सामान्यपक्षे स्थंडिली जाण । प्रतिमापूजा स्वल्पबुद्धि ॥२०॥
ज्ञाता असेल बुद्धिमंत । यज्ञपुरुषपूजा त्वरित । स्वर्गापवर्गा पूजा देत । यज्ञपुरुषपूजा मुख्य जाण ॥२१॥
अथवा पूजावे धेनूसी । ब्राह्मणपूजा विशेषी । गुरुपूजा मनोभावेसी । प्रत्यक्ष तुष्टे गुरुमूर्ति ॥२२॥
गुरु त्रैमूर्ति म्हणोनि । बोलती समस्त श्रुतिवचनी । सकळाभीष्टे तयापासूनी । पाविजे चारी पुरुषार्थ ॥२३॥
कलिप्रवेश होता नरू । न करिता अंतःकरण स्थिरू । उत्पत्ति केली शार्ङ्गधरू । समस्त कलि उद्धारावया ॥२४॥
शालिग्रामचक्रांकितेसी । प्रकाश केला हृषीकेशी । तीर्थ घेता परियेसी । समस्त पापे नासती ॥२५॥
आज्ञा घेऊनि श्रीगुरूची । पूजा करावी प्रतिमेची । वेदोक्त मंत्र करोनी वाची । विधिपूर्वक पूजावे ॥२६॥
स्त्रीजनादि शूद्रांसी । न म्हणावे वेदमंत्रेसी । आगमोक्तमार्गेसी गुरुनिरोपे करावे ॥२७॥
श्रीगुरूचे निरोपाने । पूजिजे काष्ठे पाषाणे । तेचि होती देव जाणे । होती प्रसन्न परियेसा ॥२८॥
शुचि आसनी बैसोनी । करावे प्राणायाम तिन्ही । येभ्योमाता म्हणोनि । चेतन करावा परमात्मा ॥२९॥
प्रणव मंत्रोनि द्वादशी । उदक प्रोक्षावे आपुल्या शिरसी । संकल्प करोनि अंगन्यासी । कलशपूजा करावी ॥३०॥
देवाच्या दक्षिण भागेसी । कलश ठेवावा परियेसी । पूजा करोनि भक्तीसी । शंखपूजा करावी ॥३१॥
निर्माल्य काढोनि विनयेसी । टाकावे ते नैऋत्यदिशी । धौत वस्त्र हांतरोनि हर्षी । दीप प्रज्वलित करावा ॥३२॥
स्मरावे मनी श्रीगुरूसी । मनोवाक्कायकर्मैसी । अर्चन करावे पीठासी । विधिपूर्वक अवधारा ॥३३॥
चारी द्वारे पूजोनि । दिशा पूजाव्या अर्चुनी । शांताकार करा ध्यानी । मग आवाहनावे मंत्रोक्त ॥३४॥
सहस्त्रशीर्षेति आवाहनोनि । पुरुषएवेद आसनी । एतावानस्य म्हणोनि । पाद्य द्यावे अवधारा ॥३५॥
मंत्र म्हणोनि त्रिपादूर्ध्व ऐसा । अर्घ्य द्यावे परियेसा । तस्माद्विराड म्हणा ऐसा । देवासी आचमन समर्पावे ॥३६॥
यत्पुरुषेण मंत्रेसी । स्नपन करा देवासी । दुग्धादि पंचामृतासी । स्नपनपूजा करावी ॥३७॥
पुरुषसूक्तादि रुद्रेसी । श्रुतिमार्गे करोनि न्यासासी । स्नपन करावे परियेसी । एकचित्ते अवधारा ॥३८॥
स्नपन करूनि देवासी । बैसवावे शूभासनेसी । तयज्ञमिति मंत्रेसी । वस्त्रे द्यावी परियेसा ॥३९॥
तस्माद्यज्ञेति मंत्रेसी । यज्ञोपवीत द्यावे देवासी । येणेचि मंत्रे गंधाक्षतेसी । वहावे अनन्यभक्तीने ॥४०॥
तस्मादश्वा अजायन्त । ऐसा तुम्ही मंत्र म्हणत । पुष्पे वहावी एकचित्त । मनःपूर्वक देवासी ॥४१॥
पुष्पे वहावयाचे विधान । सांगेन ऐका ऋषिजन । आपण पेरिली कुसुमे सगुण । उत्तम पक्ष परियेसा ॥४२॥
पुष्पे असती अरण्यात । ती मध्यम प्रकार बोलिजेत । क्रय करूनि घेता विकत । अधम पुष्पे जाणिजे ॥४३॥
उत्तम न मिळता घ्यावी विकत । उत्तम पक्ष पुष्पे श्वेत । रक्त मध्यम अधम पीत । कृष्णचित्र अधमाधम ॥४४॥
वर्जावी शिळी पुष्पे देख । सच्छिद्र अथवा कृमिभक्षक । भूमीवरी पडे ऐक । पुष्प त्यजावे देवासी ॥४५॥
शिळी नव्हेती द्रव्ये जाणा । बिल्वपत्रे तुळसी आणा । सहस्त्रपत्रे कमळे नाना । सदा ग्राह्य देवांसी ॥४६॥
शतपत्रे बकुलचंपकासी । पाटले कमले पुन्नागेसी । मल्लिका जाती करवीरेसी । कल्हारपुष्पे अर्पावी ॥४७॥
विष्णुपूजा करावयासी । वर्जावी पुष्पे तुम्ही ऐसी । धत्तूर अर्क करवीरेसी । रक्त पुष्पे वर्जावी ॥४८॥
गिरिकर्णिका निर्गुंडेसी । सेवगा कपित्थ करंजेसी । अमलपत्र कुष्मांडेसी । पुष्पे विष्णूसी वर्जावी ॥४९॥
ही वाहिल्या होय दोषी । सांगेन ऐका समस्त ऋषि । पुजा करिती विष्णुसी । त्यजावी याचि कारणे ॥५०॥
अर्कपुष्प वाहिल्यासी । विनाश होय आपणासी । धत्तूरपुष्पे प्रज्ञानासी । कोविदारे दरिद्रता ॥५१॥
श्रीकर्णिकापुष्पे वाहता । कुळक्षय होय त्वरिता । कंटुकारीपुष्पे वाहता । शोक होय परियेसा ॥५२॥
कंदपुष्पे होय दुःख । शाल्मलीपुष्पे रोग ऐक । त्याची कारणे करूनि विवेक । पुष्पे वहावी विष्णूसी ॥५३॥
वर्जा पुष्पे ईश्वरासी । सांगेन नावे परियेसी । कपित्थ केतकी शशांकेसी । श्यामपुष्पे वर्जावी ॥५४॥
काष्ठ पिंपळ करंज देखा । बकुल दाडिंब केतका । घातकी निंबादि पंचका । माधवीपुष्पे वर्जावी ॥५५॥
चूत कुंद यूथिका जाती । रक्त पुष्पे वर्जावी निरुती । ईश्वरार्चने दोष घडती । श्वेतपुष्पे मुख्य देखा ॥५६॥
पूजा करिता गणेशासी । वर्ज करा तुम्ही तुलसी । नित्यपूजा करा दूर्वेसी । दूर्वा वर्जे शक्तिदेवीते ॥५७॥
येणे विधी पुष्पे वाहता । काम्य होय तुम्हा त्वरिता । चतुर्विध पुरुषार्था । लाधाल तुम्ही अवधारा ॥५८॥
यत्पुरुषेति मंत्रेसी । सुगंध धूपादि परिमळेसी । ब्राह्मणोस्येति मंत्रेसी । एकार्तिक्य करावे ॥५९॥
चंद्रमामनसो इति मंत्रेसी । नैवेद्य अर्पावा देवासी । तांबूल अर्पिता म्हणा मंत्रासी । नाभ्याआसीदिति ऐसा ॥६०॥
सुवर्णपुष्पे नीरांजन । सप्तास्येति मंत्रे करून । पुष्पांजलि घेऊन । देवा यज्ञेति मंत्रे अर्पावी ॥६१॥
धातापुरस्तात मंत्रेसी । नमस्कारावे देवासी । अति संमुख पृष्ठदेशी । गर्भगृही करू नये ॥६२॥
नमस्काराचे विधान । सांगेन ऐका विद्वज्जन । सव्य देवप्रदक्षिणा । करूनि नमन करावे ॥६३॥
आपुला गुरु माता पिता । संमुख जावे बाहेरूनि येता । अथवा उत्तम द्विज देखता । संमुख जावोनि वंदावे ॥६४॥
सभा असेल द्विजांची । नमस्कार करा तुम्ही एकची । देवार्चनी तैसेची । नमस्कार पावे समस्ता ॥६५॥
माता पिता श्रीगुरूसी । नमस्काराची रीति ऐसी । उभय हस्ते कर्णस्पर्शी । एकभावे वंदावे ॥६६॥
सव्य पादावरी देखा । सव्य हस्त स्पर्शोनि निका । वामहस्ती वामपादुका । धरूनि नमन करावे ॥६७॥
गुरुस्थानांची नावे । सांगेन ऐका भावे । विचारोनिया बरवे । नमस्कारावे येणे विधी ॥६८॥
माता पिता गुरु धाता । भयहर्ता अन्नदाता । व्रतबंध केल्या पुरोहिता । सापत्नी ते गुरुस्थानी ॥६९॥

निषिद्ध स्थाने नमावयासी । सांगेन ऐका तुम्हासी । उणे असेल वय ज्यासी । नमू नये विद्वज्जनी ॥७१॥
अग्नि समिधा पुष्पे कुशा । धरिला असेल अक्षतांकुशा । स्वहस्ती परहस्ती असता दोषा । अशस्त्रवध होईजे नमस्कारिता ॥७२॥
जप अथवा होम करिता । दूर देखिला द्विज येता । स्नान करिता जळी असता । नमन करिता दोष घडे ॥७३॥
एखादा विप्र असे धावत । नेणता अथवा धनगर्वित । क्रोधवंत किंवा मंगलस्नान करित । नमस्कार करू नये ॥७४॥
एकहस्ते ब्राह्मणासी । नमू नये परियेसी । सूतकिया मूर्ख जनांसी । करू नये नमस्कार ॥७५॥
गीतवाद्यादि नृत्येसी । संतुष्टावे देवासी । प्रार्थना करावी भक्तीसी । मग अर्चावे सनकादिका ॥७६॥
पूजा अपूर्व देवासी । हस्त ठेवूनि पीठेसी । उत्तरपूजा करावी हर्षी । मग करावे उद्वासन ॥७७॥
ऐसेपरी देवपूजा । करावी भक्तीने ऐका द्विजा । संस्कृत अन्न व्हावया काजा । वैश्वदेव करावा ॥७८॥
अग्नि अलंकार करूनि । अन्न अग्निकुंडी दाखवूनि । घृतसंमिश्रित करूनि । पंच भाग करावे ॥७९॥
एक भागाच्या दहा आहुति । दुसरा बळिहरणी योजिती । अग्रदान तिसरा करिती । चौथ्या मागे पितृयज्ञ ॥८०॥
मनुष्ययज्ञ पांचव्यासी । वैश्वदेव करावा मंत्रेसी । अन्न नाही ज्या दिवसी । तंदुलांनी करावा ॥८१॥
वैश्वदेव समयासी । अतिथि आलिया घरासी । चोर चांडाल होय हर्षी । पूजा करावी मनोभावे ॥८२॥
यम सांगे दूतासी । वैश्वदेव करिता नरासी । जाऊ नको तयापासी । विष्णुआज्ञा आम्हा असे ॥८३॥
मातापिताघातकियांसी । शुनि श्वपचचांडासांसी । अतिथि आलिया घरासी अन्न द्यावे परियेसा ॥८४॥
न विचारावे गोत्रकुळ । अन्न घालावे तात्काळ । विन्मुख झालिया पितृकुळ । वर्षे सोळा न येती घरासी ॥८५॥
प्रवासी असेल आपण जरी । औषधि घृत दधि क्षीरी । कंदमूळे फळे तरी । देवयज्ञ करावा ॥८६॥
अन्नाविणे अग्रदान । करू नये साधुजन । पंचमहायज्ञ करू ब्राह्मण । चांद्रायण आचरावे ॥८७॥
न होता वैश्वदेव आपुल्या घरी । भिक्षेसि आला नर जरी । भिक्षा घालिता पाप दूरी । वैश्वदेवफल असे ॥८८॥
बळिहरण घालोनि काड:ई आपण । त्याणे आचरावे चांद्रायण । आपं काढिता दोष जाण । आणिकाकरवी काढवावे ॥८९॥
बळिहरण न काढिता जेवी जरी । सहा प्राणायाम त्वरित करी । तेणे होय पाप दूरी । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥९०॥
गृहपूजा करूनि देखा । गोग्रास द्यावा विशेखा । नित्य श्राद्ध करणे ऐका । करूनि अन्न समर्पावे ॥९१॥
स्वधाकार पिंडदान । करू नये अग्नौकरण । ब्रह्मचारियासी तांबूलदान । दक्षिणा वर्ज परियेसा ॥९२॥
वैश्वदेव झालियावरी । उभा राहोनि आपुल्या द्वारी । अतिथिमार्ग पहावा निर्धारी । आलिया पूजन करावे ॥९३॥
श्रमोनि आलिया अतिथिसी । पूजा करावी भक्तीसी । अथवा अस्तमानसमयासी । आलिया पूजन करावे ॥९४॥
वर्णाना ब्राह्मणो गुरुः । ऐसे बोलती वेदशास्त्रु । अतिथि जाण सर्व गुरु । वैश्वदेवसमयासी ॥९५॥
वैश्वदेवसमयी अतिथिसी । पूजा करिता परियेसी । ती पावे देवांसी । तुष्टे ब्रह्मा इंद्र वह्नि ॥९६॥
वायुगण अर्यमादि देव । तृप्ति पावे सदाशिव । पूजा करावी एकभाव । सर्व देवता संतुष्टती ॥९७॥
अतिथीपाद प्रक्षाळिती । पितर सकळ तृप्त होती । अन्नदाने ब्रह्मा तृप्ति । विष्णुमहेश्वरा अवधारा ॥९८॥
यतीश्वरादि ब्रह्मचारी । जे समयी येती आपुल्या घरी । अन्न द्यावे निर्धारी । महापुण्य असे देखा ॥९९॥
ग्रासमात्र दिधला एक । मेरूसमान पुण्य अधिक । बरवे द्यावे त्यासी उदक । समुद्रासमान दान असे ॥१००॥
अतिथि आलिया घरासी । जेवी आपण त्यजूनी त्यासी । श्वानयोनी पावे हर्षी । गर्दभयोनी पुढे उपजे ॥१॥
ऐसे अतिथि पूजोन । मग करावे भोजन आपण । सर्वथा न करावे अन्न भिन्न । प्रपंच करिता दोष असे ॥२॥
सायंप्रातर्गृहस्थासी । भोजन करणे संतोषी । प्रक्षालन करोनि पादांसी । ओले पायी असावे ॥३॥
ओली असावी पाच स्थाने । हस्त पाद उभय जाणे । मुख ओले पंचम स्थाने । शतायुषी पुरुष होय ॥४॥
पूर्वाभिमुख बैसोन । भोजनसमयी धरा मौन । पाद उभय जोडोन । बैसावे ऐका एकचित्ते ॥५॥
मंडल करावे चतुष्कोनी । वरी भस्म प्रोक्षोनि । क्षत्रियास मंडल त्रिकोनी । वर्तुळ वैश्यासी परियेसा ॥६॥
शूद्रे अर्धचंद्राकार । मंडल करावे परिकर । आवाहनावे सुरवर । आदित्य वसु रुद्र ब्रह्मा ॥७॥
पितामहादि देवता । तया मंडली उपजविता । याचि कारणे तत्त्वता । मंडलाविणे जेवू नये ॥८॥
न करिता मंडल जेवी जरी । अन्न नेती निशाचरी । पिशाच असुर राक्षस परी । अन्नरस नेती अवधारा ॥९॥
उत्तम पूर्वाभिमुखी देख । पश्चिम मध्यम ऐक । पितृकार्या उत्तरमुख । सदा दक्षिण वर्जावी ॥११०॥
धरावे पात्र सुवर्ण रजत ताम्रपात्र । पद्मअपात्र पालाशपात्र । पुण्यपात्र परियेसा ॥११॥
जेविता वर्जावे गृहस्थांनी ताम्रपात्र । यतींनी सुवर्ण अथवा रजत । ताम्रशुक्तिशंखज पात्र । स्फटिक पाषाण यतीसी ॥१२॥
कर्दलीगर्भपत्रेसी । पद्मपत्रजळे स्पर्शी । वल्लीपालाशपत्रेसी । जेविता चांद्रायण आचरावे ॥१३॥
वट अश्वत्थ अर्क पटोल । कदंब कोविदारपर्णे कोमळ । भोजन करिता तात्काळ । चांद्रायण आचरावे ॥१४॥
लोहपात्र आपुले करी । ताम्र मृण्मय पृष्ठपर्णावरी । कार्पासपत्री वस्त्रावरी । जेविता नरकाप्रती जाय ॥१५॥
कास्यपात्री जेविल्यासी । यश बळ प्रज्ञा आयुष्यासी । वढे नित्य अधिकेसी । गृहस्थांनी नित्य कास्यपात्र ॥१६॥
असावे पात्र पाच शेर । नसावे उने अधिक थोर । उत्तमोत्तम षट् शेर । सुवर्णपात्रासमान देखा ॥१७॥
कास्यपात्रीचे भोजन । तांबूलासहित अभ्यंगन । यती ब्रह्मचारी जाण । विधवा स्त्रियांनी वर्जावे ॥१८॥
श्वानाच्या चर्माहुनी । निषेध असे एरंडपानी । निषेध अधिक त्याहुनी । आणिक जेविल्या भिन्नताटी ॥१९॥
फुटके कास्यपात्रेसी । जेविता होय महादोषी । संध्याकाळी जेविता हर्षी । महापातकी होय जाणा ॥१२०॥
जवळी असता पतित जरी । जेवू नये अवधारी । शूद्र जेविल्या शेषावरी । जेवू नये ब्राह्मणाने ॥२१॥
सवे घेउनी बाळासी । जेवू नये श्राद्धदिवसी । आसन आपुले आपणासी । घालू नये ब्राह्मणाने ॥२२॥
आपोशन आपुले हाती । घेऊ नये मंदमती । तैल घालुनी स्वहस्ती । आपण अभ्यंग करू नये ॥२३॥
भोजनकाळी मंडळ देखा । करू नये स्वहस्तका । आयुष्यक्षय पुत्रघातका । म्हणिजे नाम तयासी ॥२४॥
नमस्कारावे वाढिता अन्न । अभिधारावे पहिलेचि जाण । प्राणाहुति घेता क्षण । घृत घालावे स्वहस्ताने ॥२५॥
उदक घेऊनि व्याहृति मंत्री । प्रोक्षोनि अन्न करा पवित्री । परिषिंचावे तेचि रीती । मग नमावे चित्रगुप्ता ॥२६॥
बळी घालोनि चित्रगुप्तासी । काढवावे सवेचि परियेसी । वाम हस्तक धुवोनि सरसी । पात्र दृढ धरावे ॥२७॥
अंगुष्ठतर्जनीमध्यमांगुलीसी । धरावे पात्र वामहस्तेसी । आपोशन करावे सव्यकरेसी । आणिकाकरवी घालावे ॥२८॥
आपोशन उदक सोडोनि जरी । आणिक घेती उदक तरी । श्वानमूत्र घेतल्यापरी । एकचित्ते परियेसा ॥२९॥
धरिले आपोशन ब्राह्मणासी । नमस्कारिता महादोषी । आशीर्वाद घेऊ नये तयापासी । उभयतांसी दोष घडे ॥१३०॥
मौन असावे ब्राअह्मणे देख । बोलू नये शब्दादिक । आपोशन घ्यावे मंत्रपूर्वक । मग घ्याव्या प्राणाहुति ॥३१॥
आपोशनाविण भोजन करी । पापविमोचन करा तरी । अष्टोत्तरशत मंत्र गायत्री । जपता दोष परिहरे ॥३२॥
प्राणाहुतीचे विधान । सांगेन ऐकिजे ब्राह्मण । प्राणाग्निहोत्र करिता जाण । समस्त पापे जाती देखा ॥३३॥
जैसा कार्पासराशीची । अग्नि लागता परियेसी । जळोनि जाय त्वरितेसी । तैसी पापे नासती ॥३४॥
प्राणाहुतीचे लक्षण । चतुर्विध पुरुषार्थ जाण । अन्न स्पर्शोनि मंत्र म्हणे । गीताश्लोक प्रख्यात ॥३५॥
श्लोक ॥ अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः । प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥३६॥
टीका ॥ अन्नं ब्रह्म रसो विष्णु । भोक्ता देव गिरिजारमणु । ऐसा तुम्ही मंत्र म्हणोनु । अग्निरस्मि मंत्र जपावा ॥३७॥
मग घ्याव्या प्राणाहुति । आहेति पंच मंत्र प्रख्याति । तर्जनी मध्यम अंगुष्ठधृती । प्राणाय स्वाहा म्हणावे ॥३८॥
मध्यम अनामिका अंगुष्ठेसी । अपानाय स्वाहा म्हणा हर्षी । व्यानाय स्वाहा म्हणा यांसी । कनिष्ठिकाअनामिकाअंगुष्ठेसी ॥३९॥
अंगुष्ठतर्जनीकनिष्ठिकेसी । उदानाय स्वाहा म्हणा हर्षी । पंचांगुलीने परियेसी । समानाय स्वाहा म्हणावे ॥१४०॥

मौन धरावयाची स्थाने । सांगेन ऐका अतिउत्तमे । स्नानासमयी धरा निर्गुणे । न धरिता फल असेना ॥४२॥
होम करिता न धरी मौन । लक्ष्मी जाय तत्क्षण । जेविता मौन न धरिता आपण । अपमृत्यु घडे त्यासी ॥४३॥
अशक्य असेल मौन जरी । प्राणाहुति घेई तववरी । मौन धरावे अवधारी । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥४४॥
पिता जिवंत असे ज्यासी । अथवा ज्येष्ठ बंधु परियेसी । धरू नये मौनासी । श्राद्धान्न जेविता धरावे ॥४५॥
पंच प्राणाहुति देता । सर्वांसी मौन ग्राह्यता । असेल पिता वडील भ्राता । मौन धरिल्या अधःपात ॥४६॥
जेविता प्रथम मधुरान्न । भोजन करावे नरे जाण । भक्षून पूर्वी द्रवान्न । कठिणांश परियेसा ॥४७॥
भोजनांती समयासी । जेवू नये द्रवान्नांसी । बळ जाय परियेसी । शीघ्र भोजन करावे ॥४८॥
धेनूसी उदक प्यावयासी । जितुका वेळ होय त्यासी । भोजन करावे परियेसी । शीघ्र भोजन मुख्य जाणा ॥४९॥
भोजन करावयाची स्थिति । सांगेन ऐका ग्रासमिति । संन्यासी-मुनि-यती । अष्ट ग्रास घ्यावे जाण ॥१५०॥
षोडश ग्रास अरण्यवासी । द्वात्रिंशत गृहस्थासी । मिति नाही ब्रह्मचाऱ्यासी । एकचित्ते परियेसा ॥५१॥
जितुका मावेल आपुल्या मुखी । तितुका ग्रास घ्यावा विशेखी । अधिक घेता ग्रास मुखी । उच्छिष्ठ भक्षिले फळ देखा ॥५२॥
अर्धा ग्रास भक्षूनि । उरले ठेविती आपुल्या भाणी । चांद्रायण आचरावे त्यांनी । उच्छिष्ठ भोजन तया नाव ॥५३॥
न बैसावे सहभोजनासी । इष्टसोयरे इत्यादिकांसी । व्रतबंधाविणे पुत्रासी । कन्याकुमारांसी दोष नाही ॥५४॥
सांडू नये अन्न देखा । घृत पायस विशेष ऐका । सांडावे थोडे ग्रास एका । जेवू नये सर्व अन्न ॥५५॥
भोजन संपेपर्यंत । पात्री धरावा वामहस्त । जरी सोडील अजाणत । अन्न वर्जोनि उठावे ॥५६॥
या कारणे द्विजजना । सोडू नये पात्र जाणा । अथवा न धरावे पूर्वीच जाणा । दोष नाही परियेसा ॥५७॥
वस्त्र गुंडाळोनि डोयीसी । अथवा संमुख दक्षिणेसी । वामपादावरी हस्तेसी । जेविता अन्न राक्षस नेती ॥५८॥
वामहस्त भूमीवरी । ठेवूनि नर भोजन करी । रोग होय शरीरी । अंगुली सोडोनि जेवू नये ॥५९॥
अंगुली सोडूनि जेवी जरी । दोष गोमांस भक्षिल्यापरी । दोष असती नानापरी । स्थाने असती भोजनासी ॥१६०॥
अश्वगजारूढ होऊनि । अथवा बैसोनि स्मशानी । देवालयी शयनस्थानी । जेवू नये परियेसा ॥६१॥
निषिद्ध जेवण करपात्रेसी । ओले नेसोनि आर्द्रकेशी । बहिर्हस्त बहिःकेशी । जेविता दोष परियेसी ॥६२॥
यज्ञोपविताच्या उपवीतीसी । भोजन करावे परियेसी । जेविता आपुल्या संमुखेसी । पादरक्षा असू नये ॥६३॥
ग्रास उदक कंद मूळ । इक्षुदंडादि केवळ । भक्षोनि पात्री ठेविता सकळ । उच्छिष्ट होय अवधारा ॥६४॥
भोजन करी स्नानाविणे । न करिता होम जेवी कवणे । अन्न नव्हे कृमि जाणे । म्हणे पराशर ऋषि ॥६५॥
पर्णपृष्ठावरी रात्रीसी । दीपेविण जेविल्यासी । महादोष असे तयासी । कृमि भक्षिल्यासमान होय ॥६६॥
दीप जाय भोजन करिता । पात्र धरावे स्मरोनि सविता । पुनरपि आणोनि लाविता । मग भोजन करावे ॥६७॥
पात्री असेल जितुके अन्न । तितुकेचि जेवावे परिपूर्ण । आणिक घेता दोष जाण । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥६८॥
स्पर्शो नये जेविता केश । कथा सांगता महादोष । दिसू नये व्योम आकाश । अंधकारी जेवू नये ॥६९॥
न ठेविता शेष स्त्रियेसी । जेविता होय अत्यंत दोषी । ठेविले न जेविता स्त्रिया दोषी । महापातके घडती जाणा ॥१७०॥
शून्यदेवदेवालयी । देवस्थान आपुले गृही । जलसमीप संध्यासमयी । जेवू नये परियेसा ॥७१॥
पात्रे ठेवूनि दगडावरी । जेवू नये अवधारी । अवलोकू नये मुखावरी । स्त्रीजनाचे परियेसी ॥७२॥
न करावे सहभोजन । जेविता होय उच्छिष्टभक्षण । कुलस्त्रियेसी करिता भोजन । निर्दोष असे परियेसा ॥७३॥
प्राशन शेष उदकासी । घेऊ नये उच्छिष्टासी । अगत्य घडे संधीसी । किंचित सांडूनि घेईजे ॥७४॥
वस्त्रोदक घेतल्यासी । अपार दोष घडती तयासी । जन्म पावे श्वानयोनीसी । पडे मागुती नरकात ॥७५॥
शब्द होय उदक घेता । अथवा क्षीर घृत सेविता । आपोशनोदक प्राशिता । सुरापानसमान असे ॥७६॥
महाजळी रिघोनि । उदक घेती मुखांतुनी । अथवा जे घेती उभ्यानी । सुरापानसमान जाणा ॥७७॥
द्वयहस्तांजुळि करूनि । घेऊ नये उदक ज्ञानी । घ्यावे एक हस्ते करूनि । वाम हस्त लावू नये ॥७८॥
सभे बैसोनि एकासनी । अथवा आपुले हातुरणी । प्राशन करू नये पाणी । महादोष परियेसा ॥७९॥
वाढावे भिन्न पात्रेसी । पाहू नये आणिक यातीसी । रजस्वला स्त्रियांसी । चांडाळ श्वान पाहू नये ॥१८०॥
दृष्टि पडे इतुकियासी । ध्वनि ऐकता कर्णासी । त्यजावे अन्न त्वरितेसी । जेविता दोष परियेसी ॥८१॥
कलहशब्द कांडण दळण । ऐकता जेवू नये अन्न । अपशब्द स्पृष्टास्पृष्ट जाण । त्यजावे अन्न परियेसा ॥८२॥
नेणते लोक पंक्तीसी । घेऊ नये परियेसी । अगत्य घडे संधीसी । उदके भस्मे करा पृथक ॥८३॥
अथवा स्तंभ असेल मध्य । द्वारमार्ग असेल शुद्ध । उदके वेष्टिता आपुले परिघ । दोष नाही परियेसा ॥८४॥
कृष्ण वस्त्र नेसोनि आपण । जेविता दोष अपार जाण । स्त्रीजन वाढिती कांसेविण । उच्छिष्टसमान परियेसा ॥८५॥
ऐसा विचार करूनि मनी । करावे भोजन द्विजजनी । विकिरिद विलोहित म्हणोनि । अभिमंत्रावे शेष अन्न ॥८६॥
विकिरीदे इति मंत्रासी । म्हणावा अघोर ऋषि । रुद्रदेवता परियेसी । अन्नाभिमंत्रणे विनियोग ॥८७॥
ऐसा मंत्र जपोन । हाती घ्यावे शेषान्न । यमाच्या नावे बळी घालोन । उत्तरापोशन मग घ्यावे ॥८८॥
उच्छिष्ट सर्व पात्रीचे । घेऊनि हाती म्हणा वाचे । रौरवमंत्र असे त्याचे । पात्राजवळी ठेवावे ॥८९॥
उठोनि जावे प्रक्षालनासी । गंडूष करोनि मग हस्त स्पर्शी । न करित गंडूष प्रक्षाली हस्तासी । आत्मघातकी तोचि जाणा ॥१९०॥
मुख प्रक्षाळिता परियेसी । मध्यमांगुली दात घासी । तर्जनी अंगुष्ठे महादोषी । रौरव नरकी परियेसा ॥९१॥
बरवे हस्तप्रक्षालन । करावे दंतशोधन । हातीचे पवित्र सोडून । टाकावे नैरृत्य दिशे ॥९२॥
अंगुष्ठमात्र पुरुषा । म्हणावा मंत्र परियेसा । हस्त घासोनि चक्षुषा । उदक लावावे अवधारा ॥९३॥
ऐसा जरी न म्हणा मंत्र । चक्षुरोग होय त्वरित । या कारणे करा निश्चित हस्तोदके आरोग्यता ॥९४॥
द्विराचमन करोनि । आयंगौ मंत्र म्हणोनि । द्रुपदादिवेन्मुमुचा म्हणोनि । पादप्रक्षालन करावे ॥९५॥
ऐसा तुम्ही मंत्र जपता । भोजनठायी जाऊनि बैसता । द्विराचमन करूनि निगुता । नासिकास्पर्श मग करावा ॥९६॥
स्मरावे मग अगस्त्यासी । कुंभकर्ण वडवाग्नीसी । वृकोदर शनैश्चरासी । इल्वल वातापि जीर्य म्हणावे ॥९७॥
हस्त दाखवावे अग्निसी । आणिक सांगेन परियेसी । बंधुवर्ग असती जयासी । पुसू नये वस्त्रे कर ॥९८॥
मग स्मरावे श्रीगुरूसी । आणिक स्मरावे कुळदेवतेसी । येणेपरी विधीसी । भोजन करावे द्विजोत्तमे ॥९९॥
विप्र विनवी श्रीगुरूसी । भोजनप्रकार सांगितला आम्हासी । विधिनिषिद्ध अन्ने कैसी । निरोपावी दातारा ॥२००॥
विप्रवचन ऐकोनि । निरोपिती श्रीगुरु संतोषोनि । ऐक ब्राह्मणा म्हणोनि । अतिप्रेमे निरोपिती ॥१॥
म्हणे सरस्वती गंगाधरु । ब्राह्मणपणाचा आचारु । निरोपिला गुरुनाथे समग्रु । म्हणोनि विनवी संतोषे ॥२॥
वैश्वदेवाविणे अन्न । अथवा गणान्न परिपुर्ण । घातले असेल बहु लवण । बहुमिश्रितान्न जेऊ नये ॥३॥
लशुन गाजर कंद मुळा । वृंताक श्वेत जो असे भोपळा । छत्राकार शाखा सकळा । वर्जाव्या तुम्ही परियेसा ॥४॥
धेनुअजामहिषीक्षीर । प्रसूतीचे । वर्जावे । दशरात्र । नूतनोदक पर्जन्य पूर । त्रिरात्रीचे वर्जावे ॥५॥
कूष्मांड डोरली पडवळेसी । मुळा बेल आवळेसी । न भक्षावे प्रतिपदेसी । भक्षिता पाप परियेसा ॥६॥
स्वर्गापवर्ग चाड ज्यासी । अष्टमी वर्जावी औदुंबरासी । अमलकफळ रात्रीसी । वर्जावे भानुवासर सप्तमी ॥७॥
बेलफळ वर्ज शुक्रवारी । शमीफळ मंदवारी । भक्षिता लक्ष्मी जाय दुरी । वर्जावे ते दिवसी परियेस ॥८॥
धात्रीफळ रात्रीसी । भक्षिता हानि प्रज्ञेसी । नाश करी वीर्यासी । धात्रीफळ वर्जावे ॥९॥
नख केश पडिलिया अन्ना । स्पर्श केलिया मार्जार जाणा । वायस घारी कुक्कुट जाणा । स्पर्श केलिया अन्न त्यजावे ॥२१०॥
धेनूमूषक मुखस्पर्शे । अथवा स्पर्शे अधःकेशे । त्यजावे अन्न भरवसे । असेल उच्छिष्ट अन्नाजवळी ॥११॥

घृततैलमिश्रित । शिळे अन्न अपवित्र । तळिले असेल सर्वत्र । शिळे नव्हे सर्वथा ॥१३॥
विप्र विकिती गोरस । घृत क्षीर परियेस । घेता घडती महादोष । साक्षात वह्निपक्व जेवू नये ॥१४॥
माषान्नाचे वटक देखा । शिळे न होती कधी ऐका । जैसे लाह्यापीठ देखा । शिळे नव्हे परियेसा ॥१५॥
कंदमूळादि सुरान्न । जवांचे असेल परमान्न । गुडयुक्त असेल अन्न । शिळे नव्हे परियेसा ॥१६॥
ऐशा शिळ्या अन्नासी । दोष नाही परियेसी । विटाळ होता महादोषी । शुचि स्थानी असावे ॥१७॥
भोजन केलिया नंतर । तांबूल घ्यावे परिकर । क्रमुकचूर्ण पर्ण सत्वर । घ्यावे द्यावे ब्राह्मणी ॥१८॥
तिळमिश्रित भक्ष्यासी । जेवु नये रात्रीसी । जेविता होय महादोषी । श्रीगुरु म्हणती ब्राह्मणाते ॥१९॥
क्रमुक एक सुखारोग्य । द्वय देता निश्चळ आरोग्य । त्रीणि द्यावी महा भाग्य । चतुर्थे दुःख होय जाणा ॥२२०॥
पाच क्रमुक देता जरी । आयुष्य प्रज्ञा वाढे भारी । देऊ नये सहा सुपारी । मरण सांगे परियेसा ॥२१॥
पर्ण अग्र मूल न काढी जरी । व्याधि संभवे अवधारी । अग्र भक्षिता पाप भारी । चूर्णपर्णे आयुष्य क्षीण ॥२२॥
पर्णपृष्ठी बुद्धिनाश । द्विपर्ण खाता महादोष । ऐश्वर्याचा होय विनाश । ऋषिसंमत असे जाणा ॥२३॥
पर्णाविण क्रमुक मुखी । घालिता आपण होय असुखी । सप्त जन्म दरिद्री दुःखी । अज्ञानी होय अंतकाळी ॥२४॥
यतीश्वरादिब्रह्मचारी । रजस्वला स्त्री विधवा जरी । तांबूल भक्षिता मांसपरी । रस त्याचा सुरापानसम ॥२५॥
तांबूल भक्षिल्यानंतर । सायंसंध्या करावी विप्रे । सूर्यअर्धमंडळ उतरे । अर्घ्यै द्यावी परियेसा ॥२६॥
बैसोनि द्यावी अर्घ्यै तिन्ही । चारी द्यावी काळ क्रमूनि । गायत्री मंत्र जपूनि । इमंमेवरुण म्हणावा ॥२७॥
गोत्रप्रवर उच्चारोन । मग करावे औपासन । करावे निशि भोजन । क्षीरमिश्रित मुख्य असे ॥२८॥
रात्री करिता परिसिंचना । ऋतंत्वा सत्यं मंत्र म्हणा । येणे विधी करा भोजना । पूर्वी जैसे बोलिले असे ॥२९॥
भोजन झालियानंतर । वेदाभ्यास एक प्रहर । मग जावे शयनावर । येणे विधी आचरावे ॥२३०॥
शयन करावयाचे विधान । सांगेन ऐका विद्वज्जन । पराशर सांगे वचन । तेचि विधान सांगतसे ॥३१॥
खट्वा असावी निर्मळ जाण । वर्जावी त्रिपाद भिन्न दूषण । औदुंबर अश्वत्थ पिंपरी निर्गुण । न करावी खट्वा परियेसा ॥३२॥
निषिद्ध जांबूळ काष्ठाची । वर्जावी प्रेतगजदंताची । भिन्नकाष्ठ त्यजावी साची । बरवी असावी खट्वा देखा ॥३३॥
सुमुहूर्ते विणावी खट्वा देखा । धनिष्ठा भरणी मृगशीर्षी दूषका । वार सांगेन विशेखा । शुभाशुभफळ असे ॥३४॥
आदित्यवारी लाभ देखा । चंद्रवारी महामुखा । भौमवारी पाविजे दुःखा । बुधवारी सांगे महापीडा ॥३५॥
गुरुवारी विणल्यासी । सहा पुत्र होती त्यासी । शुक्रवारी अतिविशेषी । मृत्यु पावे मंदवारी ॥३६॥
स्वगृही शयन पूर्वशिरेंसी । श्वशुरालयी दक्षिणेसी । प्रवासकाळी पश्चिमेसी । शयन करावे परियेसा ॥३७॥
सदा निषिद्ध उत्तर दिशा । वर्जेले फळ सांगितली दिशा । विप्रे आचरावा ऐसा । ऋषिमार्ग शुभाचार ॥३८॥
पूर्ण कुंभ ठेऊनि उशी । मंगळ द्रव्य घालावे बहुवशी । रात्रिसूक्त म्हणावे हर्षी । विष्णुस्मरण करावे ॥३९॥
मग स्मरावा अगस्त्यऋषि । माधव मुचुकुंद परियेसी । आस्तिक कपिल महाऋषि । सर्पस्तुति करावी ॥२४०॥
निषिद्ध स्थाने निजावयासी । सांगेन सर्व परियेसी । जीर्ण देवालयी स्मशानासी । एक वृक्षातळी वर्जावे ॥४१॥
चारी बिदी चोहाटेसी । ईश्वरस्थान परियेसी । मातापिता निजले स्थळासी । निजू नये परियेसा ॥४२॥
वर्जावे वारुळाजवळी । आणि तळ्याचे पाळी । नदीतीरी नसता जवळी । घोर स्थळी निजू नये ॥४३॥
वर्जावे शयन धान्यावरी । निजू नये मोडके घरी । वडील खाली निजतील तरी । खट्वा वर्जावी त्यापुढे ॥४४॥
नेसून ओले अथवा नग्न । निजू नये शिर वेष्टून । आकाशाखाली वर्जावे शयन । दीप असता निजू नये ॥४५॥
पूर्वरात्री अपरात्रीसी । निजू नये परियेसी । असू नये स्त्रियेपासी । रजस्वला चतुर्थदिनी ॥४६॥
असावे जानवे उपवीतीसी । दृष्टी न पडावी योनीसी । आयुष्य क्षीण परियेसी । दीप वर्जावा या कारणे ॥४७॥
नीळ वस्त्र नेसले स्त्रियेसी । करिता संग परियेसी । पुत्र उपजे चांडाळेसी । शुभ्र वस्त्र विशेष ॥४८॥
रजस्वला न होता स्त्रियेसी । न करावा संग परियेसी । संग करिता महादोषी । आणिक प्रकार एक असे ॥४९॥
दश वर्षे होता कन्येसी । रजस्वला सर्वत्रांसी । ऐका तुम्ही सर्व ऋषि पराशर सांगतसे ॥२५०॥
ऋतुकाळ असता स्त्रियेसी । गावासी जाता परियेसी । भ्रूणहत्या होय दोषी । प्रख्यात असे परियेसा ॥५१॥
वृद्ध अथवा वांझेसी ।असती पुत्र जिसी । बहु कन्या होती जियेसी । चुकता ऋतुकाळ दोष नाही ॥५२॥
ऋतु देता चतुर्थ दिवसी । पुत्र उपजे अल्पायुषी । कन्या होय पाचवे दिवसी । सहावे दिनी पुत्र परियेसा ॥५३॥
विषम दिवसी कन्या जाण । सम दिवसी पुत्र सगुण । दहा दिवस ऋतुकाळ खूण । चंद्रबळ असावे ॥५४॥
मूळ मघा रेवती दिवसी । संग न करावा परियेसी । कोप नसावा उभयतांसी । संतोषरूपे असावे ॥५५॥
ऋतुकाळी स्त्रीपुरुषांसी । जे जे असेल मानसी । सत्त्वरजतमोगुणेसी । तैसा पिंड उपजे देखा ॥५६॥
ऐसा ब्राह्मणाचा आचार । सांगता झाला पराशर । ऐकोनि समस्त ऋषीश्वर । येणेपरी आचरती ॥५७॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणांसी । ऐसा आचार परियेसी । जे आचरती विधींसी । दैन्य कैचे तया घरी ॥५८॥
ते वंद्य होत देवांसी । कामधेनु येईल घरासी । लक्ष्मी राहे अखंडेसी । पुत्रपौत्री नांदती ॥५९॥
होय आपण शतायुषी । न घडती दोष काही त्यासी । तो न भिई कळिकाळासी । ब्रह्मज्ञानी होय जाणा ॥२६०॥
काळमृत्यु चुके देखा । अपमृत्यु घडे कैचा ऐका । ऐसा आचार आहे निका । नित्य रहाटावे येणेपरी ॥६१॥
ऐसे ऐकोनिया वचना । विप्र लागे श्रीगुरुचरणा । झाला उपदेश उद्धारणा । कृपासागर गुरुमूर्ति ॥६२॥
भक्तजन तारावयासी । अवतरलासी हृषीकेशी । परिहरिले अंधकारासी । ज्ञानज्योती प्रकाशली ॥६३॥
ऐसे विनवोनि ब्राह्मण । पुनरपि धरिले श्रीगुरुचरण । श्रीगुरुमुर्ति संतोषोन । प्रसन्न झाले तये वेळी ॥६४॥
म्हणती श्रीगुरु तयासी । आचार सांगितला तुज हर्षी । नव जावे आता भिक्षेसी । आचार करूनि सुखी असे ॥६५॥
जे जे इच्छिसी कामना । होईल निरुती सत्य जाणा । कन्या पुत्र नांदती सगुणा । संदेह न धरावा मानसी ॥६६॥
ऐसा वर लाधोनि । विप्र गेला संतोषोनि । होता तैसा आचरोनि । सकळाभीष्टे लाधला ॥६७॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । श्रीगुरुचरित्र ऐसे परियेसी । ऐकता ज्ञान समस्तांसी । मूढ होय ब्रह्मज्ञानी ॥६८॥
अज्ञानतिमिरअंधकारासी । ज्योतिप्रकाश कथा सुरसी । जे जे इच्छिले मानसी । पाविजे त्वरित अवधारा ॥६९॥
म्हणे सरस्वतीगंगाधरु । श्रीगुरुचरित्र असे सुरतरु । ऐकता होय संतोष फारु । सकळाभीष्टे साधती ॥२७०॥
इति श्रीगुरुचरित्र । नामधारका शिष्य सांगत । आचार जो का समस्त । निरोपिला श्रीगुरुनाथे ॥२७१॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे आह्निककर्मनिरूपणं नाम सप्तत्रिंशोऽध्यायः ॥३७॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या २७१)

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
नामधारक विनवी सिद्धासी । पुढें चरित्र जाहलें कैसी । विस्तारावें कृपेंसीं । म्हणोनि चरणीं लागला ॥१॥
आर्त झालों मी तृषेचा । घोट भरवीं गा अमृताचा । चरित्र सांगें श्रीगुरुचें । माझें मन निववीं वेगीं ॥२॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । तूं जें जें मज पुससी । संतोष होतो आम्हांसी । गुरुचरित्र आठवितां ॥३॥
तुजकरितां आम्हांसी । लाभ जोडे परियेसीं । आठवली कथा सुरसी । विचित्र एक झालें असे ॥४॥
मागें कथन सांगितलें । जें भक्तीं द्रव्य आणिलें । स्वामीं अंगीकार नाहीं केलें । समाराधना करावी म्हणोनि ॥५॥
नित्य समाराधना देख । करीत होते भक्त अनेक । कधीं नाहीं आराणूक । नाहीं ऐसा दिवस नाहीं ॥६॥
ऐसें होतां एके दिवशीं । दुर्बळ द्विज आला परियेसीं । असे काश्यप-गोत्रेंसीं । नाम तया 'भास्कर' ॥७॥
अति सुक्षीण ब्राह्मण । आला आपण दर्शना म्हणोन । साष्टांगीं नमस्कारुन । भक्तिपूर्वक विनविलें ॥८॥
ते दिवसीं भक्तजन । करीत होते आराधन । उठवितात तया ब्राह्मणा । भोजन करीं म्हणोनियां ॥९॥
संकल्प करोनि तो ब्राह्मण । श्रीगुरुसी भिक्षा करवीन आपण । सवें सोपस्कार घेऊन । आला होता परियेसा ॥१०॥
त्रिवर्गाच्या पुरते देखा । सवें असे तंडुल-कणिक । वरकड पदार्थ त्या पूर्तिका । सोपस्कार असे त्यापाशीं ॥११॥
सर्व असे वस्त्रीं बांधिलें । नेऊनि मठांत ठेविलें । भक्तें आणिक त्यासी बोलाविलें । गेला तो ब्राह्मण भोजनासी ॥१२॥
भोजन करितां झाली निशी । आपण आला मठासी । गांठोडी ठेवी आपुले उशीं । मग निद्रा करी देखा ॥१३॥
नित्य घडे ऐसेंचि त्यासी । भक्त लोक येती आराधनेसी । आराणूक नव्हे त्यासी । नित्य जेवी समाराधनीं ॥१४॥
समस्त त्यास हांसती । पहा हो समाराधनेची आयती । घेऊनि आला असे भक्तीं । आपण जेवी नित्य समाराधनीं ॥१५॥
एकासी नव्हे पुरें अन्न । श्रीगुरुशिष्य बहु जन । केवीं करील हा ब्राह्मण । समाराधना करीन म्हणतो ॥१६॥
लाज नये त्यासी कैसी । समाराधना म्हणायासी । दे कां स्वयंपाक आम्हांसी । तूं करीं आजि माधुकरी ॥१७॥
ऐसें नाना प्रकारें त्यासी । विनोद करिती ब्राह्मण परियेसीं । ऐशा प्रकारें तीन मासी । क्रमिले त्या ब्राह्मणें तेथेंचि ॥१८॥
नित्य होतसे आराधन । त्यांचे घरीं जेवी आपण । गांठोडी उशाखालीं ठेवून । निद्रा करी प्रतिदिवसीं ॥१९॥
मास तीन क्रमिल्यावरी । समस्त मिळोनि द्विजवरीं । परिहास करिती अपारी । श्रीगुरुमूर्तिं ऐकिलें ॥२०॥
बोलाविती त्या ब्राह्मणासी । आजि भिक्षा करावी आम्हांसी । स्वयंपाक करीं वेगेंसीं । म्हणती श्रीगुरु कृपासिंधु ॥२१॥
ऐकोनि श्रीगुरुच्या बोला । संतोष अपार द्विजा झाला । चरणावरी माथा ठेविला । हर्षे गेला आइतीसी ॥२२॥
आणिलें द्रुय शेर घृत । शाका दोनी त्यापुरत । स्नान करुनि शुचिर्भूत । स्वयंपाक केला तये वेळीं ॥२३॥
समस्त ब्राह्मण तये वेळीं । मिळोन आले श्रीगुरुजवळी । म्हणती आजि आमुची पाळी । यावनाळ-अन्न घरीं ॥२४॥
नित्य होतें समाराधन । आम्ही जेवितों मिष्टान्न । कैंचा हा आला ब्राह्मण । आजि राहिली समाराधना ॥२५॥
श्रीगुरु म्हणती द्विजांसी । नका जाऊं घरांसी । शीघ्र जावें आंघोळीसी । येथेंचि जेवा तुम्ही आजि ॥२६॥
ब्राह्मण मनीं विचारिती । मठीं असे सामग्री आयती । स्वयंपाक आतां करविती । आम्हांसी निरोपिती याचिगुणें ॥२७॥
समस्त गेले स्नानासी । श्रीगुरु बोलाविती त्या ब्राह्मणासी । शीघ्र करीं गा होईल निशी । ब्राह्मण अपार सांगितले ॥२८॥
स्वयंपाक झाला तत्क्षण । सांगतसे श्रीगुरुसी ब्राह्मण । निरोप देती जा धांवोन । ब्राह्मण समस्त पाचारीं ॥२९॥
ब्राह्मण गेला गंगेसी । बोलावीतसे ब्राह्मणांसी । स्वामीनें बोलाविलें तुम्हांसी । शीघ्र यावें म्हणोनियां ॥३०॥
ब्राह्मण म्हणती तयासी । स्वयंपाक व्हावया होईल निशी । तुवां शीघ्र श्रीगुरुसी । भिक्षा करावी जाय वेगीं ॥३१॥
ऐसें ऐकोनि तो ब्राह्मण । गेला श्रीगुरुजवळी आपण । ब्राह्मण न येती ऐसें म्हणे । आपण जेवूं अपरात्रीं ॥३२॥
श्रीगुरु म्हणती तयासी । नेम असे आजि आम्हांसी । सहपंक्तीनें ब्राह्मणांसी । जेवूं आम्ही निर्धारीं ॥३३॥
ब्राह्मणांसहित आम्हांसी । जेवूं वाढीं गा तूं परियेसीं । जरी अंगीकार न करिसी । न जेवूं तुझे घरीं आम्ही ॥३४॥
ब्राह्मण म्हणे श्रीगुरुसी । जो निरोप द्याल आपणासी । तोचि निरोप माझे शिरसीं । ब्राह्मणांसहित जेवूं वाढीन ॥३५॥
ब्राह्मण मनीं विचारी । श्रीगुरु असती पुरुषावतारी । न कळे बोले कवणेंपरी । आपुलें वाक्य सत्य करील ॥३६॥
मग काय करी तो ब्राह्मण । विनवीतसे कर जोडून । मज न येती ब्राह्मण । विनोद करिती माझ्या बोला ॥३७॥
श्रीगुरु आणिक शिष्यासी । निरोपिती जा वेगेंसीं । बोलावूनि आणीं ब्राह्मणांसी । भोजन करा म्हणोनि ॥३८॥
शिष्य गेला धांवत । समस्त ब्राह्मणांतें बोलावीत । स्नानें करोनि आले त्वरित । श्रीगुरु-मठाजवळिक ॥३९॥
श्रीगुरु निरोपिती तयांसी । पत्रावळी करा वेगेंसीं । जेवा आजि सहकुटुंबेसीं । ब्राह्मण करितो आराधना ॥४०॥
चारी सहस्त्र पत्रावळी । कराव्या तुम्हीं तात्काळीं । उभा होता ब्राह्मण जवळी । त्यासी स्वामी निरोपिती ॥४१॥
या समस्त ब्राह्मणांसी । विनंति करावी तुवां ऐसी । तुम्हीं यावें सहकुटुंबेसीं । आपण करितों आराधना ॥४२॥
श्रीगुरुचा निरोप घेऊन । विनवीतसे तो ब्राह्मण । द्विज म्हणती त्यासी हांसोन । काय जेवा म्हणतोस आम्हां ॥४३॥
आम्हां इतुके ब्राह्मणांसी । एकेक शित न ये वांटयासी । आमंत्रण सांगावया न लाजसी । नमस्कारितोसि घडीघडी ॥४४॥
वृद्ध ब्राह्मण ऐसें म्हणती । निंदा न करा श्रीगुरु ऐकती । जैसें श्रीगुरु निरोपिती । तैसें बोलतो ब्राह्मण ॥४५॥
हो कां बरवें बरवें म्हणती । सकळ पत्रावळी करिती । ब्राह्मण श्रीगुरुपूजा त्वरिती । करिता झाला उपचारें ॥४६॥
त्रिकरणपूर्वक करी भक्ति । बरवी केली मंगळारती । तेणें श्रीगुरु संतोषती । ठाय घाला म्हणती वेगें ॥४७॥
स्वयंपाक आणूनि आपणाजवळी । ठेवीं म्हणती तये वेळीं । आणोनियां तात्काळीं । श्रीगुरुजवळी ठेविला ॥४८॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । आमुचें वस्त्र घेऊनि अन्नासी । झांकोनी ठेवीं आम्हांपाशीं । म्हणोनि वस्त्र देती तये वेळीं ॥४९॥
झांकिलें वस्त्र अन्नावरी । कमंडलुउदक घेऊनि करीं । श्रीगुरु प्रोक्षिती अन्नावरी । अभिमंत्रोनि तये वेळीं ॥५०॥
बोलावूनि म्हणती ब्राह्मणासी । उघडों नको अन्नासी । काढूनि नेऊनि समस्तांसी । वाढीं वेगीं म्हणोनियां ॥५१॥
तूप घालूनि घटांत । ओतूनि घे आणिकांत । वाढीं वेगीं ऐसें म्हणत । निरोप देती श्रीगुरु ॥५२॥
ठाय घातले समस्तांसी । वाढीतसे ब्राह्मण परियेसीं । लोक पहाती तटस्थेसीं । महदाश्चर्य म्हणताति ॥५३॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणांसी । वाढों लागा या द्विजासी । आणिक उठिले बहुतेसी । वाढूं लागले तये वेळीं ॥५४॥
भरोनि नेती जितुकें अन्न । पुनः मागुती परिपूर्ण । घृत भरलें असे पूर्ण । घट ओतूनि नेताति ॥५५॥
वाढिलें समस्त पंक्तीसी । सहपंक्तीं श्रीगुरुसी । जेवताति अतिहर्षी । द्विजवर पुसतसे ॥५६॥
जो जो मागाल तो पदार्थ । वाढूं वेगें ऐसें म्हणत । भागलेति क्षुधाक्रांत । क्षमा करणें म्हणतसे ॥५७॥
घृत असे आपुले करीं । वाढीतसे महापुरीं । विप्र म्हणती पुरे करीं । आकंठवरी जेविलों ॥५८॥
भक्ष्य परमान्न पत्रशाका । ब्राह्मण वाढिताति अनेका । शर्करा दधि लवणादिका । अनेक परी जेविले ॥५९॥
तृप्त जाहले ब्राह्मण देखा । हस्तप्रक्षालन करिती मुखा । उच्छिष्टें काढिती तात्काळिका । आश्चर्य म्हणती तये वेळीं ॥६०॥
तांबूलादि देती समस्तांसी । श्रीगुरु बोलावूनि तयांसी । बोलवा म्हणती आपुले कलत्रपुत्रांसी । समस्त येऊनि जेवितील ॥६१॥
आले विप्रकुळ समस्त । जेवून गेलें पंचामृत । श्रीगुरु मागुती निरापित । शूद्रादि ग्रामलोक बोलावा ॥६२॥
त्यांचे स्त्रियापुत्रांसहित । बोलावीं शीघ्र ऐसें म्हणत । पाचारितां आले समस्त । जेवूनि गेले तये वेळीं ॥६३॥
श्रीगुरु पुसती ब्राह्मणांसी । आतां कोण राहिले ग्रामवासी । ते सांगती स्वामियासी । अत्यंज आहेति उरले ॥६४॥
बोलावा त्या समस्तांसी । अन्न द्यावें वाढून त्यांसी । जितुकें मागती तृप्तीसी । तितुकें द्यावें अन्न वेगीं ॥६५॥
तेही तृप्त झाले देखा । प्राणिमात्र नाहीं भूका ।; सांगताति श्रीगुरुनायक । डांगोरा पिटा ग्रामांत ॥६६॥
कोणी असती क्षुधाक्रांत । त्यांसी बोलवावें त्वरित । ऐसें श्रीगुरु निरोपित । हिंडले ग्रामीं तये वेळीं ॥६७॥
प्राणिमात्र नाहीं उपवासी । सर्व जेवले परियेसीं । मग निरोपित त्या द्विजासी । भोजन तुवां करावें ॥६८॥
श्रीगुरुनिरोपें भोजन केलें । मागुति जाऊनि अन्न पाहिलें । आपण जितुकें होतें केलें । तितुकें उरलें असे अन्न ॥६९॥

ऐसें तया दिवसीं विचारिती । सहस्त्र चारी झाली मिति । भूमीवरी झाली ख्याति । लोक म्हणती आश्चर्य ॥७१॥
इतुकें झालियावरी । श्रीगुरु त्या द्विजातें पाचारी । वर देती दरिद्र दुरी । पुत्रपौत्र होती तुज ॥७२॥
समस्त जाहले तटस्थ । देखिलें अति कौतुक म्हणत । अन्न केलें होतें किंचित । चारी सहस्त्र केवीं जेविले ॥७३॥
एक म्हणती श्रीगुरुकरणी । स्मरली असेल अन्नपूर्णी । अवतारपुरुष असे धणी । श्रीनृसिंहसरस्वती ॥७४॥
एक म्हणती अपूर्व देखिलें । पूर्वीं कथानक होतें ऐकिलें । पांडवाघरीं दुर्वास गेले । ऋषीश्वरांसमवेत ॥७५॥
सत्त्वभंग होईल म्हणोन । श्रीकृष्ण आला ठाकून । तेणें केलें अन्न पूर्ण । दुसरें आजि देखिलें ॥७६॥
नर दिसतो दंडधारी । सत्य त्रैमूर्ति-अवतारी । न कळे महिमा असे अपारी । म्हणती लोक अनेक ॥७७॥
यातें नर जे म्हणती । ते जाती अधोगतीं । वर्णावया नाहीं मति । म्हणती हाचि परब्रह्म ॥७८॥
नव्हे हा जरी ईश्वर । केवीं केलें अन्नपूर । होतें तीन अडीच शेर । चारी सहस्त्र जेविले केवीं ॥७९॥
आणिक एक नवल झालें । आम्हीं समस्तीं देखिलें । प्रेतातें जीव आणिलें । शुष्क काष्ठासी पल्लव ॥८०॥
आणिक ऐका याची महिमा । कोणासी देऊं आतां साम्या । कुमसीं होता त्रिविक्रमा । त्यासी दाखविलें विश्वरुप ॥८१॥
ग्रामांत होती वांझ महिषी । क्षीर काढविलें आपुले भिक्षेसी । वेद म्हणविले पतितामुखेंसी । अभिमंत्रितां श्रीगुरुमूर्तीं ॥८२॥
आणिक जाहलें एक नवल । कुष्ठी आला विप्र केवळ । दर्शनमात्रें झाला निर्मळ । आम्हीं देखिलें दृष्टीनें ॥८३॥
विणकरी होता एक भक्त । त्यासी दाखविला श्रीपर्वत । काशीक्षेत्र क्षण न लागत । एका भक्तासी दाखविलें ॥८४॥
आणिक अपार चरित्रता । अमित असे हो सांगतां । क्षितीवरी समस्त दैवतें । तयांचें नव्हे सामर्थ्य ॥८५॥
समस्त देवांतें आराधितां । आलास्यें होय मनकाम्यता । दर्शनमात्रें श्रीगुरुनाथा । सकळाभीष्टें होताति ॥८६॥
ऐसें म्हणती विप्रलोक । अपूर्व जाहलें कवतुक । ख्याति ऐकती समस्त देख । श्रीगुरुचें चरित्र ॥८७॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । श्रीगुरुचरित्र ऐसें परियेसीं । याचि निमित्य बहुवसीं । शिष्य जाहले श्रीगुरुचे ॥८८॥
नाना राष्ट्रींचे भक्त येती । श्रीगुरुची सेवा करिती । अंतःकरणीं एकचित्तीं । भजणारांसी प्रसन्न ॥८९॥
गंगाधराचा नंदन । सरस्वती विनवी नमून । ऐका तुम्ही समस्त जन । भजा भजा हो श्रीगुरुसी ॥९०॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे अन्नपूर्तिकद्विजचतुः-सहस्त्रभोजनं नाम अष्टात्रिंशत्तमोऽध्यायः ॥३८॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥
(ओवीसंख्या ९०)

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
सिद्ध म्हणे नामधारका । पुढें अपूर्व वर्तलें ऐका । साठी वर्षे वांझेसी एका । पुत्र झाला परियेसा ॥१॥
आपस्तंब-शाखेसी । ब्राह्मण एक परियेसीं । शौनकगोत्र -प्रवरेसी । नाम तया 'सोमनाथ' ॥२॥
'गंगा' नामें त्याची पत्नी । पतिव्रताशिरोमणि । वेदशास्त्रें आचरणी । आपण करी परियेसा ॥३॥
वर्षे साठी झालीं तिसी । पुत्र नाहीं तिचे कुशीं । वांझ म्हणोनि ख्यातेसी । होती तया गाणगापुरीं ॥४॥
पतिसेवा निरंतर । करी भक्तिपुरस्सर । नित्य नेम असे थोर । गुरुदर्शना येत असे ॥५॥
नीरांजन प्रतिदिवसीं । आणोनि करी श्रीगुरुसी । येणेंपरी बहुत दिवसीं । वर्तत होती परियेसा ॥६॥
ऐसें असतां वर्तमानीं । संतुष्ट झाले श्रीगुरुमुनि । पृच्छा करिती हांसोनि । तया द्विजस्त्रियेसी ॥७॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । काय अभीष्ट असे मानसीं । आणित्येसी प्रतिदिवसीं । नीरांजन परोपरी ॥८॥
तुझ्या मनींची वासना । सांगे त्वरित विस्तारुन । सिद्धि पाववील नारायण । गौरीरमण गुरुप्रसादें ॥९॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । करी साष्टांगीं नमन । विनवीतसे कर जोडून । ' अपुत्रस्य लोको नास्ति' ॥१०॥
पुत्राविणें स्त्रियांसी । पाहों नये मुखासी । पापरुपी महादोषी । म्हणती मातें स्वामिया ॥११॥
जिचे पोटीं नाहीं बाळ । तिचा जन्म निर्फळ । वाट पाहती उभयकुळ । बेचाळीस पितृलोकीं ॥१२॥
पितृ चिंतिती मनांत । म्हणती एखादी सती वंशांत । पुत्र व्यालिया आम्हां हित । तो उद्धरील सकळांतें ॥१३॥
पुत्राविणें जें घर । तें सदा असे अघोर । अरण्य नाहीं त्यासी दूर । 'यथारण्य तथा गृह' ॥१४॥
नित्य गंगास्नानासी । आपण जात्यें परियेसीं । घेऊनि येती बाळकांसी । समस्त स्त्रिया कवतुकें ॥१५॥
कडे घेऊनियां बाळा । खेळविताति स्त्रिया सकळा । तैसें नाहीं माझे कपाळा । मंदभाग्य असें देखा ॥१६॥
जळो माझें वक्षस्थळ । कडे घ्यावया नाहीं बाळ । जन्मोनियां संसारीं निष्फळ । नव्हें पुरुष अथवा सती ॥१७॥
पुत्रपौत्र असती जयांसी । परलोक साधे तयांसी । अधोगति निपुत्रिकासी । लुप्तपिंड होय स्वामिया ॥१८॥
आतां पुरे जन्म मज । साठी वर्षे जाहलीं सहज । आम्हां आतां वर दीजे । पुढें उत्तम जन्म होय ॥१९॥
पुत्रवंती व्हावें आपण । अंतःकरण होय पूर्ण । ऐसा वर देणें म्हणोन । विनवीतसे तये वेळीं ॥२०॥
ऐकोनि तियेचें वचन । श्रीगुरु म्हणती हांसोन । पुढील जन्म जाणेल कवण । तूतें स्मरण कैंचें सांग ॥२१॥
नित्य आरति आम्हांसी । भक्तिपूर्वक भावेंसीं । करितां जाहलों संतोषी । कन्या-पुत्र होतील तुज ॥२२॥
इहजन्मीं तूतें जाण । कन्या पुत्र सुलक्षण । होतील निगुतीं म्हणोन । श्रीगुरु म्हणती तियेसी ॥२३॥
श्रीगुरुवचन ऐकोनि । पालवीं गांठी बांधी ज्ञानी । विनवीतसे कर जोडूनि । ऐका स्वामी कृपासिंधु ॥२४॥
साठी वर्षे जन्मासी । जाहलीं स्वामी परियेसीं । होत नाहीं विटाळसी । मातें कैंचे पुत्र होती ॥२५॥
नाना व्रत नाना तीर्थ । हिंडिन्नल्यें पुत्रार्थ । अनेक ठायीं अश्वत्थ- । पूजा केली स्वामिया ॥२६॥
मज म्हणती सकळै जन । करीं वो अश्वत्थप्रदक्षिणा । तेणें पुरतील मनकामना । होतील पुत्र म्हणोनि ॥२७॥
अश्वत्थसेवा बहुकाळ । करितां माझा जन्म गेला । विश्वास म्यां बहु केला । होतील पुत्र म्हणोनि ॥२८॥
साठी वर्षे येणेंपरी । कष्ट केले अपरांपरी । सेवा करित्यें अद्यापिवरी । अश्वत्थाची प्रदक्षिणा ॥२९॥
पुत्र न होती इह जन्मीं । पुढें होतील ऐसे कामीं । सेवा करितसें स्वामी । अश्वत्थाची परियेसा ॥३०॥
आतां स्वामी प्रसन्न होसी । इहजन्मीं पुत्र देसी । अन्यथा नोहे बोलासी । तुमच्या स्वामी नरहरी ॥३१॥
स्वामींनीं दिधला मातें वर । माझे मनीं हा निर्धार । हास्य न करी स्वामी गुरु । शकुनगांठी बांधिली म्यां ॥३२॥
पुढील जन्म-काम्यासी । करित्यें सेवा अश्वत्थासी । स्वामी आतांचि वर देसी । इहजन्मीं कन्या-पुत्र ॥३३॥
अश्वत्थसेवा बहु दिवस । करितां झाले मज प्रयास । काय देईल आम्हांस । अश्वत्थ सेवित्यें मूर्खपणें ॥३४॥
ऐकोनि तियेचें वचन । श्रीगुरु म्हणती हांसोन । अश्वत्थसेवा महापुण्य । वृथा नोहे परियेसा ॥३५॥
निंदा न करीं अश्वत्थासी । अनंत पुण्य परियेसीं । सेवा करीं वो आम्हांसरसी । तूतें पुत्र होतील ॥३६॥
आतां आमचे वाक्येंकरी । नित्य जावें संगमातीरीं । अमरजा वाहे निरंतरीं । भीमरथीसमागमांत ॥३७॥
तेथें अश्वत्थ असे गहन । जातों आम्ही अनुष्ठाना । सेवा करीं वो एकमनें । आम्हांसहित अश्वत्थाची ॥३८॥
अश्वत्थाचें महिमान । सांगतसें परिपूर्ण । अश्वत्थनाम-नारायण । आमुचा वास तेथें असे ॥३९॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनवीतसे ते अंगना । अश्वत्थवृक्षाचें महिमान । स्वामी मातें निरोपावें ॥४०॥
कैसी महिमा असे त्यासी । स्वामी सांगावें मजसी । स्थिर होईल माझें मानसी । सेवा करीन भक्तीनें ॥४१॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । अश्वत्थवृक्षासी निंदा करिसी । महिमा असे अपार त्यासी । समस्त देव तेथें वसती ॥४२॥
अश्वत्थाचें महिमान । असे ब्रह्मांडपुराणीं निरुपण । नारदमुनीस विस्तारोन । ब्रह्मदेवानें सांगितलें ॥४३॥
ब्रह्मकुमर नारदमुनि । नित्य गमन त्रिभुवनीं । ब्रह्मयासी पुसोनि । आला ऋषि-आश्रमासी ॥४४॥
नारदातें देखोनि । अर्घ्यपाद्य देवोनि । पूजा केली उपचारोनि । पुसते झाले तयेवेळीं ॥४५॥
ऋषि म्हणती नारदासी । विनंति एक परियेसीं । अश्वत्थमहिमा असे कैसी । विस्तारावें स्वामिया ॥४६॥
ऋषिवचन ऐकोनि । सांगता जाहला नारदमुनि । गेलों होतों आजिचे दिनीं । ब्रह्मलोकीं हिंडत ॥४७॥
आपण पुसे स्वभावेंसीं । अश्वत्थमहिमा असे कैसी । समस्त मानिती तयासी । विष्णुस्वरुप म्हणोनियां ॥४८॥
ऐसा वृक्ष असे जरी । सेवा करणें कवणेपरी । कैसा महिमा सविस्तारीं । निरोपावें स्वामिया ॥४९॥
ब्रह्मा सांगे आम्हांसी । अश्वत्थमुळीं आपण वासी । मध्यें वास हृषीकेशी । अग्रीं रुद्र वसे जाणा ॥५०॥
शाखापल्लवीं अधिष्ठानीं । दक्षिण शाखे शूलपाणि । पश्चिम शाखे विष्णु निर्गुणी । आपण उत्तरे वसतसें ॥५१॥
इंद्रादि देव परियेसीं । वसती पूर्वशाखेसी । इत्यादि देव अहर्निशीं । समस्त शाखेसी वसती जाणा ॥५२॥
गोब्राह्मण समस्त ऋषि । वेदादि यज्ञ परियेसीं । समस्त मूळांकुरेसी । असती देखा निरंतर ॥५३॥
समस्त नदीतीर्थें देखा । सप्त-सागर लवणादिका । वसती जाणा पूर्व शाखा । ऐसा अश्वत्थ वृक्ष जाणा ॥५४॥
अ-कारशब्द मूळस्थान । स्कंध शाखा उ-कार जाण । फळ पुष्प म-कारवर्ण । अश्वत्थमुख अग्निकोणीं असे ॥५५॥
एकादश रुद्रादिक । अष्ट वसु आहेत जे का । जे स्थानीं त्रैमूर्तिका । समस्त देव तेथें वसती ॥५६॥
ऐसा अश्वत्थनारायण । महिमा वर्णावया शक्त कवण । कल्पवृक्ष याचि कारण । ब्रह्मा म्हणे नारदासी ॥५७॥
नारद सांगे ऋषेश्वरांसी । त्रयमूर्ति वास ज्या वृक्षाशीं । काय महिमा सांगों त्यासी । भजतां काय सिद्धि नोहे ? ॥५८॥
ऐसें ऐकोनि समस्त ऋषि । विनविताति नारदासी । आचारावया विधि कैसी । कवणें रीतीनें भजावें ॥५९॥
पूर्वीं आम्हीं एके दिवसीं । पुसिलें होतें आथर्वणासी । त्याणें सांगितलें आम्हांसी । अश्वत्थसेवा एक रीतीं ॥६०॥
तू नारद ब्रह्मऋषि । समस्त धर्म ओळखसी । विस्तार करोनि आम्हांसी । विधिपूर्वक निरोपावें ॥६१॥
नारद म्हणे मुनिवरा । त्या व्रताचिया विस्तारा । सांगेन ऐका तत्परा । विधान असे ब्रह्मवचनीं ॥६२॥
आषाढ-पौष-चैत्रमासीं । अस्तंगत गुरुशुक्रेसीं । चंद्रबळ नसते दिवसीं । करुं नये प्रारंभ ॥६३॥
याव्यतिरिक्त आणिक मासीं । बरवे पाहोनियां दिवसीं । प्रारंभ करावा उपवासीं । शुचिर्भूत होऊनि ॥६४॥
भानुभौमवारेसीं । आतळूं नये अश्वत्थासी । भृगुवारीं संक्रांतिदिवसीं । स्पर्शूं नये परियेसा ॥६५॥
संधिरात्रीं रिक्तातिथीं । पर्वणीसी व्यतीपातीं । दुर्दिनादि वैधृतीं । अपराण्हसमयीं स्पर्शूं नये ॥६६॥
अनृत-द्यूतकर्मभेषीं । निंदा-पाखांड-वर्जेसीं । प्रातर्मौनी होवोनि हर्षी । आरंभावें परियेसा ॥६७॥
सचैल स्नान करुनि । निर्मळ वस्त्र नेसोनि । वृक्षाखालीं जाऊनि । गोमयलिप्त करावें ॥६८॥
स्वस्तिकादि शंखपद्मेसीं । घालावी रंगमाळा परियेसीं । पंचवर्ण चूर्णेसीं । भरावें तेथें पद्मांत ॥६९॥

पूजा करावी कलशांसी । पुण्याहवाचनकर्मेंसीं । संकल्पावें विधींसीं । काम्यार्थ आपुलें उच्चारावें ॥७१॥
मग कलश घेवोनि । सात वेळां उदक आणोनि । स्नपन करावें जाणोनि । अश्वत्थ वृक्षासी अवधारा ॥७२॥
पुनरपि करुनियां स्नान । मग करावें वृक्षपूजन । पुरुषसूक्त म्हणोन । पूजा करावी षोडशोपचारें ॥७३॥
मनीं ध्यावी विष्णुमूर्ति । अष्टभुजा आहेति ख्याती । शंख-चक्र-वरद-हस्तीं । अभय-हस्त असे जाणा ॥७४॥
खड्ग-खेटक एकें करीं । धनुष्य-बाण सविस्तारीं । अष्टभुजी येणेंपरी । ध्यावा विष्णु नारायण ॥७५॥
पीतांबर पांघरुण । सदा लक्ष्मी-सन्निधान । ऐसी मूर्ति ध्याऊन । पूजा करणें वृक्षासी ॥७६॥
त्रैमूर्तीचें असें स्थान । शिवशक्तीविणें नाहीं जाण । समस्तांतें आवाहनोन । षोडशोपचारें पूजावें ॥७७॥
वस्त्रें अथवा सुतेसीं । वेष्टावें तया वृक्षासी । पुनरपि संकल्पेसीं । प्रदक्षिणा कराव्या ॥७८॥
मनसा-वाचा-कर्मणेसीं । भक्तिपूर्वक भावेंसीं । प्रदक्षिणा कराव्या हर्षीं । पुरुषसूक्त म्हणत देखा ॥७९॥
अथवा सहस्त्रनामेंसीं । कराव्या प्रदक्षिणा हर्षीं । अथवा कराव्या मौन्येंसीं । त्याचें फळ अमित असे ॥८०॥
चाले जैसी स्त्री गर्भिणी । उदककुंभ घेउनी । तैसे मंद गतीनीं । प्रदक्षिणा कराव्या शुद्धभावें ॥८१॥
पदोपदीं अश्वमेध । पुण्य जोडे फळप्रद । प्रदक्षिणासमाप्तमध्य । नमस्कार करावा ॥८२॥
ब्रह्महत्यादि पापांसी । प्रायश्चित्त नाहीं परियेसीं । प्रदक्षिणा द्विलक्षांसीं । ब्रह्महत्या पाप जाय ॥८३॥
त्रिमूर्ति वसती जया स्थानीं । फल काय सांगूं प्रदक्षिणीं । समस्त पापा होय धुणी । गुरुतल्पादि पाप जाय ॥८४॥
नाना व्याधि हरती दोष । प्रदक्षिणा करितां होय सुरस । कोटि ऋण असे ज्यास । परिहरत परियेसा ॥८५॥
जन्म मृत्यु जरा जाती । संसारभय नाश होती । ग्रहदोष बाधों न शकती । सहस्त्र प्रदक्षिणा केलिया ॥८६॥
पुत्रकाम्य असे ज्यासी । त्यातें फल होय भरंवसीं । मनोवाक्कायकर्मेंसीं । एकोभावें करावें ॥८७॥
चतुर्विध पुरुषार्थ । देता होय तो अश्वत्थ । पुत्रकाम्य होय त्वरित । न करा अनुमान ऋषी हो ॥८८॥
शनिवारीं वृक्ष धरोनि । जपावें मृत्युंजय-मंत्रांनीं । काळमृत्यु जिंकोनि । राहती नर अवधारा ॥८९॥
त्यासी अपमृत्यु न बाधती । पूर्णायुषी होती निश्चितीं । शनिग्रह न पीडिती । प्रार्थावें अश्वत्थासी ॥९०॥
शनिनाम घेवोनि । उच्चारावें आपुले जिव्हेनीं । बभ्रु-पिंगळ म्हणोनि । कोणस्थ-कृष्ण म्हणावें ॥९१॥
अंतक-यम-महारौद्री । मंद-शनैश्वर-सौरि । जप करावा येणेंपरी । शनिपीडा न होय ॥९२॥
ऐसें दृढ करोनि मना । अश्वत्थ सेवितां होय कामना । पुत्रकाम्य तत्क्षणा । होय निरुतें अवधारा ॥९३॥
अमावस्या-गुरुवारेंसी । अश्वत्थछाया-जळेंसीं । स्नान करितां नरासी । ब्रह्महत्या पाप जाय ॥९४॥
अश्वत्थतळीं ब्राह्मणासी । अन्न देतां एकासी । कोटि ब्राह्मणां परियेसीं । भोजन दिल्हें फळ असे ॥९५॥
अश्वत्थतळीं बैसोन । एकदां मंत्र जपतां क्षण । फळें होतील अनेकगुण । वेदपठण केलियाचें ॥९६॥
नर एखादा अश्वत्थासीं । स्थापना करी भक्तींसीं । आपुले पितृ-बेचाळिसी । स्वर्गीं स्थापी परियेसा ॥९७॥
छेदितां अश्वत्थवृक्षासी । महापाप परियेसीं । पितृसहित नरकासी । जाय देखा तो नर ॥९८॥
अश्वत्थातळीं बैसोन । होम करितां महायज्ञ । अक्षय सुकृत असे जाण । पुत्रकाम्य त्वरित होय ॥९९॥
ऐसा अश्वत्थमहिमा । नारदाप्रति सांगे ब्रह्मा । म्हणोनि ऐकती ऋषिस्तोम । तया नारदापासोनि ॥१००॥
नारद म्हणे ऋषेश्वरासी । प्रदक्षिणेच्या दहावे अंशीं । हवन करावें विशेषीं । आगमोक्त विधानपूर्वक ॥१॥
हवनाचे दहावे अंशीं । ब्राह्मणभोजन करावें हर्षीं । ब्रह्मचर्य हविष्यान्नेंसीं । व्रत आपण करावें ॥२॥
येणेंपरी आचरोन । मग करावें उद्यापन । शक्त्यनुसार सौवर्ण । अश्वत्थवृक्ष करावा ॥३॥
तो द्यावा ब्राह्मणासी । विधिपूर्वक परियेसीं । श्वेतधेनु सवत्सेंसीं । ब्राह्मणातें दान द्यावी ॥४॥
वृक्षातळीं तिळराशी । करावी यथानुशक्तीसीं । श्वेतवस्त्र झांकोनि हर्षीं । सुक्षीण ब्राह्मणासी दान द्यावें ॥५॥
ऐसें अश्वत्थविधान । सांगे नारद ऋषिजना । येणेंपरी आचरोन । सकळाभीष्ट लाधले ॥६॥
श्रीगुरु म्हणती वांझ सतीसी । अश्वत्थमहिमा आहे ऐसी । भावभक्ति असे ज्यासी । त्यातें होय फलश्रुति ॥७॥
आचार करीं वो येणेंपरी । संशय अंतःकरणीं न धरीं । वृक्ष असे भीमातीरीं । जेथें अमरजासंगम ॥८॥
तेंचि आमुचें असे स्थान । सेवा करीं वो एकोमनें । होईल तुझी मनकामना । कन्या पुत्र तुज होतील ॥९॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । नमन करी ते अंगना । विनवीतसे कर जोडूनि । भावभक्तीकरोनियां ॥११०॥
आपण वांझ वर्षें साठी । कैंचे पुत्र आपुले पोटीं । वाक्य असे तुमचें शेवटीं । म्हणोनि आपण अंगीकारीन ॥११॥
गुरुवाक्य म्हणजे कामधेनु । ऐसें बोलती वेदपुराण । आतां नाहीं अनुमान । करीन सेवा स्वामिया ॥१२॥
चाड नाहीं अश्वत्थासी । निर्धार तुमचे बोलासीं । सेवा करीन तुमची ऐसी । म्हणोनि चरणीं लागली ॥१३॥
ऐसा निरोप घेवोनि । जावोनि वनिता संगमस्थानीं । षट्कूलांत न्हाऊनि । सेवा करी अश्वत्थाची ॥१४॥
श्रीगुरुनिरोप जेणेंपरी । तैसी सेवा करी ते नारी । येणेंपरी तीन रात्रीं । आराधिलें परियेसा ॥१५॥
श्रीगुरुसहित अश्वत्थासी । पूजा करितां तिसरे दिवसीं । स्वप्न जाहलें तियेसी । सांगेन ऐका एकचित्तें ॥१६॥
स्वप्नामध्यें विप्र एक । येवोनि देतो तिसी भाक । काम्य झालें तुझें ऐक । सांगेन एक करीं म्हणे ॥१७॥
जाऊनि गाणगापुरांत । तेथें असे श्रीगुरुनाथ । प्रदक्षिणा करीं हो सात । नमन करीं तूं भक्तींसीं ॥१८॥
जें काय देतील तुजसी । भक्षण करीं वो वेगेंसीं । निर्धार धरुनि मानसीं । त्वरित जावें म्हणे विप्र ॥१९॥
ऐसें देखोनि सुषुप्तींत । सवेंचि झाली ते जागृत । कल्पवृक्ष असे अश्वत्थ । कल्पिलें फळ त्वरित होय ॥१२०॥

सेवा करुनि चवथे दिवशीं । आली आपण मठासी । प्रदक्षिणा करुनि हर्षीं । नमन केलें तये वेळीं ॥२१॥
हांसोनियां श्रीगुरुमुनि । फळें देती तिसी दोनी । भक्षण करीं वो संतोषोनि । काम्य झालें आतां तुझें ॥२२॥
भोजन करीं वो तूं आतां त्वरित । काम्य होईल तुझें सत्य । कन्या-पुत्र दोघे तूतें । दिल्हे आजि परियेसा ॥२३॥
पारणें करोनि विधीसीं । मग भक्षावें या फलांसी । दान द्यावें ब्राह्मणांसी । जें काय पूर्वीं निरोपिलें ॥२४॥
व्रत संपूर्ण करोनि । केलें दान ते भामिनी । तेचि दिवशीं अस्तमानी । झाली आपण विटाळशी ॥२५॥
मौन दिवस तीनवरी । भोजन करी हिरवे खापरीं । श्वेत वस्त्र नेसोनि नारी । कवणाकडे न पाहेचि ॥२६॥
येणेंपरी तिन्ही निशी । क्रमिल्या नारीनें परियेसीं । सुस्नात होवोनि चवथे दिवशीं । आली श्रीगुरुचे दर्शना ॥३७॥
पतीसमवेत येऊनि । पूजा करी ती एकाग्रमनीं । श्रीगुरु म्हणती संतोषोनि । पुत्रवंती व्हावें तुम्हीं ॥२८॥
ऐसें नमूनि श्रीगुरुसी । आली आपुल्या मंदिरासी । ऋतु दिधला पांचवे दिवसीं । म्हणोनि कन्या परियेसा ॥२९॥
येणेंपरीं ते नारी । जाहली ऐका गरोदरी । ग्राम सकळ विस्मय करी । काय नवल म्हणतसे ॥१३०॥
म्हणती पहा नवल वर्तलें । वांझेसी गर्भधारण केवीं झालें । सोमनाथ विप्र भले । करीतसे आनंद ॥३१॥
सातवे मासीं ओटी भरिती । अक्षय वाणें ओंवाळिती । श्रीगुरुसी विनोदावरी प्रीति । वाणें देवविती कौतुकें ॥३२॥
आठवे मासीं तो ब्राह्मण । करी सीमंतविधान । गुरुनिरोपें संतोषोन । देती वाणें ग्रामांत ॥३३॥
अभिनव करिती सकळही जन । म्हणती वांझेसी गर्भधारण । पांढरे केश म्हातारपण वाणें देती कौतुकें ॥३४॥
एक म्हणती श्रीगुरुप्रसाद । श्रीनृसिंहमूर्ति भक्तवरद । त्याची सेवा करितां आनंद । लाधे चारी पुरुषार्थ ॥३५॥
त्रैमूर्तींचा अवतार । झाला नृसिंहसरस्वती नर । भक्तजनां मनोहर प्रगटला भूमंडळीं ॥३६॥
ऐसें नानापरी देखा । स्तोत्र करिती गुरुनायका । वाणें देत ते बालिका । अत्योल्हास तिच्या मनीं ॥३७॥
वाणें देऊनि समस्तांसी । येऊनि नमीं ती श्रीगुरुसी । भक्तवत्सल परियेसीं । अशीर्वचन देतसे ॥३८॥
संतोषोनि विप्रवनिता । करी साष्टांग दंडवता । नानापरी स्तोत्र करितां । विनवीतसे परियेसा ॥३९॥

तूं तारावया विश्वासी । म्हणोनि भूमीं अवतरलासी । त्रैमूर्ति तूंचि होसी । अन्यथा नव्हे स्वामिया ॥४१॥
तुझी स्तुति करावयासी । अशक्य आपुले जिव्हेसी । अपार तुझ्या महिमेसी । नाहीं साम्य कृपासिंधु ॥४२॥
येणेंपरी स्तोत्र करुनि । श्रीगुरुचरण वंदूनि । गेली निरोप घेऊनि । आपुले गृहा परियेसा ॥४३॥
ऐसे नवमास क्रमोनि । प्रसूत जाहली शुभदिनीं । समस्त ज्योतिषी येवोनि । वर्तविती जातकातें ॥४४॥
ज्योतिषी म्हणती तये वेळीं । होईल कन्या मन निर्मळी । अष्टपुत्रा वाढेल कुळी । पुत्रपौत्रीं नांदेल ॥४५॥
येणेंपरी ज्योतिषीं । जातक वर्तविलें परियेसीं । सोमनाथ आनंदेसीं । दानधर्म करिता जाहला ॥४६॥

दहा दिवस क्रमोनि । सुस्नात झाली ते भामिनी । कडिये बाळक घेवोनि । आली श्रीगुरुदर्शनासी ॥४७॥
बाळक आणोनि भक्तींसीं । ठेविलें श्रीगुरुचरणापाशीं । नमन करी साष्टांगेंसीं । एकभावेंकरोनियां ॥४८॥
आश्वासोनि श्रीगुरुमूर्ति । उठीं बाळे पुत्रवंती । बहुतपरी संतोषविती । प्रेमभावेंकरोनियां ॥४९॥
उठोनि विनवी ती श्रीगुरुसी । पुत्र नाहीं आमुचे कुशीं । सरस्वती आली घरासी । बोल आपुला सांभाळावा ॥१५०॥
ऐकोनि तियेचें वचन । श्रीगुरु म्हणती हांसोन । न करीं मनीं अनमान । तूतें पुत्र होईल ॥५१॥
म्हणोनि तिये कुमारीसी । कडिये घेती प्रीतींसीं । सांगताति समस्तांसी । तये कन्येचें लक्षण ॥५२॥

पुत्र होतील बहु इसी । होईल आपण शतायुषी । पुत्राचे पौत्र नयनेंसीं । पाहील आपण अहेवपणें ॥५३॥
होईल इसी ज्ञानी पति । त्यातें चारी वेद येती । अष्टैश्वर्यें नांदती । प्रख्यात होवोनि भूमंडळीं ॥५४॥
आपण होईल पतिव्रता । पुण्यशील धर्मरता । इची ख्याति होईल बहुता । समस्ता इसी वंदिती ॥५५॥
दक्षिणदेशीं महाराजा । येईल इचे दर्शनकाजा । आणिक पुत्र होईल तुज । म्हणोनि श्रीगुरु बोलती ॥५६॥
येणेंपरी श्रीगुरुमूर्ति । कन्यालक्षण सांगती । विप्रवनिता विनयवृत्तीं । म्हणे पुत्र व्हावा मज ॥५७॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । पुत्र व्हावा तुज कैसी । योग्य पाहिजे वर्षें तीसी । अथवा शतायुषी मूर्ख पैं ॥५८॥
ऐकोनि श्रीगुरुच्या वचना । विनवीतसे ते अंगना । योग्य पाहिजे पुत्र आपणा । तयासी पांच पुत्र व्हावे ॥५९॥
भक्तवत्सल श्रीगुरुमूर्ति । वर देती तेणें रीतीं । संतोषोनि घरा जाती । महानंद दंपतीसी ॥१६०॥
पुढें तिसी पुत्र झाला । वेदशास्त्रीं विख्यात भला । पांच पुत्र तो लाधला । नामकरणी श्रीगुरुचा ॥६१॥
कन्यालक्षण श्रीगुरुमूर्ती । निरोपिलें होतें जेणें रीतीं । प्रख्यात झाली सरस्वती । महानंद प्रवर्तला ॥६२॥
यज्ञ करी तिचा पति । प्रख्यात नाम 'दीक्षिती' । चहूं राष्ट्रीं त्याची ख्याती । म्हणोनि सांगे सिद्धमुनि ॥६३॥
साठी वर्षें वांझेसी । पुत्र जाहला परियेसीं । सिद्ध म्हणे नामधारकासी । ऐसी कृपा श्रीगुरुची ॥६४॥
निर्धार असे ज्याचे मनीं । त्यासी वर देती तत्क्षणीं । एकोभावें याकारणीं । भक्ति करावी श्रीगुरुची ॥६५॥
म्हणोनि सरस्वती-गंगाधर । सांगे गुरुचरित्रविस्तार । भजा भजा हो श्रीगुरु । सकळाभीष्ट लाधे तुम्हां ॥६६॥
जो भजेल श्रीगुरुसी । एकोभावें भक्तींसीं । त्यासी दैन्य कायसी । जें जें मागेल तें देईल सत्य ॥६७॥
गुरुभक्ति म्हणजे कामधेनु । अंतःकरणीं नको अनुमानु । जें जें इच्छीत भक्तजनु । समस्त देईल परियेसा ॥१६८॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे वृद्धवंध्यासंतानप्राप्ति नाम एकोनचत्वारिंशत्तमोऽध्यायः
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥
(ओवीसंख्या १६८)

श्रीगणेशाय नमः ।
सिद्ध म्हणे नामधारका । अपूर्व वर्तले आणिक ऐका । वृक्ष होता काष्ठ शुष्का । विचित्र कथा ऐक पा ॥१॥
गाणगापुरी असता श्रीगुरु । आला एक कुष्ठी द्विजवरु । आपस्तंब भार्गवगोत्रु । नाम तयाचे नरहरि ॥२॥
येवोनिया श्रीगुरुमूर्तीसी । नमन करी भक्तीसी । करी स्तोत्र बहुवसी । करसंपुट जोडोनिया ॥३॥
जय जयाजी गुरुमूर्ति । ऐकोनि आलो तुझी कीर्ति । भक्तवत्सला परंज्योती । परमपुरुषा जगद्गुरु ॥४॥
आपण जन्मोनि संसारी । वृथा झालो दगडापरी । निंदा करिताती द्विजवरी । कुष्ठी म्हणोनि स्वामिया ॥५॥
वाचिला वेद यजुःशाखा । निंदा करिताती माझी लोका । ब्राह्मणार्थी न सांगती देखा । अंगहीन म्हणोनिया ॥६॥
प्रातःकाळी उठोनि लोक । आफती माझे मुख । तेणे होते मनात दुःख । जन्म पुरे आता मज ॥७॥
पाप केले आपण बहुत । जन्मांतरी असंख्यात । तेणे हा भोग भोगित । आता न साहे स्वामिया ॥८॥
नाना तीर्थ नाना व्रत । हिंडोनि आलो आचरत । म्या पूजिले देव समस्त । माझी व्याधि न वचेची ॥९॥
आता धरोनि निर्धारु । आलो स्वामीजवळी जगद्गुरु । तुझा न होता कृपावरु । प्राण आपुला त्यजीन ॥१०॥
म्हणोनिया निर्वाणेसी । विनवीतसे श्रीगुरूसी । एकभावे भक्तीसी । करुणा भाकी द्विजवर ॥११॥
म्हणोनि मागुती नमस्कारी । नानापरी स्तुति करी । लोहपरिसा भेटीपरी । तुझ्या दर्शनमात्रेसी ॥१२॥
करुणावचनी ऐकोनि । भक्तवत्सल श्रीगुरु मुनि । निरोप देती कृपा करोनि । ऐक शिष्या नामधारका ॥१३॥
श्रीगुरु म्हणती द्विजासी । पूर्वजन्मी महादोषासी । तुवा केले बहुवसी । म्हणोनि कुष्ठी झालास ॥१४॥
आता सांगेन ते करी । तुझी पापे जाती दुरी । होशील दिव्यशरीरी । एकभावे आचरावे ॥१५॥
इतुकिया अवसरी । काष्ठ एक औदुंबरी । शुष्क होते वर्षे चारी । घेवोनि आले सर्पणासी ॥१६॥
ते देखिले श्रीगुरुमूर्ति । तया विप्रा निरोप देती । एकभावे करोनि चित्ती । घेई काष्ठ झडकरी ॥१७॥
काष्ठ घेवोनि संगमासी । त्वरित जाय भावेसी । संगमनाथपूर्वभागेसी । भीमातीरी रोवी पा ॥१८॥
तुवा जावोनिया संगमात । स्नान करोनिया त्वरित । पूजा करोनि अश्वत्थ । पुनरपि जाय स्नानासी ॥१९॥
हाती धरोनिया कलश दोनी । आणी उदक तत्क्षणी । शुष्क काष्ठा वेळ तिन्ही । स्नपन करी मनोभावे ॥२०॥
ज्या दिवसी काष्ठासी । पर्णे येतील संजिवेसी । दोष गेले तुझे परियेसी । अंग तुझे होय बरवे ॥२१॥
येणेपरी श्रीगुरुमूर्ति । तया विप्रासी निरोप देती । विश्वास झाला त्याचे चित्ती । धावत गेला काष्ठाजवळी ॥२२॥
काष्ठ उचलोनि डोईवरी । घेवोनि आला भीमातीरी । संगमेश्वरासमोरी । रोविता झाला द्विजवर ॥२३॥
जेणे रीती श्रीगुरुमूर्ति । तया विप्रा निरोप देती । आचरतसे एकचित्ती । भावभक्ति करोनिया ॥२४॥
येणेपरी सात दिवस । द्विजे केले उपवास । तया काष्ठा दोनी कलश । भरोनि घाली वेळोवेळी ॥२५॥
देखोनि म्हणती सकळजन । तया विप्रा बोलावोन । सांगताती विवंचून । गुरुनिरोपलक्षण ॥२६॥
म्हणती तूते काय झाले । शुष काष्ठ का रोविले । याचे तुवा संजीवन योजिले । मग तूते काय होय ॥२७॥
याते तू संजीव करिसी । मागुती काय येतीपल्लव यासी । ऐसे पाहिले नाही भूमिसी । श्रीगुरूची इच्छा कळेना ॥२८॥
श्रीगुरुमूर्ति कृपासिंधु । भक्तजना असे वरदु । त्याची कृपा असे अगाधु । समस्ताते कृपा करी ॥२९॥
नसेल निष्कृति तुझिया पापा । म्हणोनि दिधले काष्ठ बापा । वाया कष्ट करिसी का पा । तूते श्रीगुरूंनी निरोपिले ॥३०॥
ऐकोनि तयांचे वचन । विप्रवर करी नमन । गुरुवाक्य मज कामधेनु । अन्यथा केवी होईल ॥३१॥
सत्यसंकल्प श्रीगुरुनाथ । त्याचे वाक्य न होय मिथ्य । माझे मनी निर्धार सत्य । होईल काष्ठ वृक्ष जाणा ॥३२॥
माझ्या मनी निर्धारु । असत्य न होय वाक्यगुरु । प्राण वेचीन साचारु । गुरुवाक्य कारण आपणा ॥३३॥
येणेपरी समस्तांसी । विप्र सांगे परियेसी । सेवा करितो भक्तीसी । तया शुष्क काष्ठासी ॥३४॥
एके दिवशी गुरुमूर्तीसी । शिष्य सांगती परियेसी । स्वामींनी निरोपिले द्विजासी । शुष्क काष्ठा भजे म्हणोनि ॥३५॥
सात दिवस उपवासी । सेवा करितो काष्ठासी । एकभावे भक्तीसी । निर्धार केला गुरुवचनी ॥३६॥
किती रीती आम्ही त्यासी । सांगितले सर्व हितासी । वाया का गा कष्ट करिसी । मूर्खपणे म्हणोनि ॥३७॥
विप्र आम्हाते ऐसे म्हणे । चाड नाही काष्ठाविणे । गुरुवाक्य मजकारणे । करील आपुले बोल साच ॥३८॥
निर्धार धरोनि मानसी । सेवा करितो काष्ठासी । सात दिवस उपवासी । उदक मुखी घेत नाही ॥३९॥
ऐकोनि शिष्यांचे वचन । निरोप देती श्रीगुरु आपण । जैसा असे भाव अंतःकरण । तैसी सिद्धि पावेल ॥४०॥
गुरुवाक्य शिष्यासी कारण । सर्वथा न होय निर्वाण । जैसे भक्ताचे अंतःकरण । तैशी सिद्धि पावेल ॥४१॥
याकारणे तुम्हांसी । सांगेन कथा इतिहासी । सांगे सूत ऋषीश्वरांसी । स्कंदपुराणी परियेसा ॥४२॥
गुरुभक्तीचा प्रकार । पुसती सूतासी ऋषीश्वर । सांगे सूत सविस्तर । तेचि कथा सांगतसे ॥४३॥
सूत म्हणे ऋषीश्वरांसी । गुरुभक्ति असे विशेषी । तारावया संसारासी । आणिक नाही उपाय ॥४४॥
अयोग्य अथवा ज्ञानवंत । म्हणोनि न पाहिजे अंत । गुरुमूर्ति मनी ध्यात । सेवा करणे भक्तिभावे ॥४५॥
दृढ भक्ति असे जयापासी । सर्व धर्म साधती त्यासी । संदेह न धरावा मानसी । एकचित्ते भजावे ॥४६॥
श्रीगुरु नर ऐसा न म्हणावा । त्रैमूर्ति तोचि जाणावा । गुणदोष न विचारावा । म्हणावा तोचि ईश्वर ॥४७॥
येणेपरी धरोनि मनी । जे जे भजती श्रीगुरुचरणी । प्रसन्न होय शूलपाणि । तात्काळिक परियेसा ॥४८॥
श्लोक ॥ मंत्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ । यादृशी भावनां कुर्यात सिद्धिर्भवति तादृशी ॥४९॥
टीका ॥ मंत्रतीर्थद्विजस्थानी । देवभक्ती औषधगुणी । गुरूसी पाहे शिवसमानी । भाविल्यासारखे फल होय ॥५०॥
म्हणे सूत ऋषीश्वरांसी । गुरुभक्ति म्हणिजे आहे कैसी । सांगेन साक्ष तुम्हांसी । अपूर्व एक वर्तलेसे ॥५१॥
पूर्वी पांचाल नगरात । होता राजा सिंहकेत । तयासी होता एक सुत । नाम तयाचे धनंजय ॥५२॥
एके दिवसी राजसुत । गेला पारधीसी अरण्यात । तेथे नसती मनुष्यमात्र । उदकवर्जित स्थळांसी ॥५३॥
राजकुमार तृषाक्रांत । हिंडतसे अरण्यात । संगे होत शबरसुत । श्रमले बहुत अवधारा ॥५४॥
तेथे एक शबरसुत । हिंडत होता वनात । देखता झाला अवचित । जीर्ण एक शिवालय ॥५५॥
भिन्नलिंग तया स्थानी । पडिले होते मेदिनी । शबरे घेतले उचलोनि । म्हणे लिंग बरवे असे ॥५६॥
हाती घेवोनि लिंगासी । पहात होता शबर हर्षी । राजसुत तया संधीसी । आला तया जवळिक ॥५७॥
राजकुमार म्हणे तयासी । भिन्न लिंग काय करिसी । पडिली असती भुमीसी । लिंगाकार अनेक ॥५८॥
शबर म्हणे राजसुताते । माझ्या मनी ऐसे येते । लिंगपूजा करावयाते । म्हणोन घेतले परियेसा ॥५९॥
ऐकोनि तयाचे वचन । राजपुत्र सुहास्यवदन । म्हणे पूजी एकमने । लिंग बरवे असे सत्य ॥६०॥
ऐसे म्हणता राजकुमार । तयासी करी नमस्कार । कोण विधि पूजाप्रकार । निरोपावे म्हणतसे ॥६१॥
तुवा व्हावे माते गुरु । मी तव असे शबरु । नेणे पूजेचा प्रकारु । विस्तारावे म्हणतसे ॥६२॥
राजपुत्रे म्हणे तयासी । न्यावा पाषाण घरासी । पूजा करावी भक्तीसी । पत्रपुष्पे अर्चोनिया ॥६३॥
दंपत्ये दोघेजण । पूजा करणे मने पूर्ण । हेचि लिंग गिरिजारमण । म्हणोनि मनी निर्धारी पा ॥६४॥
नानापरी पुष्पजाती । आणाव्या तुवा शिवाप्रती । धूप दीप नैवेद्य आरती । नैवेद्यासी भस्म जाण ॥६५॥
भस्म असेल जे स्मशानी । आणावे तुवा प्रतिदिनी । द्यावा नैवेद्य सुमनी । प्रसाद आपण भक्षावा ॥६६॥
आणिक जे जे जेवी आपण । तोही द्यावा नैवेद्य जाण । ऐसे आहे पूजाविधान । म्हणोनि सांगे राजकुमारु ॥६७॥
येणेपरी राजकुमारु । तया शबरा झाला गुरु । विश्वासे केला निर्धारु । शबरे आपुले मनात ॥६८॥
संतोषोनि शबर देखा । नेले लिंग गृहांतिका । स्त्रियेसी सांगे कौतुका । म्हणे लिंग प्रसन्न झाले ॥६९॥

क्वचित्काळ येणेपरी । पूजा करी शबरशबरी । एके दिवशी तया नगरी । चिताभस्म न मिळेचि ॥७१॥
हिंडोनि पाहे गावोगावी । चिताभस्म न मिळे काही । येणेपरी सात गावी । हिंडोनि आला घरासी ॥७२॥
चिंता लागली शबरासी । पुसता झाला स्त्रियेसी । काय करू म्हणे तिसी । प्राण आपुला त्यजीन म्हणे ॥७३॥
पूजा राहिली लिंगासी । भस्म न मिळे नैवेद्यासी । हिंडोनि आलो दाही दिशी । चिताभस्म न मिळेचि ॥७४॥
जैसे गुरूंनी आज्ञापिले । त्या विधीने पाहिजे अर्चिले । नाही तरी वृथा गेले । शिवपूजन परियेसा ॥७५॥
गुरूचे वाक्य जो न करी । तो पडेल रौरवघोरी । तयाते पाप नाही दूरी । सदा दरिद्री होय नर ॥७६॥
त्यासी होय अधोगति । अखंड नरकी तया वस्ती । जो करी गुरूची भक्ति । तोचि तरेल भवार्णवी ॥७७॥
सकळ शास्त्रे येणेपरी । बोलताती वेद चारी । याचि कारणे ऐक हो शबरी । प्राण आपुला त्यजीन ॥७८॥
ऐकोनि पतीचे वचन । बोले शबरी हासोन । चिंता करिता किंकारण । चिताभस्म देईन मी ॥७९॥
मज घालोनि गृहांत । अग्नि लावा तुम्ही त्वरित । काष्ठे असती बहुत । दहन करा आपणासी ॥८०॥
तेचि भस्म ईश्वरासी । उपहारावे तुम्ही हर्षी । व्रतभंग न करावा भरवसी । संतोषरूपे बोलतसे ॥८१॥
कधी तरी शरीरासी । नाश असे परियेसी । ऐसे कार्यकारणासी । देह आपुला समर्पीन ॥८२॥
ऐकोनि स्त्रियेचे वचन । शबर झाला मनी खिन्न । प्राणेश्वरी तुझा प्राण । केवी घ्यावा म्हणतसे ॥८३॥
रूपे दिससी रतीसरसी । अद्यापि तू पूर्ववयासी । पुत्रअपत्य न देखिलेसी । या संसारासी येउनी ॥८४॥
मन नाही तुझे धाले । संसारसुख नाही देखिले । तुझे मातापित्याने मज निरविले । प्राणप्रिया रक्ष म्हणोनि ॥८५॥
चंद्रसूर्यसाक्षीसी । तुज वरिले म्या संतोषी । प्राण रक्षीन म्हणोनी हर्षी । घेवोनि आलो मंदिरात ॥८६॥
आता दहन करिता तूते । घडती पापे असंख्याते । स्त्रीहत्या महादोषाते। केवी करू म्हणतसे ॥८७॥
तू माझी प्राणेश्वरी । तूते मारू कवणेपरी । कैसा तुष्टेल त्रिपुरारि । पुण्य जावोनि पाप घडे ॥८८॥
दुःखे तुझी मातापिता । माते म्हणती स्त्रीघाता । अजूनि तुझी लावण्यता । दिसतसे प्राणप्रिये ॥८९॥
नाना व्रते नाना भक्ति । या शरीरालागी करिती । दहन करू कवणे रीती । पापे माते घडतील ॥९०॥
ऐकोनि पतीचे वचन । विनवीतसे सती आपण । कैसे असे तुम्हा अज्ञान । मिथ्या बोल बोलतसा ॥९१॥
शरीर म्हणे स्वप्नापरी । जैसा फेण गंगेवरी । स्थिर न राहे क्षणभरी । मरणे सत्य परियेसा ॥९२॥
आमुचे मायबापे जाण । तुम्हा दिधले माते दान । तुमची अर्धांगी मी पूर्ण । भिन्नभावना कोठे दिसे ॥९३॥
मी म्हणजे तुमचा देहे । विचार करोनि मनी पाहे । आपुले अर्ध शरीर आहे । काय दोष दहन करिता ॥९४॥
जे जे उपजे भूमीवरी । ते ते नाश पावे निर्धारी । माझे देहसाफल्य करी । ईश्वराप्रती पावेल ॥९५॥
संदेह सोडोनि आपणासी । दहन करी वो वेगेसी । आपण होवोनि संतोषी । निरोप देते परियेसा ॥९६॥
नानापरी पतीसी । बोधी शबरी परियेसी । घरात जावोनि पतीसी । म्हणे अग्नि लावी आता ॥९७॥
संतोषोनि तो शबर । बांधिता झाला गृहाचे द्वार । अग्नि लाविता थोर । ज्वाळा व्यापिती गगनासी ॥९८॥
दहन झाले शबरीसी । भस्म घेतले परियेसी । पूजा करोनि शिवासी । नैवेद्य दिधला अवधारा ॥९९॥
पूजा करिता ईश्वरासी । आनंद झाला बहुवसी । स्त्री दिधली हुताशी । स्मरण ऐसे त्यास नाही ॥१००॥
ऐसी भक्तिभावेसी । पूजा केली महेश्वरासी । प्रसाद घेवोनि हस्तेसी । पाचारिले स्त्रियेते ॥१॥
जैसी पूजा नित्य करोन । प्रसाद हाती घेऊन । आपुले स्त्रियेते बोलावून । देत असे तो शबर ॥२॥
तया दिवसी त्याचपरी । आपल्या स्त्रियेते पाचारी । कृपासागरी त्रिपुरारि । प्रसन्न झाला परियेसा ॥३॥
तेचि शबरी येवोनि । उभी ठेली सुहास्यवदनी । घेतला प्रसाद मागोनि । घेवोनि गेली घरात ॥४॥
जैसे तैसेचि घर दिसे । शबर विस्मय करीतसे । म्हणे दग्ध केले स्त्रियेसरिसे । घर कैसे दिसताहे ॥५॥
बोलावोनि स्त्रियेसी । शबर पुसतसे तियेसी । दहन केले मी तुजसी । पुनरपि कैसी आलीस ॥६॥
शबरी सांगे पतीसी । आपणास आठवण आहे ऐसी । अग्नि लाविता घरासी । निद्रिस्थ झाल्ये परियेसा ॥७॥
महाशीते पीडित । आपण होत्ये निद्रिस्थ । तुमचे बोल ऐकोन सत्य । उठोनि आल्ये परिय्सा ॥८॥
हे होईल देवकरणी । प्रसन्न झाला शूलपाणि । ऐसे म्हणता तत्क्षणी । निजस्वरूपी उभा ठाकला ॥९॥
नमन करिती लोटांगणी । धावोनि लागती दोघे चरणी । प्रसन्न झाला शूलपाणि । मागा वर म्हणतसे ॥११०॥
होईल सुख संसारी । राज्य दिधले धुरंधरी । गति होईल त्यानंतरी । कल्पकोटि स्वर्गवास ॥११॥
येणेपरी ॠषीश्वरांसी । सूत सांगे विस्तारेसी । गुरुचरणी विश्वास असे ज्यासी । तैसे फळ होय जाणा ॥१२॥
म्हणोनि श्रीगुरु शिष्यासी । सांगते झाले परियेसी । विश्वासे करोनि द्विज हर्षी । शुष्क काष्ठ सेवितसे ॥१३॥
जैसा भाव तैसी सिद्धि । होईल सत्य हे त्रिशुद्धि । श्रीगुरुनाथ कृपानिधि । सहज निघाले संगमासी ॥१४॥
जावोनि करिती अनुष्ठान । पहावया येती ते ब्राह्मण । देखोनि त्याचे अंतःकरण । प्रसन्न झाले तत्क्षणी ॥१५॥
होता कमंडलु करकमळी । भरला सदा गंगाजळी । उचलोनिया हस्तकमळी । घालिती उदक काष्ठासी ॥१६॥
तेचि क्षणी काष्ठासी । पल्लव आले परियेसी । औदुंबर वृक्ष जनासी । दिसतसे समस्ता ॥१७॥
जैसा चिंतामणिस्पर्श । सुवर्ण करी लोहास । तैसा श्रीगुरु सुधारस । काष्ठ झाला औदुंबर ॥१८॥
काष्ठ दिसे औदुंबर । सुदेही झाला तो विप्र । दिसे सुवर्णकांति नर । गेले कुष्ठ तात्काळी ॥१९॥
संतोषोनि द्विजवर । करी साष्टांग नमस्कार । करिता झाला महास्तोत्र । श्रीगुरूचे तये वेळी ॥१२०॥
श्लोक ॥ इंदुकोटितेज-करुणासिंधु-भक्तवत्सलम् । नंदनात्रिसूनुदत्त, इंदिराक्ष-श्रीगुरुम् ।
गंधमाल्यअक्षतादिवृंददेववंदितम् । वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥२१॥
मोहपाशअंधकारछायदूरभास्करम् । आयताक्ष, पाहि श्रियावल्लभेशनायकम् ।
सेव्यभक्तवृंदवरद, भूयो भूयो नमाम्यहम् । वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥२२॥
चित्तजादिवर्गषट्कमत्तवारणांकुशम् । तत्त्वसारशोभितात्मदत्त-श्रियावल्लभम् ।
उत्तमावतार-भूतकर्तृ-भक्तवत्सलम् । वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥२३॥
व्योमवायुतेज-आपभूमिकर्तृमीश्वरम् । कामक्रोधमोहरहितसोमसूर्यलोचनम् ।
कामितार्थदातृभक्तकामधेनु-श्रीगुरुम् । वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥२४॥
पुंडरीक-आयताक्ष, कुंडलेंदुतेजसम् । चंडुदुरितखंडनार्थ - दंडधारि-श्रीगुरुम् ।
मंडलीकमौलि-मार्तंडभासितानंनं । वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥२५॥
वेदशास्त्रस्तुत्यपाद, आदिमूर्तिश्रीगुरुम् । नादबिंदुकलातीत-कल्पपादसेव्ययम् ।
सेव्यभक्तवृंदवरद, भूयो भूयो नमाम्यहम् । वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥२६॥
अष्टयोगतत्त्वनिष्ठ, तुष्टज्ञानवारिधिम । कृष्णावेणितीरवासपंचनदीसंगमम् ।
कष्टदैन्यदूरिभक्ततुष्टकाम्यदायकम् । वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥२७॥
नारसिंहसरस्वती-नामअष्टमौक्तिकम् । हारकृत्यशारदेन गंगाधर आत्मजम् ।
धारणीकदेवदीक्षगुरुमूर्तितोषितम् । परमात्मानंदश्रियापुत्रपौत्रदायकम् ॥२८॥
नारसिंहसरस्वतीय-अष्टकं च यः पठेत् । घोरसंसारसिंधुतारणाख्यसाधनम् ।
सारज्ञानदीर्घआयुरारोग्यादिसंपदम् । चारुवर्गकाम्यलाभ, वारंवारं यज्जपेत ॥२९॥
स्तोत्र केले येणेपरी । आणिक विनवी परोपरी । म्हणे देवा श्रीहरी । कृपा केली स्वामिया ॥१३०॥
म्हणोनि मागुती नमस्कारी । श्रीगुरुनाथ अभयकरी । उठविता झाला अवधारी । ज्ञानराशि म्हणोनिया ॥३१॥

मग निघाले मठासी । समस्त शिष्यादि द्विजांसरसी । ग्रामलोक आनंदेसी । घेऊनि येती आरत्या ॥३३॥
जावोनि बैसती मठात । शिष्यांसहित श्रीगुरुनाथ । समाराधना असंख्यात । झाली ऐका ते दिनी ॥३४॥
तया विप्रा बोलावोनि । सद्गुरु म्हणती संतोषोनि । कन्यापुत्रगोधनी । तुझी संतति वाढेल ॥३५॥
तुझे नाम योगेश्वर । आम्ही ठेविले निर्धार । समस्त शिष्यांमाजी थोर । तूचि आमुचा भक्त जाण ॥३६॥
वेदशास्त्री संपन्न । तुझ्या वंशोवंशी जाण । होतील पुरुष निर्माण । म्हणोनि देती निरोप ॥३७॥
श्रीगुरु म्हणती तयासी । जावोनि आणि कलत्रासी । तुम्ही रहावे आम्हापासी । येचि ग्रामी नांदत ॥३८॥
म्हणोनि तया द्विजासी । श्रीगुरु मंत्र उपदेशी । विद्यासरस्वती या मंत्रासी । उपदेशिले परियेसा ॥३९॥
तूते होतील तिघे सुत । एकाचे नाव योगी विख्यात । आमुची सेवा करील बहुत । वंशोवंशी माझे दास ॥१४०॥
जैसे श्रीगुरूंनी निरोपिले । तयापरी त्यासी झाले । म्हणोनि सिद्धे सांगितले । नामधारकशिष्यासी ॥४१॥
म्हणोनि सरस्वतीगंगाधर । सांगे श्रीगुरुचरित्रविस्तार । उतरावया पैल पार । कथा ऐका एकचित्ते ॥४२॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । कुष्ठी उद्धरिला भक्त । गुरुमहिमा अत्यद्भुत । प्रकट झाला येणेपरी ॥१४३॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वतीपाख्याने सिद्धनामधारकसंवादे शुष्ककाष्ठसंजीवन नाम चत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥४०॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ।
(ओवीसंख्या १४३)

श्रीगणेशाय नमः ।
नामधारक शिष्य देखा । उभा राहोनि संमुखा । कर जोडुनी कौतुका । नमन करी साष्टांगीं ॥१॥
जय जयाजी सिद्धमुनि । तूं तारक भवार्णी । नाना धर्म विस्तारोनि । गुरुचरित्र निरोपिलें ॥२॥
तेणें धन्य झालों आपण । प्रकाश केलें महाज्ञान । सुधारस गुरुस्मरण ग। प्राशविला दातारा ॥३॥
एक असे माझी विनंती निरोपावें मजप्रती । आमुच्या पूर्वजें कवणें रीतीं । सेवा केली श्रीगुरुची ॥४॥
तुम्ही सिद्ध महाज्ञानी । होतां श्रीगुरुसन्निधानीं । शिष्य झाले कवणे गुणीं । निरोपावें दातारा ॥५॥
ऐकोनि शिष्याचें वचन । सिद्ध सांगे विस्तारोन । एकचित्तें करोनि मन । ऐक शिष्या नामधारका ॥६॥
पूर्वीं कथानक सांगितलें । जे कां श्रीगुरुशीं भेटले । वोसरग्रामीं एक होते भले । पूर्वज तुमचे परियेसा ॥७॥
तयाचें नाम सायंदेव । केली पूजा भक्तिभाव । त्यावरी प्रीति अतिस्नेह । आमुचे श्रीगुरुमूर्तीचा ॥८॥
तेथून आले दक्षिणदिशीं । गाणगापुरीं परियेसीं । ख्याति झाली दश दिशीं । कीर्ति वाढली बहुवस ॥९॥
ऐकोनि येती सकळ जन । करिती श्रीगुरुदर्शन । जें मनीं करिती चिंतन । पूर्ण होय तयांचें ॥१०॥
येणेंपरी श्रीगुरुमूर्ति । होते गाणगापुरा वस्ती । नाम श्रीनृसिंहसरस्वती । भक्तवत्सल निर्धारीं ॥११॥
तुमचा पूर्वज जो का होता । सायंदेव भक्त विख्याता । त्याणें ऐकिलें वृत्तान्ता । महिमा श्रीगुरु यतीचा ॥१२॥
भक्तिपूर्वक वेगेंसी । आला गाणगापुरासी । आनंद बहु मानसीं । हर्षे निर्भर होउनी ॥१३॥
दुरुनि देखिलें गाणगाभुवन । आपण घाली लोटांगण । करी दंडप्राय नमन । ऐशापरी चालिला ॥१४॥
ऐसा दंडप्रणाम करीत । गेला विप्र मठांत । देखिले तेथें मूर्तिमंत । परात्पर श्रीगुरु ॥१५॥
साष्टांग नमस्कार करीत । असे चरणावरी लोळत । केशेंकरुन पाय झाडीत । भक्तिभावें करोनिया ॥१६॥
करसंपुट जोडोनि । स्तुति करी एकाग्र मनीं । त्रैमूर्ति तूंचि ज्ञानीं । गुरुमूर्ति स्वामिया ॥१७॥
धन्य धन्य जन्म आपुलें । कृतार्थ पितर माझे झाले । कोटि जन्मांचें पाप गेलें । म्हणोनि चरणीं लागला ॥१८॥
जय जयाजी श्रीगुरुमूर्ति । त्राहि त्राहि विश्वपती । परमात्मा परंज्योती । नृसिंहसरस्वती स्वामिया ॥१९॥
तुझे चरण वर्णावयासी । शक्ति कैंची आम्हांसी । परमात्मा तूंचि होसी । भक्तवत्सला स्वामिया ॥२०॥
तुमचे चरणाचिये प्रौढी । वसती तेथें तीर्थे कोडी । वर्णिती श्रुति घडोघडी । चरणं पवित्रं विततं पुराणं ॥२१॥
त्रैमुर्तींचा अवतार । मज दिससी साक्षात्कार । भासतसे निरंतर । त्रैमूर्ति तूंचि होसी ॥२२॥
परब्रह्म तुम्ही केवळू । हातीं दंड कमंडलू । अमृत भरलें सोज्ज्वळू । प्रोक्षितां प्रेत उठतसे ॥२३॥
दंड धरिला या कारणें । शरणांगतातें रक्षणें । दुरितदैन्य निवारणें । निज भक्त रक्षावया ॥२४॥
रुद्राक्षमाळा भस्मधारण । व्याघ्रचर्माचें आसन । अमृतदृष्टि इंदुनयन । क्रूरदृष्टीं अग्निसूर्य ॥२५॥
चतुर्विध पुरुषार्थासी । भक्तजना तूंचि होसी । तूंचि रुद्र सत्य होसी । तूं नृसिंह जगद्गुरु ॥२६॥
विष्णुरुपें करिसी रक्षण । पीतांबर पांघरुण । तीर्थ समस्त तुझे चरण । भक्ताभिमानी विष्णु तूंचि ॥२७॥
वांझे कन्या पुत्र देसी । शुष्क काष्ठ आणिलें पल्लवासी । दुभविली वांझ महिषीसी । अन्न पुरविलें ब्राह्मणा ॥२८॥
विष्णुमूर्ति तूंचि जाण । त्रिविक्रमभारती ऐसी खूण । साक्ष दिधली अंतःकरण । विश्वरुप दाखविलें ॥२९॥
म्हणविले वेद पतिताकरवीं । अपार महिमा झाला पूर्वी । नरहरिअवतार मूर्ति बरवी । आलेति भक्त तारावया ॥३०॥
ऐसी नानापरी स्तुति करीत । पुनः पुनः नमन करीत । सद्गदित कंठ होत । रोमांच अंगीं उठले ॥३१॥
आनंदाश्रुलोचनीं । निघती संतोषें बहु मनीं । नव विधा भक्ति करोनि । स्तुति केली श्रीगुरुची ॥३२॥
संतोषोनि श्रीगुरुमूर्ति । तया विप्रा आश्वासिती । माथां हस्त ठेवोनि म्हणती । परम भक्त तूंचि आम्हां ॥३३॥
तुवा जें कां स्तोत्र केलें । तेणें माझें मन धालें । तुज वरदान दिधलें । वंशोवंशीं माझा दास ॥३४॥
ऐसा वर देउनी । गुरुमूर्ति संतोषोनि । मस्तकीं हस्त ठेवोनि । म्हणती जाय संगमासी ॥३५॥
स्नान करुन संगमासी । पूजा करीं अश्वत्थासी । त्वरित यावें मठासी । पंक्तीस भोजन करीं गा ॥३६॥
येणेंपरी श्रीगुरुमूर्ति । तया विप्रा निरोप देती । गुरुनिरोप जेणें रीतीं । आला स्नान करोनिया ॥३७॥
षोडशोपचारें श्रीगुरुसी । पूजा करी भक्तींसी । अनेक परी पक्वान्नेंसी । भिक्षा करवी परियेसा ॥३८॥
भक्तवत्सल श्रीगुरुमूर्ति । तया विप्रा आपुले पंक्ति । समस्त शिष्यांहुनी प्रीती । ठाव देती आपलेजवळी ॥३९॥
भोजन झालें श्रीगुरुसी । शिष्यांसहित विप्रांसी । संतोषोनि आनंदेंसी । बैसले होते मठांत ॥४०॥
तया सायंदेवविप्रासी । श्रीगुरु पुसती प्रीतींसी । तुझें स्थान कोणे देशीं । कलत्र पुत्र कोठें असती ॥४१॥
पुसती क्षेमसमाधान । कैसें तुमचें वर्तन । कृपा असे परिपूर्ण । म्हणोनि पुसती संतोषें ॥४२॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । सांगे सायंदेव विस्तारोन । कन्या पुत्र बंधुजन । समस्त क्षेम असती स्वामिया ॥४३॥
उत्तरकांची म्हणोनि ग्रामीं । तेथें वसोनि आम्ही । तुझ्या कृपें समस्त क्षेमी । असों देवा कृपासिंधु ॥४४॥
पुत्रवर्ग बंधु जाणा । करिती संसारयातना । आपुले मनींची वासना । करीन सेवा श्रीगुरुची ॥४५॥
करुनि सेवा श्रीगुरुची । असेन स्वामी परियेसीं । ऐसा माझे मानसीं । निर्धार असे देवराया ॥४६॥
ऐकोन तयाचें वचन । श्रीगुरु म्हणती हासोन । आमुची सेवा असे कठिण । आम्हां वास बहुतां ठायीं ॥४७॥
एके समयीं अरण्यांत । अथवा राहूं गांवांत । आम्हांसवें कष्ट बहुत । तुम्ही केवी साहूं शका ॥४८॥
येणेंपरी श्रीगुरुमूर्ति । तया विप्रा निरोपिती । ऐकोन विनवी मागुती । म्हणे स्वामी अंगिकारा ॥४९॥
गुरुची सेवा करी नरू । तोचि उतरे पैल पारु । तयासी कैसें दुःख अघोरु । सदा सुखी तोचि होय ॥५०॥
चतुर्विध पुरुषार्थ । देऊं शके श्रीगुरुनाथ । त्यासी नाहीं यमपंथ । गुरुभक्ति मुख्य कारण ॥५१॥
येणेंपरी श्रीगुरुसी । सायंदेव भक्तींसी । विनवीतसे परियेसीं । संतोषी झाले श्रीगुरुमूर्ति ॥५२॥
श्रीगुरु तया विप्रा म्हणती । जैसें असे तुझे चित्तीं । दृढ असेल मनीं भक्ति । तरीच करीं अंगीकार ॥५३॥
स्थिर करोनि अंतःकरण । करितां सेवा-गुरुचरण । झाले मास तीन जाण । ऐक शिष्या नामकरणी ॥५४॥
वर्ततां ऐसें एके दिवशीं । श्रीगुरु निघाले संगमासी । सवें घेतलें सायंदेवासी । समस्तांतें वारुनी ॥५५॥
भक्ताचें अंतःकरण । पहावया गेले श्रीगुरु आपण । पूर्वज तुमचा भोळा जाण । जात असे संगमासी ॥५६॥
भक्तासहित संगमासी । गेले श्रीगुरु समयीं निशी । बैसते झाले अश्वत्थासी । सुखें गोष्टी करिताती ॥५७॥
दिवस गेला अस्तमानीं । श्रीगुरु विचार करिती मनीं । दृढ याचे अंतःकरणीं । कैसी करणी पाहूं म्हणती ॥५८॥
उठविती वारा अवचित । तेणें वृक्ष पडों पाहत । पर्जन्य झाला बहुत । मुसळधारा वर्षतसे ॥५९॥
सायंदेव होता जवळी । सेवा केली तये वेळीं । केला आश्रय वृक्षातळीं । वस्त्रेंकरुनि श्रीगुरुसी ॥६०॥
पर्जन्य वारा समस्त देखा । साहिले आपण भावें ऐका । उभा राहोनि संमुखा । सेवा करी एकभावें ॥६१॥
येणेंपरी याम दोन । पर्जन्य आला महा क्षोभोन । आणिक वारा उठोन । वाजे शीत अत्यंत ॥६२॥
श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । शीत झालें बहुवसी । तुवां जाउनी मठासी । अग्नि आणावा शेकावया ॥६३॥
गुरुनिरोपें तत्क्षणीं । ऐक्यभाव धरोनि मनीं । निघाला विप्र महाज्ञानी । आणावया वैश्वानर ॥६४॥
निघाला शिष्य देखोनि । श्रीगुरु म्हणती हासोनि । नको पाहूं आपुले नयनीं । उभयपार्श्वभागातें ॥६५॥
गुरुनिरोपें येणेंपरी । निघता झाला झडकरी । न दिसे वाट अंधकारीं । खुणें खुणें जात असे ॥६६॥
अंधकार महाघोर । पाऊस पडे धुरंधर । न दिसे वाटेचा प्रकार । जात असें भक्तिपूर्वक ॥६७॥
मनीं ध्याय श्रीगुरुसी । जातसे तैसा मार्गेसी । लवतां वीज संधीसी । तेणें तेजें जातसे ॥६८॥
येणेंपरी द्विजवर । पावला त्वरित गाणगापूर । वेशीपाशीं जाऊनि सत्वर । हाक मारिली द्वारपाळा ॥६९॥

नसे मार्ग अंधकार । विजेचे तेजें जातसे नर । मनीं करितसे विचार । श्रीगुरुनीं मातें निरोपिलें ॥७१॥
दोहींकडे न पाहें निगुती । श्रीगुरु मातें निरोपिती । याची कैसी आहे स्थिति । म्हणोनि पाहे तये वेळीं ॥७२॥
आपुले दक्षिणदिशेसी । पाहतां देखे सर्पासी । भिऊनि पळतां उत्तरेसी । अद्‌भुत दिसे महानाग ॥७३॥
पांच फणी दिसती दोनी । सवेंचि येताती धावोनि । विप्र भ्याला आपुले मनीं । धावत जातसे भिऊनिया ॥७४॥
वाट सोडुनी जाय रानीं । सवेंचि येताति सर्प दोनी । जातां भयभीत होउनी । अति शीघ्र धावतसे ॥७५॥
स्मरतां झाला श्रीगुरुसी । एकभावें धैर्येंसी । जातां विप्र परियेसीं । पातला संगमाजवळीक ॥७६॥
दुरुनि देखे श्रीगुरुसी । सहस्त्रदीपज्योतीसरसी । दिसती विप्र बहुवसी । वेदध्वनि ऐकतसे ॥७७॥
जवळी जातां द्विजवरु । एकला दिसे श्रीगुरु । गेला समस्त अंधकारु । दिसे चंद्र पौर्णिमेचा ॥७८॥
प्रज्वलित केलें अग्नीसी । उजेड झाला बहुवसी । झाला विप्र सावधेसी । पाहतसे श्रीगुरुतें ॥७९॥
दोनी सर्प येवोनि । श्रीगुरुतें वंदोनि । सवेंचि गेले निघोनि । तंव हा पूर्वींच भ्यालासे ॥८०॥
श्रीगुरु पुसती तयासी । कां गा भयभीत झालासी । आम्हीं तूंतें रक्षावयासी । सर्प दोन पाठविले ॥८१॥
न धरीं आतां भय कांहीं । आमुची सेवा कठीण पाहीं । विचार करुनि आपुल्या देहीं । अंगिकारीं मुनिसेवा ॥८२॥
गुरुभक्ति असे कठिण । दृढभक्तीनें सेवा करणें । कळिकाळाचें नाहीं भेणें । तया शिष्या परियेसा ॥८३॥
सायंदेव तये वेळीं । लागतसे श्रीगुरुचरणकमळीं । विनवीतसे करुणाबहाळी । कृपा करीं म्हणोनिया ॥८४॥
गुरुभक्तीचा प्रकारु । निरोपावा मातें श्रीगुरु । जेणें माझें मन स्थिरु । होवोनि राहे तुम्हांजवळी ॥८५॥
श्रीगुरु म्हणती विप्रासी । सांगे कथा सुरसी । न गमे वेळ रात्रीसी । ब्राह्म मुहूर्त होय तंव ॥८६॥
पूर्वीं कैलासशिखरासी । बैसला होता व्योमकेशी । अर्धांगी पार्वतीसी । कथा एकान्तीं सांगतसे ॥८७॥
गिरिजा पुसे ईश्वरासी । गुरुभक्ति म्हणिजे आहे कैसी । विस्तारोनि आम्हांसी । सांगा म्हणे तये वेळीं ॥८८॥
शिव सांगे गिरिजेसी । सर्व साध्य गुरुभक्तीसी । करावें एकभावेंसी । शिव जो तोचि गुरु होय ॥८९॥
याचें एक आख्यान । सांगेन तुज विस्तारोन । एकचित्तें करोनि मन । ऐक गिरिजे म्हणतसे ॥९०॥
गुरुभक्ति म्हणिजे सुलभपण । तात्काळ साध्य होय जाण । अनेक तप अनुष्ठान । करितां विलंब परियेसीं ॥९१॥
नाना तपें अनुष्ठानें । करिती यज्ञ महाज्ञानें । त्यांतें होती महाविघ्नें । साध्य होतां दुर्लभ ॥९२॥
जो गुरुभक्ति करी निर्मळ । साध्य होईल तात्काळ । यज्ञदान तपफळ । सर्व सिद्धि त्यासी होती ॥९३॥
सुलभ असे अप्रयास । जो जाणे गुरुकुलवास । एकभावें धरोनि कांस । आराधावें श्रीगुरुसी ॥९४॥
याचा एक दृष्टान्त । सांगेन ऐका एकचित्त । ब्रह्मयाचा अवतार व्यक्त । त्वष्टाब्रह्मा परियेसा ॥९५॥
तयासी झाला एक कुमर । अतिलावण्य सुंदर । सर्वधर्मकुशल धीर । योग्य झाला उपनयना ॥९६॥
त्वष्टाब्रह्मा पुत्रासी । व्रतबंध करी परियेसीं । करावया विद्याभ्यासासी । गुरुचे घरीं निरविला ॥९७॥
गुरुची सेवा नानापरी । करीतसे ब्रह्मचारी । वर्ततां ऐशियापरी । अपूर्व एक वर्तलें ॥९८॥
वर्ततां ऐसें एके दिवशीं । आला पर्जन्य बहुवशी । पर्णशाळा परियेसीं । गळतसे गुरुची ॥९९॥
तये वेळीं शिष्यासी । निरोपिती गुरु त्यासी । त्वरित करावें आम्हांसी । एक गृह दृढ ऐसें ॥१००॥
पर्णशाळा प्रतिवर्षीं । जीर्ण होतसे परियेसीं । गृह करावें दृढतेंसी । कधीं जीर्ण नोहे ऐसें ॥१॥
न तुटे कधीं राहे स्थिर । दिसावें रम्य मनोहर । असावें सर्व परिकर । करीं शीघ्र ऐसें गृह ॥२॥
ऐसें गुरु निरोपिती । तेच समयीं गुरुची सती । सांगतसे अतिप्रीतीं । मातें कुंचकी आणावी ॥३॥
नसावी विणली अथवा शिवली । विचित्र रंगीत पाहिजे केली । माझ्या अंगप्रमाण वहिली । त्वरित आणीं म्हणतसे ॥४॥
गुरुपुत्र म्हणे शिष्यासी । मागेन तें आणीं वेगेंसी । पादुका पाहिजेत आम्हांसी । उदकावरुनि चालती ऐशा ॥५॥
अथवा चिखल न लागे त्यांसी । न व्हाव्या अधिक पायांसी । जेथें चिंतू मानसीं । तेथें घेऊनि जाती ऐशा ॥६॥
इतुकिया अवसरीं । गुरुकन्या काय करी । जातां तयाचा पल्लव धरी । आपणा कांहीं आणावें ॥७॥
उंच तानवडें आपणासी । घेऊनि यावें परियेसीं । आणिक आणा खेळावयासी । घरकुल एक आपणा ॥८॥
कुंजराचें दांतें बरवें । घरकुल तुवां आणावें । एकस्तंभी असावें । कधीं न तुटे न होय जीर्ण ॥९॥
जेथें नेईन तेथें यावें । सोपस्कारासहित आणावें । पाट ठाणवीं असावें । तया घराभीतरीं ॥११०॥
सदा दिसावें नूतन । वावरत असावें आपें आपण । करावया पाक निष्पन्न । मडकीं करुनि आणीं पां ॥११॥
आणिक एक सांगेन तुज । रांधप करावया शिकवी मज । पाक केलिया उष्ण सहज । असों नयें अन्न आणा ॥१२॥
पाक करिता मडकियेंसी । न लागे काजळ परियेसीं । आणोनि दे गा भांडीं ऐसीं । आणिक सर्व सोपस्कार ॥१३॥
गुरुकन्या ऐसें म्हणे । अंगिकारिलें शिष्यराणें । निघता झाला तत्क्षणें । महा अरण्यांत प्रवेशला ॥१४॥
मनीं चिंता बहु करी । आपण बाळ ब्रह्मचारी । काय जाणें त्यांचे परी । केवी करुं म्हणतसे ॥१५॥
पत्रावळी करुं नेणें । इतुकें मातें कधीं होणें । स्मरतसे एकाग्र मनें । श्रीगुरुचरण देखा ॥१६॥
म्हणे आतां काय करुं । मातें कोण आधारु । बोल ठेवील माझा गुरु । शीघ्र इतुकें न करितां ॥१७॥
कवणापासीं जाऊं शरण । कवण राखील माझा प्राण । कृपानिधि गुरुविण । ऐसा कवण असे दुजा ॥१८॥
जरी नायकें गुरुचा बोल । शाप देईल तात्काळ । ब्रह्मचारी आपण बाळ । म्हणोनि अंगिकार कां केला ॥१९॥
काय गति आपणासी । आतां जाऊं कवणापासीं । अशक्त बाळ मी अज्ञानेसी । अंगिकार कां केला ॥१२०॥
गुरुवाक्य मज कारण । मातें न करी निर्वाण । वेंचीन आतां आपुला प्राण । गुरुनिरोप करीन मी ॥२१॥
ऐसें महा अरण्यांत । जातसे बाळ चिंता करीत । श्रमोनिया अत्यंत । निर्वाणमनें जातसे ॥२२॥
पुढें जातां मार्ग क्रमित । भेटला एक अवधूत । तेणें बाळ देखिला तेथ । पुसता झाला तये वेळीं ॥२३॥
कवण बाळा कोठें जासी । चिंताव्याकुळ मानसीं । विस्तारोनि आम्हांसी । सांग म्हणे तये वेळीं ॥२४॥
ऐसें म्हणतां ब्रह्मचारी । जाऊनिया नमस्कारी । म्हणे स्वामी तारीं तारीं । चिंतासागरीं बुडतसें ॥२५॥
भेटलासि तूं निधानु । जैसी वत्सालागीं धेनु । दुःखी झालों होतों आपणु । देखतां मन निवालें ॥२६॥
जैसे चकोरपक्षियातें । चांदणें देखतां मन हर्षतें । तैसें तुझ्या दर्शनमात्रें । आनंद झाला स्वामिया ॥२७॥
माझें पूर्वार्जित पुण्य । कांहीं होतें म्हणोन । तुम्ही भेटलेती निधान । कृपासिंधु परमपुरुषा ॥२८॥
सांगा आपुलें नाम कवण । आगमन झालें कोठून । पहा हें निर्मनुष्य अरण्य । येथें तुम्ही भेटलेती ॥२९॥
व्हाल तुम्हीं ईश्वरु । मातें कृपा केली गुरु । तुम्हां देखता मनोहरु । अंतःकरण स्थिर झालें ॥१३०॥
कीं होसील कृपाळू । सत्त्वप्रिय भक्तवत्सलू । मी दास तुझा करीं सांभाळू । म्हणोनि चरणीं लागला ॥३१॥
नमितां तया बाळकासी । उठवीतसे तापसी । आलिंगोनि महाहर्षी । आश्वासीतसे तये वेळीं ॥३२॥
मग पुशिला वृत्तान्त । बाळ सांगे समस्त । गुरुंनीं जी जी मागितली वस्त । कवणेंपरी साध्य होय ॥३३॥
आपण बाळ ब्रह्मचारी । न होय कार्य तें अंगिकारीं । आतां पडिलों चिंतासागरीं । तारीं स्वामी म्हणतसे ॥३४॥
मग अभय देऊनि अवधूत । तया बाळातें म्हणत । सांगेन तुज एक हित । जेणें तुझें कार्य साधे ॥३५॥
विश्वेश्वर आराधन । असे एक निधान । काशीपूर महास्थान । सकळाभीष्टें साधती ॥३६॥
पंचक्रोश असे क्षिति । तया आगळी विख्याति । विष्णुमुख्य ऋषि प्रजापति । तेथें वर लाधले ॥३७॥
ब्रह्मा सृष्टि रचावयासी । वर लाधला त्या स्थळासी । वर दिधला विष्णूसी । समस्त सृष्टि पाळावया ॥३८॥
काशीपूर महास्थान । तुवां तेथें जातांचि जाण । होईल तुझी कामना पूर्ण । संदेह न धरीं मनांत ॥३९॥
तुवां जावें त्वरितेंसी । जें जें वसे तव मानसीं । समस्त विद्या लाधसी । विश्वकर्मा तूंचि जाण ॥१४०॥

तोचि देव असे दयाळ । विचित्र असे त्याचा खेळ । उपमन्यु म्हणोनि होता बाळ । तयातें दिधला क्षीरसिंधु ॥४२॥
नामें आनंदकानन । विख्यात असे महास्थान । समस्तांची कामना पूर्ण । तये ठायीं होतसे ॥४३॥
नाम असे पुरी काशी । समस्त धर्मांची हे राशी । सकळ जीवजंतूंसी । मोक्षस्थान परियेसा ॥४४॥
जे वास करिती तये स्थानीं । त्यांतें देखताचि नयनीं । जाती दोष पळोनि । स्थानमहिमा काय सांगूं ॥४५॥
ऐसें काशीस्थान असतां । कां बा करिसी तूं चिंता । तेथील महिमा वर्णितां । अशक्य माझे जिव्हेसी ॥४६॥
तया काशीनगरांत । जे जन तीर्थे हिंडत । एकेक पाउलीं पुण्य बहुत । अश्वमेधफळ असे ॥४७॥
धर्म अर्थ काम मोक्ष । जी जी मनीं असे कांक्ष । ज्ञातांचि होईल प्रत्यक्ष । संदेह न धरीं मनांत ॥४८॥
ऐकोनिया ब्रह्मचारी । साष्टांगीं नमस्कारी । कोठें असे काशीपुरी । आपण असे अरण्यात ॥४९॥
आनंदकानन म्हणसी । स्वर्गीं असे कीं भूमीसी । अथवा जाऊं पाताळासी । कोठें असे सांगा मज ॥१५०॥
या संसारसागरासी । तूंचि तारक जगा होसी । ज्ञान मातें उपदेशीं । तारीं मातें स्वामिया ॥५१॥
ऐशिया काशीपुरासी । मातें कोण नेईल हर्षी । विनवूं जरी तुम्हांसी । घेवोनि जावें म्हणोनिया ॥५२॥
कार्य असलिया तुम्हांसी । आम्हां कैसी बुद्धि देशी । मी बाळक तुम्हांसी । म्हणोनि चरणीं लागला ॥५३॥
ऐसें म्हणता तापसी । आपण नेईन म्हणे हर्षी । तुजकरितां आपणासी । यात्रालाभ घडे थोर ॥५४॥
यापरतें आम्हांसी । काय लाभ विशेषीं । वृथा जन्म मानवासी । काशीवास न करितां ॥५५॥
तुजकरितां आपणासी । दर्शन घडे पुरी काशी । चला जाऊं त्वरितेंसी । म्हणोनि दोघे निघाले ॥५६॥
मनोवेगें तात्काळीं । पातले विश्वेश्वराजवळीं । तापसी म्हणे तये वेळीं । बाळका यात्रा करीं आतां ॥५७॥
बाळ म्हणे तयासी । स्वामी मातें निरोप देसी । नेणें यात्रा आहे कैसी । कवणेंपरी रहाटावें ॥५८॥
आपण बाळ ब्रह्मचारी । नेणें तीर्थ कवणेंपरी । कवणे विधिपुरःसरीं । विस्तारोनि सांगा मज ॥५९॥
तापसी म्हणे तयासी । सांगेन यात्राविधीसी । तुंवा करावें भावेंसी । नेमें भक्तिपूर्वक ॥१६०॥
पहिलें मणिकर्णिकेसी । स्नान करणें नेमेंसी । जाऊनिया विनायकासी । पांचाळेश्वरा नमावें ॥६१॥
मग जावें महाद्वारा । विश्वेश्वरदर्शन करा । पुनरपि यावें गंगातीरा । मणिकर्णिकास्नान करावें ॥६२॥
मणिकर्णिकेचा ईश्वर । पूजूनिया निर्धार । जाऊनिया कंबळेश्वर । पूजा करीं गा भावेंसी ॥६३॥
पुढें ईश्वरवासुकीसी । पूजा करी भक्तींसी । पर्वतेश्वर पूजोनि हर्षी । गंगाकेशव पूजीं मग ॥६४॥
ललिता देवी पूजोनि । मग जावें तेथूनि । जरासंधेश्वर ध्यानीं । पूजा करीं गा भक्तींसी ॥६५॥
सोमनाथ असे थोर पूजावा शूळटंकेश्वर । तयापुढें वाराहेश्वर । पूजा करीं गा ब्रह्मेश्वरी ॥६६॥
अगस्त्येश्वर कश्यपासी । पूजा करीं हरिहरेश्वरासी । वैजनाथ महाहर्षी । ध्रुवेश्वर पूजीं मग ॥६७॥
गोकर्णेश्वर असे थोर । पूजा करीं गा हाटकेश्वर । अस्थिक्षेप तटाकेश्वर । किंकरेश्वर पूजावा ॥६८॥
भारतभूतेश्वरासी । पूजा करीं गा भावेंसी । चित्रगुप्तेश्वरासी । चित्रघंट पूजावा ॥६९॥
पाशुपतेश्वर निका । पूजा करोनि तेथें बाळका । पितामह असे जो का । ईश्वरातें पूजावें ॥१७०॥
कल्लेश्वरातें वंदूनी । पुढें जावें एक मनीं । चंद्रेश्वरातें पूजोनि । पूजा करीं गा विश्वेश्वरा ॥७१॥
पुढें पूजीं विघ्नेश्वर । त्यानंतर अग्नीश्वर । मग पूजा नागेश्वर । हरिश्चंद्रेश्वर पूजीं जाण ॥७२॥
चिंतामणि विनायका । सोमनाथ विनायक देखा । पूजा करोनि ऐका । वसिष्ठ वामदेव पूजावा ॥७३॥
पुढें त्रिसंध्येश्वर । पूजीं लिंग असे थोर । विशालाक्ष मनोहर । धर्मेश्वर पूजावा ॥७४॥
विश्वबाहु पूजा निका । पुढें आशा-विनायका । वृद्धादित्य असे जो का । पूजा करीं वो मनोभावें ॥७५॥
चतुर्वक्रेश्वर असे थोर । लिंग असे मनोहर । पूजा करीं गा ब्रह्मेश्वर । अनुक्रमें करुनिया ॥७६॥
पुनः प्रकामेश्वर असे खूण । पुढें ईश्वरईशान । चंडी चंडेश्वरा जाण । पूजा करीं भक्तींसी ॥७७॥
पूजीं भवानीशंकर । धुंडिराज मनोहर । अर्ची राजराजेश्वर । लंगूलेश्वर पूजीं मग ॥७८॥
नकुलेश्वर पूजेसी । तुवां जावें भक्तींसी । परान्नपरद्रव्येश्वरासी । पाणिग्रहणेश्वर पूजीं मग ॥७९॥
गंगेश्वर मोरेश्वर पूजोन । ज्ञानवापीं करीं स्नान । ज्ञानेश्वर अर्चून । नंदिकेश्वर पूजीं मग ॥१८०॥
निष्कलंकेश्वर थोर । लिंग असे मनोहर । पूजीं मार्कंडेयेश्वर । असुरेश्वर पूजीं मग ॥८१॥
तारकेश्वर असे थोर । लिंग बहु मनोहर । पूजा महाकाळेश्वर । दंडपाणि पूजीं मग ॥८२॥
महेश्वरातें पूजोनि । अर्ची मोक्षेश्वर ध्यानीं । वीरभद्रेश्वरसुमनीं । पूजा करीं गा बाळका ॥८३॥
अविमुक्तेश्वरापासीं । तुवां जाऊनियां हर्षी । पूजा करीं गा भावेंसी । मोदादि पंच विनायका ॥८४॥
आनंदभैरवपूजा करीं । पुनरपि जाय महाद्वारीं । जेथें असे मन्मथारि। विश्वनाथ पूजावा ॥८५॥
बाळा तूंचि येणेंपरी । अंतरगृहयात्रा करीं । मुक्तिमंडपाभीतरीं जाऊनिया मंत्र म्हणावा ॥८६॥
श्लोक ॥ अंतर्गृहस्य यात्रेयं यथावद्या मया कृता । न्यूनातिरिक्तया शंभुः प्रीयतामनया विभुः ॥१॥
इति मंत्रं समुच्चार्य क्षणं वै मुक्तिमान्भवेत् । विश्रम्य यायाद्भवने निष्पापः पुण्यभाग्भवेत् ॥२॥
ऐसा मंत्र जपून । विश्वनाथातें नमून । मग निघावें तेथून । दक्षिणमानसयात्रेसी ॥८७॥
मणिकर्णिकेसी जाउनी । स्नान उत्तरवाहिनी । विश्वनाथातें पूजोनि । संकल्पावें यात्रेसी ॥८८॥
तेथोनि निघावें हर्षी । मोदादि पंच विनायकांसी । पूजा करीं गा भक्तींसी । धुंडिराज पूजीं मग ॥८९॥
पूजीं भवानीशंकर । दंडपाणि नमन कर । विशालाक्षा अवधार । पूजा तुम्ही भक्तींसी ॥१९०॥
स्नान धर्मकूपेसी । श्राद्धविधि करा हर्षी । पूजा धर्मेश्वरासी । गंगाकेशव पूजीं मग ॥९१॥
पूजावी देवी ललिता । जरासंधेश्वर नमितां । पूजीं मग सोमनाथा । वराहेश्वरा भक्तींसी ॥९२॥
दशाश्वमेधतीर्थेसी । स्नान करीं श्राद्धेंसी । प्रयागतीर्थे परियेसीं । स्नान श्राद्ध करावें ॥९३॥
पूजोनिया प्रयागेश्वरासी । दशाश्वमेध ईश्वरासी । पूजा करीं गा भक्तींसी । शीतलेश्वर अर्चीं मग ॥९४॥
अर्ची मग वंदि देवी । सर्वेश्वर मनोभावीं । धुंडिराज भक्ति पूर्वीं । पूजा करीं गा ब्रह्मचारी ॥९५॥
तिळभांडेश्वर देखा । पूजा करोनि पुढें ऐका । रेवाकुंडीं स्नान निका । मानससरोवरीं मग स्नान ॥९६॥
श्राद्धादि पितृतर्पण । मानसेश्वर मग पूजोन । मनकामना पावे जाण । ऐक बाळा ब्रह्मचारी ॥९७॥
केदारकुंडीं स्नान । करावें तेथें तर्पण । केदारेश्वर पूजोन । गौरीकुंडीं स्नान करा ॥९८॥
पूजीं वृद्धकेदारेश्वर । पूजीं मग हनुमंतेश्वर । पूजोनिया रामेश्वर । स्नान श्राध्द कृमिकुंडीं ॥९९॥
सिद्धेश्वरा करीं नमन । करुनि स्वप्नकुंडीं स्नान । स्वप्नेश्वर पूजोन । स्नान करीं गा संगमांत ॥२००॥
संगमेश्वर पूजोन । लोलार्ककूपीं करीं स्नान । श्राद्धकर्म आचरोन । गतिप्रदीप ईश्वरासी ॥१॥
पूजीं अर्कविनायका । पाराशरेश्वरा अधिका । पूजा करोनि बाळका । सन्निहत्य कुंडीं स्नान करीं ॥२॥
कुरुक्षेत्र कुंड देखा । स्नान करावें विशेखा । सुवर्णादि दानादिका । तेथें तुम्हीं करावें ॥३॥
अमृतकुंडीं स्नान निका । पूजीं दुर्गा विनायका । दुर्गादेवीसी बाळका । पूजा करीं मनोभावें ॥४॥
पुढें चौसष्ट योगिनी । पूजा करीं गा मनकामनीं । कुक्कुट द्विजातें वंदुनी । मंत्र तेथें जपावा ॥५॥
श्लोक ॥ वाराणस्यां दक्षिणे भागे कुक्कुटो नाम वै द्विजः । तस्य स्मरणमात्रेण दुःस्वप्नः सुस्वप्नो भवेत् ॥६॥
पुढें मासोपवासासी । पूजिजे गोबाईसी । सात कवडया घालूनिया तिसी । नमन भावें करावें ॥७॥
पूजा करीं रेणुकेसी । पुढें स्नान करीं हर्षी । शंखोद्धारकुंडेसी । शंखविष्णु पूजिजे ॥८॥
कामाक्षिकुंडीं करीं स्नान । कामाक्षिदेवी पूजोन । अयोध्याकुंडीं करीं स्नान । सीताराम पूजावा ॥९॥

सूर्यकुंडीं करीं स्नान । श्राद्धकर्म आचरोन । सांबादित्य पूजोन । जावें पुढें बाळका ॥११॥
वैजनाथकुंड बरवें । तेथें स्नान तुवां करावें । वैजनाथातें पूजावें । एकभावेंकरुनिया ॥१२॥
गोदावरीकुंडेसी । स्नान करा भक्तींसी । गौतमेश्वर लिंगासी । पूजीं बाळ ब्रह्मचारी ॥१३॥
अगस्तिकुंडीं जावोनि । अगस्तेश्वरा नमूनि । स्नान करीं मनापासोनि । पूजा करीं भक्तिभावें ॥१४
शुक्रकूपीं करीं स्नान । करी शुक्रेश्वर अर्चन । मग पुढें अन्नपूर्णा नमून । पूजा करीं भावेंसी ॥१५॥
धुंडिराजातें पूजोन । ज्ञानवापीं करीं स्नान । ज्ञानेश्वर अर्चोन । दंडपाणि पूजावा ॥१६॥
आनंदभैरव वंदोनि । महाद्वारा जाऊनि । साष्टांगेसी नमोनि । विश्वनाथा अर्चिजे ॥१७॥
ऐसें दक्षिणमानस । यात्रा असे विशेष । ब्रह्मचारी करी हर्ष । योगिराज सांगतसे ॥१८॥
आतां उत्तरमानसासी । सांगेन विधि आहे कैशी । संकल्प करोनिया हर्षी । निघावें तुवां बाळका ॥१९॥
जावें पंचगंगेसी । स्नान करीं महाहर्षी । कोटिजन्मपाप नाशी । प्रख्यात असे पुराणीं ॥२२०॥
पंचगंगा प्रख्यात नामें । सांगेन असतीं उत्तमें । किरणा धूतपापा नामें । तिसरी पुण्यसरस्वती ॥२१॥
गंगा यमुना मिळोनी । पांचही ख्याति जाणोनि । नामें असती सगुणी । ऐक बाळा एकचित्तें ॥२२॥
कृतयुगीं त्या नदीसी । धर्मनदी म्हणती हर्षी । धूतपापा नाम तिसी । त्रेतायुगीं अवधारा ॥२३॥
बिंदुतीर्थ द्वारापासी । नाम जाण विस्तारेंसी । कलियुगाभीतरीं तिसी । नाम झालें पंचगंगा ॥२४॥
प्रयागासी माघमासीं । स्नान करितां फळें जैसीं । कोटिगुण पंचगंगेसी । त्याहूनि पुण्य अधिक असे ॥२५॥
ऐशापरी पंचगंगेसी । स्नान करीं गा भावेंसी । बिंदुमाधवपूजेसी । पूजा करीं गा केशवा ॥२६॥
गोपालकृष्ण पूजोनि । जावें नृसिंहभुवनीं । मंगळागौरी वंदोनि । गभस्तेश्वर पूजावा ॥२७॥
मयूखादित्यपूजेसी । तुवां जावें भक्तींसी । पुनरपि जावें हर्षी । विश्वेश्वरदर्शना ॥२८॥
मागुती मुक्तिमंडपासी । तुवां जावें भक्तींसी । संकल्पावें विधींसी । निघावें उत्तरमानसा ॥२९॥
मग निघा तेथून । आदित्यातें पूजोन । अमर्दकेश्वर अर्चोन । पापभक्षेश्वरा पूजिजे ॥२३०॥
नवग्रहातें पूजोनि । काळभैरवातें वंदूनि । क्षेत्रपाळातें अर्चोनि । काळकूपीं स्नान करीं ॥३१॥
पूजा करोनि काळेश्वरा । हंसतीर्थीं स्नान करा । श्राद्धपितृकर्म सारा । ऐक बाळा एकचित्तें ॥३२॥
कृत्तिवासेश्वरा देखा । पूजा करोनि बाळका । पुढें जाऊनि ऐका । शंखवापीं स्नान करीं ॥३३॥
तेथें आचमन करोनि । रत्नेश्वरातें पूजोनि । सीतेश्वरा अर्चोनि । दक्षेश्वर पूजीं मग ॥३४॥
चतुर्वक्रेश्वरीं पूजा । करीं वो बाळा तूं वोजा । पुढें स्नान करणें काजा । वृद्धकाळकूपा जावें ॥३५॥
काळेश्वराचे पूजेसी । तुवां जावें भक्तींसी । अपमृत्येश्वरा हर्षी । पूजा करीं गा बाळका ॥३६॥
मंदाकिनी स्नान करणें । मध्यमेश्वरातें पूजणें । तेथोनि मग पुढें जाणें । जंबुकेश्वर पूजावया ॥३७॥
वक्रतुंडपूजेसी । तुवां जावें भक्तींसी । दंडखात कूपेसी । स्नान श्राद्ध तूं करीं ॥३८॥
पुढें भूतभैरवासी । पूजिजे ईशानेश्वरासी । जैगीषव्यगुहेसी । नमन करुनि पुढें जावें ॥३९॥
घंटाकुंडीं स्नान करीं । व्यासेश्वरातें अर्चन करीं । कंदुकेश्वरातें अवधारीं । पूजा करीं गा भक्तींसी ॥२४०॥
ज्येष्ठवापीं स्नान करणें । ज्येष्ठेश्वरातें पूजणें । सवेंचि तुवां पुढें जाणें । स्नान सप्तसागरांत ॥४१॥
तेथोनि वाल्मीकेश्वरासी । पूजा करीं गा भक्तींसी । भीमलोटा जाऊनि हर्षी । भीमेश्वर पूजावा ॥४२॥
मातृ-पितृकुंडेसी । करणें श्राद्धविधीसी । पिशाचमोचन तीर्थेसी । पुढें जावें अवधारा ॥४३॥
पुढें कपर्दिकेश्वरासी । पूजा करीं गा भक्तींसी । कर्कोटकवापीसी । स्नान करीं गा बाळका ॥४४॥
कर्कोटकेश्वरासी । पूजा करीं गा भक्तींसी । पुढें ईश्वरगंगेसी । स्नान दान करावें ॥४५॥
अग्नीश्वराचे पूजेसी । चक्रकुंडीं स्नानासी । तुवा जावें भक्तींसी । श्राद्धकर्म करावें ॥४६॥
उत्तरार्क पूजोन । मत्स्योदरीं करीं स्नान । ओंकारेश्वर अर्चोन । कपिलेश्वर पूजीं मग ॥४७॥
ऋणमोचन तीर्थेसी । श्राद्धादि करावीं भक्तींसी । पापविमोचनतीर्थेसी । स्नानादि श्राद्धें करावीं ॥४८॥
तीर्थ कपालमोचन । स्नान श्राद्ध तर्पण । कुलस्तंभाप्रती जाऊन । पूजा करीं गा भक्तींसी ॥४९॥
असे तीर्थ वैतरणी । श्राद्ध करावें तेथें स्नानीं । विधिपूर्वक गोदानीं । देतां पुण्य बहुत असे ॥२५०॥
मग जावें कपिलधारा । स्नान श्राद्ध तुम्ही करा । सवत्सेसी द्विजवरा । गोदान द्यावें परियेसा ॥५१॥
वृषभध्वजातें पूजोन । मग निघावें तेथून । ज्वालानृसिंह वंदोन । वरुणासंगमीं तुम्हीं जावें ॥५२॥
स्नान श्राद्ध करोनि । केशवादित्य पूजोनि । आदिकेशव अर्चोनि । पुढें जावें परियेसा ॥५३॥
प्रल्हादतीर्थ असे बरवें । स्नान श्राद्ध तुवां करावें । प्रल्हादेश्वरातें पूजावें । एकभावें परियेसा ॥५४॥
कपिलधारा तीर्थ थोर । स्नान करावें मनोहर । पूजोनि त्रिलोचनेश्वर । असंख्यातेश्वरा पूजिजे ॥५५॥
पुढें जावें महादेवासी । पूजा करीं गा भक्तींसी । द्रुपदेश्वर सादरेंसी । एकभावें अर्चावा ॥५६॥
गंगायमुनासरस्वतींशीं । तिन्ही लिंगें विशेषीं । पूजा करीं गा भक्तींसी । काम्यतीर्थ पाहें मग ॥५७॥
कामेश्वरातें पूजोनि । गोप्रतारतीर्थ स्नानीं । पंचगंगेसी जाऊनि । स्नान मागुतीं करावें ॥५८॥
मणिकर्णिकास्नान करणें । जलशायीतें पूजणें । हनुमंतातें नमन करणें । मोदादि पंच विनायकांसी ॥५९॥
पूजा अन्नपूर्णेसी । धुंडिराज परियेसीं । ज्ञानवापीं स्नानेंसी । ज्ञानेश्वर पूजावा ॥२६०॥
पूजीं दंडपाणीसी । मोक्षलक्ष्मीविलासासी । पूजा पंचपांडवासी । द्रौपदीदुपदविनायका ॥६१॥
पूजा आनंदभैरवासी । अविमुक्तेश्वर हर्षी । पूजोनिया संभ्रमेंसी । विश्वनाथ संमुख सांगें ॥६२॥
श्लोक ॥ उत्तरमानसयात्रेयं यथावद्या मया कृता । न्यूनातिरिक्तया शंभुः प्रीयतामनया विभुः ॥६३॥
ऐसा मंत्र जपोनि । साष्टांगें नमस्कारुनि । मग निघावें तेथोनि । पंचक्रोशयात्रेसी ॥६४॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । गुरुचरित्र ऐकतां संतोषीं । येणेंचि तूं पावशी । चारी पुरुषार्थ इह सौख्य ॥६५॥
म्हणोनि सरस्वतीगंगाधर । सांगे गुरुचरित्रविस्तार । ऐकतां होय मनोहर । सकळाभीष्टे साधिजे ॥६६॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । काशीखंडीं यात्रा निरोपित । कथा असती पुराणविख्यात । एकचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥२६७॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे काशीमहायात्रानिरुपणं नाम एकचत्वारिंशत्तमोऽध्यायः
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या २६७)

श्रीगणेशाय नमः ।
संकल्प करोनिया मनीं । जावें स्वर्गद्वाराभुवनीं । गंगाकेशव पूजोनि । हरिश्चंद्र मंडपा जावें ॥१॥
स्वर्गद्वार असे जाण । मणिकर्णिकातीर्थ विस्तीर्ण । तुवां तेथें जावोन । संकल्पावें विधीनें ॥२॥
हविष्यान्न पूर्व दिवशीं । करोनि असावें शुचीसी । प्रातःकाळीं गंगेसी । स्नान आपण करावें ॥३॥
धुंडिराजातें प्रार्थोनि । मागावें करुणावचनीं । पुनर्दर्शन दे म्हणोनि । विनवावें परियेसा ॥४॥
मग गंगेतें नमोनि । जावें विश्वनाथभुवनीं । मग तयाते पूजोनि । भवानीशंकर पूजावा ॥५॥
मग जावें मुक्तिमंडपासीं । नमोनि निघावें संतोषीं । धुंडिराजाचे पूजेसी । पुनरपि जावें परियेसा ॥६॥
मागुती यावें महाद्वारा । विश्वेश्वर-पूजा करा । मोदादि पंच विघ्नेश्वरा । नमन करावें दंडपाणीसी ॥७॥
पूजा आनंदभैरवासी । मागुती यावें मणिकर्णिकेसी । पूजोनिया ईश्वरासी । सिद्धिविनायक पूजावा ॥८॥
गंगाकेशव पूजोनि । ललितादेवीसी नमोनि । राजसिद्धेश्वर आणा ध्यानीं । दुर्लभेश्वर पूजावा ॥९॥
सोमनाथ पूजा करीं । पुढें शूलटंकेश्वरी । मग पूजा वाराहेश्वरी । द्शाश्वमेध पूजा मग ॥१०॥
बंदी देवीतें पूजोनि । सर्वेश्वरातें नमोनि । केदारेश्वर धरा ध्यानीं । हनुमंतेश्वर पूजावा ॥११॥
मग पूजावा संगमेश्वरी । लोलार्कातें अवधारीं । अर्कविनायका पूजा करीं । दुर्गाकुंडीं स्नान मग ॥१२॥
आयदिुर्गां देवी पूजोनि । दुर्गा गणेश ध्याऊनि । पुनर्दर्शन दे म्हणोनि । प्रार्थावें तयासी ॥१३॥
विश्वकूपेंत ईश्वरासी । कर्दमतीर्थी स्नान हर्षी । कर्दमेश्वरपूजेसी । तुवां जावें बाळका ॥१४॥
जावें कर्दमकूपासी । पूजा मग सोमनाथासी । मग विरुपालिंगासी । पूजा करीं ब्रह्मचारी ॥१५॥
पुढें जावें नीलकंठासी । पूजा करीं गा भावेंसी । कर जोडोनि भक्तींसी । कर्दमेश्वर पूजावा ॥१६॥
पुनर्दर्शन आम्हांसी । दे म्हणावें भक्तींसी । मग निघावें वेगेंसी । नागनाथाचे पूजेतें ॥१७॥
पुढें पूजीं चामुंडेसी । मोक्षेश्वरा परियेसीं । वरुणेश्वर भक्तींसी । पूजा करीं गा बाळका ॥१८॥
वीरभद्रपूजेसी । जावोनि द्वितीय दुर्गेसी । अर्चावें विकटाक्षा देवीसी । पूजा करीं मनोभावें ॥१९॥
पूजीं भैरव उन्मत्त । विमळार्जुन प्रख्यात । काळकूटदेवाप्रत । पूजा करीं गा बाळका ॥२०॥
पूजा करीं महादेवासी । नंदिकेश्वर भैरवासी । भृंगेश्वर विशेषीं । पूजा करीं मनोहर ॥२१॥
गणप्रियासी पूजोनि । विरुपाक्षातें नमोनि । यक्षेश्वर अर्चोनि । विमलेश्वर पूजीं मग ॥२२॥
भीमचंडीं शक्तीसी । पूजीं चंडीविनायकासी । रविरक्ताक्ष गंधर्वासी । पूजा करीं मनोभावें ॥२३॥
ज्ञानेश्वर असे थोर । पूजा पुढें अमृतेश्वर । गंधर्वसागर मनोहर । पूजा करीं गा भक्तींसी ॥२४॥
नरकार्णव तरावयासी । पूजीं भीमचंडीसी । विनवावें तुम्हीं त्यासी । पुनर्दर्शन दे म्हणावें ॥२५॥
एकपादविनायकासी । पुढें पूजीं भैरवासी । संगमेश्वरा भरंवसीं । पूजा करीं गा ब्रह्मचारी ॥२६॥
भूतनाथ सोमनाथ । कालनाथ असे विख्यात । पूजा करीं गा त्वरित । कपर्दिकेश्वरलिंगाची ॥२७॥
नागेश्वर कामेश्वर । पुढें पूजीं गणेश्वर । पूजा करीं विश्वेश्वर । चतुर्मुख विनायका ॥२८॥
पूजीं देहलीविनायकासी । पूजीं गणेश षोडशीं । उदंडगणेश षोडशीं । पूजा करीं मनोहर ॥२९॥
उत्कलेश्वर महाथोर । असे लिंग मनोहर । पुढें एकादश रुद्र । तयांचें पूजन करावें ॥३०॥
जावें तपोभूमीसी । पूजा करीं गा भक्तींसी । रामेश्वर महाहर्षी । पूजीं मग सोमनाथ ॥३१॥
भरतेश्वर असे थोर । लक्ष्मणेश्वर मनोहर । पूजीं मग शत्रुघ्नेश्वर । भूमिदेवी अर्चीं मग ॥३२॥
नकुळेश्वर पूजोन । करीं रामेश्वरध्यान । पुनर्दर्शन दे म्हणोन । विनवावें परियेसा ॥३३॥
असंख्यात तीर्थ वरुण । तेथें करा तुम्हीं नमन । असंख्यात लिंगें जाण । पूजा करावी भक्तींसी ॥३४॥
पुढें असे लिंग थोर । नामें देव सिद्धेश्वर । पूजा करीं गा मनोहर । पशुपाणि विनायक ॥३५॥
याची पूजा करोनि । पृथ्वीश्वरातें नमोनि । शरयूकूपीं स्नान करोनि । कपिलधारा स्नान करीं ॥३६॥
वृषभध्वजा पूजोनि । ज्वालानृसिंहाचे वंदी चरणीं । वरुणासंगमीं स्नान करोनि । श्राद्धादि कर्में करावीं ॥३७॥
संगमेश्वर पूजावा । सर्वविनायक बरवा । पुढें पूजीं तूं केशवा । भावें करुनि ब्रह्मचारी ॥३८॥
पूजा प्ऱ्हादेश्वरासी । स्नान कपिलातीर्थासी । त्रिलोचनेश्वरासी । पूजा करीं गा भक्तीनें ॥३९॥
पुढें असे महादेव । पंचगंगातीर ठाव । पूजा करीं गा भक्तिभावें । तया बिंदुमाधवासी ॥४०॥
पूजीं मंगळागौरीसी । गभस्तेश्वरा परियेसीं । वसिष्ठ वामदेवासी । पर्वतेश्वर पूजावा ॥४१॥
महेश्वराचे पूजेसी । पुढें सिद्धिविनायकासी । पूजा सप्तवर्णेश्वरासी । सर्वगणेश पूजावा ॥४२॥
मग जावें मणिकर्णिके । स्नान करावें विवेकें । विश्वेश्वरातें स्मरोनि निकें । महादेव पूजावा ॥४३॥
मग जावें मुक्तिमंडपासी । नमन करावे विष्णूसी । पूजीं दंडपाणीसी । धुंडिराज अर्चावा ॥४४॥
आनंदभैरव पूजोनि । आदित्येशा नमोनि । पूजा करीं गा भक्तींसी । मोदादि पंचविनायका ॥४५॥
पूजा करीं गा विश्वेश्वरासी । मोक्षलक्ष्मीविलासासी । नमोनि देवा संमुखेसी । मंत्र म्हणावा येणेंपरी ॥४६॥
श्लोक ॥ जय विश्वेश विश्वात्मन् काशीनाथ जगत्पते । त्वत्प्रसादान्महादेव कृता क्षेत्रप्रदक्षिणा ॥४७॥
अनेकजन्मपापानि कृतानि मम शंकर । गतानि पंचक्रोशात्मा कृता लिंगप्रदक्षिणा ॥४८॥
ऐसा मंत्र जपोन । पुढें करावें शिवध्यान । मुक्तिमंडपा येवोन । आठां ठायीं वंदावें ॥४९॥
प्रथम मुक्तिमंडपासी । नमन करावें परियेसीं । वंदोनि स्वर्गमंडपासी । जावें ऐश्वर्यमंडपा ॥५०॥
ज्ञानमंडपा नमोनि । मोक्षलक्ष्मीविलासस्थानीं । मुक्तिमंडपा वंदोनि । आनंदमंडपा जावें तुवा ॥५१॥
पुढें वैराग्यमंडपासी । तुवां जावें भक्तींसी । येणेंपरी यात्रेसी । करीं गा बाळा ब्रह्मचारी ॥५२॥
आणिक एक प्रकार । सांगेन ऐक विचार । नित्ययात्रा मनोहर । ऐक बाळका गुरुदासा ॥५३॥
सचैल शुचि होवोनि । चक्रपुष्करणीं स्नान करोनि । देवपितर तर्पोनि । ब्राह्मणपूजा करावी ॥५४॥
मग निघावें तेथोनि । पदादित्येश्वर पूजोनि । दंपत्येश्वर नमोनि । श्रीविष्णूतें पूजावें ॥५५॥
मग नमावा दंडपाणि । महेश्वरातें पूजोनि । मग निघावें तेथोनि । धुंडिराज अर्चिजे ॥५६॥
ज्ञानवापीं करी स्नान । नंदिकेश्वर अर्चोन । तारकेश्वर पूजोन । पुढें जावें मग तुवां ॥५७॥
महाकाळेश्वर देखा । पूजा करीं भावें एका । दंडपाणि विनायका । पूजा करीं मनोहर ॥५८॥
मग यात्रा विश्वेश्वर । करीं गा बाळका मनोहर । लिंग असे ओंकारेश्वर । प्रतिपदेसी पूजावा ॥५९॥
मत्स्योदरी तीर्थासी । स्नान करावें प्रतिपदेसी । त्रिलोचन महादेवासी । दोन्ही लिंगे असतीं जाण ॥६०॥
तेथें बीजतिजेसी । जावें तुवां यात्रेसी । यात्रा जाण चतुर्थीसी । कांचीवास लिंग जाणा ॥६१॥
रत्नेश्वर पंचमीसी । चंद्रेश्वरपूजेसी । षष्ठीसी जावें परियेसीं । ऐक शिष्या एकचित्तें ॥६२॥
सप्तमीसी केदारेश्वर । अष्टमीसी लिंग धूमेश्वर । विश्वेश्वर लिंग थोर । नवमी यात्रा महापुण्य ॥६३॥
कामेश्वर दशमीसी । एकादशीसी विश्वेश्वरासी । द्वादशीसी मणिकर्णिकेसी । मणिकेश्वर पूजावा ॥६४॥
त्रयोदशी प्रदोषेसी । पूजा अविमुक्तेश्वरासी । चतुर्दशीसी विशेषीं । विश्वेश्वर पूजावा ॥६५॥
जे कोणी काशीवासी । असती नर परियेसीं । त्यांणीं करावी यात्रा ऐसी । नाहीं तरी विघ्न घडे ॥६६॥
शुक्लपक्षीं येणेंपरी । यात्रा करीं मनोहरी । कृष्णपक्ष आलियावरी । यात्रा करा सांगेन ॥६७॥
चतुर्दशी धरोनि । यात्रा करा प्रतिदिनीं । सांगेन ऐका विधानीं । एकचित्तें परियेसा ॥६८॥
वरुणानदीं करा स्नान । करा शैल्येश्वरदर्शन । संगमेश्वर पूजोन । संगमीं स्नान तये दिनीं ॥६९॥

मणिकर्णिका स्नानेंसी । पूजा ईशानेश्वरासी । हिरण्यगर्भ परियेसीं । दोनी लिंगें पूजिजे ॥७१॥
स्नान धर्मकूपेसी । करीं पूजा गोपद्मेश्वरासी । पूजा करा तया दिवसीं । एकचित्तें परियेसा ॥७२॥
कपिलधारा तीर्थासी । स्नान करा भक्तींसी । वृषभध्वज लिंगासी । सप्तमीचे दिवसीं पूजीं पै ॥७३॥
उपाशांतिकूपेसी । स्नान करा भक्तींसी । उपशांतेश्वरासी । पूजा करीं तया दिनीं ॥७४॥
पंचचूडडोहांत । स्नान करा शिव ध्यात । ज्येष्ठेश्वरा त्वरित । पूजावें तया दिनीं ॥७५॥
चतुःसमुद्रकूपासी । स्नान करीं भावेंसी । समुद्रेश्वर हर्षी । पूजा करीं तया दिनीं ॥७६॥
देवापुढें कूप असे । स्नान करावें संतोषें । शुक्रेश्वर पूजा हर्षे । पूजा करीं तया दिनीं ॥७७॥
दंडखात तीर्थेसी । स्नान करोनि देवासी । व्याघ्रेश्वरपूजेसी । तुवां जावें तया दिनीं ॥७८॥
शौनकेश्वरतीर्थेसी । स्नान तुम्ही करा हर्षीं । तीर्थनामें लिंगासी । पूजा करा मनोहर ॥७९॥
जंबुतीर्थ मनोहर । स्नान करा शुभाचार । पूजावा भावें जंबुकेश्वर । चतुर्दश लिंगें येणेंपरी ॥८०॥
शुक्लपक्षकृष्णेसी । अष्टमी तिथि विशेषीं । पूजावें तुम्हीं लिंगासी । सांगेन ऐका महापुण्य ॥८१॥
मोक्षेश्वर पर्वतेश्वर । तिसरा पशुपतेश्वर । गंगेश्वर नर्मदेश्वर । पूजा करीं मनोभावें ॥८२॥
आणिक भक्तेश्वर गभस्तीश्वर । मध्यमेश्वर असे थोर । तारकेश्वरनामें निर्धार । नव लिंगें पूजावीं ॥८३॥
आणिक लिंगें एकादश । नित्ययात्रा विशेष । लिंग असे अग्निध्रुवेश । यात्रा तुम्हीं करावी ॥८४॥
दुसरा असे उर्वशीश्वर । नकुलेश्वर मनोहर । चौथा असे आषाढेश्वर । भारभूतेश्वर पंचम ॥८५॥
लांगूलेश्वरीं करा पूजा । करा त्रिपुरांतका ओजा । मनःप्रकामेश्वरकाजा । तुम्ही जावें परियेसा ॥८६॥
प्रीतेश्वर असे देखा । मंदालिकेश्वर ऐका । तिलपर्णेश्वर निका । पूजा करीं भावेंसी ॥८७॥
आतां शक्तियात्रेसी । सांगेन ऐका विधीसी । शुक्लपक्षतृतीयेसी । आठ यात्रा कराव्या ॥८८॥
गोप्रेक्षतीर्थ देखा । स्नान करोनि ऐका । पूजा मुख्य भाळनेत्रिका । भक्तिभावेंकरोनिया ॥८९॥
ज्येष्ठवापीं स्नानेंसी । ज्येष्ठागौरी पूजा हर्षीं । स्नान पान करा वापीसी । शृंगार सौभाग्य गौरीपूजा ॥९०॥
विशाळगंगास्नानासी । पूजा विशाळगौरीसी । ललितातीर्थस्नानेसी । ललिता देवी पूजावी ॥९१॥
स्नान भवानीतीर्थेसी । पूजा करा भवानीसी । बिंदुतीर्थ स्नानासी । मंगळागौरी पूजावी ॥९२॥
पूजा इतुके शक्तींसी । मग पूजिजे लक्ष्मीसी । येणें विधी भक्तींसी । यात्रा करीं मनोहर ॥९३॥
यात्रातीर्थ चतुर्थीसी । पूजा सर्व गणेशासी । मोदक द्यावे गौरीपुत्रासी । विघ्न न करी तीर्थवासियांतें ॥९४॥
मंगळ अथवा रविवारेंसी । यात्रा करीं भैरवासी । षष्ठी तिथि परियेसीं । जावें तुम्हीं मनोहर ॥९५॥
रविवारीं सप्तमीसी । यात्रा रविदेवासी । नवमी अष्टमी चंडीसी । यात्रा तुम्हीं करावी ॥९६॥
अंतर्गृहयात्रेसी । करावी तुम्हीं प्रतिदिवसीं । विस्तारकाशीखंडासी । ऐक शिष्या ब्रह्मचारी ॥९७॥
ऐशी काशीविश्वेश्वर । यात्रा करावी तुम्हीं परिकर । आपुल्या नामीं सोमेश्वर । लिंगप्रतिष्ठा करावी ॥९८॥
इतुकें ब्रह्मचारियासी । यात्रा सांगितली परियेसीं । आचरण करीं येणें विधींसी । तुझी वासना पुरेल ॥९९॥
तुझे चित्तीं असे गुरु । प्रसन्न होईल शंकरु । मनीं धरीं गा निर्धारु । गुरुस्मरण करीं निरंतर ॥१००॥
इतकें सांगोनि तापसी । अदृश्य झाला परियेसीं । ब्रह्मचारी म्हणे हर्षीं । हाचि माझा गुरु सत्य ॥१॥
अथवा होईल ईश्वर । मज कृपाळू झाला सत्वर । कार्य लाधेल निर्धार । म्हणोनि मनीं धरियेलें ॥२॥
न आराधितां आपोआप । भेटला मातें मायबाप । गुरुभक्तीनें अमूप । सकाळाभीष्टें पाविजे ॥३॥
समस्त देवा ऐशी गति । दिल्यावांचोन न देती । ईश्वर भोळा चक्रवर्ती । गुरुप्रसादें भेटला ॥४॥
यज्ञ दान तप सायास । कांहीं न करितां सायास । भेटला मज विशेष । गुरुकृपेंकरोनिया ॥५॥
ऐसें गुरुस्मरण करीत । ब्रह्मचारी जाय त्वरित । विधिपूर्वक आचरत । यात्रा केली भक्तीनें ॥६॥
यात्रा करितां भक्तींसी । प्रसन्न झाला व्योमकेशी । निजस्वरुपें संमुखेसी । उभा राहिला शंकर ॥७॥
प्रसन्न होवोनि शंकर । म्हणे दिधला माग वर । संतोषोनि त्वष्ट्रकुमार । निवेदिता झाला वृत्तान्त ॥८॥
जें जें मागितलें गुरुवर्यें । आणिक त्याचे कन्याकुमारें । सांगता झाला विस्तारें । शंकराजवळी देखा ॥९॥
संतोषोनि ईश्वर । देता झाला अखिल वर । म्हणे बाळा माझा कुमार । सकळ विद्याकुशल होसी ॥११०॥
तुवां केली गुरुभक्ति । तेणें झाली आपणा तृप्ति । अखिल विद्या तुज होती । विश्वकर्मा तूंचि होसी ॥११॥
चतुर्विध पुरुषार्थ । लाधला तुज परमार्थ । सृष्टि रचावया समर्थ । होसी जाण त्वष्टपुत्रा ॥१२॥
ऐसा वर लाधोन । त्वष्टा ब्रह्मानंदन । केलें लिंग स्थापन । आपुले नामीं परियेसा ॥१३॥
मग निघाला तेथोनि । केली आयती तत्क्षणीं । प्रसन्न होतां शूलपाणि । काय नोहे तयासी ॥१४॥
जें जें मागितलें श्रीगुरुवरें । सकळ वस्तु केल्या चतुरें । घेऊनिया सत्वरें । आला श्रीगुरुसंमुख ॥१५॥
सकळ वस्तु देऊनि । लागतसे श्रीगुरुचरणीं । अनुक्रमें गुरुरमणि । पुत्र-कन्येंसी वंदिलें ॥१६॥
उल्हास झाला श्रीगुरुसी । आलिंगितसे महाहर्षीं । शिष्य ताता ज्ञानराशि । तुष्टलों तुझे भक्तीनें ॥१७॥
सकल विद्याकुशल होसी । अष्टैश्वर्ये नांदसी । त्रैमूर्ति तुझिया वंशीं । होतील ऐक शिष्योत्तमा ॥१८॥
घर केलें तुवां आम्हांसी । आणिक वस्तु विचित्रेंसी । चिरंजीव तूंचि होसी । आचंद्रार्क तुझें नाम ॥१९॥
स्वर्गमृत्युपाताळासी । पसरवीं तुझे चातुर्यासी । रचिसी तूंचि सृष्टीसी । विद्या चौसष्टी तूंचि ज्ञाता ॥१२०॥
तुज वश्य अष्ट सिद्धि । होतील जाण नव निधि । चिंता कष्ट न होती कधीं । म्हणोनि वर देतसे ॥२१॥
ऐसा वर लाधोनि । गेला शिष्य महाज्ञानी । येणेंपरी विस्तारोनि । सांगे ईश्वर पार्वतीसी ॥२२॥
ईश्वर म्हणे गिरिजेसी । गुरुभक्ति आहे ऐसी । एकभाव असे ज्यासी । सकळाभीष्टें पावती ॥२३॥
भव म्हणिजे सागर । उतरावया पैल पार । समर्थ असे एक गुरुवर । त्रैमूर्तीचा अवतार ॥२४॥
या कारणें त्रैमूर्ति । गुरुचरणीं भजती । वेदशास्त्रें बोलती । गुरुविणें सिद्धि नाहीं ॥२५॥
श्लोक ॥ यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ । तस्यैते कथिता ह्यर्था : प्रकाशन्ते महात्मनः ॥२६॥
ऐसें ईश्वर पार्वतीसी । सांगता झाला विस्तारेंसी । म्हणोनि श्रीगुरु प्रीतीसी । निरोपिलें द्विजातें ॥२७॥
इतुकें होतां रजनीसी । उदय झाला दिनकरासी । चिंता अंधकारासी । गुरुकृपा ज्योती जाणा ॥२८॥
संतोषोनि द्विजवर । करिता झाला नमस्कार । ऐसी बुद्धि देणार । तूंचि स्वामी कृपानिधि ॥२९॥
नमन करुनि श्रीगुरुसी । विनवीतसे भावेंसी । स्वामी कथा निरोपिलीसी । अपूर्व मातें वाटलें ॥१३०॥
काशीयात्राविधान । निरोपिलें मज विस्तारोन । तया वेळीं होतों आपण । तुम्हांसहित तेथेंचि ॥३१॥
पाहिलें आपण दृष्टान्तीं । स्वामी काशीपुरीं असती । जागृतीं कीं सुषुप्तीं । नकळे मातें स्वामिया ॥३२॥
म्हणोनि विप्र तये वेळीं । वंदी श्रीगुरुचरणकमळीं । विनवीतसे करुणा बहाळी । भक्तिभावेंकरोनिया ॥३३॥
जय जया परमपुरुषा । परात्परा परमहंसा । भक्तजनमानसहंसा । श्रीनृसिंहसरस्वती ॥३४॥
ऐसें तया अवसरीं । पूर्वज तुझा स्तोत्र करी । सांगेन तुज अवधारीं । एकचित्तें करुनिया ॥३५॥
श्लोक ॥ आदौ ब्रह्मत्वमेव सर्वजगतां वेदात्ममूर्तिं विभुं । पश्चात् क्षोणिजडा विनाश-दितिजां कृत्वाऽवतारं प्रभो । हत्वा दैत्यमनेकधर्मचरितं, भूत्वाऽत्मजोऽत्रेर्गृहे । वंदेऽहं नरकेसरीसरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥३६॥
भूदेवाखिलमानुष विदुजना बाधायमानं कलिं । वेदादुश्यमनेकवर्णमनुजा, भेदादि-भूतोन्नतम् । छेदः कर्मतमांधकारहरणं श्रीपादसूर्योदयं । वंदेऽहं नरकेसरीसरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥३७॥
धातस्त्वं हरिशंकरप्रतिगुरो, जाताग्रजन्मं विभो । हेतुः सर्वविदोजनाय तरणं, ज्योतिःस्वरुपं जगत् । चातुर्थाश्रमस्थापितं क्षितितले, पातुः सदा सेव्ययं

चरितं चित्रमनेककीर्तिमतुलं, परिभूतभूमंडलें । मूकं वाक्यदिवांधकस्य नयनं, वंध्यां च पुत्रं ददौ । सौभाग्यं विधवां च दायकश्रियं, दत्त्वा च भक्तं जनं । वंदेऽहं नरकेसरीसरस्वतीश्रीपादयुग्मांबुजम् ॥३९॥
दुरितं, घोरदरिद्रदावतिमिरं, हरणं जगज्जोतिषं । स्वर्धेनुं सुरपादपूजितजना, करुणाब्धिभक्तार्तितः । नरसिंहेंद्रसरस्वतीश्वर विभो, शरणागतं रक्षकं । वंदेऽहं नरकेसरीसरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥१४०॥
गुरुमूर्तिश्चरणारविंदयुगलं, स्मरणं कृतं नित्यसौ । चरितं क्षेत्रमनेकतीर्थसफलं सरितादि-भागीरथी । तुरगामेधसहस्त्रगोविदुजनाः स्मयक् ददंस्तत्फलं । वंदेऽहं नरकेसरीसरस्वतीश्रीपादयुग्मांबुजम् ॥४१॥
नो शक्यं तव नाममंगल-स्तुवं, वेदागमागोचरं । पादद्वं ह्रदयाब्जमंतरजलं निर्धारमीमांसतं । भूयो भूयः स्मरन्नमामि मनसा, श्रीमद्गुरुं पाहि मां । वंदेऽहं नरकेसरीसरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥४२॥
भक्तानां तरणार्थ सर्वजगतां, दीक्षां ददन्योगिनां । सुक्षेत्रं पुरगाणगस्थित प्रभो, दत्त्वा चतुष्कामदं । स्तुत्वा भक्तसरस्वतीगुरुपदं, जित्वाऽद्यदोषादिकं । वंदेऽहं नरकेसरीसरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥४३॥
एवं श्रीगुरुनाथमष्टकमिदं स्तोत्रं पठेन्नित्यसौ । तेजोवर्चबलोन्नतं श्रियकरं आनंदवर्धं वपुः । पुत्रापत्यमनेकसंपदशुभा दीर्घायुरारोग्यतां । वंदेऽहं नरकेसरीसरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥४४॥
येणेंपरी स्तोत्र करीत । मागुती करी दंडवत । सद्गदित कंठ होत । रोमांच अंगीं उठियेले ॥४५॥
म्हणे त्रैमूर्ति अवतारु । तूंचि देवा जगद्गुरु । आम्हां दिसतोसी नरु । कृपानिधि स्वामिया ॥४६॥
मज दाविला परमार्थ । लाधलों चारी पुरुषार्थ । तूंचि सत्य विश्वनाथ । काशीपुर तुजपाशीं ॥४७॥
ऐसेंपरी श्रीगुरुसी । विनवीतसे परियेसीं । संतोषोनि महाहर्षी । निरोप देती तये वेळीं ॥४८॥
श्रीगुरु म्हणती द्विजासी । दाखविली तुज काशी । पुढें तुझ्या वंशीं एकविसांसी । यात्राफळ तयां असे ॥४९॥
तूंचि आमुचा निजभक्त । दाखविला तुज दृष्टान्त । आम्हांपासीं सेवा करीत । राहें भक्ता म्हणती तया ॥१५०॥
जरी राहसी आम्हांपासी । तरी त्वां न वंदिजे म्लेंच्छासी । आणोनिया स्त्रीपुत्रांसी । भेटी करीं आम्हांतें ॥५१॥
निरोप देऊनि द्विजासी । गेले गुरु मठासी । आनंद झाला मनासी । श्रीगुरुदर्शनीं भक्तजना ॥५२॥
नामधारक शिष्यराणा । लागे सिद्धाचिया चरणां । विनवीतसे कर जोडोनि जाणा । भक्तिभावेंकरोनिया ॥५३॥
मागें कथानक निरोपिलें । सायंदेव शिष्य श्रीगुरुंनीं त्यातें निरोपिलें । कलत्रपुत्र आणीं म्हणत ॥५४॥
पुढें तया काय झालें । विस्तारोनि सांगा वहिलें । पाहिजे आतां अनुग्रहिलें । म्हणोनि चरणीं लागला ॥५५॥
संतोषोनि सिद्ध मुनि । सांगतसे विस्तारोनि । सायंदेव महाज्ञानी । गेला श्रीगुरुनिरोपें ॥५६॥
जाऊनि आपुले स्त्रियेसी । सांगता झाला पुत्रासी । आमुचा गुरु परियेसीं । असे गाणगापुरांत ॥५७॥
आम्हीं जावें भेटीसी । समस्त कन्यापुत्रांसीं । म्हणोनि निघाला वेगेंसी । महानंदेंकरोनिया ॥५८॥
पावला गाणगापुरासी । भेटी जहाली श्रीगुरुसी । नमन करी भक्तींसी । साष्टांगीं तये वेळीं ॥५९॥
कर जोडुनी तयें वेळीं । स्तोत्र करी वेळोवेळीं । ओंनमोजी चंद्रमौळि । त्रैमूर्ति तूंचि होसी ॥१६०॥
तूं त्रैमूर्तिचा अवतार । अज्ञानदृष्टीं दिससी नर । वर्णावया न दिसे पार । तुझा महिमा स्वामिया ॥६१॥
तुझा महिमा वर्णावयासी । शक्ति कैची आम्हांसी । आदिपुरुष भेटलासी । कृपानिधि स्वामिया ॥६२॥
जैसा चंद्र चकोरासी । उदय होतां संतोष त्यासी । तैसा आनंद आम्हांसी । तुझे चरण लक्षितां ॥६३॥
पूर्वजन्मीं पापराशि । केल्या होत्या बहुवशी । श्रीगुरुचे दर्शनेसी । पुनीत झालों म्हणतसे ॥६४॥
जैसा चिंतामणि स्पर्शी । हेमत्व होय लोहासी । मृत्तिका पडतां जंबूनदीसी । उत्तम सुवर्ण होतसे ॥६५॥
जातां मानससरोवरासी । हंसत्व येई वायसासी । तैसें तुझे दर्शनेंसी । पुनीत झालों स्वामिया ॥६६॥
श्लोक ॥ गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तस्था । पापं तापं च हरति दैन्यं च गुरुदर्शनम् ॥१॥
टीका ॥ गंगा स्नानानें पापें नाशी । ताप निवारी देखा शशी । कल्पवृक्षछायेसी । कल्पिलें फळ पाविजे ॥६७॥
एकेकाचे एकेक गुणें । असतीं ऐसीं हीं लक्षणें । दर्शन होतां श्रीगुरुचरणें । तिन्ही फळें पाविजे ॥६८॥
पापें हरती तात्काळीं । तापचिंता जातीं सकळी । दैन्यकानन समूळ जाळी । श्रीगुरुचरणदर्शनें ॥६९॥
चतुर्विध पुरुषार्थ । देता होय गुरुनाथ । ऐसा वोले वेदसिद्धान्त । तोचि आम्हीं देखिला ॥१७०॥
म्हणोनिया आनंदेंसी । गायन करी संतोषीं । अनेक रागें परियेसीं । कर्नाटक भाषें करोनि ॥७१॥
राग श्रीराग । कंडेनिंदु भक्तजनराभाग्यनिधियभूमंडलदोळगेनारसिंहसरस्वतीया ॥७२॥
कंडेनिंदुउंडेनिंदुवारिजादोळपादवाराजाकमळदोळदंतध्यानिसी ॥७३॥
सुखसुवाजनारुगळा । भोरगेलान्नेकामिफळफळा । नित्यसकळाहूवा । धीनारसिंहसरस्वतीवरानना ॥७४॥
वाक्यकरुणानेनसुवा । जगदोळगदंडकमंडलुधराशी । सगुणानेनीशीसुजनरिगे । वगादुनीवासश्रीगुरुयतिवरान्न ॥७५॥
धारगेगाणगापुरडोलकेलाशीहरी । दासिसोनुनादयाकरुणादली । वरावीतुंगमुनाहोरावनुअनुबिना । नारसिंहसरस्वतीगुरुचरणवन्न ॥७६॥
राजगखंडीकंडीनेननमा । इंदुकडेनेनमा । मंडलादोळगेयती कुलराये । चंद्रमन्ना ॥७७॥
तत्त्वबोधायाउपनिषदतत्त्वचरित नाव्यक्तवादपरब्रह्ममूर्तियनायना । शेषशयनापरवेशकायना । लेशकृपयनीवनेवभवासौपालकाना ॥७८॥
गंधपरिमळादिशोभितानंदासरसाछंदालयोगेंद्रेगोपीवृंदवल्लभना ॥७९॥
करीयनीयानांपापगुरु । नवरसगुसायन्नीं । नरसिंहसरस्वत्यन्ना । नादपुरुषवादना ॥१८०॥
यापरी स्तोत्रें श्रीगुरुसी । स्तुति केली बहुवसीं । संतोषोनि महाहर्षी । आश्वासिताती तये वेळीं ॥८१॥
प्रेमभावें समस्तांसी । बैसा म्हणती समीपेसी । जैसा लोभ मायेसी । या बाळकावरी परियेसा ॥८२॥
आज्ञा घेउनी सहज । गेला तुमचा पूर्वज । सकळ पुत्रांसहित द्विज । आला श्रीगुरुदर्शना ॥८३॥
भाद्रपद चतुर्दशीसी । शुक्लपक्ष परियेसीं । आला शिष्य भेटीसी । एकाभावेंकरोनिया ॥८४॥
येती शिष्य लोटांगणीं । एकाभावें तनुमनीं । येऊनि लागती चरणीं । सद्गदित कंठ झाला ॥८५॥
स्तोत्र करिती तिहीं काळीं । कर जोडोनि तये वेळीं । ओं नमोजी चंद्रमौळि । त्रैमूर्ति तूंचि होसी ॥८६॥
त्रैमूर्तीचा अवतारु । झालासी तूं जगद्गुरु । येरां दिसतोसी नरु । न कळे पार तुझा स्वामिया ॥८७॥
सिद्ध म्हणे नामकरणी । काय सांगू तयें दिनीं । कैशी कृपा अंतःकरणीं । तया श्रीगुरु यतीचे ॥८८॥
आपुले पुत्रकलत्रेंसी । जैसा लोभ परियेसीं । तैसा तुमचे पूर्वजासी । प्रेमभावें पुसताती ॥८९॥
गृहवार्ता सुरसी । क्षेम पुत्रकलत्रेंसी । द्विज सांगे मनोहर्षीं । सविस्तारीं परियेसा ॥१९०॥
पुत्रकलत्रेंसहित नमोन । सांगे क्षेम समाधान । होते पुत्र चौघेजण । चरणावरी घातले ॥९१॥
ज्येष्ठसुत नागनाथ । तयावरी कृपा बहुत । कृपानिधि गुरुनाथ । माथां हस्त ठेविती ॥९२॥
श्रीगुरु म्हणती द्विजासी । तुझ्या ज्येष्ठसुतासी । आयुष्य पूर्ण असे त्यासी । संतति बहु याची वाढेल ॥९३॥
हाच भक्त आम्हांसी । असेल श्रियायुक्तेसी । तुवां आतां म्लेंच्छासी । सेवा न करावी म्हणितलें ॥९४॥
आणिक तूंतें असे नारी । पुत्र होती तीस चारी । नांदतील श्रेयस्करी । तुवां सुखें असावें ॥९५॥
जया दिवसीं म्लेंच्छासी । तुवां जावोनि वंदिसी । हानि असे जीवासी । म्हणोनि सांगती तये वेळीं ॥९६॥
तुझा असे वडिल सुत । तोचि आमुचा निज भक्त । त्याची कीर्ति वाढेल बहुत । म्हणती श्रीगुरु तये वेळीं ॥९७॥
मग म्हणती द्विजासी । जावें त्वरित संगमासी । स्नान करोनि त्वरितेंसी । यावें म्हणती तये वेळीं ॥९८॥
ग्रामलोक तया दिवसीं । पूजा करितां अनंतासी । येऊनिया श्रीगुरुसी । पूजा करितो परियेसा ॥९९॥
पुत्रमित्रकलत्रेंसी । गेले स्नाना संगमासी । विधिपूर्वक अश्वत्थासी । पूजूनि आले मठातें ॥२००॥
श्रीगुरु म्हणती द्विजासी । आजि व्रतचतुर्दशी । पूजा करीं अनंतासी । समस्त द्विज मिळोनि ॥१॥

तये वेळीं श्रीगुरु । सांगतां झाला विस्तारु । कौंडिण्यमहाऋषीश्वरु । कैलें व्रत प्रख्यात ॥३॥
ऐसें म्हणतां द्विजवरु । करितां होय नमस्कारु । कैसें व्रत आचरावें साचारु । पूर्वीं कोणी केलें असे ॥४॥
ऐसें व्रत प्रख्यात । व्रत दैवत अनंत । जेणें होय माझें हित । कथामृत निरोपिजे ॥५॥
येणें पुण्य काय घडे । काय लाभतसे रोकडें । ऐसें मनींचें साकडें । फेडावें माझें स्वामिया ॥६॥
ऐसें विनवीतसे द्विजवरु । संतोषोनि गुरु दातारु । सांगते झाले व्रताचारु । सिद्ध म्हणे नामधारका ॥७॥
म्हणोनि सरस्वतीगंगाधरु । सांगे गुरुचरित्रविस्तारु । ऐकतां भवसागरु । पैल पार पाववी श्रीगुरु ॥८॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । काशीयात्रा समस्त करीत । श्रोते ऐकती आनंदित । तेणें सफल जन्म होय ॥९॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । सांगतसे नामधारक विख्यात । जेणें होय मोक्ष प्राप्त । द्विचत्वारिंशोऽध्याय: ॥२१०॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे काशीक्षेत्रमहिमावर्णनं नाम द्विचत्वारिंशोऽध्यायः ॥४२॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या २१०)

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

नामधारक म्हणे सिद्धासी । पुढें चरित्र जाहलें कैसी । विस्तारावें आम्हांसी । कृपा करीं गा दातारा ॥१॥
सिद्ध म्हणे ऐक वत्सा । समस्त भक्त सेवा करितां । त्यांत एक विणकर तंतिक अत्यंता । करीतसे भक्ति श्रीगुरुची ॥२॥
तीन प्रहर संसारयात्रा । करुनि येतसे पवित्रा । राजांगण झाडी विचित्रा । नमस्कार करी दुरोनि ॥३॥
ऐसे किती दिवस क्रमिले । व्रत शिवरात्री आलें । समस्त यात्रेसी निघाले । मातापिता तंतिकाचे ॥४॥
त्यासी बोलाविती यात्रेसी । तो म्हणतसे नयें तयांसी । तुम्ही मूर्ख असा पिसीं । माझा श्रीपर्वत येथेंचि असे ॥५॥
श्रीगुरु माझा मल्लिकार्जुन । पर्वत म्हणिजे श्रीगुरुभुवन । आपण न यें येथून । चरण सोडोनि श्रीगुरुचे ॥६॥
समस्त लोक त्यासी हांसती । पिसें लागलें यासीं म्हणती । चला जाऊं म्हणोनि निघती । भ्राता माता पिता त्याचे ॥७॥
नगरलोक समस्त गेला । आपण एकला राहिला । श्रीगुरुमठासी आला । गुरु पुसती तयासी ॥८॥
श्रीगुरु म्हणती तयासी । कां गा यात्रेसी तूं न वचसी । तंतिक म्हणे स्वामीसी । माझी यात्रा तुमचे चरण ॥९॥
नाना तीर्थयात्रादि देखा । तुमचे चरणीं असे निका । वायां जाती मूर्ख लोक । पाषाणदर्शन करावया ॥१०॥
ऐसें म्हणोनि तंतिक । नमस्कार करी नित्य देख । तंव पातली शिवरात्रि ऐक । माघवद्य चतुर्दशी ॥११॥
श्रीगुरु होते संगमासी । दोन प्रहर होतां भक्त परियेसीं । आपण गेला स्नानासी । उपवास असे शिवरात्रीचा ॥१२॥
संगमीं स्नान करोनि । श्रीगुरुतें नमस्कारोनि । उभा ठेला कर जोडोनि । भक्तिपूर्वक एकोभावें ॥१३॥
श्रीगुरु म्हणती तयासी । तुझीं समस्त गेलीं यात्रेसी । तूं एकलाचि राहिलासी । पहातासी विनोद श्रीपर्वताचा ॥१४॥
पुसती कधीं देखिलासी ? । म्हणे स्वामी नेणें कधींसी । तुमचे चरणीं आम्हांसी । सर्व यात्रा सदा असती ॥१५॥
त्याचा भाव पाहोनी । जवळी बोलाविती श्रीगुरुमुनि । बैस म्हणती कृपा करुनि । दाखवूं म्हणती श्रीपर्वत ॥१६॥
नयन झांकूनि पादुकेसी । दृढ धरीं गा वेगेंसी । ऐसें म्हणोनि तयासी । मनोवेगें घेऊनि गेले ॥१७॥
क्षण न लागतां श्रीगिरीसी । घेऊनि गेले भक्तासी । तीरीं बैसले पाताळगंगेसी । नयन उघडीं म्हणती त्यातें ॥१८॥
क्षणैक मात्र निद्रावस्था । म्हणतां झाला जागृता । अवलोकितां पर्वत दिसत । म्हणे स्वप्न किंवा सत्य ॥१९॥
श्रीगुरु म्हणती तयासी । कां गा भ्रांतपणें पाहसी । वेगें जावें दर्शनासी । क्षौर स्नान करुनियां ॥२०॥
श्रीगुरु ऐसे निरोप देतां । शीघ्र गेला स्नानाकरितां । तेथें देखिलीं मातापिता । भ्राता ग्रामलोक सकळिक ॥२१॥
ते पुसती तयासी । कवणें मार्गें आलासी । आमुची भेटी कां न घेसी । लपून येणें कोण धर्म ॥२२॥
विनवीतसे मातापित्यांसी । आम्ही निघालों आजि दोन प्रहरेंसी । एक घटिका लागली वाटेसी । आतां आलों गुरुसमागमें ॥२३॥
एक हांसती मिथ्या म्हणती । आम्हांसवेंचि आला लपत । ऐसें बडिवारें बोलत । अबद्ध म्हणती सकळ जन ॥२४॥
तो कोणासवें न बोले । शीघ्र स्नान क्षौर केलें । पुष्पें अक्षता बेलें । घेऊनि गेला पूजेसी ॥२५॥
पूजा करितां लिंगस्थानीं । देखता झाला श्रीगुरुमुनि । अति विस्मय करोनि । पूजा केली मनोभावें ॥२६॥
समस्त लोक पूजा करिती । श्रीगुरु सर्व पूजा घेती । तंतिक म्हणतसे चित्तीं । श्रीगुरुराज आपणचि शंकर ॥२७॥
ऐसा निर्धार करुनि । पाहिजे प्रसाद-फल खुणी । घेऊनि आला गुरुसंनिधानीं । एकचित्तें परियेसा ॥२८॥
श्रीगुरु पुसती तयासी । एधवां राहसी किंवा जासी । तंतिक विनवी स्वामियासी । एक देखिलें नवल आतां ॥२९॥
समस्त लोक जाऊनि । देवालयाभीतरीं बैसोनि । पूजा करिती तुमचे चरणीं । लिंग न देखों तुम्हीच तेथें ॥३०॥
श्रीगुरु तूं जवळीच असतां । इतुके दुरी कां कष्टती वृथा । लोक येताति बहुता । काय कारण या स्थाना ॥३१॥
तूं तरी केवळ परमेश्वर । दिसतोसि आम्हां नर । न कळे तुझा महिमा अपार । गौप्यरुपें गुरुनाथा ॥३२॥
सर्व जन मूढ होऊन । नेणती तुझें महिमान । कां हो येताति या स्थानीं । विस्तारोनि सांग मज ॥३३॥
श्रीगुरु म्हणती ऐक भक्ता । सर्वत्र ईश्वरपूर्णता । स्थानमहिमा असे ख्याता । जे अगम्य त्रिभुवनीं ॥३४॥
तंतिक म्हणे स्वामियासी । तूं तरी पूर्ण ब्रह्म होसी । स्थानमहिमा वानिसी । विस्तारुनि सांग आम्हां ॥३५॥
श्रीगुरु निरोपिती भक्तासी । येथील महिमा पुससी । सांगेन ऐक विस्तारेंसी । स्कंदपुराणीं असे कथा ॥३६॥
माघवद्य चतुर्दशी । अपार महिमा श्रीपर्वतासी । सांगेन ऐक तत्परेसी । श्रीगुरु म्हणती तंतिकातें ॥३७॥
पूर्वी ख्यात किरातदेशीं । 'विमर्षण' राजा परियेसीं । शूर असे पराक्रमेंसीं । समस्त शत्रु जिंकिले तेणें ॥३८॥
आणिक एक कुबुद्धि असे । पारधी करी बहुवसें । बलाढ्य स्थूळ बहु असे । चंचळ सकळ-स्त्रियारत ॥३९॥
सर्वमांस भक्षण करी । ग्राह्य अग्राह्य न विचारी । ऐसा वर्ते दुराचारी । ईश्वर पूजी भक्तिभावें ॥४०॥
नित्य पूजा करी अपार । शिवरात्रि आलिया हर्षनिर्भर । गीत नृत्य वाद्य परिकर । भक्तिपूर्वक करी पूजा ॥४१॥
आचार तरी बरवा नसे । शिवपूजा करी बहुवसें । पत्नी त्यासी एक असे । सुलक्षण नाम 'कुमुद्वती' ॥४२॥
सुशील सुगुण पतिव्रता । मनीं करी बहुत चिंता । पुरुष आपुला परद्वाररता । ईश्वरभक्ति करीतसे ॥४३॥
ऐसें क्रमितां एके दिवसीं । पुसों लागली आपुले पुरुषासी । म्हणे प्राणेश्वरा परियेसीं । विनंति एक असे माझी ॥४४॥
क्षमा करावी माझिया बोला । विस्तारोनि सांगावें सकळा । तुम्ही दुराचारी भक्षितां सकळां । परद्वार निरंतर ॥४५॥
तुम्हांला ईश्वरावरी । भक्ति उपजली कवणेपरी । सांगावें स्वामी सविस्तारीं । कोप न करावा प्राणनाथा ॥४६॥
राजा म्हणे स्त्रियेसी । बरवें पुसिलें आम्हांसी । ज्ञान झालें आतां मानसीं । पूर्व जन्म सांगेन माझा ॥४७॥
पूर्वी पंपानगरीं आपण । श्वानयोनीं जन्मोन जाण । होतों तेथें काळ क्रमोन । शिवरात्रि आली एके दिवसीं ॥४८॥
त्या नगरीं होतें एक शिवालय । समस्त लोक आले पूजावया । आपणही गेलों हिंडावया । भक्षावया कांहीं मिळेल म्हणोनि ॥४९॥
उत्साहें लोक पूजा करिती । नाना वाजंतरें वाजती । गर्भगृहीं प्रदक्षिणा करिती । धरुनि आरति सकळिक ॥५०॥
आपण गेलों द्वारांत । विनोदें पाहूं म्हणत । मज देखोनि आले धांवत । काष्ठ पाषाण घेवोनियां ॥५१॥
आपण पौळीमध्यें होतों पळत । द्वार घातलें मारूं म्हणत । धरा धरा मारा म्हणोनि बोलत । मारुं लागले पाषाणीं ॥५२॥
वाट नाहीं बाहेर जावयासी । अभिलाष असे जीवासी । पळतसें देवालयभीतरेसी । मार्ग नाहीं कोठें देखा ॥५३॥
बाहेर जाईन म्हणत । द्वाराकडे मागुती येत । सवेंचि लोक पाठीं लागत । सव्य प्रदक्षिणा पळतसें ॥५४॥
लपावया ठाव नाहीं देखा । वेष्टिलों पौळीं दुर्गासरिखा । पाठी लागले सकळिका । पुन्हा पौळींत पळे तैसाचि ॥५५॥
उच्छिष्ट कांहीं मिळेल म्हणोनि । देउळांत गेलों भामिनी । काकुळती बहु मनीं । प्राण वांचेल म्हणोनियां ॥५६॥
ऐसा तीन वेळां पळालों । मारतील म्हणोनि बहु भ्यालों । मग अंतरगृहीं निघालों । पूजा देखिली तेथ शिवाची ॥५७॥
द्वार धरोनि समस्त लोक । शस्त्रें मारिलें मज ऐक । ओढोनि टाकिती सकळिक । शिवालयाबाहेरी ॥५८॥
मज पुण्य घडलें प्रदक्षिणीं । पूजा देखिली नयनीं । तेणें पुण्यें राजा होउनि । उपजलों ऐक प्राणेश्वरी ॥५९॥
शिवरात्रि होती ते दिवसीं । न मिळे उच्छिष्ट भुक्तीसी । प्राण त्यजिला उपवासी । तेंही पुण्य मज घडलें ॥६०॥
आणिक एक पुण्य घडलें । दीपमाळीस दीपक उजळले । ते म्यां डोळां देखिले । प्राण त्यजिला शिवद्वारीं ॥६१॥
तेणें पुण्यें झालें ज्ञान । ऐक शिवरात्रीचें महिमान ।; म्हणसी तूं दुराचारी म्हणोनि । त्याचा संदेह सांगेन ॥६२॥
पूर्वजन्म माझा श्वान । त्याचा स्वभाव सर्वभक्षण । सर्वां ठायीं त्याची वासना । तेचि स्वभाव मज असती ॥६३॥
ऐसें स्त्रियेसी सांगितलें । पुन्हा प्रश्न तिणें केले । म्हणे स्वामी जें सांगितलें । आपुला जन्म पुरातन ॥६४॥
तुम्ही असा सर्वज्ञानी । माझा जन्म सांगा विस्तारुनि । म्हणोनि लागतसे चरणीं । कृपा करीं गा प्राणेश्वरा ॥६५॥
ऐक वपुषे ज्ञान सती । तुझा पूर्व जन्म कपोती । करीत होतीस उदरपूर्ती । एके दिवसीं अवधारीं ॥६६॥
पडिला होता मांसगोळा । तो तुवां चोंचीनें धरिला कवळा । उडत होतीस आकाशमंडळा । तें दुरुनि देखिलें घारीनें ॥६७॥
कवळ घेईन म्हणोनि । घार आली धांवोनि । तूं गेलीस वो पळोनि । महारण्य क्रमीत ऐका ॥६८॥
पाठीं लागली ते घारी । मागें पुढें न विचारी । तूं पळालीस ते अवसरीं । श्रीपर्वत-गिरीवरी ॥६९॥

दुरोनि आलीस धांवत । प्राण होता कंठगत । श्रमोनि शिखरीं तूं बैसत । घारीं येऊनि मारिलें चोंचीं ॥७१॥
घेऊनि गेली मांस-कवळें । तुझें देह पंचत्व पावलें । प्रदक्षिणा-पुण्य फळलें । झालीस तुवां राजपत्नी ॥७२॥
इतुकिया अवसरीं । पुनः पतीस प्रश्न करी । आतां तुमच्या निरोपावरी । ईश्वरपूजा करीन ॥७३॥

पुढें मज काय होईल । तुम्हीं कवण स्थानीं असाल । तें विस्तारावें प्राणेश्वरा निर्मळ । आत्मपति राजेंद्रा ॥७४॥
राजा सांगे सतीसी । पुढील जन्म कन पुससी । आपण राजा सिंधुदेशीं । जन्म पावेन अवधारीं ॥७५॥
माझी भार्या तूंचि होसी । जन्म पावसी सृंजयदेशीं । तेथील राजा पवित्रवंशी । त्याची कन्या होसील ॥७६॥
तिसरा जन्म आपणासी । राजा होईन सौराष्ट्रदेशीं । तूं उपजसी कलिंगराजवंशीं । माझी पत्नी होसील ॥७७॥
चवथा जन्म आपणासी । राजा होईन गांधारदेशीं । तूं उपजसी मागध कुळेसी । तैंही माझी प्राणेश्वरी ॥७८॥
पांचवा जन्म आपणासी । राजा होईल अवंतदेशीं । तूं दाशार्हराजकुळीं जन्मसी । माझी भार्या होसील तूं ॥७९॥
सहावा जन्म आपणासी । आनर्त नाम राजा परियेसीं । यायातिकन्या तूं होसी । तैंही माझी प्राणेश्वरी ॥८०॥
सातवा जन्म आपणासी । राजा होईन पांडयदेशीं । रुप लावण्य मजसरसीं । नोहे कवण संसारीं ॥८१॥
ज्ञानी सर्वगुणी होईन । सूर्यकांति ऐसें वदन । जैसा रुपें असे मदन । नाम माझें 'पद्मवर्ण' ॥८२॥
तूं जन्मसी वैदर्भकुळीं । रुपसौंदर्यें आगळी । जैसी सुवर्णाची पुतळी । चंद्रासारिखें मुखकमळ ॥८३॥
'वसुमती' असें नांव पावसी । तुज वरीन स्वयंवरेंसीं । दमयंती नळा जैसी । स्वयंवर होईल तुज मज ॥८४॥
राज्य करीन बहुत दिवस । यज्ञ करीन असमसाहस । जिंकीन समस्त देशांस । मंत्रशास्त्र शिकेन बहु ॥८५॥
देवद्विजार्चन करीन । नाना अग्रहार दान देईन । ऐशापरी वृद्धाप्य होऊन । राज्यीं स्थापीन पुत्रासी ॥८६॥
आपण चवथा आश्रम घेईन । अगस्त्यऋषीपाशीं जाईन । ब्रह्मज्ञानोपदेश शिकेन । अंतकाळ होय तंव ॥८७॥देहावसान होतां । तुज घेईन सांगाता । दिव्य विमानीं बैसोनि तत्त्वता । स्वर्गाप्रती जाऊं बळें ॥८८॥
ईश्वरपूजेची महिमा । शिवरात्रिव्रत श्रीशैल्य अनुपम्या । म्हणोनि राजा स्त्री घेऊनि संगमा । यात्रा करी शिवरात्री ॥८९॥
श्रीगुरु म्हणती तंतिकासी । शिवरात्री-श्रीपर्वत-महिमा ऐसी । ऐक तो श्वान परियेसीं । सप्तजन्मीं राजा झाला ॥९०॥
अंतीं पावला स्वर्गलोक । पर्वतमहिमा ऐसा ऐक । तुज जाहलें गुरुमुख । ईश्वरपूजा करीं बरवी ॥९१॥
ग्रामीं असे कल्लेश्वर । गाणगाग्रामीं भीमातीर । पूजा करीं गा निरंतर । मल्लिकार्जुनसमान ॥९२॥
संगमेश्वर संगमासी । पूजा करीं अहर्निशीं । मल्लिकार्जुन तोचि परियेसीं । न धरीं संदेह मनांत ॥९३॥
तंतिक म्हणे स्वामियासी । स्वामी तूं मज चाळविसी । पूजेसि गेलों मल्लिकार्जुनासी । लिंगस्थानीं तुज देखिलें ॥९४॥
सर्वां ठायीं तूंचि एक । झाला असंसी व्यापक । कल्लेश्वर संगमनायक । एकेक सांगसी आम्हांपुढें ॥९५॥
ऐकोनि श्रीगुरु हांसती । ये रे पादुका धरीं म्हणती । नयन त्याचे झांकिती । संगमा आले तात्काळीं ॥९६॥
इतुकिया अवसरीं । मागें गाणगापुरीं । श्रीगुरुसी पाहती गंगातीरीं । कोठें गेले म्हणोनियां ॥९७॥

एक म्हणती संगमीं होता । एक म्हणती आम्हीं आलों आतां । कोठें गेले पहा म्हणतां । चुकर होती भक्तजन ॥९८॥
श्रीगुरु आले संगमासी । तंतिकास पाठविती मठासी । बोलावावया शिष्यांसी । आपण राहिले संगमांत ॥९९॥
तंतिक आला गांवांत । लोक समस्त हांसत । क्षौर कां रे केलें म्हणत । तंतिक म्हणे श्रीपर्वता गेलों होतों ॥१००॥
दवणा प्रसाद विभूति । नानापरींचे हार दाखविती । लोक ऐसा विस्मय करिती । म्हणती दोनप्रहरीं घरीं होता ॥१॥
एक म्हणती सत्य मिथ्या । त्यासी म्हणती सांग रे सत्या । तंतिक म्हणे सर्वे गुरुनाथा । गेलों होतों वायुवेगें ॥२॥
श्रीगुरु आले संगमासी । मज पाठविलें मठासी । बोलाविलें शिष्यांसी । राहूं पाहती आजि संगमीं ॥३॥
एक म्हणती होईल सत्य । मूर्ख म्हणती नव्हे, मिथ्य ।; तंतिक गेला त्वरित । शिष्यवर्गांसी जाणविलें ॥४॥
सांगितला सकळ वृत्तांत । समस्त गेले संगमा त्वरित । पूजा जाहली संगमीं बहुत । सिद्ध म्हणे नामधारकासी ॥५॥
मिथ्या म्हणती जे लोक । त्यांसी होईल कुंभीपाक । पंधरा दिवसीं ऐक । यात्रालोक गांवा आले ॥६॥
मग पुसती तयांसी । तेहीं सांगितलें भरंवसीं । आनंद झाला भक्तांसी । म्हणे सरस्वती-गंगाधर ॥७॥
सिद्धें सांगितलें नामधारकासी । तें मी सांगतसें परियेसीं । श्रीगुरुमहिमा अपारेंसी । अमृत सेवितों निरंतर ॥१०८॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे श्रीशैलशिवरात्रिमहिमावर्णनं नाम त्रिचत्वारिंशोऽध्यायः
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥
(ओवीसंख्या १०८)

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
नामधारक म्हणे सिद्धमुनि । श्रीगुरुचरित्र तुम्ही देखिलें नयनीं । तुमचें भाग्य काय वानूं वदनीं । परब्रह्म देखिलें असे ॥१॥
तुमचेनि प्रसादेंसीं । अमृतपान झालें आम्हांसी । आतां कष्ट आम्हां कायसी । सकळाभीष्ट लाधलों ॥२॥
तुम्ही भेटलेति मज तारका । दैन्य गेलें सकळ दुःख । सर्वाभीष्ट लाधलों सुख । गुरुचरित्र ऐकतां ॥३॥
मागें कथानक सांगितलें । श्रीगुरु संगमीं राहिले । पुढें काय अपूर्व वर्तलें । निरोपावें दातारा ॥४॥
सिद्ध सांगे नामधारकासी । ऐक वत्सा विस्तारेंसीं । विचित्र झालें येरे दिवसीं । एकचित्तें परियेसा ॥५॥
'नंदी' नाम एक ब्राह्मण । सर्वांगीं कुष्ट श्वेतवर्ण । तुळजापुरा जाऊन । वर्षें तीन आराधिलें ॥६॥
तीन संवत्सर उपवास । द्विज कष्टला बहुवस । निरोप झाला सायासें । चंदलापरमेश्वरीजवळी जाणें ॥७॥
जगदंबेचा निरोप घेऊनि । आला चंदलापरमेश्वरीस्थानीं । मास सात पुरश्चरणीं । पुनरपि केले उपवास ॥८॥
नानापरी कष्टतां । स्वप्न जाहलें अवचिता । तुवां जावें त्वरिता । गाणगग्रामस्थानासी ॥९॥
तेथें असती श्रीगुरु । त्रयमूर्तीचा अवतारु । वेष धरिला असे नरु । तेथें होसील उत्तमांगी ॥१०॥
ऐसे निरोप त्यासी जाहले । विप्र म्हणे भलें केलें । मास सात कां चुकर केलें । जरी तुझे हातीं नोहेचि ॥११॥
जगन्माता तुळजा भवानी । तिचा निरोप घेऊनि । आलों तुजपाशीं ठाकोनि । तूं दैवत म्हणोनियां ॥१२॥
दैवतपण ठाउकें जाहलें । आम्हांसी निरोप दिधलें । मनुष्यापाशीं जा म्हणितलें । तुझे हातीं नोहेचि कांहीं ॥१३॥
तूं जगद्दैवत जगदंबा म्हणविसी । आम्हां मनुष्यापाशीं पाठविसी । नांव जाहलें दैवतपणासी । भाग्य माझें म्हणतसे ॥१४॥
मनुष्यापाशीं जा म्हणावयासी । लाज नये कैसी तुम्हांसी । ओळख जाहली दैवतपणासी । उपवासी सात महिने ॥१५॥
पहिलेंचि जरी निरोप देत । इतुके कष्ट आम्हां न होत । दुराशा केली मी परदैवत । म्हणोनि, दुःख करी नानापरी ॥१६॥
ऐसें अनेकपरीनें । दुःख करीतसे तो ब्राह्मण । पुन्हा मागुती पुरश्चरण । करीन म्हणे तो द्विजवर ॥१७॥
म्हणे मज बरवें होणें । अथवा आपुला प्राण देणें । ऐसें बोलोनि निर्वाणें । विप्र धरणें बैसला ॥१८॥
पुनरपि स्वप्न तयासी । तैसेंचि होय परियेसीं । आणिक समस्त भोपियांसी । तेणेंचिपरी स्वप्न होय ॥१९॥
सकळ भोपे म्हणती तयासी । आजि स्वप्न झालें आम्हांसी । छळण न करीं गा देवीसी । निरोपासरसा जाईं वेगीं ॥२०॥
तूं तरी आतां नव जासी । आम्हां निरोप झाला ऐसी । बाहेर घालूं तुम्हांसी । देवळांत येऊं नेदूं ॥२१॥
इतुकें जाहलियावरी । पारणें केलें द्विजवरीं । पूजा करी नानापरी । निरोप घेऊनि निघाला ॥२२॥
गाणगाग्रामासी आला । मठीं जाऊनि पुसों लागला । भक्तजन सांगती त्याला । संगमीं आहेत गुरुमूर्ति ॥२३॥
भक्त म्हणती तयासी । श्रीगुरु येतील पारणेसी । काल शिवरात्री-उपवासी । आतां येतील परियेसीं ॥२४॥
इतुकिया अवसरीं । श्रीगुरु आले साक्षात्कारी । ग्रामलोक द्विजातें वारी । राहें दूरी नको सन्मुख ॥२५॥
श्रीगुरु आले मठांत । द्विज उभा होता चिंतीत । भक्तजन सांगती मात । विप्र एक आला असे ॥२६॥
सर्वांगीं असे श्वेत । स्वामिदर्शना आलों म्हणत । श्रीगुरु म्हणती आपण जाणत । संदेहरुपें आला असे ॥२७॥
म्हणती बोलावा मठांत । भक्त गेले धांवत । तया द्विजातें पाचारीत । आला विप्र आंगणा ॥२८॥
दुरोनि देखिलें श्रीगुरुसी । नमन करीत लोळे भूमीसी । श्रीगुरु म्हणती तयासी । संदेहरुपें आलासि कां ॥२९॥
देवीपासूनि मनुष्यापाशीं । येणें झालें काय कार्येंसी । संदेह करोनि मानसीं । कैसा आलासि द्विजवरा ॥३०॥
ऐसें वचन ऐकोनि । आपुले मनींचें जाणिलें म्हणोनि । क्षमा करीं गा स्वामी म्हणोनि । लोटांगणीं येतसे ॥३१॥
म्हणे स्वामी आपण तमांध । तुझे दर्शनें झालों सुबुद्ध । अज्ञानें वेष्टिलों होतों मंद । नेणें सोय परब्रह्मा ॥३२॥
तूं साक्षात् वस्तु म्हणोनि । नेणों आपण तमोगुणी । आजि माझा सुदिन । दर्शनें झालों पुनीत ॥३३॥
पापकर्मी पापी आपण । पापात्मा नेणें निज खूण । पापें संभवलों पूर्ण । आलों शरण तुजपाशीं ॥३४॥
तूं भक्तजनां आधार । शरणागता वज्रपंजर । ब्रीद वानिती सचराचर । श्रीगुरु नृसिंहसरस्वतीचें ॥३५॥
आजि माझें कुकर्म गेलें । परब्रह्मचरण देखिलें । मनोरथ माझे पुरले । कृपासागरा यतिराया ॥३६॥
तूं भक्तजनाची कामधेनु । मनुष्यवेषीं आलासि अवतरोनु । तुझा पार जाणे कवणु । त्रैमूर्ति तूंचि होसी ॥३७॥
जैसी सगरांवरी गंगा । पावन करावया आली जगा । तैसा तूं भक्तसेवकवर्गा । तारावया अवतरलासी ॥३८॥
का अहिल्या झाली पाषाण । दिव्यदेही झाली लागतां चरण । तैसें मज आजि निर्गुण । झालें स्वामी गुरुनाथा ॥३९॥
व्रतबंध विवाह झालियावरी । व्याधि उद्भवली आपुले शरीरीं । स्त्री राहिली माहेरीं । स्पर्शों नये शरीर म्हणे ॥४०॥
आपुले असती मातापिता । सकळ म्हणती जाईं परता । दुःख जाहलें अपरिमिता । संसार त्यजूनि निघालों ॥४१॥
गेलों होतों तुळजापुरा । उपवास केले अपारा । मज म्हणती तूं पापभारा । नव्हे तुज बरवें आतां ॥४२॥
निरोप दे जा सन्नती । जेथें चंदलापरमेश्वरी वसती । तेथें होईल निवृत्ति । पाप जाईल म्हणोनि ॥४३॥
तेथेंही कष्ट केले बहुत । नव्हेचि कांही, देवी उबगत । निरोप झाला जा म्हणत । कृपामूर्ति तुजपाशीं ॥४४॥
ऐसें माझें दैव हीन । उबगताति देव आपण । मज देखोनि निर्वाण । बाहेर घाला म्हणताति ॥४५॥
देवता आपण उबगताति । मनुष्य कैसे मज देखती । निर्वाणीं आलों तुम्हांप्रती । निर्धार केला मरणाचा ॥४६॥
ऐसा पापी असोनि आपण । काय करावें अंग हीन । तोंड न पाहती कुष्ठी म्हणोन । मरण बरवें यापरतें ॥४७॥
आतां असे एक विनंति । होय अथवा नव्हे निश्चितीं । शीघ्र निरोपावें यति । दैवतें चाळविती आशाबद्धें ॥४८॥
मज चाड नाहीं शरीराची । प्राण देईन सुखेंचि । तूं रक्षक माउली शरणागताची । निरोपावें दातारा ॥४९॥
ऐसें करुणावचन ऐकोन । श्रीगुरु बोलती हांसोन । सोमनाथ ब्राह्मण बोलावून । निरोप देती न्याया संगमासी ॥५०॥
बरवा संकल्प सांगोनि । स्नान करवा षट्कूळभुवनीं । अश्वत्थप्रदक्षिणा करवूनि । वस्त्रें टाका दूर त्याचीं ॥५१॥
नवीं वस्त्रें द्या यासी । शीघ्र आणा पारणेसी । ऐसा निरोप देती त्यांसी । दोघे गेले झडकरी ॥५२॥
स्नान करुनि बाहेर आला । शरीरवर्ण पालटला । अश्वत्थप्रदक्षिणा करूं लागला । सु-वर्ण जाहलें सर्वांग ॥५३॥
वस्त्रें देती ब्राह्मणासी । जीर्ण वस्त्रें टाकिती दूरेंसी । जेथें टाकिती ते भूमीसी । क्षार भूमि होय त्वरित ॥५४॥
सांगातें घेऊनि द्विजासी । सोमनाथ आला मठासी । चरणीं घातलें तयासी । लोक सर्व विस्मित ॥५५॥
नंदीनामें केला नमस्कार । संतोषें स्तोत्र करी अपार । हर्षें जाहला निर्भर । लोळतसे पादुकावरी ॥५६॥
श्रीगुरु म्हणती तयासी । तुझी कामना झाली परियेसीं । सर्वांग आहे कैसी । अवलोकोनि पाहें म्हणती ॥५७॥
पाहतां सर्वांग बरवें जाहलें । तावन्मात्र जंघेसी राहिलें । पाहतां मन त्याचें भ्यालें । म्हणे स्वामी असे थोडें ॥५८॥
तुझी कृपादृष्टि झाली असतां । थोडें राहिलें म्हणे केवीं आतां । करीतसे दंडवता । कृपा करीं गा परमात्मा ॥५९॥
श्रीगुरुमूर्ति निरोपिती तयासी । तूं संशय करोनि आलासी । मनुष्य काय करील म्हणोनि मानसीं । तेणें गुणें राहिलेंथोडें ॥६०॥
त्यासी असे एक प्रतीकार । तुवां कवित्व सांगावें अपार । आमुची स्तुति करावी निरंतर । बरवें होईल तुज मग ॥६१॥
नंदीनामा म्हणे स्वामीसी । लिखित नेणें वाचायासी । कैसें करुं मी कवित्वासी । मंदमति असे आपण ॥६२॥
काय जाणें कवित्वस्थिति । मज नाहीं काव्यव्युत्पत्ति । स्वामी ऐसा निरोप देती । म्हणोनि चरणीं लागला ॥६३॥
श्रीगुरु म्हणती द्विजासी । मुख उघडीं काढीं जिव्हेसी । विभूति शिंपिती तयासी । ज्ञान उपजलें ब्राह्मणा ॥६४॥
चरणांवरी ठेविला माथा । उभा ठेला स्तोत्र करितां । म्हणे स्वामी मी नेणता । सेवेसी नव्हे अराणुक ॥६५॥
मायापाशीं वेष्टोनि । बुडत होतों संसारगहनीं । आठवण न करीं कधीं मनीं । तुझे चरणा विसरलों ॥६६॥
संसार-सागर मायाजाळ । योनीं जन्मोनि चौऱ्यांशीं लक्षकुळ । आठवण नव्हे तुझें नाम केवळ । मंदमति जाहली मज ॥६७॥
स्वेदज अंडज उद्भिज्जेंसी । जन्मा आलों पशुयोनीसी । तव ज्ञान कैंचें आम्हांसी । स्थावर जंगम जैं होतों ॥६८॥
नानायोनींत मनुष्य विशेष । शूद्रादि याती बहवस । जधीं होतों त्या जन्मास । काय जाणें तुझी सोय ॥६९॥

मातेचें शोणित पित्याचें रेत । संपर्क जहाला जननीगर्भांत । जैसें सुवर्ण मुशीं असे कढत । दिवस पांच बुद्‌बुदाकार ॥७१॥
पंधरा दिवसा होय स्थिर । एक रस होऊनि निर्धार । तधीं मी काय जाणें गुरु । नाहीं पंचतत्त्वें मज ॥७२॥
मासें एक पिंड होय । द्वय मासीं शिर पाय । तिसरे मासीं सर्व अवयव । नवद्वारें झालीं मग ॥७३॥
पंचतत्त्वे होतीं एक । वायु-आप-पृथ्वी-तेज-ख । प्राण आला तात्काळिक । तधीं स्मरण कैंचें मज ॥७४॥
पांचवे मासीं त्वचा रोम । सहावे मासीं उच्छ्वास आम्हां । सातवे मासीं श्रोत्र जिव्हा । मेद मज्जा दृढ जाहली ॥७५॥
ऐसे नव मास कष्टत । होतों जननिये-गर्भांत । रुधिर-विष्ठा-मूत्रांत । कष्टलों भारी स्वामिया ॥७६॥
माता भक्षी उष्ण क्षार । तेणें तीक्ष्णें कष्टलों अपार । पडे लोळे अनेक प्रकार । दुःख तेव्हां सांगूं कोणा ॥७७॥
मना आलें भक्षण करीं । दुःख होय मज अपारी । ऐसें नवमासवरी । मातागर्भीं कष्टलों ॥७८॥
तधीं कैचें तुझें स्मरण । वेष्टिलों होतों मायावरणें । स्मरलों नाहीं तुझे चरण । मग योनिमुखीं जन्मलों ॥७९॥
उपजतांचि आपणासी । आयुष्य लिहिलें लल्लाटेसी । अर्ध गेलें वृथा निशीं । रात्रीं निद्रा मानवा ॥८०॥
उरले आयुष्यांत देखा । तीन भाग केले विशेखा । बाल यौवन वृद्धाप्य ऐका । निर्माण झाले तये वेळीं ॥८१॥
बाळपणीं आपणासी । कष्ट झाले असमसाहसी । मज घालिती पाळणेसी । मूळमूत्रांत लोळतसें ॥८२॥
बाळपणींचें दुःख आठवितां । शोक होय मज अपरिमिता । काय सांगूं गुरुनाथा । नाना आपदा भोगिल्या ॥८३॥
शयनस्थानीं मलमूत्रांत । निरंतर असें लोळत । आपली विष्ठा आपण खात । अज्ञानतिमिरें वेष्टिलों ॥८४॥
एकादे समयीं आपणासी । पोटशूळ उठे बहुवसीं । रोदन करितां परियेसीं । स्तनपान मला करविती ॥८५॥
क्षुधाक्रांत होय बहुत । मज म्हणती पोट दुखत । अंगुली घालूनि मुखांत । वोखद मज पाजविती ॥८६॥
ऐसें क्षुधेनें पीडितां बहुत । मज घालिती पाळण्यांत । हालविती पर्यंदें गात । क्षुधाक्रांत रुदन करीं ॥८७॥
म्हणती रुदन करितो बाळ । मुखीं शिंपिती कांजीतेल । रक्षा बांधिती मंत्रें केवळ । नेणे माता भूक माझी ॥८८॥
पाळण्यांत घालिती कौतुकें । प्रावरणांत असतां वृश्चिकें । मारीतसे पाठीं डंक । प्रलाप मी करीतसें ॥८९॥
आणिक पाळणा हालविती । राहें राहें उगा म्हणती । स्तनपान मागुती करविती । वृश्चिकविष नेणतां ॥९०॥
तेणें दुःखें स्तनपान न करीं । मागुती घालिती पाळण्याभीतरीं । वृश्चिक मज डंक मारी । प्राणांतिक मज होय ॥९१॥
माता खाय अंबट तिखट । स्तनपानें मज अपार वोखट । अति मधुर क्षीर अंबट । तेणें खोकतसें सर्वकाळीं ॥९२॥
नाना औषधें मज देती । तेणें माझे डोळे दुखती । कुंकुम लवणक्षार भरिती । डोळे आले म्हणोनियां ॥९३॥
ऐसे कष्ट धुरंधर । बाळपणीं जाहले अपार । वाढलों कष्ट भोगीत फार । वर्षें बारा लोटलीं ॥९४॥
तधीं तुझे चरणस्मरणा । मज कैंचें गा देवराणा । कष्टलों मी याचिगुणा । पूर्वजन्म नाठवेचि ॥९५॥
दोन भाग उरले आपणासी । मदनें व्यापिलें शरीरासी । जैसा पतंग दीपासी । भ्रमिजेत उन्मत्त ॥९६॥
नेणें मी गुरु माता पिता । समस्तांतें करी निंदा वार्ता । परस्त्रीवरी करीं चिंता । कुळाकुळ न विचारीं ॥९७॥
ब्राह्मणातें निंदा करी । वृद्धाच्या चेष्टा करी अपारी । मदें व्यापिलें असे भारी । नाठवती तुझे चरण मज ॥९८॥
मांसाचे कवळाकारणें । मत्स्य जाय जेवीं प्राणें । तैसा आपण मदनबाणें । वश्य जाहलों इंद्रियांसी ॥९९॥
नानावर्ण स्त्रियां भोगिलें । परद्रव्य अपहारिलें । सिद्धमहंतांतें निंदिलें । दृष्टीं न दिसे माझे कांहीं ॥१००॥
ऐसा मदनें व्यापूनि । मागें पुढें न पाहें नयनीं । पतंग जाय धांवोनि । दीपावरी पडे जैसा ॥१॥
ऐसा वेष्टोनि मदनबाणीं । न ऐके सुबुद्धि कधीं श्रवणीं । सोय न धरीं तुझे चरणीं । यौवनपण गेलें ऐसें ॥२॥
मग वृद्धाप्य आले शरीरासी । उबग होय स्त्रीपुत्रांसी । श्वासोच्छ्वास कफेसीं । सदा खोकला होय मज ॥३॥
अवयव सर्वही गलित होती । केश पांढरे होतीं त्वरिती । दंतहीन, श्रवणें न ऐकिजेति । दृष्टीं न दिसे, नासिक गळतें ॥४॥
ऐसा नाना रोगें कष्टतां । तुमची सेवा कधीं घडणें आतां । स्वामी तारका श्रीगुरुनाथा । संसारसागरा कडे करीं ॥५॥
ऐसा मंदमति आपण । न ओळखेचि तुझे चरण । तूंचि केवळ नारायण । अवतार तूं श्रीगुरुमूर्ति ॥६॥
तूंचि विश्वाचा तारक । धरोनियां नरवेष । त्रयमूर्ति तूंचि एक । परब्रह्म श्रीगुरुनाथा ॥७॥
दिवांध नेणती तुज लोक । तूंचि विश्वाचा पाळक । मी किंकर तुझा सेवक । संसार-धुरंधरीं तारीं मज ॥८॥
ऐसें नानापरी स्तोत्र । करीतसे नंदीनामा पवित्र । जन पाहताति विचित्र । त्यांसी म्हणे नंदीनामा ॥९॥
ऐका हो जन समस्त । श्रीगुरू जाणा परब्रह्मवस्तु । आपण पाप केलें बहुत । दर्शनमात्रें सर्व गलें ॥११०॥
जैसें तृणाचे बणवीसी । अग्नि लागतां क्षणें कैसी । गुरुकृपा होय ज्यासी । पाप जळे तयापरी ॥११॥
'चरणं पवित्रं विततं पुराणं' । ऐसें बोले वेद आपण । सेवा सेवा हो गुरुचरण । गुरुवेगळा देव नाहीं ॥१२॥
ब्रह्मदेवें आपण देखा । दुष्टाक्षरें लिहिलीं कपाळिका । तैसेही होय निका । श्रीगुरुचरणीं लागतां ॥१३॥
जवळी असतां निधान । कां नोळखा हो तुम्ही जन । नृसिंहसरस्वती कामधेनु । भजा भजा हो सकळिक ॥१४॥
इहसौख्य ज्ञान ऐका । अंतीं पावे वैकुंठलोका । संदेह नाहीं होईल सुखा । सत्य जाणा हो बोल माझा ॥१५॥
नंदीनामा स्तोत्र करितां । श्रीगुरु संतोषी अत्यंता । भक्तांसी ऐसा निरोप देत । 'कवीश्वर' म्हणा यासी ॥१६॥
कवि 'बसवरस' नाम तयासी । निर्धार केला आम्हीं भरंवसीं । ऐसें कृपेनें बोलती त्यासी । ऐकोनि चरणीं लागला ॥१७॥
जें कां शेष होतें जंघेवरी । तें तात्काळ गेलें दूरी । नंदीनामा आनंद करी । राहिला सेवा करीत देखा ॥१८॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । श्रीगुरुचरित्र ऐसें परियेसीं । कथा करीत कवि बसवरसी । श्रीगुरुसेवेसी राहिला ॥१९॥
नामधारक म्हणे सिद्धमुनि । दुसरा कवि 'नरहरि' म्हणोनि । तो केवीं झाला शिष्य सुगुणी । कवेश्वर भक्त जाहला ॥१२०॥
तें विस्तारोनि आम्हांसी । सांगा स्वामी कृपेंसी । वांछा असे मानसीं । गुरुचरित्र ऐकावें ॥२१॥
म्हणे सरस्वती-गंगाधर । पुढील कथेचा विस्तार । ऐकतां होय मनोहर । नामस्मरण कामधेनु ॥१२२॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे द्विजकुष्टपरिहारो नाम चतुश्चत्वारिंशोऽध्यायः ॥४४॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥
(ओवीसंख्या १२२)

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
नामधारक विनवी सिद्धासी । मागें कथा निरोपिलीसी । नंदीनामा कवि ऐसी । दुसरा आणिक आला म्हणोनि ॥१॥
कवणेंपरी झाला शिष्य । तें सांगावें जी आम्हांस । विस्तार करुनि आदिअंतास । कृपा करुनि दातारा ॥२॥
सिद्ध म्हणे नामधारका । सांगों तुतें कथा ऐका । आश्चर्य झालें कवतुका । श्रीगुरुचरित्र अति गोड ॥३॥
गाणगापुरीं असतां गुरु । ख्याती झाली अपरांपरु । लोक येती थोरथोरु । भक्त बहुत जाहले ॥४॥
नंदीनामा कवि होता । कवित्व केलें अपरिमिता । समस्त लोक शिकती अमृता । प्रकाश झाला चहूं राष्ट्रीं ॥५॥
ऐसें असतां एके दिवसीं देखा । श्रीगुरुसी नेलें भक्तें एका । आपुले घरीं शोभनदायका । म्हणोनि नेलें आपुले ग्रामा ॥६॥
हिपरगी म्हणिजे ग्रामासी । नेलें आमुचे श्रीगुरुसी । पूजा केली तेथें बहुवसी । समारंभ थोर जाहला ॥७॥
तया ग्रामीं शिवालय एक । नाम 'कल्लेश्वर' लिंग ऐक । जागृत स्थान प्रख्यात निक । तेथें एक द्विजवर सेवा करी ॥८॥
तया नाम 'नरहरी' । लिंगसेवा बहु करी । आपण असे कवीश्वरी । नित्य करी पांच कवित्वें ॥९॥
कल्लेश्वरावांचूनि । आणिक नाणी कदा वचनीं । एकचित्तें एकमनीं । शिवसेवा करीतसे ॥१०॥
समस्त लोक त्यासी म्हणती । तुझे कवित्वाची असे ख्याति । श्रीगुरुसी कवित्वावरी प्रीति । गुरुस्मरण करीं तूं कांहीं ॥११॥
त्यांसी म्हणे तो नर । कल्लेश्वरासी विकिलें जिव्हार । अन्यत्र देव अपार । नरस्तुति मी न करीं ॥१२॥
ऐसें बोलोनियां आपण । गेला देवपूजेकारण । पूजा करितां तत्क्षण । निद्रा आली तया द्विजा ॥१३॥
नित्य पूजा करुनि आपण । कवित्व करी पार्वतीरमणा । ते दिवसीं अपरिमाण । निद्रा आली तया देखा ॥१४॥
निद्रा केली देवळांत । देखता जाहला स्वप्नांत । लिंगावरी श्रीगुरु बैसत । आपण पूजा करीतसे ॥१५॥
लिंग न दिसे श्रीगुरु असे । आपणासी पुसती हर्षें । नरावरी तुझी भक्ति नसे । कां गा आमुतें पूजितोसि ॥१६॥
षोडशोपचारेंसीं आपण । पूजा करी स्थिर मनीं । ऐसें देखोनियां स्वप्न । जागृत झाला तो द्विज ॥१७॥
विस्मय करी आपुले मनीं । म्हणे नरसिंहसरस्वती शिवमुनि । आला असे अवतरोनि । आपण निंदा त्याची केली ॥१८॥
हाचि होय सद्गुरु । त्रयमूर्तींचा अवतारु । भेट घ्यावी आतां निर्धारु । म्हणूनि आला श्रीगुरुपाशीं ॥१९॥
आला विप्र लोटांगणेंसीं । येऊनि लागला चरणासी । कृपा करीं गा अज्ञानासी । नेणों तुझें स्वरुप आपण ॥२०॥
प्रपंचमाया वेष्टोनि । नोळखें आपण अज्ञानी । तूंचि साक्षात् शिवमुनि । निर्धार जाहला आजि मज ॥२१॥
कल्लेश्वर कर्पूरगौरु । तूंचि होसी जगद्गुरु । माझें मन झालें स्थिरु । तुझे चरणीं विनटलों ॥२२॥
तूंचि विश्वाचा आधारु । शरणागता वज्रपंजरु । चरणकमळ वास भ्रमरु । ठाकोनि आलों अमृत घ्यावया ॥२३॥
जवळी असतां निधानु । कां हिंडावें रानोरानु । घरा आलिया कामधेनु । दैन्य काय आम्हांसी ॥२४॥
पूर्वीं समस्त ऋषि देखा । तप करिती सहस्त्र वर्षें निका । तूं न पवसी एकएका । अनेक कष्ट करिताति ॥२५॥
न करितां तपानुष्ठान । आम्हां भेटलासि तूं निधान । झाली आमुची मनकामना । कल्लेश्वर लिंग प्रसन्न झालें ॥२६॥
तूंचि संत्य कल्लेश्वरु । ऐसा माझे मनीं निर्धारु । कृपा करीं गा जगद्गुरु । म्हणोनि चरणीं लागला ॥२७॥
श्रीगुरु म्हणती तयासी । नित्य आमुची निंदा करिसी । आजि कैसें तुझे मानसीं । आलासी भक्ति उपजोनि ॥२८॥
विप्र म्हणे स्वामियासी । अज्ञान अंधकार आम्हांसी । कैसे भेटाल परियेसीं । ज्योतिर्मय न होतां ॥२९॥
म्यां कल्लेश्वराची पूजा केली । तेणें पुण्यें आम्हां भेटी लाधली । आजि आम्ही पूजेसी गेलों ते काळीं । लिंगस्थानीं तुम्हांसि देखिलें ॥३०॥
स्वप्नावस्थेंत देखिलें आपण । प्रत्यक्ष भेटले तुझे चरण । स्थिर जाहलें अंतःकरण । मिळवावें शिष्यवर्गांत ॥३१॥
ऐसें विनवोनि द्विजवर । स्तोत्र करीतसे अपार । स्वप्नीं पूजा षोडशोपचार । तैसें कवित्व केलें देखा ॥३२॥
मानसपूजेचें विधान । पूजा व्यक्त केली त्याणें । श्रीगुरु म्हणती तत्क्षण । आम्ही स्वप्नरुप लोकांसी ॥३३॥
प्रत्यक्ष आम्ही असतां देखा । स्वप्नावस्थीं कवित्व ऐका । येणें भक्तें केलें निका । स्वप्नीं भेदूनि समस्त ॥३४॥
ऐसें म्हणोनि शिष्यांसी । वस्त्रें देती त्या कवीसी । लागला तो श्रीगुरुचरणासी । म्हणे आपण शिष्य होईन ॥३५॥
श्रीगुरु म्हणती तयासी । कल्लेश्वर श्रेष्ठ आम्हांसी । पूजा करीं गा नित्य त्यासी । आम्ही तेथें सदा वसों ॥३६॥
विप्र म्हणे स्वामियासी । प्रत्यक्ष सांडोनि चरणासी । काय पूजा कल्लेश्वरासी । तेथेंही तुम्हांसी म्यां देखिलें ॥३७॥
तूंचि स्वामी कल्लेश्वरु । त्रयमूर्तीचा अवतारु । हाचि माझा सत्य निर्धारु । न सोडीं आतां तुझे चरण ॥३८॥
ऐसें विनवोनि स्वामियासी । आला सवें गाणगापुरासी । कवित्वें केलीं बहुवसी । सेवा करीत राहिला ॥३९॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । कवीश्वर दोघे श्रीगुरुपाशीं । आले येणें रीतीसीं । भक्ति करिती बहुवस ॥४०॥
म्हणे सरस्वती-गंगाधरु । ज्यासी प्रसन्न होय श्रीगुरु । त्याचे घरीं कल्पतरु । चिंतिलें फळ पाविजे ॥४१॥
कथा कवीश्वराची ऐसी । सिद्ध सांगे नामधारकासी । पुढील कथा विस्तारेंसीं । सांगेल सिद्ध नामधारका ॥४२॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे नरहरिकवीश्वर-वरप्राप्ति नाम पंचचत्वारिंशोऽध्यायः
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥
(ओवीसंख्या ४२)

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
नामधारक म्हणे सिद्धासी । पुढें कथा वर्तली कैसी । तें विस्तारोनि सांगावें आम्हांसी । कृपा करीं गा दातारा ॥१॥
सिद्ध म्हणे श्रीमंता । ऐकेन म्हणसी गुरुचरित्रा । तुज होतील पुत्रपौत्रा । सदा श्रियायुक्त तूं होसी ॥२॥
सांगो आतां एक विचित्र । जेणें होतील पतित पवित्र । ऐसें असे श्रीगुरुचरित्र । तत्परेंसीं परियेसा ॥३॥
गाणगापुरीं असतां श्रीगुरु । सण आला दिपवाळी थोरु । शिष्य आले पाचारुं । आपुले घरीं भिक्षेसी ॥४॥
सप्त शिष्य बोलाविती । एकाहूनि एक प्रीतीं । सातै जण पायां पडती । यावें आपुले घरासी ॥५॥
एकएक ग्राम एकेकासी । श्रीगुरु म्हणती तयांसी । समस्तांच्या घरीं यावें कैसी । तुम्ही आपणचि विचारा ॥६॥
तुम्हीं वांटा आपणियांत । कवणाकडे निरोप होत । तेथें आम्हीं जाऊं म्हणत । शिष्याधीन आम्ही असों ॥७॥
आपणांत आपण पुसती । समस्त आपण नेऊं म्हणती । एकमेकांत झगडती । आपुला स्वामी म्हणोनियां ॥८॥
श्रीगुरु वारिती तयांसी । तुम्ही भांडतां कासयासी । आम्ही एक गुरु सातांसी । एका घरीं येऊं म्हणती ॥९॥
ऐसें वचन ऐकोनि । समस्त विनविती कर जोडूनि । स्वामी प्रपंच न पहावा नयनीं । समर्थ-दुर्बळ म्हणों नये ॥१०॥
समस्तांसी पहावें समान । न विचारावें न्यून पूर्ण । उपेक्षिसी दुर्बळ म्हणोन । गंगाप्रवेश करुं आम्ही ॥११॥
विदुराचिया घरासी । श्रीकृष्ण जाय भक्तीसीं । राजा-कौरवमंदिरासी । नवचे तो भक्तवत्सल ॥१२॥
आम्ही समस्त तुमचे दास । कोणासी न करावें उदास । जो निरोप द्याल आम्हांस । तोचि आपण करुं म्हणती ॥१३॥
ऐसें म्हणोनियां समस्त । करिती साष्टांग दंडवत । समस्त आम्हां पहावें म्हणत । विनविताति श्रीगुरुसी ॥१४॥
श्रीगुरु म्हणती समस्तांसी । येऊं तुमच्या घरासी । चिंता न धरावी मानसीं । भाक आमुची घ्या म्हणती ॥१५॥
ऐसें ऐकोनि श्रीगुरुवचन । विनविताति सातै जण । समस्तां आश्वासितां येऊं म्हणोन । कवणें करावा भरंवसा ॥१६॥
श्रीगुरु मनीं विचारिती । अज्ञानी लोक नेणती । तयां सांगावें एकांतीं । एकेकातें बोलावूनि ॥१७॥
जवळी बोलावूनि एकासी । कानीं सांगती तयासी । आम्ही येतों तुझे घरासी । कोणापुढें न सांगावें ॥१८॥
ऐसी भाक तयासी देती । उठोनि जाईं गांवा म्हणती । दुजा बोलावूनि एकांतीं सांगती । येऊं तुझ्या घरासी ॥१९॥
ऐसें सांगोनि तयासी । पाठविलें ग्रामासी । बोलावूनि तिसरेयासी । तेणेंचि रीतीं सांगती ॥२०॥
ऐसें सातै जण देखा । समजावोनि गुरुनायका । पाठविले तेणेंचिपरी ऐका । महदाश्चर्य वर्तलें ॥२१॥
एकमेकां न सांगत । गेले सातही भक्त । श्रीगुरु आले मठांत । अतिविनोद प्रवर्तला ॥२२॥
ग्रामांतील भक्तजन । हे व्यवस्था ऐकोन । विनविताति कर जोडोन । आम्हां सांडोनि जातां स्वामी ॥२३॥
त्यांसी म्हणती श्रीगुरुमूर्ति । आम्ही राहिलों जाणा चित्तीं । न करावी मनीं खंती । आम्ही असों येथेंचि ॥२४॥
ऐसें बोलतां संतोषीं । जवळीं होऊं आली निशी । दिवाळीची त्रयोदशी । रात्रीं मंगळस्नान करावें ॥२५॥
आठरुप झाले आपण । अपार महिमा नारायण । सात ठायींही गेले आपण । गाणगापुरीं होतेचि ॥२६॥
ऐसी दिपवाळी जाहली । समस्तां ठायीं पूजा घेतली । पुनः तैसेचि व्यक्त जाहले । गौप्यरुपें कोणी नेणें ॥२७॥
कार्तिकमासीं पौर्णिमेसी । करावया दीपाराधनेसी । समस्त भक्त आले दर्शनासी । गाणगाग्रामीं श्रीगुरुजवळी ॥२८॥
समस्त नमस्कार करिती । भेटीं दहावे दिवसीं म्हणती । एकमेकातें विचारिती । म्हणती आपले घरीं गुरु होते ॥२९॥
एक म्हणती सत्य मिथ्या । समस्त शिष्य खुणा दावित । आपण दिल्हें ऐसें वस्त्र । तें गा श्रीगुरुजवळी असे ॥३०॥
समस्त जाहले तटस्थ । ग्रामलोक त्यासी असत्य म्हणत । आमुचे गुरु येथेंचि होते । दिपवाळी येथेंचि केली ॥३१॥
विस्मय करिती सकळही जन । म्हणती होय हा त्रैमूर्ति आपण । अपार महिमा नारायण । अवतार होय श्रीहरीचा ॥३२॥
ऐसे म्हणोनि भक्त समस्त । नानापरी स्तोत्र करीत । न कळे महिमा तुझी म्हणत । वेदमूर्ति श्रीगुरुनाथा ॥३३॥
तूंचि विश्वव्यापक होसी । महिमा न कळे आम्हांसी । काय वर्णावें श्रीचरणासी । त्रैमूर्ति तूंचि एक ॥३४॥
ऐसी नानापरी स्तुति करिती । दीपाराधना अतिप्रीतीं । ब्राह्मणभोजन करविती । महानंद भक्तजना ॥३५॥
श्रीगुरुमहिमा ऐसी ख्याति । सिद्ध सांगे नामधारकाप्रती । भूमंडळीं झाली ख्याति । श्रीनृसिंहसरस्वतीची ॥३६॥
म्हणे सरस्वती-गंगाधरु । जवळी असतां कल्पतरु । नोळखिती जन अंध-बधिरु । वायां कष्टती दैन्यवृत्तीं ॥३७॥
भजा भजा हो श्रीगुरुसी । जें जें काम्य तुमचे मानसीं । साध्य होईल त्वरितेसीं । आम्हां प्रचीति आली असे ॥३८॥
अमृत पान करावयासी । अनुमान पडे मूर्खासी । ज्ञानवंत भक्तजनांसी । नामामृत श्रीगुरुचें ॥३९॥
श्रीगुरुसेवा करा हो करा । मारीतसे मी डांगोरा । संमत असे वेदशास्त्रां । गुरु तोचि त्रैमूर्ति ॥४०॥
गुरुवेगळी गति नाहीं । वेदशास्त्रें बोलतीं पाहीं । जे निंदिती नरदेहीं । सूकरयोनीं जन्मती ॥४१॥
तुम्ही म्हणाल भज ऐसी । आपुले इच्छेनें लिहिलेंसी । वेदशास्त्र-संमतेसीं । असेल तरी अंगीकारा ॥४२॥
संसारसागर धुरंधर । उतरावया पैलपार । आणिकाचा निर्धार । नव्हे गुरुवांचोनि ॥४३॥
निर्जळ संसार-अरण्यांत । पोई घातली असे अमृत । सेवा सेवा तुम्ही समस्त । अमरत्व त्वरित होईल ॥४४॥
श्रीगुरु नृसिंहसरस्वती । अवतरला असे त्रयमूर्ति । गाणगाग्रामीं वास करिती । आतां असे प्रत्यक्ष ॥४५॥
जे जे जाती तया स्थाना । तात्काळ होय मनकामना । कांहीं न करावें अनुमाना । प्रत्यक्ष देव तेथें असे ॥४६॥
आम्ही सांगतों तुम्हांसी हित । प्रशस्त झालिया तुमचें चित्त । गाणगापुरा जावें त्वरित । म्हणे सरस्वती-गंगाधर ॥४७॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे अष्टस्वरुपधारणं नाम षट्चत्वारिंशोऽध्यायः ॥४६॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥
(ओवीसंख्या ४७)

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । अपूर्व एक कथा वर्तली परियेसीं । श्रीगुरुचरित्र अतिकवतुकेंसीं । परम पवित्र ऐक पां ॥१॥
गाणगापुरीं असतां श्रीगुरु । ख्याति जाहली अपारु । भक्त होता एक शूद्रु । नाम तया 'पर्वतेश्वर' ॥२॥
त्याच्या भक्तीचा प्रकारु । सांगेन ऐका मन स्थिरु । भक्ति केली श्रीगुरु । कायावाचामनेंकरुनि ॥३॥
श्रीगुरु नित्य संगमासी । जात असती अनुष्ठानासी । मार्गीं तो शूद्र परियेसीं । आपुले शेतीं उभा असे ॥४॥
श्रीगुरुतें नित्य देखोनि । येई धांवत शेतांतूनि । साष्टांगीं नमन करुनि । पुनरपि जाय आपुले स्थाना ॥५॥
माध्यान्हकाळीं मठासी । येतां मागुती नमस्कारी परियेसीं । ऐसें किती दिवसवर्षीं । शूद्र भक्ति करीतसे ॥६॥
श्रीगुरु तयासी न बोलती । नमन केलिया उगीच असती । येणेंविधि बहु काळ क्रमिती । आला शूद्र नमस्कारा ॥७॥
नमन करितां शूद्रासी । पुसती श्रीगुरु संतोषीं । कां रे नित्य कष्टतोसी । आड पडतोसी येऊनियां ॥८॥
तुझे मनीं काय वासना । सांगे त्वरित विस्तारुन । शूद्र विनवी कर जोडून । शेत आपुलें पिकावें ॥९॥
श्रीगुरु पुसती तयासी । काय पेरिलें तुझ्या शेतासी । शूद्र म्हणे यावनाळ बहुवसी । पीक जाहलें तुझे धर्में ॥१०॥
तुम्हांसी नित्य नमन करितां । पीक दिसे अधिकता । पोटरें येतील आतां । आतां तुझेनि धर्में जेवूं ॥११॥
स्वामी यावें शेतापाशीं । पहावें अमृतदृष्टींसीं । तूं समस्तां प्रतिपाळिसी । शूद्र म्हणोनि नुपेक्षावें ॥१२॥
श्रीगुरु गेले शेतापाशीं । पाहूनि म्हणती त्या शूद्रासी । सांगेन तुज जरी ऐकसी । विश्वास होईल बोलाचा ॥१३॥
जें सांगेन तुज एक वाक्येंसीं । जरी भक्तीनें अंगीकारिसी । तरीच सांगूं परियेसीं । एकोभावें त्वां करावें ॥१४॥
शूद्र विनवी स्वामियासी । गुरुवाक्य कारण आम्हांसी । दुसरा भाव मजपाशीं । नाहीं स्वामी म्हणतसे ॥१५॥
मग निरोपिती श्रीगुरु त्यासी । आम्ही जातों संगमासी । परतोनि येऊं माध्यान्हेसी । तंव सर्व पीक कापावें ॥१६॥
ऐसें सांगोनि शूद्रासी । श्रीगुरु गेले संगमासी । शूद्र विचार करी मानसीं । गुरुवाक्य मज कारण ॥१७॥
शीघ्र आला ग्रामांत । अधिकारियासी विनवीत । खंडोनि द्यावें आपलें शेत । गत संवत्सराप्रमाणें देईन धान्य ॥१८॥
अधिकारी म्हणती त्यासी । पीक जाहलें बहु शेतासी । म्हणोनि गुतका मागतोसी । अंगीकार न करूं जाण ॥१९॥
नानाप्रकारें विनवी त्यासी । द्विगुण देईन गतसंवत्सरासी ; । अंगीकारिलें संतोषीं । वचनपत्र लिहूनि घेती ॥२०॥
आपण अभयपत्र घेऊनि । लोक मिळवोनि तत्क्षणीं । गेला शेता संतोषोनि । कापीन म्हणे वेगेंसीं ॥२१॥
कापूं आरंभिलें पिकासी । स्त्री-पुत्र वर्जिती त्यासी । पाषाण घेऊनि स्त्री-पुत्रांसी । मारुं आला तो शूद्र ॥२२॥
समस्तांतें मारी येणेंपरी । पळत आलीं गांवाभीतरी । आड पडती राजद्वारीं । "पिसें लागलें पतीसी ॥२३॥
पीक होतें बहुवसीं । कापूनि टाकितो मूर्खपणेंसीं । वर्जितां पहा आम्ही त्यासी । पाषाण घेउनि मारी तो ॥२४॥
संन्यासी यतीश्वराच्या बोलें । पीक सर्वही कापिलें । आमुचें जेवितें भाण गेलें । आणिक मासां भक्षितों आम्ही"॥२५॥
अधिकारी म्हणती तयांसी । कापीना कां आपुल्या शेतासी । पत्र असे आम्हांपाशीं । गतवत्सरेसीं द्विगुण द्यावें ॥२६॥
वर्जावया माणसें पाठविती । नायके शूद्र कवणे गतीं । शूद्र म्हणे जरी अधिकारी भीती । पेंवीं धान्य असें तें देईन ॥२७॥
जावोनि सांगती अधिकारियासी । आम्हीं सांगितलें त्या शूद्रासी । त्यानें सांगितलें तुम्हांसी । विनोद असे परियेसा ॥२८॥
जरी भीतील अधिकारी । तरी धान्य देईन आतांचि घरीं । गुरें बांधीन त्यांचे द्वारीं । पत्र आपण दिलें असे ॥२९॥
अधिकारी म्हणती तयासी । आम्हां चिंता असे कायसी । पेंवें ठाउकीं असती आम्हांसी । धान्य असे अपार ॥३०॥
इतुकें होतां शूद्र देखा । पीक कापिलें मनःपूर्वका । उभा असे मार्गीं ऐका । श्रीगुरु आले परतोनि ॥३१॥
नमन करुनि श्रीगुरुसी । शेत कापिलें दाविलें त्यांसी । श्रीगुरुनाथ म्हणती तयासी । वायां कापिलें म्हणोनि ॥३२॥
विनोदें तुज सांगितलें । तुवां निधरिं कापिलें ।; म्हणे तुमचें वाक्य भलें । तेंचि कामधेनु मज ॥३३॥
ऐसें ऐकोनि श्रीगुरु म्हणती । निर्धार असेल तुझे चित्तीं । होईल अत्यंत फळश्रुती । चिंता न करीं म्हणोनियां ॥३४॥
ऐसें सांगोनि श्रीगुरुनाथ । आले आपण ग्रामांत । सवें शूद्र असे येत । आपुले घराप्रती गेला ॥३५॥
पुसावया लोक येती समस्त । होतसे त्याचे घरीं आकांत । स्त्री-पुत्र सर्व रुदन करीत । म्हणती आमुचा ग्रास गेला ॥३६॥
शूद्र समस्तां संबोखी । न करीं चिंता रहा सुखी । गुरुसोय नेणिजे मूर्खीं । कामधेनु असे वाक्य त्यांचें ॥३७॥
एकेकाचे सहस्त्रगुण । अधिक लाभाल तुम्ही जन । स्थिर करा अंतःकरण । हानि नव्हे मी जाणें ॥३८॥
नर म्हणतां तुम्ही त्यासी । शिवमुनि असे भरंवसीं । असेल कारण पुढें आम्हांसी । म्हणोनि निरोपिलें ऐसें मज ॥३९॥
श्रीगुरुकृपा होय ज्यासी । दैन्य कैंचें असे त्यासी । निधान जोडलें आम्हांसी । म्हणोनि तो शूद्र सांगतसे ॥४०॥
नानापरीनें स्त्री-पुत्रांसी । संबोखीतसे शूद्र अति हर्षीं । इष्टवर्ग बंधुजनासी । येणेंचि रीतीं सांगतसे ॥४१॥
समस्त राहिले निवांत । ऐसे आठ दिवस क्रमीत । वारा वाजला अति शीत । ग्रामींचें पीक नासलें ॥४२॥
समस्त राष्ट्रींचें पीक देखा । शीतें नासलें सकळिका । पर्जन्य पडिला अकाळिका । मूळनक्षत्रीं परियेसा ॥४३॥
ग्राम राहिला पिकेंवीण । शूद्रशेत वाढलें दशगुण । वाढले यावनाळ सगुण । एकेका अंकरा फरगडेंसीं ॥४४॥
पीक झालें अत्यंत । समस्त लोक विस्मय करीत । देश राहिला स्वभावें दुष्कृत । महदाश्चर्य जहालें देखा ॥४५॥
ते शूद्रस्त्री संतोषोनि । शेता आली पूजा घेऊनि । अवलोकीतसे आपुले नयनीं । महानंद करीतसे ॥४६॥
येऊनि लागे पतीचे चरणीं । विनवीतसे कर जोडूनि । बोले मधुर करुणावचनीं । क्षमा करणें म्हणतसे ॥४७॥
अज्ञानमदें अति वेष्टिलें । नेणतां तुम्हांसी अति निंदिलें । श्रीगुरु कैंचा काय ऐसें म्हणितलें । क्षमा करणें प्राणेश्वरा ॥४८॥
ऐसें पतीसी विनवोनि । शेतींचे पांडवांसी पूजोनि । विचार करिती दोघेजणी । श्रीगुरुदर्शना जावें आतां ॥४९॥
म्हणोनि सर्व आयतीसीं । पूजों आलीं श्रीगुरुसी । स्वामी पुसती तयांसी । काय वर्तमान म्हणोनियां ॥५०॥
दोघेंजण स्तोत्र करिती । जय जया शिवमुनि म्हणती । कामधेनु कुळदैवती । तूंचि आमुचा देवराया ॥५१॥
तुझें वचनामृत आम्हां । चिंतामणिप्रकार महिमा । पूर्ण जाहलें आमुचें काम्य । शरण आलों तुज आजि ॥५२॥
'भक्तवत्सल' ब्रीद ख्याति । ऐसें जगीं तुज वानिती । आम्हीं देखिलें दृष्टांतीं । म्हणोनि चरणीं लागलीं ॥५३॥
नाना प्रकारें पूजा आरती । शूद्र-स्त्री करीतसे भक्तीं । श्रीगुरु संतोषले अतिप्रीतीं । म्हणती लक्ष्मी अखंड तुझे घरीं ॥५४॥
निरोप घेऊनि दोघेंजण । गेलीं आपुले आश्रमासी जाण । करितां मास काळक्रमण । पीक जाहलें अपार ॥५५॥
गतसंवत्सराहूनि देखा । शतगुण जाहलें धान्य अधिका । शूद्र म्हणतसे ऐका । अधिकारियासी बोलावोनि ॥५६॥
शूद्र म्हणे अधिकारियासी । पीक गेलें सर्व गांवासी । रिता दिसतसे कोठारासी । आपण देईन अर्ध वांटा ॥५७॥
गतवत्सर-द्विगुण तुम्हांसी । अंगीकृत होय परियेसीं । धान्य जाहलें बहुवसीं । शताधिकगुण देखा ॥५८॥
देईन अर्ध भाग मी संतोषीं । संदेह न करा हो मानसीं । अधिकारी म्हणती तयासी । धर्महानि केवीं करुं ॥५९॥
गुरुकृपा असतां तुजवरी । पीक जाहलें बहुतापरी । नेऊनियां आपुले घरीं । राज्य करीं म्हणती त्यासी ॥६०॥

संतोषोनि शूद्र देखा । विप्रांसी वांटी धान्य अनेका । घेऊनि गेला सकळिका । राजवांटा देऊनि ॥६१॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । श्रीगुरुचरित्र-महिमा परियेसीं । दृढ भक्ति असे सदा ज्यासी । कैंचें दैन्य तया घरीं ॥६२॥
सकळाभीष्ट तयासी होती । लक्ष्मी राहे अखंडिती । श्रीगुरुसेवा भावभक्तीं । म्हणे सरस्वती-गंगाधर ॥६३॥
इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे शूद्रवरप्रदानं नाम सप्तचत्वारिंशोऽध्यायः ॥४७॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥
(ओवीसंख्या ६३)

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

नामधारक शिष्य सगुण । लागे सिद्धाचिया चरणा ।
विनवीतसे कर जोडून । भक्तिभावें करुनियां ॥ १ ॥
त्रिमूर्तीचा अवतार । वेषधारी जाहला नर ।
राहिला प्रीतीनें गाणगापुर । कवण क्षेत्र म्हणोनियां ॥ २ ॥
भूमीवरी प्रख्यात । तीर्थें असती असंख्यात ।
समस्त सोडोनि येथ । काय कारणें वास केला ॥ ३ ॥
या स्थानाचें महिमान । सांगा स्वामी विस्तारुन ।
म्हणोनि धरिले सिद्धाचे चरण । नामधारकें तया वेळीं ॥ ४ ॥
ऐकोनि तयाचें वचन । सिद्धमुनि संतोषोन ।
सांगतसे विस्तारुन । ऐका श्रोते एकचित्तें ॥ ५ ॥
आश्विन वद्य चतुर्दशीं । दिपवाळी पर्वणीसी ।
श्रीगुरु म्हणती शिष्यांसी । स्नान करावें त्रिस्थळींचे ॥ ६ ॥
गया प्रयाग आणि वाराणशी । चला यात्रे कलत्रपुत्रेसी ।
विप्र म्हणती श्रीगुरुसी । आइती करणें म्हणोनियां ॥ ७ ॥
ऐकोनि श्रीगुरु हांसती । ग्रामाजवळी तीर्थें असतीं ।
करणें न लागे तुम्हां आइती । चला दावीन तुम्हांसी ॥ ८ ॥
ऐसें म्हणोनि भक्तांसी । गेले अमरजासंगमासी ।
स्नान केलें महाहर्षी । शिष्यांसहित श्रीगुरुमूर्ती ॥ ९ ॥
श्रीगुरु म्हणती शिष्यांसी । महिमा अपार या संगमासी ।
प्रयागासमान परियेसीं । षट्कुळामध्यें स्नान करणें ॥ १० ॥
विशेष भीमा नदी उत्तरे वाहे । अमरजा संगम मनोहर आहे ।
गंगा यमुना निर्धार हे । तीर्थ बरवें परियेसा ॥ ११ ॥
विशेष आपण उत्तरे वाहे । याची महिमा अपार आहे ।
शताधिक पुण्य होये । काशीहून परियेसा ॥ १२ ॥
आणिक अष्ट तीर्थें असतीं । त्यांची महिमा असे ख्याती ।
सांगेन ऐका एकचित्तीं । श्रीगुरु म्हणती शिष्यांसी ॥ १३ ॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । विनविताति भक्तजन ।
' अमरजा ' नदी नाम कवण । कवणापासाव उत्पत्ति ॥ १४ ॥
श्रीगुरु म्हणती भक्तांसी । बरवें पुसिलें आम्हांसी ।
जालंधर-पुराणेसीं । असे कथा प्रख्यात ॥ १५ ॥
' जालंधर ' निशाचर । समस्त जिंतिली वसुंधरा ।
पराभविलें इंद्रपूर । समस्त देव पळविले ॥ १६ ॥
देवां-दैत्यांसी झालें युद्ध । सुरवर मारिले बहुविध ।
इंद्रे जाऊनि प्रबोध । ईश्र्वराप्रति सांगितला ॥ १७ ॥

शीघ्र प्रतिकार करावा । म्हणोनि चरणीं लागला ॥ १८ ॥

आम्ही मारितों दैत्यांसी । रक्त पडे भूमीसी ।

अखिल राक्षस-बिंदूंसी । अधिक निपजती भूमीवरी ॥ १९ ॥

स्वर्ग मृत्यु पातळ । सर्व भरलें दैत्यकुळ ।

मारिले आमुचे देव सकळ । म्हणोनि आलों तुजपाशीं ॥ २० ॥

ऐसें वचन ऐकोनि । ईश्र्वर प्रज्वाळला मनीं ।

निघाला रौद्र होऊनि । दैत्य निर्दाळण करावया ॥ २१ ॥

इंद्र विनवी ईश्र्वरासी । स्वामी माराल दैत्यांसी ।

जीवन आणावया देवांसी । प्रकार कांहीं करावा ॥ २२ ॥

संतोषोनि गिरिजारमण । अमृतवचन उच्चारोन ।

घट दिधला तत्क्षण । संजीवनी उदक देखा ॥ २३ ॥

उदक घेवोनि इंद्रराव । त्वरित जातसे स्वभाव ।

शिंपोनियां समस्त देव । उठविले तये वेळीं ॥ २४ ॥

उरलें अमृत घटीं होतें । घेऊनि जातां अमरनाथें ।

पडिले भूमीं अवचितें । प्रवाह झाला क्षितीवरी ॥ २५ ॥

' संजीवनी ' नामें नदी । उद्भवली भूमीं प्रसिद्धी ।

' अमरजा ' नाम याचि विधी । प्रख्यात झाली अवधारा ॥ २६ ॥

याकारणें या नदीसी । जे स्नान करिती भक्तींसी ।

काळमृत्यु न होय त्यांसी । अपमृत्यु केवीं घडे ॥ २७ ॥

शतायुषी पुरुष होती । रोगराई न पीडिती ।

अपस्मारादि दोष जाती । ब्रह्महत्यादि पातकें ॥ २८ ॥

' अमृतनदी ' नाम इयेसी । संगम झाला भीमरथीसीं ।

तीर्थ जाहलें प्रयागासरसी । त्रिवेणीचा संगम ॥ २९ ॥

कार्तिकादि माघमासीं । स्नान करितां भक्तिसीं ।

इह सौख्य परलोकासी । मोक्षस्थाना पावती ॥ ३० ॥

सोम-सूर्य-ग्रहणासीं । संक्रमण-सोम-अमावास्येसी ।

पुण्य तिथि एकादशी । स्नान करितां अनंत पुण्य ॥ ३१ ॥

न साधती दिवस जरी । सदा करावें मनोहरी ।

समस्त दोष जाती दूरी । शतायुषी श्रियायुक्त ॥ ३२ ॥

ऐसा संगममहिमा देखा । पुढें तीर्थ असे अति विशेखा ।

दिसे अश्र्वत्थ सन्मुखा । ' मनोरथ ' तीर्थ असे ॥ ३३ ॥

त्या तीर्थी स्नान केलिया । मनोरथ पाविजे काम्या ।

कल्पवृक्षस्थान अनुपम्या । कल्पिलें फळ पाविजे ॥ ३४ ॥

अश्र्वत्थ नव्हे तो कल्पतरु । जाणावें तुम्हीं निर्धारु ।

जें जें चिंतितील नरु । पावतील काम्य अवधारा ॥ ३५ ॥

ऐसें मनोरथ तीर्थ । ठाऊक असे प्रख्यात ।
सन्मुख असे अश्र्वत्थ । सदा असों याचिगुणें ॥ ३६ ॥
जे जन येऊनि सेवा करिती । तयांचे मनोरथ पुरती ।
न धरा संदेह आतां चित्तीं । ऐसें म्हणती श्रीगुरुनाथ ॥ ३७ ॥
आम्ही वसतो सदा येथें । ऐसें जाणा तुम्ही निरुतें ।
दृष्टीं पडतीं गरुत्मतें । खूण तुम्हां सांगेन ॥ ३८ ॥
कल्पवृक्षातें पूजोनि । जावें मग शंकरभुवनीं ।
संगमेश्र्वर असे त्रिनयनी । पूजा करावी मनोभावें ॥ ३९ ॥
जैसा पर्वती मल्लकार्जुन । तैसा संगमी रुद्र आपण ।
भक्तिपूर्वक प्रदक्षिणा । करावी तुम्ही अवधारा ॥ ४० ॥
नंदिकेश्र्वरा नमोनि । नमन करावें चंडीस्थानीं ।
पुन्हा नंदी सव्य करुनि । जावें मग सोमसूत्रासी ॥ ४१ ॥
सवेंचि परतोनि वृषभासी । नमोनि जावें चंडीपाशी ।
पुढें जावे सोमसूत्रासी । येणेंविधि प्रदक्षिणा ॥ ४२ ॥
ऐसी प्रदक्षिणा देखा । तीन वेळां करुन ऐका ।
वृषभस्थानासी येऊनि निका । अवलोकावें श्रीशिवासी ॥ ४३ ॥
वामहस्तीं वृषण धरुनि । तर्जनी अंगुष्ठ शिंगी ठेवोनि ।
पूजा पहावी दोनी नयनीं । इंद्रासमान होय नर ॥ ४४ ॥
धनधान्यादि संपत्ति । लक्मी राहे अखंडिती ।
पुत्रपौत्र त्यांसी होती । संगमेश्र्वर पूजोलिया ॥ ४५ ॥
पुढें तीर्थ वाराणशी । अर्धकोश असे परियेसीं ।
ग्राम असे नागेशी । तेथोनि उद्भव असे जाणा ॥ ४६ ॥
त्याचें असे आख्यान । कथा नव्हे प्रत्यक्ष जाण ।
होता एक ब्राह्मण । भारद्वाज गोत्राचा ॥ ४७ ॥
विरक्त असे ईक्ष्वरभक्त । सर्वसंग त्याग करीत ।
आपण असे अनुष्ठानीत । सदा ध्याय शिवासी ॥ ४८ ॥
प्रसन्न झाला चंद्रमौळी । सदा दिसे दृष्टीजवळी ।
विप्र आल्हादें सर्व काळीं । देह विसरोनि हिंडतसे ॥ ४९ ॥
लोक म्हणती पिसा त्यासी । निंदा करिती बहुवसीं ।
दोघे बंधु असती तयासी । नामें त्यांची अवधारा ॥ ५० ॥
एकाचें नाम असे ' ईश्र्वर ' । दुसरा नामें ' पांडुरंगेश्र्वर ' ।
बंधूतें केला अव्हेर । आपण निघाले काशीसी ॥ ५१ ॥
करोनियां सर्व आयती । समस्त निघाले त्वरितीं ।
त्या पिशातें सवें पाचारिती । चला जाऊं म्हणोनियां ॥ ५२ ॥
ब्रह्मज्ञानी द्विज निका । पिसा म्हणती मूर्ख लोक ।

विश्र्वेश्र्र असे मजजवळी । दाखवीन तुम्हांतें तात्काळीं ।

आश्र्चर्य करिती लोक सकळी । दाखवीं म्हणती बंधुजन ॥ ५४ ॥

काशीस जावें अति-प्रयास । येथें भेटे तरी कां सायास ।

म्हणोनि बोलती अति हर्षे । तये वेळीं अवधारा ॥ ५५ ॥

इतुकिया अवसरी । विप्र गंगास्नान करी ।

ध्यानस्थ होतां साक्षात्कारी । ईश्र्वर आला तयाजवळी ॥ ५६ ॥

विनवीतसे शिवासी । आम्हां पाहिजे नित्य काशी ।

दर्शन व्हावें विश्र्वेश्र्वरासी । म्हणोनि चरणीं लागला ॥ ५७ ॥

ईक्ष्वर भोळा-चक्रवर्ती । प्रसन्न झाला अतिप्रीतीं ।

दिसे काशीक्षेत्र निश्र्चिती । मणिकर्णिका कुंड झालें ॥ ५८ ॥

विश्र्वेश्र्वराची मूर्ति एक । निघाली कुंडांतूनि विशेख ।

नदीं-उत्तर दिशे निक । उद्भवली परियेसा ॥ ५९ ॥

उदक निघालें कुंडांतून । जैसी भागीरथी गहन ।

जे जे असती काशींत खूण । समस्त लोकांसी दिसतसे ॥ ६० ॥

संगम जाहला नदी भीमा । तीर्थ काशी अति उत्तमा ।

आचार करिती मनोधर्मी । बंधुज्ञानी म्हणती मग ॥ ६१ ॥

म्हणे ब्राह्मण बंधूंसी । काशीस न जावें आमुचे वंशी ।

समस्तीं आचरावें हेचि काशी । आम्हां शंकरें सांगितले ॥ ६२ ॥

आपुलें नाम ' भ्रांत ' म्हणा । ' गोसावी ' नाम निर्धार खुणा ।

तुम्हीं दोघे बंधुजना । ' आराध्य ' ऐसें आरोपिलें ॥ ६३ ॥

दोघें जावें पंढरपुरा । तेथें असे पुंडलीकवरा ।

सदा तुम्ही पूजा करा । ' आराध्य ' नाम विख्यात ॥ ६४ ॥

प्रतिवर्षी काशीसी । येथे यावे निधरिसीं ।

तीर्थ असें अति विशेषीं । ऐसें म्हणे तो ब्राह्मण ॥ ६५ ॥

श्रीगुरु म्हणती भक्तजनासी । काशीतीर्थ प्रकटलें ऐसी ।

संशय न धरावा तुम्हीं मानसीं । वाराणसी प्रत्यक्ष ही ॥ ६६ ॥

ऐकोनि समस्त द्विजवर । करिती स्नान दान आचार ।

तेथोनि पुढें येती गुरुवर । सिद्ध सांगे नामधारका ॥ ६७ ॥

श्रीगुरु म्हणती सकळिकांसी । तीर्थ दाविती पापविनाशी ।

स्नानमात्रें पाप नाशी । जैसें तृणा अग्नि लागे ॥ ६८ ॥

आपुले भगिनी रत्नाबाईसी । दोष असे बहुवशीं ।

बोलावोनि त्या समयासी । पुसताति श्रीगुरुमुनि ॥ ६९ ॥

ऐक पूर्वदेह भगिनी । तूं आलीस आम्हां दर्शनी ।

पाप तुझे असे गहनी । आठवण करी मनामध्यें ॥ ७० ॥

ऐकोनि श्रीगुरुचे बोल । पायां पडे वेळोवेळ ।

अज्ञान आपण मूढ केवळ । इतुकें ज्ञान कैंचें मज ॥ ७१ ॥
तूं जगदात्मा विश्र्वव्यापक । तूंचि ज्ञानज्योति दिपक ।
सर्व जाणसी तूंचि एक । विस्तारुनि सांग मज ॥ ७२ ॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । आपुलें पाप मज पुससी ।
वधिलें पांच मार्जारांसी । नेणसी खूण धरीं आपुली ॥ ७३ ॥
होती मार्जारी गर्भेंसीं । प्रसूति झाली भांडेसी ।
न पहातां तूं उदक घातलेंसी । झांकोनि ठेविलें अग्नीवरी ॥ ७४ ॥
पांच मार्जारांचा घात । लागले आणिक दोष बहुत ।
ऐसें ऐकोनि पाहे त्वरित । श्र्वेरतकुष्ठ झालें तिसी ॥ ७५ ॥
देखोनि भयाभीत झाली । श्रीगुरुचरणीं येऊनि लागली ।
विनवीतसे करुणाबहाळीं । कृपा करीं गा श्रीगुरुमूर्ति ॥ ७६ ॥
समस्त पापें करुनि राशि । तीर्था जाती वाराणशीसी ।
आल्यें तुझे दर्शनासी । पापावेगळें होईन म्हणोनि ॥ ७७ ॥
श्रीगुरु पुसती तियेसी । तुज असती पापराशि ।
पुढिले जन्मीं भोगिसी । तरी जाईल आतांचे ॥ ७८ ॥
रत्नाबाई विनवी स्वामियासी । उबगल्यें बहु जन्मासी ।
याचिकाजें दर्शनासी । आल्यें मी मुक्त होईन म्हणोनि ॥ ७९ ॥
आतां पुरेजन्म आपणासी । म्हणोनि धरिलें चरणासी ।
याचि जन्मीं भोगीन भोगासी । पाप आपण म्हणतसे ॥ ८० ॥
इतुकें ऐकोनि श्रीगुरुमूर्ति । रत्नाबाईस निरोप देती ।
पापविनाशीं जाय त्वरिती । स्नानमात्रें जाईल कुष्ठ ॥ ८१ ॥
नित्य करी वो येथे स्नान । सप्तजन्मींचे पाप भग्न ।
संदेह न धरी वो अनुमान । म्हणोनि सांगती श्रीगुरु ॥ ८२ ॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । आम्हीं देखिले दृष्टींसीं ।
स्नान करितां त्रिरात्रीसी । कुष्ठ तिचें परिहारिलें ॥ ८३ ॥
ऐसें प्रख्यात तीर्थ देखा । नाम ' पापविनाशी ' ऐका ।
जे स्नान करिती भाविका । सप्तजन्म-पापें जातीं ॥ ८४ ॥
तीर्थ-महिमा देखोन । रत्नाबाई संतोषोन ।
राहिली मग मठी बांधोन । तीर्थासन्निध अवधारा ॥ ८५ ॥
पुढें ' कोटितीर्थ ' देखा । श्रीगुरु दाविती सकळिकां ।
स्नानमात्रें होय निका । याचें आख्यान बहु असे ॥ ८६ ॥
जंबुद्विपीं जितुकीं तीर्थे । एकेक महिमा अपरिमितें ।
तितुकियां वास कोटितीर्थें । विस्तार असे सांगतां ॥ ८७ ॥
सोम-सूर्यग्रहणेसी । अथवा संक्रांति-पर्वणीसी ।
अमावास्या-पौर्णिमा-प्रतिपदेसी । स्नान तेथें करावें ॥ ८८ ॥

दान द्यावें द्विजा निका । कोटि गोदान फळ असे ॥ ८९ ॥

हे तीर्थमहिमा आहे ऐसी । एकेक दान कोटीसरसी ।

जे घडेल शक्तीसी । दान येथें करावें ॥ ९० ॥

पुढें तीर्थ ' रुद्रपाद ' । कथा असे अतिविनोद ।

गयातीर्थ-समप्रद । तीर्थ असे अवधारा ॥ ९१ ॥

जे जे आचार गयेसी । करावें तेथें परियेसीं ।

पूजा करा रुद्रपादासी । कोटि जन्म पापें जाती ॥ ९२ ॥

पुढें असे ' चक्रतीर्थ ' । अतिविशेष पवित्र ।

केशव देव सन्निध तत्र । पुण्यराशि स्थान असे ॥ ९३ ॥

तया तीर्थी स्नान करितां । पतित होती ज्ञानवंता ।

अस्थि होती चक्रांकिता । द्वारावती समान देखा ॥ ९४ ॥

तिये स्थानीं स्नान करोनि । पूजा करावी केसवचरणीं ।

द्वारावती-चतुर्गुणी । पुण्य असे अवधारा ॥ ९५ ॥

ऐकोनि श्रीगुरुचे वचन । समस्त करिती स्नान दान ।

पुढें मागुती ' मन्मय ' गहन । तीर्थ सांगती श्रीगुरु ॥ ९६ ॥

ग्रामपूर्वभागेसी । कल्लेश्र्वर देव परियेंसी ।

जैसें गोकर्णमहाबळेंसी । समान क्षेत्र परियेसा ॥ ९७ ॥

मन्मथ तीर्थी स्नान करावें । कल्लेश्र्वराते पूजावें ।

प्रजावृद्धि होय बरवें । अष्टैश्र्वर्यें पावती ॥ ९८ ॥

अखंड श्रावणामासीं । अभिषेक करावा देवासी ।

दीपाराधना कार्तिकमासीं । अनंत पुण्य अवधारा ॥ ९९ ॥

ऐसी अष्टर्तीथमहिमा । सांगती श्रीगुरु-पुरुषोत्तमा ।

संतोष जाहले भक्त प्रेमा । अति उल्हास करिताति ॥ १०० ॥

म्हणती समस्त भक्तजन । नेणो तीर्थांचे महिमान ।

स्वामीं निरोपिलें कृपेन । पुनीत केलें आम्हांसी ॥ १०१ ॥

जवळी असतां समस्त तीर्थे । कां जावें दूर यात्रे ।

स्नानमात्रे होय पवित्र । म्हणोनि समस्त आचरती ॥ १०२ ॥

अष्टतीर्थे निरोपोन । श्रीगुरु आले मठश्थान ।

समाराधना करिती भक्तजन । महानंद प्रवर्तला ॥ १०३ ॥

सिद्ध म्हणे नामधारकासी । तीर्थमहिमा आहे ऐसी ।

श्रीगुरुंनी निरोपिलें आम्हांसी । म्हणोनि तुज सांगितले ॥ १०४ ॥

म्हणे सरस्वती-गंगाधर । क्षेत्र थोर गाणगापुर ।

तीर्थें असती अपरांपर । आचरा तुम्ही भक्तीनें ॥ १०५ ॥

॥ इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ

श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे

अमरजासंगमे-गंधर्वपुर-तीर्थमहिमानिरुपणं

नाम अष्टचत्वारिंशोऽध्यायः ॥

श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

गुरुचरित्र अध्याय ४८

श्रीगणेशाय नमः ।
नामधारक शिष्य सगुण । सिद्धमुनीतें नमन करुन । विनवीतसे कर जोडून । भक्तिभावेंकरोनिया ॥१॥
त्रैमूर्तीचा अवतार । झाला वेषधारी नर । राहिला प्रीतीं गाणगापुर । कवण क्षेत्र म्हणोनिया ॥२॥
भूमीवरी प्रख्यात । तीर्थे असती असंख्यात । समस्त सांडोनिया येथ काय कारण वांस केला ॥३॥
या स्थानाचें महिमान । सांगा स्वामी विस्तारोन । म्हणोनि धरी सिद्धाचे चरण । नामधारक तये वेळीं ॥४॥
ऐकोन तयाचें वचन । सिद्धमुनि संतोषोन । सांगतसे विस्तारोन । ऐका श्रोते एकचित्तें ॥५॥
आश्विन वद्य चतुर्दशीसी । दिपवाळी पर्वणीसी । श्रीगुरु म्हणती शिष्यांसी । स्नान करावें त्रिस्थळीचें ॥६॥
गया-प्रयाग-वाराणशीसी । चला यात्रे पुत्रकलत्रेंसी । विप्र म्हणती श्रीगुरुसी । आइती करणें म्हणोनिया ॥७॥
ऐकोन श्रीगुरु हांसती । ग्रामजवळी तीर्थें असती । करणें न लागे तुम्हां आइती । चला नेईन तुम्हांसी ॥८॥
ऐसें म्हणोनि भक्तांसी । गेले अमरजासंगमासी । स्नान केलें महाहर्षी । शिष्यांसहित श्रीगुरुंनी ॥९॥
गुरु म्हणती शिष्यांसी । महिमा अपार संगमासी । प्रयागसमान परियेसीं । षट्कुळामध्यें स्नान करणें ॥१०॥
विशेष नदी भीमातीर । अमरजासंगम थोर । गंगा यमुना वाहे निर्धार । तीर्थ बरवें परियेसा ॥११॥
विशेषें आपण उत्तरे वाहे । याचें पुण्य अपार आहे । शताधिक पुण्य पाहे । काशीहून परियेसा ॥१२॥
आणिक अष्ट तीर्थें असती । तयांचा महिमा विख्यात जगतीं । सांगेन ऐका एकचित्तीं । श्रीगुरु म्हणती शिष्यांसी ॥१३॥
ऐकोन श्रीगुरुचें वचन । विनविताती भक्तजंन । अमरजानदी नाम कोण । कोणापासाव उत्पत्ति ॥१४॥
श्रीगुरु म्हणती भक्तांसी । बरवें पुसिलें आम्हांसी । जालंधर पुराणासी । असे कथा प्रख्यात ॥१५॥
जालंधर नामें निशाचर । समस्त जिंकिलें सुरवर । आपुलें केलें इंद्रपुर । समस्त देव पळाले ॥१६॥
देवा दैत्यां झालें युद्ध । सुरवर मारिले बहुविध । इंद्रें जाऊनि प्रबोध । ईश्वराप्रती सांगितला ॥१७॥
इंद्र म्हणे ऐक शिवा । दैत्यें मारिलें असे देवां । शीघ्र प्रतिकार करावा । म्हणोनि चरणीं लागला ॥१८॥
आम्ही मारितों दैत्यांसी । रक्त पडतसे भूमीसी । अखिल दैत्यबिंदूंसी । अधिक उपजवी भूमीवरी ॥१९॥
स्वर्ग मृत्यु पाताळ । सर्वत्र मारिलें दैत्यकुळ । मारिले आमुचे देव सकळ । म्हणोनि आलों तुम्हांपासीं ॥२०॥
ऐसें वचन ऐकोनि । ईश्वर प्रज्वाळला मनीं । निघाला रुद्र होऊनि । दैत्यनिर्दाळण करावया ॥२१॥
इंद्र विनवी ईश्वरासी । वधावया दैत्यांसी । जीवन आणावया देवांसी । ऐसा प्रतिकार करावा ॥२२॥
संतोषोनि गिरिजारमण । अमृतमंत्र उच्चारोन । घट दिधला तत्क्षण । संजीवनी उदक देखा ॥२३॥
तें उदक घेवोनि इंद्राव । शिंपताचि समस्त देव । उठोनिया अमर सर्व । स्वर्गास जाती तये वेळीं ॥२४॥
उरलें अमृत घटीं होतें । घेऊनि जातां अमरनाथें । पडिलें भूमीं अवचितें । प्रवाह आला क्षितीवरी ॥२५॥
ते संजीवनी नामें नदी । उद्भवली भूमीं प्रसिद्धी । अमरजा नाम याचि विधीं । प्रख्यात झाली अवधारा ॥२६॥
या कारणें या नदीसी । जे स्नान करिती भक्तीसी । काळमृत्यु न बाधे त्यासी । अपमृत्यु घडे केवी ॥२७॥
शतायुषी पुरुष होती । रोगराई न पीडिती । अपस्मारादि रोग जाती । ब्रह्महत्यादि पातकें ॥२८॥
अमृतनदी नाम तियेसी । संगम झाला भीमरथीसी । तीर्थ झालें प्रयागसरसी । त्रिवेणीचा संगम ॥२९॥
कार्तिकादि माघमासीं । स्नान करिती भक्तींसी । इह सौख्य परलोकासी । मोक्षस्थाना पावती ॥३०॥
सोम-सूर्य-ग्रहणासी । संक्रमण सोम-अमावास्येसी । पुण्यतिथि एकादशीसी । स्नान करावें अनंत पुण्य ॥३१॥
साधितां प्रतिदिवस जरी । सदा करावें मनोहरी । समस्त दोष जाती दूरी । शतायुषी श्रियायुक्त होय ॥३२॥
ऐसा संगममहिमा ऐका । पुढें सांगतसें तीर्थ विशेखा । दिसे अश्वत्थ संमुखा । मनोहर तीर्थ असे ॥३३॥
या तीर्थी स्नान केलिया । मनोहर पाविजे काया । कल्पवृक्षस्थानीं अनुपम्या । कल्पिलें फळ पाविजे ॥३४॥
अश्वत्थ नव्हे हा कल्पतरु । जाणावें तुम्हीं निर्धारु । जें जें चिंतिती मनीं नरु । पावती काम्यें अवधारा ॥३५॥
ऐसें मनोहर तीर्थ । ठावें असे प्रख्यात । संमुख असे अश्वत्थ । सदा असो याचिया गुणें ॥३६॥
जे जन येऊनि सेवा करिती । तयांचे मनोरथ पुरती । न धरावा संदेह आतां चित्तीं । ऐसें म्हणती श्रीगुरुनाथ ॥३७॥
आम्ही वसतों सदा येथें । ऐसें जाणा तुम्ही निरुतें । दृष्टीं पडतां मुक्ति होते । खूण तुम्हां सांगेन ॥३८॥
कल्पवृक्षातें पूजोनि । मग जावें शंकरभुवनीं । संगमेश्वर असे त्रिनयनी । पूजा करावी मनोभावें ॥३९॥
जैसा पर्वती मल्लिकार्जुन । तैसा संगमीं रुद्र आपण । भक्तिपूर्वक प्रदक्षिण । करावी तुम्ही अवधारा ॥४०॥
नंदिकेश्वरातें नमोनि । नमन करावें चंडस्थानीं । पूर्ण नदीं सव्य करोनि । मग जावें सोमसूत्रासी ॥४१॥
सवेंचि परतोनि वृषभासी । नमोनि जावें चंडापासीं । पुनः जावें सोमसूत्रासी । येणें विधीं प्रदक्षिणा ॥४२॥
ऐसी प्रदक्षिणा देखा । तीन वेळां करोनि ऐका । वृषभस्थानीं येऊनि निका । अवलोकावें शिवासी ॥४३॥
वामहस्तीं वृषण धरोनि । तर्जनी अंगुष्ठ शृंगीं ठेवोनि । पूजा पहावी दोनी नयनीं । इंद्रासमान होय नर ॥४४॥
धनधान्यादि संपत्ति । लक्ष्मी राहे अखंडिती । पुत्र पौत्र त्यासी होती । संगमेश्वर पूजिलिया ॥४५॥
पुढें तीर्थ वाराणशी । अर्ध कोश परियेसीं । ग्राम असे नागेशी । तेथोनि उद्भव असे जाण ॥४६॥
याचें असे आख्यान । कथा नव्हे प्रत्यक्ष जाण । होता एक ब्राह्मण । भारद्वाज गोत्राचा ॥४७॥
विरक्त असे ईश्वरभक्त । सर्वसंग त्याग करीत । आपण रत अनुष्ठानांत । सदा ध्याई शिवासी ॥४८॥
प्रसन्न झाला चंद्रमौळी । सदाशिव दिसे जवळी । विप्रा आल्हाद सर्व काळीं । देहभाव विसरोनि हिंडत ॥४९॥
लोक म्हणती पिसा त्यासी । निंदा करिती बहुवसीं । दोघे बंधु असती तयासी । नामें त्यांचीं अवधारा ॥५०॥
एका नाम असे ईश्वर । दुसरा नामें असे पांडुरंगेश्वर । बंधु एकला करोनि अव्हेर । आपण निघाले काशीसी ॥५१॥
करोनिया सर्व आइती । सर्व निघाले त्वरिती । तया पिशातें पाचारिती । चला जाऊं म्हणोनिया ॥५२॥
ब्रह्मज्ञानी द्विज निका । पिसा म्हणती मूर्ख लोका । बंधूंसि म्हणे द्विज ऐका । नका जाऊं काशीसी ॥५३॥
विश्वेश्वर असे मजजवळी । दावीन तुम्हां तात्काळीं । आश्चर्य करिती सकळी । दावीं म्हणती बंधुजन ॥५४॥
काशीस जावें अति प्रयास । येथें भेटे तरी कां सायास । म्हणोनि बोलताती हर्ष । तये वेळीं अवधारा ॥५५॥
इतुकिया अवसरीं । विप्र गंगास्नान करी । ध्यानस्थ होता साक्षात्कारी । ईश्वर आला तयाजवळी ॥५६॥
विनवीतसे शिवासी । आम्हां नित्य पाहिजे काशी । दर्शन होय विश्वेश्वरासी । म्हणोनि चरणीं लागला ॥५७॥
ईश्वर भोळा चक्रवर्ती । प्रसन्न झाला अतिप्रीतीं । दिसे तीच काशी त्वरितीं । मणिकर्णिका कुंड झालें ॥५८॥
विश्वेश्वराची मूर्ति एक । निघाली कुंडीं विशेख । नदी उत्तरे दिसे निक । एकबाणप्रमाण असे ॥५९॥
उदक निघालें कुंडांतून । जैसें भागीरथी गहन । ज्या ज्या असती काशींत खुणा । समस्त असती तयासी ॥६०॥
संगम झाला नदी भीमा । तीर्थ असे काशी उत्तमा । आचार करिती सप्रेमा । बंधु ज्ञानी म्हणती मग ॥६१॥
म्हणे ब्राह्मण बंधूंसी । काशीस न जावें आमुचे वंशीं । समस्तें आचरावें ही काशी । आम्हां शंकरें सांगितलें ॥६२॥
आपुलें नाम ऐसें जाणा । गोसावी नाम निर्धारीं खुणा । तुम्हीं बंधु दोघेजणां । आराधावें ऐसें निरोपिलें ॥६३॥
दोघीं जावें पंढरपुरा । तेथें असे पुंडलीकवरा । सदा तुम्हीं पूजा करा । आराध्या नामें विख्यात ॥६४॥
प्रतिवर्षीं कार्तिकीसी । येथें यावें निधरिंसी । तीर्थ असे विशेषीं । ऐसें म्हणे ब्राह्मण ॥६५॥
श्रीगुरु म्हणती भक्तासी । काशीतीर्थ प्रगटलें ऐसी । न धरावा संशय तुम्हीं मानसीं । वाराणसी प्रत्यक्ष ही ॥६६॥
ऐकोनि समस्त द्विजवर । करिती स्नान निर्मळ आचार । तेथोनि पुढें येती गुरुवर । सिद्ध सांगे नामधारका ॥६७॥
श्रीगुरु म्हणती सकळिकांसी । तीर्थ दाविती पापविनाशी । स्नानमात्रें पाप नाशी । जैसा तृणा अग्नि लागे ॥६८॥
आपुले भगिनी रत्नाईसी । दोष असे बहवसीं । बोलावोनि त्या समयासी । पुसताती श्रीगुरुमूर्ति ॥६९॥

ऐकोनि श्रीगुरुच्या बोला । पायां पडे वेळोवेळां । अज्ञान आपण मूढ केवळा । इतुकें कैसें ज्ञान मज ॥७१॥
तूं जगदात्मा विश्वव्यापक । तूंचि ज्ञानज्योतिप्रकाशक । सर्व जाणसी तूंचि एक । विस्तारोनि सांग मज ॥७२॥
श्रीगुरु म्हणती तियेसी । आपुलें पाप मज पुससी । वधिलें पांच मार्जारासी । नेणसी खूण धरीं आपुली ॥७३॥
होती मार्जारी गर्भिणी । प्रसूति झाली भांडयामधुनी । न पाहतां उदक घालुनी । झाकोनि ठेविली अग्नीवरी ॥७४॥
पांच मार्जारांचा घात । लागला दोष बहुत । ऐसें ऐकोनिया त्वरित । श्वेतकुष्ठ झाले तिसी ॥७५॥
देखोनिया भयाभीत झाली । श्रीगुरुचरणा येऊनि लागली । विनवीतसे करुणा बहाळी । कृपा करी गा गुरुमूर्ति ॥७६॥
करोनि समस्तपापराशि । तीर्थी जाती वाराणशी । मी आलें तुझे दर्शनासी । पापावेगळी होईन म्हणोनि ॥७७॥
श्रीगुरु पुसती तियेसी । तुज राहे पापराशि । पुढले जन्मीं जरी भोगिसी । तरी कुष्ठ जाईल आतां ॥७८॥
रत्नाई विनवी स्वामियासी । उबगलें बहुत जन्मासी । याचि कारणें तुझे दर्शनासी । पापावेगळें होऊं म्हणतसें ॥७९॥
आतां पुरे जन्म आपणा । म्हणोनि धरिले तुझे चरणा । याचि जन्मीं भोगीन जाणा । पापाचें फळ म्हणतसे ॥८०॥
इतुकें ऐकोनि गुरुमूर्ति । रत्नाईस निरोप देती । पापविनाश तीर्था जाय त्वरिती । स्नानमात्रें जाईल कुष्ठ ॥८१॥
नित्य करीं हो येथें स्नान । सप्तजन्मींचे दोष दहन संदेह न करितां होय अनुमान । म्हणोनि सांगती श्रीगुरु ॥८२॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । आम्हीं देखिलें दृष्टींसी । स्नान करितां त्रिरात्रीसी । कुष्ठ तिचें परिहारिलें ॥८३॥
ऐसें प्रख्यात तीर्थ देखा । नाम पापविनाशी ऐका । जे करिती स्नान भक्तिपूर्वका । सप्तजन्मींचीं पापें जाती ॥८४॥
तीर्थमहिमा देखोन । रत्नाबाई संतोषोन । राहिली मठ बांधोन । तीर्थासन्निध अवधारा ॥८५॥
पुढें कोटितीर्थ देखा । श्रीगुरु दाविती सकळिकां । स्नानमात्रें होय निका । याचें आख्यान बहु असे ॥८६॥
जंबुद्वीपीं जितकीं तीर्थें । एकेक महिमा अपरिमितें । इतुकिया वास कोटितीर्थें । विस्तार असे सांगतां ॥८७॥
सोम-सूर्य-ग्रहणासी । अथवा संक्रांतिपर्वणीसी । अमापौर्णिमा प्रतिपदेसी । स्नान तेथें करावें ॥८८॥
सवत्सेसी धेनु देखा । सालंकृत करोनि ऐका । दान द्यावें द्विजा निका । एकेक दान कोटिसरसे ॥८९॥
तीर्थमहिमा आहे कैसी । स्नान केलिया अनंत फळ पावसी । एकेक दान कोटीसरसी । दोन तीर्थी करावें ॥९०॥
पुढें तीर्थ रुद्रपद । कथा असे अतिविनोद । गयातीर्थ समप्रद । तेथें असे अवधारा । जे जे आचार गयेसी । करावे तेथें परियेसीं । पूजा करा रुद्रपदाची । कोटि जन्मींचीं पापें जाती ॥९२॥
पुढें असे चक्रतीर्थ अतिविशेष पवित्र । केशव देव सन्निध तत्र । पुण्यराशिस्थान असे ॥९३॥
या तीर्थी स्नान करिता । ज्ञान होय पतितां । अस्थि होती चक्रांकिता । द्वारावतीसमान देखा ॥९४॥
या तीर्थी स्नान करोनि । पूजा करावी केशवचरणीं । द्वारावती चतुर्गुणी । पुण्य असे अवधारा ॥९५॥
ऐकोनि श्रीगुरुचें वचन । समस्त करिती स्नान दान । पुढें असे मन्मथदहन । तीर्थ सांगती श्रीगुरु ॥९६॥
ग्रामपूर्वभागेंसी । कल्लेश्वर देव परियेसीं । जैसें गोकर्णमहाबळेश्वरासी । समान क्षेत्र परियेसा ॥९७॥
मन्मथ तीर्थी स्नान करावें । कल्लेश्वरातें पूजावें । प्रजावृद्धि होय बरवें । अष्टैश्वर्यें पाविजे ॥९८॥
आषाढ श्रावण मासीं । अभिषेक करावा देवासी । दीपाराधना कार्तिकमासीं । अनंत पुण्य अवधारा ॥९९॥
ऐसा अष्टतीर्थमहिमा । सांगती श्रीगुरु पुरुषोत्तमा । संतोषोनि भक्त उत्तमा । अति उल्हास करिताती ॥१००॥
म्हणती समस्त भक्तजन । नेणों तीर्थाचें महिमान । स्वामीं निरोपिलें कृपेनें । पुनीत केलें आम्हांसी ॥१॥
जवळी असतां समस्त तीर्थें । कां जावें दूर यात्रे । स्थान असे हें पवित्र । म्हणोनि समस्त आचरती ॥२॥
अष्टतीर्थें सांगत । श्रीगुरु गेले मठांत । समाराधना करिती भक्त । महानंद प्रवर्तला ॥३॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । तीर्थमहिमा आहे ऐसी । श्रीगुरु सांगती आम्हांसी । म्हणोनि तुज निरोपिलें ॥४॥
म्हणे सरस्वतीगंगाधर । क्षेत्र थोर गाणगापुर । तीर्थें असती अपरंपार । आचरा तुम्ही भक्तीनें ॥५॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । सिद्धमुनि-शिष्यसंवाद बहुत । गाणगापुरमाहात्म्य विख्यात । एकुणपन्नासाव्यांत कथियेलें ॥१०६॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे अमरजासंगमगाणगापुरक्षेत्रमहिमावर्णनं नाम एकोनपंचाशत्तमोऽध्यायः ॥४९॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या १०६)

श्रीगणेशाय नमः । सिद्ध म्हणे नामधारका । पुढें अपूर्व झालें ऐका । पूर्वी रंजक-कथानका । तूंतें आपण निरोपिलें ॥१॥
तयानें मागितला वर । राज्यपद धुरंधर । प्रसन्न झाले तयासी गुरुवर । दिधला वर परियेसा ॥२॥
उपजला तो म्लेंच्छ जातींत । वैदुरीनगरीं राज्य करीत । पुत्रपौत्रीं नांदत । महानंदें परियेसा ॥३॥
ऐसा राजा तो यवन । होता आपण संतोषोन । अश्व गज अपार धन । पायभारा मिति नाहीं ॥४॥
आपण तरी यातिहीन । पुण्यवासना अंतःकरण । दानधर्म करी जाण । समस्त यातीं एकभावें ॥५॥
विशेष भक्ति विप्रांवरी । ती असे पूर्वसंस्कारीं । असती देवालयें भूमीवरी । उपद्रव नेदी तयांसी ॥६॥
तया घरचे पुरोहित । तया रायातें शिकवीत । आपण होऊन म्लेंच्छ जात । देवद्विज निंदावें ॥७॥
तयांतें तुम्हीं सेवितां देख । तेणें होय अपार पातक । यातिधर्म करणें सुख । अनंत पुण्य असे जाणा ॥८॥
मंदमति द्विजजाती । देखा पाषाणपूजा करिती । समस्तांतें देव म्हणती । काष्ठवृक्षपाषाणांसी ॥९॥
धेनूसी म्हणती देवता होय । पृथ्वी सोम अग्नि सूर्य । तीर्थयात्रा नदीतोय । समस्तां देव म्हणताती ॥१०॥
ऐसे विप्र मंदमती । निराकारा साकार म्हणती । तयांतें म्लेंच्छ जे भजती । ते पावती अधःपात ॥११॥
ऐसे यवनपुरोहित । रायापुढें सांगती हित । ऐकोनि राजा उत्तर देत । कोपें करोनि परियेसा ॥१२॥
राजा म्हणे पुरोहितांसी । निरोपिलें तुम्हीं आम्हांसी । अणुरेणुतृणकाष्ठेंसी । सर्वेश्वर पूर्ण असे ॥१३॥
समस्त सृष्टि ईश्वराची । स्थावर जंगम रचिली साची । सर्वत्र देव असे साची । तर्कभेद असंख्य ॥१४॥
समस्त जातींची उत्पत्ति । जाणावी तुम्ही पंचभूतीं । पृथ्वी आप तेज वायु निगुती । आकाशापासाव परियेसा ॥१५॥
समस्तांची वृद्धि एक । जाणती मृत्तिका कुलाल लोक । नानापरीचीं करिती अनेक । भांडीं भेद परोपरी ॥१६॥
नानापरीच्या धेनु असती । क्षीर असे एकचि रीतीं । सुवर्ण जाण तेचि रीतीं । परोपरीचे अलंकार ॥१७॥
तैसा देह भिन्न जाण । परमात्मा एकचि पूर्ण । जैसा नभीं मृगलांछन । नाना घटीं दिसतसे ॥१८॥
दीप असे एक घरीं । वाती लाविल्या सहस्त्र जरी । समस्त होती दीपावरी । भिन्न भाव कोठें असे ॥१९॥
एकचि सूत्र आणोनि । नानापरीचे ओविती मणि । सूत्र एकचि जाणोनि । न पाविजे भाव भिन्न ॥२०॥
तैशा जाति नानापरी । असताती वसुंधरीं । समस्तांसी एकचि हरी । भिन्न भाव करुं नये ॥२१॥
आणिक तुम्ही म्हणाल ऐसें । पूजिती पाषाण देव कैसे । सर्वां ठायीं पूर्ण भासे । विश्वात्मा आहेचि ॥२२॥
प्रतिमापूजा स्वल्पबुद्धि । म्हणोनि सांगती प्रसिद्धीं । आत्माराम पूजिती विधीं । त्यांचे मतीं ऐसें असे ॥२३॥
स्थिर नव्हे अंतःकरण । म्हणोनि करिती प्रतिमा खूण । नाम ठेवोनि नारायण । तया नामें पूजिताती ॥२४॥
तयातें तुम्ही निंदा करितां । तरी सर्वां ठायीं पूर्ण कां म्हणतां । प्रतिष्ठाव्या आपुले मता । द्वेष आम्हीं न करावा ॥२५॥
या कारणें ज्ञानवंतीं । करुं नये निंदास्तुति । असती नानापरी जाती । आपुले रहाटीं रहाटती ॥२६॥
ऐशापरी पुरोहितांसी । सांगे राजा विस्तारेंसी । करी पुण्य बहुवसी । विश्वास देवद्विजांवरी ॥२७॥
राजा देखा येणेंपरी । होता तया वैदुरीनगरीं । पुढें त्याचे मांडीवरी । स्फोटक एक उद्भवला ॥२८॥
नानापरीचे वैद्य येती । तया स्फोटकासी लेप करिती । शमन न होय कवणे रीतीं । महादुःखें कष्टतसे ॥२९॥
ऐसें असतां वर्तमानीं । श्रीगुरु असतां गाणगाभुवनीं । विचार करिती आपुले मनीं । राजा येईल म्हणोनिया ॥३०॥
येथें येतां म्लेंच्छ लोक । होईल द्विजां उपबाधक । प्रगट झालों आतां ऐक । आम्हीं येथें असूं नये ॥३१॥
प्रगट जहाली महिमाख्याति । पहावया येती म्लेंच्छ जाति । आतां रहावें आम्हीं गुप्तीं । लौकिकार्थ परियेसा ॥३२॥
आला ईश्वरनाम संवत्सरु । सिंहेसी आला असे गुरु । गौतमी तीर्थ थोरु । यात्राप्रसंगें जावें आतां ॥३३॥
म्हणती समस्त शिष्यांसी । करा आयती वेगेंसी । येतो राजा बोलावावयासी । जावें त्वरित गंगेला ॥३४॥
ऐसें ऐकोनि शिष्यजन । विचार करिती आपआपण । जरी येईल राजा यवन । केवी होय म्हणताती ॥३५॥
ऐसा मनीं विचार करिती । काय होईल पहा म्हणती । असे नरसिंहसरस्वती । तोचि रक्षील आपणांतें ॥३६॥
येणेंपरी श्रीगुरुमूर्ति । असतां गाणगापुरीं ख्याति । राजा यवना झाली मति । पूर्वसंस्कारीं परियेसा ॥३७॥
स्फोटकाचे दुःखें राजा । अपार कष्टला सहजा । नानापरी औषधें वोजा । करितां न होय तया बरवें ॥३८॥
मग मनीं विचार करी । स्फोटकें व्यापिलें अपरंपारी । वैद्याचेनि नोहे दूरी । काय करावें म्हणतसे ॥३९॥
बोलावूनि विप्रांसी । पुसे काय उपाय यासी । विप्र म्हणती रायासी । सांगतों ऐका एकचित्तें ॥४०॥
पूर्वजन्मीं पापें करिती । व्याधिरुपें होऊन पीडिती । दानधर्में तीर्थी दैवतीं । व्याधि जाय परियेसा ॥४१॥
अथवा भल्या सत्पुरुषासी- । भजा आपण भावेंसी । तयाचे दृष्टिसुधारसीं । बरवें होईल परियेसा ॥४२॥
सत्पुरुषाचे कृपादृष्टीं । पापें जाती जन्म साठी । मग रोग कैंचा पोटीं । स्फोटकादि त्वरित जाय ॥४३॥
ऐकोनिया विप्रवचन । राजा करीतसे नमन । मातें तुम्ही न म्हणा यवन । दास आपण विप्रांचा ॥४४॥
पूर्वजन्मी आपण । केली सेवा गुरुचरण । पापास्तव झालों जाण । यवनाचे कुळीं देखा ॥४५॥
एखादा पूर्ववृत्तान्त । मातें निरोपावा त्वरित । महानुभावदर्शन होत । कवणाचा रोग गेला असे ॥४६॥
रायाचें वचन ऐकोनि । विचार करिती विप्र मनीं । सांगूं नये या स्थानीं । एकान्तस्थळ पाहिजे ॥४७॥
तुम्ही राव म्लेंच्छजाती । समस्त तुम्हां निंदा करिती । आम्ही असों द्विजजाती । केवी करावें म्हणताती ॥४८॥
विप्रवचन ऐकोन । विनवीतसे तो यवन । चाड नाहीं जातीवीण । आपणास तुम्हीं उद्धरावें ॥४९॥
ऐसें रायाचें अंतःकरण । अनुतप्त झालें असे जाण । मग निरोपिती ब्राह्मण । तया रायातें परियेसा ॥५०॥
विप्र म्हणती रायासी । स्थान बरवें पापविनाशी । जावें तुम्हीं सहजेंसी । विनोदार्थ परियेसा ॥५१॥
तेथें असे स्थळ बरवें । एकान्तस्थान पहावें । स्नान करावें मनोभावें । एकचित्तें परियेसा ॥५२॥
ऐकोनिया विप्रवचन । संतोषला राजा आपण । निघाला त्वरित तेथोन । आला पापविनाश तीर्थासी ॥५३॥
समस्तांतें राहवूनि । एकला गेला तया स्थानीं । स्नान करितां तये क्षणीं । आला एक यति तेथें ॥५४॥
राजा देखोनि यतीसी । नमन करी भावेंसी । दावीतसे स्फोटकासी । म्हणे उपशमन केवी होय ॥५५॥
ऐकोनि तयाचें वचन । सांगता झाला विस्तारोन । महानुभावाच्या दर्शनें । तूंतें बरवें होय जाणा ॥५६॥
पूर्वीं याचें आख्यान । सांगेन ऐक विस्तारोन । एकचित्तें करोनि मन । ऐक म्हणती तये वेळीं ॥५७॥
अवंती म्हणिजे थोर नगरी । तेथें होता एक दुराचारी । जन्मोनिया विप्र उदरीं । अन्य रहाटीं रहातसे ॥५८॥
आपण असे मदोन्मत्त । समस्त स्त्रियांसवें रमत । स्नानसंध्या त्यजूनि निश्चित । अन्यमार्गें वागतसे ॥५९॥
ऐसें दुराचारीपणें । रहाटतसे तो ब्राह्मण । पिंगला म्हणिजे वेश्या जाण । तयेसवें वर्ततसे ॥६०॥
न करी कर्म संध्यास्नान । रात्रंदिवस वेश्यागमन । तिचे घरीं भक्षी अन्न । येणेंपरी दोष केले ॥६१॥
ऐसें असतां वर्तमानीं । ब्राह्मण होता वेश्यासदनीं । तेथें आला एक मुनि । वृषभनामा महायोगी ॥६२॥
तया देखोनि दोघें जण । करिती साष्टांग नमन । भक्तिभावें करोन । घेवोनि आलीं मंदिरांत ॥६३॥
बैसवोनिया पीठावरी । पूजा करिती षोडशोपचारीं । अर्घ्यपाद्य देवोनि पुढारी । गंधाक्षता लाविती ॥६४॥
नाना परिमळ पुष्प जाती । तया योगियासी समर्पिती । परिमळ द्रव्यें अनेक रीतीं । समर्पिलीं तया योगेश्वरा ॥६५॥
चरणतीर्थ घेऊन । पान करिती दोघेंजण । त्यांतें करविती भोजन । नानापरी पक्वान्नेंसी ॥६६॥
करवूनिया भोजन । केलें हस्तप्रक्षालन । बरवा पलंग आणोन । देती तया योगियासी ॥६७॥
तया मंचकीं निजवोन । तांबूल देती आणोन । करिती पादसंवाहन । भक्तिभावें दोघेंही ॥६८॥
निद्रिस्त झाला योगेश्वर । दोघें करिती नमस्कार । उभें राहोनि चारी प्रहर । सेवा केली भावेंसी ॥६९॥
उदय झाला दिनकरासी । संतोषला तो तापसी । निरोप घेऊनि संतोषीं । गेला आपुल्या स्थानाप्रती ॥७०॥

पुढें तया विप्रासी । मरण आलें परियेसीं । पिंगला नाम वेश्येसी । दोघें पंचत्व पावलीं ॥७२॥
पूर्वकर्मानुबंधेंसी । जन्म झाला राजवंशीं । दशार्णवाधिपतिकुशीं । वज्रबाहूचे उदरांत ॥७३॥
तया वज्रबाहूपत्नी । नाम तिचें वसुमती । जन्मा आला तिचे पोटीं । तो विप्र परियेसा ॥७४॥
तया वज्रबाहूसी । ज्येष्ठ राणीच्या गर्भेसी । उद्भवला विप्र परियेसीं । राजा समारंभ करीतसे ॥७५॥
देखोनि तिचे सवतीसी । क्रोध आला बहु मानसीं । गर्भ झाला सपत्नीसी । म्हणोनि द्वेष मनीं धरी ॥७६॥
सर्पगरळ आणोनि । दिल्हें सवतीस नाना यत्नीं । गरळें भेदिलें अतिगहनीं । तया राजज्येष्ठ स्त्रियेसी ॥७७॥
दैवयोगें न ये मरण । सर्व शरीरीं झाले व्रण । चिंता करी अतिगहन । महाकष्ट भोगीतसे ॥७८॥
ऐशापरी राजयुवती । कष्टें झाली प्रसूति । उपजतां बाळका मातेप्रती । सर्वांग स्फोट वाहत ॥७९॥
विषें व्यापिलें सर्वांगासी । म्हणोनि आक्रंदती दिवानिशीं । दुःख करी राजा क्लेशीं । म्हणे काय करुं आतां ॥८०॥
देशोदेशींच्या वैद्यांसी । बोलाविती चिकित्सेसी । वेंचिती द्रव्य अपारेंसी । कांहीं केलिया बरवें नोहे ॥८१॥
तया माता बाळकासी । व्रण झाले बहुवसीं । निद्रा नाहीं रात्रीसी । सर्वांगीं कृमि पडले असती ॥८२॥
त्यांतें देखोनि रायासी । दुःख झालें बहुवसीं । निद्रा नाहीं दिवानिशीं । त्याचे कष्ट देखोनिया ॥८३॥
व्यथें करोनि मातासुत । अन्न उदक न वचे क्वचित । शरीरीं सर्व क्लेश होत । क्षीण झालें येणेंपरी ॥८४॥
राजा येऊनि एके दिवसीं । पाहे आपुले स्त्री-सुतासी । देखोनिया महाक्लेशी । दुःख करीतसे परियेसा ॥८५॥
म्हणें आतां काय करुं । केवी करणें प्रतिकारु । नाना औषधें उपचारु । करितां स्वस्थ नव्हेचि ॥८६॥
स्त्री-पुत्रांची ऐशी गति । जिवंत शवें झाली असती । यांच्या रोगासी होय शांति । केवी पाहूं म्हणतसे ॥८७॥
आतां यातें पहावयासी । कंटाळा येतो आम्हांसी । बरवें नव्हे सत्य यांसी । काय करणें म्हणतसे ॥८८॥
यांतें देखतां आम्हांसी । श्रम होती देहासी । नेवोनिया अरण्यासी । त्यांतें त्यजूं म्हणतसे ॥८९॥
जे जे असती पापीजन । त्यांतें जीवन अथवा मरण । भोगिल्यावांचोनि न सुटे जाण । आपुलें आपण भोगिजे ॥९०॥
विचार करोनि मानसीं । बोलाविलें कोळियासी । सांगतसे विस्तारेंसी । ऐका श्रोते एकचित्तें ॥९१॥
राजा म्हणे सूतासी । माझे बोल परियेसीं । नेऊनि आपुले स्त्री -पुत्रांसी । अरण्यांत ठेवावें ॥९२॥
मनुष्यांचा संचार । जेथें नसेल निर्धार । तेथें ठेवीं वेगवक्र । म्हणे राजा सूतासी ॥९३॥
येणेंपरी सूतासी । राजा सांगे विस्तारेंसी । रथा दिधला संजोगेंसी । घेऊनि गेला झडकरी ॥९४॥
तिचे दासदासी सकळ । दुःख करिती महाप्रबळ । माता पिता बंधु सकळ । समस्त प्रलाप करिताती ॥९५॥
दुःख करिती नर नारी । हा हा पापी दुराचारी । स्त्री-सुतांसी कैसेपरी । केवी यांतें मारवितो ॥९६॥
रथावरी बैसवोनि । घेवोनि गेला महारानीं । जेथें नसती मनुष्य कोणी । तेथें ठेविलीं परियेसा ॥९७॥
सूत आला परतोनि । सांगे रायासी विस्तारोनि । महाअरण्य दुर्गम वनीं । तेथें ठेविली म्हणतसे ॥९८॥
ऐकोनि राजा संतोषला । दुसरे स्त्रियेसी वृत्तान्त सांगितला । दोघांसी आनंद जाहला । वनीं राहिलीं मातासुत ॥९९॥
मातापुत्र दोघेंजण । पीडताती दुःखेंकरुन । कष्टती अन्नउदकावीण । महाघोर वनांत ॥१००॥
राजपत्नी सुकुमार । तिये शरीरीं व्रण थोर । चालूं न शके पृथ्वीवर । महाकंटक भूमीवरी ॥१॥
कडिये घेवोनि बाळकासी । जाय ती मंदगमनेंसी । आठवी आपुले कर्मांसी । म्हणे आतां काय करुं ॥२॥
तया वनीं मृगजाति । व्याघ्र सिंहादिक असती । सर्प थोर अपरिमिती । हिंडताती वनांत ॥३॥
मातें जरी व्याघ्र मारी । पापापासून होईन दुरी । पुरे आतां जन्म संसारीं । वांचोनि काय व्यर्थ जिणें ॥४॥
म्हणोनि जाय पुढें रडत । क्षणोक्षणीं असे पडत । पुत्रासहित चिंता करीत । जात असे वनमाजी ॥५॥
उदकाविणें तृषाक्रांत । देह व्रणें असे पीडित । व्याघ्रसर्पादि देखत । भयें चकित होतसे ॥६॥
देखे वेताळ ब्रह्मराक्षस । वनगज भालुका बहुवस । केश मोकळे पायांस । कांटे धोंडे लागताती ॥७॥
ऐसे महाअरण्यांत। राजश्री असे हिंडत । पुढें जातां देखिलें वनांत । गुरें चरती वाणियांचीं ॥८॥
तयांपासीं जावोनि । पुसतसे करुणावचनीं । गोरक्षकांतें विनवोनि । मागे उदक कुमारासी ॥९॥
गोरक्षक म्हणती तियेसी । जावें तुवां मंदिरासी । तेथें उदक बहुवसी । अन्न तूंतें मिळेल ॥११०॥
म्हणोनि मार्ग दाखविती । हळूहळू जाय म्हणती । राजपत्नी मार्ग क्रमिती । गेली तया ग्रामांत ॥११॥
तया ग्रामीं नरनारी । दिसताती अपरंपारी । ऐकोन आली मनोहरी । पुसे तयां स्त्रियांसी ॥१२॥
म्हणे कवण येथें राजा । संतोषी दिसे समस्त प्रजा । ऐकोनि सांगती वैश्यराजा । महाधनिक पुण्यात्मा ॥१३॥
त्याचें नांव पद्माकर । पुण्यवंत असे थोर । तूंतें रक्षील साचार । म्हणोनि सांगती तियेसी ॥१४॥
इतुकिया अवसरीं । तया वैश्याचे घरीं । दासी होत्या मनोहरी । त्याही आल्या तियेजवळी ॥१५॥
येवोनि पुसती वृत्तान्त । घेवोनि गेल्या मंदिरांत । आपल्या स्वामीसी सांगत । आद्यंतेंसीं विस्तारें ॥१६॥
तीस देखोनिया वैश्यनाथ । कृपा करी अत्यंत । नेऊनिया मंदिरांत । दिल्हें एक गृह तिसी ॥१७॥
पुसोनिया वृत्तान्त । वाणी होय कृपावंत । दिल्हें अन्नवस्त्र बहुत । नित्य तिसी रक्षीतसे ॥१८॥
ऐशी तया वैश्याघरीं । होती रायाची अंतुरी । वर्धतसे पीडा भारी । व्रण न वचे परियेसा ॥१९॥
येणेंपरी राजसती । तया वैश्याचे घरीं होती । वाढले व्रण तयांसी बहुती । प्राणांतक होतसे ॥१२०॥
वर्ततां ऐसें एके दिवसीं । मरण आलें कुमारकासी । प्रलाप करी बहुवसी । राजपत्नी तये वेळीं ॥२१॥
मूर्च्छा येऊनि तये क्षणीं । राजपत्नी पडे धरणीं । आपुलें कर्म आठवोनि । महाशोक करीतसे ॥२२॥
त्या वाणियाच्या स्त्रिया देखा । संबोखिताति ती बाळिका । कवणेंपरी तिचे दुःखा । शमन नोहे परियेसा ॥२३॥
नानापरी दुःख करी । आठवीतसे पूर्वापारी । म्हणे ताता माझ्या सौरी । कोठें गेलासी बाळका ॥२४॥
राजकुमारा पूर्णचंद्रा । माझ्या आनंदसमुद्रा । मातें धरिसी मौनमुद्रा । तूंतें काय बरवें असे ॥२५॥
मातापिता बंधुजन । सोडोनि आल्यें सकळ जाण । तुझा भरंवसा होता पूर्ण । मातें रक्षिसी म्हणोनिया ॥२६॥
मातें अनाथ करोनि । तूं जातोसि सोडोनि । मज रक्षिता नसे कोणी । प्राण त्यजीन म्हणतसे ॥२७॥
येणेंपरी राजनारी । दीर्घस्वरें रुदन करी । देखोनिया नरनारी । दुःख करिती परियेसा ॥२८॥
समस्तही दुःखाहुनी । पुत्रशोक केवळ वाहि । मातापितरांतें दाहोनि । भस्म करी परियेसा ॥२९॥
येणेंपरी दुःख करितां । ऋषभ योगी आला त्वरिता । पूर्वजन्मींच्या उपकारार्था । पातला तेथें महाज्ञानी ॥१३०॥
योगियातें देखोनि । वंदिता झाला तो वाणी । अर्घ्यपाद्य देवोनि । उत्तम स्थानीं बैसविला ॥३१॥
योगी तया अवसरीं । पुसे कवण दीर्घस्वरीं । शोक करितसे अपारीं । कवण असे म्हणतसे ॥३२॥
सविस्तर वैश्यनाथ । सांगता जाहला वृत्तान्त । योगीश्वर कृपावंत । आला तिये जवळीक ॥३३॥
म्हणे योगी तियेसी । मूढपणें दुःख करिसी । कवण जन्मला भूमीसी । कवण मेला सांग मज ॥३४॥
देह म्हणिजे विनाशी जाण । जैसा गंगेंत दिसे फेण । व्यक्ताव्यक्त सर्वेचि होय जाण । जलबुद्बुदापरी देखा ॥३५॥
पृथ्वी तेज वायु आप । आकाश मिळोनि सर्वव्याप । पंच गोठली शरीररुप । दिसत असे परियेसा ॥३६॥
पंच भूतें पांचाठायीं । निघोन जातां शून्य पाहीं । दुःख करितां अवकाश नाहीं । वृथा कां तूं दुःख करिसी ॥३७॥
गुणापासाव उत्पत्ति । निज कर्में होय निरुती । काळ नाचवी दृष्टिविकृती । वासना तयापरी जाणा ॥३८॥
मायेपासोनि माया उपजे । होय गुणें सत्त्वरजें । तमोगुणें तेथें सहजें । देहलक्षण येणेंपरी ॥३९॥
या तीन गुणांपासाव । उपजताती मनुष्यभाव । सत्त्वगुणें असती देव । रजोगुण मनुष्याचा ॥१४०॥
तामस तोचि राक्षस । जैसा गुण असे त्यास । तैसा जन्मे पिंडाभास । कधीं स्थिर नव्हेचि ॥४१॥

कल्पकोटिवर्षांवरी । जिवंत असती सुर जरी । तेही न राहती स्थिरी । मनुष्यांचा काय पाड ॥४३॥
या कारणें ज्ञानीजनें । उपजतां संतोष न करणें । मेलिया दुःख न करणें । स्थिर नव्हे देह जाणा ॥४४॥
गर्भ संभवें जिये काळीं । विनाश म्हणोनि जाणती सकळीं । कोणी मरती यौवनकाळीं । क्वचिद्वार्धक्यपाणीं जाणा ॥४५॥
जैसें कर्म पूर्वार्जित । तेणेंपरी असे घडत । मायामोहें म्हणत । सुत नरदेही हे ॥४६॥
जैसें लिखित ललाटेसी । ब्रह्मदेवें लिहिलें परियेसीं । कालकर्म उल्लंघावयासी । शक्ति न होय कवणा जाणा ॥४७॥
ऐसें अनित्य देहासी । कां वो माते दुःख करिसी । तुझी पूर्वपरंपरा कैसी । सांगा आम्हां म्हणतसे ॥४८॥
तूं जन्मांतरीं जाणा । कवणा होतीस अंगना । किंवा झालीस जननी कोणा । भगिनी कोणाची सांग पां ॥४९॥
ऐसें जाणोनि मानसी । वायां कां हो दुःख करिसी । जरी बरवें तूं इच्छिसी । शरण जाईं शंकरा ॥१५०
ऐसें ऐकोनि राजयुवती । करी ऋषभयोगिया विनंति । आपणासी झाली ऐसी गति । राज्यभ्रष्ट होऊनि आल्यें ॥५१॥
मातापिता बंधुजन । सोडोनि आलें मी रान । पुत्र होता माझा प्राण । भरंवसा मज तयाचा ॥५२॥
तया जहाली ऐशी गति । आपण वांचोनि काय प्रीति । मरण व्हावें मज निश्चिती । म्हणोनि चरणीं लागली ॥५३॥
ऐसें निर्वाण देखोनि । कृपा उपजली योगियामनी । पूर्व उपकार स्मरोनि । प्रसन्न झाला तये वेळीं ॥५४॥
भस्म काढोनि तये वेळीं । लाविलें प्रेताचे कपाळीं । घालितां त्याचे मुखकमळीं । प्राण आला परियेसा ॥५५॥
बाळ बैसला उठोनि । सर्वांग झालें सुवर्णवर्णी । मातेचे व्रणही तेच क्षणीं । जाते झाले तात्काळ ॥५६॥
राजपत्नी पुत्रासहित । करी योगियासी दंडवत । ऋषभयोगी कृपावंत । आणीक भस्म प्रोक्षीतसे ॥५७॥
तात्काळ तया दोघांसी । शरीर होय सुवर्णसंकाशी । शोभायमान दिसे कैसी । दिव्य काया उभयतांची ॥५८॥
प्रसन्न झाला योगेश्वर । तये वेळीं दिधला वर । तुम्हां न होय जराजर्जर । तारुण्यरुप चिरंजीवी ॥५९॥
तुझा सुत भद्रायुषी । कीर्ति वरील बहुवशी । राज्य करील परियेसीं । पित्याहूनि अधिक जाणा ॥१६०॥
ऐसा वर देऊनि । योगी गेला तेथोनि । ऐक राजा एकमनीं । सत्पुरुषाचें महिमान ॥६१॥
सत्पुरुषाची सेवा करितां । तुझा स्फोटक जाईल त्वरिता । तुवां न करावी कांहीं चिंता । दृढ धरीं भाव एक ॥६२॥
ऐसें यतीचें वचन ऐकोनि । राजा नमन करी तये क्षणीं । विनवीतसे कर जोडोनि । कोठें असे सत्पुरुष ॥६३॥
मातें निरोपावें आतां । जाईन आपण तेथें तत्त्वतां । मजला त्यांचें दर्शन होतां । होईल बरवें म्हणतसे ॥६४॥
ऐकोनि राजाचें वचन । सांगतसे मुनि आपण । भीमातीरीं गाणागाभुवन । असे तेथें परमपुरुष ॥६५॥
तयापासीं तुवां जावें । दर्शनमात्रें होईल बरवें । ऐकोनि राजा एकभावें । निघता झाला तये वेळीं ॥६६॥
एकभावें राजा आपण । घ्यावया श्रीगुरुदर्शन । प्रयाणावरी करी प्रयाण । आला गाणगापुरासी ॥६७॥
ग्रामीं पुसे सकळिकांसी । कोण येथें एक तापसी । रुप धरिलें संन्यासी । कोठें आहे म्हणतसे ॥६८॥
भयभीत झाले सकळिक । म्हणती आतां नव्हे निक । श्रीगुरुसी पुसतों ऐक । काय करील न कळे म्हणती ॥६९॥
कोणी न बोलती तयासी । राजा कोपला बहुवसी । म्हणे आलों भेटीसी । दावा आपणा म्हणतसे ॥१७०॥
मग म्हणती समस्त लोक । श्रीगुरु अनुष्ठानस्थान असे निक । अमरजासंगमीं माध्यान्हिक । करोनि येती ग्रामातें ॥७१॥
ऐसें ऐकोनि म्लेंच्छ देखा । समस्तां वर्जूनि आपण एका । बैसोनिया आंदोलिकां । गेला तया स्थानासी ॥७२॥
दुरोनि देखतां श्रीगुरुसी । चरणीं चाले म्लेंच्छ परियेसीं । जवळी गेला पहावयासी । नमन करुनि उभा राहे ॥७३॥
श्रीगुरु म्हणती तयासी । कां रे रजका कोठें अससी । बहुत दिवशीं भेटलासी । आमचा दास होवोनिया ॥७४॥
ऐसें वचन ऐकोनि । म्लेंच्छ झाला महाज्ञानी । पूर्वजन्म स्मरला मनीं । करी साष्टांग दंडवत ॥७५॥
पादुकांवरी लोळे आपण । सद्गदित अंतःकरण । अंगीं रोमांच उठोन । आनंदबाष्पें रुदन करी ॥७६॥
पूर्वजन्मीं आठवोन देखा । रुदन करी अति दुःखा । कर जोडून विनवी ऐका । नाना परी स्तोत्र करी ॥७७॥
राजा म्हणे श्रीगुरुसी । कां उपेक्षिले आम्हांसी । झालों आपण परदेशी । चरणावेगळें केलें मज ॥७८॥
अंधकारसागरांत । कां घातलें मज येथ । मी होऊनि मदोन्मत्त । विसरलों चरण तुझे ॥७९॥
संसारसागरमायाजाळीं । बुडालों आपण दुर्मति केवळीं । सेवा न करीं चरणकमळीं । दिवांध झालों आपण ॥१८०॥
होतासि तूं जवळी निधान । न ओळखें आपण मतिहीन । तमांधकारीं वेष्टोन । तुझे चरण विसरलों ॥८१॥
तूं भक्तजनां नुपेक्षिसी । निर्धार होता माझे मानसीं । अज्ञानसागरीं आम्हांसी । कां घातलें स्वामिया ॥८२॥
उद्धरावें आतां मज । आलों आपण हेंचि काज । सेवोनि तुझे चरणरज । असेन आतां राज्य पुरे ॥८३॥
ऐसें नानापरी देखा । स्तुति करी राजा ऐका । श्रीगुरु म्हणती भक्त निका । तुझी वासना पुरेल ॥८४॥
राजा म्हणे श्रीगुरुसी । झाला स्फोटक आपणासी । व्यथा होतसे प्रयासी । कृपादृष्टीं पहावें ॥८५॥
ऐसें वचन ऐकोन । श्रीगुरु करिती हास्यवदन । स्फोटक नाहीं म्हणोन । पुसताती यवनासी ॥८६॥
राजा पाहे स्फोटकासी । न दिसे स्फोटक अंगासी । विस्मय करीतसे मानसीं । पुनरपि चरणीं माथा ठेवी ॥८७॥
राजा म्हणे स्वामियासी । तुझें प्रसन्नत्व आम्हांसी । राज्य पावलों संतोषीं । अष्टैश्वर्य माझें अवलोकावें ॥८९॥
भक्तवत्सल ब्रीद तुझें । वासना अर्थ पुरवीं माझे । इंद्रियसंसार उतरीं ओझें । लीन होईन तुझे चरणीं ॥१९०॥
श्रीगुरु म्हणती तयासी । आम्ही तापसी संन्यासी । येऊं नये तुझे नगरासी । महापातकें होती तेथें ॥९१॥
नगरीं नित्य धेनुहत्या । यवनजाति तुम्ही सत्या । जीवहिंसा मद्यपी कृत्या । वर्जावें आतां निर्धारें ॥९२॥
सर्व अंगिकार करोनि । राजा लागे दोन्ही चरणीं । म्हणे मी दास पुरातनीं । पूर्वापारीं दृष्टि देणें ॥९३॥
पूर्वी माझें जन्म रजक । स्वामीवचनें राज्य विशेख । पावोनि देखिलें नाना सुख । उणें एक म्लेंच्छजाति ॥९४॥
दर्शन होतां तुझे चरण । संतुष्ट झालें अंतःकरण । पुत्रपौत्र दृष्टीं पाहोन । मग मी राहीन तुझे सेवे ॥९५॥
ऐसें नानापरी देखा । राजा विनवी विशेखा । पाया पडे क्षणक्षणिका । अतिकाकुळती येतसे ॥९६॥
श्रीगुरु मनीं विचार करिती । पुढें होणार ऐसी गति । कलियुगीं असे दुर्जन जाति । गौप्य असतां पुढें बरवें ॥९७॥
सहज जावें सिंहस्थासी । महातीर्थ गौतमीसी । जावें हें भरंवसी । आतां आम्हीं गुप्त व्हावें ॥९८॥
ऐसें मनीं विचारुनि । श्रीगुरु निघाले संगमाहूनि । राजा आपुले सुखासनीं । बैसवी प्रीती करोनिया ॥९९॥
पादुका घेतल्या आपुले करीं । सांगातें येतसे पादचारीं । श्रीगुरु म्हणती आरोहण करीं । लोक निंदा तुज करिती ॥२००॥
राष्ट्राधिपति तुज म्हणती । जन्म तुझा म्लेंच्छजाती । ब्राह्मणसेवें तुज हांसती । जाति दूषण करितील ॥१॥
राजा म्हणे स्वामी ऐका । कैचा राजा मी रजका । तुझे दृष्टीं असे निका । लोह सुवर्ण होतसे ॥२॥
समस्तांसी राजा आपण सत्य । मी रजक तुझा भक्त । पूर्ण झाले मनोरथ । तुझें झालें दर्शन मज ॥३॥
इतुकिया अवसरीं । समस्त दळ मिळालें भारी । मदोन्मत्त अतिकुंजरी । वारु नाना वर्णांचे ॥४॥
उभा राहोनि राजा देखा । समस्त दाखवी सैन्यका । संतोष मनीं अति हरिखा । आपुलें ऐश्वर्य दाखवितसे ॥५॥
श्रीगुरु निरोपिती यवनासी । आरोहण करीं वारुवेसी । दूर जाणें असे नगरासी । निरोप आमुचा नको मोडूं ॥६॥
श्रीगुरुवचन ऐकोन । समस्त शिष्यांतें आरोहण । देता झाला तो यवन । आपण वाजीं आरुढला ॥७॥
आनंद बहु यवनाचे मनीं । हर्षनिर्भर न माये गगनीं । श्रीगुरुभेटी झाली म्हणोनि । अति उल्हास करीतसे ॥८॥
श्रीगुरुमूर्ति बोलाविती यवनासी । म्हणती झालों अतिसंतोषी । तूं भक्त केवळ गुणराशी । संतुष्ट झालों आपण आजी ॥९॥
आम्ही संन्यासी तापसी । नित्य करावें अनुष्ठानासी । तुम्हांसमागमें मार्गासी । न घडे वेळीं संध्यादिक ॥२१०॥
यासी उपाय सांगेन । अंगिकार करावा जाण । पुढें जाऊं आम्ही त्वरेनें । स्थिर यावें तुम्हीं मागें ॥११॥
पापविनाशी तीर्थासी । भेटी होईल तुम्हांसी । ऐसें म्हणोनि रायासी । अदृश्य झाले गुरुमूर्ति ॥१२॥
समस्त शिष्यांसहित । श्रीगुरु गुप्त झाले त्वरित । मनोवेगें मार्ग क्रमित । गेले वैदूरपुरासी ॥१३॥

साखरे सायंदेवाचा सुत । भेटीस आला नागनाथ । नानापरी पूजा करीत । समाराधना आरंभिली ॥१५॥
श्रीगुरु नेऊनि आपुले घरा । पूजा केली षोडशोपचारा । आरती करोनि एक सहस्त्रा । समाराधना करी बहुत ॥१६॥
इतुकें होतां झाली निशी । श्रीगुरु म्हणती नागनाथासी । सांगोनि आलों म्लेंच्छासी । पापविनाशीं भेटूं म्हणोनि ॥१७॥
जाऊं आतां तया स्थानासी । राहतां यवन येईल परियेसीं । उपद्रव होईल ब्राह्मणांसी । विप्रघरा म्लेंच्छ येती ॥१८॥
ऐसें सांगोनि आपण । गेले पापविनाशीं जाण । शुभासनीं बैसोन । अनुष्ठान करीत होते ॥१९॥
इतुकिया अवसरीं । राजा इकडे काय करी । गुरुनाथ न दिसती दळभारीं । मनीं चिंता बहु वर्तली ॥२२०॥
म्हणे कटकटा काय झालें । गुरुनाथें मज उपेक्षिलें । काय सेवे अंतर पडलें । तेणें गेले निघोनिया ॥२१॥
मागुती मनीं विचारी । पुढें जातों म्हणोनि येरी । पापविनाशी तीर्थातीरीं । भेटी देतों म्हणितलें ॥२२॥
न कळे महिमान श्रीगुरुचें । कोण जाणें मनोगत त्यांचें । दैव बरवें होतें आमुचें । म्हणोनि चरणांचें दर्शन झालें ॥२३॥
राजस्फोटक होता मज । आलों होतों याचि काज । कृपानिधि श्रीगुरुराज । भेटी झाली पुण्य माझें ॥२४॥
पुढें गेले निश्चित । म्हणोनि मनीं विचार करित । दिव्य अश्वावरी आरुढोनि त्वरित । निघाला राजा परियेसा ॥२५॥
चतुश्चत्वारिंशत् क्रोश देखा । राजा पातला दिवसें एका । पापविनाशी तीर्थीं देखा । अवलोकितसे श्रीगुरुसी ॥२६॥
विस्मय करी अति मानसीं । येऊनि लागला चरणांसीं । विनवीतसे भक्तींसी । गृहाप्रति यावें म्हणतसे ॥२७॥
नगर सर्व श्रृंगारिलें । प्रवाळ-मोतियां तोरण केलें । गुडिया मखर उभारविलें । समारंभ थोर नगरांत ॥२८॥
बैसवोनिया पालखींत । आपण चरणचालीं येत । नवरत्न असे ओवाळित । नगर लोक आरत्या आणिती ॥२९॥
ऐशा समारंभें राजा देखा । घेऊनि गेला गुरुनायका । विस्मय झाला सकळ लोकां । महदाश्चर्य म्हणताती ॥२३०॥
लोक म्हणती म्लेंच्छजाती । पहा हो विप्रपूजा करिती । राजा अनाचारी म्हणती । जातिधर्म सांडिला आजी ॥३१॥
ज्याचें पाहूं नये मुख । त्याची सेवा करी देख । राजा नष्ट म्हणोनि सकळिक । म्लेंच्छजाती बोलती ॥३२॥
विप्रकुळ समस्त देख । संतोष करिती अतिकौतुक । राजा झाला विप्रसेवक । आतां बरवें राज्यासी ॥३३॥
ऐसा राव असतां । महाराष्ट्रधर्मीं वर्ततां । आपुला द्वेष तत्त्वतां । न करील जाण पां ॥३४॥
ऐसा राजा असतां बरवें । ज्ञानवंत असे स्वभावें । ब्रह्मद्वेषी नव्हे पहावें । पुण्यश्लोक म्हणती ऐसा ॥३५॥
नगरलोक पहावया येती । नमस्कारिती अतिप्रीतीं । राजे चरणचालीं येती । लोक म्हणती आश्चर्य ॥३६॥
एक म्हणती हा होय देव । म्हणोनि भजतो म्लेंच्छराव । या कलियुगीं अभिनव । देखिलें म्हणताती सकळिक ॥३७॥
सवें वाजंत्र्यांचे गजर । बंदीजन वाखाणिती अपार । राजा हर्षें निर्भर । घेऊनि जातो गुरुसी ॥३८॥
नानापरीचीं दिव्य वस्त्रें । वांटीतसे राजा पवित्रें । द्रव्य ओवाळुनि टाकी पात्रें । भिक्षुक तुष्टले बहुत देखा ॥३९॥
ऐशा समारंभें देखा । घेऊनि गेला राजा ऐका । महाद्वारीं पातले सुखा । पायघडया अंथरती ॥२४०॥
नानापरीचीं दिव्यांबरें । मार्गीं अंथरती अपारें । वाजती भेरी वाजंत्रें । राजगृहा पातले ॥४१॥
मरासिंहासनस्थानीं । श्रृंगार केला अतिगहनीं । जगद्गुरुतें नेऊनि । सिंहासनीं बैसविलें ॥४२॥
राजमंदिरींच्या नारी । आरत्या घेऊनिया करीं । ओवाळिती हर्षनिर्भरीं । अनन्यभावें करोनियां ॥४३॥
समस्त लोक बाहेर ठेवोन । श्रीगुरु होते एकले आपण । सवें शिष्य चवघेजण । जवळी होते परियेसा ॥४४॥
अंतःपुरींचे कुलस्त्रियांसी । पुत्रपौत्रीं सहोदरासी । भेटविलें राजें परियेसीं । साष्टांगीं नमन करिती ते ॥४५॥
राजा विनवी स्वामियासी । पुण्यें देखिलें चरणांसी । न्याहाळावें कृपादृष्टीसी । म्हणोनि चरणीं लागला ॥४६॥
संतोषले श्रीगुरुमूर्ति । तयांसी आशीर्वाद देती । राजयातें बोलाविती । पुसताती गृहवार्ता ॥४७॥
श्रीगुरु म्हणती तयासी । संतुष्ट झालास कीं मानसीं । अजूनि व्हावें कांहीं भावेंसी । विस्तारोनि सांग म्हणती ॥४८॥
राजा विनवी स्वामियांसी । अंतर पडतें चरणासी । राज्य केलें बहुवसीं । आतां द्यावी चरणसेवा ॥४९॥
ऐसें ऐकोनि श्रीगुरु म्हणती । आमुची भेटी श्रीपार्वतीं । तुझे पुत्र राज्य करिती । तुवां यावें भेटीसी ॥२५०॥
ऐसा निरोप देऊनि । श्रीगुरु निघाले तेथोनि । राजा विनवी चरण धरोनि । ज्ञान मजला असावें ॥५१॥
कृपासिंधु गुरुनाथ । ज्ञान होईल ऐसें म्हणत । आपण निघाले त्वरित । गेले गौतमी- तीरासी ॥५२॥
स्नान करोनि गौतमीसी । आले गाणगापुरासी । आनंद झाला समस्तांसी । श्रीगुरुचरणदर्शनें ॥५३॥
संतुष्ट झाले समस्त लोक । पहावया येती कौतुक । वंदिताती सकळिक । आरती करिती मनोभावें ॥५४॥
समस्त शिष्यांतें बोलाविती । श्रीगुरु त्यांसी निरोपिती । प्रगट झाली बहु ख्याति । आतां रहावें गुप्तरुपें ॥५५॥
यात्रारुपें श्रीपर्वतासी । निघावें आतां परियेसीं । प्रगट बोले हेचि स्वभावेंसी । गुप्तरुपें राहूं तेथें ॥५६॥
स्थान आपुलें गाणगापुरीं । येथूनि न वचे निर्धारीं । लौकिकमतें अवधारीं । बोल करितों श्रीशैलयात्रा ॥५७॥
प्रगट करोनिया यात्रेसी । वास निरंतर गाणगाभुवनासी । भक्तजन तारावयासी । राहूं येथें निर्धार ॥५८॥
कठिण दिवस युगधर्म । म्लेंच्छराजा क्रूरकर्म । प्रगटरुपें असतां धर्म । समस्त म्लेंच्छ येती ॥५९॥
राजा आला म्हणोनि । समस्त यवन ऐकोनि । सकळ येती मनकामनी । म्हणोनि गुप्त असावें ॥२६०॥
ऐसें म्हणोनि शिष्यांतें । सांगितलें श्रीगुरुनाथें । सिद्ध सांगे नामधारकातें । चरित्र ऐसें श्रीगुरुचें ॥६१॥
पुढें येतील दुर्दिन । कारण राज्य यवन । समस्त येती करावया भजन । म्हणोनि गुप्त राहिले ॥६२॥
लौकिकार्थ दाखवावयासी । निघाले आपण श्रीशैल्यासी । कथा असे विशेषी । सिद्ध म्हणे नामधारका ॥६३॥
गंगाधराचा सुत । सरस्वती असे विनवीत । प्रत्यक्ष असे श्रीगुरुनाथ । देखिलें असे गाणगापुरीं ॥६४॥
सद्भावें भजती भक्तजन । त्यांची कामना होईल पूर्ण । संदेह न धरीं अनुमान । त्वरित सिद्धि असे जाणा ॥६५॥
न लागतां कष्ट सायास । कामना पुरती गाणगापुरास । भक्तिभावें विशेष । कल्पवृक्ष तेथें असे ॥६६॥
जें जें कल्पिलें फळ । त्वरित पावती सकळ । धनधान्यादि विपुळ । पुत्रपौत्रादि शीघ्र होती ॥६७॥
सिद्ध म्हणे नामधारकासी । हें गुरुचरित्र दिनीं निशीं । मनोभावें वाचनेंसी । सकळ कामना पुरतील ॥६८॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । सिद्ध नामधारका सांगत । यवनाचा उद्धार येथ । तुम्हांकारणें सांगितला ॥२६९॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे सार्वभौमस्फोटकशमने ऐश्वर्यावलोकने वैदुरीप्रवेशो नाम पंचाशत्तमोऽध्यायः ॥५०॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या २६९)

श्रीगणेशाय नमः ।
नामधारक विनवी सिद्धासी । कथा सांगितली आम्हांसी । म्लेंच्छराजें श्रीगुरुसी । होतें नगरासी नेलें ॥१॥
तेथोन आले गाणगाभुवना । पुढील वर्तल्या निरुपणा । सांगा स्वामी कृपाघना । गुरुचरित्र आम्हांसी ॥२॥
सिद्ध म्हणे ऐक वत्सा । कथा असे अतिविशेषा । ऐकतां जाती सकळ दोषा । चिंतिलें काम्य पाविजे ॥३॥
राजाची भेट घेऊनि । श्रीगुरु आले गाणगाभुवनीं । योजना करिती आपुल्या मनीं । गुप्त रहावें म्हणोनिया ॥४॥
प्रगट झालों बहुवसी । राजा आला भेटीसी । उपजली भक्ति म्लेंच्छासी । नाना जाती येतील ॥५॥
म्हणोनि आतां गुप्त व्हावें । लोकमतें निघोनि जावें । पर्वतयात्रा म्हणोनि भावें । निघाले श्रीगुरु परियेसीं ॥६॥
गुप्त राहिले गाणगापुरीं । प्रगट दाविलें लोकाचारीं । निघाले स्वामी पर्वतगिरीं । शिष्यांसहित अवधारा ॥७॥
भक्तजन बोळवित । चिंता करीत अत्यंत । श्रीगुरु संबोखिती समस्त । रहावविती अतिप्रीतीनें ॥८॥
दुःख करिती सकळ जन । लागताती श्रीगुरुचरण । स्वामी आम्हांतें सोडून । केवी जातां यतिराया ॥९॥
भक्तजनांची तूं कामधेनु । आम्ही बाळक अज्ञानु । होतासि आम्हां निधानु । सोडोनि जातां श्रीगुरु ॥१०॥
नित्य तुझें करितां दर्शन । दुरितें जाती निरसून । जी जी कामना इच्छी मन । त्वरित पावे स्वामिया ॥११॥
बाळकातें सोडोनि माता । केवी जाय अव्हेरितां । तूं आमुचा मातापिता । नको अव्हेरुं म्हणताती ॥१२॥
ऐकोनि नानापरी विनंति । हांसते झाले श्रीगुरुमूर्ति । संबोखिती अतिप्रीतीं । न करा चिंता म्हणोनि ॥१३॥
आम्ही असतों याचि ग्रामीं । नित्य स्नान अमरजासंगमीं । वसों माध्यान्हीं मठधामीं । गुप्तरुपें अवधारा ॥१४॥
जे भक्त असती माझ्या प्रेमीं । त्यांतें प्रत्यक्ष दिसों आम्ही । लौकिकमतें अविद्याधर्मी । बोल करितों श्रीशैलयात्रा ॥१५॥
प्रातःस्नान कृष्णातीरीं पंचनदी वृक्ष औदुंबरीं । अनुष्ठाना बिंदुक्षेत्रीं । माध्यान्हीं येतों भीमातटीं ॥१६॥
अमरजासंगमीं स्नान करोनि । पूजा घेऊं मठीं निर्गुणीं । चिंता न करा अंतःकरणीं । म्हणोनि सांगती श्रीगुरु ॥१७॥
ऐसें सांगती समस्तांसी । संदेह न धरावा मानसीं । गाणगाभुवनीं अहर्निशीं । वसों आम्ही त्रिवाचा ॥१८॥
जे जे जन भक्ति करिती । त्यांसी आमुची अतिप्रीति । मनकामना पावती । सिद्धवाक्य असे आमुचें ॥१९॥
अश्वत्थ नव्हे कल्पवृक्ष । संगमीं असे प्रत्यक्ष । तुमच्या मनीं जें अपेक्ष । त्वरित होय पूजितां ॥२०॥
कल्पवृक्षातें पूजोनि । मग यावें आमुचे स्थानीं । पादुका ठेवितों निर्गुणी । पूजा करा मनोभावें ॥२१॥
विघ्नहर चिंतामणी । त्यातें पूजितां एकमनीं । चिंतिलें फळ तत्क्षणीं । लाभे तुम्हां अवधारा ॥२२॥
समस्त विघ्नांचा अंतक । पूजा तुम्हीं विनायक । अष्टतीर्थें असती विशेख । आचरावीं मनोभावें ॥२३॥
संतोषकारक आम्हांप्रती । त्रिकाळ करावी आरती । भक्तजन जें इच्छिती । त्वरित होय अवधारा ॥२४॥
ऐसें सांगोनि तयांसी । निघालें स्वामी परियेसीं । भक्त परतोनि मठासी । आले चिंतित पायांतें ॥२५॥
चिंतित निघती मठांत । तेथें दिसती श्रीगुरुनाथ । लोक झाले विस्मित । म्हणती वस्तु त्रैमूर्ति ॥२६॥
यासी म्हणती जे नर । ते पावती यमपूर । सत्य बोलिले निर्धार । न कळे महिमा आम्हांसी ॥२७॥
सवेंचि पाहतां न दिसे कोणी । प्रेमळ भक्त देखती नयनीं । यापरी गौप्यरुप धरोनि । राहिले श्रीगुरु मठांत ॥२८॥
दृष्टान्त दाखविला भक्तांसी । पातले आपण श्रीपर्वतासी । पाताळगंगातीरासी । राहिले स्वामी परियेसा ॥२९॥
शिष्यांतें निरोपिती अवधारा । पुष्पांचें आसन त्वरित करा । जाणें असे पैलतीरा । ऐक्य होऊं मल्लिकार्जुनीं ॥३०॥
निरोप देतां श्रीगुरुमूर्ति । आणिलीं पुष्पें शेवंती । कुमुदें कल्हारें मालती । कर्दळीपर्णें वेष्टोनि ॥३१॥
आसन केलें अतिविचित्र । घातलें गंगेमध्यें पात्र । शिष्यां सांगती वेगवक्र । जावें तुम्ही गृहासी ॥३२॥
दुःख करीत येत सकळी । यांसी सांगती श्रीगुरु चंद्रमौळी । गाणगाग्रामीं असों जवळी । भाव न धरावा दुजा तुम्ही ॥३३॥
लौकिकमतें आम्ही जातों । ऐसें दृष्टान्तीं दिसतों । भक्तजनां घरीं वसतों । निर्धार धरा मानसीं ॥३४॥
ऐसें भक्तां संबोखोनि । उठले श्रीगुरु तेथोनि । पुष्पासनीं बैसोनि । निरोप देती भक्तांसी ॥३५॥
कन्यागतीं बृहस्पति । बहुधान्य संवत्सरी ख्याति । सूर्य चाले उत्तर दिगंतीं । संक्रांति कुंभ परियेसा ॥३६॥
शिशिर ऋतु माघमासीं । असितपक्ष प्रतिपदेसी । शुक्रवारीं पुण्यदिवसीं । श्रीगुरु बैसले निजानंदीं ॥३७॥
श्रीगुरु म्हणती शिष्यांसी । जातों आम्ही निज मठासी । पावतां खूण तुम्हांसी । प्रसादपुष्पें पाठवितों ॥३८॥
येतील पुष्पें जाती शेवंती । घ्यावा प्रसाद तुम्हीं भक्तीं । पूजा करावी अखंड रीतीं । लक्ष्मी वसों तुम्हां घरीं ॥३९॥
आणिक सांगेन एक खूण । गायनीं करी जो माझें स्मरण । त्याचे घरीं असे जाण । गायनप्रीति आम्हांसी ॥४०॥
नित्य जें जन गायन करिती । त्यांवरी माझी अतिप्रीति । तयांचे घरी अखंडिती । आपण असों अवधारा ॥४१॥
व्याधि न होय त्यांचे घरीं । दरिद्र जाय त्वरित दुरी । पुत्रपौत्र श्रियाकरीं । शतायुषी नांदतील ॥४२॥
ऐकतील चरित्र माझें जरी । वाचतील नर निरंतरी । लक्ष्मी राहे त्यांचे घरीं । संदेह न धरावा मनांत ॥४३॥
ऐसें सांगोनि भक्तांसी । श्रीगुरु जहाले अदृशी । चिंता करिती बहुवशी । अवलोकिती गंगेंत ॥४४॥
ऐशी चिंता करितां थोर । तटाकीं पातले नावेकर । तिहीं सांगितला विचार । श्रीगुरु आम्हीं देखिले ॥४५॥
शिष्यवर्गासी मनोहर । व्यवस्था सांगती नावेकर । होतों आम्ही पैलतीर । तेथें देखिले मुनीश्वर ॥४६॥
संन्यास वेष दंड हातीं । नामें श्रीनृसिंहसरस्वती । निरोप दिधला आम्हांप्रती । तुम्हां सांगा म्हणोनि ॥४७॥
आम्हांस आज्ञापिती मुनि । आपण जातों कर्दळीवनीं । सदा वसों गाणगाभुवनीं । ऐसें सांगा म्हणितलें ॥४८॥
भ्रांतपणें दुःख करितां । आम्हीं देखिलें दृष्टान्ता । जात असतां श्रीगुरुनाथा । सुवर्णपादुका त्यांचे चरणीं ॥४९॥
निरोप सांगितला तुम्हांसी । जावें आपुल्या स्थानासी । सुखी असावें वंशोवंशीं । माझी भक्ति करोनि ॥५०॥
प्रसादपुष्पें आलिया । घ्यावीं शिष्यें काढोनिया । ऐसें आम्हां सांगोनिया । श्रीगुरु गेले अवधारा ॥५१॥
ऐसें सांगती नावेकर । समस्त राहिले स्थिर । हर्षें असती निर्भर । प्रसादपुष्पें पहाती ॥५२॥
इतुकिया अवसरीं । आलीं प्रसादपुष्पें चारी । मुख्य शिष्यें प्रीतिकरीं । काढोनि घेतलीं अवधारा ॥५३॥
नामधारक म्हणे सिद्धासी । मुख्य शिष्य कोण उपदेशीं । विस्तारोनिया आम्हांसी । पुष्पें कोणा लाभलीं ॥५४॥
सिद्ध म्हणे नामधारका । शिष्य बहुत गुरुनायका । असती गाणगापुरीं ऐका । गेले शिष्य आश्रमा ॥५५॥
आश्रम घेती संन्यासी । त्यांसी पाठविलें तीर्थासी । तयांचीं नामें परियेसीं । सांगेन ऐका विस्तारोन ॥५६॥
बाळकृष्णसरस्वती । उपेंद्रमाधवसरस्वती । पाठविते झाले प्रीतीं । आपण राहिले संगमीं ॥५७॥
गृहस्थधर्म शिष्य बहुत । समस्त आपुले घरीं नांदत । त्रिवर्ग आले श्रीपर्वताप्रत । चवथा होतों आपण ॥५८॥
साखरे नाम सायंदेव । कवीश्वर-युग्में पूर्वभाव । नंदी नामें नरहरी देव । पुष्पें घेतलीं चतुर्वर्गी ॥५९॥
गुरुप्रसाद घेऊन । आले शिष्य चौघेजण । तींच पुष्पें मज पूजन । म्हणोनि पुष्पें दाखविती ॥६०॥
ऐसा श्रीगुरुचा महिमा । सांगतसे अनुपमा । थोडें सांगितलें तुम्हां । अपार असे सांगतां ॥६१॥
श्रीगुरुचरित्र कामधेनु । सांगितलें तुज विस्तारोनु । दुःख दरिद्र गेलें पळोनु । ऐसें जाण निर्धारीं ॥६२॥
ऐसें श्रीगुरुचरित्र । श्रवणीं कीर्तनी अतिपवित्र । सुखें नांदती पुत्रपौत्र । लक्ष्मीवंत होती जाण ॥६३॥
धर्म अर्थ काम मोक्ष । तयांसी लाभे प्रत्यक्ष । महा आनंद उभयपक्ष । पुस्तक लिहितां सर्वसिद्धि ॥६४॥
ऐसें सिद्धें सांगितलें । नामधारक संतोषले । सकळाभीष्ट लाधलें । तात्काळिक अवधारा ॥६५॥
म्हणे सरस्वतीगंगाधर । श्रीगुरुचरित्र अतिमनोहर । ऐकतां पावती पैल पार । संसारसागरा तरोनिया ॥६६॥
श्रीगुरुचरित्र ऐकतां । सकळाभीष्टें तत्त्वतां । लाधती म्हणोनि समस्तां । ऐका म्हणे नामधारक ॥६७॥
अमृताची असे माथणी । स्वीकारितां भाविक जनीं । धर्मार्थ काम मोक्ष साधनीं । हेचि कथा ऐकावी ॥६८॥
पुत्रपौत्रां ज्यासी चाड । त्यासी हे कथा असे गोड । राहे लक्ष्मी स्थिर अखंड । श्रवणमात्रें घरीं नांदे ॥६९॥

म्हणे सरस्वतीगंगाधर । श्रोतयांसी करी नमस्कार । कथा ऐका मनोहर । सकळाभीष्टें साधती ॥७१॥
मुख्य भाव कारण । प्रेमें करितां श्रवण पठण । निजध्यास आणि मनन । प्रेमें करोनि साधिजे ॥७२॥
श्रीनृसिंहसरस्वती शंकर । त्याचे चरणीं अर्पण साग्र । त्याचेचि प्रसादें समग्र । समस्त प्रजा सुखी असती ॥७३॥
ग्रंथ ठेवावा शुद्ध स्थानीं । शुद्ध वस्त्रीं शुद्ध मनीं । नित्य पूजा करोनि । ग्रंथ गृहामाजीं ठेवावा ॥७४॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । सिद्धनामधारकसंवाद अमृत । गुरुसमाधि नाम विख्यात । एकपंचाशत्तमोऽध्यायः ॥७५॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे श्रीगुरुसमाधिगमनं नाम एकपंचाशत्तमोऽध्यायः ॥५१॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या ७५)

श्रीगणेशाय नमः ।
नामधारक विनवी सिद्धासी । श्रीगुरु निघाले शैल्ययात्रेसी । पुढें कथा वर्तली कैसी । तें विस्तारेंसी मज सांगावें ॥१॥
सिद्ध म्हणे शिष्योत्तमा । काय सांगूं सद्गुरुची महिमा । आतां वर्णनाची झाली सीमा । परी गुरुभक्तिप्रेमा नावरे ॥२॥
श्रीगुरु सिद्ध झाले जावयासी । श्रीपर्वती यात्राउद्देशीं । हा वृत्तान्त नागरिक जनासी । कळला परियेसीं तात्काळ ॥३॥
समस्त जन आले धावत । नरनारी सर्व मिळाल्या बहुत । गुरुसी प्रार्थित अनेक भक्त । श्रीपर्वतासी स्वामी कां जातां ॥४॥
आम्हांसी भासतें व्यक्त । तुम्ही अवतार करितां समाप्त । निरंतर आपण असा अव्यक्त । परिजनांसी सुव्यक्त दिसत होतां ॥५॥
तुमचे चरणांचें होतां दर्शन । पातकांचें होतसे दहन । आतां कैसें करतील जन । म्हणोनि लोटांगणें घालिती ॥६॥
पुढें आम्हांस काय गति । आम्हीं तरावें कैशा रीतीं । स्वामीचे चरण नौका होती । तेणें पार उतरत होतों ॥७॥
तुम्ही भक्तास कामधेनूपरी । कामना पुरवीत होतां बरी । म्हणोनि जगले आजवरी । याउपरी आम्हीं काय करावें ॥८॥
स्वामीकरितां गाणगापूर । झालें होतें वैकुंठपूर । आतां दीपाविणें जैसें मंदिर । तैसें साचार होईल हें ॥९॥
माउलीविणें तान्हें बाळ । कीं देवाविणें देऊळ । जळाविणे जैसें कमळ । तैसें सकळ तुम्हांविणें ॥१०॥
माता पिता सकळ गोत । इष्टमित्र कुळदैवत । सर्वही आमुचा गुरुनाथ । म्हणोनि काळ क्रमित होतों ॥११॥
आपुल्या बाळकांसी अव्हेरुनी । कैसें जातां स्वामी येथुनी । अश्रुधारा लागल्या लोचनीं । तळमळती सकळ जन ॥१२॥
तेव्हां गुरु समस्त जनांप्रती । हास्यवदन करुनि बोलती । तुम्ही जनहो मानूं नका खंती । सांगतों यथास्थित तें ऐका ॥१३॥
आम्ही असतों याचि ग्रामीं । स्नान पान करुं अमरजासंगमीं । गौप्यरुपें रहातों नियमीं । चिंता कांहीं तुम्हीं न करावी ॥१४॥
राज्य झालें म्लेंच्छाक्रांत । आम्ही भूमंडळीं विख्यात । आमुचे दर्शनास बहु येथ । यवन सतत येतील पैं ॥१५॥
तेणें प्रजेस होईल उपद्रव । आम्ही अदृश्य रहातों यास्तव । ज्यास असे दृढ भक्तिभाव । त्यास दृश्य स्वभावें होऊं ॥१६॥
लौकिकामध्यें कळावयासी । आम्ही जातों श्रीशैल्यपर्वतासी । चिंता न करावी मानसीं । ऐसें समस्तांसी संबोधिलें ॥१७॥
मठीं आमुच्या ठेवितों पादुका । पुरवितील कामना ऐका । अश्वत्थवृक्ष आहे निका । तो सकळिकांचा कल्पतरु ॥१८॥
कामना पुरवील समस्त । संदेह न धरावा मनांत । मनोरथ प्राप्त होती त्वरित । ही मात आमुची सत्य जाणा ॥१९॥
संगमीं करुनिया स्नान । पूजोनि अश्वत्थनारायण । मग करावें पादुकांचें अर्चन । मनकामना पूर्ण होतील ॥२०॥
विघ्नहर्ता विनायक । आहे तेथें वरदायक । तीर्थें असती अनेक । पावाल तुम्ही सुख अपार ॥२१॥
पादुकांची करुनि पूजा । त्रिकाळ आरती करुनि ओजा । आमुचें वचन यथार्थ समजा । म्हणोनि द्विजांसी गुरु सांगती ॥२२॥
आम्ही येथेंच रहातों मठांत । हें वचन जाणावें निश्चित । ऐसें संबोधूनि जना आद्यंत । निघाले त्वरित गुरुराज पैं ॥२३॥
समागमें जे धावले जन । त्यांचें करुन समाधान । शिष्यांसहित त्वरित गतीनें । गेले निघून श्रीगुरु ॥२४॥
लोक माघारे परतले । समस्त गुरुच्या मठासी आले । तेथें समस्तांनीं गुरु देखिले । बैसले होते निजासनीं ॥२५॥
सर्वेंचि पहातां झाले गुप्त । जन मनीं परम विस्मित । आम्ही सोडूनि आलों मार्गांत । येथें गुरुनाथ देखिले ॥२६॥
सर्वव्यापी नारायण । त्रैमूर्ति अवतार पूर्ण । चराचरी श्रीगुरु आपण । भक्तांकारणें रुप धरिती ॥२७॥
ऐसा दृष्टान्त दावूनि जनांसी । आपण गेले श्रीशैल्यासी । पावले पाताळगंगेसी । राहिले त्या दिवसीं तेथें ॥२८॥
श्रीगुरु शिष्यांसी म्हणती । मल्लिकार्जुनासी जावोनि शीघ्र गतीं । पुष्पांचें आसन यथास्थितीं । करोनि निगुती आणावें ॥२९॥
शिष्य धावले अति शीघ्र । पुन्नागादि कंद कल्हार । करवीर बकुळ चंपक मंदार । पुष्पें अपार आणिलीं ॥३०॥
त्या पुष्पांचें केलें दिव्यासन । तें गंगाप्रवाहावरी केलें स्थापन । त्यावरी श्रीगुरु आपण । बैसले ते क्षणीं परमानंदें ॥३१॥
बहुधान्य संवत्सर माघमास । कृष्णप्रतिपदा शुभ दिवस । बृहस्पति होता सिंहराशीस । उत्तर दिशे होता सूर्य पैं ॥३२॥
शिशिर ऋतु कुंभ संक्रमण । लग्नघटिका सुलक्षण । ऐसे शुभमुहूर्तीं गुरु आपण । आनंदें प्रयाण करिते झाले ॥३३॥
मध्यें प्रवाहांत पुष्पासनीं । बैसोनि शिष्यास संबोधोनि । आमुचा वियोग झाला म्हणोनि । तुम्हीं मनीं खेद न मानावा ॥३४॥
त्या गाणगापुरांत । आम्ही असोच पूर्ववत । भावता दृढ धरा मनांत । तुम्हां दृष्टान्त तेथें होईल ॥३५॥
आम्ही जातों आनंदस्थानासी । तेथें पावलों याची खूण तुम्हांसी । फुलें येतील जिनसजिनसीं । तुम्हांस तो प्रसाद ॥३६॥
पुष्पांचें करिता पूजन । तुम्हां होईल देव प्रसन्न । भक्तिभावें करावी जतन । प्राणासमान मानुनी ॥३७॥
आणिक एक ऐका युक्ति । जे कोणी माझें चरित्र गाती । प्रीतीनें नामसंकीर्तन करिती । ते मज प्रिय गमती फार ॥३८॥
मजपुढें करितील गायन । जाणोनि रागरागिणी तानमान । चित्तीं भक्तिभाव धरुन । करिती ते मज कीर्तन परमानंदें ॥३९॥
भक्त मज फार आवडती । जे माझें कथामृत पान करिती । त्यांचे घरीं मी श्रीपती । वसतों प्रीतीनें अखंडित ॥४०॥
आमुचें चरित्र जो पठण करी । त्यास लाभती पुरुषार्थ चारी । सिद्धि सर्वही त्याच्या द्वारीं । दासीपरी तिष्ठतील ॥४१॥
त्यासी नाहीं यमाचें भय । त्यास लाभ लाभे निश्चय । पुत्रपौत्रांसहित अष्टैश्वर्य । अनुभवोनि निर्भय पावे मुक्ति ॥४२॥
हें वचन मानी अप्रमाण । तो भोगील नरक दारुण । तो गुरुद्रोही जाण जन्ममरण । दुःख अनुभवणें न सुटे त्यासी ॥४३॥
या कारणें असूं द्या विश्वास । सुख पावाल बहुवस । ऐसें सांगोनि शिष्यांस । श्रीगुरु तेथूनि अदृश्य झाले ॥४४॥
शिष्य अवलोकिती गंगेंत । तों दृष्टीं न दिसती श्रीगुरुनाथ । बहुत होवोनि चिंताक्रांत । तेथें उभे तटस्थ झाले ॥४५॥
इतुकियात आला नावाडी तेथ । तो शिष्या सांगे वृत्तान्त । गंगेचे पूर्वतीरीं श्रीगुरुनाथ । जात असतां म्यां देखिले ॥४६॥
आहे वेष संन्यासी दंडधारी । काषयांबर वेष्टिलें शिरीं । सुवर्णपादुका चरणामाझारीं । कांति अंगावरी फाकतसे ॥४७॥
तुम्हांस सांगा म्हणोनि । गोष्टी सांगितली आहे त्यांनीं । त्यांचे नांवें श्रीनृसिंहमुनि । ते गोष्टी कानीं आइका ॥४८॥
कलिकाळास्तव तप्त होउनी । आपण असतों गाणगाभुवनीं । तुम्हीं तत्पर असावें भजनीं । ऐसें सांगा म्हणोनि कथिलें ॥४९॥
प्रत्यक्ष पाहिले मार्गांत । तुम्ही कां झाले चिंताक्रांत । पुष्पें येतील जळांत । घेऊनि निवांत रमावें ॥५०॥
नावाडी यानें ऐसें कथिलें । त्यावरुनि शिष्य हर्षले । इतुकियांत गुरुप्रसाद फुलें । आलीं प्रवाहांत वाहत ॥५१॥
तीं परमप्रसादसुमनें । काढोनि घेतलीं शिष्यवर्गानें । मग परतले आनंदानें । गुरुध्यान मनीं करित ॥५२॥
सिद्धासी म्हणे नामधारक । पुष्पें किती आलीं प्रासादिक । शिष्य किती होते प्रमुख । तें मज साद्यंत सांगावें ॥५३॥
सिद्ध म्हणे नामधारका । तुवा भली घेतली आशंका । धन्य बा तुझ्या विवेका । होसी साधक समर्थ ॥५४॥
खूण सांगतों ऐक आतां । श्रीगुरु गाणगापुरीं असता । बहुत शिष्य होते गणितां । नाठवती ते ये समयीं ॥५५॥
ज्यांणीं केला आश्रमस्वीकार । ते संन्यासी थोर थोर । तीर्थें हिंडावया गेले फार । कृष्णबाळसरस्वती प्रमुख ते ॥५६॥
जे शिष्य झाले गृहस्थ केवळ । ते आपुल्या गृहीं नांदती सकळ । तारक होते श्रीगुरुनाथ प्रबळ । भक्त अपरिमित तारिले ॥५७॥
श्रीजगद्गुरुच्या समागमीं । चारीजण होतों आम्ही । सायंदेव नंदी नरहरी मी । श्रीगुरुची सेवा करीत होतों ॥५८॥
चौघांनीं घेतलीं पुष्पें चारी । गुरुप्रसाद वंदिला शिरीं । हीं पहा म्हणोनि पुष्पें करीं । घेऊनि झडकरी दिधलीं ॥५९॥
चौघांनीं चारी पुष्पांसी । मस्तकीं धरिलीं भावेंसी । आनंद झाला नामधारकासी । गुरुप्रसाद त्याचे दृष्टीं पडला ॥६०॥
इति श्रीगुरुचरित्रामृत । सिद्ध नामधारकासी सांगत । श्रीगुरुप्रसाद झाला प्राप्त । द्विपंचाशत्तमोऽध्यायः ॥६१॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे प्रसादप्राप्तिर्नाम द्विपंचाशत्तमोऽध्यायः ॥५२॥
श्रीगुरुदत्तात्रेयार्पितमस्तु ॥
(ओवीसंख्या ६१)